
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय · हिंदुधर्म
सं. क्र. २०७७

हिंदुसमाज
संघटना आणि विघटना

REFBK-0015963

पू. ग. सहस्रबुद्धे

16 Marathi
५५४९९
१९/३/६१.
2000



...

हिंदुसमाज :
संघटना आणि विघटना

लेखक

डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे

REFBK-0015963

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २

सर्व हक्क सुरक्षित

किंमत : सहा रुपये

पहिली आवृत्ती : १९६७

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणे २

मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, ४६१।४ सदाशिव, पुणे २

घरप्रपंचाप्रमाणेच
माझ्या लेखनप्रपंचातील
यशाचे श्रेय
सौ. द्वारकाबाईस—

प्रस्तावना

भारताचा अर्वाचीन इतिहास, म्हणजे इ. स. १००० पासूनचा इतिहास, हा भारतीयांना मोठा लाजिरवाणा आणि दुःखास्पद आहे. हा इतिहास म्हणजे हिंदूंच्या पराभवाचा व पारतंत्र्याचा इतिहास आहे. विजयनगर, मराठे, असे काही अपवाद त्यात आहेत; पण ते अपवाद म्हणावे लागतात यावरूनच त्यांचे मूळ स्वरूप स्पष्ट होते. आणि हे अपवादही राजकीय क्षेत्रातले आहेत. इतर क्षेत्रांतला पराभव फारच लज्जास्पद आहे. साधारण तेराव्या शतकापासून एकुणिसाव्या शतकापर्यंत पाचसहाशे वर्षांच्या काळात या भूमीच्या कुशीत या अन्य क्षेत्रांत कोणी व्यास, वाल्मीकी, यास्क, पाणिनी, वराहमिहिर, आर्यभट्ट, कालिदास, शूद्रक, बुद्ध, महावीर, शंकराचार्य यांसारखा थोर पुरुष निपजलाच नाही; पण पुढे पाश्चात्यविद्या या भूमीत प्रसृत झाल्यानंतर मात्र राममोहन राय, रानडे, टिळक, सावरकर, जगदीशचंद्र, प्रफुल्लचंद, रवीन्द्रनाथ, शरद्बाबू, महात्माजी, पंडितजी यांच्या रूपाने ती महापुरुषपरंपरा पुन्हा येथे अवतरू लागली.

याची कारणमीमांसा करून ती ग्रंथरूपाने मांडावी असे फार दिवस मनात होते. 'महाराष्ट्रसंस्कृती' हा जो ग्रंथ सध्या मी लिहीत आहे त्याच्यासाठी प्राचीन इतिहासाचे वाचन चालू असताना ती कारणमीमांसा मनात तयार होत होती. त्याच वेळी विश्वहिंदुपरिषदेचे सरचिटणीस श्री. दादासाहेब आपटे यांनी परिषदेच्या उद्दिष्टांच्या अनुरोधाने मी काही लिहावे अशी सूचना केली. हा विषय मनात होताच. तेव्हा त्यावर एक लेख लिहावा असे ठरवून १९६५ च्या मे महिन्यात मी त्याचा आराखडा करू लागलो. त्याच वेळी कमीत कमी चार तरी लेख होतील असे ध्यानात आले. प्रत्यक्षात चारांचे आठ प्रदीर्घ लेख होऊन आज त्याला अडीचशे पानांच्या प्रबंधाचे रूप आले आहे. हे सर्व लेख जुलै १९६५ ते सप्टेंबर १९६६ या वर्ष सवा वर्षाच्या काळात 'वसंत' मासिकात प्रसिद्ध झालेले आहेत. तेच आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहेत.

हिंदूंच्या दीर्घकालीन पारतंत्र्यास आणि त्यांच्या सर्वांगीण अधःपातास या अर्वाचीन काळात येथल्या शास्त्री-पंडितांनी सनातन हिंदुधर्माला जे हीन व विकृत रूप दिले होते तेच प्रामुख्याने कारणीभूत आहे, असा या प्रबंधाचा मुख्य सिद्धान्त आहे. प्राचीन काळापासून धार्मिक विचारांचे दोन प्रवाह या भूमीत

चालू आहेत. त्यांतील एक प्रवाह समाजाला उपकारक, त्याच्या कर्तृत्वाला पोषक आणि सर्व प्रकारे तेज, प्रज्ञा, बुद्धी, पराक्रम यांना संवर्धक असा असून दुसरा सर्व दृष्टींनी समाजविघातक, अपकारक व अधोगामी असा आहे. बुद्धिप्रामाण्य, परिवर्तनीयता, प्रवृत्तिवाद, समता, गुणनिष्ठ चातुर्वर्ण्य, राजधर्माचे श्रेष्ठत्व, समसंधी, समाजनिष्ठा, सहकार्य, पतितशुद्धी ही पहिल्या धर्माची तत्त्वे असून शब्दप्रामाण्य, अदृष्टप्रधानता, समन्वयपद्धती, अपरिवर्तनीयता, निवृत्ती, विषमता, जन्मनिष्ठ जातिभेद, कलियुगकल्पना, वैयक्तिकता, समाजविमुखता, रूढिवाद ही जे उत्तरकालीन निबंधकार शास्त्री-पंडित त्यांच्या धर्माची तत्त्वे आहेत. इ. स. च्या दहाव्या शतकापर्यंत पहिल्या प्रवाहाचा, त्या विचारसरणीचा जनमनावर प्रभाव होता म्हणून त्या वेळेपर्यंतचा भारताचा इतिहास हा अत्यंत तेजस्वी व अभिमानास्पद असा झाला. दहाव्या शतकाच्या सुमारास त्या प्राचीन सनातन धर्माला अवकळा आली. त्या काळचे व नंतरचे धर्मशास्त्रकार हे अगदी मूढ, अविवेकी व दृष्टिशून्य असे होते. त्यांनी जे धर्मशास्त्र सांगितले त्यामुळेच ही अवकळा आली आणि त्यामुळेच या भूमीलाही अवकळा आली.

अनेक संशोधक, इतिहासवेत्ते व धर्मशास्त्रवेत्ते यांच्या आधारे हा विषय या प्रबंधाच्या पहिल्या चार प्रकरणांत मांडला आहे. पुढल्या चार प्रकरणांत आपल्या अर्वाचीन इतिहासाची मीमांसा याच दृष्टीने केली आहे. सर्व प्रकारे धर्म अधोगामी झाला असताना विजयनगरचे सम्राट व मराठे यांना हिंदुधर्म व हिंदुसंस्कृती यांचे रक्षण कसे करता आले असा प्रश्न उद्भवतो. त्यांनी काही अंशी तरी धर्मक्रान्ती केली, प्राचीन धर्मातील काही उत्कर्षकारक तत्त्वांचा अवलंब केला म्हणून त्यांना यश आले, असे त्या प्रश्नाचे उत्तर आहे. रजपूत व शीख यांच्या इतिहासाचा हाच सारार्थ आहे. या चार पराक्रमी लोकांच्या इतिहासाचा हा निष्कर्ष पाच ते सात या प्रकरणांत मांडला आहे. शेवटच्या आठव्या प्रकरणात गेल्या शंभरसवाशे वर्षांतील भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचा याच दृष्टिकोणातून विचार केला आहे. या काळात या भूमीत अपूर्व अशी धर्मक्रान्ती झाली आणि बुद्धिप्रामाण्य, प्रवृत्तिवाद, समता, गुणनिष्ठा, समसंधी या प्राचीन धर्मतत्त्वांचा येथल्या धुरीणांनी अवलंब केला. यामुळेच भारतीय समाजाला स्वातंत्र्यलढा जिंकण्याइतके सामर्थ्य प्राप्त झाले, हे अनेक इतिहासपंडितांच्या आधारे या प्रकरणात सिद्ध केले आहे. हेच उन्नतिकारक

तत्त्वज्ञान स्वातंत्र्योत्तरकाळात प्रभावी होऊन आपली लोकसत्ता दृढ व बलाढ्य होईल अशी साहजिकच सर्वांची अपेक्षा होती. पण त्या अपेक्षेचा भंग झाला आणि पुन्हा आपली लोकशाही, आपले स्वातंत्र्य, आपली संस्कृती, आपली अस्मिता यांचे रक्षण करण्यास आपण अजूनही असमर्थच आहो, असे घोर दृश्य दिसू लागले. असे का झाले याची चर्चा या आठव्या प्रकरणाच्या उत्तरार्धात करून ही भयानक आपत्ती टाळण्यासाठी भारतातील तरुणांनी कोणत्या उपायांचा अवलंब केला पाहिजे, कोणत्या मार्गांनी गेले पाहिजे याचे विवेचन शेवटी केले आहे. पाश्चात्त्य मिशनऱ्यांच्या पद्धतीने भारतीय बहुजनात मिसळून राहून प्रथम शास्त्रीपंडितांच्या विकृत धर्माचे संस्कार जनतेच्या मनावरून पुसून टाकले पाहिजेत व राममोहन राय, रानडे, टिळक, आगरकर, दयानंद, विवेकानंद, सावरकर, महात्माजी यांनी प्रारंभिलेली सर्वांगीण क्रान्ती पूर्ण केली पाहिजे, हा एकच उन्नतीचा उपाय आहे, हा एकच मार्ग आहे. आजचा विद्यार्थी सध्याच्या परिस्थितीमुळे संतप्त झाला आहे आणि तो जाळपोळ, विध्वंस या मार्गाने जात आहे. त्याने हे ध्यानात ठेवावे की टिळक, आगरकर, महात्माजी असेच संतप्त झाले होते; पण त्यांनी आपला संताप लोकजागृतीच्या रूपाने व्यक्त केला आणि त्यांत ब्रिटिशांच्या साम्राज्याची आहुती दिली. आजच्या विद्यार्थ्यांनी त्या थोर पुरुषांच्या मार्गाने जाऊन अपुरी सामाजिक, धार्मिक क्रान्ती पुरी करून पुन्हा लोकशक्ती निर्माण केली पाहिजे. येथे लोकसत्ता आली; पण तिची जबाबदारी घेण्यास समर्थ असे 'लोक'च येथे नाहीत. येथील जनता अजून सतराव्या अठराव्या शतकातच आहे. तिला जागृत, संघटित करून विसाव्या शतकात आणणे ही जबाबदारी विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची आहे. स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे यासाठी लक्ष तरुणांची एक संघटना उभारणे अवश्य आहे. आजच्या संतप्त विद्यार्थ्यांनी विवेकनिष्ठा जागृत ठेवून अशी संघटना उभारली तर भारताचे भवितव्य उजळण्याचे सामर्थ्य त्यांना सहज प्राप्त होईल.

हा प्रबंध तयार करताना मला अनेकांचे साह्य झाले आहे. माझे मित्र श्री. गं. म. साठे व प्रा. चं. शं. बरवे यांच्याकडे प्रकरण तयार झाल्यावर ते वाचण्याचे व त्यावर चर्चा करण्याचे काम होते. प्रत्येक प्रकरण त्यांच्या दृष्टिकोणातून पाहून झाल्यानंतरच मी 'वसंत'कडे धाडीत असे. त्यांच्या या परिश्रमामुळे मला माझे लेखन दुरून पाहता आले. 'वसन्त'चे संपादक श्री.

दत्तप्रसन्न काटदरे यांचा मी कायमचाच ऋणी आहे. लेखाची लांबीरुंदी, त्यातील विचारसरणी, त्याची सौम्य वा तिखट भाषा यांवर त्यांनी कधीही, कसलीही बंधने घातली नाहीत. या प्रबंधातील शेवटची दोन-तीन प्रकरणे तर नेहमीच्या लेखमर्यादेच्या दृष्टीने दुप्पट-तिप्पट लांबीची झाली आहेत; पण ती सर्व जशीच्या तशी त्यांनी छापली. त्यांचे विभाग करण्याचे त्यांनी मनातही आणले नाही. आणि हे सहकार्य आज दोन तपे ते देत आहेत. त्यांच्या ऋणाचा केवळ निर्देश करणे एवढेच मला शक्य आहे. विश्वहिंदुपरिषदेचे सरचिटणीस श्री. दादासाहेब आपटे यांचे या प्रबंधातील विचारांच्या प्रसाराला मोठेच साह्य झाले आहे. पहिल्या प्रकरणापासून त्यांनी कानडी, गुजराथी, हिंदी इ. भाषांत त्याची भाषांतरे करून ती प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली होती. बंगलोरचे 'विक्रम' साप्ताहिक व अहमदाबादचे 'साधना' साप्ताहिक यांत ही भाषांतरे येत असत. पुण्याच्या 'तरुण भारता'ने मराठीतून ही प्रकरणे सारांशरूपाने त्या त्या वेळी प्रसिद्ध केली. सध्या 'राष्ट्रधर्म' लखनौ हे मासिक व 'पांचजन्य' लखनौ हे साप्ताहिक यांत हिंदीमधून हा प्रबंध क्रमशः प्रसिद्ध होत आहे. या सर्व नियतकालिकांचे संपादक व प्रकाशक यांचा मी फार आभारी आहे.

वेदकालापासून आजपर्यंतच्या हिंदुसमाजाच्या संघटन-विघटन-तत्त्वांचा इतिहास लिहावयाचा तर त्यासाठी किती ग्रंथ लागतील याची सहज कल्पना येईल. प्रत्येक लेखकाला ग्रंथोपलब्धीची नेहमीच चिंता वाटत असते; पण मी या चिंतेतून सर्वथा मुक्त होतो. आमच्या स. प. कॉलेजच्या ग्रंथालयात मला मुक्त-द्वारच आहे. तेथले ग्रंथालय-प्रमुख डॉ. कावळे व ग्रंथपाल श्री. मेहेंदळे यांनी ग्रंथांची उणीव मला कधीच पडू दिली नाही. इतर ग्रंथालयांतून आणून किंवा विकत घेऊन त्यांनी सर्व प्रकारची पुस्तके मला पुरविली व अजूनही ते तशीच पुरवितात. पुणे विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. हिंगवे यांनी तर माझा विषय सतत मनात बागवून त्या दृष्टीने उपयुक्त अशा ग्रंथांचे व लेखांचे एक टाचणच करून ठेविले होते आणि हे साहित्य घरी पोचविण्याचीही व्यवस्था केली होती. माझे मित्र 'भारतीय संस्कृतिकोश'चे संपादक पं. महादेवशास्त्री जोशी यांनी आपले ग्रंथा-लयही मला नित्य खुले ठेविलेले आहे. 'केसरी-मराठा' ग्रंथालयाचे श्री. शंकरराव बरवे यांनीही वेळोवेळी तेथले ग्रंथ मला उपलब्ध करून दिले आहेत. इंग्लंड,

फ्रान्स येथील ग्रंथपालांच्या हकीकती मधून मधून वाचण्यात येतात. हा प्रबंध लिहिताना मला त्यांची आठवण होत असे.

माझे सर्व लेखन पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची कायमची जबाबदारी श्री. अनंतराव कुलकर्णी यांनी घेतलेलीच आहे. त्यामुळे त्यासंबंधी विवंचना करण्यात माझी शक्ती मुळीच खर्च होत नाही. मी माझा हा भाग्ययोग समजतो. कारण माझा सर्व वेळ मला त्यामुळे लेखनाला देता येतो.

कल्पना मुद्रणालयाचे मालक श्री. चिं. स. लाटकर यांना नुकतेच उत्कृष्ट छपाईबद्दल महाराष्ट्र राज्यसरकारचे पारितोषिक मिळाले आहे. ते कसे सार्थ आहे हे या ग्रंथाच्या छपाईवरून कळून येईलच. अशा सुंदर छपाईसाठी श्री. लाटकर यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

जानेवारी १९६७ पु. ग. सहस्रबुद्धे

अनुक्रमणिका

१	हिंदुसमाज समाज आहे काय ?	१–२६
२	हिंदुसमाज-संघटनातत्त्व	२७–४९
३	दोन प्रवाह	५०–७३
४	विघटना	७४–१०३
५	स्वराज्य आणि स्वधर्म	१०४–१३८
६	हिंदुपदपातशाही	१३९–१७५
७	राज्य करेगा खालसा	१७६–२१२
८	हिंदुसमाजाचे भवितव्य	२१३–२५७



हिंदुसमाज समाज आहे काय ?

विश्वहिंदुपरिषद

जानेवारी १९६६ मध्ये गंगा-यमुनांच्या संगमावर प्रयागक्षेत्री विश्वहिंदुपरिषद भरली होती. जगातल्याच नव्हे तर भारतातल्या हिंदूंची अशी परिषद प्राचीन अर्वाचीन काळी केव्हाही भरली नव्हती. त्या दृष्टीने पाहता हिंदूंच्या जीवनातील ही अत्यंत महत्त्वाची घटना होय असे म्हणावे लागेल. येथे हिंदू हा शब्द वैदिक, बौद्ध, जैन, शीख, लिंगायत या सर्व पंथांचा समावेश करणारा समाज या अर्थी योजिलेला आहे. बौद्धपंथीयांच्या काही परिषदा– संगीतिका– दोन-एक हजार वर्षांपूर्वी भरलेल्या आहेत. हिंदूंच्या विद्वत्परिषदाही मागे भरत व अजूनही भरतात. पण अखिल हिंदूंची अशी ही पहिलीच परिषद आहे. तेव्हा तिचे काही अनन्यसामान्य महत्त्व आहे हे कोणाच्याही ध्यानी येईल.

या परिषदेची वार्ता कानी येताच अशी परिषद पूर्वी केव्हाच का भरली नव्हती असा प्रश्न कोणाही विचारी माणसाच्या मनात उभा राहील. माझ्याही मनात तसाच तो उभा राहिला. 'कोणाही हिंदू-नेत्याच्या मनात तशी परिषद भरविण्याची कल्पना आली नाही म्हणून'–असे त्या प्रश्नाचे साधे उत्तर देता येईल. पण असे का झाले, अखिल हिंदूंना एकत्र आणावे, त्यांची संघटना करावी, त्यांच्यांत सामरस्य निर्माण करावे, त्यांच्या समस्या सामुदायिकरीत्या

सोडवाव्या असे हजारो वर्षांच्या या दीर्घ कालावधीत केव्हाच कोणाच्या मनात कसे आले नाही, हा प्रश्न मनाला त्रस्त करून टाकतो आणि त्याचे चिंतन करताना अनेक प्रश्न, अनेक आशंका, अनेक समस्या यांचे मोहोळच्या मोहोळ घोंघावत येऊन बुद्धीला घेरून टाकते. अखिल हिंदूंना एकत्र येऊन करण्याजोगे काही कार्यच नव्हते की काय ? सर्व हिंदूंना समान असे उद्दिष्टच या दीर्घकालात नव्हते काय ? सर्वांच्या सामुदायिक शक्तीने साधावे असे ध्येय हिंदूंच्या डोळ्यांपुढे कधी कोणी उभेच केले नाही काय ? हिंदुसमाजावर व भारतावर इतिहासपूर्वकाळापासून सतत परकीयांची आक्रमणे होत आहेत. गेली हजारो वर्षे तर या आक्रमणांमुळे हिंदुत्व, हिंदुसंस्कृती, हिंदुपरंपरा नष्टच होते की काय अशी भीती विचारवंतांच्या चित्तात घर करून राहिली आहे. असे असताना अखिल हिंदुपरिषदेची आवश्यकता हिंदु नेत्यांच्या मनाला का जाणवली नाही किंवा जाणवली असूनही सर्व हिंदु–त्यांतील वर निर्देशिलेले पंथ व त्यांतील सर्व वर्ण, जाती, उपजाती, सवर्णसमाज, अस्पृश्यसमाज–यांना समान व्यासपीठावर येणे शक्य नाही असे वाटल्यामुळे त्यांनी ती अव्यवहार्य म्हणून सोडून दिली असेल काय ? असे अनेक प्रश्न आम्हांला जाब द्या म्हणून समोर उभे राहतात. आणखी एक प्रश्न तर मनाला दंशच करून जातो. सर्व हिंदूंना समान व्यासपीठावर आणणे शक्य नाही असे मागल्या नेत्यांना वाटले असेल की, तसे आणणे निषिद्ध होय, निंद्य होय, ते धर्मविरुद्ध होय असा सिद्धान्त मनाशी असल्यामुळे त्यांनी त्या विचाराला थाराच दिला नसेल— हा तो प्रश्न होय.

विश्वहिंदुपरिषदेच्या निमित्ताने निर्माण झालेल्या या नैकविध प्रश्नांचा सर्व हिंदूंनी सम्यक् विचार करणे अवश्य आहे. या प्रश्नांची उत्तरे आपल्याला देता आली तर या परिषदेच्या भावी कार्याची दिशा आपल्याला ठरविता येईल, हिंदु समाजाला जडलेल्या व्याधींचा विचार करून काही निदान करता येईल व काही उपाययोजनेचे चिंतन करणे शक्य होईल; त्या दृष्टीने येथे काही प्रयत्न केला आहे.

या दृष्टीने चिंतन करू लागताच मनापुढे पहिला प्रश्न येतो तो हा की–

हिंदुसमाज हा समाज आहे काय ?

आजच नव्हे तर आज शंभर-दीडशे वर्षे तरी हा प्रश्न पुनः पुन्हा हिंदु विचारवंतांच्या मनाला त्रस्त करीत आहे. कोणत्याही लोकसमूहाला समाज

किंवा राष्ट्र या पदवीला जावयाचे असेल तर काही किमान अपेक्षा तरी त्याने पुऱ्या करणे अवश्य असते. अनेक सांस्कृतिक बंधनांनी, अनेक निष्ठांच्या चिवट धाग्यांनी, अनेक श्रद्धांच्या सूत्रांनी तो समूह दृढबद्ध असला पाहिजे. अनेक आचार, परंपरा, दैवते, श्रद्धास्थाने, पुण्यपुरुष, अनेक मानबिंदू , पुण्यग्रंथ ही आपणा सर्वांची एक आहेत, सर्वांना सारखीच वंद्य आहेत, ही जाणीव त्या समूहातील प्रत्येक व्यक्तीच्या ठायी जागृत असली पाहिजे. या जाणिवेमुळेच या समूहातील सर्व घटकांची सुखदुःखे एक होतात, रागद्वेष समान होतात, सर्वांचे अभिमान सुसंवादी होतात–म्हणजेच तो समूह एकरूप होतो. सर्वांचे पूर्वपरंपरांचे अभिमान एककेन्द्र असले, वर्तमान सुखदुःखे अभिन्न असली आणि भविष्यकालच्या आकांक्षा आणि ध्येये समरूप असली म्हणजे तो लोकसमूह समाज या पदवीला पात्र होतो. समूहाच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाच्या दृष्टीने याची फार आवश्यकता असते. सर्वांचे रागद्वेष, सुखदुःखे व अभिमान-स्थाने अभिन्न असली तरच समूहातील कोणाही एकावर आघात झाला तर तो स्वतःवरच झाला असे समजून सर्व समाज खवळून उठतो. आणि असा सामूहिक संताप ज्या समूहात उद्‌भवू शकतो तोच स्वसंरक्षण करू शकतो. अन्यथा तो दुबळा होऊन परक्यांच्या भक्ष्यस्थानी पडतो. आत्मरक्षणाला, स्वातंत्र्यसंरक्षणाला जो समूह समर्थ नाही त्याला समाज किंवा राष्ट्र म्हणणे शक्य नाही.

समआचारविचार, समप्रतिष्ठा, अभिन्न श्रद्धास्थाने, एकरूप ध्येयाकांक्षा या निकषांवर घासून पाहता हिंदुलोकसमूह हा समाज ठरेल काय ? कोठल्याही श्रद्धास्थानाचा, मानबिंदूचा अवमान झाला तर अखिल समाज संतप्त होऊन खवळून उठला पाहिजे, प्राणान्त प्रतिकाराला सज्ज झाला पाहिजे हे लक्षण हिंदुसमाजात दिसते काय ? आज दिसत नसले तर पूर्वी कधी दिसत होते काय ? आणि या लक्षणांनी संपन्न होऊन आत्मरक्षणाचे सामर्थ्य हिंदूंनी कधी प्राप्त करून घेतले होते काय ?

वर सांगितलेच आहे की गेली शंभर–दीडशे वर्षे तरी हिंदू विचारवंतांच्या मनाला हा प्रश्न त्रस्त करीत आहे. ज्ञानकोशकारांनी १९२० साली आपली चिंता पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे : 'भारतीय संस्कृतीची अंगे चोहोकडे पसरली, तिने अनेक लोकांवर छाप ठाकली, आणि बऱ्याच लोकसमुदायास

स्थूल एकरूपता आणली. पण ९०० वर्षांचा इतिहास पाहता विद्येविषयी होत असलेल्या दुर्लक्षामुळे, स्पर्धा करणाऱ्या आणि भारतीय संस्कृतीचा नाश करू पाहणाऱ्या इतर संस्कृतींशी भारतातील विद्वानवर्ग अपरिचित असल्यामुळे, वाढत चाललेल्या ज्ञानक्षेत्राशी असंबद्ध राहिल्याने, जगाशी स्पर्धा करण्यास योग्य असे समाजयंत्र बनविण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे आणि इतर काही कारणांनी या संस्कृतीचा दिवसेंदिवस नाश होत आहे. एकेकाळी या संस्कृतीचा पगडा बॅक्ट्रियापासून कांबोडियापर्यंत आणि खरोष्ट्रापासून फिलिपाईनपर्यंत इतका दृढ झाला होता की, हा सर्व प्रदेश म्हणजे भारतवर्षच होऊ पहात होता..... तीच संस्कृती आज नामशेष होऊ पहात आहे. आणि आपण जागरूक झाल्यास तिचे भवितव्य काय आहे या सर्व गोष्टी आपणास विचारार्ह आहेत.' (ज्ञानकोश, प्रस्तावनाखंड, विभाग १ ला, पृ. ४४)

डॉ. केतकरांच्याप्रमाणेच हिंदुसंस्कृतीविषयीची ही चिंता अनेकांनी व्यक्त केली आहे. आणि साधारणतः गेली ९०० वर्षे या समाजाला दौर्बल्य आले आहे, प्रतिकारक्षम असे समाजयंत्र बनविण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे या दीर्घ काळात या समाजाला आत्मरक्षण करण्यात, आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्यात अपयश आले आहे याविषयीही बहुतेक पंडितांचे एकमत आहे. –(चिं. वि. वैद्य-मध्ययुगीन भारत, खंड ३ रा, प्रस्तावना. द. के. केळकर –संस्कृतिसंगम, पृ. ३०४)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या १८ वर्षांचा इतिहास पाहता हिंदुसमाजाचे दौर्बल्य अगदीच उघडे होऊन वरील चिंता मनाचा जास्तच दाह करीत आहे. चीनने गिळलेला भाग आपण परत घेऊ शकलो नाही. पाकिस्तानसारखे अत्यंत क्षुद्र राष्ट्रही दिवसातून दहा वेळा आपल्या सरहद्दींचा भंग निर्भयपणे करते, आपल्या भूप्रदेशावर आक्रमण करून त्याचे लचके तोडते; आणि भारताचे नेते त्याच्या प्रतिकाराची तीव्र भाषासुद्धा बोलू धजत नाहीत. नागाप्रश्न, काश्मीरप्रश्न, आसाम, सीमाप्रश्न यांनी भारताच्या संरक्षणसामर्थ्याची सत्त्वपरीक्षाच चालविली आहे. आसामात आठ लक्ष पाकिस्तानी घुसले आहेत. त्यांना बाहेर काढण्याचेही सामर्थ्य भारताजवळ नाही. डॉ. केतकरांनी म्हटल्याप्रमाणे एकेकाळी बॅक्ट्रिया ते कांबोडिया व खरोष्ट्र ते फिलिपाइन इतका भूखंड भारतवर्ष होऊ पाहात होता. उलट आता, गेली कित्येक शतके जो भूखंड भारतवर्ष म्हणून मान्य होता,

त्यांतील भूप्रदेशही तोडले जात आहेत. सिंध गेला, बलुचिस्तान गेला, वायव्य प्रांत गेला, पंजाब निम्मा गेला, पूर्व बंगाल गेला, लडाख चीनने घेतला. काश्मीर, आसाम त्याच मार्गावर आहेत आणि आता कच्छला सुरुंग लागले आहेत. आणि या सर्व बाबतीत आपण वाटाघाटीचे दरवाजे कायम मोकळे ठेवलेले आहेत ! लवकरच हे प्रदेश वादग्रस्त ठरतील. म्हणजे आपणच तसे जाहीरपणे घोषित करू. म्हणजे ते गेले तर फारसे दुःख होणार नाही !

जे प्रांत अजून भारताच्या सत्तेखाली आहेत त्यांतही हिंदूंच्या देवतांचा, स्त्रियांचा व शिवछत्रपतींसारख्या पुण्यपुरुषांचा कोणीही केव्हाही अपमान करू शकतो. आणि अशा वेळी शांततेचा भंग होऊ नये म्हणून हिंदूंनाच अटक करण्यात येते. हे सर्व पाहून मनात प्रश्न येतो की, हिंदुसमाज हा समाज आहे काय ? या लोकसमुदायाला समाज म्हणून घेण्याचा काही हक्क आहे काय ?

प्रारंभकालापासून हिंदूंच्या इतिहासाचे विहंगमावलोकन करून या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा या प्रकरणात प्रयत्न करावयाचा आहे. हिंदुसमाज हा समाज आहे काय, आज नसल्यास पूर्वी होता काय, असल्यास कधी होता, तो कोणाच्या प्रयत्नाने झाला होता, त्याच्यात दृढता, दुर्भेद्यता किती होती, ती पुढे केव्हा व कशामुळे नष्ट झाली, आज ही संस्कृती नामशेष होऊ पहात आहे असे विचारवंतांना वाटते त्याची कारणे काय, आणि हिंदूंचे व त्यांच्या संस्कृतीचे भवितव्य काय आहे इत्यादी समस्या आपल्यापुढे आहेत. भारताच्या प्राचीन इतिहासाच्या प्रकाशात त्यांची चिकित्सा आपल्याला करावयाची आहे.

आर्य कोण ?

आर्य लोक हिंदुस्थानात बाहेरून आले की ते मूळचे येथलेच होते हा प्रश्न वादग्रस्त आहे. पण त्यात आपल्याला शिरण्याचे कारण नाही. ते येथले असोत वा बाहेरून आलेले असोत, आपल्याला त्यांच्या संस्कृतीच्या उदयकाळाची स्थिती पहावयाची आहे. सुमारे सहा हजार वर्षांपूर्वी एक पराक्रमी, प्रज्ञासंपन्न, विजिगीषु व सुसंस्कृत समाज म्हणून जेव्हा आर्य लोक भारतात उदयास येऊ लागले त्या वेळी भारतात शेकडो जमाती लहान लहान पुंज करून राहिलेल्या होत्या. द्रविड, असुर, राक्षस, वानर, दैत्य, दानव, नाग, निषाद, किरात, कैवर्त, दास, दस्यू , पुलिंद, शक, आंध्र, यवन, पणी, कांबोज, पारद, पल्हव,

खस इ. अनेक नावे आपल्याला प्राचीन संस्कृत वाङ्मयात सापडतात. येथे एका गोष्टीचा खुलासा करणे अवश्य वाटते. आतापर्यंत पंडितांनी, विशेषतः पाश्चात्त्य पंडितांनी, भारतातील प्राचीन जमातींविषयी जे संशोधन केले त्याअन्वये आर्य हा शब्द वंशवाचक समजला जात असे. त्याचप्रमाणे येथल्या मूळच्या सर्व जमाती अनार्य, दास, दस्यू, अशा मानल्या जात असत. गोरे आर्य यांनी या काळ्या अनार्यांना जिंकले व मग त्यांच्या संकरातून चारवर्णी लोक निर्माण झाले असा रूढ समज आहे. पण ही सर्व मते आता अगदी निराधार ठरली आहेत. आर्य शब्द वंश, वर्ण या अर्थी वेदांत एकदाही येत नाही. त्याचप्रमाणे त्यांनी ज्यांना जिंकले ते सर्व काळे, कुरूप, रानटी होते असेही नाही. नवे मत असे आहे की आर्य हा शब्द श्रेष्ठत्व, प्रभुत्व, सुसंस्कृतत्व याचा वाचक आहे. (शानकोश–प्रस्तावना खंड, विभाग ३ रा, प्रकरण तिसरे.) या मताच्या आधाराने त्या वेळच्या समाजघडणीचे पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

त्या प्राचीनकाळी यज्ञरूपाने अग्नीची पूजा करणारा एक थोर पराक्रमी प्रज्ञावंत व बुद्धिमान असा वर्ग येथल्याच जमातीतून उदयास आला किंवा बाहेरून येथे आला. पण यजनशीलता व तत्संबद्ध अशी वैदिक संस्कृती हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण होते. भिन्न वंश किंवा शुभ्रवर्ण हे नव्हते. आणि यज्ञसंस्था व वेदविद्या यामुळे हा वर्ग आपल्याला श्रेष्ठ व आर्य म्हणवू लागला. या वर्गात सुर होते तसेच असुरही होते. (असुर शब्दाचा एक अर्थ श्रेष्ठ देव, प्रभु असाही होता. पुढे याचे स्पष्टीकरण केले आहे.) आणि द्रविड, दैत्य, नाग या ज्या जमाती त्यांतलेही लोक लवकरच या संस्कृतीत समाविष्ट झाले. आर्यांनी याला विरोध केला नाही, एवढेच नव्हे तर तसा समावेश करून घेऊन सर्व विश्व आर्य करावयाचे–कृण्वंतो विश्वमार्यम्– ही त्यांची प्रतिज्ञाच होती. ही नुसती प्रतिज्ञाच पाहिली तरी आर्य शब्द वंशवाचक किंवा वर्णवाचक नव्हता हे ध्यानात येईल. कारण वंश किंवा वर्ण हा बदलणे शक्य नसते. सर्वांना वेदनिष्ठ यज्ञप्रधान संस्कृतीत समाविष्ट करावयाचे हाच त्या प्रतिज्ञेचा अर्थ आहे. जाती, वंश, वर्ण, जितजेतेभाव हा त्या प्रतिज्ञा करणाऱ्यांच्या स्वप्नातही नव्हता हे अगदी स्पष्ट आहे. अशा या आर्य लोकांचे व भारतातल्या इतर जमातींचे प्रारंभी घनघोर संग्राम झाले हे खरे आहे. पण आर्याआर्यांतही त्यांच्या भरत, तुर्वसु, तृत्सु, द्रुह्यू या जमातींतही संग्राम झालेले आहेत.

तेवढ्यावरून काहीच ठरत नाही. आर्य हा स्वतंत्र वंश होता हे तर मुळीच सिद्ध होत नाही.

प्राचीन काळच्या आर्य शब्दाच्या व्याख्या पहा.

कर्तव्यमाचरन् कार्यमकर्तव्यमनाचरन् ।
तिष्ठति प्रकृताचारे स वा आर्य इति स्मृतः ॥

' विहित कर्तव्य जो आचरतो, निषिद्ध, निंद्य आचरण करीत नाही व रूढ शिष्टाचार जो पाळतो त्याला आर्य म्हणावे. ' असा या वचनाचा भावार्थ आहे. ' आर्यत्व हे चारित्र्यावर अवलंबून आहे, धन किंवा विद्या यांवर नाही, ' असा महाभारतात स्पष्ट निर्वाळा दिलेला आहे.

वृत्तेन हि भव्यत्यार्यो न धनेन न विद्यया । उद्योग–९०, ५३.

तेव्हा आर्य शब्द संस्कृतिवाचक, गुणवाचक आहे, तो वंशवाचक वा वर्णवाचक नाही यात संदेह नाही.

असे हे आर्य, ज्यांच्यात द्रविड, असुर, नाग, यांचाही निश्चयाने समावेश होतो, त्यांनी आपले वर्चस्व भारतात प्रस्थापित करण्यास प्रारंभ केला तेव्हा अर्थातच अनार्य–(यज्ञवेदविरोधी) अशा ज्या जमाती त्यांच्याशी त्यांचा दीर्घकाळपर्यंत संघर्ष झाला. पण अखेरीस या आर्यांचे वर्चस्व प्रस्थापित होऊन सप्तसिंधु, पंजाब या प्रांतातून ते हळूहळू चहू दिशांना पसरू लागले व आपली यज्ञसंस्था प्रस्थापून वसाहती करू लागले. आणि कालांतराने आपले सामर्थ्य दुर्जय आहे असा आत्मप्रत्यय येताच त्यांच्यापुढे पहिली समस्या उभी राहिली ती म्हणजे या अखिल भारतीय लोकसमुदायाला एकरूपता कशी आणावी ही. ही सोडविण्यासाठी त्यांनी अनेकविध उपायांची योजना केली आणि वेद, ब्राह्मणे, आरण्यके, पुराणे, रामायण, महाभारत हे प्राचीन वाङ्मय पाहता असे दिसते की या कामात त्यांना कल्पनातीत यश आले आहे.

एकवंशीयत्व :

वर निर्देशिलेल्या प्राचीन वाङ्मयातील वंशोत्पत्तीच्या व इतर वंशविषयक कथा पाहिल्या तर आर्यांच्या आर्यीकरणाच्या इतिहासाचा बराच उलगडा होईल. कश्यप हा अत्यंत थोर ब्राह्मण होता. तो मरीचीचा पुत्र व ब्रह्मयाचा पौत्र होय. दिती व अदिती या त्याच्या दोन स्त्रिया. एकीची प्रजा ही दैत्य व

दुसरीची ती आदित्य ! या कश्यपाने प्रजापतीच्या बारा कन्यांशी विवाह केला होता आणि त्यांपासून त्याला प्रजा झाली ती कोणती ? नाग, सर्प, गरुड, राक्षस, अप्सरा ! या कथेचा स्पष्ट अर्थ असा की या नावाच्या सर्व जमाती एक तर मुळातच एक रक्ताच्या होत्या किंवा आर्यांनी या कथा निर्माण करून आपण सर्व एकवंशीय आहो अशी भावना सर्वांच्या ठायी बुद्धिपुरस्सर निर्माण केली होती. सुर आणि असुर यांच्यातील भेद असाच मनोरंजक आहे. आज असुर याचा अर्थ राक्षस, दैत्य, अत्यंत क्रूर, हिंस्र, रानटी लोक असा होतो. वेदांत या शब्दाचा हा अर्थ आहे. पण दुसराही याच्याबरोबर उलट, असाही अर्थ आहे. असुर म्हणजे परमात्मा, देवाधिदेव, असा अर्थ वेदांत सापडतो. इंद्र, वरुण, अग्नी यांनाही वेदांत असुर म्हटले आहे. शाल्व हे दैत्य होते असे महाभारतात वर्णन आहे. पण याच शाल्व घराण्यातला द्युमत्सेन-पुत्र सत्यवान हा सावित्रीचा पती होता. सत्यवान या दानवाचे, सूर्याप्रमाणे तेजस्वी, बृहस्पती-सारखा बुद्धिमान, इंद्रासारखा सामर्थ्यवान व पृथ्वीसारखा क्षमाशील, असे नारदांनी वर्णन केले आहे. आणि या दानवाला वरणारी शिबिकुलातली सावित्री तर भारतवर्षात आदर्श पतिव्रता मानलेली आहे. तीही दैत्य कुलातली होती. (महाभारत, आदि० अ. ६७, श्लोक ८, १७–अश्वपति व द्युमत्सेन हे याच शिबी व शाल्व कुळातले होते की नाही याविषयी वाद होणे शक्य आहे. पण ही दोन कुळे मूळची दैत्य होती असे या श्लोकांत स्पष्ट म्हटले आहे.)

आस्तीक हा जरत्कारू या तपःसामर्थ्यवान, महातेजस्वी अशा ब्राह्मणाचा मुलगा. त्याचेही वर्णन तपस्वी, वेदवेदांगामध्ये पारंगत, महात्मा, असे महाभारतात केलेले आहे. पण तो एका नागकन्येचा पुत्र होता. वासुकी या नागराजाची भगिनी जरत्कारू हिच्याशी या ब्राह्मण जरत्कारूने विवाह केला होता. तिचाच हा पुत्र होय. नागकुलोत्पन्न असूनही आस्तीक हा त्या काळापासून आजपर्यंत श्रेष्ठ आर्य गणला गेलेला आहे. तेव्हा सत्यवान व सावित्री यांना ते दैत्य असूनही आर्यांनी आदर्श पतिपत्नी मानले असले तर नवल नाही. कारण आर्यत्व हे गुणांवर, चारित्र्यावर अवलंबून होते, वंशावर नव्हते. आणि तसे पाहता देव आणि दैत्य यांचा वंश एकच होता. प्रल्हाद हाही दैत्यच होता. पण 'प्रल्हादश्चास्मि दैत्यानाम्' असे म्हणून गीतेत त्याला श्रेष्ठ पदवी, आर्यत्व दिलेच आहे. सौति हा रोमहर्षणाचा पुत्र. हा रोमहर्षण सूत जातीचा होता.

उत्तरकाळाचे चातुर्वर्ण्याचे शास्त्र असे की ब्राह्मण स्त्री व क्षत्रिय पुरुष यांची संतती ती सूत किंवा क्षत्रिय स्त्री व वैश्य पुरुष यांची ही संतती. कसेही म्हटले तरी हा प्रतिलोम विवाह होय. अर्थात त्यांची संतती शूद्र ठरते. अशा या शूद्र सौतीनेच पुराणज्ञान सांगितले आणि शौनकासारख्या तपोनिष्ठ ब्राह्मणाने ते श्रवण केले ! पुढील काळात हे पुष्कळांना रुचले नाही. व त्यांनी रोमहर्षण सूत हा निराळा होता असे सांगितले आहे. पण प्राचीनांना आर्यत्व गुणांवर अवलंबून आहे असे वाटत असल्यामुळे यात आक्षेपार्ह असे काहीच वाटले नाही.

म्लेंच्छ व यवन या अगदी परकीय, भारतबाह्य व हीन जमाती मानल्या जातात. पण त्यांची उत्पत्ती कशी झालेली आहे ? ययातीचे यदु, तुर्वसु, द्रुह्यु, अनु व पुरु असे पाच पुत्र. यांतील तुर्वसूचे पुत्र ते यवन व अनूचे ते म्लेंच्छ असे महाभारत सांगते.

यदोस्तु यादवा जाताः तुर्वसोर्यवनाः स्मृताः ।
द्रुह्योः सुताःतु वै भोजा अनोस्तु म्लेंछजातयः ।।

याचा अर्थ असा की अत्यंत श्रेष्ठ आर्य असे जे यादव, पौरव, भोज त्यांचे म्लेंच्छ, यवन हे अगदी रक्तसंबंधाने भाईबंद होते. (आदि. ८५–३५)

आंध्र, पुंड्र, शबर, पुलिंद व मूतिब या सर्व अनार्य जमाती. पण त्यांची उत्पत्ती कशी झाली होती ? हे सर्व विश्वामित्राचे पुत्र होते. ऐतरेय ब्राह्मण म्हणते की, 'शुनःशेपाला भाऊ मानण्याचे त्यांनी नाकारले म्हणून संतप्त होऊन विश्वामित्राने त्यांना शाप दिला व ते अनार्य झाले.' म्हणजे अत्यंत हीन गणलेली ही संतती ऋग्मंत्रांची रचना करणाऱ्या विश्वामित्राची प्रजा होती. (ऐतरेय ब्राह्मण ८–१८.)

शक–हूणांचे आर्यीकरण :

ऐतिहासिक कालात (इसवी सनाच्या पहिल्या ३–४ शतकांत) शक, यवन (ग्रीक), कुशान, हूण, या भारतावर आक्रमण करून येणाऱ्या जमातींचे आर्यीकरण कसे झाले हे पाहिले तर वेदकाळात काय व कसे घडले असेल याची चांगली कल्पना येईल. शक, कुशान, हूण, या जमाती अत्यंत हिंस्र,

क्रूर व रानटी अशा होत्या. त्या सर्व मध्य आशियातून टोळधाडीसारख्या भारतात आल्या होत्या. पण एक-दोन पिढ्यांतच त्या सुसंस्कृत झाल्या आणि वैदिक, बौद्ध हे भारतातले धर्म स्वीकारून ब्राह्मणांना भूमिदान करणे, लक्षब्राह्मण-भोजन घालणे, त्यांचे विवाह करून देणे, परमभागवत म्हणवून घेणे इ. भारतीय आचार त्यांनी स्वीकारले व कालांतराने येथल्या समाजांशी ते लोक एकरूप होऊन गेले. शिलालेख, नाणी, जयस्तंभ अशा अस्सल पुराव्यांनी हे आता निर्विवाद सिद्ध झाले आहे. वर निर्देशिलेल्या ज्या अनेक कथा, त्यांच्याकडे या दृष्टीने पाहिले तर वैदिक काळात आर्यांनी सर्व भारतीय समाजाला एकरूप करण्याचे जे प्रयत्न केले त्यांचेच स्वरूप त्या कथांतून स्पष्ट होते असे ध्यानात येईल. कनिष्काचा नातू कुशाण राजा वासुदेव हा परमभागवत म्हणून प्रसिद्ध आहे. हा इतिहास आहे. त्यावरून अशाच पद्धतीने प्राचीन आर्यांनी कश्यप, विश्वामित्र, वसिष्ठ, यदु, पुरु यांच्याशी येथील जमातींचे संबंध जोडून त्यांना वैदिकांच्या यज्ञप्रधान संस्कृतीत समाविष्ट करून घेतले, असा मागला इतिहास दिसू लागतो.

भृगु, आंगिरस, मरीची, अत्रि, वसिष्ठ, पौलस्त्य, पुलह व क्रतु ही ब्राह्मणांची आठ कुळे श्रेष्ठ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांतील पौलस्त्यापासून राक्षस, वानर, किन्नर व यक्ष या जमाती निर्माण झाल्या व पुलहापासून किंपुरुष, पिशाच्च, भूत, सिंह व वाघ अशी प्रजा निर्माण झाली. यावरून भारतातील सर्व जमाती या प्रत्यक्षात एकवंशीय असल्या पाहिजेत किंवा आर्येतर जमातींना ऐतिहासिक काळातील शककुशानांप्रमाणे आर्य संस्कृतीत समाविष्ट करताना आर्यांनी त्यांचा संबंध ब्राह्मण क्षत्रिय कुलांशी जोडून दिला असला पाहिजे, असे दिसते. शुक्राचार्य हे असुरांचे गुरु होते. आणि ययाती या आर्य क्षत्रिय राजाने त्यांची कन्या देवयानी हिच्याशी विवाह केला. त्याचप्रमाणे असुरराजा वृषपर्वा याची कन्या शर्मिष्ठा हिच्याशीही (मनाने) विवाह केला. तेव्हा ब्राह्मण, क्षत्रिय व असुर हे एकवंशीय तरी असले पाहिजेत किंवा वर्णसंकर करण्यात त्यांना कसलाही अधर्म वाटत नसला पाहिजे. देवयानी ही ब्राह्मणकन्या. ययाती हा क्षत्रिय. म्हणजे हा प्रतिलोम विवाह. पुढील काळातल्या धर्मशास्त्राप्रमाणे यांची प्रजा शूद्र होय. पण त्यांचा मुलगा यदु हा प्रसिद्ध यादव कुलाचा मूळपुरुष मानला जातो. श्रीकृष्ण त्यांच्याच कुळात झालेला आहे. महाभारतात सांगितले

आहे की, देवयानीचा पत्नी म्हणून स्वीकार करताना हा वर्णसंकर होत आहे, हे महापातक आहे, असे ययातीला वाटले. पण शुक्राचार्यांनी त्याला सांगितले की, 'हे पातक खरे, पण मी तुला त्यापासून मुक्त करतो.' आणि त्याप्रमाणे ययाती मुक्त झालाही. पुढील काळी अत्यंत भयावह मानलेल्या वर्णसंकर या पातकाची त्या मागल्या काळी इतकीच प्रतिष्ठा होती. श्रेष्ठ ब्राह्मणांना केवळ आशीर्वाद देऊन लोकांना त्या पातकातून मुक्त करता येत असे. शर्मिष्ठा ही तर असुरकन्या. तिचा तर ययातीशी शास्त्रोक्त विवाहही झालेला नव्हता. तिने फक्त मनाने त्याला वरिले होते. अर्थातच त्यांचीही संतती शूद्र होय. पण त्यांचा पुत्र पुरु हा तर पौरवकुलाचा संस्थापक व अत्यंत श्रेष्ठ असा राजा ठरला. तेव्हा अखिल भारतीय समाजाला एकरूप देताना, आर्य करून सोडताना वैदिक मंत्रांचे संस्कार करणे, भिन्नभिन्न जमातींना थोर कुळांशी निगडित करून टाकणे व प्रत्यक्ष विवाहसंबंध घडविणे, वर्णसंकर घडवून आणणे, असे तीन मार्ग आर्यांनी अनुसरले होते असे दिसते.

आर्य मिशनरी :

सर्व समाज वैदिक संस्कृतीच्या कक्षेत आणून या अखिल भारतीय लोकसमुदायाला राष्ट्रपदवीला नेण्यासाठी आर्यांनी अक्षरशः हाडाची काडे केली. आज ख्रिस्ती मिशनरी, दक्षिण अमेरिका, आफ्रिका येथील जंगलांत, तेथील रानटी जमातींत आपल्या धर्माच्या प्रसारार्थ, सर्व जगाच्या ख्रिस्ती-करणार्थ घरदार सोडून देऊन, जाऊन राहतात. जीवाचा धोका पत्करतात, संसाराचा उन्हाळा करून घेतात आणि प्रसंगी जाणूनबुजून आत्मबलिदान करतात. प्राचीनकाळी भारतात आर्यांनी हेच केले. अगस्त्य ऋषीचे उदाहरण यासाठीच प्रसिद्ध आहे. अगस्त्य हा मूळचा काशीचा. पण धर्मप्रसाराची आकांक्षा त्याला स्वस्थ बसू देईना. विंध्यपर्वताच्या दक्षिणेस अजून आर्यांचा प्रवेश झाला नव्हता. तेथल्या जमाती यज्ञसंस्थेच्या कक्षेत आल्या नव्हत्या. तेव्हा 'कृण्वंतो विश्वमार्यम्' ही प्रतिज्ञा आठवून अगस्त्य विंध्य ओलांडून दक्षिणेतल्या त्या घन, निबिड, महारण्यात प्रवेश करता झाला. आणि त्याने थेट रामेश्वरापर्यंत आश्रम स्थापन करून आर्यसंस्कृतीचा ध्वज ठायी ठायी उभा केला. हे कार्य त्याने किंवा त्याच्या कुलातील पुढील पुरुषांनी केले

असेल. पण श्रीरामचंद्र दक्षिणेत आले त्याच्यापूर्वी अनेक पिढ्या हे कार्य झाले होते यात शंका नाही. रामायणात त्याचे अगदी सविस्तर वर्णन आलेले आहे. श्रीरामचंद्र वनवासाला येण्यापूर्वीच दण्डकारण्यात शेकडो, हजारो, अक्षरशः हजारो ब्राह्मण येऊन आश्रम करून राहिले होते. व वेदाध्ययन करून, यज्ञकुंडे स्थापून अग्निपूजा करीत होते. तेथील राक्षसांना हे असह्य झाल्यामुळे ते आश्रमांवर नित्य धाड घालून त्या आश्रमांचा व ब्राह्मणांचा नाश करीत असत. अत्रि, शरभंग, सुतीक्ष्ण, अगस्त्य इ. ऋषींचे आश्रम तेथे होते. तेथे श्रीरामचंद्र गेल्यावर राक्षसांनी हजारो ब्राह्मणांना मारून टाकल्याच्या भीषण कथा ऋषींनी त्यांना सांगितल्या व आपले राक्षसांपासून रक्षण करण्याची त्यांना प्रार्थना केली. ते दक्षिणेत येऊन राहिले होते तरी रामचंद्रालाच आपला राजा मानीत होते. म्हणजे आर्यराज्याच्या विस्ताराची कल्पना त्यांच्या मनात निश्चित होती. राक्षसांनी एवढा विध्वंस केला, ब्राह्मणांचे हत्याकांड केले तरी त्यांनी आपली यज्ञ, वेद व वैदिक संस्कृती यांवरील निष्ठा लवमात्र ढळू दिली नव्हती. उलट हरप्रयत्नाने राक्षसांनाही ते वेदमंत्राची व यज्ञाची दीक्षा देत. रावण हा स्वतः यज्ञकर्ता व वेदवेत्ता होता. हनुमान लंकेत गेला त्या वेळी त्याला राक्षसांच्या घरांतून वेदमंत्रांचे घोष ऐकू आले. वालीला मारल्यानंतर सुग्रीवाला रामचंद्रांनी अभिषेक करविला तो ब्राह्मणांच्या हस्ते व वेदमंत्रांचा घोष करूनच करविला. रावणवधानंतर बिभीषणाला त्यांनी अभिषेक केला तोही समंत्रकच केला. तेव्हा विश्व आर्य करून टाकणे या ध्येयासाठीच ब्राह्मणांचे व क्षत्रियांचे प्रयत्न चालले होते हे उघड आहे.

संस्कृत– अखिल भारतीय भाषा :

पण यापेक्षा अगदी निर्णायक पुरावा म्हणजे संस्कृत भाषेचा. आर्य ऋषी व राजे जेथे जेथे गेले तेथे तेथे वेद, यज्ञसंस्था व संस्कृत भाषा ही त्रयी नेण्यास ते विसरले नाहीत. वानर, राक्षस, नाग, दैत्य या सर्वांना यज्ञदीक्षेबरोबरच ते संस्कृत भाषेचेही पाठ देत असत. रामायणात याचा एक उत्कृष्ट पुरावा आहे. श्रीरामचंद्र व लक्ष्मण ऋष्यमूक पर्वतावर गेले तेव्हा सुग्रीवाने हनुमानाला त्यांच्याकडे पाठविले. तेव्हा हनुमान त्यांच्याशी अस्खलित व

सुश्राव्य अशा संस्कृतात बोलू लागला. रामचंद्रांना ते भाषण ऐकून पराकाष्ठेचे आश्चर्य वाटले. ते लक्ष्मणाला म्हणाले–

नानृग्वेदविनीतस्य नायजुर्वेदधारिणः ।
नासामवेदविदुषः शक्यमेवं प्रभाषितुम् ॥
नूनं व्याकरणं कृत्स्नं अनेन बहुधा श्रुतम् ।
बहु व्याहरतानेन न किंचिदपशब्दितम्
—(किष्किंधा ३, ३०)

' ज्याने ऋग्वेदाचा अभ्यास केलेला नाही, ज्याने यजुर्वेद धारण केलेला नाही, आणि जो सामवेद जाणत नाही, त्याला असे भाषण करता येणे शक्य नाही. खरोखर याने व्याकरणाचा संपूर्ण अभ्यास केलेला आहे. कारण इतके दीर्घ भाषण करूनही याने एकही शब्द अशुद्ध उच्चारला नाही. '

यावरून श्रीरामचंद्रांच्या आधीच दक्षिणेत संस्कृत भाषेचा प्रसार झाला होता हे उघड आहे. अखिल भारताची एकभूमी, त्याचे एकराष्ट्र घडविण्यात संस्कृत भाषेचे फारच मोठे साह्य झाले असले पाहिजे यात शंका नाही. पुढे पुराण-काली आसेतुहिमाचल प्रत्येक प्रदेशात पंडितवर्गाची हीच भाषा होती याला तर ऐतिहासिक प्रमाणेच आहेत. बहुजनांच्या अनेक प्राकृत भाषा त्या काळीही असल्या पाहिजेत. महाभारतात तसे वर्णनच आहे.

नानाचर्मराभिच्छन्ना । नानाभाषाश्च भारत
कुशला देशभाषासु । जल्पन्तोऽन्योन्यमीश्वराः ॥

कौरव-पांडव युद्धकाळी भारतातील सर्व प्रदेशातून राजे व सैनिक आले होते. त्यांचे हे वर्णन आहे. ते अनेक भाषी होते, आपापल्या देशभाषांत कुशल होते आणि त्यांतूनच बोलत होते. पण असे असूनही वरिष्ठवर्गाची, आर्यांची अखिल भारतातली विचारविनिमयाची, ग्रंथरचनेची भाषा संस्कृतच होती. भारतात असा एकही प्रदेश नाही की जेथले शास्त्रीपंडित संस्कृत जाणीत नाहीत. इंग्रजी राज्यात सर्व भारतात इंग्रजी भाषा पसरली म्हणूनच दक्षिणेतले टिळक, रानडे, गोखले, सत्यमूर्ती, सुब्रह्मण्यम् यांचे उत्तरेतील लजपतराय, बिपिनचंद्र, मालवीय यांशी सामरस्य होऊन अखिल भारताचे एकराष्ट्र घडविणे सुलभ झाले. हेच कार्य पूर्वी संस्कृत भाषेने केले आहे. आणि त्याचे

सर्व श्रेय अखिल भारतात वेद व संस्कृत वाणी व यज्ञसंस्था यांचा प्रसार करणाऱ्या अगस्त्यप्रभृती ऋषींना व त्यांचे रक्षण करणाऱ्या श्रीराम-कृष्णांना आहे.

श्रीकृष्णांचे कार्य

अखिल भारताचे एकराष्ट्र करण्याच्या दृष्टीने श्रीकृष्णांचे कार्य फार मोठे आहे. वेद, यज्ञसंस्था, संस्कृतवाणी व एकंदर आर्यसंस्कृती यांनी एकरूप झालेल्या समाजाला एकाच सार्वभौमसत्तेखाली आणून ती ऐक्यबंधने दृढ करून टाकण्याचे महाकार्य त्यांनी केले. युधिष्ठिराने सार्वभौमसत्ता प्रस्थापित करावी अशी श्रीकृष्णांची महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठीच प्रथम त्यांनी त्याच्याकडून राजसूय यज्ञ करविला आणि भारतीय युद्धानंतर अश्वमेध करवून पांडवांची सत्ता आसेतुहिमाचल प्रस्थापित केली. युधिष्ठिर हा [अत्यंत नालायक निघाल्यामुळे कृष्णाचे मनोरथ ज्या प्रमाणात सिद्धीस जावयास हवे होते त्या प्रमाणात गेले नाहीत. युधिष्ठिराच्या अंगी कणखरपणा नव्हता, दृढनिश्चय नव्हता, तडफ नव्हती. मोठमोठी धर्मतत्त्वे बोलत राहण्याची फक्त त्याला सवय होती. पण त्यांचा अहर्निश जप करूनही द्यूत खेळू नये, राज्य व बायको पणाला लावू नये, प्रजापालन हा श्रेष्ठ धर्म होय हे काही त्याला उमगले नाही. इतका त्या व्यसनाच्या तो आहारी गेला होता. त्यामुळे भारतीय युद्ध त्याने ओढवून घेतले व श्रीकृष्णांचे मनोरथ धुळीस मिळविले. तरी त्या संहारानंतरही जमेल त्या रीतीने त्यांनी सार्वभौमसत्ता पांडवांकडून प्रस्थापित केलीच. अखिल समाज एकजीव करून टाकण्यास तिचे फारच साह्य झाले.

श्रीकृष्ण यादवकुळातले होते. आणि या कुलाने आर्यसंस्कृतिप्रसाराच्या कामी फारच मोठे कार्य केले असे इतिहासवेत्त्यांचे मत आहे. भारतीय इतिहास समितीच्या 'हिस्टरी अँड कल्चर ऑफ दी इंडियन पीपल' या ग्रंथाच्या 'दि वेदिक एज' या पहिल्या खंडात डॉ. ए. डी. पुसाळकर म्हणतात, 'भारताचा नैर्ऋत्य भाग व रजपुताना, गुजराथ, माळवा व दक्षिणापथ या प्रांतांवर आपली अधिसत्ता प्रस्थापित करून तेथे आर्यसंस्कृतीचा ध्वज उभारण्याचे जे कार्य यादवांनी केले त्याचा विशेष उल्लेख करणे अवश्य आहे. हे प्रदेश यादवांच्यामुळेच आर्यसंस्कृतीच्या कक्षेत आले. यादव

हे पुरुरवा–यदु याचे वंशज म्हणवितात. पण त्यांनी अनार्यांशी विपुल प्रमाणात विवाहसंबंध केले हे विशेष आहे. यामुळे परकीयांचे आर्यीकरण फार सुलभ झाले. यादवांचा वीर श्रीकृष्ण शिरोमणी हा अतिशय उदारमतवादी होता. त्याच्या तत्त्वोपदेशामुळे तथाकथित शूद्रसमाजात आर्यांच्या संस्कृतीचा प्रसार वेगाने झाला. यादवांच्या या उदार (म्हणजेच इतरांच्या दृष्टीने ढिल्या) धोरणामुळेच त्यांच्या काही शाखांना महाभारत व पुराणे यात असुर म्हणून संबोधिले आहे.

ते कसेही असले तरी श्रीरामचंद्र व श्रीकृष्ण हे खरे आर्यवीर होत, 'कृण्वंतो विश्वमार्यम्' या चळवळीचे ते आद्य आधारस्तंभ होत यात शंकाच नाही. त्यांची परमेश्वराच्या अवतारात गणना होते ती यासाठीच.' (दि वेदिक एज, पृ. ३१५).

यज्ञकर्ते असुर :

श्रीकृष्णांनी स्वतः जांबुवती या आर्येतर जमातीतल्या राजाच्या कन्येशी विवाह केला होता. नरकासुराने पळवून नेलेल्या सहस्रावधी स्त्रिया मुक्त करून त्यांच्याशीही त्यांनी विवाह केला हे प्रसिद्धच आहे. त्यांचा नातू अनिरुद्ध याने बाणासुराच्या कन्येचे पाणिग्रहण केले होते. बाणासुर, जरासंध, शिशुपाल हे सर्व असुर म्हणून प्रसिद्ध आहेत. पण ते सर्व यज्ञकर्ते व ब्राह्मणी-संस्कृतीचे अभिमानी होते. श्रीकृष्ण जरासंधाच्या गिरिव्रज नामक नगरीला गेले तेव्हा प्रथम ते त्याच्या राजवाड्याच्या यज्ञशाळेतच गेले. नगरीतून जाताना त्यांना वेदमंत्रांचे घोष ऐकू येत होते. श्रीकृष्ण आले तेव्हा राजधानीत अशुभ चिन्हे होऊ लागली. ती तेथील वेदपारंगत ब्राह्मणांना प्रथम दिसून आली व त्यांनीच ती राजाच्या निदर्शनास आणिली. यावरून प्रारंभी सांगितलेल्या राक्षस, वानर, दैत्य, इ. जमातींत या काळापर्यंत वैदिक संस्कृतीचे व यज्ञ-संस्थेचे मूळ चांगले खोलवर गेले होते असे दिसून येईल. आर्यसंकृतीच्या कक्षेत येऊनही काही जमातींनी रामकृष्णादी आर्यांशी वैरभाव धरला होता हे खरे पण तशी वैरे आर्याआर्यांतही होती. अखिल भारताचे आर्यीकरण करण्याच्या दृष्टीने असुरराजांची ही यज्ञभक्ती व वेदनिष्ठा लक्षणीय आहे.

भारतवर्षामधील शेकडो जमातींना एका सूत्रात गुंफून त्यांच्यातून एकजीव समाज निर्माण करण्यासाठी वेदकालीन कर्त्या पुरुषांनी कोणते प्रयत्न केले

याचा विचार येथवर केला. प्रथमतः त्यांनी हा सर्व समाज एकवंशीय आहे असा विचार मांडला. काही जमातींशी प्रत्यक्षच वैवाहिक संबंध जोडले. जेथे ते जमले नाही, तेथे अनेक ब्राह्मण व क्षत्रिय श्रेष्ठ पुरुषांच्या कुळांशी या जमातींचे सांस्कृतिक संबंध जोडून दिले. हे श्रेष्ठ पुरुष त्यांचे धर्मपिते वा गुरु वा नेते झाले. अनेक क्षत्रिय राजघराण्यांनी ज्याप्रमाणे आपले संबंध चंद्रसूर्यांशी जोडले त्याचप्रमाणे आर्यनेत्यांनी या जमातींचे धागे या पुरुषांशी जोडून दिले. हे करीत असतानाच त्यांनी यज्ञसंस्था व वेदग्रंथ यांच्याबद्दलच्या निष्ठा त्या जमातींत निर्माण केल्या. आणि सर्वांहून विशेष प्रभावी साधन म्हणजे संस्कृत भाषा! आसेतुहिमाचल शास्त्रीपंडितांमध्ये या भाषेचा त्यांनी प्रसार करून सांस्कृतिक, धार्मिक व भावनात्मक ऐक्याचे अत्यंत चिवट असे बंध निर्माण केले. यामुळे अखिल भारत ही एक भूमी आहे आणि येथला सर्व लोक-समुदाय हा एक समाज आहे ही गोष्ट भारती युद्धाच्या पूर्वीच त्यांनी सिद्ध करून टाकली होती. त्यामुळे या युद्धात क्षत्रियांचा फार भयंकर संहार झाला तरी या भूमीची खंडे झाली नाहीत, फाळणी होण्याचे महादुर्दैव तिच्या कपाळी आले नाही आणि यदाकदाचित तसा संभव निर्माण झाला असलाच तर श्रीकृष्णांनी युधिष्ठिराला अश्वमेध करण्याची प्रेरणा देऊन भारतात एक सार्वभौम सत्ता स्थापन करून मुळातच तो नष्ट करून टाकला. वेदकाळातील नेत्यांच्या प्रयत्नांचे हे स्वरूप पाहिल्यावर आता पुढल्या पुराणकाळाचा विचार करावयाचा आहे.

इतिहासपुराणे :

वेदकाळानंतर पुराणकाळ येतो असे वर म्हटले आहे. त्याचे थोडे स्पष्टीकरण करणे अवश्य आहे. वेदकाळ साधारणपणे इ. पू. ४००० ते इ. पू. १००० असा धरला जातो. रामायण–महाभारत यांना इतिहास म्हणतात. त्यांत वर्णिलेल्या घडामोडी वर सांगितलेल्या वेदकाळात घडल्या हे खरे. पण ते ग्रंथ अर्वाचीन आहेत. त्यांचा काळ इ. पू. ३०० ते २०० असा मानतात. त्यानंतर पुराणे रचली गेली. ही अठरा पुराणे साधारणपणे इ. स. ३०० ते ८०० या काळात रचली असे मत रूढ आहे. याविषयी फार मतभेद आहेत. पण आपल्या विवेचनाच्या दृष्टीने ते अप्रस्तुत आहेत. पुराणांचा काळ वर सांगितला

तो आजच्या स्थितीत जी पुराणे दिसतात त्यांचा काळ होय. मूळ पुराणरचना वेदकाळीच झाली किंवा पुराणे वेदांपूर्वीही अस्तित्वात होती हे मत आता बहुमान्य झाले आहे. पण येथे जे विवेचन करावयाचे आहे ते सध्याच्या स्वरूपात जे इतिहास व जी पुराणे दिसतात त्यांच्या आधारे करावयाचे आहे. त्यांतील कथा अतिप्राचीन काळी, वेदसमकाळी किंवा तत्पूर्वीही, घडल्या असणे पूर्ण संभवनीय आहे. पण इतिहासपुराणांचा काळ म्हणताना इ. पू. ३०० ते इ. स. ८०० हा काळ येथे अभिप्रेत आहे. आणि पुष्कळ ठिकाणी इतिहास-पुराणे असा निर्देश न करता केवळ पुराणे असे म्हटले आहे तरी तेथे दोन्ही अभिप्रेत आहेत. अशा या इतिहासपुराणांनी वेदब्राह्मण या ग्रंथांप्रमाणेच भारतीय समाज एकरूप करण्याचा जो फार मोठा प्रयत्न केला त्याचे स्वरूप आता पाहावयाचे आहे.

वेदोत्तर व पुराणपूर्वकाळात भारतात फार मोठ्या घडामोडी झाल्या व समाजाचे स्वरूप अगदी पालटून गेले. उपनिषदांनी ब्रह्मविद्या निर्माण करून वैदिक यज्ञयागाचा व कर्मकांडाचा अगदी कटू असा निषेध केला. प्रत्यक्ष वेदां-विषयी त्यांनी अनादर दाखविला नाही. ठायी ठायी पूज्य बुद्धीच प्रगट केली. पण वेदांवर उभारलेल्या कर्मकांडरूप धर्माचा मात्र फार अधिक्षेप केला. त्यामुळे एकंदर यज्ञधर्माची प्रतिष्ठा खूपच कमी झाली. पुन्हा वेदकर्त्या ऋषींच्या ठायी असलेली पहिली उदार दृष्टी आता राहिली नव्हती. भारतातल्या सर्व जमातींना या श्रेष्ठ धर्मात सामावून घ्यावयाचे आहे, त्यांचे आर्यीकरण करावयाचे आहे हा पहिल्या ऋषींचा ध्येयवाद नव्या शास्त्रकारांच्या ठायी नव्हता. त्यामुळे बहुजनसमाज त्यांच्यापासून दूर जाऊ लागला. तुटून निघू लागला. याच वेळी आणि कदाचित याचमुळे बौद्ध व जैन धर्मांचा उदय झाला. व त्यांनी आपल्या धर्माला उदार रूप देऊन ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत सर्वांना तो सुलभ करून दिला व पाली व अर्धमागधी या बहुजनांच्या प्राकृत भाषांत त्याचे प्रतिपादन करण्यास प्रारंभ केला. त्यामुळे बहुजनांचा ओढा त्या धर्माकडे होऊन वैदिक धर्माचा लोक त्याग करू लागले. त्यांतही बिंबिसारादि राजांचा त्या धर्माकडे कल होऊन बौद्धांना जास्तच उत्तेजन मिळाले. या सर्वामुळे वैदिक धर्मावर फार मोठी आपत्ती कोसळून भारतीय समाज विघटित होऊ लागला. समाजाची धर्मनिष्ठा विचलित होऊन त्याची ऐक्यभावना भंगण्याचा कठिण समय प्राप्त

झाला. या घोर संकटातून भारतीय समाजाला वाचविण्यासाठी इतिहास-पुराणांचा अवतार झाला आहे.

नवी श्रद्धास्थाने :

वेद, यज्ञ व इंद्रादि देवता या श्रद्धास्थानांवरून समाजाची निष्ठा ढळली आहे हे पाहताच पुराणांनी त्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न न करता नवी श्रद्धास्थाने निर्माण केली. ती म्हणजे शिव, विष्णु, ब्रह्मा, राम आणि कृष्ण ही होत. इतिहासपुराणांचे प्रामुख्याने हे कार्य आहे. समाजाची श्रद्धास्थाने जेवढी एकरूप तेवढा समाज एकरूप होतो हे तत्त्व जाणूनच पुराणांनी या देवतांविषयी दीर्घकथाकाव्ये व आख्याने लिहून अखिल भारतात त्यांचा अत्यंत कसोशीने प्रसार केला. त्याला यश किती आले हे आपण पाहतोच आहो. अखिल भारतात असा एक प्रदेश नाही की जेथे शिवाची पूजा केली जात नाही. असा एक समाज नाही की जो रामकृष्णांची भक्ती करीत नाही. विष्णु या शब्दाचा मूळ अर्थ व्यापणारा असा आहे. अखिल भारताला व्यापून या देवतेने तो शब्द सार्थ केला आहे. गणेश, ब्रह्मा याही देवतांची पुराणे लिहून त्यांनाही पुराणांनी भारतीयांच्या हृदयात अढळ स्थान प्राप्त करून दिले. अशा रीतीने अग्नि, इंद्र, मित्र, वरुण, पवमान इ. वैदिक देवतांच्या स्थानी ब्रह्माविष्णुमहेशादि देवता स्थापन करून पुराणांनी अखिल भारताला पुन्हा एका नव्या रज्जूने बद्ध केले व सुरू झालेल्या विघटनेला आळा घातला.

पण याहीपेक्षा पुराणांनी मोठे कार्य केले ते म्हणजे या सर्व देवतांच्या ऐक्याची प्रस्थापना. एका समाजात किंवा संस्थेत दोन परस्परविरोधी, प्रतिस्पर्धी नेते निर्माण झाले की तो समाज किंवा ती संस्था भंग पावते हा आपला नित्याचा अनुभव आहे. लोकसमुदायाच्या बाबतीत हे शतपटीने खरे आहे. त्यामुळेच सर्व देवतांचे अद्वैत प्रस्थापित करण्याचा पुराणांनी अट्टाहासाने प्रयत्न केलेला दिसतो.

एका विष्णु या देवतेचा इतिहास पहिला तरी पुराणांच्या या प्रयत्नाचे स्वरूप ध्यानी येईल. हिंदूंचे मत्स्यकूर्मवराहादि दशावतार प्रसिद्ध आहेत. ते सर्व विष्णूचेच अवतार आहेत हे हिंदुधर्मग्रंथांनी इतक्या आग्रहाने व इतक्या ठिकाणी प्रतिपादले आहे की त्याविषयी आता हिंदुमात्राच्या मनात अविचल

अशी श्रद्धा दृढमूल होऊन गेलेली आहे. वास्तविक या मूळच्या भिन्न जमातींच्या भिन्न काळच्या देवता असल्या पाहिजेत. पण त्यांचे मूळ रूप पुराणांनी इतके पुसून टाकले आहे की त्यांच्या भिन्नपणाची शंकासुद्धा आता कोणाच्या मनात उरलेली नाही. या विष्णूलाच शतपथ ब्राह्मणात यज्ञ म्हटले आहे. व वेदांत सूर्य म्हटले आहे. त्याला मान्यता देऊन पुराणांनी यज्ञाचे सर्व पावित्र्य व वैभव विष्णूमध्ये समाविष्ट करून घेऊन जुन्या परंपरेचा धागा अतूट राखला आहे. नारायण, वासुदेव या मुळात स्वतंत्र देवता होत्या व त्यांचे स्वतंत्र पंथही होते. कृष्ण या नावाविषयी तर फारच वाद आहेत. पूर्व काळी या नावाचे अनेक पुरुष होऊन गेले. पण पुराणांनी नारायण, वासुदेव, कृष्ण, गोविंद यांचे व विष्णूचे रूप पूर्ण अभिन्न करून टाकले. गीताकार श्रीकृष्ण व गोकुळातला गोपालकृष्ण हे दोघे अनेकांच्या मते अगदी भिन्न होत. पण पुराणांनी ते मानले नाही. गोकुळातला कृष्ण हा आभीर जमातीचा एक वंद्य असा नायक असण्याचा पूर्ण संभव आहे. पण पुराणांनी या सर्वांना एका विष्णुरूपात विलीन करून भारतीय जनतेच्या मनात एक सर्वव्यापी अमर असे श्रद्धास्थान निर्माण करून ठेवले. लोकसंग्रहाचा हा प्रयत्न अगदी असामान्य असा आहे.

स्वतः श्रीकृष्णांनी लोकसंग्रहाचा असाच एक फार मोठा प्रयत्न गीतेच्या दहाव्या अध्यायात केला आहे असे पंडितांचे मत आहे. 'गीतातत्त्वविमर्श' या आपल्या ग्रंथात 'मम तेजोंऽशसंभवम्' या पहिल्याच प्रकरणात प्रा. माटे यांनी त्याचे फार चांगले विवेचन केले आहे. त्याचा सारार्थ पुढे देतो.

संग्राहक धोरण :

जयिष्णु आर्य लोक या भूमीत सर्वत्र पसरू लागताच हिमालयापासून समुद्रापर्यंत पसरलेल्या द्वीपाचे एकराष्ट्र करावयाचे हा त्यांचा निश्चय झाला. त्यांनी येथली सर्व भूमी आक्रमिली पण केवळ आक्रमण करून ते स्वस्थ बसले असते तर कालांतराने त्यांची शक्ती लुळी पडली असती. पण 'आपणा सर्वांना येथे रहावयाचे आहे व या सर्वांचा एक समाज बनवावयाचा आहे' या विचाराने त्यांनी आक्रमक वृत्ती सोडून देऊन देववेवीचे धोरण आखले. आणि त्या-अन्वये धर्माचे व तत्त्वज्ञानाचे स्वरूप ठरविताना त्यांनी त्याचे लक्षण व्यवच्छेदकता,

हे न ठरविता, संग्रहक्षमता हे ठरविले. म्हणजे परमेश्वरविषयक तत्त्वज्ञानात 'माझे खरे व तुझे खोटे व ते तुझे नष्ट केले पाहिजे' ही भूमिका न पत्करता त्यांनी सर्वसंग्रहाची वृत्ती अवलंबिली. गीतेच्या दहाव्या अध्यायात 'जे जे श्रीमदूर्जित आहे त्यात माझेच तेज आहे' हा जो विचार श्रीकृष्णांनी सांगितला तो या दृष्टीनेच सांगितला आहे.

आर्यांचे जसे इन्द्रचंद्रादि देव होते तसेच येथल्या मूळच्या अर्धसंस्कृत, असंस्कृत व रानटी लोकांचेही नाग, वाघ, सिंह, गरुड, मगर, पिंपळ इ. देव होते. ही दैवते तशीच पृथक्पणे राहू दिली असती तर येथे देशभर पसरलेले सहस्रो मानवपुंज एकत्र सांधून त्यांचा एक समाज घडविण्याचे आर्यांचे भव्य स्वप्न साकार झाले नसते. या दैवतांवर प्रारंभीच आघात करणे हेही शक्य नव्हते. त्याने अकारण वैराग्नी निर्माण झाला असता. म्हणून श्रीकृष्णांनी सांगून टाकले की, 'या सर्व माझ्याच विभूती आहेत.' ते म्हणाले, 'रुद्रांमध्ये शंकर मी आहे, यक्षराक्षसांमध्ये वित्तेश मी आहे, सर्पांचा वासुकी मीच, नागांचा अनंत मीच, दैत्यांचा प्रल्हाद मीच, अश्व, मकर, कामधेनू, मृगेन्द्र, वैनतेय, जाह्नवी सर्व मीच आहे.' यांमध्ये, राक्षस, यक्ष, दैत्य यांचा व मगर, गरुड, सिंह, यांची पूजा करणाऱ्या अर्धरानटी लोकांचाही श्रीकृष्णांनी समावेश करून त्यांना आर्यांच्या पदवीला नेऊन ठेविले आहे. आर्यांच्या या उदार, सहिष्णु व सर्वसंग्राहक धोरणामुळेच सर्व हिंदुसमाज एकत्र बांधला गेला.

शिव आणि रुद्र :

शिव या दैवताची कथा अशीच आहे. रुद्र ही वेदातली देवता. आणि महादेव ही पंडिताच्या मते, अनार्यांची देवता होय. भूत, पिशाच्च हे त्याचे गण, त्याची स्मशानातली राहणी, कातड्याची वस्त्रे, चिताभस्माचे लेपन यांवरून तो विचार खरा वाटतो. पण आपल्या सर्वांना एकजीव व्हावयाचे आहे, हा आर्यांचा बुद्धिनिश्चय झाला होता. आणि दैवते, श्रद्धास्थाने, ध्येये एकरूप झाल्यावाचून समाज एक होत नाही हे त्यांनी जाणले होते. म्हणून महादेव व रुद्र यांना त्यांनी अभिन्न करून टाकले. गीतेतील विभूतियोगासारखाच यजुर्वेदातील रुद्राध्याय आहे. सर्व चराचरामध्ये रुद्रच भरून राहिला आहे, पशू, पक्षी, प्राणी, वनस्पती यांचा तो पती आहे, सूर्य तोच आहे, विष्णु तोच आहे, असे

त्याचे वर्णन आहे. असा हा रुद्र शिवाशी एकरूप झाल्यामुळे शिव ही देवता सर्वश्रेष्ठ व सर्ववंद्य ठरली. एकराष्ट्र करण्याचा आर्यांचा निश्चय किती दृढ होता हे यावरून ध्यानात येईल. शिव ही अनार्य देवता. पण तरीही तिचा यांनी स्वीकार केला इतकेच नव्हे तर आपल्या मूळच्या सर्व देवतांपेक्षा तिला श्रेष्ठ असे स्थान दिले. आणि याहीपुढे जाऊन आर्यांची परमपूज्य जी देवता म्हणजे विष्णु तिचे व शिवाचे अद्वैत प्रस्थापिले. ' शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः । ' ही उक्ती प्रसिद्धच आहे. शिव व विष्णु यांत भेद करील तो नरकाला जाईल असे पुराणात वारंवार प्रतिपादिलेले आहे. आणि या प्रतिपादनाला पूर्ण दृढता यावी म्हणून हरिहर ही एकच मूर्तीही त्यांनी कल्पिली. ब्रह्माविष्णुमहेश यांचा समावेश केलेली दत्तात्रयमूर्ती आणि शिव, विष्णु, सूर्य, देवी व गजानन यांचे शंकराचार्यांनी केलेले पंचायतन यांच्या मागे हे एकीकरणाचे धोरण असल्याचे स्पष्ट दिसते. विष्णुसहस्रनाम व शिवसहस्रनाम यांची रचना याच हेतूने झालेली आहे, हे तर उघडच आहे. सर्व दैवते, चराचरातील सर्व तेजाचे अंश एकेका देवतेत या सहस्रनामानी समाविष्ट केलेले आहेत आणि अंती या दोन्ही देवतांचे अद्वैत साधले आहे.

बदरीनाथ, जगन्नाथ, रामेश्वर व द्वारका या चार धामांच्या यात्रा; गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधु, कावेरी या सात अखिल भारतातल्या पवित्र नद्यांची स्नाने; बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन; अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, पुरी, द्वारावती या पुण्यनगरींच्या यात्रा यांचा पुराणांनी जो आग्रहाने उपदेश केला आहे व त्यांपासून मिळणाऱ्या थोर पुण्याचे जागोजाग जे वर्णन केले आहे ते अखिल भारतीय समाजाला एकरूप देण्याच्या हेतूनेच होय यात शंका नाही. या सर्वसंग्राहकतेमुळेच वैदिक आर्यांनी मनापुढे ठेवलेले राष्ट्रनिर्मितीचे ध्येय सफल झाले असे बहुतेक सर्व पंडितांचे मत आहे.

संस्कृत आणि प्राकृत :

शेवटी एकीकरणाच्या प्रक्रियेतील संस्कृत भाषेने केलेल्या कार्याचे महत्त्व पाहून हा विचार संपवू. वैदिककाळातच आसेतुहिमाचल संस्कृत भाषा वरिष्ठ वर्गात, शास्त्रीपंडितांत रूढ झाली होती हे वर सांगितलेच आहे. पुराणकाळातली

तिची कामगिरी याहीपेक्षा महत्त्वाची आहे. नेहमी असे सांगितले जाते की बौद्ध व जैन धर्मांनी संस्कृत भाषा सोडून देऊन पाली, अर्धमागधी या प्राकृत भाषांचा आश्रय केला म्हणून बहुजन समाजाला त्यांचा धर्मोपदेश सुलभ झाला व त्या धर्मपंथांकडे तो समाज आकर्षिला गेला. पण या विधानाला कितपत अर्थ आहे ते तपासून पाहिले पाहिजे. कारण असे की जोपर्यंत बहुजनसमाज साक्षर नाही तोपर्यंत त्याला संस्कृतात लिहिले काय किंवा प्राकृतात लिहिले काय, सारखेच आहे. धर्मज्ञानाचे त्याचे मुख्य साधन म्हणजे श्रवण. आणि धर्मगुरु त्याच्या भाषेत जर धर्मप्रवचन करीत असतील तर मूळ ग्रंथ कोणत्या भाषेत आहे याची चिंता करण्याचे त्याला कारण नाही. पुराणांनी नेमके हेच केले. व्यासांनी, किंवा सौतीने पुराणे लिहिली ती संस्कृतात, पण पुराण सांगणारी एक स्वतंत्र संस्था निर्माण करून हे संस्कृतातले धर्मज्ञान सर्व समाजात प्रसृत करण्याची त्यांनी व्यवस्था करून टाकली. यामुळे दुहेरी कार्य साधले. पुराणे हे धर्मग्रंथ संस्कृतात रचल्यामुळे त्यांना अखिल भारतीय मान्यता मिळाली. अन्यथा प्रत्येक प्रांताची पुराणे निराळी होऊन भारतवर्षाच्या एकतेचा भंग झाला असता. शिव-विष्णु, राम कृष्ण, गंगा–यमुना, काशीरामेश्वर, एकादशी-शिवरात्र यांचे जे महत्त्व आज पंजाबमध्ये आहे तेच बंगालमध्ये आहे, तेच गुजराथेत व केरळमध्ये आहे. रामायण-महाभारत, हे ग्रंथ संस्कृतात नसते तर आज प्रत्येक भारतीयाचा रामकृष्ण या नावांनी जो श्वासोच्छ्वास चालतो तो चालला नसता. आणि सर्व भारत हा एक देश आहे ही भावना टिकून राहिली नसती.

तुलनेने याचा विचार केला तर तो जास्त उद्बोधक होईल. पाली, अर्धमागधी या भाषांत लिहिलेल्या ग्रंथांचे वर्चस्व आज भारतीय समाजावर किती आहे व संस्कृतात लिहिलेल्या ग्रंथाचे किती आहे याची तुलना प्रत्येकाने करून पहावी. बुद्धमहावीर यांच्या अवतारकार्यानंतर भारतात त्यांच्या मतांचा प्रसार किती झाला ? शिकंदराची स्वारी भारतावर झाली तेव्हा पश्चिम आणि वायव्य या बाजूच्या प्रांतांत बुद्धाचे नावही माहीत नव्हते. तरी या वेळी त्या धर्माच्या उदयाला तीनशे वर्षे होऊन गेली होती. मग बहुजनांच्या भाषेत ग्रंथ लिहून त्या पंथांना काय मिळाले ? त्यांनी त्या भाषांचा आश्रय केला तरी भारतावर वर्चस्व महाभारत, रामायण, भागवत यांचेच निरपवाद, अखंड कायम राहिले. त्याचे कारण म्हणजे पुराणप्रवचनकीर्तन या हिंदूंच्या संस्था. हिंदूंनी मूळ ग्रंथ संस्कृतात

ठेविले आणि त्याचे श्रवण नाना भाषांमध्ये करविण्याची सोय बहुजनांसाठी केली. त्यामुळे अखिल भारताचे सामरस्यही साधले आणि सर्व थरांत धर्मप्रसार करण्याचे उद्दिष्टही साधले.

पाणिनीचे दृढबंधन :

संस्कृत भाषेवर येणाऱ्या आणखी एका आक्षेपाचा विचार येथे केला पाहिजे. इ. पू. सातव्या शतकात पाणिनीने संस्कृत भाषेचे व्याकरण लिहिले आणि तिला नियमबद्ध करून टाकली. त्या वेळी ती भाषा केवळ ग्रांथिक स्वरूपातच होती असे म्हणतात. काही पंडित तर असे म्हणतात की तिला पाणिनीने नियमबद्ध केले म्हणूनच ती मृत झाली. इंग्रजी, फ्रेंच इ. भाषांची व्याकरणे रचल्याला आता शतके उलटून गेली आहेत. तरी त्यांना मृतकळा आलेली नाही, उलट त्या विकासच पावत आहेत. मराठी, हिंदी याही व्याकरणबद्ध झाल्याला शतक होऊन गेले. तरी त्यांच्यावर वार्धक्य आल्याची चिन्हे दिसत नाहीत. तेव्हा हा विचार अगदी हास्यास्पद म्हणून सोडून दिला पाहिजे. पण पाणिनीने संस्कृत भाषेला नियमबद्ध केले हे खरेच आहे. पण त्यामुळे हित झाले की अहित ? पाणिनीच्या उत्तर काळात दोन हजार वर्षे दळणवळणाची साधने नसताना अखिल भारतीय शास्त्रीपंडित एकमेकांशी संवाद करू शकले व अखिल भारतातील धर्मकल्पनांमध्ये सुसंवाद राखू शकले ते पाणिनीच्याच आश्रयाने हे आपण विसरता कामा नये. संस्कृत भाषेची ही अखिल भारतीय बैठक लाभल्यामुळेच तत्कालीन भारतीय विद्यापीठांत भारतातील सर्व प्रदेशांतील विद्यार्थ्यांना विद्याध्ययन करता आले. पंडितांना धर्मचर्चा करिता आली आणि इतिहासपुराणांना रामकृष्णांची चरित्रे आदर्श म्हणून उभी करून समाजाला स्फूर्ती देता आली व परंपरांचा अभिमान टिकविता आला. प्रा. द. के. केळकर यांनी आपल्या 'संस्कृतिसंगम' या ग्रंथात याविषयी अत्यंत उद्‌बोधक असे विवेचन केले आहे. त्याचा भावार्थ असा : संस्कृत भाषा हे भिन्नभिन्न प्रांतीयांच्या विचारविनिमयाचे व म्हणूनच सर्वांना एकसूत्रात गोवणारे प्रभावी साधन होऊन बसले. हे साधन शाश्वत व टिकाऊ बनवावयाचे तर ते शिस्तीच्या नियमांनी बांधून वज्रलेप करणे अवश्य होते. पाणिनीने ते कार्य केले व सर्व प्रांतीच्या विद्वानांनी ते मान्य केले. संस्कृत भाषेचा विकास हा त्या त्या प्रांतावर सोपविला

असता तर दोनचार शतकांतच एकाची संस्कृत भाषा दुसऱ्याला दुर्बोध झाली असती. म्हणून अखिल भारतीय भाषेच्या स्वैरविकासाला नियंत्रण घालणे हे सांस्कृतिक ऐक्यवर्धनाच्या दृष्टीने अगत्याचे होते. यामुळे संस्कृत भाषा बंदिस्त झाली खरी पण म्हणूनच ती अमर झाली. शंकराचार्यांना ही बैठक लाभली म्हणूनच बत्तीस वर्षांच्या अल्पावधीत त्यांना भारतावर आपल्या तत्त्वज्ञानाची मुद्रा ठोकणे शक्य झाले. कालिदास, शूद्रक, भवभूती यांना अखिल भारताचे कवी होण्याचा मान मिळाला तो पाणिनीमुळेच. आयुर्वेदामधील चरक हा पंजाबचा, सुश्रुत हा बनारसचा, वाग्भट हा सिंधमधला आणि वृंद हा महाराष्ट्राचा. पण सर्वांची एक आयुर्वेदविद्या झाली व ती भारतमान्य झाली ती देववाणीमुळेच. मनुयाज्ञवल्क्यनारदादि स्मृतिकारही सर्व आर्यावर्तात मान्यता पावले ते या गीर्वाण भारतीच्याच आश्रयाने. याचा अर्थ असा की अखिल भारताचे सांस्कृतिक ऐक्य टिकून राहिले त्याचे बव्हंशी श्रेय पाणिनीच्या नियमबद्ध संस्कृत भाषेलाच दिले पाहिजे.

व्यापकता व सामर्थ्य :

पृथ्वीवर निरनिराळे भूप्रदेश निसर्गाने निर्माण केले आहेत. त्यांचे देश किंवा राष्ट्र यात रूपांतर कोण करते? ते मानव समाजांचे कार्य आहे. जर्मनीच्या ज्या सीमा आहेत त्या काही निसर्गाने निर्माण केल्या नाहीत. तेथले लोक स्वतःला एक समाज, एक राष्ट्र मानतात, तेथल्या परंपरांचा अभिमान धरतात म्हणून जर्मनी हे राष्ट्र झाले. अखिल युरोप हा ख्रिस्तधर्मीय आहे. पण हे सर्व लोक आपल्याला एक समाज मानीत नाहीत म्हणून सर्व युरोप हे राष्ट्र झाले नाही. हिंदुस्थान जवळ जवळ युरोपासारखेच एक खंड आहे. प्राचीन भारतीयांच्या एकीकरणाच्या प्रयत्नाला यश आले नसते तर येथे आज युरोपसारखीच अनेक राष्ट्रे दिसली असती. ती तशी दिसत नाहीत, अखिल भारत एक देश, एक राष्ट्र आहे ही जाणीव सर्व हिंदवासीयांच्या मनात दृढ आहे, याचे श्रेय त्या प्राचीन आर्यांना म्हणजे द्रविड, असुर, नाग, दैत्य, यांनी जो एक श्रेष्ठ वर्ग घडविला त्याला आहे. हे यश फार मोठे आहे. अफगाणिस्तानपासून मोरोक्कोपर्यंत मुस्लीमांचे साम्राज्य कित्येक शतके टिकून होते. पण या सर्व भूप्रदेशाचा एक देश स्वप्नातही अस्तित्वात आला नाही. युरोपचे वैर

सांगितलेच आहे. इंडोनेशिया, दक्षिण अमेरिका यांचे असेच आहे. आरब एकवंशीय व एकधर्मीय असूनही सर्व आरब भूविभागाचे त्यांना एक राष्ट्र करता आले नाही. या बाबतीत प्राचीन काळी चीनला व अर्वाचीन काळी अमेरिकेलाच फक्त यश आले आहे. भारतीय आर्यांचे यश किती दुर्मिळ कोटीतले आहे हे यावरून ध्यानात येईल.

प्राचीन आर्यांना हे अलौकिक यश आले यामुळे त्यांचे समाजशास्त्र जगातील सर्व समाजशास्त्रांपेक्षा श्रेष्ठ होय असे पंडितांचे मत आहे. पण या समाजशास्त्राचा असा गौरव करणाऱ्यांनीच त्यांतील एक महान् वैगुण्यही दाखवून दिले आहे. डॉ. केतकर म्हणतात, 'व्यापकतेच्या दृष्टीने जे समाज-शास्त्र अत्यंत बलवान ठरले तेच समाजशास्त्र दार्ढ्याच्या दृष्टीने अगदी दुर्बल ठरले आहे, हे देखील त्याबरोबरच कबूल केले पाहिजे. अत्यंत भिन्न समाज एक छत्राखाली आणल्यामुळे, आणि ते देखील सक्तीने न आणता खुशीने आणले गेल्यामुळे हिंदुसमाज हा एक भिन्नस्वरूपी लोकांचा समुच्चय बनला आहे व संघटित कार्य करण्यास असमर्थ झाला आहे, अशी भीती पुष्कळांना वाटू लागली आहे.' (प्राचीन महाराष्ट्र शातवाहनपर्व, पृ. २८४. ज्ञानकोश प्रस्तावनाखंड, विभाग १ ला, पृ. ३८१) प्रारंभीच 'हिंदुसमाज समाज आहे काय ?' हा प्रश्न विचारला आहे त्यात हीच भीती व्यक्त झालेली आहे. एका हिंदूवर आघात झाला तर सर्व हिंदू खवळून उठतात असे कधी घडतच नाही, असे दिसते. निदान गेली हजार वर्षे तरी इतिहास कंठरवाने हेच सांगत आहे. मग प्रश्न असा येतो की त्यापूर्वी काय होते ? पूर्वीपासूनच संघटित कार्य करण्यास हा समाज वा हा लोकसमुदाय असमर्थ होता काय ? संभूयसमुत्थान असे त्याला कधी जमलेच नाही काय ? जमले असले तर त्या वेळी त्याला कोणी संघटित केले होते ? त्यांना यश कशामुळे आले ? या प्रश्नांचा विचार आता केला पाहिजे. तो पुढील प्रकरणात करू. तत्पूर्वी या प्रकरणात आर्यांच्या राष्ट्रघडणीच्या प्रयत्नांचे जे वर्णन केले आहे त्यांतून जे काही महत्त्वाचे सिद्धांत हाताशी लागतात ते पाहू :

(१) येथे सर्वांना रहावयाचे आहे हे आर्यनेत्यांनी निश्चितपणे ठरविले होते. (२) त्यासाठी सर्व भारतीय समाज एकरूप झाला पाहिजे असा त्यांचा बुद्धिनिश्चय झाला होता. (३) या ध्येयाच्या आड वर्ण, वंश, संस्कृत–

असंस्कृतपणा हे काही येऊ द्यावयाचे नाही या तत्त्वाचा त्यांनी कधीही विसर पडू दिला नाही. (४) यामुळेच सहिष्णुता व संग्राहकता ही महाव्रते त्यांनी अंगीकारिली व प्रत्येकाच्या धर्मभावनांचा, दैवतांचा व आचारांचा आदर केला.

विश्वहिंदुपरिषदेला ही तत्त्वे दीपस्तंभासारखी मार्गदर्शक होतील यात शंका नाही.

❀

२

हिंदुसमाज - संघटनातत्त्व

हिंदुसमाज समाज आहे काय, या प्रश्नाचा विचार मागल्या प्रकरणात आपण केला. एवढ्या खंडप्राय देशात परस्परांपासून अत्यंत भिन्न अशा जमातींनी घडलेल्या त्या लोकसमुदायाला दळणवळणाची साधने उपलब्ध नसताना, त्या मागल्या काळी भारतीय आर्यांनी–असुर, द्रविड, नाग, इ. जमातींतील श्रेष्ठ, प्रज्ञावंत, कर्त्या पुरुषांनी–एकरूपता प्राप्त करून दिली हे त्यांचे कर्तृत्व अगदी असामान्य असे होय, असे पंडितांचे मत असल्याचे आपण पाहिले. पण त्याचबरोबर आर्यांच्या त्या सर्वसंग्राहक धोरणामुळे या समाजाला एकरूपता आली असली तरी त्याला दार्ढ्य आले नाही, संघटित सामर्थ्य निर्माण करण्यास हा समाज असमर्थ झाला हा त्या धोरणावर येणारा आक्षेपही आपण ऐकला. या आक्षेपाचाच आता विचार करावयाचा आहे. म्हणजे हिंदु-समाज समाज असला तरी तो संघटित आहे काय, तो कधी संघटनक्षम होऊ शकेल काय, पूर्वी तो तसा कधी होता काय असा आपला दुसरा प्रश्न आहे.

कोणताही समाज संघटित व्हावयाचा तर त्याला काही संघटनातत्त्व असले पाहिजे. धर्म, राष्ट्र, वंश ही संघटनातत्त्वे आतापर्यंतच्या जगाच्या इतिहासात भिन्नभिन्न लोकांनी आश्रयिलेली आहेत. वर्ग हे नवीन संघटनातत्त्व मार्क्सने प्रतिपादिले होते. पण ते फोल ठरले. त्या तत्त्वाचा कधीच कोणी-मार्क्सवादी

समुदायांनीसुद्धा – अवलंब केला नाही. पूर्वकाळी धर्म व वंश या तत्त्वांचा प्रभाव फार असे. तेव्हा प्रायः त्याचाच अवलंब बहुतेक समाज करीत. युरोपात राष्ट्र हे तत्त्व गेल्या चारपाच शतकांत उदयास आले आहे. आज बहुतेक देश राष्ट्र म्हणूनच संघटित होत आहेत. एकभूमी, एक परंपरा व बहुधा एक भाषा हे राष्ट्रधर्माचे समबंध म्हणून मान्यता पावलेले आहेत. प्राचीन भारतीयांनी धर्म, वंश व राष्ट्र यांपैकी कोठल्या एखाद्या तत्त्वाचा अवलंब करून येथला समाज संघटित केला होता काय, हे आता पहावयाचे आहे.

आपपरभाव :

समाज एखाद्या तत्त्वावर संघटित होतो म्हणजे काय, याचा अर्थ आपण मनाशी निश्चित करून ठेविला पाहिजे. वरीलपैकी कोणतेही तत्त्व अवलंबिले तरी त्या तत्त्वावर अचल निष्ठा समाजातील बहुसंख्य लोकांची असली पाहिजे. धर्मतत्त्वाचा आश्रय केला तर माझ्या धर्माचे ते माझे स्वकीय व इतर सर्व परकीय असा भाव त्यातून लोकांच्या मनात निर्माण झाला पाहिजे. संघटनेच्या सामर्थ्याचा उपयोग प्रामुख्याने समाजसंरक्षणासाठी, त्याच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी, व्हावयाचा असतो. आणि तेथेच समाजातील नागरिकांच्या निष्ठेची खरी कसोटी लागत असते. एरवी स्वधर्मीय ते स्वकीय व परधर्मी ते परकीय ही भावना इतक्या तीव्रपणे प्रतीत न झाली तरी समाजाला फारसा धोका नसतो. पण मरणमारणाच्या संग्रामात ही भावना, ही निष्ठा व्यक्तींच्या मनातून अणुमात्र जरी विचलित झाली तरी समाजावर संकट ओढवते. मी स्वकीयांविरुद्ध-स्वधर्मीय, स्वराष्ट्रीय वा स्ववंशीय यांच्या विरुद्ध–कधीही लढणार नाही; निदान परकीयांच्या बाजूने स्वकीयांविरुद्ध रणात उतरणार नाही इतकी तरी कमीत कमी निष्ठा कोणत्या तरी तत्त्वावर असल्यावाचून समाज संघटित होत नाही. त्याला सामर्थ्य प्राप्त होत नाही. प्राचीन काळी हिंदूंनी कोणत्या तरी निष्ठेची जोपासना करून, म्हणजे आपपरभाव निश्चित करून संघटित सामर्थ्य निर्माण केले होते काय ? समाजाच्या मनात सतत आपपरभाव निश्चित असल्यावाचून आणि तन्निष्ठ जे रागद्वेष ते तीव्र, उत्कट व धारदार झाल्यावाचून समाज संघटनक्षम होऊ शकत नाही आणि त्याला सामर्थ्य लाभत नाही. हिंदूंना हे सामर्थ्य कधी लाभले होते काय ?

प्राचीन भारतीयांनी वंशतत्त्वाचा संघटनेसाठी अवलंब केला नव्हता हे आपण मागल्या प्रकरणात पाहिलेच आहे. आर्य हे नाव वंशवाचक आहे व भारतातील मूळचे द्रविड, असुर, नाग इ. लोक आर्यांहून भिन्न वंशाचे होते, इत्यादी युरोपीय पंडितांची मते अगदी निराधार आहेत, हे ज्ञानकोशकारांनी निर्णायकपणे दाखवून दिले आहे. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांनी आपल्या 'वेदांतील राष्ट्रदर्शन' या ग्रंथात या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून तोच निर्णय दिला आहे. तेव्हा याविषयी आता शंकेला जागा नाही. मग आर्यांनी संघटनेसाठी कोणत्या तत्त्वाचा आश्रय केला होता ? त्यांचे आपपरभाव कोणत्या तत्त्वावर ठरत होते ?

वेदग्रंथ उघडून सहज जरी चाळून पाहिले तरी 'हे इंद्रा, आमच्या शत्रूंचा तू नाश कर, हे अग्ने आमच्या शत्रूंच्या नगरांचा विध्वंस कर, देवांनो, शत्रूंपासून आमचे रक्षण करा, त्यांच्यावर वज्र फेका, हे पूषन्, आमच्यावर चालून येणाऱ्या शत्रूंचे निर्दाळण कर, देवांनो, आमच्या स्तोत्रांचा, प्रार्थनांचा स्वीकार करा व आमचे शत्रू नष्ट करा.' अशा तऱ्हेच्या प्रार्थना शेकडो सूक्तांत केलेल्या दिसून येतात. या सूक्तांतून शत्रूंविषयीचा जळता द्वेष पावलोपावली प्रगट झालेला दिसून येतो. आता युरोपीय पंडित म्हणतात त्याप्रमाणे हे शत्रू म्हणजे एतद्देशीय मूळच्या कृष्णवर्णीय, कुरूप, रानटी जमाती जर नव्हत तर मग आर्यांचे हे शत्रू कोण होते ?

यज्ञविरोधक :

यज्ञसंस्था, अग्निउपासना, वैदिक संस्कृती व संस्कृत भाषा यांचे द्वेष्टे, यांचे विध्वंसक, यांचे शत्रू ते आर्यांचे शत्रू होते. दस्यु, दास असा त्यांचा सतत निर्देश केलेला आढळतो. पण यज्ञविरोध हे त्यांचे मुख्य लक्षण आहे. ऋग्वेदातील पुढील ऋचा पहा. "अयाजक, हिंसाप्रचुर अशा वाणीने बडबड करणारे पणी, यज्ञकर्माविषयी श्रद्धा नसलेले, स्तोत्रे गाऊन अग्नीची कीर्ती न वाढविणारे, यज्ञकर्म न करता वृथाच कालक्षेप करणारे असे जे पणीनामक दस्यू त्यांना अग्निदेव पूर्णपणे हाकून लावतो. इतकेच नाही तर सर्व देवांत अग्नि हा प्रमुख होत्साता अयाजक अशा दुसऱ्या कित्येक लोकांनाही रसातळी

दडपून टाकतो. " (ऋग्वेद ७·६·२) अनेक ठिकाणी दस्यूंचे वर्णन कर्महीन, (यज्ञहीन) कर्मरहित, अग्नीला हविर्भाग न देणारे, त्याचप्रमाणे मृध्रवाच, असे केलेले असून आर्यांचे वर्णन यज्ञकर्ते, अग्निपूजक, अग्निहोत्र धारण करणारे असे केलेले आहे. अनेक ऋचा देऊन ज्ञानकोशकारांनी आर्य व अनार्य (दस्यू) यांतील भेद यजनविषयक आहे, वांशिक नाही, असा निर्णय दिला आहे. (बुद्धपूर्व जग–प्रकरण ३ रे.) याचा अर्थ असा की, आर्यांनी धर्म हे संघटनातत्त्व निश्चित केले होते. 'यज्ञ' हा त्यांचा धर्म होता. ते त्यांचे दैवत होते. त्या देवतेचे व तिच्या पूजनातून निर्माण झालेल्या संस्कृतीचे उपासक ते स्वजन आणि तिचे विरोधक ते परकीय, ते शत्रू असा आपपरभाव आर्यांच्या मनात निश्चित झालेला होता. रामायणात विश्वामित्राने रामाचे साह्य मागितले ते यज्ञरक्षणासाठी. त्याचा विध्वंस राक्षस करीत होते म्हणून ते शत्रू होते, असेच वर्णन आहे.

भूमिनिष्ठेचा उदय :

'यज्ञ' हे आर्यांचे दैवत होते, वेदमंत्रांनी त्याची पूजा करणे हा त्यांचा धर्म होता आणि वेद, ब्राह्मणे, उपनिषदे, आर्षमहाकाव्ये या संस्कृतग्रंथांतून जोपासली गेलेली ती त्यांची संस्कृती होती. त्यामुळे त्यांचे आपपरभाव या यज्ञधर्मप्रधानसंस्कृतीवर प्रारंभी अवलंबून होते. पण पुढे हळूहळू आर्यांची यज्ञनिष्ठा भूमीचा आश्रय करू लागली. तिने यज्ञाचा आश्रय सोडला असा अर्थ नव्हे. उलट यज्ञीय भूमी, यज्ञपुनीत भूमी, ती आर्यभूमी असाच त्यांचा भाव होता. पण यज्ञाच्या जोडीला भूमिनिष्ठा हळूहळू त्यांच्या मनात दृढावू लागली हे मात्र निश्चित. या भूमिनिष्ठेतूनच राष्ट्रनिष्ठेचा—त्या थोर संघटनतत्त्वाचा—उद्भव होतो. आर्य प्रथम वायव्यप्रांत व पंजाब या प्रदेशांत रहात होते. पुढील काळात ते पूर्वेला सरकू लागले. तेव्हा कुरुपांचाल, कोसल विदेह ही भूमी ते पवित्र मानू लागले. आणि जसजसा त्यांच्या वसाहतीचा विस्तार होऊ लागला तसतसे आर्यावर्त कोणत्या भूमीला म्हणावे याविषयी त्यांच्यात वाद व चर्चा होऊ लागल्या. वेद, ब्राह्मणे, उपनिषदे, धर्मसूत्रे, पुराणे यांत ही चर्चा विपुल प्रमाणात चाललेली दिसून येते. त्याबरोबर हेही दिसून येते की, आर्यावर्ताच्या कक्षा वाढत आहेत. कृष्णमृग जेथपर्यंत विचरतो

तेथपर्यंत आर्यावर्ताच्या सीमा, असे जुन्या ग्रंथांत अनेकदा सांगितलेले आहे. कृष्णमृग हा अग्नीचा अवतार मानीत. त्यावरून हा अर्थ स्पष्ट दिसतो की आर्यांची यज्ञसंस्कृती जेवढ्या प्रदेशात पसरली तेवढ्या भूमीला ते आर्यावर्त म्हणू लागले. मनूच्या मते विंध्य पर्वताच्या उत्तरेचा आणि हिमालय व पूर्व-पश्चिम समुद्र यांनी सीमित केलेला सर्व भूभाग (म्हणजे उत्तर भारत) हा आर्यावर्त होय. या भागात राहणारे ते आर्य व बाहेरचे ते म्लेंच्छ असे तो म्हणतो. यावरून आता आपपरभाव भूमीवर ठरू लागले असे दिसून येईल. मात्र अजून यज्ञसंस्कृतीचे, त्या कल्पनांचे वर्चस्व कमी झालेले नाही हे स्पष्ट आहे. म्लेंच्छ या शब्दाचा मूळ अर्थ अशुद्ध बोलणारे, असा आहे हेही येथे ध्यानात ठेवले पाहिजे. यानंतर पाणिनि-उत्तरकाळी आर्यांचा दक्षिणेतही प्रवेश झाला व काही शतकांतच त्यांनी कन्याकुमारीपर्यंत सर्व प्रदेशाचे आर्यीकरण करून टाकले. तेव्हा आर्यावर्ताला आता शास्त्रकार भारतवर्ष म्हणू लागले. आणि हिमालय व पश्चिम, दक्षिण व पूर्व समुद्र या सीमांतील देश तो भारतवर्ष अशा त्याच्या मर्यादा सांगू लागले. शबरस्वामी (इ. स. ५ वे शतक) आपल्या जैमिनीभाष्यात सांगतात की, हिमालयापासून कुमारीपर्यंत भाषा व संस्कृती यांचे संपूर्ण ऐक्य आहे. चाणक्याने आपल्या दूरदृष्टीने हे आधीच पाहिले होते. (इ. पू. ४ थे शतक) चक्रवर्तिक्षेत्राची मर्यादा त्याने 'हिमवत् समुद्रान्तरम्' अशी सांगितली आहे. धर्माने, संस्कृतीने जो समाज एकरूप केला तो राजसत्तेने एक झाला पाहिजे हा त्याचा आग्रह यात स्पष्ट दिसतो. श्रीकृष्णांनी असाच प्रयत्न केला होता हे मागल्या प्रकरणात सांगितलेच आहे. सर्व भारत हा आर्य झाल्याचे व ही सर्व भूमी पवित्र ठरल्याचे आणखी एक द्योतक म्हणजे गंगा यमुनांच्या बरोबरीने गोदावरी, कावेरी या नद्या पवित्र ठरल्या, दक्षिणेतल्या नगरी व पर्वतही तीर्थक्षेत्राच्या यादीत समाविष्ट झाले आणि भरतभूमीचा 'समुद्ररशनादेवी' असा निर्देश शास्त्रकार करू लागले. (धर्म-शास्त्राचा इतिहास, खंड २ रा, भाग १ ला, पृ. ११ ते १८. म. म. पां. वा. काणे व संस्कृतिसंगम–पृ. २४३. द. के. केळकर.)

राष्ट्राभिमान :

यज्ञभक्तीचे पर्यवसान हळूहळू त्या यज्ञाने पावन झालेल्या भूमिभक्तीत कसे

झाले ते आपण पाहिले. पण येवढ्याने राष्ट्रनिष्ठा पूर्णतेस जात राही. या भूमी-विषयी जाज्वल्य अभिमान, येथल्या परंपरांविषयी तशीच उत्कट आत्मीयता आणि त्यांच्या संरक्षणासाठी आत्मबलिदान करण्याची सिद्धता एवढा भावार्थ राष्ट्रनिष्ठेत सामावलेला असतो. त्या अभावी ती राष्ट्रनिष्ठा वंध्याच राहते. तिच्यातून सामर्थ्य निर्माण होत नाही. वेदवाङ्मयात राष्ट्रनिष्ठेतील हा सर्व भावार्थ दृग्गोचर होतो ही भारताला अत्यंत भूषणावह अशी गोष्ट आहे. अथर्ववेदाच्या पृथ्वीसूक्तात या सर्व भावनांचा सूक्तकाराने उत्तम आविष्कार केला आहे. सूक्तकार म्हणतो—

यत् ते भूमे विखनामि क्षिप्रं तदपि रोहतु ।
मा ते मर्म विमृग्वरि मा ते हृदयमर्पिपम् ॥ ३५ ॥

हे भूमि ! मी जी जागा खणतो ती शीघ्र प्राणतत्त्वाने भरून जावो. माझ्या हातून तुझ्या मर्मावर आघात न होवो. वा तुझ्या हृदयांला माझ्या हातून व्यथा न होवो.

इन्द्रो यां चक्र आत्मनेऽनमित्रां शचीपतिः ।
सा नो भूमिः विसृजतां माता पुत्राय मे पयः ॥ १० ॥

शचीपति इंद्राने जिला शत्रुरहित केली ती ही भूमाता आपला पुत्र असलेल्या मला दूध–पोषक द्रव्य–देवो.

भूमीला माता म्हणून संबोधिल्यानंतर तिचे अन्नधन, गोधन, विपुलोदक नद्या, हिरण्य, रत्नमाणके, नानावीर्या औषधी, हे जे वैभव त्याचे कवीने मोठे बहारीचे वर्णन केले आहे.

कवीने या भूमीच्या उज्ज्वल परंपरेवरील आपली भक्ती अशीच मोठ्या तेजस्वी शब्दांत प्रगट केली आहे. तो म्हणतो, 'ज्या ठिकाणी आमच्या पूर्वजांनी आपले अद्‌भुत पराक्रम केले, ज्या ठिकाणी देवांनी असुरांचा विध्वंस केला, ती ही आमची जन्मभूमी आम्हांला ऐश्वर्य व तेज देवो. हे शत्रुमर्दिनी भूमाते ! जे आमचा द्वेष करतात, जे सेना घेऊन आमच्यावर आक्रमण करतात व आमचा नाश करण्यासाठी टपून बसलेले असतात त्यांचा तू नाश

कर. याच भूमीवर आमच्या सामर्थ्यसंपन्न ऋषींनी यज्ञ, तपस्या व मंत्रोच्चार केलेला आहे.'

कवीने व्यक्त केलेला हा अभिमान केवळ वाचिक नाही. भूमीसाठी वाटेल ते कष्ट करण्यास व प्रसंगी आत्मबलिदान करण्यासही तो सिद्ध आहे.

अहमस्मि सहमान उत्तरो नाम भूम्याम् ।
अभीषाड् अस्मि विश्वाषाड् आशामाशां विषासहिः ॥ ५४ ॥

मी आपल्या मातृभूमीसाठी व तिच्या दुःखविमोचनासाठी सर्व प्रकारचे कष्ट भोगावयास सिद्ध आहे. मी सर्व दिशांना विशेषप्रकारे विजय मिळवीन व शत्रूंचा नाश करीन.

यद् वदामि मधुमत् तद् वदामि यदीक्षे तद् वनन्ति मा ।
त्विषीमानस्मि जूतिमान् अवान्यान् हन्मि दोधतः ॥ ५८ ॥

माझ्या मातृभूमीच्या हिताचेच मी बोलेन व जे करावयाचे ते तिच्या साह्यासाठीच करीन. मी ज्योतिःपूर्ण, तेजस्वी व बुद्धिसंपन्न होऊन या भूमातेचे शोषण करणाऱ्या शत्रूंचा विनाश करीन.

अशी ग्वाही देऊन सूक्ताच्या शेवटी कवीने मातृभूमीसाठी करावयाच्या अंतिम त्यागाचीही सिद्धता व्यक्त केली आहे.

दीर्घं न आयुः प्रतिबुध्यमाना
वयं तुभ्यं बलिहृतः स्याम ॥ ६२ ॥

आम्हांस दीर्घ आयुष्य प्राप्त होवो. आम्ही उत्तम ज्ञानी व्हावे आणि मातृभूमीसाठी आम्ही आमचे बलिदान करावे.

(अथर्ववेद—भाग २ रा, संपादक–पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर, कांड १२, सूक्त १ ले. मंत्र ३५, १०, २, ३, ४, ५, ६, १४, ३९, ५४, ५८, ६२. अथर्ववेदाच्या या भागाला पंडित सातवळेकरांनी 'मातृभूमि आणि स्वराज्यशासन' असेच नाव दिले आहे.)

पुराणांनी याच उत्कटतेने भारतवर्षाबद्दलचा अभिमान प्रगट केला आहे. विष्णुपुराण म्हणते, 'सहस्र जन्मांनंतर भारतवर्षात जन्म मिळतो. आणि येथे जन्मलेल्यांनाच स्वर्ग व मोक्ष प्राप्त होऊ शकतो.' वायुपुराणाने अशीच भारत-

भक्ती व्यक्तविली आहे. (विष्णु–२, ३, २. वायु ४५, ७७.) ब्रह्मपुराणाचा २७ वा अध्याय 'भारतवर्षानुकीर्तनम्' याच नावाने प्रसिद्ध आहे. 'जे नरश्रेष्ठ भारतवर्षात जन्माला येतात ते धन्य होत. देवांना या भूमीत जन्म मिळावा अशी फार इच्छा असते. या भरतभूमीच्या सर्व गुणांचे वर्णन करणे कोणाला शक्य आहे?' असा या भूमीचा पुराणकाराने गौरव केला आहे. (ब्रह्मपुराण–आनंदाश्रमप्रत. अ. २७)

वरील वचने अत्यंत स्फूर्तिदायक आहेत व भारताच्या प्राचीन तत्त्ववेत्त्यांनी त्या जुन्या काळी राष्ट्रधर्माविषयीचे हे विचार सांगितले हे आपल्याला अत्यंत भूषणावह आहे, हे खरे. पण हे सर्व ग्रंथगत आहे. पुराणात आहे. प्रत्यक्षात या राष्ट्रनिष्ठेने भारून जाऊन, आपपरभाव निश्चित करून, मातृभूमीसाठी परकीय आक्रमकांशी प्राणपणाने हिंदुलोक संघटित होऊन लढले, या निष्ठेपायी त्यांनी सर्वस्वाचा होम करून घेतला आणि या दिव्य निष्ठेने प्रेरित होऊन भारताच्या लोकसमुदायातून एक प्रबल, समर्थ व संपन्न असे राष्ट्र त्यांनी निर्माण केले, असे कधी घडले आहे काय, ऐतिहासिक कालात घडले काय, असा प्रश्न आहे. तसे झाले असेल तरच वरच्या ग्रांथिक विचारांचे महत्त्व. नाही तर आज भारतात काय कमी आहे? राष्ट्रनिष्ठा, भारतनिष्ठा, मातृभूमीची भक्ती, सर्वस्वाचा त्याग यांविषयी लेखन व उपदेश भारतात टनावारी चालू आहे. पण असा एक तरी पक्ष भारतात आहे काय की ज्याला राष्ट्रनिष्ठ म्हणता येईल? भारतीय जीवनाचे एक क्षेत्र तरी असे आहे काय की जेथे या निष्ठेने कार्यकर्ते प्रेरित झालेले आहेत? राजकारणात तर राष्ट्रनिष्ठा औषधाला तरी सापडेल की नाही याची शंका आहे. तेव्हा केवळ ग्रांथिक तत्त्वज्ञान सांगितलेले आहे, याला फारसे महत्त्व नाही. ते तत्त्वज्ञान लोकांच्या जीवनात, प्रत्यक्षात किती आचरले जाते यावर सर्व अवलंबून आहे. म्हणून हे पहावयास हवे की, भारतात प्राचीन काळी ही निष्ठा प्रत्यक्षात किती अवतरली होती? तिच्यामुळे या भूमीत संघटित सामर्थ्य किती निर्माण झाले होते?

शिकंदराच्या काळी :

वर सांगितलेच आहे की कोणतेही संघटनातत्त्व समाजात किती प्रभावी आहे याची खरी कसोटी परकीय आक्रमणाच्या वेळी लागते. सोन्याची

विशुद्धी किंवा श्यामिका (हीण) यांची खरी परीक्षा अग्नीत होते. त्याचप्रमाणे लोकांच्या निष्ठेची खरी परीक्षा रणकुंडात होत असते. भारताच्या प्रारंभकाळीच भारताच्या राष्ट्रनिष्ठेची कसोटी लागली आणि तीत या सुवर्णभूमीतले हे सुवर्ण अगदी बावन्नकशी ठरले असा इतिहासवेत्त्यांनी आज एकमुखाने निर्वाळा दिला आहे. शिकंदराने भारतावर जे भीषण आक्रमण केले ते रणकुंड, आणि त्यातून भारताचे पहिले सम्राट महाराज चंद्रगुप्त मौर्य यांनी निर्माण केलेले अखिल भारताचे पहिले साम्राज्य हे शुद्ध सुवर्ण होय. हिंदुलोक फार प्रचंड असे संघटित सामर्थ्य निर्माण करू शकतात, हे इतिहासकाळात त्या वेळी प्रथम सिद्ध झाले.

पारसीक राष्ट्राचे–इराणचे–व ग्रीकांचे पिढीजात वैर. पण ग्रीकांची लहान लहान गणराज्ये त्या एकछत्री पारसीक साम्राज्यशक्तीपुढे फारशी टिकाव धरू शकत नसत. शिकंदरचा पिता फिलिप याने ग्रीकांचे एकराज्य निर्माण केले, व ते संघटित सामर्थ्य पाठीशी घेऊन शिकंदर विश्वविजयासाठी बाहेर पडला. पहिल्या धडाक्यालाच त्याने दरायसच्या पारसीक साम्राज्याचा विध्वंस केला व इराणचा सम्राट, म्हणून स्वतःच्या नावाची द्वाही फिरविली. वाटेत त्याने बाबिलोनी साम्राज्य असेच धुळीस मिळविले होते. त्यामुळे गंगेच्या काठचे मगध साम्राज्य असेच निर्दाळून हिंदुस्थानचा सम्राट म्हणून मिरवण्याची त्याला स्वप्ने पडू लागली. म्हणून त्याच जोसात तो तसाच वादळी वेगाने पुढे निघाला व भारतावर कोसळला. बाबिलोन, इराण येथे जशी कोपराने खणण्याजोगी मऊ भुसभुशीत जमीन सापडली तशीच येथे सापडेल असे त्याला वाटले होते. पण येथे त्याला पावलोपावली काळ्या, लोखंडी फत्तराची ठेच लागू लागली. आणि अखेरीस या फत्तरावर त्याच्या स्वप्नांच्या ठिकऱ्या होऊन, गंगाकाठच्या मगधसाम्राज्याचे दुरून दर्शन घेण्याचे भाग्यही न मिळता, त्याला रक्तबंबाळ अवस्थेत परत जावे लागले. विश्वविजेत्या त्या सेनानीचा हा दारुण मुखभंग कशामुळे झाला ?

भारतांतील जिवंत राष्ट्रधर्मामुळे !

भारताच्या सीमेवर त्या वेळी सिंधूनदीच्या दोन्ही तीरांवर सौभूती, कठ, मालव, क्षुद्रक, अग्रश्रेणी, पट्टनप्रस्थ अशी अनेक गणराज्ये (प्राजके–रिपब्लिकस्) व तक्षशिलेसारखी काही राजके सत्तारूढ होती. या राज्यांचे परिघ

लहान होते. त्यांचा जीव लहान होता. त्यामुळे शिकंदराच्या अफाट सेना-सागराचा प्रतिकार करण्यात ती यशस्वी झाली नाहीत. शिकंदराला प्रत्येक वेळी जयच मिळाला. पण तो सुखासुखी मिळाला नाही. या गणराज्यांनी त्याला इतका कडवा प्रतिकार केला की, प्रत्येक तसून् तसू भूमी शिकंदराला लढूनच घ्यावी लागली. दर ठिकाणी तुंबळ रणकंदन करावे लागले. ते इतके की व्यास नदीपाशी येऊन पोचेपर्यंत त्याचे ते अफाट सैन्य हैराण होऊन गेले. आणि पलीकडे यौधेयगणांची कडवी सेना आपल्या स्वागतासाठी उभी आहे हे कळताच त्याने हाय खाल्ली. आणि तसेच पुढे जाण्याचा शिकंदराने आग्रह धरला तेव्हा सैन्यात वेदिली माजण्याची चिन्हे दिसू लागली. प्लुटार्क म्हणतो 'पौरवाशी [पोरसशी] झालेल्या लढाईतच मॅसिडोनियन सेना मनाने खचून गेली होती. त्यात तिने ऐकले की, पुढे एकेक राजा ८० हजार, दोन लक्ष अशी सेना घेऊन संग्रामास सिद्ध झालेला आहे. त्यामुळे शिकंदर पुढे जाऊ लागला तर त्याला निश्चयाने विरोध करावयाचा असे शिपायांनी ठरविले.' या प्रसंगाची अत्यंत करुण वर्णने ग्रीक व रोमन इतिहासकारांनी केलेली आहेत. शिकंदर गंगा ओलांडून मगधावर चालून जाण्याचा आपला आग्रह सोडीत नाही असे दिसू लागताच सैनिकांच्या काळजात धडकी भरली. व हजारो सैनिक रडू लागले. त्याच्या तंबूच्या दाराशी रडत, भेकत उभे राहून आम्हांला परत पाठवा म्हणून याचना करू लागले. या रडण्याचे व हताश होण्याचे एक कारण म्हणजे अनेक वर्षे बायकामुलांचा, घराचा झालेला वियोग हे होय, हे खरे. घरदार सोडून त्या सेनेला आठ वर्षे झाली होती. आणि मगधावर जावयाचे म्हणजे आणखी इतकीच वर्षे जाण्याचा संभव होता. पण बाबिलोन, इराण येथे विजय मिळाले तसे भारतात मिळाले असते तर, मगधच काय पण आसामपर्यंतसुद्धा आणि तेथून दक्षिणेत सातवाहनांच्या प्रतिष्ठानापर्यंतसुद्धा जाण्यास शिकंदराची सेना तयार झाली असती. पण पोलादी तट फोडूनच प्रत्येक पाऊल टाकावे लागणार हे दिसत असल्यामुळे मॅसिडोनियन सेना हताश होऊन रडू लागली यात शंका नाही. (दि क्लासिकल अकाउंटस् ऑफ इंडिया–संपादक–आर. सी. मजुमदार, पृष्ठ १३३, १९०, १९८. या पुस्तकात आरियन, कर्टिस, डियोडोरस, जस्टिन, प्लुटार्क इ. प्राचीन ग्रीक व रोमन इतिहासकारांच्या ग्रंथांतून हिंदुस्थान-विषयक उतारे निवडून संपादकांनी एकत्र करून छापले आहेत. शिकंदराच्या

स्वारीविषयी व येथल्या गणराज्यांनी त्याला जो प्रतिकार केला त्याविषयी जी माहिती येथे दिली आहे ती या प्राचीन ग्रीक–रोमन इतिहासकारांच्या आधारे दिली आहे.

कडवे रागद्वेष :

शिकंदराच्या अत्यंत प्रबळ अशा मॅसिडोनियन सेनेची अशी दुर्दशा कशाने झाली ते आता पाहावयाचे आहे. या काळापर्यंत भारतीय समाज एकरूप होऊन गेला होता आणि भारतवर्षाच्या सीमाही निश्चित झाल्या होत्या. आर्यांनी प्रस्थापिलेल्या यज्ञधर्माचे रूप आता पुष्कळच पालटले होते. पण तो वैदिक धर्म याच नावाने रूढ होता. व त्याचा आणि त्याने पवित्र झालेल्या भरतभूमीचा कडवा अभिमान लोकांच्या चित्तात दृढमूल झाला होता. त्यामुळे शिकंदर हा पर आहे, तो आक्रमक आहे, आपला धर्म व आपली भूमी यांचा तो शत्रू आहे याविषयी त्या सीमेवरील राज्यांतील नागरिकांच्या मनात अणुमात्र शंका नव्हती. स्वभूमीचे प्रेम व आक्रमकांचा द्वेष या राष्ट्रनिष्ठेच्या दोन बाजू आहेत. असे उत्कट रागद्वेष भारतीयांच्या मनात त्या वेळी होते म्हणूनच त्यांनी अत्यंत प्रखर असा प्रतिकार केला. वरवर पाहता त्यांना यश आले नाही. त्यांची राज्ये धुळीस मिळाली. त्यांच्या घोर कत्तली झाल्या. त्यांच्या स्त्रियांना जोहार करावे लागले. पण असे आत्म-बलिदान त्यांनी केले म्हणूनच शिकंदरला व्यास नदीपासून परत फिरावे लागले. नाही तर तो थेट पाटलीपुत्राला गेला असता व तेथल्या सिंहासनावर बसून भारताचा सम्राट म्हणून त्याने आपल्या नावाची द्वाही फिरविली असती. भरतभूमीच्या कपाळचा हा कलंक टळला, तिचे मुखमंडल पहिल्याप्रमाणेच मंगल चिन्हांनी मंडित राहिले, हे त्या सीमाभागातील लोकांनी केलेल्या बलिदानामुळेच होय. हे यश लहान आहे काय ?

शिकंदर आणि भारतीय यांचा हा जो भीषण रणसंग्राम झाला, त्यात भारतीय राष्ट्रनिष्ठेनेच प्रेरित झाले होते, हे अनेक घटनांवरून निश्चित दिसते. मासागा येथे सात हजार लोकांची एक जमात शिकंदराच्या हाती सापडली. त्यांची कत्तल करण्याऐवजी शिकंदराने त्यांना सांगितले की, तुम्ही माझ्या सैन्यात सामील होत असाल तर, तुम्हांस जीवदान देऊन मी लष्करात ठेवून घेईन. त्या लोकांनी ते तात्पुरते मान्य केले व आम्हांस एकमत बनविण्यास

एक रात्र द्यावी, व येथून नऊ मैलांवरील एका टेकडीवर रात्रभर जाऊ द्यावे, अशी विनंती केली. शिकंदराने ती मान्य केली. पण रात्री त्या पठारावर गेल्यावर 'परकीय आक्रमकांच्या पक्षाने भारतीयांशी लढण्याचे पाप आपण करावयाचे नाही' असा त्यांनी निश्चय केला. आणि रातोरात निघून जाण्याचे ठरविले. पण याचा शिकंदराला सुगावा लागताच त्याने त्यांच्यावर अचानक छापा घातला. तरीही शरण न जाता त्या शूर शिपायांनी अखेरपर्यंत लढा देऊन धारातीर्थी मरण पतकरले. त्यांच्यातील स्त्रियाही हाती शस्त्र घेऊन लढल्या व त्यांनीही मृत्यूला कवटाळले. डियोडोरस म्हणतो, 'अपमानित जिण्यापेक्षा हे मानाचे मरणच त्यांना श्रेयस्कर वाटले.' (क्लासिकल अकाउंटस्. आरियन, पृ. १३, डियोडोरस, पृ. १६३)

मालव आणि क्षुद्रक अशी दोन गणराज्ये सिंधूच्या तीरावर होती. त्यांचे पिढीजात वैर होते. पण शिकंदराशी सामना द्यावयाचे ठरताच त्यांनी ते वैरही विसरावयाचे ठरविले. आणि ऐक्यबंध दृढ करून टाकण्यासाठी दोन्ही गणराज्यांनी आपापसात कन्यादाने करून १०००० विवाह घडवून आणले. पण त्यांची सैन्ये एक होण्याच्या आधीच शिकंदराने त्यांच्यावर छापा घातला व सहस्रावधी लोकांची कत्तल केली. पण याच संग्रामात एका नगरीच्या तटावरून शिकंदराने आत उडी मारली त्या वेळी एका हिंदी वीराने एक विषदिग्ध बाण त्याला मारला. त्यामुळे शिकंदर रक्ताच्या थोराळ्यात कोसळला. या अपघातातून तो मरता मरता वाचला. काही दिवस तर तो मेला अशीच अफवा उठली होती. त्यामुळे त्याच्या साम्राज्यात बंडाळ्याही झाल्या. (उक्तग्रंथ– डियोडोरस, पृ. १७६)

राष्ट्रनिष्ठेचे तत्त्वज्ञान :

भारतीयांच्या ठायी दिसून आलेली ही राष्ट्रनिष्ठा ही सहजगत्या झालेली गोष्ट नव्हती. या भूमीत त्या निष्ठेचे तत्त्वज्ञान बुद्धिपूर्वक, प्रयत्नपूर्वक रुजविण्यात आले होते. हे कार्य करणाऱ्या लोकांनाच ग्रीक ग्रंथकारांनी फिलॉसफरस्, जिमनोसोफिस्टस्, ब्राह्मण या नावांनी संबोधिलेले आहे. प्लुटार्क म्हणतो, 'लष्कराइतकाच या फिलॉसफरस्नीही शिकंदराचा पिच्छा पुरविला. जे राजे त्याला शरण गेले त्यांची ते अत्यंत निर्भर्त्सना करीत आणि स्वतंत्र राज्यांना

त्याच्याविरुद्ध उठण्याचा उपदेश करीत. त्यामुळे शिकंदराने अशा कित्येक उपदेशकांना फाशी दिले.' [उक्तग्रंथ, पृ. १९५] ग्युसिकॅनस या राजाला एकदा शिकंदराने नमविले होते, पण त्याने मागून परत उठावणी केली. त्याला शिकंदरने पुन्हा पकडले तेव्हा त्याला असे कळले की या उठावणीमागे अनेक ब्राह्मण आहेत. तेव्हा शिकंदराने त्याला व त्याच्याबरोबर त्या ब्राह्मणांनाही देहदंडाची शिक्षा दिली. [उक्तग्रंथ, पृ. ७७, ७८] एकेप्रसंगी तर एका ब्राह्मणाने निर्भयपणे शिकंदराच्या तोंडावर उत्तर दिल्याचे प्लुटार्कने नमूद करून ठेविले आहे. 'तू सबास याला माझ्याविरुद्ध बंड करण्याची चिथावणी का दिलीस ?' असे त्याने विचारले तेव्हा त्या ब्राह्मणाने शांतपणे उत्तर दिले, 'त्याने मानाने जगावे व मरावेही मानानेच, असे मला वाटले म्हणून.' [पृ. २०१]

सिंधूच्या दोन्ही तीरांवर असलेली ही प्राजके (गणराज्ये) व राजके वैदिक धर्माची अभिमानी होती. कठगण हा तर 'कठोपनिषद' व 'काठकसंहिता' यांमुळे भारतात अमर झाला आहे. हे सर्व कृष्णयजुर्वेदी असून त्यांचे काठकधर्मसूत्र विष्णुस्मृतीचा मूलाधार म्हणून प्रसिद्ध आहे. क्षुद्रकगणाचे लोकही तत्त्वज्ञानातील पांडित्यासाठी शिकंदराच्या वेळी प्रसिद्ध होते. [हिंदू पॉलिटी-डॉ. जयस्वाल, पृ. ७७] क्षुद्रक व मालवगणातील ब्राह्मण हे तत्त्वज्ञानाप्रमाणेच रणपांडित्यातही प्रसिद्ध होते. शिकंदराशी झालेल्या लढाईत ५००० ब्राह्मणांनी धारातीर्थी देह ठेविले. कर्टिस म्हणतो की, 'हे लोक कडवे असल्यामुळे शिकंदाराला कैदी असे फारच थोडे मिळाले. बहुतेकांनी मरण पतकरिले.' झेलम व चिनाब यांच्या संगमावरील, ग्रीक इतिहासकारांनी उल्लेखिलेले 'सिबोई' म्हणजे ऋग्वेदातील 'शिव' जमातीचे लोक होत. [कॉंप्रिहेन्सिव्ह हिस्टरी-खंड २ रा. पृ. १२५, १२७] या धर्माभिमानामुळेच त्यांची भारतवर्षावरील, मातृभूमीवरील निष्ठा अविचलित राहिली होती.

भारतीयांच्या चित्तात राष्ट्रधर्म असा जागृत असल्यामुळे शिकंदराची पाठ फिरताच त्याने जिंकलेल्या प्रदेशांत सर्वत्र उठावणी होऊ लागली. दमारॅक्सस या भारतीय अधीपतीने शिकंदर तक्षशिलेला असतानाच कंदाहार प्रांतात बंडाची चेतवणी दिली होती. नंतर त्याचा परत प्रवास सुरू झाला तेव्हा अश्वकायन गणांनी त्याने नेमलेला सत्रप-राज्यपाल-निकॅनॉर याचा

शिरच्छेद केला. फिलिप या दुसऱ्या सत्रपाचाही असाच शिरच्छेद झाला. शिकंदराच्या सत्तेला हे सरळ आव्हानच होते. पण ते स्वीकारण्याचे सामर्थ्य त्याला नव्हते. त्याने दुसऱ्या एका भारतीय सत्रपाला याचा बंदोबस्त करण्यास आज्ञा दिली व तो पुढे निघून गेला. हे, तो जिवंत असताना ! मग त्याच्या मृत्यूनंतर काय झाले असेल याची सहज कल्पना येईल. भारतीयांच्या मनात या परकी सत्तेविषयी केव्हाच प्रेम नव्हते. कडवा द्वेष होता. त्यामुळे शिकंदराच्या मृत्यूची वार्ता पसरताच ग्रीकांचे सुभेदार, त्यांचे ध्वज, त्यांच्या वसाहती, जे जे म्हणून ग्रीक चिन्ह मागे उरले होते ते त्यांनी समूळ नष्ट करून टाकले व पारतंत्र्याचा कलंक धुऊन काढला. आणि थोड्याच दिवसात एक वावटळ यावी व जावी तसा प्रकार होऊन शिकंदराचे आक्रमण भारतात नामशेषही राहिले नाही. [ए कॉंप्रिहेन्सिव्ह हिस्टरी ऑफ इंडिया, खंड २ रा, प्रकरण १ ले, लेखक डॉ. आर. के. मुकर्जी.]

पहिले स्वातंत्र्ययुद्ध :

पण शिकंदराच्या मृत्यूनंतर दुसरी जी महान घटना भारतात घडून आली तिला हिंदूंच्या संघटित सामर्थ्याच्या दृष्टीने जास्त महत्त्व आहे. ती म्हणजे चंद्रगुप्त मौर्य याचा उदय ही होय. इतिहासकालात या महापुरुषानेच भारताला प्रथम राष्ट्र पदवी प्राप्त करून दिली. शिकंदराची स्वारी आली त्या वेळी तक्षशिलेच्या विद्यापीठात आर्य चाणक्य याच्या हाताखाली तो शिक्षण घेत होता. चाणक्याने परकी सत्तेविषयीचा द्वेष त्याच्या रोमरोमात भिनवून दिला होता. 'परकी सत्ताधाऱ्याला या प्रदेशाबद्दल ममत्व नसते, त्याने तो देश पाशवी बळाने जिंकलेला असतो, म्हणून तो प्रजेला पिळून काढतो व संपत्ती धुऊन नेतो,' हे अर्थशास्त्र या चाणक्याच्या ग्रंथातील वर्णन प्रसिद्धच आहे. [अधिकरण ८ वे. प्रकरण २ रे.] अशा तेजस्वी शिक्षणाने चंद्रगुप्ताचे मन राष्ट्रनिष्ठेने भारून गेले होते. शिकंदर परत फिरताच उध्वस्त झालेल्या गणराज्यांतून, त्याने अखिल आर्यावर्ताचे एकराज्य घडविण्याच्या कल्पनेचा प्रचार करण्यास प्रारंभ केला. आणि जी गणराज्ये प्राणपणाने शिकंदराशी लढली त्यांना स्वातंत्र्याचे, एकराज्याचे व समाजसंघटनेचे हे

आवाहन अत्यंत मानवले व त्यांतील सर्व सेना चंद्रगुप्ताच्या ध्वजाखाली गोळा झाल्या. हे भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते, आणि त्याचा नेता चंद्रगुप्त हाच होता, हे रोमन इतिहासकार जस्टिन यानेही लिहून ठेविले आहे. राष्ट्रनिष्ठेला अवश्य ते आपपरभाव, ते रागद्वेष त्या गणराज्यांतील नागरिकांच्या मनात किती निश्चित झाले होते हे यावरून दिसून येते. भारतवर्ष ही त्यांची मायभूमी होती म्हणून शिकंदर त्यांना पर होता, शत्रु होता. म्हणूनच त्याच्या आक्रमणाचा त्यांनी प्रखर प्रतिकार केला. तशी निष्ठा त्यांच्या मनात नसती तर त्यांनी शिकंदरच्या मॅसिडोनियन सैन्याचे मुक्तिसेना म्हणून कम्युनिस्टांच्या पद्धतीप्रमाणे स्वागत केले असते. पण त्यांनी स्वागत केले ते चंद्रगुप्ताचे. आणि ते स्वातंत्र्यसेनेचे नेताजी म्हणून. कारण तो त्यांना स्वकीय होता. स्वातंत्र्ययुद्ध हा दिव्य अग्नी आहे. त्यात माणसांचे क्षुद्र अहंकार वितळून जातात. शिकंदराशी सामना करण्याचे ठरताच मालव व क्षुद्रक यांनी आपली भिन्न गणराज्ये एक करण्याचे ठरविले हे वर सांगितलेच आहे. आता सर्व गणराज्यांनी भारतराष्ट्रात आपले अहंकार वितळवून चंद्रगुप्ताच्या सेनासागरात विलीन व्हावयाचे ठरविले. चंद्रगुप्ताच्या सेनेत प्रामुख्याने भरती, शिकंदराशी जी गणराज्ये लढली, त्यांच्याच सैनिकांची होती, असे मॅक्क्रिंडल म्हणतो ते अगदी खरे आहे. पण चंद्रगुप्त तेवढ्यावरच थांबला नाही. त्याचे स्वप्न फार भव्य होते. त्याच्या आकांक्षांना गगन ठेंगणे होते. त्यामुळे त्याने व चाणक्याने सर्व राजसत्ताक प्रदेशांतही दौरा काढला व प्रचंड सेना उभारली. (उक्तग्रंथ, डॉ. मुकर्जी. पृ. ३. तळटीप.) पुढील तीन-चार वर्षांत सर्व विंध्योत्तर भारतात महाराज चंद्रगुप्त साम्राज्य स्थापू शकले ते याच संघटनेच्या बळावर; नंतर दहा-पंधरा वर्षांनी ग्रीक सेनापती सेल्यूकस निकेटर शिकंदराप्रमाणेच भारतावर चालून आला तेव्हा त्यांनी त्याला धूळ चारिली ती याच संघटित सामर्थ्याच्या पुण्याईने आणि पुढे थोड्याच वर्षांत अखिल भारतावर महाराजांनी मौर्य साम्राज्य प्रस्थापित केले आणि सांकृतिकदृष्ट्या एकरूप असलेल्या भारतवर्षाचे भारतराष्ट्रात रूपांतर केले तेही लोकांच्या मनांत दृढमूल असलेल्या याच भारतनिष्ठेच्या दिव्य शक्तीने.

परकीय आक्रमकांचा, सर्वस्वाचा होम करून, प्राणपणाने प्रतिकार करण्याची ही भारतीयांची परंपरा पुढे सुमारे एक हजार वर्षे तरी चालू होती.

मागे सांगितलेच आहे की इ. स. हजारपर्यंतचा भारताचा इतिहास हा वैभवाचा आहे, कर्तृत्वाचा आहे, ते सुवर्णयुग होय, याविषयी बहुतेक इतिहासवेत्त्यांचे एक मत आहे. त्याच्या सामर्थ्याला आणि म्हणूनच वैभवाला ओहोटी लागली ती इ. स. १००० नंतर. तेथून पुढे येथल्या समाजाची विघटना सुरू झाली हे त्याचे कारण होय. पण त्या विघटनेची कारणमीमांसा आपल्याला पुढील प्रकरणात करावयाची आहे. सध्या आपण हिंदूंच्या संघटित सामर्थ्याचा इतिहास पहात आहोत. हे सामर्थ्य इ. स. १००० पर्यंत टिकून होते. त्याचेच थोडे धावते अवलोकन करून हे प्रकरण संपवावयाचे आहे.

हिंदूंचे संघटित सामर्थ्य :

सम्राट चंद्रगुप्त यांनी सेल्युकस निकेटर याचे ग्रीक आक्रमण निर्दाळून टाकल्यानंतर व आपले साम्राज्य इराणच्या सीमेला नेऊन भिडविल्यानंतर पुढील सव्वाशे वर्षांत ग्रीकांची भारताकडे वाकडा डोळा करून पाहण्याची छाती झाली नाही. पण अशोकानंतरचे मौर्य राजे अगदी कर्तृत्वहीन होते. त्यामुळे आक्रमकांची लोभी दृष्टी पुन्हा भारताकडे वळू लागली. आणि डेमिट्रियस या ग्रीक राजाने भारतावर स्वारी केली. या वेळी आणखी एक दुर्दैव भारतावर ओढवले होते. ते म्हणजे बुद्धधर्माची अहिंसा हे होय. शिकंदराच्या स्वारीच्या वेळी बौद्धधर्म मगधाच्या परिसरापलीकडे फारसा पसरला नव्हता. पंजाबात तर त्याचे नावही कोणाला माहीत नव्हते. पण त्यानंतर, सम्राट अशोकाने राजसत्तेच्या बळावर भारतात बौद्धधर्माचा, धम्मविजयाचा, अहिंसेचा प्रसार केला. त्यामुळे भारताची प्रथम प्रतिकारवृत्ती, नंतर प्रतिकार शक्ती, आणि शेवटी प्रतिकारयंत्रणा ढिली झाली. वर आपण पाहिलेच की, शिकंदराला विजय मिळविताना प्रत्येक अंगुळभूमीसाठी लढावे लागले. पण आता ! डेमिट्रियस बॅक्ट्रियातून जो निघाला तो थेट अयोध्येला भिडला. मध्ये वाटेत त्याला कोणी आडवे गेलेच नाही. शिकंदराला व्यास नदीवरून निराशेने परतावे लागले, आणि डेमिट्रियस थेट अयोध्येपर्यंत यात्रेला यावा तसा आला याचा अर्थ काय ? याचा एकच अर्थ की शस्त्रबळाची निंदा, अहिंसेचे प्रेम, ऐहिक ऐश्वर्याचा तिटकारा हे त्रिविध रोग त्या वेळी मगधसाम्राज्याला जडले होते. सुदैव एवढेच की आजच्याप्रमाणे अखिल भारत त्या वेळी या रोगांनी

पीडित झाला नव्हता. कलिंगाचा महाप्रतापी राजा खारवेल याने डेमिट्रियसशी मुकाबला करून त्याला सीमापार केले. त्यानंतर चारच वर्षांनी मिनँडर हा ग्रीक पुन्हा स्वारी करून आला होता. या वेळी मगधसम्राट बृहद्रथ याच्या नाकर्तेपणाची सर्वांनाच चीड आली होती. त्याच्या प्रतिकारशून्य शांततेमुळे लोक संतप्त झाले होते. ही संधी साधून त्याचा सेनानी पुष्यमित्र याने त्याचा शिरच्छेद केला आणि स्वतः सम्राटपदावर येऊन त्याने मिनँडरवर चालून जाऊन त्याच्या सेनेचा निःपात केला व भारताचे स्वातंत्र्य अबाधित राखले. या दोन्ही आक्रमणांच्या वेळी भारताच्या सीमा हिंदुकूशपर्यंत आहेत याची खारवेल, पुष्यमित्र या दोघांनाही जाणीव होती. शत्रूचा तेथपर्यंत पाठलाग करून त्याला सीमेच्या बाहेर काढल्यानंतरच ते थांबले. ही घटना इ. पू. १८४ या वर्षी घडली. व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो, 'यानंतर जवळजवळ १७०० वर्षांत भारतावर पाश्चात्त्यांचे आक्रमण झाले नाही.' (अर्ली हिस्टरी ऑफ् इंडिया, पृ. २१०)

शस्त्रबळ आणि धर्मबळ :

पुष्यमित्राच्या शुंग वंशाने सुमारे शंभर वर्षे राज्य केले. आणि त्यानंतर पुढील चारशे वर्षांत उत्तरभारतात दुर्दैवाने पराक्रमी असा सम्राट झाला नाही. आणि याच काळात ग्रीकांच्यापेक्षा शतपटीने भीषण अशी शककुशाणांची महाभयंकर आक्रमणे भारतावर कोसळत होती. हे शककुशाण म्हणजे केवळ हिंस्र श्वापदांच्या टोळ्या होत्या. कत्तल, आग, लूट, विध्वंस हाच त्यांचा आनंद होता. त्यांनी केवळ भारतालाच नव्हे तर कास्पियन समुद्रापासून चीनपर्यंत सर्व देशांना त्राही भगवान करून सोडले होते. फरक एवढाच की भारताने शस्त्रबळाने व धर्मबळाने त्यांना आपल्या अंतरात विलीन करून या रानटांचे नावही भारतात उरू दिले नाही.

उत्तरेस मोठा पराक्रमी सम्राट झाला नाही हे खरे, पण त्या वेळी दक्षिणेने ही जबाबदारी शिरावर घेतली. पैठणच्या सातवाहनांवर शकांची धाड कोसळली होती. पन्नास एक वर्षे त्यांची नाशिक, जुन्नरपर्यंत सत्ताही प्रस्थापित झाली होती. पण या वेळी सातवाहन कुलातील गौतमीपुत्र सातकर्णीचा उदय झाला व त्याने शकांशी तुंबळ संग्राम करून त्यांचा राजा नहपान यास ठार मारले व

शकांना नर्मदापार केले. याच वेळी उत्तरेत यौधेय व मालव या गणराज्यांनी शकांना असाच प्रखर प्रतिकार केल्यामुळे त्यांच्या आक्रमणाचा कणाच मोडला. पण याच वेळी शकांपेक्षाही भयंकर अशा कुशाणांचे आक्रमण भारतावर आले. त्यांचा मोठा राजा कनिष्क याने तर उत्तरपश्चिम भारतावर साम्राज्यच प्रस्थापित केले. या वेळी मात्र कुशाणांना तीव्र प्रतिकार झाला नाही. अखिल भारताचे सामर्थ्य संघटित करील असा महापुरुष या वेळी कोणीच जन्माला आला नाही. त्यामुळे कुशाणसत्तेचे निर्मूलन लगोलग झाले नाही. आणि त्यांच्या आश्रयाने शकही उत्तरेत दीर्घकाळपर्यंत टिकून राहिले.

पण शककुशाणांचे शस्त्रबळाने राजकीयदृष्ट्या निर्मूलन झाले नाही तरी त्यांच्या शककुशाणत्वाचे निर्मूलन मात्र निश्चित झाले. कारण या दोन्ही जमातींनी संपूर्ण भारतीय धर्मांचा स्वीकार केला. नहपानाचा जावई उषवदात व पुढील शकराजा रुद्रदामन यांनी संपूर्णपणे हिंदुधर्माचा स्वीकार केला. ते ब्राह्मणांना दाने देऊ लागले, लक्षभोजन घालू लागले. त्यांनी भारतीय नावे स्वीकारली आणि संस्कृत भाषेचा अभिमान धरून आपले शिलालेख संस्कृतातच कोरविले. कुशाणांचा राजा कनिष्क हा बौद्ध झाला व अशोकाप्रमाणेच त्याने बौद्धधर्माचा प्रसार भारतात व बाहेरही केला. त्याने अखिल बौद्धपरिषदही भरविली. त्या वेळीच बौद्धांच्या महायान पंथाची स्थापना झाली. कनिष्क संस्कृत भाषेचाही अभिमानी होता. त्याने बौद्धतत्त्वज्ञानाचे ग्रंथ संस्कृतात लिहविले. आश्चर्याची गोष्ट अशी की, कनिष्क हा बुद्धाबरोबर रुद्राचीही उपासना करीत असे ! त्याचा नातू याने तर वासुदेव हे आर्य नाव धारण करून वैदिकधर्माचाच स्वीकार केला. त्याच्या नाण्यावर शिव आणि नंदी यांच्या प्रतिमा आहेत. तेव्हा शककुशाणांची आक्रमणे परक्यांची खरी, पण कालांतराने तेच भारतीय झाले, येथला धर्म व संस्कृती त्यांनी स्वीकारली व आपले परकीयत्वच बव्हंशी नष्ट करून टाकले. तरीही त्यांच्या आणि भारतीयांच्या मनात, ते सत्ताधारी असेपर्यंत, काही अंशी ती जाणीव शिल्लक होती. पुढे चौथ्या शतकात समुद्रगुप्ताने कुशाणांचा समूळ उच्छेद केला आणि त्याच्यामागून त्याचा पुत्र चंद्रगुप्त (२ रा) विक्रमादित्य याने शकांचे निर्मूलन केले. त्यानंतर ती जाणीव समूळ नष्ट होऊन शककुशाण भारतीय संस्कृतीत पूर्ण विलीन झाले. या वेळी भारतीय लोक संघटित सामर्थ्य निर्माण करू शकतात हे पुन्हा एकदा गुप्तवंशाने सिद्ध

केले. पण येवढ्यावर हे भागले नाही. त्यांच्या कारकीर्दीतच शककुशाणांच्या इतकेच हिंस्र असे जे हूण त्यांच्या आक्रमणाचे प्रलयंकर धक्के भारताला बसू लागले. आणि भारताच्या संघटनसामर्थ्याची, त्याच्या संघटनतत्त्वाची व भारतीयांच्या राष्ट्रनिष्ठेची पुन्हा एकदा रणकुंडात परीक्षा होण्याची वेळ आली.

भारत व इतर जग :

हूणांच्या स्वाऱ्या म्हणजे जगावरचेच संकट होते. मध्य आशियातून निघून या टोळधाडी प्रथम चीनवर तुटून पडल्या. जाळपोळ, लूट, कत्तली करून त्यांनी चीनचा मुलूख वैराण करून टाकला, शस्त्रबळाने त्यांचा प्रतिकार करणे चीनला अशक्य झाले; म्हणून आपल्या सीमेवरती त्याने ती प्रसिद्ध चिनी भिंत बांधली. यानंतर हूणांची एक काळलाट युरोपवर पसरली. या हिंस्र रानटांनी रशिया पायदळी तुडवून डॅन्यूबपर्यंत मजल मारली व शेकडो मैलांचे प्रदेश वेचिराख करून टाकले. अटिल्ला हा त्यांचा पुढारी म्हणजे संहारासुरच होता. रोमन साम्राज्यही त्याने हादरून कोसळून टाकले. मुंडक्यांच्या राशी करून त्यावर बसण्यात त्याला आनंद वाटत असे. इ. स. ४५३ मध्ये याचा मृत्यू झाल्यावर हूणांचे हे तुफान भारताकडे वळले. पण चीन, रशिया व मध्य युरोप यांच्यापेक्षा भारतात त्याला निराळा अनुभव आला. गुप्तवंशातील कुमारगुप्ताचा मुलगा स्कंदगुप्त नुकताच गादीवर आला होता. त्याने या क्रूर हिंस्र काळलाटेचे आव्हान स्वीकारले व पाटलीपुत्राहून निघून तो वायव्य सरहद्दीवर जाऊन हिमालयीन पहाडासारखाच तेथे उभा राहिला. अनेक वेळा हूणांच्या तुफानी काळलाटा त्याच्यावर आदळल्या पण दरवेळी त्या फुटून गेल्या व सम्राट स्कंदगुप्त अभंग राहिला. दरवेळी धडक देताच आपलाच कपाळमोक्ष होतो हे कालांतराने हूणांच्या जड डोक्यात शिरले. मध्य आशिया, चीन, रशिया, मध्य युरोप या प्रदेशांत मुसंडी मारून वराहवेगाने सहज प्रवेश करणाऱ्या या श्वापदांच्या टोळ्यांना भारताच्या भूमीवर आपले खूरही या वेळी ठेवता आले नाहीत. पुढे स्कंदगुप्ताच्या वृद्धापकाळात भारतावर पुन्हा ही टोळधाड आली. या वेळीही स्कंदगुप्त पुन्हा त्यांच्यावर चालून गेला. पण त्याला शिबिरातच मृत्यू आला. त्यामुळे हूणांना रान मोकळे मिळाले. आणि मग जवळ जवळ पन्नास-साठ वर्षे पश्चिमोत्तर भारतात मृत्यूचे तांडवनृत्यच चालू होते. तोरमाण व

मिहिरगुल या हूणांच्या नायकांनी पुराणकाळच्या दैत्यदानवांनाही फिके ठरविले. पृथ्वीचा अंत जवळ आला असेच त्या प्रदेशात भासू लागले. मगधाचे राजे अत्यंत कर्तृत्वहीन होते. त्यामुळे सर्वत्र घोर निराशा पसरली होती. पण अजूनही भारतात राष्ट्रनिष्ठा जागृत होती. तिच्या बळावरच माळव्याचा राजा यशोधर्मा याने अनेक हिंदुराजांची संघटना उभारली आणि मिहिरगुलाला रणांगणात गाठून त्याचा संपूर्ण पराभव करून भारताला प्राणांतिक संकटातून सोडविले.

संभूय समुत्थान :

यशोधर्म्याच्या या विजयाला अनेक दृष्टींनी महत्त्व आहे. तो काही सम्राट नव्हता. तरी अनेक राजसत्तांची तो संघटना करू शकला. समानसंकट दिसताच आपसातील क्षुद्र भेदभाव, मत्सर, अहंकार यांना विवेकाने जिंकण्याचे सामर्थ्य लोकांत असणे हे त्यांच्या जिवंतपणाचे, स्वत्वाचे, स्वाभिमानाचे, जागृत निष्ठेचे लक्षणच होय. त्याची प्रतीती या वेळी आली. यशोधर्म्याच्या ध्वजाखाली मगधाचा बालादित्यही आला होता. तो नामधारी का होईना पण सम्राट होता. तरी तो या राजसंघटनेत सामील झाला हा त्याच्या विवेकाचा प्रभाव होय. संघटनविद्या म्हणजेच जगण्याची विद्या अजून भारत विसरला नव्हता असे यावरून निश्चयाने म्हणता येते.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट. तोरमाण, मिहिरगुल हे शिवोपासक होते. म्हणजे भारतीय वैदिक धर्मानुयायी राजांना ते स्वधर्मीय होते. पण यशोधर्मा व त्याचे सहकारी राजे यांनी हा विचार राष्ट्ररक्षणाच्या आड येऊ दिला नाही. त्याला त्यांनी शत्रूच लेखिले. उलट बौद्धांची वृत्ती पहा. पुष्यमित्र शुंग याच्या वेळी आक्रमण करून आलेला मिनँडर हा ग्रीकराजा बौद्ध झाला होता. वास्तविक तरीही भारताचा तो शत्रूच होता. पण बौद्धांनी हे ओळखले नाही. व त्यांनी त्याचा पक्ष घेतला. पुष्यमित्राने त्यांच्यावर शस्त्र धरले ते याच कारणाने. [प्रो. जगन्नाथ-काँप्रिहेन्सिव्ह हिस्टरी ऑफ इंडिया; खंड दुसरा. पृ. ९९. डॉ. जयस्वाल यांचाही आधार या विधानासाठी प्रो. जगन्नाथ यांनी दिला आहे.] एरवी पुष्यमित्र हा हिंदु वैदिक परंपरेप्रमाणे धर्मसहिष्णूच होता. पण राष्ट्रद्रोही अन्यपंथीयांनाच नव्हे तर अन्यधर्मीयांनाही राष्ट्रनिष्ठ

स्वकीयांपेक्षा जास्त सहिष्णुतेने व प्रेमाने वागविण्याची सध्याची परंपरा त्याकाळी भारतात नसल्यामुळे त्याने बौद्धांना कठोर दंड केला. वैदिक धर्मीयांनी वेदकाळापासून राष्ट्रनिष्ठा हे संघटनातत्त्व स्वीकारले होते. गुप्तकाळातही त्यांची ती निष्ठा जिवंत होती हे मिहिरगुलाचा त्यांनी जो निःपात केला त्यावरून स्पष्ट दिसून येते.

सुवर्णयुग :

या निष्ठेमुळेच इ. स. पू. ३२७ पासून इ. स. ५२८ या आठशे-नऊशे वर्षांच्या काळात ग्रीकांची आक्रमणे, शककुशाणांची आक्रमणे आणि हूणांच्या टोळधाडी यांना तोंड देऊन त्यांचे भारताला निर्दाळण करता आले आणि आपला धर्म, संस्कृती व स्वत्व यांचे रक्षण करण्यात तो यशस्वी झाला. इ. स. ५२८ नंतर म्हणजे मिहिरगुलाचा पराभव झाल्यानंतर ५०० वर्षे भारताला शांततेची लाभली. व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो त्याप्रमाणे या दीर्घकाळात भारत परकीयांच्या आक्रमणापासून अगदी मुक्त होता. मध्यंतरी महंमद कासीम याने सिंधवर स्वारी केली होती, पण ते आक्रमण, त्याच्या मते, अगदी एका प्रांतापुरते परिच्छिन्न असून त्याचा भारतावर तसा काहीच परिणाम झाला नाही. इ. स. ६०० ते १००० हा काळ भारताच्या इतिहासात मोठ्या उत्कर्षाचा झाला असे इतिहासवेत्त्यांचे मत आहे. कुलगुरु चिं. वि. वैद्य या काळाला विशेषतः ८०० ते १००० या काळाला भारताचे सुवर्णयुग मानतात. दीर्घकाल एका तत्त्वावर दृढ निष्ठा ठेवून भारतीयांनी जे संघटनसामर्थ्य जोपासले त्याचेच हे अमृतमधुर फळ त्यांना मिळाले, हे उघड आहे.

त्या प्राचीन काळात हिंदूंनी संघटित सामर्थ्याची अशी जोपासना केली ही जगाच्या इतिहासातली असामान्य गोष्ट आहे. या काळात युरोपवर शककुशाण-हूण, गॉथ या रानटांच्या अशाच टोळधाडी कोसळल्या होत्या. पण त्यांपासून युरोपियांना, ग्रीकरोमनांनाही स्वतःचे, स्वतःच्या संस्कृतीचे रक्षण करता आले नाही. या रानटांनी त्यांची राज्ये, साम्राज्ये धुळीस मिळविली. कारण कोठल्याच संघटनतत्त्वाचा त्यांनी त्या काळात अवलंब केला नव्हता. आर्यांनी ऐश्वर्याची ही राजविद्या चांगली अभ्यासली होती. आणि हजारो वर्षे तिची दृढ उपासना चालू ठेविली होती. व्हिन्सेंट स्मिथने, या आक्रमकांशी भारताने जो मुकाबला

केला त्याचा इतिहास देताना, भारताच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणारे चंद्रगुप्त मौर्य, सातवाहन, पुष्यमित्र, समुद्रगुप्त, स्कंदगुप्त, यशोधर्मा हे राजे वैदिकधर्माचे कट्टे अभिमानी होते, असे पुन्हा पुन्हा आवर्जून सांगितले आहे. एके ठिकाणी तो म्हणतो, " शक, पल्हव, यवन या ज्या परकी जमाती पश्चिम भारतात येऊन स्थिरावल्या होत्या त्यांना वैदिक धर्मीय राजा विलिवयांकुर [गौतमीपुत्र सातकर्णी] याने कायमचे शत्रुस्थानी लेखले होते. नहपानाच्या सत्तेचा समूळ निःपात करून त्याने त्या शत्रूंनी जिंकलेले प्रदेश परत घेतले. अखिल हिंदूंना आणि विशेषतः सनातन ब्राह्मणीधर्माच्या हिंदूंना भारतबाह्य परकीयांचा जो द्वेष वाटत असे त्यातूनच विलिवयांकुर राजाला शक-यवनांच्या पारिपत्यांची प्रेरणा मिळाली होती. " हा उतारा देऊन स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात :

क्वचित, भारतावरील या इतिहासकार स्मिथच्या इंग्लिश साम्राज्याचेही कट्टर शत्रू हिंदू हेच होते या त्याच्या स्वानुभवाचे शल्यही त्याच्या वरील वाक्यात व्यक्तविले गेले असावे.

[समग्र सावरकरवाङ्मय. खंड ४ था. पृ. ६७७]

प्राचीन काळी, भारतात द्रविड, असुर, नाग, राक्षस, निषाद, यवन, किरात, कैवर्त, कांबोज, दरद, खस, शक, कुशान, पणी, आंध्र, पुलिंद, मूतिब, पुंड्र, भरत, यादव, भोज अशा अनेक जमाती चिरवसती करून राहिल्या होत्या. त्यांना एकरूप देण्यात, त्यांतून एक समाज निर्माण करण्यात आर्य यशस्वी झाले, एवढेच नव्हे तर त्या समाजात दार्ढ्य निर्माण करून, त्याला संघटित करून त्याच्या ठायी बल, सामर्थ्य व दुर्जय अशी प्राणशक्ती निर्माण करण्यातही त्यांना अपूर्व यश आले, याविषयी वरील इतिहासदर्शनानंतर कोणाला शंका राहील असे वाटत नाही. ग्रीक, शक, कुशाण, हूण यांनी पुनः पुन्हा केलेल्या आक्रमणांचा निःपात करून भारताचे स्वत्त्व नष्ट करू पहाणाऱ्या त्या जमातींना आपल्या अभ्यंतरात पूर्णपणे विलीन करून त्यांनाच भारतीय बनवून टाकण्या-इतके शस्त्रबळ व धर्मबळ त्यांच्या ठायी होते. त्याचप्रमाणे धर्म, तत्त्वज्ञान, विद्या, कला यांची जोपासना करण्यासाठी आणि गोधन, कृषिधन, सुवर्णधन यांनी ही भूमी संपन्न करण्यासाठी मोठमोठी साम्राज्ये स्थापन करण्यास अवश्य ते बुद्धिबल व अवश्य ते संघटनकौशल्यही त्यांनी परिणत केले होते. मौर्यांचे साम्राज्य, सातवाहनांचे साम्राज्य, गुप्तसाम्राज्य, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट

यांची साम्राज्ये, श्रीहर्षाचे साम्राज्य, ही साम्राज्ये त्यांच्या या गुणसंपदेची साक्ष देतील.

हिंदुसमाज संघटनक्षम आहे काय, संघटित सामर्थ्य त्याने पूर्वी कधी निर्माण केले होते काय, असा आपला प्रश्न होता. पाश्चात्य-पौर्वात्त्य पंडितांच्या आधारे व इ. स. १००० पर्यंतच्या भारताच्या इतिहासाच्या साक्षीने, त्या प्रश्नाला आपल्याला आता निःशंकपणे उत्तर देता येईल की, होय. समाजसंघटनेचे शास्त्र, चिरंजीव होण्याची ही राजविद्या हिंदुसमाजाने, जगातल्या इतर कोणत्याही समाजापेक्षा, त्या काळात जास्त अभ्यासिली होती, जास्त आत्मसात केली होती.

३

दोन प्रवाह

हिंदुसमाज समाज आहे काय, त्याला प्राचीन काळी तरी काही संघटनातत्त्व होते काय, या प्रश्नांचा विचार गेल्या दोन प्रकरणांत आपण केला. अखिल भारतात वसत असलेल्या शेकडो जमातींना एकरूपता आणून त्या प्रचंड मानव-समूहातून एक संघटित समाज निर्माण करण्याचे प्रयत्न त्या काळच्या समाजधुरीणांनी–आर्यांनी–निश्चित केले होते आणि त्यांना त्यांत यशही तसेच स्पृहणीय आले होते असे त्यावरून आपल्याला दिसले. आणि याच प्रयत्नातून भारतात प्रथम यज्ञधर्मनिष्ठा व तीतून पुढे राष्ट्रनिष्ठा विकसित होऊन हा समाज अत्यंत बलशाली झाला, अमोघ पराक्रम करू शकला असेही आपल्याला दिसून आले. राष्ट्रनिष्ठा या संघटनतत्त्वाच्या सामर्थ्यामुळेच इ. स. पू. ३२३ पासून पुढील एक हजार वर्षांत ग्रीक, शक, कुशाण, हूण इ. सुसंस्कृत वा रानटी जमातींची जी ९।१० आक्रमणे भारतावर आली, ज्या आक्रमणांमुळे युरोपीय संस्कृती नष्ट होण्याची वेळ आली होती, त्यांना तोंड देऊन त्यांचे निर्दाळण करण्यास भारत समर्थ झाला, असा त्यांतून निघणारा निष्कर्षही आपण ध्यानी घेतला. हा निष्कर्ष सर्वमान्य होईल अशी आशा वाटते.

अरब आक्रमणे

भारताच्या ठायी असे सुसंघटित सामर्थ्य असल्यामुळेच इ. सनाच्या आठव्या

शतकापासून येऊ लागलेल्या आरबांच्या आक्रमणांनाही त्याला यशस्वीपणे तोंड देऊन त्यांचा निःपात करता आला. इसवी सनाच्या पाचव्या-सहाव्या शतकात **स्कंदगुप्त व यशोवर्मा** यांनी हूणांचा निःपात केल्यानंतर पुढील पाचशे वर्षांत भारतावर शककुशाणहूणांच्या आक्रमणाइतके भयंकर आक्रमण झाले नाही, असे काही इतिहासपंडितांचे मत आहे. पण ते तितकेसे यथार्थ वाटत नाही. आठव्या शतकाच्या प्रारंभापासून सुरू झालेली आरबांची आक्रमणे काही कमी भयानक नव्हती. या काळात आरबांनी दक्षिण युरोप जवळजवळ सर्व जिंकला होता. इजित, इराण तार्तरी हे प्रदेश तर त्यांनी पहिल्या धडाक्याला लोळविले. इजित, इराणमधली प्राचीन साम्राज्ये त्यांनी धुळीस मिळविली. त्यांच्यापुढे उभे राहणे, फ्रान्समधील चार्लस मार्टेलचा अपवाद वजा करता, कोणालाच शक्य झाले नाही. हिंदुस्थानात प्रथम महंमद कासीमने सिंध जिंकला तेव्हा तीच परिस्थिती निर्माण झाली होती. पण हळूहळू राजस्थानातले राजपूत आरबांशी मुकाबला करण्यास सिद्ध झाले व बाप्पा रावळ, कालभोज यांनी त्या जगज्जेत्यांना चांगलाच धडा शिकविला. खलिफा अलमामून याच्या कारकीर्दीत आरबांनी राजस्थानवर चोवीस वेळा स्वाऱ्या केल्या. पण तितक्याही वेळा मेवाडचा राजा दुसरा खुम्माण याने त्यांना खडे चारले. यापूर्वी आरबांनी दक्षिणेत उतरण्याचा प्रयत्न केला होता. पण गुजराथच्या चालुक्यांनी आपल्या खड्गाचा तेथेही अडसर घातला. यामुळे आरबांचा दक्षिण भारतात शिरकाव झाला नाही आणि भारतात मुस्लीमांचे राज्य स्थापन झाले नाही. रजपूत आणि चालुक्य यांच्या या पराक्रमाला विशेष अर्थ आहे. शक, हूण यांना स्वतःचा निराळा असा धर्म नव्हता, स्वत्व नव्हते. पण मुस्लीमांचे तसे नव्हते. अत्यंत कडव्या व आक्रमक अशा धर्माचे ते उपासक होते. शिवाय आरबांची संस्कृती ही उच्च दर्जाची होती. पण त्यांनाही भारतीयांनी रणात पराभूत केले. त्यामुळे भारताचे स्वातंत्र्य टिकवून स्वधर्म व स्वसंस्कृती यांचे संरक्षण करण्यास हिंदू अजूनही समर्थ होते हे सिद्ध झाले.

दा. क्र. 94223

चित्र पालटू लागले

दहाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून आणि विशेषतः अकराव्या शतकाच्या प्रारंभापासून—इ. स. १००१ पासून—मात्र हे चित्र पालटू लागले. इ. स. ९८० मध्येच जयपाळाचा पराभव करून सबुक्तगीनने पंजाब घेतला. पुढे ठरलेली

खंडणी जयपाळाने न दिल्यामुळे सबुक्तगीनाने पुन्हा स्वारी केली. त्या वेळीही जयपाळाचा पराभव झाला. आणि पंजाब प्रांत हिंदूंच्या हातातून कायमचा जाऊन भारताच्या आणि हिंदूंच्या इतिहासातील प्रदीर्घ तमोयुगास प्रारंभ झाला. एक दोन लढायांतील पराभवांवरून काहीच निष्कर्ष काढता येत नाही. तेव्हा जयपाळाचा दोनदा पराभव होऊन हे पराभवकांड येथेच थांबले असते तर युग पालटले, असे म्हणता आले नसते. पण सबुक्तगीनाचा मुलगा गझनीचा महमूद याने १००१ मध्ये भारतावर स्वाऱ्या करण्यास प्रारंभ करून १०२४ पर्यंत एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या. पण हिंदूंना त्याचा एकदाही पराभव करता आला नाही. पुढील तीनशे वर्षांत मुस्लीम आक्रमणे अव्याहत होत होती. बाराव्या शतकाच्या अखेर भारतात घोरीवंशाचे राज्यच स्थापन झाले. आणि पुढील शतकात बंगाल बिहार, आसाम, गुजराथ, माळवा हे सर्व प्रांत मुस्लीमांनी जिंकून घेतले. अजून दक्षिणेत मुस्लीमांचा प्रवेश झाला नव्हता. पण चौदाव्या शतकाच्या प्रारंभी दक्षिणापथात प्रवेश करून मुस्लीमांनी पंधरा-वीस वर्षांतच यादव, होयसळ, पांड्य, चोल इ. राज्ये बुडविली व अखिल भारत आक्रांत केला.

इ. स. हजारपूर्वीचे भारताचे वैभव, त्याचे क्षात्रतेज, त्याचे शौर्यधैर्य, त्याचे स्वातंत्र्य व त्याचे दिग्विजय आणि त्यानंतरचे त्याचे दैन्य, दौर्बल्य, पारतंत्र्य, गुलामगिरी, प्रतिकारशून्यता, मानहानी स्वत्वशून्यता — अशी ही दोन चित्रे समोर आली असता इ. स. १००० च्या सुमारास कोठल्या तरी धार्मिक, सामाजिक वा राजकीय अशा दुर्धर रोगाने भारतीय समाज ग्रस्त झालेला असला पाहिजे याविषयी शंका रहात नाही. जे जीवनाचे तत्त्वज्ञान, जी धर्माची, समाजरचनेची, राजशासनाची मूलतत्त्वे पूर्वी भारताने अवलंबिली होती त्यांचा त्याने त्याग केला असला पाहिजे किंवा त्यांना अत्यंत विकृत रूप आले असले पाहिजे; त्यावाचून एवढ्या समर्थ, बलशाली समाजाचा असा दारुण अधःपात होणार नाही, हे सहज ध्यानात येते. तेव्हा आज विश्वहिंदुपरिषदेसारख्या संस्था स्थापून हिंदूंच्या पुनरुज्जीवनाचा विचार करावयाचा असेल तर ज्या रोगाने या समाजाला ग्रासले आहे त्याची चिकित्सा प्रथम केली पाहिजे, आपल्या अवनतीची मीमांसा आधी केली पाहिजे, याविषयी दुमत होईल असे वाटत नाही. या तिसऱ्या व पुढील चवथ्या लेखात हीच मीमांसा करावयाची आहे.

व्याधींची चिकित्सा :

या मीमांसेसाठी आपल्या मागल्या इतिहासाकडे पाहू लागताच त्यावरून असे ध्यानात येते की इ. स. १००० आधीच्या शे-दोनशे वर्षांत हिंदुसमाज एकाच नव्हे तर अनेक रोगांनी ग्रस्त झालेला होता व त्याचे सामर्थ्य हे रोग दीर्घ काल पोखरून टाकीत होते. या रोगांची चिकित्सा करताना आणखी एक गोष्ट लक्षात येते ती ही की, या सर्व अनर्थाला आपले आपणच जबाबदार आहो. 'मनुष्य हा आपला आपण बंधू किंवा रिपु असतो', हे गीतावचन हिंदुसमाजाच्या बाबतीत तितकेच खरे आहे. इतिहासावरून निश्चित होणारे हे अपश्रेय माथी घेण्यास आपण तयार झालो तरच भविष्यकाळाविषयी आशा धरता येईल. हे सर्व दैवयोगाने झाले, कलियुगामुळे झाले, नियतीच याला जबाबदार आहे अशी ज्यांची धारणा आहे, त्यांनी या चिकित्सेच्या फंदात न पडावे हे बरे. कारण मानवाच्या हाती जे नाही त्याची चिकित्सा करून करावयाचे काय ? नियतीमुळे अधःपात झाला असला तर नियतीमुळेच, झाला तर, उत्कर्ष होईल, किंवा तिच्या मनात नसले तर होणार नाही. तेथे मानवाच्या प्रयत्नांचा संबंध येतो कोठे ? पण अशा रीतीने नियती-वर आपल्या अवनतीचे खापर फोडणे हे न्याय्यही नाही. मागील काळच्या वैभवाचे श्रेय जर आपण आपल्याकडे घेतो, आपली धर्मतत्त्वे, आपले असामान्य समाजशास्त्र, आपली स्पृहणीय नीतिमत्ता, आपले चारित्र्य, सर्व विषयांत अप्रतिहत प्रवेश करणारी आपली बुद्धिमत्ता यामुळेच आपल्याला त्या प्राचीन काळी अतुल वैभव प्राप्त झाले, असे आपण म्हणतो तर पुढे जी अवनती झाली त्या वेळी आपल्या या सर्व गुणांचा लोप झाला असला पाहिजे, आपण त्या थोर तत्त्वांपासून च्युत झालो असलो पाहिजे, आपले थोर चारित्र्य नष्ट झाले असले पाहिजे, हे मान्य करून ते अपश्रेयही आपल्या माथी घेण्याची समंजसता आपण दाखविली पाहिजे. ही वक्तव्यता, हे उत्तरदायित्व आपल्या शिरी घेणे यातच न्याय आहे व यातच उज्ज्वल भविष्याचे बीज आहे. तेव्हा अशा अनाग्रही सत्यशोधनाच्या बुद्धीने आपण आपल्या समाजाला जडलेल्या व्याधींची चिकित्सा करण्यास प्रारंभ करू.

विकृत धर्मतत्त्वे :

वर म्हटले आहे की मागच्या उत्कर्षाच्या काळी जे जीवनाचे तत्त्वज्ञान

आपण अवलंबिले होते, ज्या धर्माचा आपण आश्रय केला होता त्याचा या पुढल्या काळात आपण त्याग केला असला पाहिजे, म्हणूनच ही अवकळा आली. हेच खरे आहे. धर्म, समाजव्यवस्था, अर्थव्यवहार यांची जी मूलतत्त्वे प्राचीन काळी आपण शिरोधार्य मानली होती त्यांचे मूळ स्वरूप या वेळी अगदी लोपून त्यांना अत्यंत विकृत, अत्यंत विपरीत असे रूप इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या आगेमागे प्राप्त झाले होते. आणि या धर्मलोपामुळेच हिंदुसमाज हतप्रभ होऊन गेला होता.

समता, सहकार्य, स्वातंत्र्य, प्रवृत्तिवाद, बुद्धिनिष्ठा या थोर तत्त्वांवर प्राचीनांची श्रद्धा होती. ती पुढे पुढे नष्ट झाली आणि विषमता, दूरीभाव, निवृत्तिवाद, शब्दप्रामाण्य यांचे उत्तरोत्तर प्राबल्य होत गेले. वेदकाळापासून इ. स. १००० वर्षांपर्यंत भारताचा इतिहास पाहता एक गोष्ट ध्यानात येते की, वरील दोन्ही परस्पर विरुद्ध विचारांचे प्रवाह भारतात प्रारंभापासून चालू होते. पण प्रारंभीच्या काळात समता, बुद्धिवाद यांनी संपन्न असलेल्या, समाजसंघटनेला पोषक अशा प्रवाहाचा जोर विशेष होता. त्यामुळेच हिंदुसमाज समाजरूप पावला व त्याचा उत्कर्ष झाला. पण हळूहळू दुसऱ्या प्रवाहाचा जोर वाढू लागला व विषमता, निवृत्तिवाद या प्रतिगामी तत्त्वज्ञानाने अखेर पहिल्या समतेच्या, संघटनेच्या धर्मावर मात केली व हिंदुसमाजाला अधःपातास नेले. 'धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।' हे वचन अगदी खरे ठरले. आपण समता, स्वातंत्र्य, बुद्धिवाद या धर्माचे रक्षण केले नाही. तो धर्म हत झाला. त्यामुळे त्यानेच आपल्याला विनाशाला नेले.

या दोन विचारप्रवाहांच्या काठाने चालत जाऊन त्यांचे अवलोकन आपल्याला आता करावयाचे आहे. या लेखात आपण समतेच्या, संघटनेच्या धर्माचे स्वरूप पाहू आणि नंतर पुढील लेखात विषमता, विघटना या विनाशक विचारसरणींचा अभ्यास करू. पण तुलना चांगली मनात भरावी यासाठी प्रथम दोन्ही तत्त्वज्ञानांचे स्थूलमानाने आलोचन करून मग तपशिलात शिरू. 'समासेन तु वक्ष्यामि विस्तरेण च वै पुनः ।' ही व्यासांची पद्धती केव्हाही श्रेयस्कर होय.

विघटनेचे प्रयत्न :

कोणताही समाज आचार, विचार, आकांक्षा, सुखदुःखे, पूर्वपरंपरा या

दृष्टींनी जितका अधिक एकरूप असतो तितका तो जास्त संघटित व म्हणूनच बलशाली होतो. 'साम्याद् हि सख्यं भवति, वैषम्यान्नोपपद्यते। हे व्यासवचन अगदी खरे आहे. हे जाणूनच प्राचीन आर्यांनी समतेच्या तत्त्वावर हिंदु-समाजाची उभारणी करण्याचा निर्धार केला होता. पण पुढील समाजाशास्त्र-वेत्त्यांना त्याचा विसर पडला; नव्हे, त्यांनी जाणूनबुजून त्याचा त्याग केला. आणि अहोरात्र विघटनेचेच प्रयत्न केले. 'विघटनेचे प्रयत्न' हे शब्द जरा चमत्कारिक लागतील. पण ते यथार्थ आहेत. चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता ही त्यांची त्रयीविद्या होती. आणि तिचा पुरस्कार करताना हा हिंदुसमाज जितका भिन्नरूप होईल, विषम होईल, तितका करण्याचा त्यांनी निर्धार केला. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अस्पृश्य आणि यांच्या संकरांतून निर्माण झालेल्या अनंत आंतरप्रभव जाती यांनी परस्परांत विवाह करू नये आणि एकमेकांचे व्यवसाय त्यांनी करू नयेत असे दण्डक तर त्यांनी घातलेच, पण एवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून या भिन्न घटकांनी परस्परांचे अन्न घेऊ नये, पाणी घेऊ नये, त्यांनी परस्परांना स्पर्शही करू नये अशी बंधने धर्म म्हणून त्यांनी लावून दिली. हिंदुधर्म हा सनातन वैदिकधर्म असे आपण म्हणतो. वेद हिंदूंना अत्यंत पूज्य आहेत असे मानले जाते. पण हिंदूंना म्हणजे कोणाला ? शूद्र व अस्पृश्य हा या मानवसमूहातील बहुसंख्य वर्ग. त्यांना वेदपठनाचा तर राहोच पण श्रवणाचासुद्धा अधिकार नव्हता. म्हणजे विद्या, पूज्यग्रंथ यांच्याही बाबतीत हा समाज भिन्नरूपच राहिला पाहिजे, असा त्या धर्मशास्त्रज्ञांचा कटाक्ष होता. क्षणभर विवाह, व्यवसाय, वेदपठन हे सोडून देऊ. सर्व वर्णांना व जातींना समआचार लावून देऊन त्यांच्यात साम्य, समबंध, समरसता निर्माण करण्याचे तरी त्या धर्मशास्त्रज्ञांनी प्रयत्न केले काय ? नाही. याही बाबतीत त्यांचे विघटनेचेच धोरण होते. कोणत्याही दोन वर्णांमध्ये एकही सम आचार नसलाच पाहिजे असे त्यांचे धोरण होते. त्रैवर्णिकांना वेदाधिकार होता. पण त्यातही ब्राह्मणाचा सावित्रीमंत्र निराळा, क्षत्रियाचा निराळा, वैश्याचा निराळा. त्यांची उपनयनाची वयोमर्यादाही निराळी ! अलीकडे चातुर्वर्ण्याचे काही शास्त्रीय समर्थन करण्याची रीत निघाली आहे. या भिन्नवयोमर्यादांचे बाळशास्त्री हरदास यांनी कसे समर्थन केले आहे पहा. ब्राह्मणांचा सावित्रीमंत्र ८ अक्षरांचा असे, क्षत्रियांचा ११ अक्षरांचा व

वैश्यांचा १२ अक्षरांचा. तीन-चार अक्षरे जास्त झाल्यामुळे ते मंत्र पाठ करण्यास एकदोन वर्षांनी वय जास्त असणे अवश्यच आहे ! ब्राह्मणाचे उपनयन आठव्या वर्षी व्हावयाचे. क्षत्रियाच्या मंत्रात तीन अक्षरे जास्त. तेव्हा तो पाठ करण्यास त्याला तीन वर्षे जास्त लागणारच. म्हणून त्याचे उपनयन अकराव्या वर्षी, आणि ४ अक्षरे जास्त म्हणून वैश्याचे बाराव्या वर्षी !

आचारभेद करता करता शास्त्रीपंडित कोणत्या थराला गेले ते पहा. शौचाहून आल्यावर ढुंगण किती वेळा धुवावे यातही भिन्नतत्त्व असावे असा त्यांचा कटाक्ष होता. ब्राह्मणाने आठ वेळा, क्षत्रियाने सहा वेळा, वैश्याने चार वेळा व शूद्राने दोन वेळा ! यातही समानता आली तरी चातुर्वर्ण्य लोपेल अशी त्यांना भीती होती.

हिंदु - एक मानवसमूह

ज्या मानवसमूहात इतका परस्परभेद आहे, आणि तो भेद असलाच पाहिजे असे जेथे शास्त्र आहे त्या समूहाला समाज म्हणणे कसे शक्य आहे ? वर्णा-वर्णांमध्ये, जातीजातींमध्ये जेथे इतका दूरीभाव आहे की एका वर्णाला दुसऱ्याची सावलीही चालत नाही, त्याच्या शब्दाचे श्रवण चालत नाही, एकाच रस्त्याने दोघांनी जाणे जेथे निषिद्ध, त्या समूहाला समाज म्हणणे कसे शक्य आहे ? काही जमातींनी जन्मोजन्मी दुसऱ्यांच्या दास्यातच राहिले पाहिजे, पशुवत् जिणेच जगले पाहिजे, असे ज्यांचे धर्मशास्त्र आहे त्या मानवसमूहाला समाज म्हणणे कसे शक्य आहे ? ज्या समूहात समाजधुरीण हीनजातीय लोकांच्या सुखदुःखाची, त्यांच्या योगक्षेमाची, ते जगतात की मरतात याची अणुमात्रही चिंता वाहत नाहीत, त्या समूहाला समाज म्हणणे कसे शक्य आहे ? समूहातले भिन्न घटक—भिन्न व्यक्ती व जातीजमाती—जितके परस्परांच्या जास्त जवळ येतील, त्यांच्यात स्नेहभाव जितका जास्त निर्माण होईल, काही समबंधनांनी ते जितके जास्त बद्ध होतील तितका तो समूह जास्त संघटित होतो व त्याला 'समाज' ही पदवी प्राप्त होते. पण ज्या समूहातील धुरीण सोळे-ओळे, पावित्र्य-पातित्य, रक्तशुद्धी-रक्तसंकर इ. विचारांनी प्रत्येक घटक दुसऱ्यापासून तोडून काढण्यातच धन्यता मानतात आणि असे धर्मशास्त्र स्थापित करण्यात कृतार्थता मानतात त्या समूहाला समाज म्हणणे कसे शक्य आहे ?

उत्तरकालीन हिंदुसमाजाला समाज म्हणणे सर्वथा अशक्य आहे. कारण हा समूह समाज होताच कामा नये, असे त्याचे धर्मशास्त्र आहे!

समतेची उपासना :

सुदैवाने प्राचीन काळापासून असे धर्मशास्त्र नव्हते. समाज एकरूप करावा, सम करावा आणि त्यायोगे संघटित करावा असे प्राचीन हिंदुधुरीणांचे धोरण होते. मुखाने, लेखाने ते अहोरात्र साम्य, समता, बंधुता या तत्त्वांचा उद्‌घोष करीत होते. 'समानी व आकूतिः समाना हृदयानि वः।' हा वेदमंत्र पहा. 'तुमचा अभिप्राय एकसारखा, तुमची अंतःकरणे एकसारखी व तुमचे मन एकसारखे असो; जेणेकरून तुमचे सुसाह्य म्हणजे संघशक्तीची बळकटी होईल.' (ऋग्वेद १०, १९१.)

संगच्छध्वं संवदध्वं सं वो मनांसि जानताम्
देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते। (कित्ता)

'एके ठिकाणी जमा, संवाद करा, तुमची मने एक करा, व ज्याप्रमाणे पूर्वीचे विद्वान आपल्या नियत कर्तव्यासाठी एकत्र जमत त्याप्रमाणे तुम्हीही जमत जा.' या मंत्रामध्ये कोणत्याही विशिष्ट जातीचा विशेष रीतीने उल्लेख न करता सर्वांना सामान्य रीतीने आज्ञा केलेली आहे.

समानो मंत्रः समितिः समानी, समानं मनः
सहचित्तमेषाम्। (कित्ता)

'सर्वांचे मंत्र समान, सर्वांची सभा समान, सर्वांचे मन समान आणि सर्वांचे चित्तही समान असो.' सर्वांचा मंत्र एक व सर्वांची सभाही एक हे ध्यानात ठेवण्याजोगे आहे.

वरील आज्ञा कोणत्याही विशिष्ट जातीला उद्देशून केलेल्या नाहीत. सर्व समाजाला आहेत. पण तशी शंका कोणाला येईल तर त्यांचे समाधान पुढील वचनांवरून होईल.

विश्वस्य केतुर्भुवनस्य गर्भ आरोदसी अपृणाज्जायमानः।
वीडुं चित् अद्रिमभिनत् परायन् जना यदग्निं अयजन्त पंच।
ऋ. १०।४५।६॥ यजु. अ. १२॥

" जो अग्नि विश्वाचा ध्वज आहे, भुवनाचा गर्भ आहे, जो द्युलोक व पृथ्वी यांना व्यापून आहे, जो मेघ व पर्वत यांना भेदून टाकतो, त्या अग्नीचे (वा परमेश्वराचे) पाचही प्रकारचे लोक यजन करतात. "

यज्ञियासः पंचजना मम होत्रं जुषध्वम् ।
पंचजना मम होत्रं जुषन्ताम् । ऋ. १०।५३

' यजन करणारे पंचजन माझ्या होत्राचे–यज्ञाचे–सेवन करोत. '

पंचजन म्हणजे सर्व समाज, सर्व जनता, मनुष्यमात्र. (श्रीमत् शंकराचार्य व श्रीसायणाचार्य यांनी असा अर्थ दिला आहे) तेव्हा सर्व-भेदनिरपेक्ष सर्वांनी यजन करावे अशी ही वेदाज्ञा आहे. ' विश ' हा शब्द जनता, बहुजनसमाज याच अर्थाने मागे वापरीत. कोठे कोठे ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या खेरीज इतर समाज असाही अर्थ आहे. तरी ' त्वामग्ने मानुषीरीळते विशः । ऋ. ५ । ८ । ३ ॥ अग्निं होतारं ईळते यज्ञेषु मानुषो विशः । ऋ. ६ । १४ । २ ॥ अशा ऋग्मंत्रांतून ' विश तुझे स्तवन करतात ' असा उल्लेख करून मंत्रकर्त्यांनी आपले व्यापक, उदार, समतेचे तत्त्व स्पष्ट केले आहे.

वेदकाळी उच्चनीच, श्रेष्ठकनिष्ठ अशी भावना नव्हती. समता, बंधुता व स्वातंत्र्य, याच तत्त्वांचे मंत्रकर्ते ऋषी उपासक होते हे अनेक मंत्रांवरून दिसून येते. समतेचे मंत्र आपण पाहिले. आता बंधुतेचे पाहू.

अज्येष्ठासो अकनिष्ठास एते । सं भ्रातरो वावृधुः सौभगाय ॥
ऋ. ५ । ६० । ५ ॥

ते अज्येष्ठा अकनिष्ठास उद्भिदो । अमध्यमासो महसा विवावृधुः ॥
ऋ. ५ । ५९ । ६ ॥

' कोणी ज्येष्ठ नव्हेत, कनिष्ठ नव्हेत व मध्यमही नव्हेत, ते सर्व परस्परांचे बंधू आहेत व उत्तम भाग्यासाठी सर्व वाढत आहेत. '

वेदकाळी समाजाची उभारणी समतेच्या व बंधुतेच्या तत्त्वांवर झाली होती, जन्मनिष्ठ उच्चनीचता ते ऋषी मानीत नसत हे या मंत्रांवरून दिसून येईल. पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांनी ' स्पशास्पर्श विचार ' या ग्रंथात वरील वेदवचने देऊन ऋषींची ही तत्त्वे स्पष्ट केली आहेत. (वरील अवतरणे तेथूनच घेतलेली आहेत. प्रकरण ४ थे पहा.) प्रकरणाचा समारोप करताना पं. सातवळेकर

म्हणतात, 'समाजामध्ये उच्चनीच भेद कल्पिणे व ते जन्मसिद्ध असून कोणत्याही कारणाने नष्ट होऊ शकत नाहीत असे मानणे, हे वैदिक धर्माच्या अगदी विरुद्ध आहे या शंका नाही.'

सुदैवाने वेदांच्या उत्तरकाळीही (इ. स. पू. १००० ते इ. स. १०००) दीर्घकाळपर्यंत या संघटनापोषक धर्माचा विजयच होत गेला. त्यामुळेच हिंदुसमाज संघटित व समर्थ होऊ शकला. पण हळूहळू विघटनेच्या, विषमतेच्या विचारप्रवाहाचा जोर वाढत जाऊन शेवटी त्याने पहिल्या विचारप्रवाहावर मात केली आणि त्याच्या पुरस्कर्त्या धर्मशास्त्रज्ञांनी हिंदुसमाज धुळीस मिळविला.

या दोन प्रवाहांच्या संघटनविघटनकार्याचा इतिहास आता पहावयाचा आहे. वेदकाळी व नंतरही दीड-दोन हजार वर्षे वर सांगितलेली समतेची तत्त्वे केवळ ग्रंथापुरती सांगितलेली नसून प्रत्यक्षात अवतरलेली होती हे सिद्ध करण्यास आता विपुल प्रमाणे उपलब्ध झालेली आहेत. त्यांच्या आधारे इ. स. १००० पर्यंतच्या हिंदुसमाजाचे स्वरूप या लेखात प्रथम पाहू. आणि नंतर याच काळात सुप्त असलेली भेदभावाची, विषमतेची, विघटनेची बीजे विकसित होऊन त्यांचा घातक परिणाम कसा झाला त्याचा पुढील लेखात विचार करू.

[यानंतरचे विवेचन पुढील ग्रंथकारांच्या आधारे केलेले आहे. म. म. पांडुरंग वामन काणे–'**धर्मशास्त्राचा इतिहास**;' म. म. श्रीधरशास्त्री पाठक–'**अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ**;' पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर–'**स्पर्शास्पर्श**;' आचार्य क्षितिमोहन सेन–(१) '**भारतवर्षमें जातिभेद**', (२) '**संस्कृति-संगम**'; डॉ. काशीप्रसाद जयस्वाल–(१) '**मनु आणि याज्ञवल्क्य**'; (२) '**हिंदू पॉलिटी**'; कुलगुरु चिं. वि वैद्य–'**मध्ययुगीन भारत**,' भाग १, २, ३. या थोर पंडितांनी मूळ ग्रंथांतली शेकडो अवतरणे दिली आहेत. या लेखांत मी त्यांच्या ग्रंथांतले पृष्ठांक दिलेले आहेत. त्यांनी उद्धृत केलेल्या वचनांचा मूळ पत्ता दरवेळी विस्तारभयास्तव दिलेला नाही. तो जिज्ञासूंनी मुळातून पहावा.]

गुणनिष्ठ वर्ण :

वेदकाळी चातुर्वर्ण्यव्यवस्था होती किंवा नाही याविषयी पंडितांमध्ये मतभेद आहेत. पण तो प्रश्न वादग्रस्त म्हणून सोडला तरी त्याकाळी वर्णभेद असलेच तर

ते जन्मनिष्ठ नव्हते व त्यासंबंधीची बंधने उत्तरकाळातल्याप्रमाणे कडक तर मुळीच नव्हती यावद्दल फारसा वाद नाही. म. म. काणे यांच्या मते त्या प्रारंभीच्या काळी वर्ण नसून वर्ग होते. त्यांचे हे म्हणणे प्रमाणसिद्ध आहे हे पुढील उदाहरणांवरून कळून येईल. त्या काळी क्षत्रिय कुळांत अनेक ब्रह्मर्षी निर्माण होत व ब्राह्मण कुळांत अनेक राजपुरुष उत्पन्न होत. वीतहव्य हा राजा क्षत्रिय होता. भृगुऋषींच्या कृपेने तो ब्रह्मर्षी झाला. त्याचा पुत्र गृत्समद हा वेदांतल्या काही सूक्तांचा कर्ता आहे. सुतेजा, प्रमती हे त्याच्याच कुळातले ब्राह्मण होत. शौनक हा प्रसिद्ध ऋषी त्याच्याच कुळातला होय. या शौनकाने चातुर्वर्ण्य निर्माण केले असे विष्णुपुराण म्हणते. म्हणजे त्याच्या आधी ते नव्हते एवढे निश्चित ठरते. शौनकाचा पिता शुनक याला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या सर्व वर्णांचे पुत्र होते, असे हरिवंशपुराण म्हणते. नहुष हा क्षत्रिय राजा. त्याचा पुत्र यति हा योगबलाने ब्रह्मर्षी झाला. बळीराजाचे अंग, वंग, कलिंग इ. पाच पुत्र क्षत्रिय होते. त्यांची संतती बालेय ब्राह्मण म्हणून प्रसिद्ध आहे (हरिवंश). भगवान ऋषभदेव यांना शंभर पुत्र होते. त्यांतील ज्येष्ठ पुत्र भारताचा अधिपती (क्षत्रिय) झाला. त्याच्याहून कनिष्ठ ८१ पुत्र महाश्रोत्रीय (ब्राह्मण) झाले (भागवत-पुराण). पुरुवंशात कोणी क्षत्रिय झाले, कोणी ब्राह्मण झाले. मुद्गल राजाच्या कुळातील संतती मौद्गल्य ब्राह्मण म्हणून प्रसिद्ध आहे. विश्वामित्र तपोबलाने क्षत्रियाचा ब्राह्मण झाला हे प्रसिद्धच आहे. पण एवढेच नाही. तो ब्राह्मणांचा गोत्रकर्ताही झाला. त्याचे अनेक पुत्र तपस्वी व ब्रह्मवंशविवर्धन झाले. सुप्रसिद्ध गायत्रीमंत्राचा कर्ता विश्वामित्रच होय. मांधाता, पुरुकुत्स, अजमीढ, कक्षीव, विष्णुवृद्ध हे सर्व ब्रह्मर्षी क्षत्रियकुलोत्पन्न होते (वायुपुराण). नाभाग व वृष्टि या क्षत्रियांचे पुत्र वैश्य झाले. ('भारतवर्ष में जातिभेद' – क्षिति मोहन सेन पृ. २६ ते ४०. चिं. वि. वैद्य; 'मध्ययुगीन भारत' –भाग २, पृ. ६९–७२)

वरील इतिहास ध्यानात घेऊनच, 'प्रारंभी एकच वर्ण होता व त्यातून गुणकर्मभेदाने पुढे चार वर्ण निर्माण झाले, असे रामायण, महाभारत, भागवत, ब्रह्मपुराण, लिंगपुराण इत्यादी प्राचीन ग्रंथांत वारंवार सांगितलेले आढळते. (श्रीधरशास्त्री पाठक—'अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ' पृ. ३०; पंडित सातवळेकर — 'स्पर्शास्पर्श' पृ. १३; आचार्य सेन - 'भारतवर्ष में जातिभेद' पृ. ९.)

यामुळेच गुणांवरून मनुष्याचा वर्ण ठरतो, जन्मावरून नव्हे. ही विचारधारा त्या काळी प्रबल होती असे दिसते. महाभारतामध्ये आदि, वन, अनुशासन, शांति या पर्वांत हा विचार पुनः पुन्हा आवर्जून सांगितलेला आहे. मनुष्य ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र कशामुळे होतो? असे भारद्वाजाने भृगूला विचारले. त्या वेळी भृगू म्हणाला, " वेदाध्ययन, सदाचार, सत्यपरायणता या गुणांनी ब्राह्मणत्व येते. प्रजापालन, क्षात्रतेज इ. गुणांनी मनुष्य क्षत्रिय होतो. कृषिगोरक्ष्य, धनार्जन यामुळे मनुष्य वैश्य होतो. आणि जो वेदांचा त्याग करतो, नित्य अमंगळ असतो, ज्याला भक्ष्याभक्ष्यविचार नाही, तो शूद्र होतो. " गुणांची अशी परीक्षा होण्यासाठी सर्वांना समसंधी मिळणे अवश्य आहे. नाही तर कोणाची प्रवृत्ती कशी, हे कळण्यास मार्गच राहणार नाही. म्हणून या सर्व वर्णांना—म्हणजेच सर्व समाजाला— यज्ञाचा व वेदाचा अधिकार आहे, असे भृगूने स्पष्टपणे सांगितले आहे. आणि शेवटी ' सत्य, तप, विद्या ही लक्षणे शूद्राच्या ठायी असतील तर तो शूद्र ब्राह्मण होय, आणि ब्राह्मणाच्या ठायी नसतील तर तो ब्राह्मण शूद्र होय असा निर्वाळा दिला आहे. '(शांतिपर्व) पितामह भीष्मांनी तर, ' जो ब्राह्मण वरील सात्त्विक गुणांनी संपन्न नसेल त्याला दास मानून वेठीला धरावे व दासाचे भोजन त्याला द्यावे ', असे आपले मत दिले आहे. अनुशासनपर्वात शंकर पार्वतीला सांगतात की ' हीन कुलात जन्मलेला शूद्र जर आगमसंपन्न असेल तर त्याला संस्कृत ब्राह्मण मानावे. '

तांड्यब्राह्मणात पुढील कथा आहे. कण्व या ब्राह्मणकुळात वत्स व मेधातिथी असे दोन पुत्र–भाऊ–होते. त्यांतील वत्साची आई शूद्र होती. तेव्हा मेधातिथी त्याला म्हणाला की, ' तू यामुळे ब्राह्मण नाहीस. शूद्र आहेस. ' तेव्हा वत्साने एकदम अग्निदिव्य केले. अग्नीने त्याला दग्ध केले नाहीच. उलट तो मेधातिथी-पेक्षा श्रेष्ठ ब्राह्मण (ब्रह्मीयान्) ठरला. हीन–कुळजन्म हा स्त्रियांनाही त्याकाळी बाधक ठरत नसे. **' स्त्रीरत्नं दुष्कुलाद् अपि '** हे मनुवचन प्रसिद्ध आहे. तसे सांगून मनूने अक्षमाला व शारंगी यांची उदाहरणे दिली आहेत (मनु. ९.२३ व २४). या दोघी अधमयोनिजा होत्या. पण वसिष्ठ व मंदपाल या ऋषींनी त्यांचे पाणिग्रहण केले व त्या भारतीयांना पूज्य ठरल्या. अक्षमाला हीच अरुंधती होय. विवाहसमयी आजही वधूवरांनी तिला वंदन करावयाचे असते. (श्रीधरशास्त्री पाठक— अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ, पृ. ५६) ब्रह्मपुराणातही ती ती

विशिष्ट कर्मे करून शूद्र, वैश्य, क्षत्रिय यांना कोणताही वर्ण प्राप्त करून घेता येतो; शूद्र ब्राह्मण होऊ शकेल, वैश्य क्षत्रिय होऊ शकेल, असे प्रतिपादिले आहे. (२२३–१४,३२). ' शूद्र आगमसंपन्न असेल तर तो संस्कृत ब्राह्मण होतो ', हा महाभारतातला विचार येथेही पुन्हा आलेला आहे. आणि वर असे सांगितले आहे की 'अशा आगमसंपन्न शूद्राची ब्राह्मणानेही सेवा करावी' हे मत स्वयं ब्रह्मा सांगतो (आचार्यसेन—भारतवर्ष में जातिभेद—पृ. ४०).

समसंधीचे तत्त्व

शूद्र आगमसंपन्न झाला तर त्याला ब्राह्मण मानावें असे अर्थीज्या त्या काळचे धर्मवेत्ते म्हणतात त्याअर्थी शूद्राला आगमसंपन्न होण्याची संधी तेव्हा होती हे निर्विवाद आहे. संधिसमानत्वाचे तत्त्व हे समाजाच्या उत्कर्षाला अत्यंत अवश्य असते. उत्तरकालीन धर्मशास्त्रज्ञांनी हेच नष्ट केल्यामुळे हिंदुसमाजाला अवकळा आली. प्राचीन काळी हे तत्त्व केवळ बोलण्यापुरते किंवा ग्रंथापुरते नव्हते, हे अनेक उदाहरणांवरून, विशेषतः विवाहबाह्य संततीतून जे थोर पुरुष झाले त्यांच्या चरित्रांवरून स्पष्ट दिसते. व्यास हा धीवरीचा (कोळणीचा) पुत्र, पराशर श्वपाकीचा (चांडाळीचा) आणि वसिष्ठ हा वेश्येचा पुत्र होता. ऐतरेय ब्राह्मणाचा कर्ता महीदास इतरा नामक शूद्र स्त्रीपासून झाला होता. दीर्घतमा ऋषीची माता उशिज ही शूद्र दासी होती (आचार्य सेन–भारतवर्ष में जातिभेद ' पृ. १२, १४, २४). कवष ऐलूष व सत्यकाम जाबाली यांच्या कथा प्रसिद्धच आहेत. विवाहबाह्य संबंधातून उत्पन्न झालेले हे सर्व पुरुष हीन गणले गेले असते, त्यांना उत्कर्षाची संधी मिळाली नसती तर भारतीय संस्कृती किती दरिद्री राहिली असती याचा विचार मनात आला की पुढील काळातील धर्मशास्त्रज्ञांच्या हेकटपणाचा उद्वेग येतो. पूर्वकाळच्या ऋषींची अशी कोती दृष्टी नव्हती, हे आपले भाग्यच होय. काठकसंहितेत म्हटले आहे की, 'ज्ञान व तपस्या या गुणांमुळे मनुष्य ब्राह्मण ठरतो. मग त्याच्या मातापित्यांची चौकशी कशाला करता ? वेद ब्राह्मणाचा पिता व तोच त्याचा पितामह होय.' (कित्ता पृ. ४१)

वर्णसंकर

ब्राह्मण्य, क्षत्रियत्व, वैश्यत्व व शूद्रत्व— म्हणजेच मनुष्याचा वर्ण असा त्याच्या

गुणकर्मांवर अवलंबून असल्यामुळे आंतरवर्णीय विवाहांवर त्या काळी कसलेच बंधन नव्हते हे उघड आहे. कोणत्याही कुळात कोणत्याही वर्णाचा पुरुष वा स्त्री निर्माण होत असे याचा हाच अर्थ आहे. पण या संबंधात तर्क करीत बसण्याचे कारण नाही. महाभारतात तसे स्पष्ट सांगितलेले आहे. वनपर्वात नहुष व युधिष्ठिर यांचा संवाद आहे. त्यांत नहुषाच्या एका प्रश्नाला उत्तर देताना युधिष्ठिर म्हणाला, 'हे नागेन्द्रा, सध्या सर्व वर्णांचा संकर झालेला असल्यामुळे, अमक्याची अमुक जाती आहे, असे ठरविणे कठिण आहे. सर्व लोक सर्व वर्णांच्या स्त्रियांच्या ठायी अपत्ये उत्पन्न करतात. तेव्हा ब्राह्मण कोणास म्हणावे या तुझ्या प्रश्नाला, ज्याच्या ठायी वृत्त, शील, सदाचार ही आढळतील त्यालाच ब्राह्मण म्हणावे, असे मी उत्तर दिले.'

आंतरजातीय विवाह सर्रास चालू होते याला दुसरे एक बलवत्तर प्रमाण आहे. धर्मसूत्रकार व स्मृतिकार यांनी अशा विवाहांतून निर्माण झालेल्या प्रजेच्या जाती कोणत्या याची विपुल चर्चा केली आहे. आंतरजातीय विवाहाचे म्हणजेच वर्णसंकराचे दोन प्रकार मानले जात. श्रेष्ठ वर्णाचा पुरुष व कनिष्ठ वर्णाची स्त्री यांचा विवाह तो अनुलोम व याउलट तो प्रतिलोम. प्रारंभीचे सूत्रकार व स्मृतिकार यांपैकी बऱ्याच शास्त्रकारांनी अनुलोम विवाह विहित मानलेला होता. तेव्हा तो सर्रास घडत असल्यास नवल नाही. पण प्रतिलोम विवाहही विपुल होत असत. श्रीधरशास्त्री पाठक म्हणतात, 'चारही वर्णांचा परस्परसंबंध होऊ शकत असल्यामुळे केवळ अनुलोम विवाह घडून आले असे नसून मनुष्यस्वभावानुसार प्रतिलोम विवाहही घडत गेले. याज्ञवल्क्याने सूत, वैदेहिक, चांडाल, मागध, क्षत्ता, आयोगव, रथकार अशी भिन्न भिन्न वर्णांच्या संयोगाने झालेल्या प्रतिलोम संततीच्या जातींची नावे दिली आहेत. त्यांच्या मते ही सर्व असत् संतती होय. इतरही अनेक स्मृतिकारांनी अशाच याद्या दिल्या आहेत. (अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ–पृ. ५६ ते ५९). प्रतिलोम संतती सर्व शूद्र मानली जात असे. अनुलोम संततीही काही शास्त्रकारांच्या मते शूद्र ठरे. आणि या वर्णांची संख्या सारखी वाढत होती हे तर स्पष्टच आहे. तेव्हा अनुलोम व प्रतिलोम असे दोन्ही मिश्र विवाह माजल्याकाळी विपुल घडत यात शंका नाही. प्रारंभी हे निषिद्ध मानलेले नव्हते. आयोगव ही जाति प्रतिलोम; म्हणून शूद्र होय. पण ऐतरेय ब्राह्मणातील प्रसिद्ध मंत्रातील आविक्षित मरुत्त हा

राजा, ज्याचे वर्णन धैर्यशील यज्ञशील जितेंद्रिय, सूर्यासारखा तेजस्वी, पृथ्वीसारखा क्षमाशील, बृहस्पतीसारखा बुद्धिमान असे केले आहे, ज्याने शंभर अश्वमेध यज्ञ केले होते, ज्याच्या यज्ञांत स्वतः बृहस्पतीने याजन केले होते, (महाभारत–आश्वमेधिक पर्व; अ. ४) ज्याच्या सभेत विश्वेदेव सभासद होते, तो मरुत्त राजा आयोगव होता. (डॉ. देवदत्त भांडारकर, इंडियन कल्चर, – ऑक्टो. १९३४; पृ. २७७.) महाभारत रचयिता लोमहर्षण हा सूत म्हणजेच असाच शूद्र होता हे मागे सांगितलेच आहे.

म. म. पां. वा. काणे यांनी आपल्या ग्रंथात आंतरजातीय विवाहांची माहिती दिली आहे तीवरून हेच दिसते. बौधायन, आपस्तंब, गौतम इ. धर्मसूत्रकार व मनु, याज्ञवल्क्य इ. स्मृतिकार यांची ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्यातील अनुलोम विवाहाला पूर्ण संमती होती. काहींनी या द्विजांनी शूद्र स्त्रीशी विवाह करण्यासही संमती दिलेली आहे. पण इतरांनी या विवाहाचा कडक निषेध केला आहे. आणि ज्यांनी संमती दिली आहे त्यांनीसुद्धा खळखळ करूनच दिली आहे. पण यावरून त्रैवर्णिकांत मिश्रविवाह होत होते यात कसलीच शंका नाही. हे सांगून काणे यांनी तशा विवाहांची ऐतिहासिक काळातली उदाहरणे दिली आहेत. गुप्तवंशातील चंद्रगुप्त २ रा (वैश्य) याची राजकन्या वाकाटक नृपती रुद्रसेन २ रा (ब्राह्मण) याची पट्टराणी होती. कदंबराजा ककुस्थवर्मा (ब्राह्मण) याने आपल्या कन्यांचे विवाह गुप्त (वैश्य) व इतर अनेक क्षत्रिय घराण्यांतील राजपुत्रांशी लावून दिले होते. हे प्रतिलोम विवाह होते. वाकाटक नृपती देवसेन याचा मंत्री हस्तिभोज याच्या एका ब्राह्मण पूर्वजाने ब्राह्मण व क्षत्रिय स्त्रिया केल्या होत्या. प्रसिद्ध संस्कृत कवी राजशेखर याची स्त्री अवन्ती-सुंदरी ही चव्हाण कुलातील क्षत्रियकन्या होती. विजयनगरच्या राजा बुक्क १ ला याने आपली कन्या विरूपादेवी बोडेय या ब्राह्मणाला दिलेली होती. प्रतिहार राजकुलाचा संस्थापक हरिश्चंद्र हा ब्राह्मण असून त्याची स्त्री क्षत्रिय होती. गुहिल कुळाचा संस्थापक गुहदत्त हा ब्राह्मण होता. त्याचा एक वंशज भर्तृपट्ट याने एका राष्ट्रकूट राजकन्येशी लग्न केले होते. सेनापती पुष्यमित्र शुंग याचा पुत्र अग्निमित्र याने मालविका या क्षत्रिय राजकन्येकशी विवाह केला होता. 'कादंबरी'चा लेखक प्रसिद्ध कवी बाण यांची सावत्र आई शूद्र होती. तिचे दोन मुलगे चंद्रसेन व मातृसेन हे बाणाचे भाऊ होते. स्वतः बाणानेच आपल्या

हर्षचरितात हे सांगितले आहे. सम्राट हर्षवर्धन (वैश्य) याने आपली कन्या वलभीचा क्षत्रिय राजा ध्रुव भट याला दिली होती. त्याची बहीण राज्यश्री ही कनोजचा गृहवर्मा याची पट्टराणी होती. वर उल्लेखिलेला भर्तृपट्ट अल्लट याने हूण राजकन्या हरियादेवी हिचे पाणिग्रहण केले होते. कलचूरी घराण्यातील यशकर्ण हा, कर्णदेव व हूण राजकन्या अव्वलदेवी, यांचा पुत्र होता. (काणे–धर्मशास्त्राचा इतिहास, खंड २ रा, भाग १ ला–पृ. ४४७ ते ४५१. शिवाय पहा—बाँबे लॉ–रिपोर्टर १९३६, ऑगस्ट १५. म. म. काणे यांचा लेख—'भारतवर्षातील मिश्रविवाह' स्मृती व शिलालेख यांच्या आधारे. कुलगुरु चिं. वि. वैद्य. मध्ययुगीन भारत, भाग १ ला, पृष्ठ ७८) अशा रीतीने आंतरजातीय विवाह इ. सनाच्या ९ व्या १० व्या शतकापर्यंत चालू होते. नंतर ते बंद झाले असे म. म. काणे व कुलगुरू वैद्य या दोघांनीही आपले मत दिले आहे. 'दि हिस्टरी अँड कल्चर ऑफ इंडियन पीपल' या मालेतील 'दी क्लासिकल एज' या खण्डाच्या प्रस्तावनेत डॉ. कन्हय्यालाल मुनशी यांनी म्हटले आहे की, 'या कालखंडात (इ. स. ३२० ते इ. स. ७४०) अनुलोम विवाह ही गोष्ट नित्याचीच होती व प्रतिलोम विवाहही अगदी दुर्मिळ होते असे नाही.' याच खण्डातील 'सोशल कंडिशनस्' या प्रकरणात डॉ. यू. एन्. घोषल यांनी या मुनशींच्या मताला साधार, सप्रमाण पुष्टी दिली आहे.

व्यवसायसंकर :

विवाहाप्रमाणेच व्यवसायबंधनेही मागल्याकाळी स्मृतींतल्याप्रमाणे कडक नव्हती. म. म. काणे यांनी म्हटल्याप्रमाणे त्या प्राचीनकाळी हिंदुसमाजात वर्णभेद नसून वर्गभेद होता हेच खरे. वेदातील अनेक सूक्ते क्षत्रियांनी रचलेली आहेत. ऋग्वेदातील पहिल्या मंडलातील पहिले दहा मंत्र मधुच्छंद याने रचलेले आहेत. स्वतः विश्वामित्राची सूक्ते ऋग्वेदात आहेतच. गायत्री मंत्राचा द्रष्टा तोच होता हे पूर्वी सांगितलेच आहे. चंद्रवंशीय राजा पुरूरवा हाही अनेक मंत्रांचा द्रष्टा होता. शंतनूचा भाऊ देवापी हा तर मंत्रकर्ता असून तो पौरोहित्यही करीत असे. (आचार्य सेन, पृ. ३२) ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ९४ वे सूक्त नाग-वंशीय कद्रूचा पुत्र अर्बुद याने रचले आहे. तैत्तिरीय संहितेत म्हटल्याप्रमाणे त्याच मंडलातील १८९ व्या सूक्ताची ऋषी सर्पराज्ञी ही होती. ७६ व्या सूक्ताचा

कर्ता नागजातीय इरावतपुत्र जरत्कर्ण हा होता. पहिल्या लेखात सांगितलेच आहे की आर्य हा वंशवाचक शब्द नव्हता. यज्ञनिष्ठा, वेदसंस्कृती, संस्कृत वाणी ही आर्यत्वाची लक्षणे होती. त्यांचा स्वीकार करणारे कोणत्याही वंशातले असले तरी ते आर्यच ठरत, हे या सूक्तकार नागांच्या उदाहरणांवरून स्पष्ट होते. दम हा सूर्यवंशातला विख्यात राजा. त्याने आपल्या पित्याच्या श्राद्धासाठी राक्षसकुलातील ब्राह्मण बोलाविले होते. आणि सूर्यवंशातील राजे हा आचार नेहमीच पाळीत असत (वायुपुराण). (आचार्य सेन–संस्कृतिसंगम, पृ. २६, ३४). या उदाहरणांवरून तो सिद्धान्त जास्तच दृढ होतो. नागकुलांतील ऋषी सूक्ते रचीत. राक्षसकुलांतील ब्राह्मण श्राद्धाला योग्य ठरत.

ब्रह्मवेत्ते क्षत्रिय :

क्षत्रिय जसे मंत्रद्रष्टे होते तसेच ते औपनिषदिक ब्रह्मविद्येचे ज्ञाते व उपदेष्टेही होते. अनेक ब्राह्मणांनी क्षत्रिय राजांकडून ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतल्याच्या कथा उपनिषदांत आहेत. गार्ग्यनामक ब्राह्मणास काशीचा राजा अजातशत्रु याने ब्रह्मविद्या शिकविली. (बृहदारण्यक, २-१०-१). जीवलपुत्र प्रवाहण या राजाने गौतमनामक ब्राह्मणाला ब्रह्मज्ञान सांगितले. (बृहदारण्यक, ६–२–१) याच प्रवाहणाकडून शलावतपुत्र शिल्क व दाल्भ्य गोत्री चैकितायन हे ब्राह्मण ब्रह्मविद्या शिकले (छांदोग्य, १–८–१). केकयपुत्र अश्वपती राजाकडे प्राचीनशाल, सत्ययज्ञ इ. पाच ब्राह्मण शिष्य म्हणून आले व त्याच्यापासून त्यांनी ब्रह्मज्ञान हस्तगत केले (छांदोग्य, ५–११). जनक राजा ब्रह्मवेत्ता होता हे प्रसिद्धच आहे. तेव्हा वेदमंत्रांचे दर्शन व ब्रह्माचे ज्ञान हे ब्राह्मणांनाच होत असे असे नाही. क्षत्रियही त्या क्षेत्रात तितकेच श्रेष्ठ होते. यज्ञांत पौरोहित्य करण्याचा म्हणजे याजनाचा अधिकार ब्राह्मणांनाच आहे अशी आज समजूत आहे. तीही चुकीची आहे. क्षत्रिय देवापीने याजन केल्याचे उदाहरण वर दिलेच आहे. ऐतरेय ब्राह्मणातील श्यार्पण्य शायकायनाचे उदाहरण असेच आहे. ब्रह्मविद्या प्राप्त करून घेण्याचा अधिकार तर त्याकाळी सर्वांनाच– शूद्रांनासुद्धा होता, हे यजुर्वेदातील 'ही कल्याणकारक वाणी मी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व चारण या सर्वांसाठी उच्चारली,' या मंत्रावरून स्पष्ट होते. 'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र या सर्वांमध्ये तू तेज निहित कर' या तैत्तिरीय संहितेतील मंत्रावरून हेच

दिसते. (पं. सातवळेकर, पृ.–४४, ४६). हे उतारे देऊन पंडित सातवळेकर म्हणतात, 'ही समानता पाहण्यासारखी व विचार करण्यासारखी आहे.'

शूद्रांची प्रतिष्ठा

इ. स. पूर्व ४००० ते इ. स. पूर्व १००० हा वेदकाळ असे मानले जाते. या काळाच्या अखेरीस वर्ण बहुतेक जन्मनिष्ठ झाले असे पंडितांचे मत आहे. तरी त्यानंतरही विवाहविषयक व व्यवसायविषयक बंधने फारशी कडक नव्हती. शूद्र जातीलाही उत्कर्षाला या काळात कसा वाव मिळत असे हे पाहिले असता त्या काळच्या समानसंधित्वाच्या धोरणाची कल्पना येईल. राजाचे मंत्री किती असावे व ते कोणत्या वर्णाचे असावे याविषयी भीष्मांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे. 'राजाचे चार ब्राह्मण मंत्री, आठ क्षत्रिय मंत्री, एकवीस वैश्य मंत्री, तीन शूद्र मंत्री व एक सूत मंत्री—(सूत हा प्रतिलोम विवाहजन्य होता) असे मंत्री नेमावे.' (शांति.–८५–८) ब्राह्मणांपेक्षा शूद्र मंत्र्यांची संख्या एकानेच कमी आहे हे ध्यानात ठेविले पाहिजे. 'तीन वर्णांची सेवा हाच शूद्राचा धर्म होय.' असे त्या वेळी शास्त्र होते. महाभारतातही तसे शास्त्र अनेक ठिकाणी सांगितलेले आहे. मागल्या त्या काळात परस्परविरुद्ध असे दोन विचारप्रवाह चालू होते असे वर अनेकदा सांगितले आहे याचा अर्थ यावरून स्पष्ट होईल. मागल्या काळातील रामायण, महाभारत, मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृती यांसारख्या ग्रंथांत वरचेवर भर पडत गेली आहे, हे प्रसिद्धच आहे. ज्याला जे वाटेल ते त्याने लिहावे व वरच्यासारख्या ग्रंथांत त्याचा प्रक्षेप करावा असा प्रकार कित्येक शतके चालू होता. ऋग्वेदात मागून भर पडली नाही अशी समजूत आहे. पण त्यातील दहावे मंडल मागून रचलेले आहे, असे अर्वाचीन पंडितांचे मत आहे. अशा प्रकारामुळे या ग्रंथांचे ग्रंथ हे रूप जाऊन त्यांना कोश हे रूप प्राप्त झालेले आहे. त्यामुळे त्यांत अत्यंत परस्परविरुद्ध अशी मते ठायी ठायी आढळतात. आणि भर घालणाऱ्यांनी संदर्भाचासुद्धा विचार कित्येक वेळा केला नसल्याने एकाच व्यक्तीच्या तोंडी व लागोपाठ दोन वाक्यांतही अशी मते आढळतात. यामुळे कोणते मत कोणाचे हे निश्चयाने सांगता येत नाही. पण तरीही भिन्न भिन्न विचारसरणी कोणत्या होत्या, भिन्न तत्त्वज्ञाने कशी उदय पावत होती हे मात्र निश्चित कळते. असो.

शूद्रांना मंत्रिपदापर्यंत प्रवेश असल्यामुळे, 'द्विजसेवा हाच त्यांचा धर्म,' या शास्त्राचा किती मुलाहिजा राखला जात असेल याची कल्पना सहज येईल. आणि शूद्राला राजपदही दुष्प्राप्य नव्हते हे पाहिल्यावर तर त्याविषयी शंकाच राहाणार नाही. 'शूद्र राजा होऊ शकेल की नाही ?' या युधिष्ठिराच्या प्रश्नाला उत्तर देताना भीष्म म्हणतात, 'राजा, अपार व नौकाशून्य अशा संकटरूपी समुद्रामध्ये जो मूर्तिमंत नौकाच झालेला असतो तो जरी शूद्र असला तरी, त्याचा तो सन्मान करणे सर्वथैव योग्यच आहे.' (शांति. ७८–३८). भीष्मांनी सांगितलेले हे मत केवळ ग्रांथिक नाही. पुराणांच्या मताअन्वये भारतवर्षांत पहिले विशाल साम्राज्य स्थापन करणार चंद्रगुप्त मौर्य हा शूद्र होता. त्याचा पुत्र बिंदुसार व नातू सम्राट अशोक हे अर्थातच शूद्र होते. दक्षिणेतील पैठणच्या सातवाहनांचे घराणे, पुराणांच्या मते, शूद्रच होते. यांचे साम्राज्य तर साडेचारशे वर्षे चालू होते. यावरून असे दिसते की, शास्त्र काहीही सांगत असले तरी प्रत्यक्षात लोकांना यात काही विपरीत वाटत नव्हते. त्यांचा या सम्राट घराण्यांना पूर्ण पाठिंबा होता.

शक, यवन, दरद, पल्हव, निषाद, किरात, कांबोज, शबर, पुलिंद, या जमाती भारतातील आदिवासी जमाती होत असे आजचे इतिहासवेत्ते म्हणतात. शक, यवन, दरद, पल्हव हे मूळचे क्षत्रिय पण संस्कारलोपामुळे व ब्राह्मणांच्या अदर्शनाने शूद्र झालेले लोक असे मनूने म्हटले आहे. पण इतर अनेक शास्त्रकारांनी यांना संकरज म्हणून शूद्र ठरविले आहे. महाभारतात यांना नरकगामी चांडाळतुल्य लोक असे म्हटले आहे. पण महाभारतातच अनेक ठिकाणी, या लढाऊ जमाती असून जरासंध, भगदत्त, दुर्योधन यांच्या सैन्यांत ते शौर्याने लढले, असे त्यांचे वर्णन केले आहे. केवळ जन्मावरून काही जमातींवर शिक्के मारून ठेवणे व त्यांना श्रेष्ठ व्यवसाय करण्यास बंदी करणे किती अशास्त्रीय आहे हे यावरून दिसून येईल. नवव्या-दहाव्या शतकानंतर असली बंधने फारच कडक झाली व त्यांमुळेच हिंदुसमाजाचा नाश झाला.

'नमस्तक्षभ्यो रथकारेभ्यश्च वो नमो' इ. यजुर्वेदातील (अ. १६ । २७) मंत्र देऊन पंडित सातवळेकर म्हणतात, 'सुतार, लोहार, रथकार, कुंभार, निषाद, भिल्ल, हे सर्व कारागीर शूद्र. यांना नमन करावे असे वेदांमध्ये सांगितलेले आहे. हे मंत्र द्विजांच्या तोंडचे आहेत. त्या दृष्टीने त्यांची महती

विशेष आहे. कालाच्या ओघामध्ये विचारांना चालना न मिळाल्यामुळे या नमस्कारार्ह जाती पुढे हीन व कायमच्या बहिष्कृत झाल्या. क्षुद्र विषमता शेवटी कोणत्या थरास जाऊन पोचते व ती समाजाला कशी बाधक होते, हे पहावयाचे असल्यास हिंदुसमाजातील ही स्पर्शास्पर्शाची चाल पहावी.' (स्पर्शास्पर्श–पृ. १०७, १०८.)

'शूद्रांमधील अस्पृश्यत्व' या प्रकारणात पं. सातवळेकरांनी प्राचीन काळातील समतेचा व सध्याच्या विषमतेचा अनेक प्रकारे ऊहापोह केला आहे. त्यांतच मनुस्मृती, कूर्मपुराण, यमस्मृती, पराशरस्मृती, बृहत्पराशरस्मृती, यांतील अनेक आधार देऊन अन्नपाण्याच्या स्पर्शास्पर्शासंबंधी सध्या ज्या अतिरेकी कल्पना रूढ झाल्या आहेत त्या मागच्या काळात मुळीच नव्हत्या, असे दाखवून दिले आहे. गोपाल, दास, नापित, कुंभार इ. अनेक शूद्र गणलेल्या जातींच्या हातचे अन्न खाण्यास, पाणी घेण्यास वरील शास्त्रकारांची मुळीच हरकत नाही. अनेक स्मृतिकारांनी सरसकट शूद्र असा शब्द वापरून ते भोज्यान्न आहेत असे मत दिले आहे. कोणी काही अल्पस्वल्प अशी बंधने घातली आहेत. पण उलट आपत्काळी कोणाच्याही हातचे अन्न खाण्यास हरकत नाही, असेही काही स्मृतिकारांनी सांगितले आहे. एवढी एक गोष्ट जरी वरिष्ठ हिंदूंनी ध्यानात ठेवली असती तरी हिंदुसमाज आजच्यासारखा शतधा दुभंगला नसता; सर्व वर्णांचे व जातींचे लोक एकमेकांत मिसळत राहिले असते आणि सहवासाने त्यांच्यातील सामरस्य दृढ होऊन त्यांचे सामर्थ्य वर्धिष्णु होत राहिले असते.

शूद्रांना ब्रह्मचर्य, संन्यास या आश्रमांचा व गायत्रीमंत्राचाही अधिकार पूर्वी होता, हेही पंडित सातवळेकरांनी याच प्रकरणात, अनेक स्मृतिवचने देऊन, सिद्ध केले आहे. अन्नपाण्याच्या स्पर्शास्पर्शाविषयीच्या त्यांच्या मताला म. म काणे (धर्मशास्त्राचा इतिहास–खंड २ रा, भाग १ ला, पृ. १६१–६२), कुलगुरु चिं. वि. वैद्य (मध्ययुगीन भारत, भाग २ रा, पृ. ३२९–३०) यांनी पुष्टी दिली आहे.

गणराज्यांतील समता :

समता हे समाजाच्या उत्कर्षाला, दृढतेला, संघटित वृत्तीला अत्यंत पोषक असे तत्त्व आहे. आणि चातुर्वर्ण्य म्हणजे मूर्तिमंत विषमता. अस्पृश्यता ही

तर या व्यवस्थेतील क्रूर अशा विषमतेची परिसीमा होय; म्हणूनच हिंदु-समाजातील विघटनेच्या विषबीजांचा विचार करताना हिंदूंनी शिरोधार्य मानलेल्या समाजरचनेच्या या तत्त्वांचा आपण तपशिलाने विचार करीत आहोत. त्यात असे दिसून येत आहे की प्राचीन काळी धार्मिक, सामाजिक, राजकीय सर्वच क्षेत्रांत जास्तीत जास्त समता स्थापिण्याचे प्राचीन समाजधुरीणांनी पराकाष्ठेचे प्रयत्न केले होते. उत्तर काळात, साधारणतः इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या सुमारास समतेच्या या तत्त्वांचा पराभव झाला आणि त्यानंतर एक-दोन शतकांतच हिंदू समाजाचाही पराभव झाला हे दारुण सत्य आजच्या हिंदूंना प्रतीत व्हावे यासाठीच, समता व उत्कर्ष आणि विषमता व विनाश यांमध्ये निश्चित कार्यकारणभाव आहे, हे ऐतिहासिक प्रमाणांनी सिद्ध करण्याचा या लेखात प्रयत्न केलेला आहे. भारताचा इ. स. १००० पर्यंतचा इतिहास अत्यंत वैभवाचा, उत्कर्षाचा, समृद्धीचा, व पूर्णस्वातंत्र्याचा होता हे आतापर्यंत अनेक वेळा दाखविलेच आहे. तोच काळ समतेचा, एकरूपतेचा, सहकार्याचा व संघटनेचा होता हे या लेखात आपण पहात आहोत. त्यासंबंधीचाच आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पुरावा आता द्यावयाचा आहे. तो म्हणजे भारतातील गणराज्यांचा किंवा लोकशाहीचा इतिहास हा होय.

भारतामध्ये प्राचीन काळी फार मोठ्या प्रमाणात गणराज्ये किंवा प्राजके (रिपब्लिक्स्) स्थापन झाली होती व त्यांचा कारभार दीर्घकालपर्यंत यशस्वीपणे चालला होता याविषयी आता दुमत राहिलेले नाही. डॉ. काशीप्रसाद जयस्वाल यांची 'हिंदू पॉलिटी' हा ग्रंथ या विषयात बव्हंशी प्रमाण मानला जातो. काही तपशिलात त्यांच्या प्रतिपादनाविषयी अनेकांनी मतभेद व्यक्त केले आहेत. पण गणराज्यांच्या स्वरूपाविषयीची त्यांनी काढलेली सामान्य रूपरेखा बहुमान्य झाली आहे. येथे आपल्याला तपशिलात शिरण्याचे कारण नाही. चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता, न्यायदानातील पक्षपात यामुळे जी विषमता समाजात रूढावत होती तिला गणराज्यांमुळे कसा पायबंद बसला होता व हिंदुसमाजात काही प्रदेशांत तरी बऱ्याच अंशी समता कशी नांदत होती येवढेच आपणांस पहावयाचे आहे. अगदी प्रारंभीच्या काळापासून समता व विषमता–संघटना व विघटना–यांचे प्रवाह चालू होते. पण इ. स. १००० पर्यंत समतेच्या प्रवाहाचा जोर बराच असल्यामुळे हिंदुसमाज संघटित राहू शकला व स्वातंत्र्य, साम्राज्य,

स्वधर्म, स्वसंस्कृती यांचे रक्षण करू शकला, हे या लेखाचे विचारसूत्र वर अनेकवेळा सांगितलेच आहे. त्यातील समतेच्या, संघटनेच्या प्रवाहातील एक अनुकूल धारा या दृष्टीने गणराज्यांचा विचार येथे करावयाचा आहे.

डॉ. जयस्वाल यांच्या मते इ. स. पूर्व १००० ते इ. स. ५५० हा गणराज्यांचा कालखंड होय. याच कालात नंद, मौर्य, शुंग, सातवाहन, कुशाण, गुप्त इ. घराण्यांची साम्राज्ये भारतात होऊन गेली. आणि या कालखंडात भारताचे खरे वैभव साम्राज्यातच दिसत होते. पण याच काळात उत्तर भारतात जी गणराज्ये नांदत होती त्यांचा इतिहास भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने अगदी उपेक्षणीय आहे असे नाही.

मागील लेखात भारतीयांच्या राष्ट्रनिष्ठेचे ग्रीक ग्रंथकारांच्या आधाराने वर्णन केले आहे. त्याच आरियन, कर्टिस, डियोडोरस, प्लुटार्क, या ग्रंथकारांच्या आधाराने आपल्या 'हिंदु पॉलिटी,' या ग्रंथात, डॉ. जयस्वाल यांनी भारतातील प्राजकांचे वर्णन केले आहे. त्यातील समता, स्वातंत्र्य, नागरिकांची प्रतिष्ठा या दृष्टीने अवश्य तेवढेच उतारे पुढे देतो. (पृष्ठांक हिंदूपॉलिटी या ग्रंथातले आहेत.) डियोडोरस म्हणतो, 'सौभूती गणराज्यात अतिशय हितावह असे कायद्याचे राज्य आहे. आणि त्यातील शासनपद्धती प्रशंसनीय अशीच आहे. भारतातील इतर प्रदेशांपेक्षा येथे नागरिकांना प्रतिष्ठा जास्त आहे. सौभूती आणि कठ राज्यात स्त्रीपुरुष आपापले विवाह स्वतःच ठरवितात. त्यात हुंड्याचा वा श्रेष्ठकनिष्ठ कुलाचा प्रश्न येत नाही. रूपाला मात्र फार महत्त्व असते. व्यासनदीजवळील गणराज्यातील लोक कृषिप्रिय, व शूर असून तेथे महाजनसत्ता (ॲरिस्टॉक्रसी) होती. हे महाजन न्यायाने व संयमाने सत्ता चालवीत. (अरियन) क्षुद्रक व मालव गण यांचा पराभव शिकंदराने केला असे ग्रीक लेखक म्हणतात. पण जयस्वालांच्या मते हे खरे नाही. कारण पुढील काळातील पतंजलीने, या दोन गणराज्यांनी केलेले संयुक्त प्राजक अस्तित्वात होते, असे सांगून त्यांतील क्षुद्रकांचा विजय झाला, असे म्हटले आहे. आणि शिकंदरांशी वाटाघाटी करण्यास त्यांचे जे १०० प्रतिनिधी आले होते त्यांच्या वर्णनावरून, ते जित लोक होते, असे दिसत नाही. शिकंदराने इतर कोणाचे केले नाही असे त्यांचे स्वागत केले. प्रत्येकास त्याने बसावयास सुवर्णासन दिले होते व शामियान्यात जरीचे व मखमलीचे पडदे सोडले होते. आपल्या स्वातंत्र्याचा या प्रतिनिधींना अभिमान वाटत होता आणि, 'आम्ही

शतकानुशतक हे स्वातंत्र्य अभंग राखिले आहे,' असे अभिमानाने ते सांगत होते. (कर्टिस) अंबष्ठ गणराज्याबद्दल कर्टिसने म्हटले आहे की, 'शौर्यधैर्यात व लष्करी बळात या राज्यातील लोक भारतातील इतर प्रदेशांपेक्षा अणुमात्र कमी नव्हते. आणि त्याचे शासन लोकायत्त होते.' पंजाबातील गणराज्यांविषयी डियोरस म्हणतो, 'अनेक पिढ्यानंतर अनियंत्रित राजसत्ता या लोकांनी नष्ट केली व लोकायत्त शासने स्थापन केली. त्यानंतर इतरत्रही अनेक नगरींनी लोकशासनाचाच अवलंब केला.' (पृ. ६०, ६१, ६४, ६७, ७५)

या वर्णनावरून भारताच्या गणराज्यांतील समानतेची कल्पना येईल. सर्व नागरिक जेथे स्वयंशासनाचे अभिमानी असतात, प्रत्येकाला जेथे मताधिकार असतो, स्त्री–पुरुषांना जेथे विवाहस्वातंत्र्य असते तेथे चातुर्वर्ण्यातील विषमता कितपत नांदू शकेल हे सांगावयास नको. या गणराज्यांमध्ये सर्व जनता शस्त्रधारी असून त्यांची लोकसेना (नेशन इन् आर्मस्) स्वातंत्र्यरक्षणासाठी सदैव सिद्ध असे. त्यामुळेच ही गणराज्ये समर्थ व बलाढ्य होती. सर्व जनता हीच सेना असलेल्या राज्यात जन्मनिष्ठ विषमता नांदणे फार कठिण आहे. आणि तशी ती नांदत नव्हती, तेथे समता होती, हे महाभारतकरांनीच सांगितले आहे. भीष्म म्हणतात, की या गणराज्यात 'जात्या च सदृशाः सर्वे कुलेन सदृशाः तथा।' जातीने व कुलाने सर्व लोक सम होते. (शांतिपर्व अ. १०७, ३०)

गणराज्यांत समता होती, शास्त्रविहित विषमता नव्हती याचे आणखी एक प्रमाण जुन्या ग्रंथांत मिळते. मनु आणि आपस्तंब हे चातुर्वर्ण्याचे अभिमानी शास्त्रकार होते. त्यांची गणराज्यांतील लोकांवर वक्रदृष्टी होती. आपस्तंबाने गणराज्यांकडून दान घेण्यास ब्राह्मणांना मनाई केलेली आहे. आणि मनूने मल्ल लिच्छवी या गणराज्यांतील लोकांना व्रात्य (भ्रष्ट आर्य) ठरविले आहे. (डॉ. जयस्वाल-मनु आणि याज्ञवल्क्य, पृ. ४०) या शास्त्रकारांनी उपदेशिलेली विषमता त्या गणराज्यांत नव्हती, तेथे त्यांच्या मताप्रमाणे सर्व गोलंकार होता, याचा हा अप्रत्यक्ष पुरावा म्हणून तरी मानता येईल असे वाटते.

वर सांगितलेच आहे की त्या काळात भारताचे सर्व वैभव साम्राज्यसत्तांनीच वाढविले होते. त्यामानाने गणराज्यांची महती थोडी, हे खरे. पण भारतात त्याकाळी व्यक्तीची प्रतिष्ठा, समता, स्वातंत्र्य या तत्त्वांचे प्रवाह, अल्पप्रमाणात का होईना, पण दीर्घकाल वहात होते, एवढे यावरून निश्चित दिसते.

समता हेच सामर्थ्य :

आता राजसत्ता, साम्राज्यसत्ता यांचा वरील दृष्टीने विचार करून राजकीय क्षेत्रातल्या समतेचा विचार संपवू. या सत्तांचे वर्णन करताना डॉ. जयस्वाल म्हणतात की येथले राजेसुद्धा अनियंत्रित असे कधीच नव्हते. प्रारंभीच्या काळात तर सभा, समिती या लोकायत्त संस्थांचे त्यांच्यावर प्रत्यक्षच नियंत्रण असे. इतकेच नव्हे तर त्याच संस्था राजाची निवड करीत. पुढील काळात राजपद आनुवंशिक झाले पण तरीही लोक अर्वाचीन काळाप्रमाणे राजशासनाविषयी उदासीन नव्हते. त्याविषयी ते फार दक्ष असत. आणि हेच, जयस्वालांच्या मते, भारताच्या शासनाचे त्या काळात मुख्य बळ होते. राजशासनरूप वृक्षाची मुळे त्याकाळी लोकजीवनात खूप खोलवर गेलेली असत. भीष्मांनी गणराज्यांतील समतेविषयी जशी ग्वाही दिलेली आहे तशी राजसत्तांकित प्रदेशांतील समतेविषयी कोणी दिलेली नाही हे खरे. पण आपण एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, लोक जागृत व दक्ष असल्यानंतर चातुर्वर्ण्य रूढावले असले तरी त्यांतील विषमतेचे विष मारले जाणारच. शूद्र हा मंत्रिपदाला ज्या समाजांत जाऊ शकतो तेथे, शास्त्रांनी काहीही सांगितले तरी, विषमता किती राहील हे दिसतच आहे. लोकजीवनात शासनाची मुळे जाऊन तेथून मिळणाऱ्या जीवन-रसावरच तो वृक्ष जगत असताना विषमतेला पायबंद पडणारच. तसा तो या काळात निश्चित पडला होता. म्हणून तो समाज आजच्यापेक्षा अधिक एकरूप, सम, समरस, समसुखदुःखी, समानहृदय होऊ शकला. व त्यामुळेच तो जयिष्णु वर्धिष्णु, समृद्ध व सामर्थ्यसंपन्न असा झाला होता.

समता, बंधुता, सहकार्य या तत्त्वांचे समाजसंघटनेच्या दृष्टीने किती महत्त्व आहे हे यावरून ध्यानात येईल. 'राष्ट्रनिष्ठा' या तत्त्वाने प्राचीन काळचा हिंदुसमाज संघटित झाला होता असे गेल्या प्रकरणात दाखविले आहे. राष्ट्रनिष्ठेत समता, बंधुता ही तत्त्वे गृहीतच धरलेली असतात. ती तत्त्वे त्या काळच्या समाजाने कशी अवलंबिली होती व त्यांचा व सामर्थ्याचा किती दृढसंबंध आहे हे येथवर विवरून सांगितले. आता याच काळात विषमता, भेदभाव, विद्वेष यांची विषबीजे कशी प्रतिपादिली जात होती, आणि त्यांचेच पुढे विषवृक्ष होऊन हिंदुसमाजाचा त्यांमुळे कसा विनाश झाला हे पुढील लेखात पहावयाचे आहे.

४

विमर्शना

सप्तशृंखला :

कुलगुरू चिंतामणराव वैद्य यांनी 'मध्ययुगीन भारत' या नावाने भारताचा, इ. स. ६०० ते इ. स. १२०० या कालविभागाचा, त्रिखंडात्मक इतिहास लिहिला आहे. त्यातील तिसऱ्या खंडाला त्यांनी 'हिंदु भारताचा अंत' असे नाव दिले आहे. त्यातील तिसऱ्या भागातील शेवटच्या शेवटच्या प्रकरणांची नांवे 'अजमीर व दिल्ली यांचा उच्छेद', 'कनोज व बनारस यांचा उच्छेद', 'उत्तर हिंदुस्थानातील इतर रजपूत राज्यांचा उच्छेद', अशी आहेत. इ. स. १२०० ही त्यांच्या कालखंडाची म्हणजे मध्ययुगाची मर्यादा होती. नाही तर पुढल्या खंडातील प्रकरणांची नावे 'यादवांचा उच्छेद', 'होयसळांचा उच्छेद', 'चोळांचा उच्छेद', व शेवटी 'दक्षिण भारताचा उच्छेद' अशी त्यांना द्यावी लागली असती.

'हिंदु भारताचा अंत' याचा इतिहास लिहून झाल्यावर त्यांनी या अंताची, या उच्छेदाची पुढील प्रकरणांत कारणमीमांसा केली आहे. ती करताना कडक जातिबंधने, राष्ट्रभावनेचा अभाव, स्वराज्याविषयीची उदासीनता, अहिंसाप्रवणता, हिंदूंतील धार्मिक ऐक्याचा नाश, कलिवर्ज्य प्रकरण, पतितपरावर्तनाचा निषेध

इत्यादी कारणे हिंदूंच्या अधःपाताची म्हणून त्यांनी दिलेली आहेत. (भाग ३ रा, पुस्तक ७ वे, प्रकरणे २५, २६; पुस्तक ८ वे, प्रकरण ४)

हे सर्व विवेचन वाचीत असताना एक गोष्ट ध्यानात येते की यांतील प्रत्येक रूढी ही हिंदुसमाजाच्या विघटनेस कारण झालेली आहे. पूर्वीच्या काळी हिंदुसमाजातील भिन्न घटक एकमेकांशी संलग्न करण्याचे, सांधण्याचे, त्यांना एकरूप देऊन संघटित करण्याचे शास्त्रज्ञांचे धोरण होते व ते प्रभावी ठरले होते. आता एक वर्ण दुसऱ्या वर्णापासून, एक जात दुसऱ्या जातीपासून, एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपासून तोडून काढण्याचे धर्मशास्त्रकारांनी धोरण आखले होते. त्या धोरणाचाच प्रभाव वाढून अखेरीस हिंदुराजसत्तांचा, धर्माचा व संस्कृतीचा उच्छेद होण्याची वेळ आली.

तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे यांनी ' हिंदूंच्या अवनतीची मीमांसा ' या पुस्तकात ' पावित्र्याच्या अतिरेकी कल्पना ', ' सामुदायिक ध्येयाचा अभाव ' इ. या अवनतीची कारणे दिली आहेत. आणि शेवटी यामुळे हिंदुसमाजात ' स्वकीय–दूरीकरणप्रवृत्ती ' बळावून त्याची अवनती झाली, असा निष्कर्ष काढला आहे. (पृ. १३१)

आचार्य क्षितिमोहन सेन यांनी आपल्या ' भारतवर्षमें जातिभेद ' या आपल्या पुस्तकात ' हमारा इतिहास इसी प्रकार अपनों को पराया बनानेका इतिहास है ' असा एका वाक्यातच भारताच्या अधःपाताविषयी निर्णय दिला आहे. (पृ. ३१) आपल्यापेक्षा दुसऱ्याला हीनजातीय ठरवावे, शूद्र ठरवावे, पतित ठरवावे, अपवित्र लेखावे आणि तोडून दूर फेकावे, यातच लोक कृतार्थता मानू लागले होते. त्यातून विघटनेवाचून दुसरे काय होणार ?

म. म. काणे यांनी आपल्या ' धर्मशास्त्राचा इतिहास ' या ग्रंथाच्या पाचव्या खंडात हिंदूंच्या अधःपाताची अशीच कारणचिकित्सा केली आहे. ती करताना निवृत्तिवाद, इहविन्मुखता, राजकारणाविषयीची उदासीनता, सर्व समाजाला बांधील अशा सम आचारविचारांचा, धर्मबंधनांचा अभाव ही कारणे त्यांनी दिली आहेत. आमची अध्यात्मतत्त्वे पाहिली तर ती जगदैक्य, भूतैक्य प्रतिपादणारी; आणि प्रत्यक्षात मात्र अनंत प्रकारचे भेदभाव, अशी विपरीतता आमच्या बुद्धीला आली होती. हे विवेचन करून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सांगितलेल्या सप्तशृंखलांचा त्यांनी, अधःपाताची कारणे म्हणून, निर्देश केला आहे. (पृ. १६२० –

१६२३) स्पर्शबंदी (अस्पृश्यता), वेटीबंदी (जातिभेद), शुद्धिबंदी, व्यवसायबंदी, रोटीबंदी, वेदबंदी, व सिंधुबंदी या सावरकरांनी सांगितलेल्या सात शृंखला होत. यांतील प्रत्येक बंदीचे पर्यवसान समाजाची शकले करणे, त्याची विघटना करणे यातच झाले व अजूनही होत आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी या शृंखलांना स्वदेशी शृंखला म्हटले आहे. मागल्या लेखात सांगितले आहे की, हिंदू शास्त्रीपंडितांनीच असले धर्मशास्त्र रचून आपला समाज धुळींस मिळविला. या शृंखला स्वदेशी आहेत या म्हणण्याचा हाच भावार्थ आहे. आमच्या आम्हीच या शृंखला घडवून त्यांनी हिंदुसमाजातील भिन्न घटकांना निरनिराळ्या खांब्रांशी जखडून ठेविले व एकमेकांजवळ येणे अशक्य करून टाकले. त्यामुळे हा समाज समाज राहिलाच नाही. हिंदु मानवसमूहात व्यक्ती आहेत, जाती आहेत; पण त्या सर्व मिळून एक समाज होत नाही. खरे म्हणजे जाती याही इतरांच्या विद्वेषापुरत्याच आहेत. त्यांच्या अंतरात सर्व विलग, अबद्ध, असंघटित अशा व्यक्तीच आहेत. अशी या मानवसमूहाची दुर्दशा का झाली याची अनेक कारणे वर उल्लेखिलेल्या थोर पंडितांनी दिली आहेत. त्यांचाच आता प्रपंच करावयाचा आहे. हिंदुधर्मीयांनी इ. स. १० व्या शतकाच्या आगेमागे अत्यंत विपरीत असे तत्त्वज्ञान स्वीकारले, अत्यंत हानिकारक व घातक अशी धर्माची व समाजरचनेची तत्त्वे स्वीकारली म्हणून त्यांचा नाश झाला असे मागल्या लेखात सांगितले आहे. हे धर्मशास्त्र ज्यांनी रचले त्यांनी व त्यांच्या अर्वाचीन पुरस्कर्त्यांनी त्याचे समर्थनही केले आहे. त्या विपरीत धर्मशास्त्राचा इतिहास पाहताना त्याच्या समर्थकांनी मांडलेल्या उपपत्तींचाही आपण परामर्श घेऊ.

विषमता :

मागल्या प्रकरणात सांगितलेच आहे की समता आणि विषमता यांचा पुरस्कार करणाऱ्या दोन परपस्परविरुद्ध विचारसरणी प्रारंभीच्या काळापासून प्रचलित होत्या. त्यातील समतेच्या प्रवाहाचा विचार त्या लेखात आपण केला. आता विषमतेच्या दुसऱ्या प्रवाहाचा मुळापासून मागोवा घेत त्याच्या मुखापर्यंत जाऊन त्याच्यामुळे हिंदुसमाज शतधा छिन्नभिन्न कसा झाला ते पाहावयाचे आहे.

उपनिषदांमध्ये ब्राह्मणांनी क्षत्रियांपासून ब्रह्मविद्येचे पाठ घेतल्याचे अनेक उल्लेख

आहेत. त्यांचा निर्देश मागे केलाच आहे. क्षत्रियांनी ही विद्या ब्राह्मणांना शिकविली हे खरे; पण ती देताना, हे प्रतिलोम आहे, विपरीत आहे, असे क्षत्रियांनी उद्गार काढल्याचे दिसते. ब्राह्मणाने क्षत्रियाकडे विद्येसाठी जावे, हे अजातशत्रू राजाला प्रतिलोम वाटत होते. याचा अर्थ असा की ब्राह्मण, क्षत्रिय हे जन्माने ठरत होते. कवष ऐलूषाची कथा अशीच आहे. यज्ञदीक्षा घेऊन तो ब्राह्मणांमध्ये बसला होता. हे ध्यानी येताच, 'तू दासीपुत्र आहेस, येथून चालता हो' असे म्हणून ब्राह्मणांनी त्याला एका वाळवंटात हाकून दिले. पण तेथे त्याने सरस्वतीची प्रार्थना केली. तेव्हा ती नदीरूपाने धावत आली. त्याची ती प्रार्थना म्हणजेच ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातले ३० वे सूक्त होय. (काणे, धर्मशास्त्र, खण्ड २ रा, पृ. ३६–६८)

या दोन्ही कथा उद्बोधक आहेत. वर्ण जन्माने ठरत होते असे त्या दर्शवितात. पण गुणकर्मानुसार मनुष्याला प्रतिष्ठा मिळत होती, पूर्वग्रह बाजूला सारून लोक गुणांना मान देत होते, असेही त्यावरून दिसते. गुणांची ही प्रतिष्ठा पुढेपुढे अमान्य होऊन जन्माची वाढत गेली. आणि त्यामुळेच समाज पराकाष्ठेचा विषम होऊन त्याची अनंत शकले झाली. अशा समाजामध्ये एकरूप समाजासारखी संघटना होणे अशक्य असते. आणि म्हणूनच त्याच्या ठायी सामर्थ्य निर्माण होत नाही. यापेक्षाही जास्त हानिकारक गोष्ट म्हणजे गुणकर्माला मान न देणाऱ्या समाजात व्यक्तिजीवनाची प्रतिष्ठा राहात नाही. आणि व्यक्तिजीवनाची प्रतिष्ठा हा तर उत्कर्षाचा मूळ पाया होय. प्रतिष्ठा नाही म्हणजे उत्कर्षाला संधी नाही. आणि ती नाही म्हणजे व्यक्ती समाजाच्या उत्कर्षापकर्षाविषयी उदासीन होते. स्वतःच्या धर्माविषयीही ती उदासीन होते. अभ्युदय व निःश्रेयस प्राप्त करून देणारा तो धर्म. पण यांचा लाभ ज्या धर्मात होत नाही त्या धर्माविषयी लोकांना प्रेम का वाटावे ? त्यांची धर्मांतर करण्याची प्रवृत्ती झाली तर त्यांना दोष कसा देता येईल ? कुमारिल भट्टाने म्हटले आहे की, शूद्रांतूनच बहुसंख्य लोक बौद्ध झाले आहेत. हे जाणूनच त्या वेळी पुराणांनी शूद्रांना काहीसा धर्माधिकार दिला. पण पुढे तो पुन्हा काढून घेण्यात आला. आजच्या काळातही डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी हिंदुधर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला याचे कारण हेच आहे. या धर्मात राहून आपल उत्कर्ष होणार नाही ही त्यांची खात्री झाली म्हणूनच त्यांनी

धर्मत्याग केला. पण हिंदुसमाज या आपत्तीविषयी उदासीनच आहे. गेली हजार वर्षे तो तसाच होता व अजूनही, काही अपवाद वजा जाता, बहुसंख्य हिंदु जनतेच्या वृत्तीत फारसा फरक पडला आहे असे दिसत नाही. प्राचीन काळी जिवंत, चैतन्यसंपन्न असलेल्या या समाजाला ही शववृत्ती, ही संज्ञाहीनता, ही बधिरता, ही जडता, ही निर्बुद्धता उत्तरकाळच्या धर्मशास्त्रामुळेच आलेली आहे. गुणांची प्रतिष्ठा जाऊन जन्मालाच सर्व महत्त्व कसे येत गेले ते धर्मशास्त्रातील वचनांच्या आधारे आता पाहू.

ब्राह्मणमाहात्म्य :

तैत्तिरीय ब्राह्मण, महाभारत, मनुस्मृती, वसिष्ठधर्मसूत्र, विष्णुधर्मसूत्र, पराशरस्मृती अशा जुन्या धर्मग्रंथांतून ब्राह्मणांची पुढीलप्रमाणे अतिरेकी स्तुती केलेली आढळते. " ब्राह्मण हा अग्निवैश्वानर आहे, ब्राह्मण हे मूर्त देव होत, ब्राह्मण हेच विश्वाचा आधार होत, विश्वातील सर्व धन त्यांचे आहे, ब्राह्मण संतप्त झाला तर प्रतिविश्व निर्माण करील, दिक्पाल निर्माण करील व देवांनाही स्थानभ्रष्ट करील; व्रत, तप, यज्ञ यांत कोठे काही उणे पडले तर ते ब्राह्मणकृपेने भरून निघते, ब्राह्मणाचा शब्द म्हणजे देवाचा शब्द, तो कधीच खोटा ठरत नाही, सर्व प्राणिमात्रांचा ब्राह्मण हा गुरू होय; ब्राह्मण म्हणजे श्रेष्ठ तप, श्रेष्ठ ज्ञान, त्यांच्या अर्घ्यदानामुळेच आकाशात सूर्य प्रकाशतो, ब्राह्मणांनी यज्ञ केले नाहीत तर सूर्य उगवणेच शक्य नाही. पुरोहितांच्या मंत्रसामर्थ्यानेच राजांना जय मिळतो, कोणालाही देवपद देणे व देवपदावरून कोणालाही च्युत करणे हे ब्राह्मणांच्या हाती आहे, त्यांच्या इच्छेप्रमाणेच राजांना राजपद मिळते वा असलेल्यांचे राजपद जाते. " (म. म. काणे, धर्मशास्त्राचा इतिहास, खण्ड २ रा, पृ. १३५–३६) ज्ञानी, तपोनिष्ठ, वेदोनारायण अशा ब्राह्मणांची जरी अशी स्तुती केली तरी ती सार्थ ठरणार नाही, हास्यास्पदच ठरेल. मग सरसकट सर्व ब्राह्मणांना उद्देशून असली स्तोत्रे रचली तर काय होईल हे सांगावयास नकोच. दुर्दैवाने वरील ग्रंथांतील ही स्तुती गुणकर्मांची नाही. जातीची आहे. काही ठिकाणी तसे स्पष्टपणे सांगितलेलेही आहे. ' ब्राह्मणः संभावेनैव देवानां अपि दैवतम् । ' केवळ जन्मानेच ब्राह्मण देवांचे दैवत ठरतो, असे मनु म्हणतो. (११–८४) याही पुढे जाऊन त्याने म्हटले आहे की, ' ब्राह्मण विद्वान

असो अविद्वान असो. तो देवच आहे. (मनु ९–३८४) इतर स्मृती व पुराणे यांत ब्राह्मणांची अशीच अहमहमिकेने प्रशंसा केलेली आढळते. 'जन्मनैव महाभागो ब्राह्मणो नाम जायते नमस्यः सर्व भूतानाम् ॥' अशा तऱ्हेची वचने सर्वत्र सापडतात.

यातली विस्मयकारक गोष्ट अशी की, ज्या ग्रंथात तप, ज्ञान, चरित्र्य, मनोनिग्रह यांमुळे मनुष्य ब्राह्मण ठरतो, हे गुण नसतील तर तो जन्माने ब्राह्मण असला तरी शूद्र होतो व त्याला शूद्राप्रमाणेच वागवावे, असे निर्धाराने सांगितले आहे. त्याच ग्रंथांतून वरील वचनेही सापडतात. पण वर सांगितलेच आहे की मागल्या बहुतेक सर्व ग्रंथांत नित्य भर पडत गेली आहे. त्यामुळे त्यांचे ग्रंथरूप जाऊन त्यांना कोशरूप आले आहे. तेव्हा त्यांत असली ध्रुवभिन्न वचने सापडली तर नवल नाही. जाता जाता एक गोष्ट सांगावीशी वाटते की, असली विवेकहीन, निर्बुद्ध, आंधळी भर घालण्यामुळे ग्रंथकाराला काही दृष्टिकोन असतो, त्याला काही व्यक्तिमत्त्व असते, त्याचे काही स्वतंत्र तत्त्वज्ञान असते, हा विचारच भारतातून पुढे पुढे नष्ट झाला. हिंदुसमाजाच्या प्रगतीला हे अपकृत्य अत्यंत घातक झालेले आहे. थोर ग्रंथकारांचे व्यक्तिमत्त्व ही राष्ट्राची मोठी शक्ती आहे. तीच या भर घालणाऱ्या लोकांनी नष्ट करून टाकली. असो.

विषमतेचा दुसरा ओघ समतेबरोबरच कसा वाहात होता याची काही कल्पना वरील ब्राह्मणगौरवावरून येईल. ब्राह्मण केवळ जन्माने श्रेष्ठ मानावा हा विचार विषमतेचे विष समाजात निश्चितपणे रुजवितो. ब्राह्मणांची कर्तव्ये सांगताना, या सर्व शास्त्रकारांनी फार उदात्त कल्पना मांडलेल्या आहेत, यात शंका नाही. ब्राह्मणांनी अहोरात्र वेदाध्ययन करावे, एका दिवसाच्या गरजेपेक्षा जास्त धनसंचय करू नये, धर्महीनांकडून दान घेऊ नये, राजापुढेही याचना करू नये, यजन–याजन, अध्ययन–अध्यापन, दान–प्रतिग्रह हीच त्याची कर्तव्ये, या कर्तव्यात थोडे दिवस जरी खंड पडला तरी ब्राह्मण्य लोपेल; अशा तऱ्हेची असंख्य वचने शास्त्रग्रंथांत सापडतात. आणि याप्रमाणे आचरण करणाऱ्या ब्राह्मणास अग्रमान द्यावा, असे सांगितले तर ते आक्षेपार्हही होणार नाही. पण ही लक्षणे ज्यांच्या ठायी दिसत नाहीत त्यांनाही पूज्य मानावे, असे म्हटले की समाजाचा अधःपात अटळ होतो.

गुण जन्मनिष्ठ असले तर :

जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्यव्यवस्था ही केव्हा हितावह ठरेल ? जर त्या त्या वर्णाचे किंवा जातीचे लोक, नित्यनियमाने, शास्त्रकारांनी त्या वर्णाच्या म्हणून सांगितलेल्या गुणांनी संपन्न असतील तर. ब्राह्मण जातीत जन्मलेला प्रत्येक मनुष्य किंवा त्या जातीचे बहुसंख्य लोक तप, निग्रह, ज्ञान, चारित्र्य या गुणांनी, तसेच क्षत्रिय जातीतील लोक, शौर्य, धैर्य, प्रजापालनदक्षता, इत्यादी गुणांनी; असे सर्व वर्णीय लोक आपापल्या शास्त्रप्रणीत गुणांनी युक्त असतील तरच जन्मनिष्ठ व्यवस्थेला अर्थ आहे. पण असे कधीही घडत नाही. पूर्वी घडलेले नाही व पुढेही घडणार नाही. त्यामुळे ब्राह्मणांची कर्तव्ये अमुक, क्षत्रियांची तमुक, असे नुसते शास्त्र सांगण्याचा काहीही उपयोग नाही. कारण तसे नुसते शास्त्र सांगण्याने गुण निर्माण होत नसतात. ब्राह्मणांच्या अंगी जन्मतः श्रेष्ठ गुण नसतात व नुसत्या उपदेशाने ते निर्माण होत नाहीत हे प्राचीन शास्त्रकारांना चांगले समजलेले होते. प्राचीन काळीसुद्धा, ब्राह्मण शास्त्रविहित यजनयाजन इ. व्यवसायांपेक्षा अन्य निषिद्ध व्यवसाय करीत असत. अशा ब्राह्मणांना श्राद्धाला बोलावू नये असे सांगून, शास्त्रकारांनी त्यांची एक प्रचंड यादी दिली आहे. तीवरून हे स्पष्ट दिसते की, जन्मावर गुणसंपदा त्या काळीही अवलंबून नव्हती. अत्रिस्मृतीत ब्राह्मणांच्या दहा प्रकारांची एक यादी दिली आहे. तीत देवब्राह्मण, मुनिब्राह्मण हे श्रेष्ठ प्रकार सांगून झाल्यावर शूद्रब्राह्मण, निषादब्राह्मण, पशुब्राह्मण, म्लेंच्छ-ब्राह्मण, चांडाळब्राह्मण असेही ब्राह्मणांचे प्रकार सांगितले आहेत. आणि या प्रकारचे ब्राह्मण ठोंबे, शंख, गुंड, मवाली, आततायी, आचारहीन, चोर, दरोडेखोर होते असे सांगितले आहे. अपरार्क या शास्त्रकाराने, जन्माने ब्राह्मण असूनही जे ब्राह्मण नव्हेत अशांचे सहा प्रकार सांगितले आहेत. सरकारी नोकरी करणारा, क्रयविक्रय करणारा, अनेकांचे यजमानकृत्य करणारा, सबंध खेड्याची भिक्षुकी करणारा, वेळेवर संध्या न करणारा व खेड्यात किंवा शहरात नोकरी करणारा, हे ते सहा प्रकार होत. अनुशासपर्व (महाभारत) म्हणते की,' काही ब्राह्मण चोर आहेत, काही डोंबारी, काही नाचे पोरे व काही डँबिस आहेत ! '

पण खेदाची गोष्ट अशी की, अशा ब्राह्मणांचाही मान राखावा, त्यांना पूजेसाठी बोलवावे, त्यांना दान द्यावे असा उपदेश शास्त्रकारांनी केलेला आहे.

'देवपूजेसाठी बोलाविताना ब्राह्मणाचे चारित्र्य वा त्याची विद्वत्ता पाहू नये,' (अनुशासन पर्व ९०.२) 'परीक्षा करूनच ब्राह्मण बोलवावा असे वेदवचन आहे हे खरे, पण परीक्षा न करणेच चांगले. परीक्षा न करता ब्राह्मण बोलाविले तर पितर व देव संतुष्ट होतात.' (अपरार्क–पृ. ४५५) ब्राह्मण सत्‌शील असो, दुःशील असो, सुसंस्कृत असो, हीन असो, त्याचा अपमान करू नये; कारण तो भस्माखालच्या अग्नीसारखा असतो.' (वृद्धगौतमस्मृती, अध्याय ३ रा) अशा तऱ्हेची विपुल वचने धर्मशास्त्रात सापडतात. (काणे, खंड २ रा, पृ. ११७, १३५, १३६) याचा अर्थ स्पष्ट आहे. चारित्र्य, तप, वेदाध्ययन, विद्वत्ता, ज्ञान, यांची किंमत या शास्त्रकारांच्या लेखी शून्य होय. असे शास्त्रकार जेथे झाले आणि अशांना जेथले लोक अनुसरले त्यांचे भवितव्य सांगण्यास श्रुतिस्मृतींची गरज नाही.

नरोटीचे महत्त्व :

केवळ जातिब्राह्मणाला मान द्यावा ही जी प्रवृत्ती ती म्हणजे सर्व जीवनव्यापी अशा एका घातकी प्रवृत्तीचा एक भाग आहे. जडाला, भौतिक पिंडाला, बाह्य सांगाड्याला, नरोटीला महत्त्व द्यावे आणि आतील चैतन्याची उपेक्षा करावी, आत्म्याला गौण लेखावे, श्रीफलाची अवहेलना करावी ही ती प्रवृत्ती होय. संहिताकाळानंतर ब्राह्मण ग्रंथांची रचना झाली. त्यांनी यज्ञयागांतील बाह्य कर्मकांडाचे इतके अवडंबर माजविले की, त्यामुळे वेदांतील ऐश्वर्याकांक्षा, विजिगीषा, रसरशीत चैतन्यमय जीवन यांचा लोपच झाला. उपनिषदांनी यज्ञयागावर अत्यंत कठोर टीका केली, यज्ञसंस्थेची हेटाळणी केली ती यासाठीच. अर्थाला सोडून शब्दाचेच महत्त्व मानणे ही कर्मकांडाइतकीच दुसरी अनर्थावह प्रवृत्ती होय. मीमांसकांनी ही अधोगामी प्रवृत्ती अगदी पराकाष्ठेला नेली. पण तेवढ्यावर हे संपले नाही. तर पुढील काळात शब्दनिष्ठेने अखिल भारतीय जीवन व्यापून त्यातील जीवनरस शोषून घेतला. वेदांतील शब्दांना महत्त्व, भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील शब्दांना महत्त्व, गुरुमुखातील शब्दांना महत्त्व! गीता, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे यांतील शब्दांना महत्त्व. म्हणून मग त्यांचा कीस काढून त्यांतील अर्थाला स्वमताकडे खेचून आणण्याची धडपड. अध्यात्म, काव्यशास्त्र, विद्याव्यासंग या सर्व क्षेत्रांत या शब्दनिष्ठेने चैतन्याचा नाश करून हिंदूंच्या बुद्धीला

जडत्व आणले. जडाची उपासना केल्यावर दुसरे काय होणार! तेच समाज-रचनाशास्त्रात झाले. चारित्र्य, तप, वेदाध्ययन, श्रद्धा, शौर्य, क्षात्रतेज, विजिगीषा यांचे म्हणजे चैतन्याचे महत्त्व जाऊन ब्राह्मण, क्षत्रिय यांच्या भौतिक पिंडाला मान मिळू लागला. या भौतिक पिंडात वरील थोर गुण सतत नियमाने राहात असते तर चातुर्वर्ण्यरचनेला कोणीच विरोध केला नसता. पण तसे ते राहत नाहीत, हे पूर्वीच्या शास्त्रकारांनीच लिहून ठेविले आहे. तरी या वर्णांना मान द्यावा असा त्यांचा आग्रह आहे. अर्वाचीन काळी वैज्ञानिक दृष्टी प्राप्त झाल्यानंतरही राजवाडे, बाळशास्त्री हरदास यांसारखे पंडित चातुर्वर्ण्याचे समर्थन करतात हे मोठे दुर्दैव होय. जन्माने वर्ण ठरत असूनही, ब्राह्मणक्षत्रियांचा अनेक कालखंडात अधःपात झाला, असे याच पंडितांनी लिहिले आहे. तरी 'त्यागी, ज्ञानोपासक ब्राह्मणवर्ग निर्माण केला व तो सहस्रावधी वर्षे टिकवून दाखविला, हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य होय' असे त्यांचे मत आहेच.

सामाजिक न्यायाचा अभाव :

ब्राह्मणांच्या भौतिक पिंडालाच महत्त्व दिल्यामुळे न्यायदानात पक्षपात करण्याची बुद्धी शास्त्रकारांना सहजच झाली. आणि त्यातून उद्भवणाऱ्या अन्यायाची, विषमतेची, अणुमात्र क्षिती न बाळगता शास्त्रकारांनी पक्षपाती शास्त्र, धर्म म्हणून लिहून ठेविले. राजा हा सर्व प्रजेचा शास्ता होय; पण ब्राह्मणांवर त्याची सत्ता चालणार नाही. ते शासनमुक्त आहेत. ब्राह्मणाने कोणताही गुन्हा केला तरी त्याला फटक्याची शिक्षा द्यावयाची नाही, त्याला बेड्या घालावयाच्या नाहीत, त्याला हद्दपार करावयाचे नाही, त्याला दण्ड करावयाचा नाही, त्याची निर्भर्त्सनाही करावयाची नाही, असे गौतमधर्मसूत्राचे म्हणणे आहे. इतर शास्त्रकारांनी हे विधान फक्त विद्वान ब्राह्मणालाच लागू आहे, असे म्हटले आहे. पण कोणत्याही कारणाने ब्राह्मणाला देहदंड द्यावयाचा नाही, याविषयी कौटिल्याखेरीज सर्वांचे एकमत आहे. ब्राह्मणाने राजद्रोह केला, फितुरी केली तर त्याला नदीत बुडवावे, असे कौटिल्य सांगतो. इतरांनी घोर अपराधासाठी ब्राह्मणाचे मुंडन करून त्याच्या कपाळावर तप्त मुद्रा ठोकून त्याला हद्दपार करावे, असे म्हटले आहे. ब्राह्मणापासून कर घेऊ नये असे बहुतेक स्मृतींनी सांगितले आहे.

काहींच्या मते केवळ श्रोत्रीय ब्राह्मण करमुक्त असावे. पण काहींच्या मते सर्वच ब्राह्मण ! कारण त्यांचे पुण्य राजाला मिळते तो करच होय ! प्रत्येक गुन्ह्यासाठी प्रत्येक वर्णाला शास्त्रकारांनी भिन्नभिन्न शिक्षा सांगितल्या आहेत. शूद्राने वरिष्ठ-वर्गीय स्त्रीशी व्यभिचार केला तर त्याला लिंगच्छेदाची शिक्षा. पण ब्राह्मणाने ब्राह्मणस्त्रीवर बलात्कार केला तरी फक्त १००० दंड. शूद्राने ब्राह्मणाची निंदा केली तर त्याची जीभ कापावी, वैश्याने ब्राह्मणाची बदनामी केली तर १५० दंड, क्षत्रियाला १०० दंड. पण ब्राह्मणाने शूद्राची निंदा केली तर १२ दंड किंवा मुळीच दंड नाही.

हा अन्याय आहे, पक्षपात आहे असे काही शास्त्रकारांना जाणवत होते. त्यामुळे त्यांनी हे केवळ श्रोत्रीय, विद्वान ब्राह्मणापुरतेच मर्यादित आहे, किंवा हे केवळ अर्थवादात्मक आहे, शास्त्रकारांच्या मनात तसे नाही, असे म्हणून या अन्यायाचे स्वरूप सौम्य करण्याचा प्रयत्न केला आहे. काही शास्त्रकारांनी एक-दोन गुन्ह्यांच्या बाबतीत अगदी उलट धोरण सांगितले आहे. चोरीच्या गुन्ह्यांसाठी शूद्राला जितका दण्ड त्याच्या दुप्पट वैश्याला, त्याच्या दुप्पट क्षत्रियाला व त्याच्या दुप्पट ब्राह्मणाला दण्ड, गौतम आणि मनू यांनी सांगितला आहे. कारण गुन्ह्याचे खरे स्वरूप कळण्याची पात्रता त्याला असते, ती शूद्राला नसते. वास्तविक हीच दृष्टी सर्वत्र ठेवावयास हवी होती. तसा एक विचारप्रवाह होता, हे मागल्या लेखात सांगितलेच आहे. तशा निःपक्षपाती न्यायाच्या बळावरच अनेक शतके हा समाज टिकू शकला. पण या दुसऱ्या प्रवाहाचा जोर हळूहळू वाढत गेला. व समाज विघटित होऊ लागला असे म. म. काणे यांनी अनेक ठिकाणी सांगितले आहे. (धर्मशास्त्राचा इतिहास, खंड २ रा, पृ. १७१–१७९) हे विवेचन करताना काणे यांनी युरोपात धर्मगुरूंच्या बाबतीत यापेक्षाही भयंकर पक्षपात होत असे, असे अनेक प्रमाणांनी दाखवून दिले आहे. तेथे असा विषम न्याय होता यात शंकाच नाही. पण पाश्चात्त्य युरोपातील एकेक राष्ट्राने व तेथील जागरूक जनतेने याविरुद्ध लढा केला व ती विषमता नष्ट केली. आणि ज्यांनी समतेच्या धर्माची स्थापना केली त्याच राष्ट्रांचा उत्कर्ष झाला अशी इतिहासाची साक्ष आहे, हे आपण ध्यानात ठेविले पाहिजे. भारतात वरील विषम न्याय शास्त्रविहित होता तरी त्यावर मात करून समताधर्म इ. स. दहाव्या शतकापर्यंत विजयी होत होता,

हे मागल्या लेखात दाखविलेच आहे. पुढे त्या धर्माचे रक्षण होईना. त्यामुळे सामाजिक न्याय ही कल्पनाच हिंदुसमाजातून नष्ट झाली. आणि या घोर पातकामुळे त्याचा नाश झाला.

सर्व समाज शूद्र

जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्याचे म्हणजेच विषमतेचे पुरस्कर्ते जे शास्त्रकार त्यांनी ब्राह्मणांच्या भौतिक पिंडाला महत्त्व देऊन समाजाला कसे विकृत, अन्यायकारक व अधोगामी धर्मशास्त्र सांगितले ते आपण पाहिले. आता शूद्रांच्या बाबतीत तशाच जन्मजात उच्चनीचतेच्या तत्त्वाचा अवलंब करून वरच्यापेक्षाही शतपटीने आंधळे, मूढ आणि अविवेकी शास्त्र त्यांनी कसे रचले ते पाहावयाचे आहे.

प्रथम शूद्र या वर्णात या शास्त्रकरांनी कोणाचा समावेश केला आहे ते पाहू. कारुकर्म करणारे, कारुनारू म्हणजे साधारणतः बलुतेदार व अलुतेदार हे सर्व (काही अपवाद वजा जाता) या वर्णात येतात. सुतार, लोहार, कुंभार, परीट, न्हावी, गुरव, कोळी, तेली, तांबोळी, साळी, माळी, ठाकर, वडशी, हे सर्व शास्त्रकारांच्या मते शूद्र होत. चांभार, महार, मांग, बुरुड यांचा समावेश अलुतेबलुतेदारांत होतो. तरी उत्तरकालीन स्मृतिकारांनी त्यांना अस्पृश्य ठरविले आहे. पूर्वी त्यांचा शूद्र वर्णातच समावेश होत असे. याशिवाय गुराखी, नट, रथकार, भिल्ल, यांनाही शूद्र मानलेले आहे. पण एवढ्यावर हे भागत नाही. मनुस्मृती, यमस्मृती, पराशरस्मृती, बृहत्पाराशर स्मृती, कूर्मपुराण, यांनी शेतकऱ्यांनाही शूद्र ठरविले आहे. आर्धिक, कृषीवल, अर्धसीरी, क्षेत्रकर्षक असा त्यांचा या ग्रंथांत निर्देश केलेला आहे. वेदव्यासस्मृतीमध्ये वणिक व कायस्थ यांचीही शूद्रांत गणना केलेली आहे. (स्पर्शास्पर्श विचार, पं. सातवळेकर, भाग ८ वा; अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ, पाठक, पृ. ४५–४८) प्रतिलोम संकरापासून झालेली सर्व प्रजा प्राचीन काळापासून शास्त्रकारांनी शूद्र ठरविली आहे हे प्रसिद्धच आहे. अनुलोमविवाह दीर्घकाळपर्यंत शास्त्रविहित होते; तरी पुढे पुढे मातृसावर्ण्य रूढ झाले, संतती मातेच्या वर्णाची ठरू लागली. व त्यामुळे शूद्र स्त्रियांना द्विजांपासून झालेली संततीही शूद्र ठरू लागली.

वरील यादीत वणिक आणि शेतकरी हे दोघेही आलेले आहेत. 'कृषिगोरक्ष्य-

वाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।' असे शास्त्र असताना यांना शूद्र का गणले हे सांगणे कठीण आहे. खरा चमत्कार पुढेच आहे. इ. स. पूर्व ४ थ्या शतकानंतर भारतात क्षत्रियवर्णच नाही, राजसत्ता चालविणारे सर्व लोक शूद्रच आहेत, असा एक सिद्धांत शास्त्रकारांनी मांडून ठेवलेला आहे. महानंदी हा शैशुनाग वंशातला त्या काळचा राजा. महापद्मनंद हा त्याला एका शूद्र स्त्रीपासून झालेला मुलगा. पुराणे असे सांगतात की, त्याने सत्तारूढ झाल्यावर, सर्व क्षत्रियांचा, परशुरामाप्रमाणेच संहार केला. आणि तेव्हापासून भारतात क्षत्रियच नाहीत. जे राजे आहेत ते, आपणांस क्षत्रिय म्हणवीत असले तरी, वास्तविक शूद्रच होत. विष्णुपुराण, मत्स्यपुराण व भागवतपुराण यांत हा सिद्धान्त मांडलेला आहे. आणि त्याच्या आधारे रघुनंदन (१६ वे शतक) याने आपल्या 'शुद्धितत्त्व' या ग्रंथात, कमलाकर भट्ट (१७ वे शतक) याने 'शूद्रकमलाकरात' व नागेश भट्ट (१८ वे शतक) याने 'व्रात्यताप्रायश्चितनिर्णय' या ग्रंथात 'कलियुगात ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण आहेत 'कलाववंद्यतयोः स्थितिः' असा निर्णय दिलेला आहे. (काणे, धर्मशास्त्राचा इतिहास, खंड २ रा, पृ. ३८०–८१)

कारुनारू हे शूद्र आहेतच; वणिक व कृषीवल यांना शास्त्रकारांनी शूद्र ठरविले आहे. 'नंदान्तं क्षत्रियकुलम्' या वचनान्वये सर्व क्षत्रिय शूद्र झाले. यानंतर शास्त्रकारांची दृष्टी स्त्रियांकडे वळली. व त्यांनाही त्यांनी शूद्र ठरवून जन्माचे सार्थक करून घेतले. पूर्वी स्त्रियांना वेदपठनाचा अधिकार होता. पुढे तो नाकारण्यात आला. म्हणून मग त्या शूद्र ठरल्या. 'स्त्रियो वैश्याः तथा शूद्राः' असा गीतेने स्त्रियांचा शूद्रांबरोबर केलेला उल्लेख प्रसिद्धच आहे. पण स्त्रिया, शूद्र, कुत्रे– असाही एकत्र उल्लेख अनेक शास्त्रकार करतात. (काणे, वरील ग्रंथ, पृ. ५७६ ते ५७८)

आता राहिले फक्त ब्राह्मण. शास्त्रकारांनी त्यांना शूद्र ठरविले नाही हे खरे. पण त्यांना शूद्र ठरवून टाकण्याची व्यवस्था मनूने करून टाकली आहे. मनूचे असे शास्त्र आहे की, ज्या देशात शूद्र राजा आहे त्या देशात ब्राह्मणांनी राहू नये (मनु ४·६१). अर्थात या आज्ञेचा अवमान करून ब्राह्मण शूद्र–राज्यात राहिले तर ते पतित होणार हे उघडच आहे. आता भारतात तर अडीच हजार वर्षे क्षत्रियच नाहीत. तरी ब्राह्मण येथे राहातच आहेत. तेव्हा विष्णू, मत्स्य व

भागवत या पुराणांचे कर्ते व रघुनंदन, कमलाकर व नागेश भट्ट हे सोवळे ब्राह्मण यांसकट सर्व ब्राह्मण शास्त्रान्वयेच शूद्र ठरतात. ज्या शास्त्रान्वये क्षत्रिय शूद्र ठरतात त्याच शास्त्राअन्वये ब्राह्मणही शूद्र ठरतात. आणि शिवाय सर्व स्त्रिया शूद्र ठरल्यामुळे मातृसावर्ण्याच्या नियमाप्रमाणे सर्व वर्णांच्या स्त्रियांची संतती, अर्थात ब्राह्मणही शूद्रच ठरतात !

लहरी शास्त्र :

हे शास्त्रकार अर्थातच ब्राह्मणांना शूद्र मानावयास तयार होणार नाहीत. कारण ब्राह्मण हा अत्यंत हीन असला तरी तो पूज्य होय, असे त्यांचे मत आहे. क्षत्रिय हे सर्व शूद्र होत हे मत कोणत्याच स्मृतीला मान्य नाही. दहाव्या शतकाअखेरपर्यंतचे सर्व स्मृतींचे टीकाकारही, क्षत्रियांचे धर्म काय, ते विवरून सांगतात. तेव्हा कलियुगात क्षत्रियच नाहीत, हे मत त्यांना मान्य होते, असे दिसत नाही. (काणे–धर्मशास्त्र, खंड २ रा, पृ. ३८१) तरी बाकी राहिलेली यादी काही लहान नाही. जवळजवळ सर्व बहुजन समाज त्यात समाविष्ट होतो. त्यामुळे मनात असा प्रश्न येतो की, या सर्वांना शास्त्रकारांनी शूद्र का ठरविले ? काही अमंगळ उद्योग, पापकर्मे, अभक्ष्यभक्षण, वेदत्याग, ही कारणे दिलेली आहेत. (शांतिपर्व, १८९–१) आपापल्या कर्माने अनेक लोक शूद्र होतात असे वेदव्यास-स्मृतीत म्हटले आहे. वर्णसंकरामुळे संतती शूद्र होते असे तर अनेक शास्त्रकार सांगतात. पण शास्त्रकारांच्या निरनिराळ्या सर्व उपपत्ती पाहिल्यावर तर्कशुद्ध-प्रतीतिकारक असे कोणतेच कारण त्यांतून दिसत नाही. केवळ शास्त्रकारांची लहर एवढेच एक कारण दिसते. त्यांच्या हातात शिक्के होते ते त्यांनी आपल्या लहरीप्रमाणे वाटेल त्याच्या कपाळी उठविले व त्यांच्या जाती ठरविल्या. हे मत म्हणजे संपूर्ण सत्य नव्हे, अर्धसत्य आहे, असे म. म. काणे म्हणतात (धर्म-शास्त्र, खंड २ रा; प्रकरण २ रे; पृ. ५१). पण त्यांनीच त्या प्रकरणात जी माहिती दिली आहे तीवरून, तेच संपूर्ण सत्य आहे, असे दिसून येईल.

भिन्न वर्णांच्या संकरापासून झालेल्या संततीच्या, शास्त्रकारांनी, ज्या जाती ठरविल्या आहेत त्या पाहा. अंबष्ठ ही जात ब्राह्मण आणि वैश्या (वैश्य स्त्री) यांच्या संकरापासून झाली, असे मनुस्मृतीचे मत आहे, तर ती ब्राह्मण आणि क्षत्रिया यांपासून झाली, असे वसिष्ठस्मृती म्हणते. आयोगव ही जात शूद्र व

वैश्या यांपासून झाली (औशनस) व शूद्र आणि क्षत्रिया यांपासून झाली (अग्निपुराण) अशी भिन्न मते आहेत. उग्र ही जात क्षत्रिय–शूद्रा, क्षत्रिय–वैश्या, वैश्य–शूद्रा अशा संकरांतून जन्माला आली असे मनू, वसिष्ठ व सूत-संहिता यांचे अनुक्रमे मत आहे. निषाद, पुक्कस, मागध, वैदेहक, कैवर्त यांच्याबद्दल अशीच भिन्न मते आहेत. (अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ—श्रीधरशास्त्री पाठक, पृ. १६६–१७६) ही मतभिन्नता पाहिली म्हणजे, त्या त्या जातीवर शिक्के मारताना, या शास्त्रकारांच्या मनात कोणताही युक्तिवाद नव्हता, केवळ त्यांच्या लहरीवर हे चालले होते, याबद्दल शंका राहात नाही.

या शास्त्रकारांची स्तुती करताना त्यांनी सर्व वर्णांना व जातींना योग्य ते व्यवसाय लावून दिले, हे त्यांचे बुद्धिकौशल्य म्हणून सांगण्यात येते. पण प्रत्यक्षात पाहाता त्यांनी कोठे बुद्धी वापरली असेल अशी शंकासुद्धा येत नाही. अंबष्ठ ही जात पाहा. हिच्या उत्पत्तीविषयी मतभेद आहेत हे वर सांगितलेच आहे. तसेच तिच्या व्यवसायाविषयीही आहेत. मनूने या जातीला वैद्यक हा व्यवसाय-' लावून दिला ' आहे. तर उशनाने तिला शेती, अ-नर्तन (?) किंवा ध्वज रक्षण हे धंदे सांगितले आहेत. आयोगव जातीला सुतारी हा धंदा मनूने सांगितला आहे. तर उशनाने तिला कोष्ट्याचा, शेतकऱ्याचा, तांबटाचा किंवा कापडाच्या व्यापाराचा धंदा लावून दिला आहे. एकच माणूस सुतारी, कापड-व्यापार, शेती या व्यवसायांना योग्य ठरतो याचा अर्थ काय ? या व्यवसायांना सारखेच गुण लागतात की काय ? आणि अमक्या वर्णाचा संकर झाला म्हणजे त्यातून जन्मलेल्या संततीच्या ठायी अमक्या व्यवसायाला योग्य असे गुण उपजतच येतात असे या शास्त्रकारांनी कशावरून ठरविले ? उग्र या जातीने घुशी, उंदीर पकडून उपजीविका करावी असे मनू म्हणतो तर उशना म्हणतो की तिने भालदार–चोपदार व्हावे किंवा गुन्हेगारांच्या शिक्षेची अंमलबजावणी करावी. या सर्व उद्योगांना एकाच प्रकारचे कौशल्य लागते, असे या शास्त्रकारांचे मत असले तर तो मोठा विनोदच आहे. मूर्धावसिक्त ही ब्राह्मण व क्षत्रिया यांपासून झालेली जात. तिला राजपद मिळाले तर तिने राज्य करावे, नाही तर आयुर्वेद, ज्योतिष किंवा मंत्रविद्या यांवर उपजीविका करावी, अशी शास्त्रकार सांगतात. राज्यकारभार आणि आयुर्वेद यांना सारखेच गुण लागतात असे समजणाऱ्या शास्त्रकारांचे बुद्धि-

कौशल्य काय वर्णावे ! (शास्त्रकारांच्या वरील मतासाठी—काणे धर्मशास्त्र, खंड २ रा, पृ. ७१ ते ९१ पाहा) या सर्वांवरून हे स्पष्ट दिसते की जातींच्या कपाळावर शिक्के मारताना शास्त्रकारांनी ज्याप्रमाणे केवळ स्वतःच्या लहरीने निर्णय केले, त्याचप्रमाणे त्यांना व्यवसाय लावून देतानाही स्वतःची लहर हाच त्यांचा युक्तिवाद होता. आणि अशा या फुसक्या युक्तिवादाच्या आधारे शास्त्रकारांनी बहुसंख्य हिंदूंना–शूद्रांना धर्मबाह्य ठरवावे, अज्ञानाच्या नरकात त्यांना कायमचे पिचत ठेवावे आणि हिंदूंतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांनी या शास्त्रकारांच्या वचनाला मान देऊन त्यांना शतकानुशतक दुर्गतिपंकात लोटून द्यावे यापेक्षा दुसरा आत्मघातकीपणा कोणता ?

हिंदूंची सहिष्णुता

शूद्राला या शास्त्रकारांनी धर्मबाह्य ठरविले आहे. त्याला वेदाधिकार नाही. त्याच्यादेखत इतरांनीसुद्धा वेद म्हणू नयेत, तो पशूसारखाच होय, शूद्र म्हणजे स्मशानच होय, अशी मते त्यांनी मांडली आहेत. त्यांचे धंदे ओंगळ होते म्हणून त्यांना असे हीन लेखीत, असे शास्त्रकारांनी म्हटले आहे. पण यात काही अर्थ नाही. काही जातीचे धंदे ओंगळ असतील; पण शेतकरी, माळी, सुतार, लोहार यांचे धंदे तर ओंगळ नव्हते ना ? मग त्यांना शूद्र लेखून त्यांना वेदपठण वर्ज्य का केले ? हिंदुधर्मीय लोक अत्यंत सहिष्णू अशी जगात कीर्ती आहे. खिस्ती , मुसलमान यांचा असा सिद्धान्त आहे की, येशू किंवा अल्ला यांना शरण गेलात तरच तुमचा उद्धार होईल. पण हिंदूंना तसे वाटत नाही. प्रत्येकाने आपापल्या इच्छेप्रमाणे कोणत्याही देवतेची उपासना करावी, कोणताही धर्ममार्ग अनुसरावा व आपला उद्धार करून घ्यावा, अशी हिंदूंची उदारवृत्ती आहे. यामुळेच सातवाहन, गुप्त, चालुक्य, राष्ट्रकूट इ. प्राचीन राजे स्वतः वैदिक धर्माचे अनुयायी होते तरी, त्यांनी बौद्ध, जैन यांना हिंदुधर्मीयांप्रमाणेच वागविले, त्यांच्या विहारांना, मठांना दाने दिली, जमिनी दिल्या, त्यांना धर्मस्वातंत्र्य दिले. हिंदू असे सहिष्णू आहेत हे खरेच आहे. पण ही सहिष्णुता ते परमधर्मीयांना दाखवितात ! हिंदूंना नाही. तसे नसते तर त्यांनी शूद्रांना यज्ञधर्माचा अवलंब करण्याची, वेदपठनाची मनाई का केली असती ? खिस्ती, मुस्लीम यांना आपापल्या श्रद्धेप्रमाणे बायबल-कुराणांचा

अवलंब करून सद्गती मिळविता येते, हे जसे हिंदू शास्त्रकारांना मान्य आहे, त्याचप्रमाणे शूद्रांना, अस्पृश्यांना वेदमार्गाने सद्गती प्राप्त करून घेण्याचा अधिकार आहे, हे त्यांना मान्य असावयास हरकत नव्हती. पण ते हिंदू होते व आहेत हाच त्यांचा अपराध आहे. सहिष्णू वृत्ती परक्यांच्या बाबतीत! स्वकीयांशी वागताना तिचा संबंध येतो कोठे ?

वैज्ञानिक अवडंबर :

शूद्रांना यज्ञाधिकार दिला असता, ब्राह्मणांनी त्यांना वेद शिकवून आपल्या थोर धर्माची दीक्षा त्यांना दिली असती, तर काय बिघडले असते ? अर्वाचीन ध्वनिशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायन यांच्या आधारे जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्याचे समर्थन बाळशास्त्री हरदास करीत असतात. ते म्हणतात, 'वेदमंत्रांच्या ठायी काही स्वयंभू शक्ती असते, ती विशिष्ट शब्दसंघातांतून निर्माण होते, त्या शब्द-संघातांचे योग्य उच्चार करण्याचे सामर्थ्य ब्राह्मणांच्याच कंठात असते, म्हणून त्यांना श्रेष्ठपद निसर्गतःच मिळणे योग्य होय. आणि उच्च श्रेणीच्या ध्वनि-शास्त्राला धरून केलेली त्रिवर्णात्मक समाजरचनाही योग्य होय.' बाळशास्त्री यांनी अशा तऱ्हेचे बरेच पांडित्यपूर्ण विवेचन, विज्ञानाची परिभाषा वापरून आपल्या 'वेदांतील राष्ट्रदर्शन' या ग्रंथात केले आहे. (पृ. १३७–१७९) पण भारतावर आलेल्या अनेक भयावह आपत्ती, त्याचप्रमाणे वेदकाळात, पुराणकाळात व ऐतिहासिककाळात या भूमीवर झालेली आक्रमणे व येथे घडलेले अनेक अनर्थ यांचे निवारण करण्यास ब्राह्मणांना वेदमंत्रांच्या पठनामुळे प्राप्त झालेली अलौकिक शक्ती उपयोगी पडली, असे जोपर्यंत सिद्ध होत नाही, ब्राह्मणांना व क्षत्रियांना मुत्सद्देगिरी, राजनीती, शस्त्रविद्या, बाहुबल यांचा इतर देशांतल्याप्रमाणेच या आपत्तींच्या निवारणासाठी आश्रय करावा लागला हे जोपर्यंत दिसत आहे, तोपर्यंत वैज्ञानिक भाषेतले हे सर्व अवडंबर व्यर्थच ठरणार. आणि व्यास, वसिष्ठ, अस्तिक, शौनक यांसारखे अनेक संकरज ब्राह्मण वेदमंत्रांचा योग्य उच्चार करू शकत होते हे जोपर्यंत असिद्ध होत नाही तोपर्यंत जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याचे समर्थन हास्यास्पदच ठरणार !

संकर हितावह :

शूद्रांच्या वेदाधिकाराप्रमाणेच पूर्वी होत असलेल्या अनुलोम-प्रतिलोम विवाहा-

विषयीही प्रश्न उद्‌भवतो. हे विवाह चालू ठेवले असते तर हिंदू समाजावर कोणते संकट कोसळले असते ? अलीकडे असा एक युक्तिवाद करण्यात येतो की, पूर्वी असे विवाह चालू होते पण त्यांचे वाईट परिणाम पाहूनच पुढील शास्त्रकारांनी ते निषिद्ध मानले. पण प्रश्न असा येतो की, असे कोणते वाईट परिणाम या शास्त्रकारांना दिसून आले ? त्यांच्या या शास्त्रनियमांचे समर्थन करणाऱ्या अर्वाचीन विद्वानांनी तरी,त्या मिश्रविवाहांमुळे कोणते वाईट परिणाम झाले,तें सांगितले आहे काय ? मुळीच नाही. हे अर्वाचीन पंडित तरी इतिहास पाहू शकत होते ना ? मग त्यांनी कोणत्या इतिहासाच्या आधारे या वेटीबंदीचे समर्थन केले ? इतिहासकाळातला अखिल भारताचा पहिला साम्राट चंद्रगुप्त मौर्य हा शूद्र होता. सम्राट अशोक हा त्याचा नातू अर्थातच शूद्र होता. दक्षिणेत प्रथमच साम्राज्य स्थापन करणारे सातवाहन घराणे शूद्र होते. ही मते पुराणांनीच मांडली आहेत. इतिहासपूर्वकाळातील आविक्षित मरुत्त हा शंभर अश्वमेध करणारा महाराजा शूद्र होता. पुराणे ज्या काळात लिहिली जात होती त्या काळात गुप्तसाम्राज्य विस्तारत होते. गुप्त हे वैश्य होते. पण त्यांचा पहिला सम्राट चंद्रगुप्त याने लिच्छवी या क्षत्रिय घराण्यातील राजकन्येशी लग्न केले होते. म्हणजे हा प्रतिलोम विवाह होय. भारताचा नेपोलियन म्हणून ज्याची कीर्ती आहे तो सम्राट समुद्रगुप्त हा प्रतिलोम-विवहाहातूनच जन्मला होता. या घराण्यात कदंब या ब्राह्मण राजघराण्यातील कन्याही दिल्या होत्या. म्हणजे आणखी प्रतिलोम. शास्त्रकारांच्या मते सर्व प्रतिलोमसंतती ही शूद्र होय. अर्वाचीन पंडित म्हणतात त्याप्रमाणे, चांगले वाईट परिणाम पाहून, शास्त्रकारांनी आपले शास्त्र लिहिले असते, तर असल्या विवाहाचा त्यांनी पुरस्कारच केला असता. पण देश काल बघून परिस्थिती अभ्यासून, प्रत्यक्ष अवलोकन करून बुद्धीच्या, तर्काच्या आश्रयाने निर्णय करण्याची ऐपतच या शास्त्रकारांच्या ठायी नव्हती. त्यांच्या कोणत्याही ग्रंथात तर्कनिष्ठ कारणे कोणत्याही प्रसंगी दिलेली नाहीत. असे केल्याने सर्व कुळ नरकात जाईल, पुढील जन्मी ते लोक कृमिकीटक होतील, अनंत जन्म या पापाचे प्रायश्चित्त भोगावे लागेल, अशीच कारणे ते देतात. पूर्वकाळी विदुर व धर्मव्याध हे दोघे शूद्र असून मोठे धर्मवेत्ते होते, म्हणून शूद्रांना धर्माधिकार आहे, असे कोणी म्हणेल. त्यावर या शास्त्रकारांचे उत्तर असे आहे, की पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळे त्यांना हे सामर्थ्य प्राप्त झाले होते म्हणून

सर्व शूद्रांना तसे होणार नाही. पण पुढील काळातील शूद्रांना पूर्वजन्मीची पुण्याई नव्हती हे या शास्त्रकारांनी कसे ठरविले ? पण असा प्रश्न विचारणे हेच चूक आहे. कोणत्याही सुसंगत युक्तिवादावर त्यांचे शास्त्र उभारलेलेच नाही. त्यांना तसे उभारण्याचे सामर्थ्यच नव्हते. ज्यांना तशी ऐपत होती त्यांनी अगदी रोख व्यवहार पाहून, प्रत्यक्ष अवलोकन करून, आपले धर्मशास्त्र रचले होते. त्यामुळे शूद्र राजा होण्यास हरकत नाही, शूद्राला मंत्रिपद देण्यास हरकत नाही, चारित्र्यावरून वर्ण ठरवावा, अशा तऱ्हेचे निर्णय त्यांनी दिले होते. त्यांच्या त्या धर्मशास्त्राचे सविस्तर विवेचन गेल्या लेखात केलेच आहे. येथे आपण त्याच्याविरुद्ध असलेल्या दुसऱ्या विचारप्रवाहाचा, अगदी भिन्न अशा तत्त्वप्रणालींचा, धर्मशास्त्राचा विचार करीत आहो. शूद्रांना धर्मबाह्य लेखून कायमचे पतित मानून एक बहुसंख्य मानवसमूह जीवनातून उठविण्याचे कार्य त्या धर्मशास्त्राने केले आहे. ते एवढेच करून थांबले नाही. हिंदुसमाजाच्या चिरफळ्या करण्याचे धोरण आणखी पुढे नेऊन, त्यांनी शूद्रांतून काही जाती तोडून काढून, त्यांना पूर्ण अस्पृश्य करून टाकले. आज भारतात ७–८ कोटी अस्पृश्य आहेत. यावरून केवढ्या मोठ्या मानवसमूहाची या धर्मशास्त्राने हत्या केली आहे हे ध्यानात येईल.

अस्पृश्यता अशास्त्रीय :

पं. सातवळेकर, श्रीधरशास्त्री पाठक, म म. काणे या पंडितांचे असे निश्चित मत आहे की, पूर्वकाळी आजच्यासारखी अस्पृश्यता मुळीच नव्हती. काणे म्हणतात की, वेदबाह्यात चर्मकार, चांडाळ, पौल्कस ही नावे आहेत. पण या जाती अस्पृश्य आहेत, असा कोठेही निर्देश नाही. आरंभीच्या काही स्मृती चारच वर्ण मानतात. मनूच्या मते पाचवा वर्णच अस्तित्वात नाही. याचा अर्थ असा की, त्या काळी आजच्या अस्पृश्यांची गणना शूद्र वर्णातच होत असे. आणि शूद्राच्या हातचे अन्न खाण्यास सुद्धा इ. सनाच्या ८ व्या ९ व्या शतकापर्यंत शास्त्रकारांची हरकत नव्हती. वरील तीनही पंडितांच्या मते, जन्मजात अस्पृश्यता हिंदुधर्मशास्त्रात फक्त एका चांडाळाच्या बाबतीत सांगितलेली आहे. ब्राह्मण स्त्री व शूद्र पुरुष यांचे अपत्य म्हणजे चांडाळ. तोच फक्त जन्माने अस्पृश्य. श्रीधरशास्त्री पाठक म्हणतात, ही अस्पृश्यता

फक्त त्या व्यक्तीपुरती आहे. चांडाळ म्हणून जी जात आहे ती यामुळे अस्पृश्य ठरत नाही. शूद्रब्राह्मणी या संकरातून झालेली अपत्ये यांना लावलेला चांडाळ शब्द पारिभाषिक आहे, तो जातीचा वाचक नाही. चांडाळ जाती ही शूद्र आहे. म्हणून ती स्पृश्यच आहे. वरील पारिभाषिक चांडाळ हे मात्र खरे जन्माजात अस्पृश्य. इतर काही अस्पृश्य शास्त्रात सांगितले आहेत ते जन्मजात नव्हेत. ते केवळ त्यांच्या हीन व्यवसायामुळे अस्पृश्य झालेले असतात. आणि तेही तेवढ्या वेळापुरतेच. त्यातून ते मोकळे झाले, स्वच्छ झाले की ते स्पृश्य होतात. पारिभाषिक चांडाळ सोडले तर, इतरांच्या बाबतीत जी अस्पृश्यता मानली जाते ती, उत्तरकालीन रूढीमुळे आलेली आहे. तिला शास्त्राधार नाही. रूढिवादी लोकांनी आपल्या लहरीप्रमाणे हा कडकपणा अवलंबिलेला आहे. (अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ, भाग ४ था व ५ वा.) अस्पृश्यता पूर्वी नव्हती, अस्पृश्यांच्या दर्शनाने द्विज अपवित्र होतात, त्यांच्या सावलीनेही विटाळ होतो असले मूर्ख दण्डक मनुयाज्ञवल्क्यांच्या स्वप्नांतही नव्हते. १० व्या शतकात झालेल्या मेधातिथीनेही असेच मत मांडले आहे. त्यानंतरच्या काळात सर्वच जातिबंधने कडक होऊ लागली. दूरीकरणाची, भेदाची प्रवृत्ती वाढत चालली आणि त्यानंतर अस्पृश्यता निर्माण झाली. (म. म. काणे, धर्मशास्त्र, खंड २ रा, प्रकरण ४ थे) या बाबतीत काणे यांनी व्याघ्रपाद, बृहस्पती, अपरार्क, कुल्लूक यांचा निर्देश केला आहे. आपल्या टीकांमधून त्यांनी अस्पृश्यतेचे शास्त्र सांगितले आहे. पण पूर्वपरंपरेला ते मुळीच मान्य नव्हते.

समाजपराङ्मुख :

या शास्त्रकारांचे हे शास्त्र पाहिले की, वस्तुस्थिती पाहून, परिस्थितीचा अभ्यास करून समाजाच्या उत्कर्षापकर्षाकडे सतत लक्ष ठेवून, धर्मनियम सांगावयाचे असतात, हे प्राचीन ऋषींचे थोर तत्त्व जाणण्यास हे शास्त्रकार असमर्थ होते, हे स्पष्ट दिसून येते; आणि हेच उत्तरकाळच्या हिंदुसमाजाचे मोठे दुखणे आहे. धर्मामुळे अर्थकामही प्राप्त करून घ्यावयाचे असतात, धर्म हा लोकांच्या प्रभवासाठी, अभ्युदयासाठी असतो, ही दृष्टीच पुढल्या काळी नष्ट झाली. आणि शास्त्रकारांनी धर्म अदृष्टफल करून टाकला. अमका शास्त्रनियम योग्य की अयोग्य हे तपासून पाहण्याचा निकष पारलौकिक कल्याण हा झाला. ते कल्याण किती झाले, झाले

की नाही, अकल्याणच झाले की काय, हे पाहण्याचे काहीच साधन उपलब्ध नसल्यामुळे, स्मृतिकारांची लहर एवढेच धर्माला प्रमाण राहिले आणि हिंदु-समाजाचा अधःपात झाला. प्राचीनकाळी व्यवहार, परिस्थिती पाहून, अनुभव, बुद्धी, तर्क यांच्या आधारे शास्त्रनिर्णय करण्याची पद्धत होती, हे आपण विसरता कामा नये.

तस्मात् कौन्तेय विदुषा धर्माधर्मविनिश्चये
बुद्धिमास्थाय लोकेस्मिन् वर्तितव्यं कृतात्मना ॥

हे अर्जुना, म्हणून विद्वानाने या जगात बुद्धीचा अवलंब करून धर्माधर्माचा निश्चय करावा व त्याप्रमाणे वागावे. (शांति, १४१–१०२)

केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यो विनिर्णयः ।
युक्तिहीने विचारे तु धर्महानिः प्रजायते ॥

केवळ शास्त्राचा आश्रय करून धर्मनिर्णय करू नये. तर्कहीन विचार केला असता धर्महानी होते. (पाराशरमाधवीये–बृहस्पतिः)

देशकालौ तु संप्रेक्ष्य बलाबलमथात्मनः ।
नादेशकाले किंचित् स्यात् देशकालौ प्रतीक्षताम्
(वनपर्व २८–३२)

परिस्थिती व आपले बलाबल पाहूनच कोणताही निर्णय करावा.

अशा तऱ्हेची शेकडो वचने प्राचीन धर्मग्रंथांत सापडतात. महाभारत, रामायण, कौटिल्याचे अर्थशास्त्र, नारदस्मृती असे काही व्यवहारवादी, वास्तवादी, बुद्धिवादी ग्रंथ त्या काळात होऊन गेले. साधारणपणे इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत झालेल्या स्मृतींतही, अनेक ठिकाणी अशी समाजाभिमुख दृष्टी असल्याचे, दिसून येते. पुढे या दृष्टीचा लोप झाला आणि मग रघुनंदन, कमलाकर भट्ट यासारखे देशकाल न पाहणारे, समाजपराङ्मुख, विवेकहीन, मूढ शास्त्रकार निपजू लागले. आपल्या या शास्त्राने बहुजनसमाज व एक मोठा राज्यकर्ता वर्ग किती दुखावेल, त्यामुळे हिंदू समाज किती विघटित होईल, एक वर्ण दुसऱ्या वर्णापासून असा तोडून काढण्यात आपण केवढे घोर पातक करीत आहो, याचा विचारही या पंडितांच्या मनाला शिवला नाही. यावरून उत्तर काळचे हे शास्त्रकार किती वेजबाबदार होते व यांच्यामुळेच धर्महानी होऊन हिंदुसमाज शतधा कसा भग्न झाला याची कल्पना येईल.

आणखी पोटभेद :

धर्म अदृष्टफल झाला, धर्मशास्त्राचे नियम हितकारक की घातक हे ठरविण्याचे ऐहिक निकष अमान्य झाले, धर्माधर्माची फले परलोकात मिळतील, पुढल्या जन्मी मिळतील असे शास्त्रकार सांगू लागले की, समाजाचा अधःपात होतो. कारण कोणीही काहीही शास्त्र सांगावे ! इतिहास, अनुभव, तर्क, प्रत्यक्ष व्यवहार अशापैकी ते तपासून पाहण्यास काहीच साधन नाही; त्यामुळे भोळा समाज अदृष्टाच्या भीतीने ते मानू लागतो. सहाव्या सातव्या शतकानंतर स्मृतींनी मिश्रविवाह, आणि सर्व वर्णांचा एकत्र अन्नपानव्यवहार निषिद्ध ठरविला आणि समाजही ते मानू लागला व त्यामुळे हिंदू समाजाची विघटना होऊ लागली. आणि ही विघटनेची वृत्ती पुढे, शास्त्रकारांच्या मूढतेमुळे, बळावतच गेली. अनुलोम विवाह पूर्वी शास्त्रविहित होते आणि व्यवहारातही ते घडून येते होते. पण हळूहळू शास्त्रकार त्याचा निषेध करू लागले. आणि हिंदुसमाजाचे भिन्न वर्ण एकमेकांपासून दूर जाऊ लागले. पुढल्या काळात या समाजाच्या आणखी चिरफळ्या होऊ लागल्या. आतापर्यंत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चारच वर्ण होते. यांच्या संकरातून निर्माण झालेली संतती कधी पित्याच्या वर्णाची तर कधी मातेच्या वर्णाची ठरे. किंवा वर सांगितल्याप्रमाणे या संततीची शास्त्रकार वेगळीच जात मानीत. पण अजून या चार वर्णांत पोटवर्ण किंवा पोटजाती झाल्या नव्हत्या. अखिल भारतातील ब्राह्मण किंवा क्षत्रिय किंवा वैश्य यांचा एकच वर्ण असे. त्यांच्यांत आणखी पोटभेद नव्हते. पण अकराव्या शतकापासून ब्राह्मणांत पंचगौड व पंचद्रविड हे भेद होऊ लागले आणि मग एका प्रांतातही कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, देवरुखे, सहवासी, पळशे अशा पोटजाती निर्माण झाल्या. आणि याचप्रमाणे क्षत्रिय व वैश्य या वर्णांचीही शकले झाली. अर्थात पोटजातीबरोबर उच्चनीचतेचा दुरभिमान निर्माण होऊन समाज छिन्नभिन्न होऊ लागला. डॉ. आळतेकर म्हणतात, अत्रिसंहितेसारख्या स्मृती, या प्रांतातले ब्राह्मण हीन, त्या प्रांतातले श्रेष्ठ, असे सांगून या विघटक वृत्तीचे पोषणच करीत राहिल्या. त्याचा हळूहळू परिणाम होऊन पुढल्या काळात प्रांतभेद बळावले व समाज विदीर्ण झाला. (राष्ट्रकूट अँड देअर टाइम्स, पृ. ३३५) कुलगुरू चिं. वि. वैद्य यांनी आपल्या मध्ययुगीन

इतिहासाच्या प्रत्येक खंडात हेच मत मांडले आहे. त्यांच्या मते सातव्या शतकात हर्षाच्या काळी जातिनिर्बंध बरेच सैल होते. पुढच्या काळात ते कडक होत गेले. त्यामुळे अनुलोम विवाह हळूहळू बंद होत गेले. आणि नंतर ब्राह्मण क्षत्रिय-वैश्यांतही पोटभेद निर्माण होऊन समाज फुट्ट लागला. (भाग १ ला – पृ. ७८ ते ९६; भाग २ रा, पृ. ३१३– ३२१, ३९१–९२; भाग ३, ५३२-५५०) 'आमच्या मते या सुमारास जातिबंधने अधिक दृढ झाली, हे हिंदूंच्या अधःपाताचे कारण आहे.' असे आपले स्पष्ट मत शेवटच्या भागात त्यांनी दिले आहे.

आंतरवर्णीय विवाह बंद झाले, जातींच्या पोटजाती झाल्या. त्याचप्रमाणे सर्व वर्णांचा एकत्र अन्नपानव्यवहार, जो पूर्वी शास्त्रविहित होता तोही, या सुमारास बंद झाला व समाजाच्या भिन्न घटकांमधील द्वेष वाढू लागला. गौतम, आपस्तंब, बौद्धायन या धर्मसूत्रकारांना सहभोजन पूर्ण मान्य होते. पण आठव्या नवव्या शतकातील स्मृतिकार अंगिरस, व्यास, यम यांनी हे निषिद्ध ठरविले. शूद्राचे अन्न तर यांनी ब्राह्मणाला वर्ज्य ठरविलेच,पण क्षत्रिय वैश्यांचेही कहंशी वर्ज्य ठरवून जातीजातीत पाचरी ठोकण्याचे काम पुरे केले. (डॉ. आळतेकर, राष्ट्रकूट, पृ. ३३८) इ. स. ८०० ते १००० या कालाविषयी लिहिताना कुलगुरू वैद्य म्हणतात, या कालातील विशेष लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे सर्व वर्णांच्या लोकांचा होणारा एकत्र अन्नपानादी व्यवहार. अनुलोम विवाहाप्रमाणेच एकत्र भोजनाच्या प्रघाताने समाजात एकजीवपणा व जोम उत्पन्न होई यात शंका नाही. (भाग २ रा, पृ. ३२९) पुढील काळात मात्र अन्नपानादिकांविषयी जास्त कडक निर्बंध घालण्यात येऊ लागले. ब्राह्मण आपल्याला जास्त शुचिर्भूत समजू लागले, क्षत्रियांकडून पाणी घेणे हेही त्यांना वर्ज्य झाले. यामुळे जातीजातीतला स्नेहभाव कमी होत गेला यात आश्चर्य नाही. (कित्ता, पृ. ३९१–९६) याच प्रकाराचे विचार म. म. काणे, पं. सातवळेकर, तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे यांनी व्यक्त केल्याचे मागे सांगितलेच आहे.

आंतरवर्णीय विवाह व अन्नपानव्यवहार हे निषिद्ध ठरवून उत्तरकालीन शास्त्रकारांनी हिंदु समाजातील भिन्न घटकांना परस्परांपासून तोडून काढले. त्याचाच परिपाक होऊन एका वर्णात पोटजाती निर्माण होऊन आणखी शकले झाली. एवढ्याने हा समाज पुरेसा विघटित होणार नाही अशी चिंता वाटूनच

की काय याच सुमारास भिन्न भिन्न देवतांच्या अभिमान्यांनी शैव, वैष्णव, शाक्त असे परस्पर व्यवच्छेदक पंथ स्थापून विघटनेचे कार्य पुरे केले. हिंदुधर्म सहिष्णू आहे अशी त्यांची पुरातन काळापासून कीर्ती आहे. पुराणात शिवविष्णू एकरूप आहेत, सर्व देवता एकाच परमेश्वराच्या मूर्ती आहेत असे अट्टाहासाने सांगितल्याचे वर आलेच आहे. वेद, गीता यांचे हेच संग्राहक धोरण होते हे प्रसिद्धच आहे. पण इसवी सनाच्या आठव्या नवव्या शतकापासून काही धर्मधुरीणांची बुद्धी फिरली आणि हिंदुधर्माचे उदार, संग्राहक रूप त्यांना पहावेनासे झाले. आणि त्यांनी पंथभेद माजविण्यास प्रारंभ केला. आपल्या सर्वच धर्मग्रंथांत उत्तरकालीन लोकांनी सारखी भर घातली आहे हे मागल्या लेखात सांगितलेच आहे. शैव, वैष्णव इत्यादी पंथांत विद्वेष माजविणारी, त्यांच्यात वैरभाव चेतविणारी वचने याच पद्धतीने कोणी तरी मागून घातल्याचे स्पष्ट दिसते. अर्थात हा प्रक्षेप कोणी व केव्हा केला हे सांगण्यास कोणतेच प्रमाण उपलब्ध नाही; पण पूर्वीच्या विचारांशी सर्वस्वी विसंगत असे हे प्रक्षेप आहेत त्यामुळे असे म्हणणे युक्त वाटते. किंवा एकाच वेळी दोन्ही विचारप्रवाह चालू होते, समाजपोषक विचारांचे पूर्वी प्राबल्य होते व उत्तरकाळी त्यांचा प्रभाव कमी होऊन घातक तत्त्वज्ञानाची सरशी झाली असे तरी मानले पाहिजे. विघातक विचार केव्हा सांगितले याला महत्त्व कमी. ते प्रभावी केव्हापासून झाले हे पाहण्याला महत्त्व जास्त.

वराहपुराण, व मत्स्य, वायू, भागवत, पद्म ही पुराणे यांत शैवसिद्धांतांची निरर्ग लनिंदा केलेली आहे. जो वैष्णव नाही तो नास्तिक, लोकांनी विष्णूखेरीज अन्य देवतांची उपासना करू नये, त्यांना नमस्कार करू नये, त्यांच्या देवळांतसुद्धा जाऊ नये असा उपदेश बुद्धहारीतस्मृतीने केला आहे. न्याय, वैशेषिक, सांख्य ही दर्शने व पाशुपतासारखी पंथतत्त्वे ही या पुराणांनी वेदबाह्य व तामस ठरवून त्यांच्या स्मरणानेसुद्धा मनुष्य पतित होतो असे सांगितले आहे. या पुराणकारांच्या पुढे एक अडचण होती. काही पुराणांत विष्णूच्या तोंडीच शिवाची स्तुती आहे. मग शैवमत निंद्य कसे ठरणार? पण यावर त्यांनी एक क्लृप्ती लढविली. त्यांनी पुराणातच असे लिहून ठेविले की स्वतः विष्णूनेच शिवाला विनंती केली, की तुम्ही लोकांना वाममार्गाला नेण्यासाठी असे वेदबाह्य शास्त्र रचा. त्याप्रमाणे शिवाने केले. तेव्हा ही शैव शास्त्रे वेदबाह्यच होत. मत्स्य,

वायू इत्यादी पुराणांत बौद्ध, जैन ही शास्त्रे विष्णूने स्वतःच लोकांना मोह पाडण्यासाठी सांगितली, असेही म्हटले आहे. (काणे, धर्मशास्त्र, ५ वा खंड, पृ. ९७४–७६) मनुष्याने एकदा बुद्धिवाद सोडला, ग्रंथाला प्रमाण मानून त्याचे बंधन मानण्याचा शास्त्रकारांनी दण्डक घातला म्हणजे मनुष्याचा किती अधःपात होतो हे यावरून दिसून येईल. इतर पंथांच्या निंदेची स्वतःची हौस भागविण्यासाठी या पुराणकारांनी शिव, विष्णू यांचेच बळी देऊन टाकले, आपले अधम विचार त्यांच्या तोंडी घालून दिले. अर्थात त्यामुळे या पुराणकारांना इष्ट तो अनर्थ लवकरच घडून आला. हे भिन्न पंथ परस्परांचे वैरी झाले व हिंदुसमाज आणखी भग्न झाला.

रामानुज (इ. स. १०१६) हे वैष्णवपंथी होते. एका चोळराजाने त्यांचा अनन्वित छळ केला. कुलोत्तुंग या चोळ राजाने (इ. स. ११३३–५०) शैवमताभिमानामुळे गोविंदांची मूर्ती समुद्रात फेकून दिली. आणि शिव-विष्णू यांची एक मूर्ती असलेले देऊळ पाडून टाकले. तिरुक्कदाईयूर येथे ११६० साली धर्मधुरीणांची महासभा भरली होती. तिने शिवमंदिराच्या पुजाऱ्यांना एक ठराव करून बजावले की तुम्ही वैष्णवांत मिसळला तर तुमची मालमत्ता जप्त करण्यात येईल. याच्या आधीचा चोळ राजा राजराज (इ. स. ९८५–१०१४) व त्याची बहीण कुंदवई यांनी शिव, विष्णू, जिन यांची मंदिरे स्वतः बांधली होती. पण ती सहिष्णू वृत्ती आता नष्ट झाली. यानंतर वैरभाव नष्ट करण्याचे अनेकांनी प्रयत्न केले. पण एकदा दोन पंथातील स्नेहभाव संपला तो संपला आणि विघटना होऊन समाजाचा अधःपात झाला. (प्रा. नीळकंठशास्त्री, दि चोलाज्, खंड २ रा, भाग १ ला, पृ. ४८८–९०) बौद्धधर्म या सुमारास भारतातून लुप्त झाला होता. पण जैनधर्म पुष्कळच प्रभावी होता. पण इतके दिवस त्याच्याबद्दल सहिष्णू वृत्ती होती. ती आता नष्ट झाली व सनातन वैदिक धर्म, वीरशैव आणि जैन यांच्यांत नित्य संघर्ष होण्यास प्रारंभ होऊन भारतात आतापर्यंत असलेले धर्मैक्य नष्ट झाले. कुलगुरू चिं. वि. वैद्य यांनी याचे सविस्तर विवेचन केले आहे. ते म्हणतात, या कालविभागात (इ. स. १००० ते १२००, हिंदुधर्मात भिन्न भिन्न द्वेष करणारी मते प्रबळ झाली आणि मजबूत राष्ट्राचे जे एक मुख्य लक्षण धर्मैक्य ते नाश पावून हिंदुस्थान दुर्बल झाले. (मध्ययुगीन भारत, भाग ३ रा, पृ. ५८५–६२२)

पण हिंदुसमाजाच्या एकरूपतेचा, धर्मैक्याचा खरा भंग झाला, तो मुस्लीम आक्रमणामुळे. मुस्लीम आक्रमकांनी मृत्युदंड दाखवून हजारो, लाखो लोकांना–हिंदूंना–सक्तीने बाटविले. प्रारंभी या आपत्तीच्या बाबतीत धर्मधुरीण जागृत होते. इ. स. ७१२ साली महंमद कासीम याने सिंध प्रांतावर स्वारी केली आणि नंतर हजारो हिंदूंना बाटविले. पण लगेच ८–१० वर्षांनी देवल ऋषींनी नवी स्मृती रचून यांच्या शुद्धीकरण्याची व्यवस्था केली आणि एका महान आपत्तीचे निवारण केले. पण पुढील मूढ शास्त्रकारांना हा सुविचार मानवला नाही. 'कलिवर्ज्य' नामक एक प्रकरण (शास्त्रग्रंथ) रचून त्यांनी पतितपरावर्तन निषिद्ध मानले. आणि एकदा बाटला तो कायमचा बाटला असे ठरून एक प्रचंड हिंदुसमूह मूळ धर्मापासून तुटून निघाला; एवढेच नव्हे तर या हिंदुसमाजाचा कायमचा हाडवैरी बनून त्याच्या उच्छेदाचे कंकण त्याने हाती बांधले. वास्तविक मनूच्या मते सक्तीचे धर्मांतर हे धर्मांतरच नव्हे. (सर्वान् बलकृतान् अर्थान् अकृतान् मनुरब्रवीत् – मनु. ८. १६८) खुषीने धर्मांतर केले असले आणि मग पश्चात्ताप झाला तरी अल्प प्रायश्चित्ताने शुद्धी होते असे याज्ञवल्क्य, कश्यप, विष्णू इत्यादी शास्त्रकारांनी सांगितले आहे. जे मूळचे अहिंदू त्यांनाही चातुर्वर्ण्यात समाविष्ट करून घ्यावे, असे महाभारत, हरिवंश यांत उपदेशिले आहे. पण पुढे पावित्र्याच्या कल्पना फारच उंचावल्या आणि हा विवेक सुटला. (हिंदूंच्या अवनतीची मीमांसा–कोकजे, प्रकरण ७ वे.) आणि हिंदुधर्मातून गेलेला मनुष्य कायमचा पिढ्यान् पिढ्या, शतकानुशतक मुस्लिमच कसा राहील याची चिंता हिंदू शास्त्रकार वाहू लागले.

मुस्लीम झालेले कायम मुस्लीम कसे राहतील एवढीच चिंता करून हिंदू मानवसमूह थांबत नाही. हिंदू असलेल्यांना बाहेर लोटून मुसलमान कसे करता येईल याचीही चिंता हिंदुधर्मीय वाहतात. आचार्य क्षितिमोहन सेन यांनी याचे बंगालमधील एक उदाहरण दिले आहे. ते वाचून कोणाही हिंदूला उद्वेगच येईल. बंगालमधील टिपरा जिल्ह्यात माहीमाल मुसलमान नामक एक समाज आहे. ते लोक मूळचे हिंदू कैवर्त-कोळी होते. एकदा शेजारच्या गावी कॉलरा सुरू होऊन त्यात तेथील सर्व मुस्लीम लोक बळी पडले. फक्त एक लहान मुलगा वाचला. त्याला या कैवर्तातील एका गृहस्थाने आपल्या घरी वाढविले. काही वर्षांनी भोवतालच्या हिंदू समाजाने त्या मुलाचा दीर्घ संसर्ग घडल्यामुळे या सर्व

कैवर्तांवर बहिष्कार घातला. त्यांनी अनेक वेळा हिंदूंची करुणा भाकली, पण व्यर्थ. त्यामुळे ते लोक अगतिक होऊन शेवटी मुसलमान झाले. आता ते कडवे मुसलमान बनले आहेत. राजस्थानातील मलकाना रजपुतांची हकीगत अशीच आहे. देश, गोब्राह्मण यासाठी शौर्याने लढणारा हा समाज! एकदा यांच्या गावच्या तळ्यात मुस्लीमांनी गोमांस टाकले अशी अफवा उठली. हिंदू लोक अत्यंत 'पवित्र!' त्यांना हा भ्रष्टाकार कसा सहन होणार? त्यांनी या सर्व रजपुतांना मुस्लीम धर्मात लोटून आपल्या पावित्र्याचे रक्षण केले. (संस्कृतिसंगम– पृ. १०३) या पावित्र्यकल्पनेपायीच हिंदुसमाज छिन्नभिन्न झाला, असा सिद्धान्त तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे यांनी आपल्या 'हिंदूंच्या अवनतीची मीमांसा' या ग्रंथात मांडला आहे व अनेक प्रमाणे देऊन तो सिद्ध केला आहे. पावित्र्याच्या या कल्पनेने हिंदुसमाजाला जोपर्यंत झपाटले आहे तोपर्यंत त्याची संघटना होणे दुर्घट आहे.

अशा या विकृत धर्मबुद्धीमुळे या हिंदुसमाजाला संघटनात्त्व असे राहिलेच नाही. राष्ट्रभावना पूर्वी उदित झाली होती हे मागे सांगितले आहे. पण कोणत्याहि समाजपोषक भावनेचा ग्रंथ, प्रवचने, कीर्तने यांनी सतत परिपोष करावा लागतो. तो तर पुढल्या काळात झाला नाहीच. उलट वर सांगितल्याप्रमाणे तिला सुरुंग लावण्यातच उत्तरकाळचे शास्त्रकार धन्यता मानीत होते. धर्म ही समाजसंघटक अशी दुसरी शक्ती होय. पण त्या दृष्टीने भारतात धर्माचा संपूर्ण लोपच झाला होता असे वरील विवेचनावरून दिसून येईल. सर्व समाजाला बद्ध करील असा एकच आचार, विचार, संस्कार हिंदुमानवसमूहात असताच कामा नये अशी शास्त्रकारांची प्रतिज्ञाच होती. एक आचारविचार हे कलियुगातील अधःपाताचे लक्षण म्हणून त्यांनी सांगितले आहे. एक आचारविचार नाही आणि एका वर्णाला आपल्याच धर्मातील दुसऱ्या वर्णीयाची सावलीही खपत नाही, इतका बंधुभाव हिंदुधर्मात होता. अशा स्थितीत संघटना होणार कशी आणि टिकणार कशी? त्यात आणखी या काळात निवृत्तिवादाची, मायावादाची, भर पडली. त्यामुळे हिंदूधर्म हा समाजधर्म असा राहिलाच नाही. तो संपूर्ण व्यक्तिधर्म झाला. आणि एक हिंदू दुसऱ्या हिंदूचा कोणी नाही अशी स्थिती निर्माण झाली. राजधर्म हा सर्व धर्मांत श्रेष्ठ असा महाभारतकारांचा सिद्धान्त आहे. तो आता दृष्टिआड झाला आणि वैयक्तिक स्वर्गमोक्ष, व्रते, उपासतापास,

सोवळेओवळे हाच धर्म झाला. सर्व समाजाला मिळून काही करावयाचे आहे, साधावयाचे आहे ही भावना या मानवसमूहातून नष्ट झाली.

कलिवर्ज्य :

विषमता, भेदवृत्ती, दूरीभाव, विघटना यांजी बीजे जरी आपल्या धर्मशास्त्रात प्राचीन काळापासून होती तरी त्यांचा परिपोष इ. स. ९ व्या १० व्या शतकांतील धर्मशास्त्रामुळे विशेष झाला. आणि अकराव्या शतकात रचल्या गेलेल्या कलिवर्ज्य प्रकरणामुळे त्या विषारी रोपट्याचा पूर्ण विषवृक्ष झाला व तेथूनच विषमतेचे विष अंगी भिनून हिंदुसमाजाचा झपाट्याने अधःपात होऊ लागला. कलिवर्ज्य प्रकरण हे उत्तरकाळाच्या विघातक धर्मशास्त्रांपैकी एक महत्त्वाचे प्रकरण असल्यामुळे त्याची थोडक्यात कल्पना देणे अवश्य आहे. त्यावाचून या विवेचनला सांगता येणार नाही.

'कलिवर्ज्य' ही स्मृती नाही. अनेक पुराणे व स्मृती यांतील वचने एकत्र करून हे स्मृतिवजा तयार केलेले धर्मशास्त्र आहे. मागील धर्मशास्त्रकारांनी अनेक धर्मनियम सांगितले होते. यांतील कलिवर्ज्याच्या कर्त्याला जे नापसंत होते ते त्याने एकत्र केले व मागल्या थोर शास्त्रकारांनी हे नियम सांगितले असले, तरी ते कलियुगात लागू नाहीत, असे बेधडक सांगून टाकले. वास्तविक कलियुगकल्पनाच मागल्या शास्त्रकारांना मान्य नव्हती. त्यांच्या मनातही ती नव्हती. शिवाय, आमचे शास्त्र आम्ही आमक्या युगासाठी सांगितले आहे, असे त्यांनी कोठेही म्हटलेले नाही. सर्व हिंदुसमाज त्यांना त्रिकालदर्शी मानतो. तसे मानले नाही तर मनुयाज्ञवल्क्यांना आज प्रतिष्ठाच राहणार नाही. तरी या ग्रंथकाराने त्यांची अनेक शासने कलिवर्ज्यात घातली; आणि मागल्या स्मृतिकारांना त्रिकालदर्शी मानणाऱ्या हिंदुसमाजाने व त्या काळच्या शास्त्रकारांनी त्याचे हे कलिवर्ज्य स्वीकारले. हा कलिवर्ज्यकार इतका धीट की, पराशराने केवळ कलियुगासाठीच आपली स्मृती आहे, असे सांगितलेले असताना त्याचीही अनेक वचने त्याने कलिवर्ज्यात ढकलली आहेत. मागील शास्त्रकारांप्रमाणेच पराशरानेही शूद्रासमवेत केलेला अन्नव्यवहार विहित ठरविला आहे, विधवाविवाहास मान्यता दिली आहे. कलिवर्ज्याने ही दोन्ही शासने अविहित ठरविली. पतितांची शुद्धी प्राचीनांना मान्य होती. तीही

वस्तु संग्रहालय, ठाणे. निर्लेख
क्रमांक ८०५/८६६... दि: ...
कालावधी ३०/१०/... ते दि: २९/३/...

त्याने कलिवर्ज्य ठरविली. आणि सर्वांत अनर्थकारक म्हणजे त्याने केलेला व हिंदुसमाजाने मूढपणे मानलेला परदेशगमनाचा निषेध हा होय. या आधी दोन हजार वर्षे हिंदु लोक साम्राज्यासाठी, धर्मप्रसारासाठी व व्यापारासाठी सर्व जगभर संचार करीत असत. आता परदेशी गेल्यावर बाटेल त्या लोकांबरोबर अन्नपाणीव्यवहार होईल, मग जात बाटेल आणि मग बहिष्कार पडेल, या भीतीने समाजाला अत्यंत हितकर असा जो विश्वसंचार तो बंद पडला, आणि हिंदुसमाज कूपमंडूक बनला. त्याचे एक जिवंत ज्ञानसाधन नष्ट झाल्यामुळे तो आंधळा झाला आणि मग अज्ञानाने, भीतीने, अविवेकाने जो कोणी जे शास्त्र भकेल त्याला अनुसरू लागला. (कलिवर्ज्य विवेचनासाठी पाहा — हिंदूंच्या अवनतीची मीमांसा — कोकजे, प्रकरण ८ वे; काणे–धर्मशास्त्र, खण्ड ३ रा. पृ ८८५ ते ९६८)

संग्रहालय ठाणे
94883
प्रत

सर्व समाजच ग्रस्त :

हिंदुसमाजाच्या विघटनेचा हा इतिहास पाहात असताना एक मोठा गंभीर प्रश्न मनात येतो. शास्त्रकारांनी वर वर्णिलेले मूढ, अधोगामी, विघटक शास्त्र सांगितले तरी सर्व समाजाने व त्याच्या इतर धुरीणांनी ते का मानले? त्या काळात सर्व वर्णांचे राजे भारतात राज्य करीत होते. ह्युएनत्संगाने त्याच्या प्रवासकाळी (इ. स. ७ व्या शतकात) भारतात पाच राजे क्षत्रिय, तीन ब्राह्मण, दोन वैश्य व दोन शूद्र होते, असे लिहून ठेविले आहे. इतर ऐतिहासिक पुराव्यांनीही हे आता सिद्ध झाले आहे. तेव्हा ज्यांना या शास्त्रकारांनी, कारण नसताना केवळ लहरीखातर हीन लेखले त्यांनी या शास्त्राला का धिक्कारिले नाही? सत्ता त्यांच्या हाती होती. शस्त्रबळ त्यांच्याजवळ होते. आणि प्राचीन काळातील उदार ऋषिमुनींच्या शास्त्राचेही बळ त्यांना आपल्या पाठीशी घेता आले असते. या काळात अनेक क्षत्रिय राजघराणी अत्यंत पराक्रमी होती. त्यांनी तरी या अधोगामी धर्मशास्त्राला किंवा अधर्मशास्त्राला विरोध करावयाचा. पण त्यांनी तसे तर केले नाहीच; उलट ब्राह्मणपूजक, चातुर्वर्ण्य-संरक्षक असे म्हणवून घेण्यातच भूषण मानले. याचा अर्थ असा की त्यांनाही शास्त्रप्रणीत जन्मनिष्ठ उच्चनीचता प्रिय होती, मान्य होती. मनूने ब्राह्मणांप्रमाणेच क्षत्रिय राजांचेही वर्णन केले आहे. इन्द्र, अग्नी, सूर्य, वायू इ. लोकपालांच्या

अंशांनी विधात्याने राजाला घडविलेले असते. त्यामुळे त्याचें सामर्थ्य इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ असते. त्याच्या अलौकिक तेजामुळे त्याच्याकडे कोणी पाहू शकत नाही. राजा स्वतः सूर्य आहे, इन्द्र आहे, ती एक महादेवता आहे, म्हणून राजाला तो लहान वयाचा असला तरी, मनुष्य मानून त्याचा कधीही अवमान करू नये, असे मनू म्हणतो. मनूचे हे मत सर्व क्षत्रियांनी स्वीकारलेले आहे. त्यांच्यातही वांशिक उच्चनीचतेच्या कल्पना अत्यंत प्रखर अशा होत्या. तेव्हा त्यांनी त्या अधोगामी शास्त्राला विरोध केला नाही यात नवल असे काहीच नाही. तीच गोष्ट वैश्य व शूद्र सत्ताधाऱ्यांची. भारतवर्षात अमुक एका राज्यात त्या काळी राजांनी अस्पृश्यता नष्ट केली, शूद्रांना वेदाधिकार दिले किंवा शास्त्रवचनांचा धिक्कार करून त्यांना इतरांच्या बरोबरीची प्रतिष्ठा दिली असे घडलेले नाही. या वर्णातले जे राजे झाले त्यांनी आपली प्रतिष्ठा आपल्या-पुरतीच ठेविली. विषमतेच्या शास्त्रावर घाव घालून सर्व समाजाला त्याच्या शृंखलांतून मुक्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याचेसुद्धा कोठे आढळत नाही. सर्व समाजच जन्मनिष्ठ उच्चनीचतेच्या विषारी कल्पनांनी ग्रस्त झालेला होता असा याचा अर्थ होतो. यापरते दुर्दैव काय ?

प्राचीन काळचे समाजधारणेचे श्रेष्ठ तत्त्वज्ञान टाकून देऊन हिंदुसमाजाने या काळी दुसऱ्या कोणत्या तरी अधोगामी तत्त्वज्ञानाचा अवलंब केला असला पाहिजे असे तिसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभी म्हटले होते. ते अधोगामी विघटनेचे तत्त्वज्ञान कोणते याचे येथवर विवेचन केले. हे विषमतेचे तत्त्वज्ञान आहे. आचार विषम, विचार विषम, धर्म विषम, न्याय विषम, सर्व समाजरचनाच विषम ! देशकालपरिस्थिती न पाहता, अंध अशा प्रामाण्यबुद्धीने विवेकहीन, मूढ अशा शास्त्रकारांनी हे तत्त्वज्ञान उपदेशिले आणि तितक्याच आंधळेपणाने व मूढबुद्धीने हिंदुसमाजधुरीणांनी ते स्वीकारले. यामुळे हा समाज छिन्नभिन्न झाला. येथे एकमेकांचा कोणी नाही अशी स्थिती झाली. सर्व समाज मिळून काही साधावयाचे आहे ही भावनाच या भूमीतून नष्ट झाली. 'या उत्तरकाळात हिंदुसमाजापुढे सर्वव्यापी, सर्वसंग्राहक असे ध्येयच राहिले नाही, त्यामुळे आम्हीच आमचे स्वातंत्र्य परकीयांच्या पदरात टाकले' असा सिद्धान्त मांडून तर्कतीर्थ कोकजेशास्त्री यांनी त्याचे फार उत्तम विवरण केले आहे. (हिंदूंच्या अवनतीची मीमांसा – प्रकरण ११ वे.)

इ. स. १००१ साली गझनीच्या महंमदाने भारतावर स्वारी केली व तेव्हापासूनच भारताच्या स्वातंत्र्याला ग्रहण लागले आणि हळूहळू त्याचा खग्रास झाला. येवढे भीषण आक्रमण आल्यावरही हिंदूंनी त्याची कारणमीमांसाही केली नाही. ती ऐपतच त्याच्या बुद्धीला राहिली नव्हती. त्यामुळे विघटनेच्या विषबीजांचे तर त्यांनी निर्मूलन केले नाहीच, उलट निवृत्तिसाद, कर्मकांड, व्यक्तिनिष्ठ धर्म, पंथस्तोत्र इ. नवीन विषबीजांची त्यांत भरच घातली. यामुळे मूळच्या व्याधी जास्तच विकोपाला गेल्या. त्या खग्रासग्रहणातून अजूनही भारताचा मोक्ष झालेला नाहीं. पारतंत्र्याच्या या प्रदीर्घ घोर अंधःकारयुगाचे – त्यातील स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न, त्यातील यशापयश, त्यामागली संघटना, त्यामागचे तत्त्वज्ञान यांचे आता विवेचन करावयाचे आहे. पुढील प्रकणाचा तोच विषय आहे.

५

स्वराज्य आणि स्वधर्म

फार प्राचीन काळापासून हिंदुसमाजात समता आणि विषमता, संघटना आणि विघटना, गुणनिष्ठा आणि जन्मनिष्ठा, बुद्धिनिष्ठा आणि शब्दप्रामाण्य असे दोन विचारप्रवा चालू असून त्यांतील दुसऱ्या समाजघातकी प्रवाहाचा जोर इसवी सनाच्या दहाव्या-अकराव्या शतकापासून वाढत गेला आणि त्यामुळे या समाजाचा अधःपात झाला, हा विचार गेल्या चार प्रकरणांत सविस्तर मांडला. या काळाच्या सुमाराला नव्या स्वतंत्र स्मृती निर्माण होण्याचे बंद झाले; आणि जुन्या स्मृतींवर टीका करणारे, अनेक स्मृतींचे सारार्थ काढून त्यावरून नवीन धर्मशास्त्र बनविणारे असे धर्मशास्त्रकार उदयास आले. या धर्मशास्त्रकारांना निबंधकार व त्यांच्या ग्रंथांना निबंध असे नाव रूढ झालेले आहे. या निबंधकारांपैकी मेधातिथी, विज्ञारण्य, यांसारखे काही अपवाद वजा जाता, बहुतेक शब्दप्रामाण्यवादी, अंध, समाजपरिस्थिती पाहून, स्वतंत्र चिंतन करून निर्णय करण्याची ऐपत नसलेले, समाजाच्या उत्कर्षापकर्षाची कारणमीमांसा करण्यास असमर्थ आणि प्रतिगामी, अविवेकी व मूढ असेच होते. त्यामुळे हिंदुधर्मशास्त्राला उत्तरोत्तर समाजघातक व विकृत रूप येत गेले; व त्याचाच परिणाम होऊन हिंदुसमाज रसातळाला गेला. इसवी सनाच्या आठव्या शतकात सिंध प्रांत मुस्लीमांच्या ताब्यात गेला तो कायमचा आणि दहाव्या शतकात

पंजाब परतंत्र झाला तोही तसाच. तेव्हापासून आजच्या क्षणापर्यंत अखिल भारत, त्याच्या सर्व प्रांतांसह, पूर्ण स्वतंत्र असा केव्हाही झाला नाही. अखिल भरतखंडाला स्वातंत्र्यसूर्याचे दर्शन झाले, पारतंत्र्याचा अंधार त्याच्या कोणत्याही भूभागात नाही, असा दिव्य क्षण या हजार-बाराशे वर्षांत एकदाही उगवला नाही. हे दुर्घटित आपण आपल्या समाजाच्या संघटनाविघटनेचा विचार करताना नित्य ध्यानी बागविले पाहिजे. या काळात रजपूत, विजयनगर, मराठे व शीख यांनी आक्रमणांचा निकराने प्रतिकार करून, त्यांचे बव्हंशी निर्दाळण करून, या भूमीला स्वातंत्र्यसूर्याचे दर्शन मधून मधून घडविले. या पुढील प्रकरणात प्रामुख्याने त्यांच्याच कर्तृत्वाची मीमांसा करावयाची आहे. त्यांच्या कर्तृत्वामागे कोणते धर्मशास्त्र होते, समाजधारणेचे कोणते तत्त्व होते, समाजसंघटनेचे काही नवीन तत्त्व त्यांनी शोधिले होते काय, त्यांना यश आले ते कशामुळे आणि शेवटी तेही पारतंत्र्यात बुडाले ते कशामुळे याची चिकित्सा करून हिंदुसमाजाच्या भावी उत्कर्षासाठी काही मार्ग आपल्याला शोधावयाचा आहे; उपायचिंतन करावयाचे आहे. पण तसे करताना वर सांगितलेल्या अविवेकी व हीन धर्मशास्त्रामुळे हिंदुसमाज अधःपाताच्या कोणत्या पातळीला गेला होता तेही आपण पाहून ठेविले पाहिजे. त्यावाचून आपल्यावरील भयानक संकटाची कल्पना आपल्याला येणार नाही; आपण ज्या व्याधींनी ग्रस्त झालो आहो त्यांचे स्वरूप नीट आकळणार नाही आणि अंतर्मुख होऊन उपायचिंतन करता येणार नाही. म्हणून प्रथम पारतंत्र्याच्या या प्रदीर्घ घोर अंधःकारयुगाचे स्वरूप आपण पाहू. नंतर या युगात वर निर्देशिलेल्या चार राष्ट्रांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जे प्रयत्न केले त्यांच्या यशापयशाची चिकित्सा करू आणि मग उपायचिंतन करू.

जीवनशक्ती नाही :

वर सांगितलेच आहे की आठव्या शतकात सिंध व दहाव्या शतकात पंजाब हे प्रांत हिंदूंच्या हातून गेले ते कायमचे. आजही ते पूर्णपणे आपल्या ताब्यात आलेले नाहीत. आणि पुढे कधी काळी येण्याची आशाही उरलेली नाही. वास्तविक येथे बलुचिस्थान व अफगाणिस्थान यांचाही निर्देश केला पाहिजे. कारण हे दोन्ही प्रांत आठव्या-नवव्या शतकापर्यंत हिंदू राजसत्तेखाली होते. तेथील प्रजाही बव्हंशी हिंदू होती. दिल्लीला मुस्लीम सत्ता स्थापन करणारा

महंमद घोरी याचा आजा हा हिंदू होता आणि ज्या घोर परगण्यातून तो आला तेथे हिंदूंचीच वसती होती. पण हे प्रांत आपले होते याची स्मृतीही भारताला नाही, इतके ते आपल्याला व आपण त्यांना पारखे झालो आहो. अकराव्या शतकाच्या प्रारंभी महंमद गझनीच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. पुढील तीस वर्षांत त्याने सतरा स्वाऱ्या केल्या, पण एकाही स्वारीत त्याचा पराभव झाला नाही. काही ठिकाणी त्याला प्रतिकार झाला, कडवा प्रतिकार झाला, पण काही ठिकाणी तोही झाला नाही. राजे व सेनापती पळूनच गेले. या स्वाऱ्यांत त्याने शेकडो देवळे फोडली, हजारांनी कत्तली केल्या व दशसहस्रांनी हिंदूंचे धर्मांतर केले. कत्तलीत बाल, वृद्ध, स्त्रिया यांनाही त्याने वगळले नाही. हजारो स्त्रियांना त्याने दासी करून परदेशांत नेऊन विकले. हिंदूंचा जो जो म्हणून मानबिंदू होता तो त्याने पायपोसाने मोजला. पण तरीही हिंदू त्याचा यशस्वी प्रतिकार करू शकले नाहीत. हिंदूंची जीवनशक्ती किती क्षीण झाली होती हे यावरून दिसून येते. स्वातंत्र्याचे, आपल्या भूमीचे, आपल्या धर्माचे, आपल्या स्त्रियांचे, संसाराचे रक्षण करण्याचे सामर्थ्य हे जीवनशक्तीचे पहिले लक्षण होय. ते शक-यवन-कुशाण-हूण यांच्या आक्रमणांच्या वेळी जसे दिसून आले तसे या वेळी दिसले नाही.

अंध धर्मशास्त्र :

यानंतर वास्तविक हिंदूंना दीडशे वर्षांचा दीर्घ अवसर मिळाला होता. गझनीचे राज्य महंमदानंतर अगदी विस्कळित, विघटित व दुबळे झाले होते. त्या काळी पंजाब सहज मुक्त करता आला असता; इतकेच नव्हे तर गझनीची सत्ताही बुडविता आली असती. पण त्यासाठी सावधता, साक्षेप यांची आवश्यकता असते. झालेल्या घटनांची कार्यकारणमीमांसा करून तीवरून काही निर्णय करण्याची शक्ती अंगी असावी लागते. आगामी संकटांची आधी जाण ठेवून त्यांच्या प्रतिकाराची सिद्धता करावी लागते. पण हिंदूंनी यातले काहीच केले नाही. बाहेरच्या जगात, भारताच्या सरहद्दीबाहेर काय चालले आहे, आपल्याला निर्दाळून गेलेला शत्रू कोण होता, त्याचे बलाबल कशात आहे, तेथून पुन्हा आक्रमण येण्याची शक्यता कितपत आहे, याची जी विवंचना, ती हिंदूंनी केलीच नाही. सर्व जगाच्या हालचालींचे, निदान सरहद्दीजवळच्या

देशांतल्या घडामोडींचे ज्ञान मिळविणे हे जीवनशक्तीचे दुसरे लक्षण होय. पण परदेशगमनाचा निषेध, म्लेंच्छ सहवासाचा निषेध, हा हिंदूंच्या धर्मशास्त्रातली लाडकी कलमे त्याच्या आड आली. आणि महंमद घोरीची आक्रमणे ११७६ साली म्हणजे सुमारे दीडशे वर्षांनी सुरू झाली तरी महंमद गझनीच्या वेळेपेक्षा भारतातील राजांच्या मनोवृत्तीत, वेसावधतेत व प्रतिकारशक्तीत कसलाही फरक पडला नव्हता. धर्मशास्त्रकार परिस्थिती पाहून धर्मशास्त्र रचीत नव्हते आणि राजसत्ताधारी डोळसपणे अवलोकन करून अनुभवाने राजनीतिशास्त्र व युद्ध-शास्त्र संवर्धित करीत नव्हते. महंमद घोरीच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. तीन स्वाऱ्यांत त्याचा जय झाला. चवथ्या स्वारीत पृथ्वीराजाने त्याचा निःसंदेह पराभव केला व त्याला जीवदान देऊन सोडून दिले. यानंतर तरी त्याने व रजपूत राजांनी सावध रहावे ! पण उलट पृथ्वीराज विलासात दंग होऊन राहिला व आपल्याच प्रधान सरदारांवर अत्याचार करू लागला. तेव्हा त्याच सरदारांनी शिहाबुद्दिन महंमद घोरीकडे जाऊन त्याला बोलावून आणले. तरीही ठाणेश्वरच्या लढाईत अनेक रजपूत राजे व सरदार घोरीशी सामना करण्यास एकत्र झाले होते. मधल्या काळात मुस्लीमांचे युद्धशास्त्र, त्यांची कपटनीती, त्यांचा धार्मिक कडवेपणा हे सर्व जाणून त्यांवर मात करण्याची सिद्धता हिंदूंनी केली असती तर अजूनही जय मिळाला असता. पण दीडशे वर्षांपूर्वी महंमद गझनीशी लढ-ताना हिंदूंची जी युद्धनीती होती तीच याही वेळी होती. अर्थातच रजपुतांची वाताहत झाली आणि भारताचे भवितव्य ठरून गेले. यानंतर घोरीने पाचवी स्वारी करून कनोज घेतले. तोपर्यंत तेथला राजा जयचंद राठोड तमाशा पहात बसला होता. पृथ्वीराजाशी त्याचे वैर होते, म्हणून तो त्याच्या साह्यार्थ गेला नाही, हे ठीक. पण हेच संकट आपल्यावर येणार हे जाणून त्याने स्वतंत्रपणे तयारी करावयास हवी होती. पण ही बुद्धी व शक्ती हिंदूंत राहिली नव्हती. त्यामुळे कनोज पडले. ते लुटून महंमद लगोलग काशीवर गेला व तेथील सर्व मूर्ती नाहीशा करून त्याने त्यांवर मशिदी उभारल्या व अपरंपार लूट जमा करून नेली. येथून पुढे हिंदूंच्या राजसत्तेबरोबरच त्यांच्या मंदिरांचे, मूर्तींचे व स्त्रियांचे भवितव्य ठरून गेले—परकीय आक्रमणापुढे बळी जाणे ! मुस्लीम राज्याचा पाया आता भारतात घातला गेला होता. ते या तीहींचे कडवे शत्रू होते. आणि या तिहींनाही त्यांचे संरक्षण करण्यास समर्थ असे मित्र कोणी

नव्हते. '**धर्म एव हतो हन्ति, धर्मो रक्षति रक्षितः।**' हे वचन प्रसिद्ध आहे. मूर्ती, मंदिरे हा हिंदूंचा धर्म. त्याचे रक्षण करण्यास हिंदू असमर्थ ठरले. तो हत झाला व त्यामुळेच हिंदूंचा नाश झाला. काशीला हिंदूंनी प्रतिकारही केला नाही!

पडण्यास योग्य :

दिल्ली, अजमीर, कनोज, काशी यांचा उच्छेद झाल्यावर मुस्लीम सत्तेचा पाया हिंदुस्थानात घातला गेला आणि पुढच्या उण्यापुऱ्या चाळीस वर्षांत सर्व उत्तर हिंदुस्थान स्वातंत्र्याला मुकला. चिं. वि. वैद्य लिहितात, 'पुढील पंचवीस वर्षांत उत्तर हिंदुस्थानातील राजघराणी आश्चर्यकारक झपाट्याने पडली. पण यात आश्चर्य काय? उत्तर हिंदुस्थान या वेळी पडण्यासच योग्य झाले होते.' इतर राज्ये जिंकण्याचे काम शिहाबुद्दिनच्या कुतुबुद्दिन ऐबक व शमसुद्दिन अल्तमश या सेनापतींनी केले. हे दोघेही प्रथम गुलाम होते. पण अंगच्या गुणांनी सेनापती आणि सुल्तान झाले. शिहाबुद्दिन याने कुतुबुद्दिन ऐबक यास आपली कन्या देऊन जावईही केले. ऐबकने याचप्रमाणे अल्तमशला आपला जावई केले. गुलामी त्यांच्या उत्कर्षाच्या आड आली नाही. या काळात हिंदुसमाजात हे कधीही घडले नसते. कारण येथले लोक चातुर्वर्ण्याचे अभिमानी होते! ११९७ साली कुतुबुद्दिन याने गुजराथवर स्वारी केली. अबूच्या पायथ्याशी एका घाटावर हिंदू सेना खडी होती. मुस्लीमांनी जरा भ्यालेसे दाखवून माघार घेतली व नित्याप्रमाणे हिंदू फसून पुढे आल्यावर ते उलटले. लढाई होऊन वीस हजार हिंदू मारले गेले. नंतर एकदोन वर्षांत मुस्लीमांनी पाटण व अनहिलवाड जिंकून गुजराथचा विध्वंस केला (११९९). इ. स. १२०२ साली ऐबकने कलिंजरचा विख्यात किल्ला घेतला. तेथली देवळे पाडून त्यांच्या मशिदी केल्या आणि पन्नास हजार लोक गुलाम म्हणून नेले. त्याच साली बख्त्यार खिलजी या सरदाराने बंगाल व बिहार हे प्रांत जिंकले, विक्रमशील या विद्यापीठाची राखरांगोळी केली, तेथले सर्व बौद्ध ग्रंथ जाळून टाकले व हजारो बौद्ध भिक्षूंची कत्तल केली. कुतुबुद्दिनने यासाठी त्याचा मोठा सन्मान केला. कुतुबुद्दिनानंतर अल्तमश सुल्तान झाला. त्याने रणथंबोर व ग्वाल्हेर हे किल्ले घेतले. त्या वेळी ग्वाल्हेरमधील स्त्रियांनी जोहार केला! इ. स. १२३४ साली अल्तमशने विदिशेवर स्वारी

करून त्या पुरातन नगरीचा व तेथील देवालयांचा नायनाट केला. आणि तेथून उज्जनीवर चालून जाऊन त्याने महाकाळाचे प्रसिद्ध देवालय फोडले आणि विक्रमादित्याची मूर्तीही तोडून टाकली.

स्थितप्रज्ञ हिंदू राजे :

अल्तमशनंतर जवळ जवळ तीस वर्षे म्हणजे १२६६ मध्ये बल्बन सुल्तान होईपर्यंत पुन्हा हिंदूंना अवसर मिळाला होता. कारण या काळात दिल्लीचे सुल्तान अगदी दुबळे होते व राजसत्ता विस्कळित झाली होती; पण पुनरुत्थान करण्याचे सामर्थ्य हिंदूंच्या ठायी राहिलेच नव्हते. विंध्याच्या दक्षिणेस दावण गिरीचे यादव, हळेबीडचे होयसळ यादव, मदुरेचे पांड्य, आणि वरंगळचे काकतीय यांची विशाल राज्ये होती. त्यांना तर तीनशे वर्षे अवसर मिळाला होता. पण ते सावध झाले नाहीत. उत्तर हिंदुस्थानात मुस्लीमांकडून होणारे अत्याचार, त्या कत्तली, ते बलात्कार, ती जाळपोळ, तो विध्वंस हे सर्व ते हिंदुसम्राट स्थितप्रज्ञाच्या वृत्तीने पहात बसले होते. १२९४ साली अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीच्या यादवांचा नाश केला. त्यानंतर दहा वर्षे तो दक्षिणेत उतरला नाही. म्हणजे दक्षिणेत आक्रमण आल्यावरही पुन्हा दहा वर्षांचा अवधी मिळाला होता. पण तीनशे वर्षांत ज्यांना तयारी करता आली नाही त्यांना दहा वर्षांत काय साधणार ? दहा वर्षांनी अल्लाउद्दिनचा सेनापती मलिक काफूर याच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. आणि पुढील पंधरा वर्षांत वर निर्देशिलेली सर्व राज्ये विध्वंसून तो रामेश्वरला पोचला आणि तेथे त्याने एक मशीद उभारली. हा काफूर प्रथम एक अस्पृश्य हिंदू होता. त्या वेळी त्याला सूर्यचंद्र वंशांतल्या राजांच्या सैन्यात शिपाई म्हणून सुद्धा प्रवेश मिळाला नसता. पण मुसल्मान होताच त्याने या वंशांतल्या राजांची साम्राज्ये सहज लीलेने विलयाला नेली. आणि पुढे तर तो दिल्लीचा कर्ताकरविता झाला. तो सुल्तानही झाला असता पण तेवढ्यात त्याचा खून झाला. दुसरा एक पूर्वीचा अस्पृश्य, खुश्रूखान, हा तर प्रत्यक्ष दिल्लीचा सुल्तान झालाच. हिंदू असताना हे दोघेही अंत्यज एवढ्या मोठ्या पदाला चढू शकले नसते. पण हे पाहूनही हिंदूंची जन्मसिद्ध जातिव्यवस्था व त्यांचे ते सनातन चातुर्वर्ण्य जागे झाले नाही अंत्यज हे जन्मोजन्मी अस्पृश्यतेच्या नरकात राहिले पाहिजेत असे हिंदुधर्म-

शास्त्र आहे. त्यांनी मुस्लीम होऊन आपला उत्कर्ष साधावा. मग त्यांच्यापुढे हिंदुराजे, हिंदु शास्त्री व हिंदुधर्मशास्त्रही नमेल. पण हिंदू असताना उत्कर्ष साधण्याची संधी त्यांना मिळणार नाही ! असल्या अधम, हीन धर्मशास्त्रामुळे समाजाचा नाश न झाला तरच नवल !

अल्लाउद्दिनाने १२९७ साली गुजराथ प्रांत जिंकला. ऐबकने तो जिंकल्यावर लगेच पुन्हा तो स्वतंत्र झाला होता. आता मात्र त्याला दीर्घ काल पारतंत्र्य आले. १३०३ साली अल्लाउद्दिनाने चितोडचा विध्वंस केला. त्या वेळी राणी पद्मिनी-सह १५००० रजपूत स्त्रियांनी जोहार केला. १३२० पर्यंत मलिक काफूरने दक्षिणची सर्व राज्ये बुडविली. आणि १३३९ साली शहा मीर या मुसलमान सरदाराने काश्मीरचे हिंदुराज्य बुडविले. अशा रीतीने सिंध, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश, बंगाल, बिहार, गुजराथ, माळवा, मेवाड, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, तेलंगण, केरळ, अशा सर्व हिंदुराज्यांचा मुसलमानांनी विध्वंस केला व तेथे मुस्लीम सत्ता स्थापन केली. या सत्तेचा काहीच प्रतिकार झाला नसता तर इजिप्त, इराण, जावा, सुमात्रा यांप्रमाणेच आज हिंदुस्थान सर्वच्या सर्व इस्लामधर्मी झाला असता. पण तसा तो झाला नाही. याचे कारण, राजस्थान, कर्नाटक, महाराष्ट्र व पंजाब या राष्ट्रांनी नष्ट झालेली हिंदूंची जीवनशक्ती पुन्हा जिवंत केली व आक्रमणाचा प्रतिकार करून शेवटी भारतातून मुस्लीम सत्तेची पाळेमुळे खणून काढली, हेच होय.

मुस्लीमांचे सामर्थ्य :

या चार प्रदेशांत हिंदूंनी जे पुनरुत्थान केले ते कोणत्या मार्गाने केले ते आता पहावयाचे आहे. पण ते पहात असताना आपण मुस्लीमांचे सामर्थ्य काय होते ते पाहिले पाहिजे. कारण या सामर्थ्याचा नाश करूनच हिंदूंना हे पुनरुत्थान साधावयाचे होते. एक गोष्ट आपण ध्यानात ठेवली पाहिजे की अखिल भारतावर मुस्लीमांचे एकछत्री साम्राज्य असे कधीही नव्हते. अल्ला-उद्दिन खिलजी व महंमद तघलख यांच्या काळी सर्व मिळून दहा-पाच वर्षेच काय ते असे साम्राज्य असले तर असेल. बाकी प्रारंभापासून अकबरच्या उदयापर्यंत मुस्लीम साम्राज्यसत्ता अशी भारतात केव्हाही नव्हती. मुस्लीमांनी भारतातील सर्व प्रवेश जिंकले हे खरे. पण सिंध, काश्मीर, बंगाल, बिहार, गुजराथ,

महाराष्ट्र येथले सुलतान बहुधा स्वतंत्रच असत. त्यांच्या व दिल्लीच्या सुलतानांच्या नित्य लढाया चालत. त्यांची आपसांतही नित्य युद्धे होत. वारसाच्या लढाया दिल्लीच्या तख्तासाठी होत तशाच या प्रदेशांतही होत असत. अकबरापासून म्हणजे १५६० पासून औरंगजेब अखेर इ. स. १७०७ पर्यंत मुस्लीम साम्राज्यसत्तेला थोडे स्थैर्य होते. त्या वेळीही अखिल भारतावर त्यांचे साम्राज्य नव्हतेच. दक्षिणेत मोगलांची सत्ता कधीच प्रस्थापित झाली नाही. त्यांचे साम्राज्य उत्तरेतच होते. आणि तेहि वारशाची दरपिढीला होणारी युद्धे, अयोध्या, बंगाल येथील सुभेदारांची बंडे यांनी खिळखिळे झालेले, असेच होते. याशिवाय शिया व सुनी असे भेद मुस्लीमांत होतेच आणि ते एकमेकांत घनघोर युद्धे व्हावीत इतके तीव्र होते. वंश दृष्टीने पाहिले तरी त्यांच्यांत अनेक भेदभाव होते. अरब, अफगाण, इराणी, तुर्क, मंगोल, शिद्दी व बाटलेले हिंदी-मुसलमान या वांशिक भेदांना, अनेक वेळा अत्यंत उग्र रूप येऊन एका वंशाने दुसऱ्याच्या कत्तली कराव्या येथपर्यंत अनेक वेळा मजल गेलेली होती. हे सर्व इतिवृत्त ध्यानात घेतले म्हणजे असे म्हणावे लागते की, भारतावरील मुस्लीम आक्रमणाचा इतिहास हा मुस्लीमांच्या कर्तृत्वाचा नसून हिंदूंच्या नादानीचा, अधःपाताचा आहे. हे आक्रमण पाचसहाशे वर्षांत केव्हाही, कोणत्याही क्षणी हिंदूंना भारी होते असे नाही. मुस्लीमामुस्लीमांत पाहिले तर कोणीही यावे आणि कोठल्याही प्रांतातल्या आणि दिल्लीच्याही सत्तेचा धुरळा करावा अशी स्थिती बहुधा सर्व काळी होती. असे असून हिंदूंना हे पाचसहा शतके साधले नाही, ही गोष्ट अत्यंत उद्वेगजनक वाटते. या समाजाच्या सामर्थ्याला कोठे तरी अत्यंत घातक अशी कीड लागलेली असली पाहिजे, हाच त्याचा अर्थ आहे.

तुलना :

इ. स. १३४६ साली हसन गंगू बहामनी याने दक्षिणेत कुलबर्गा येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्याआधी देवगिरीस यादवांचे राज्य होते. एकदा पराभव होऊन दिल्लीचे सांडलिकत्व नशिबी आल्यावर यादवांनी दिल्लीचे जू झुगारून देण्याचा सारखा प्रयत्न चालविला होता. रामदेवराव, शंकरदेव व हरपाळदेव यांनी यासाठी दोन पिढ्या धडपड चालविली होती. पण त्यांना यश आले. नाही. ते सर्व प्राणास मुकले. उलट हसन गंगू बहामनी याला, दिल्लीचे जू

झुगारावे, असे वाटताच झुरळ उडवून द्यावे, तसे त्याने ते उडवून दिले. आणि बहामनी राज्ये नष्ट करण्यासाठी अनेकवार स्वाऱ्या करूनही तीनशे वर्षे दिल्लीकरांना यश आले नाही. उत्तरेतली व दक्षिणेतली हिंदुराज्ये दिल्लीच्या सुलतानांनी पाचपंचवीस वर्षांत सहज लीलया बुडविली. काही काही राज्ये त्यांनी एकेका वर्षात व काही तर दोन-चार महिन्यांत नष्ट केली. जे दक्षिणेतील बहामनी राज्याचे, तेच बंगाल, गुजराथ, माळवा, सिंध येथील मुस्लीम राज्यांचे. दिल्लीच्या सत्तेशी झगडा करून दोनदोनशे वर्षे तेथील सुलतानांनी आपली राज्ये टिकविली होती. याचे कारण हेच की दिल्लीच्या सत्तेतच तसा दम नव्हता. नादान, विलासी सुलतान, सरदारांचे, सेनापतींचे हेवेदावे, वर सांगितलेले पंथभेद, वारशाची युद्धे यांनी ती सत्ता नेहमी जर्जर, विकल झालेली असे. पण असे असूनही हिंदूंना तिचे निर्दाळण करता आले नाही. दुर्दैव असे की त्यांनी अठराव्या शतकापर्यंत तसा प्रयत्नही केला नाही. हे पाहून हिंदूंच्या जीवनशक्तीचा प्रत्येकाने अंतर्मुख होऊन फार बारकाईने विचार केला पाहिजे असे वाटते.

आकांक्षाच सेल्या :

हा विचार करू लागताच अनेक प्रश्न मनात उभे राहतात. अरबस्तानातून सिंधवर प्रथम आक्रमण आले, आणि त्यानंतर राजस्थानवर अनेक आक्रमणे झाली. ती सर्व रजपुतांनी परतवून लाविली. पण प्रश्न असा येतो की, या टोळधाडी कायमच्या नष्ट करण्यासाठी राजपुतांनी अरबस्तानावर का स्वारी केली नाही? महंमद गझनी, महंमद घोरी यांनी लागोपाठ भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या. पण या सत्ता मुळातच उखडून टाकण्याच्या हेतूने हिंदी राजांनी गझनी, कंदाहार, खुरासान या परगण्यांवर का स्वाऱ्या केल्या नाहीत? ही दिग्विजयी वृत्ती पूर्वी हिंदूंत होती. ती आता समूळ नष्ट का झाली? तेराव्या शतकाच्या आरंभी मुस्लीम सत्तेचा पाया भारतात घातला गेला. आणि लगेच सर्व भारत जिंकण्याच्या आकांक्षा मुस्लीमांत निर्माण झाल्या. सिंधपासून बंगाल-पर्यंतचा सर्व उत्तर हिंदुस्थान त्यांनी पंचवीस वर्षांत आक्रमिला आणि पुढील शतकात रामेश्वरपर्यंत जाऊन तेथे त्यांनी मशीद उभारली. अशा आकांक्षा प्रांतोप्रांती स्वतंत्र झालेल्या प्रत्येक मुस्लीम सत्तेच्या ठायी होत्या. पण

अकराव्या आणि बाराव्या शतकात भारतात जी अनेक हिंदू राज्ये होती त्यांतल्या एकानेही अशी आसेतुहिमाचल भरारी का मारली नाही? मनात शल्य असे उभे राहते की अनेक रजपूत सरदारांनी – राजा भगवानदास, मानसिंग, मिर्झाराजे जयसिंग, जसवंतसिंग यांनी—मुस्लीमांच्या साम्राज्याच्या प्रसारासाठी अखिल भारतभर आणि मध्य आशियापर्यंतही दिग्विजय केले. पण हम्मीर, कुंभराणा संगराणा यांनी हिंदूंचे साम्राज्य वाढविण्यासाठी राजस्थानबाहेर कधीच पाऊल टाकले नाही! या घटनांची संगती कशी लावावयाची?

रजपूत, विजयनगर, मराठे व शीख यांनी मुस्लीम आक्रमणाच्या प्रतिकारार्थ जे प्रयत्न केले त्यांचा इतिहास पाहून त्याची थोडी मीमांसा आपल्याला करावयाची आहे. तसे करताना वरील प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करू.

रजपूत :

आठव्या शतकात सिंधवर अरबांनी आक्रमण केले. तो प्रांत त्या वेळी अतिशय थोडक्या अवधीत बळी पडला. तेव्हा तेथून पुढे सरकून कासीमने मुलतानही घेतले. अरबांनी पश्चिमेस जिब्राल्टर, स्पेनपर्यंत विजय मिळविले होते. तसेच विजय हिंदुस्थानातही मिळविण्याची त्यांची आकांक्षा होती. त्यामुळे सिंधमधून ते राजस्थानवर आक्रमण करू पहात होते. पण बाप्पारावळ हा एक थोर पुरुष या वेळी उदयास आला व त्याने मेवाडमध्ये चितोडास राज्यस्थापना करून अरबांच्या आक्रमणास पायबंद घातला. पुढल्या शतकात खलिफा अलमामूनच्या सैन्याला मेवाडचा राजा दुसरा खुम्माण याने अनेकवेळा खडे चारल्याचे मागे सांगितलेच आहे. असे प्रचंड तडाखे बसल्यामुळे अरबांनी राजस्थानवर फिरून आक्रमण केले नाही. अकराव्या शतकात महंमद गझनीच्या स्वाऱ्या भारतावर झाल्या. पण तो राजस्थानात कधी शिरला नाही. त्यामुळे मेवाडशी त्याचा सामना झाला नाही. तेराव्या शतकात शिहाबुद्दिन घोरीने दिल्लीला राज्य प्रस्थापित केले आणि उत्तर हिंदुस्थानातील बहुतेक राज्ये त्याने व पुढील सुल्तानांनी नष्ट केली. पण त्या वेळीही मेवाडवर त्यांची मात्रा चालली नाही. शमसुद्दिन अल्तमश याने मेवाडवर स्वारी केली होती. पण त्या वेळचा राजा जैत्रसिंह याने त्याचा पुरा मोड केला. हीच परंपरा तेराव्या शतकाच्या

अखेरपर्यंत टिकवून मेवाडच्या शूर रजपुतांनी आपले स्वातंत्र्य अबाधित राखले. इ. स. १३०३ मध्ये अल्लाउद्दिन याने चितोडवर स्वारी केली. त्या वेळी राणा रत्नसिंह व लक्ष्मणसिंह यांनी प्रतिकाराची पराकाष्ठा केली. पण रणांगणात ते मारले गेले व पद्मिनीसह रजपूत स्त्रियांनी जोहार केला. त्यानंतर चितोड सर्व जाळून टाकून सुलतानाने मेवाडचे राज्य नष्ट करून टाकले. पण लवकरच चक्रवर्ती हम्मीर याचा उदय झाला व त्याने मेवाडच्या गादीची पुन्हा प्रस्थापना केली. त्यानंतर क्षेत्रसिंह, मोकल, कुंभ व महाराणा संग यांसारखे भीमपराक्रमी पुरुष चितोडच्या गादीवर आले व आपल्या शौर्यधैर्याने त्यांनी स्वधर्माचे व स्वातंत्र्याचे रक्षण केले. गुजराथ, माळवा येथील सुलतान या वेळी स्वतंत्र झाले होते. त्यांच्याशी या राजांच्या नित्य लढाया चालत. कधी ते एक होऊनही चितोडवर हल्ला करीत. पण तरीही चितोड अभंग राहिले. पण यानंतर बाबराचा उदय झाला. त्याने सर्व मुस्लीम सामर्थ्याची संघटना केली. त्या वेळी रजपुतांचे बल असे संघटित होऊ शकले नाही आणि महाराणा संग याचा खानवाच्या (फत्तेपूर शिक्री) लढाईत पराभव होऊन मेवाडचे स्वातंत्र्य संपुष्टात आले.

बाप्पारावळापासून राणासंगापर्यंत जवळ जवळ आठशे वर्षे मुस्लीम आक्रमणाचा जो राजपुतांनी प्रतिकार केला त्यासाठी भारतवर्ष त्यांचा कायमचा ऋणी राहील. रजपुतांचे हे कार्य इतके असामान्य आहे की, भारताच्या इतिहासात त्याची स्मृती अमर होऊन राहील यात शंका नाही. बाप्पारावळ व खुम्माण यांनी आपल्या शौर्याचे पहाड मध्ये उभे केले नसते तर आठव्या-नवव्या शतकात अरबांच्या आक्रमणाची लाट सर्व उत्तर हिंदुस्थानात पसरली असती. त्या घोर आपत्तीतून भारताला वाचविण्याचे श्रेय सर्वस्वी रजपुतांचेच आहे.

रजपुतांच्या श्रेयाचा असा विचार केल्यानंतर त्याच्या मर्यादांचाही विचार केला पाहिजे. आणि हिंदुसमाजाच्या संघटनक्षमतेविषयी यावरून काही निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

एकछत्र नाही :

भारतातील हिंदुबलाच्या संघटनेचा विचार करू लागताच पहिली गोष्ट ध्यानात येते ती ही की, रजपुतांना अखिल राजस्थानचे एकछत्री राज्य करणे कधीही शक्य झाले नाही ! मेवाड, जयपूर, जोधपूर, अजमीर, बिकानेर इत्यादी रजपूत

राज्ये स्वतंत्र होती. प्रसंगी ती मेवाडच्या नेतृत्वाखाली एक होत असली तरी त्यांच्या आपसात नित्य लढाया चालू असत. दक्षिणेत विजयनगरच्या नेत्यांनी तुंगभद्रेच्या दक्षिणेच्या आंध्र, तामीळनाड, केरळ व कर्नाटक येवढ्या प्रदेशांचे एकछत्री राज्य स्थापून ते २००-२५० वर्षे यशस्वी रीतीने चालविले होते. त्यामुळे तो सर्व भूप्रदेश मुस्लीमांच्या अत्याचारांपासून दीर्घकाळ अबाधित राहिला. रजपुतांनी याच प्रकारे निदान सर्व राजस्थान एकछत्री केले असते तर जयपूर, जोधपूर, इ. संस्थानांचे स्वातंत्र्य, तेथील स्त्रियांचे शील व पावित्र्य यांचे त्यांना रक्षण करता आले असते. इतकेच नव्हे तर सिंध, गुजराथ, माळवा, या प्रदेशांतील मुस्लीम सत्ता नष्ट करून शेवटी दिल्लीच्या सुलतानीलाही शह देता आला असता. महाराणा कुंभ, महाराणा संग, महाराणा प्रतापसिंह यांच्या पराक्रमांचे इतिहास वाचले म्हणजे यात अशक्य काहीच नव्हते असे दिसते. विजयनगरने वर सांगितलेल्या चार प्रदेशांचे स्वातंत्र्य व शील रक्षिले आणि मधून मधून विजापूर, नगर, गोवळकोंडा यांवरही आक्रमण करून ती राज्ये खिळखिळी करून टाकली. हे सर्व यश एकछत्री सत्तेचे आहे. रजपुतांना हे जमले नाही. यात त्यांना यश आले नाही. ते का आले नाही ?

प्रसिद्ध इतिहासकार ईश्वरी प्रसाद यांनी रजपुतांच्या शौर्याचे व त्यांच्या उणीवांचेही वर्णन केले आहे. " रजपूत जन्मतःच लढवय्या असे. शरणागती-पेक्षा प्राणदान त्याला श्रेयस्कर वाटे. पण त्याचे हे शौर्य, हे बल संघटित होणे दुरापास्त होते. कारण त्यांच्यात भिन्न भिन्न जमाती व कुले असून प्रत्येक जमातीला आपल्या वांशिक थोरवीचा अतिरिक्त अभिमान असे. या जमातीत नित्यस्पर्धा व कलह चालत व त्यांमुळे रजपुतांचे ऐक्य दुष्कर होऊन बसले होते. शिवाय तेथे जातिभेदाची भावना पराकाष्ठेची तीव्र होती. त्यामुळे खालच्या जातीतील पुरुष थोर पदाला चढणे अशक्य होते. अर्थातच खालच्या जातीतील लोकांच्या कर्तृत्वाला समाज मुकत असे. जाती व कुल यांच्या अंध अभिमानामुळे गुण व कार्यक्षमता यांची फार हानी होऊन मुस्लीमांचा पहिला तडाखा बसताच सर्व राजपुती भारत पायासकट हादरला. "—(मिडीव्हल इंडिया, पृ. १३२) पुस्तकाच्या प्रस्तावनेतही त्यांनी हेच विचार मांडले आहेत. मानापमानाच्या कल्पनांमुळे रजपूत आंधळे झाले होते. त्यामुळे विघटना हेच त्यांचे लक्षण होऊन बसले. रजपूत एवढे महापराक्रमी पण सर्व रजपूत जमाती व लोक दृढपणे

एकछत्रात आणणारा सम्राट राजस्थानात केव्हाच झाला नाही !

अंध मानापमानाच्या भावनांमुळे, कुलश्रेष्ठतेच्या विपरीत कल्पनेमुळे रजपूत हे राष्ट्रसंघटना वा साम्राज्यसंघटना करू शकले नाहीत. त्या सर्वांना धर्माभिमान होता. पण आपला कुलाभिमान धर्मसंघटनेत विलीन करण्यास त्यांची तयारी नव्हती. त्यामुळे शेवटी प्रत्येक कुलाला आपल्या मुली मोगलांना द्याव्या लागल्या व मोगलांचे दास व्हावे लागले आणि तो धर्माभिमान निष्फल ठरला. म्हणजे कुलाभिमानही गेला व धर्माभिमानही गेला !

स्वराज्य व स्वधर्म :

पण धर्माभिमान याचा अर्थ आपण स्पष्ट केला पाहिजे. अनेक इतिहासकारांनी जयपूर, जोधपूर या संस्थानांतील राजे भगवानदास, मानसिंह, मिर्झाराजे जयसिंह, जसवंतसिंह, बिकानेचा रायसिंह, हाडावतीचा रावभोज यांचे, ते सर्व स्वधर्माचे अभिमानी होते, हिंदुधर्मावर त्यांची अपार निष्ठा होती, असे वर्णन केले आहे. यांच्यापैकी बहुतेकांनी आपल्या घराण्यातील कन्या मोगलांस दिल्या होत्या व मोगलसाम्राज्याचा विस्तार करण्यात आपले शक्तिसर्वस्व वेचले होते. वर सांगितलेच आहे की, रजपुतांनी राजस्थानाबाहेर राज्यसाम्राज्यविस्तारासाठी कधीच पाऊल टाकले नाही. पण टाकले नाही ते हिंदुराज्यविस्तारासाठी ! मुस्लीम साम्राज्यासाठी ते मध्य आशियापासून तंजावरापर्यंत आणि सिंधपासून बंगाल बिहारपर्यंत सेना घेऊन दौडत होते. महाराणा प्रतापसिंह यांचे स्वातंत्र्य-संपादनाचे प्रयत्न यांनीच विफल केले. शिवछत्रपतींवर तो प्रसंग यांनीच आणला होता. मिर्झाराजा जयसिंह म्हणत असे की, दिल्लीचे नशीब माझ्या हाती आहे. मी दिल्लीचे केव्हाही चूर्ण करू शकेन. आणि त्याचे सेनासामर्थ्य व सेना-नायकत्वाचे गुण पाहता, ते अक्षरशः खरे होते असे दिसते. त्याच्याजवळ बावीस हजार रजपूत घोडेस्वार असत. गझनीच्या महंमदाजवळ पंधरा हजारच घोडेस्वार होते. त्याचा पूर्वज मानसिंह याच्याजवळ वीस हजार कडवी रजपूत सेना होती. पण ती घेऊन तो अकबराच्या सेवेस नेहमी सज्ज असे.

अंगी सेनानायकाचे विपुल गुण आहेत, प्रचंड सेना हाताशी आहेत, स्वधर्माचा अभिमानही आहे; तरी हे सर्व रजपूत वीर बादशहाच्या सेवेत राहून हिंदुराज्ये बुडविण्याच्या व मुस्लीम राज्यविस्ताराच्या उद्योगात गुंतलेले असत.

याचा अर्थ असा की स्वराज्य व स्वधर्म यांचा काही संबंध असतो हे त्यांच्या स्वप्नातही नव्हते. व्रतेवैकल्ये, तीर्थयात्रा, उपास, गोब्राह्मणपूजन, दानधर्म, पूजा अभिषेक यांचा आचार केला की आपण स्वधर्माचे पालन केले असे त्यांना वाटत होते. आणि ही श्रद्धा अजूनही हिंदुसमाजात दृढमूल आहे. हिंदुधर्माला व्यक्तिधर्माचे स्वरूप कसे आले होते, हे यावरून स्पष्ट होते. धर्म हा समाजाच्या धारणेसाठी, अभ्युदयासाठी, संघटनेसाठी असतो हा प्राचीन विचारच हळूहळू या भूमीतून नाहीसा झाला आणि या समाजाला संघटनतत्त्वच राहिले नाही. राष्ट्रभावना शक-यवन-हूणांच्या आक्रमणाच्या काळी बऱ्याच प्रमाणात होती. तिचा पुढे लोप झाला. आणि धर्माला व्यक्तिनिष्ठ रूप आले. मोक्ष ही कमालीची व्यक्तिनिष्ठ कल्पना आहे. तिला समाजनिष्ठ करण्याचा गीतेतील भागवतधर्माचा प्रयत्न होता. पण टिळकांनी गीतारहस्यात म्हटल्याप्रमाणे, भागवतधर्मही पुढे निवृत्तिप्रधान म्हणजे व्यक्तिनिष्ठ झाला. व्रतेवैकल्ये, उपासतापास, तीर्थयात्रा यांचा तर समाजनिष्ठेशी केव्हाच संबंध नव्हता. यामुळेच स्वराज्य व स्वधर्म यांचा संबंध तुटला व मानसिंग, जयसिंह हे स्वराज्यशत्रू स्वधर्मनिष्ठ ठरू लागले.

ब्रह्मक्षत्र :

स्वधर्म व स्वराज्य यांचा संगम म्हणजेच प्राचीन काळचा ब्रह्मक्षत्रसंयोग होय. ब्राह्मण व क्षत्रिय यांनी जर सहकार्य केले तर, अग्नी वने जाळतो, तसे ते शत्रूला जाळून टाकतील, (वन, १८५, २५) ब्राह्मण क्षत्रियाचे सामर्थ्य वाढवितो व क्षत्रियामुळे ब्राह्मणाचा उत्कर्ष होतो, (शांति, ७३, ३२) अशा तऱ्हेची अनेक वचने महाभारतात आहेत. समाजाच्या उत्कर्षासाठी स्वधर्म व स्वराज्य यांची सांगड अविभाज्य असली पाहिजे, असाच त्यांचा अर्थ आहे. धर्माचा विचार करतानाही, राजधर्मात सर्व धर्म समाविष्ट होतात, असा पितामह भीष्मांचा अभिप्राय होता. ते म्हणतात, 'ज्याप्रमाणे एकट्या हत्तीच्या पावलात इतर सर्व प्राण्यांच्या पावलांचा समावेश होतो त्याप्रमाणे एका राजधर्मात इतर सर्व धर्मांचा अंतर्भाव होतो.' (शांति, ६३, २५) राजधर्मविहीन व्रतेवैकल्ये, उपासतापास, तीर्थयात्रा यांना प्राचीन ऋषी धर्म म्हणण्यास सिद्धच नव्हते. याचाच अर्वाचीन भाषेत अर्थ असा की जो स्वातंत्र्यद्रोही असतो तो स्वधर्मनिष्ठ

असणेच शक्य नाही. त्याच्या सोमवार–एकादश्यांना व प्रयाग-काशीच्या वाऱ्यांना काडीमात्र अर्थ नाही. हे सर्व राजे स्वतःला क्षत्रिय म्हणवीत असत. महाभारतकारांच्या मते क्षत्रियाचा धर्म कोणता? क्षत्रियाला शत्रूच्या नाशा-वाचून दुसरा धर्म नाही. (उद्योग-२१-४३) युद्धात जय मिळवणे हाच क्षत्रियाचा व्यवसाय होय. (सभा, ५५,७) राज्य जिंकण्याच्या कामी कोणी अडथळा करील तर त्याचा वध करणे हा क्षात्रधर्म होय. (शांति १२,१०,७) असे क्षात्रधर्माचे स्पष्टीकरण त्यांनी केले आहे. पण मानसिंग, जसवंतसिंह हे शत्रूचे दास्य पतकरूनही स्वतःला श्रेष्ठ क्षत्रिय म्हणवीत! अत्यंत विपरीत गोष्ट अशी की चितोडच्या महाराण्यांपुढे नमण्यात किंवा शिवछत्रपतींच्या सेवेत त्यांना कुलाभिमान गेला असे वाटत असे, अपमान वाटत असे. पण वंशपरंपरा मोंगलांची गुलामी पतकरण्यात वा त्यांना कन्या देण्यात, कुलाभिमान दुखविला असे वाटत नसे. स्वराज्य व स्वधर्म यांची फारकत झाल्याचे हे लक्षण होय. असा धर्म समाजसंघटना करण्यास सर्वस्वी अयोग्य ठरतो. याच काळात मुस्लीमांनी अनेक वेळा 'धर्म' हे संघटनतत्त्व मानले होते. बाबर व संग यांचे खानव्याला युद्ध झाले त्यात प्रथम बाबराची सेना वीस हजारच होती. पण संगाने पूर्वी पराभूत करून सोडून दिलेले सर्व मुस्लीम त्याला मिळाले व ती सेना लाखावर गेली.

स्वराज्यद्रोही तो धर्मद्रोही :

डॉ. एस् दत्त यांनी संग व बाबर यांच्या सेनांचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे : बाबराजवळ १५००० च सैन्य होते. पण मरू किंवा मारू अशा त्वेषाने ते पेटले होते. आणि ते दृढ व संघटित असे होते. उलट संगाच्या सैन्यात दृढनिष्ठा व संघटना या दोहींचा अभाव होता. संगाच्या सैन्यात हिंदू होते तसेच मुसलमानही होते. पण मुस्लीमांच्या चित्तात अफगाण साम्राज्याच्या आकांक्षा होत्या. त्यामुळे ते मनापासून लढलेच नाहीत. तरी त्यांनी संगाचा पक्ष घेतल्यामुळे बाबर त्यांना धर्मभ्रष्ट म्हणतो. (त्याच्या मनात स्वराज्य व स्वधर्म यांची फारकत झालेली नव्हती हे यावरून स्पष्ट आहे.) शिवाय संगाच्या सैन्यात जे हिंदू होते ते केवळ जुलमाचा रामराम म्हणून आले होते. कारण संगाचे आधिपत्य व श्रेष्ठत्व त्यांना मनातून सहन होत नव्हते. लढाई संपताच

भिन्न रजपूत जमाती सरळ आपापल्या देशी निघून गेल्या. बलाढ्य अशा संगाच्या जोखडाखालून बरे सुटलो, असे जणू त्यांना वाटले. (हिस्टरी ॲण्ड कल्चर ऑफ दि इंडियन पीपल – संपादक डॉ. मुनशी, खंड ६ वा, पृ. ३८६) डॉ. दत्त म्हतात की, संग हा रजपुतांच्या भिन्न जमातीत राष्ट्रैक्याची जोपासना करू शकला नाही. म्हणून हे अपयश आले. हे तर खरेच आहे. ' रजपूत तेवढा मेळवावा ' असा महामंत्र त्यांना कोणीच दिला नव्हता. आणि ही भावना एका एकी उद्‌भवणे कठिणच असते. पण धर्मावर तर सगळ्यांचे प्रेम होते ना ? निष्ठा, भक्ती, अभिमान ही होती ना ? होय. हे सर्व होते. पण धर्म म्हणजे काय हेच त्यांना माहीत नव्हते. हे एक संघटनतत्त्व आहे, त्याचा स्वातंत्र्याशी संबंध आहे, इतर अभिमान व मानापमान त्या निष्ठेत विलीन केले पाहिजेत, असे त्यांना कोणी शिकविलेच नव्हते. त्यावेळचे धर्मशास्त्रज्ञ व त्यांचे धर्मशास्त्र केवळ व्यक्तिधर्माला वाहिलेले होते. समाजधर्म ते जाणीतच नव्हते. अशा धर्मशास्त्रापायी विघटनेवाचून दुसरे काय होणार ?

मॅझिनीचे राजकीय तत्त्वज्ञान विशद करताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी त्याच्या चरित्राच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, राजकारणाला धर्म आहे व धर्माला राजकारण आहे, हे महत्सत्य, हे कालदेशाबाधित सत्य ओळखून प्रत्येकाने परमेश्वरी कर्तव्य म्हणून स्वातंत्र्यलढ्यासाठी सिद्ध झाले पाहिजे. कारण व्यक्तीच्या, कुटुंबाच्या, समाजाच्या व मनुष्यजातीच्या सर्व प्रकारच्या उन्नतीचे मुख्य साधन राजकीय स्वातंत्र्य हे आहे. म्हणून त्याचे संपादन व संरक्षण करणे हे प्रत्येक व्यक्तीचे प्रथम कर्तव्य होय. ती परमेश्वराची आज्ञाच आहे. राजधर्म सर्व धर्मात श्रेष्ठ असे म्हणण्यात पितामह भीष्मांचा जो अभिप्राय आहे तोच मॅझिनीच्या मनात होता, असे यावरून दिसते. पण निवृत्ती, व्रतवैकल्ये, केवलभक्ती, जातिभेद, चातुर्वर्ण्य, पंथभेद या हिंदुधर्मशास्त्रातील घातक तत्त्वांमुळे राजधर्माचा हिंदूंना विसर पडला व ते परकीय आक्रमणास बळी पडले, आणि त्यामुळे अंती त्यांचा धर्महीं गेला व स्वातंत्र्यही गेले. लक्षावधी लोकांना मुस्लीमांनी सक्तीने बाटविले, लक्षावधी स्त्रियांवर बलात्कार केले, त्यांना दासी म्हणून परदेशात विकले व आपल्या जनानखान्यात घातले. सहस्रावधी मंदिरांचा व मूर्तींचा विध्वंस केला व शेकडो धर्मग्रंथ, धर्मपीठे व धर्मप्रवक्ते यांना जाळून टाकले. स्वराज्य व स्वधर्म यांचा अभेद हिंदूंनी जाणला नाही

त्याचे हे प्रायश्चित्त आहे. अजूनही त्याच भ्रांतीमुळे तशीच फळे ते भोगीत आहेत. आत्मा आणि परमात्मा यांचा अभेद यांचे ऐक्य, त्यांनी जाणले नसते तरी फारसे बिघडले नसते. अद्वैत तत्त्वज्ञानाची उपासना त्यांनी केली नसती तरी धर्महानी झाली नसती. पण स्वराज्य व स्वधर्म यांचे अद्वैत येथील शास्त्रज्ञांनी जाणून ते लोकमानसात दृढमूल करावयास हवे होते. पण त्यांनी नेमके उलट केले. जीवशिवांच्या अभेदावार सर्व शक्ती खर्च केली आणि स्वराज्य-स्वधर्मांच्या अद्वैताची संपूर्ण उपेक्षा केली. म्हणूनच हिंदुधर्म हा संघटनतत्त्व होऊ शकला नाही. आणि त्यामुळे हिंदुसमाज छिन्नभिन्न झाला. तो समाजच राहिला नाही.

वैयक्तिक कर्तृत्व :

महंमद घोरी, कुतुबुद्दिन ऐबक, अल्तमश, बल्बन, अल्लाउद्दिन खिलजी, बाबर, यांच्याशी वैयक्तिक दृष्टीने तुलना करता पृथ्वीराज चव्हाण, चक्रवर्ती हम्मीर, राणा कुंभ, राणा संग हे रजपूत महावीर लवमात्र कमी नव्हते. आणि त्याग, चारित्र्य, प्रजाहितदक्षता या गुणांत तर ते शतपटीने श्रेष्ठ होते. अकबर हा मुस्लीमांतील मोठा बादशहा. त्याच्याशी तुलना केली तर महाराणा प्रताप-सिंह हे कर्तृत्वाच्या दृष्टीने मुळीच कमी नव्हते. पण अकबर हा सर्व उत्तर हिंदुस्थानचा बादशहा झाला व राणाजींना आयुष्यभर प्राणांतिक झगडा करूनही शेवटी चितोड घेता आला नाही ! याचे कारण हिंदुसमाज किंवा नुसते रजपूत सुद्धा राणाजींच्या पाठीशी नव्हते, नव्हे तेच अकबराचे सेनापती होऊन राणा-जींच्या व हिंदुसमाजाच्या नाशास प्रवृत्त झाले होते, आणि तरीही हिंदुधर्म-शास्त्र त्यांना भ्रष्ट म्हणत नव्हते, हे होय. उलट अकबराच्या मागे, हिंदूंशी प्रसंग असला म्हणजे तरी, सर्व मुस्लीम समाज उभा असे. म्हणजे तुलनेने पाहता मुस्लीम समाज हा समाज होता. त्यामुळेच वैयक्तिक कर्तृत्वात राणाजींच्या पेक्षा विशेष आधिक्य नसूनही अकबर सुलतान होऊ शकला. मायभूमीचे स्वातंत्र्य हे धर्माच्या प्रगतीचे एक लक्षण होय असे हिंदुधर्मशास्त्राने मानले असते, स्वातंत्र्य व धर्म यांत अद्वैत मानले असते तर या भूमीत कलियुग आलेच नसते.

विजयनगर :

विजयनगरच्या संस्थापकांनी व नेत्यांनी मात्र हे अद्वैत पुरेपूर जाणले होते. मुस्लीमांचे आक्रमण हे हिंदुधर्मावरील भयानक संकट आहे हे तर त्यांनी ओळखलेच; पण त्याबरोबर या धर्माच्या रक्षणासाठी स्वराज्याखेरीज अन्य उपाय नाही हे महान सत्य त्यांनी ध्रुवासारखे सतत दृष्टीसमोर ठेविले होते. त्यामुळे त्यांना समाजसंघटना कशी करता आली व त्या घोर आपत्तीपासून हिंदुसमाजाचे कसे रक्षण करता आले ते आता पाहावयाचे आहे.

हिंदू पंडितांचे उद्योग :

विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना इ. स. १३३६ साली झाली. वर सांगितलेच आहे की तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत मुस्लीमांनी उत्तर हिंदुस्थान जिंकले असले तरी दक्षिणेत त्यांचा प्रवेश झाला नव्हता. पण चौदाव्या शतकाच्या प्रारंभी तसा प्रवेश होताच अवघ्या १५-२० वर्षांत देवगिरी यादव, द्वारसमुद्र – होयसळ यादव, वरंगळ – काकतीय व मदुरा – पांड्य या चारही बलाढ्य साम्राज्यांचा त्यांनी विध्वंस करून टाकला. डॉ. एस्. कृष्णस्वामी अय्यंगार म्हणतात की ' मुबारिक खिलजीने देवगिरीचा नाश करून तेथे लष्करी तळ केला हे दक्षिणेतील सत्तांचे डोळे उघडण्यास पुरेसे अंजन होते. वास्तविक हेही अंजन हवे होते असे नाही. ' त्यांचा भावार्थ असा की, उत्तर हिंदुस्थानातील मुस्लीम आक्रमण, अत्याचार व त्यांच्या साम्राज्याची स्थापना या घटनांवरून दाक्षिणात्य सत्तांना मुस्लीम आक्रमणाचे स्वरूप व त्याचा अर्थ पूर्वीच कळावयास हवा होता. पण या काळात ते अशक्य होते. कोणत्याही घटनेचा अर्थ आकळण्याची ऐपतच त्या वेळी हिंदुसमाजधुरीणांत राहिली नव्हती. आत्मा व परमात्मा यांत पूर्ण अद्वैत आहे की विशिष्ट अद्वैत आहे, एकादशीसारख्या उपवासाला तांबडा भोपळा चालेल की दुध्या, अनंतव्रताला लाडू चालतील की घीवर, स्नानसंध्या तीन वेळा करावी की दोन वेळा, गंध आडवे लावावे की उभे, अस्पृश्यांचा वारा अंगावर आला तर कोणते प्रायश्चित्त घ्यावे, सावली पडली तर कोणते आणि प्रत्यक्ष स्पर्श झाला तर कोणते, जेवताना अंगावर एक वस्त्र असावे की दोन, पाय ओले असावेत की कोरडे, मुलीचे लग्न आठव्या वर्षी करावे की सव्वा आठऱ्या वर्षी, यांपैकी कोणत्या

चयामुळे उभयकुलांचा उद्धार होईल, याव असल्या गहन व समाज-जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या समस्या सोडविण्यात येथल्या धर्मशास्त्रज्ञांची बुद्धी चोवीस तास गुंतलेली असल्यामुळे, मंदिरविध्वंस, स्त्रियांवरील अत्याचार, पारतंत्र्य असल्या क्षुल्लक प्रश्नांचे अर्थ आकळून घेण्यास त्यांना वेळच नव्हता ! काही संन्यासी, संत यांना वरील गहन समस्यांत रस वाटत नव्हता. पण त्यांना इहलोकीच्या कोणत्याच वस्तूविषयी गृह, वित्त, धन, दारा, सुत, स्वराज्य, साम्राज्य, शत्रू, मित्र, यांपैकी कशाविषयीही – रस नव्हता. त्यामुळे अल्लाउद्दिन आणि रामदेवराव यांत त्यांना भेद वाटत नव्हता. इतर काही बुद्धिमंतांनी आपली दृष्टी साहित्याकडे वळवून एका उपमेत ऐशी प्रकार कसे होतात हे सांगण्यात, नाटकातील नायिकांचे नवऱ्याच्या सहवासात राहणारी, जिचा नवरा प्रवासास गेला आहे अशी, जिच्यावर रमणाचे प्रेम आहे अशी, नाही अशी, असे भेद ठरविण्यात आणि यांत पुन्हा नवबाला, प्रौढा, गतवयस्का या दृष्टीने प्रत्येक प्रकाराचे आणखी भेद कसे करता येतील हे पाहण्यात आपली सर्व प्रज्ञा गुंतविलेली होती. मिळून काय, राजकारणाविषयी स्वराज्य, स्वातंत्र्य यांविषयी सर्व उदासीन होते. त्यामुळे उत्तर हिंदुस्थान गेला, चितोडही पडले, देवगिरीचे साम्राज्य कोसळून पडले तरी दक्षिणेत कोणाचे डोळे उघडले नाहीत.

आणि राजांचे :

देवगिरीच्या रामचंद्ररावाचा पहिला पराभव १२९६ मध्ये झाला. त्यानंतर त्याने नियमित खंडणी दिली नाही म्हणून मालिक काफूरने स्वारी करून त्याला कैद करून दिल्लीला नेले (१३०४). आगामी आपत्तीची कल्पना येण्यास हे पुरेसे होते; पण १३०९ मध्ये मलिक काफूर वरंगळवर चालून आला तरी त्याला तोंड देण्याची कसलीच तयारी तेथे नव्हती. रामचंद्ररावाने या वेळी दक्षिणेतील इतर राज्ये बुडविण्यास मनोभावे साह्य केले. यात आपण धर्मद्रोह करीत आहो असे त्याला मुळीच वाटले नाही. अर्थातच वरंगळच्या प्रतापरुद्राचा पराभव झाला आणि प्रचंड लूट घेऊन काफूर परत गेला. १३११ मध्ये तो पुन्हा दक्षिणेत आला. आता द्वारसमुद्राच्या वीर बल्लाळावर त्याला धाड घालावयाची होती. वीर बल्लाळ हा रामचंद्ररावाचा जुना वैरी. तेव्हा ही संधी साधून त्याने काफूरबरोबर साह्यार्थ परशुरामदेव या सुभेदाराला विपुल

फौजफाटा देऊन पाठविले. उत्तरेतून ही काळलाट येत असताना, द्वारसमुद्रावर ती धडकण्याची वेळ आली तरी वीर बल्लाळ राजधानीत नव्हता. तो कोठे गेला होता ? मदुरेच्या पांड्य राज्यावरील हक्काविषयी सुंदर पांड्य व वीर पांड्य हे आपसात झगडत होते. त्यांनाही या वेळी आपण भांड्र नये असा विवेक सुचला नाही. आणि वीर बल्लाळालाही, या भांडणाचा फायदा उठविण्याची ही वेळ नव्हे, हे ध्यानात आले नाही. वरून तो काळ चालून येत असताना वीर बल्लाळ पांड्यांवर स्वारी करून त्यांचा मुलूख घशात घालण्याच्या उद्योगात गढून गेला होता. अर्थात तो राजधानीत–द्वारसमुद्रास–परत आला तेव्हा रामचंद्रराव व प्रतापरुद्र यांच्याच मार्गाने जाण्यावाचून आपल्याला गत्यंतर नाही हे ध्यानी येऊन त्याने शरणागती पत्करली. त्यानंतर पांड्यांची घटका भरली. त्यांनी गनिमी काव्याने दऱ्याखोऱ्यातून बराच तीव्र प्रतिकार केला. त्यामुळे काफूरच्या सैन्याची बरीच दुर्दशाही झाली. पण अंती विजय त्याचाच झाला. त्याने देवगिरी, वरंगळ, द्वारसमुद्र यांच्या प्रमाणेच पांड्यांची राजधानी मदुरा जाळून टाकली आणि तेथून थेट रामेश्वरला जाऊन तेथे त्याने मशीद बांधली.

यानंतरही सात वर्षे गेली. १३१८ मध्ये मुबारिक खिलजी पुन्हा देवगिरीवर चालून आला. पण तरीही हरपाळदेवाची तयारी नव्हती. त्याचा पराभव करून त्याला मुबारिकने जिवंत सोलून मारले. तेथून मुबारिक वरंगळला गेला. तेथे प्रतापरुद्राचीही तीच स्थिती होती. हिंदू एक तर पूर्ण बेसावध असत किंवा सावध असूनही त्यांचे कर्तृत्व शून्य झाल्यामुळे त्यांना राज्य, लष्कर, यांची संघटना करता येत नव्हती. परिस्थितीचे ज्ञान करून घ्यावे, स्वपरबलाबल जाणावे, उपायचिंतन करावे हे सामर्थ्यच त्यांच्या ठायीचे नष्ट झाले होते. या वेळी प्रतापरुद्राचा पराभव झाला; पण त्यामुळे त्याला काही उमज पडला, असे नाही. १३२१ साली ग्यासुद्दीन तघलखाने आपला मुलगा जौनाखान याच्या आधिपत्याखाली वरंगळवर फिरून फौज धाडिली तेव्हा प्रतापरुद्र काय करीत होता ? आर. सी. मजुमदार म्हणतात, 'दिल्लीला बंडाळ्या माजलेल्या ऐकून त्याने सुलतानी जू झुगारून दिले; खंडणी देण्याचे नाकारले आणि वारंवार येणाऱ्या सुलतानी आक्रमणापासून स्वधर्म, स्वदेश, यांचे रक्षण करण्यासाठी हिंदूंची संयुक्त आघाडी निर्माण करण्याऐवजी त्याने लष्करी स्वाऱ्या करून भोवतालची राज्ये जिंकण्याचा उद्योग आरंभिला! राजनैतिक विद्या व

शहाणपण कसले ते त्याला मुळीच नव्हते. त्यामुळे मुस्लीम आक्रमणाचे स्वरूप त्याला कळले तरी नसावे किंवा कळूनही तो बेसावध राहिला असावा.' –(हिस्टरी ॲण्ड कल्चर ऑफ इंडियन पीपल; संपादक : डॉ. मुनशी.– खंड ६ वा, पृ. ५३)

अधोगामी धर्म :

१२९४ पासून १३३६ पर्यंत म्हणजे विजयनगरची स्थापना होईपर्यंत सतत चाळीस वर्षे दिल्लीचे सुलतान दक्षिणेवर स्वाऱ्या करीत होते. त्यात त्यांचा एकदाही पराभव झाला नाही. एकाद्दुसऱ्या स्वारीतील जयापजय हा योगायोग मानता येईल. पण या चाळीस वर्षांत त्यांच्या वीस तरी स्वाऱ्या झाल्या असतील. शिवाय हिंदूंची भिन्न राज्ये होती. यादव, होयसळ, पांड्य व काकतीय असे चार हिंदू राजवंश होते. पण एकही या मुस्लीम आक्रमणाचा प्रतिकार करू शकला नाही. दोन स्वाऱ्यांमध्ये कधी तीन, कधी चार, तर कधी दहा वर्षांचासुद्धा अवधी गेलेला आहे. म्हणजे हिंदूंना उसंतच मिळाली नाही असे नाही. मुसल्मान सेनापती एकच एक सतत येत होता आणि तो असामान्य होता, असेही नाही. अल्लाउद्दिन खिलजी, मलिक काफूर, खुश्रूखान, मुबारिक शहा, जौनाखान, महंमद तघलख, जलालुद्दिन असे अनेक मुस्लीम सेनापती या स्वाऱ्या घेऊन येत होते. ते सर्वच्या सर्व हिंदुराज्ये बुडविण्यात यशस्वी व्हावे आणि दोन–दोनशे वर्षे स्थायी झालेल्या सूर्यचंद्रवंशीय हिंदु साम्राज्यांना त्यांचा प्रतिकार करता येऊ नये याचा अर्थ काय? याचा अर्थ एकच होतो, हिंदुसमाजात जीवनशक्ती राहिलीच नव्हती. त्यांचा धर्म, म्हणजेच अर्वाचीन भाषेत त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान, अत्यंत विकृत, अत्यंत हीन व अधोगामी झाले होते. हे विकृत तत्त्वज्ञान, हा अधोगामी घातक धर्म कोणता याचे विवरण मागल्या प्रकरणात विस्तरशः केले आहे. या प्रकरणातही प्रारंभी त्याचा सारार्थ सांगितला आहे. जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता, तज्जन्य विषमता, अंधरूढीचे प्राबल्य, देश-कालपरिस्थिती पाहून चिंतन करण्याची असमर्थता, धर्माची अपरिवर्तनीयता, त्यातील कर्मकांड, संन्यास, निवृत्ती, परलोकनिष्ठा, शब्दप्रामाण्य, राजधर्माची उपेक्षा, स्वराज्य व स्वधर्म यांची फारकत हीच त्या अधोगामी, हीन, अमंगळ धर्माची लक्षणे होत. अशा या धर्मामुळे हिंदुसमाजाचा नाश झाला हे मुस्लीम

आक्रमणाचा जो थोडा इतिहास वर दिला आहे, त्यावरून कोणाच्याही ध्यानात येईल, आणि मग विजयनगर, मराठे व शीख यांच्या यशाचे स्वरूप पाहता त्यांच्या धुरीणांनी धर्मशास्त्रात काही अंशी तरी क्रान्ती केली असली पाहिजे, त्याशिवाचून त्यांना यश मिळणे सर्वथा असंभवनीय होते, असा विचार मनात येऊन त्या धर्मक्रान्तीचे स्वरूप काय हे जाणून घेण्यास मन उत्सुक होईल.

विजयनगरच्या धुरीणांनी धर्मक्रान्ती केली होती हे अगदी निर्विवाद होय. यादव, होयसळ, पांड्य व काकतीय यांना मुळीच यश आले नाही आणि विजयनगरला एक प्रचंड साम्राज्य स्थापून अडीच-तीनशे वर्षे यशस्वी प्रतिकार करून तुंगभद्रेच्या खालच्या प्रदेशात हिंदुधर्म व हिंदू संस्कृती यांचे रक्षण करता आले याचे श्रेय त्या धर्मक्रान्तीलाच आहे हे आता सर्वमान्य झाले आहे.

विजयनगर—धर्मक्रान्ती :

धर्मक्रान्तीवाचून समाजउत्कर्ष होणार नाही अशी विजयनगरच्या धर्मधुरीणांच्या बुद्धीची निश्चिती झाली होती याचे पहिले गमक म्हणजे त्यांनी पतितशुद्धीच्या रूढीचे केलेले पुनरुज्जीवन हे होय. देवलस्मृतीने, मुस्लीमांनी सक्तीने ज्यांचे धर्मांतर केले त्यांची शुद्धी करावी, असे शास्त्र आठव्या शतकात सांगितले होते. पण नंतरच्या काळात, कलिवर्ज्यांचा कर्ता आणि इतर स्मृतिकार व निबंधकार या अंध, मूढ व अविवेकी धर्मशास्त्रज्ञांनी देवलांचे ते शास्त्र त्याज्य ठरविले होते. पण विद्यारण्य तथा माधवाचार्य हे जे चौदाव्या शतकातील धर्मद्रष्टे थोर पुरुष यांना शुद्धिबंदी किती घातक आहे हे ध्यानात येऊन त्यांनी हरिहर आणि बुक्क या इस्लामला सक्तीने बळी पडलेल्या थोर सरदारांना शुद्ध करून परत स्वधर्मात घेतले.

विद्यारण्य :

कांपिली हे त्या काळी एक स्वतंत्र राज्य होते. धारवाड, बेल्लारी, रायचूर हे परगणे त्यात समाविष्ट होते. त्या राज्यावर मुस्लीमांची धाड आली त्या वेळी तेथील राजा कांपिलीदेव रणांगणी पडला. त्याच्या सर्व पुत्रांना व सरदारांना महंमद तघलख याने कैद करून सक्तीने बाटविले. हरिहर आणि बुक्क हे विजयनगरचे संस्थापक हे कांपिलीदेवाचेच सरदार होते. त्यांना दिल्लीला नेऊन

सुलतानाने नंतर कांपिली राज्याच्या बंदोबस्तासाठी आपले सेनापती–सुभेदार म्हणून परत पाठविले. हे दोघे वरंगळचे सरदार होते असे कोणी म्हणतात. पण इस्लामचा स्वीकार करून ते सुलतानाचे सुभेदार म्हणून परत दक्षिणेत आले होते याविषयी फारसा वाद नाही. (डॉ. मुनशी, उक्तग्रंथ, पृ. ६२, ७७, २७१) धर्मांतर झाले तरी हरिहर व बुक्क यांना इस्लामविषयी मुळीच प्रेम नव्हते. त्यांच्या अंतःकरणात हिंदू धर्माविषयी अजून दृढ भक्ती होती. पण तरीही त्यांना विद्यारण्यासारखा स्वतंत्र प्रज्ञेचा धर्मवेत्ता पुरुष भेटला नसता तर त्यांचा नाइलाज होऊन इतर अनेक धर्मांतरित पराक्रमी पुरुषांप्रमाणे त्यांनी कांपिलीस किंवा अन्यत्र आपल्या मुस्लीमवंशाची गादी स्थापिली असती. पण सुदैवाने त्यांना विद्यारण्य भेटले. त्यांनी त्यांना स्वधर्मात परत येण्याचा उपदेश केला आणि शुद्धीची जबाबदारी स्वतःच्या शिरी घेऊन, त्यांचे गुरू शृंगेरीपीठाचे शंकराचार्य विद्यातीर्थ याची संमतीही मिळविली. राजसत्तेप्रमाणेच धर्मसत्तेचे आहे. तिच्यापीठावर अधूनमधून जरी एखादा प्रज्ञावंत पुरुष आला तरी तो समाजाच्या प्रगतीला अत्यंत वेगाने चालना देतो. आद्य शंकराचार्यांनंतर विद्यातीर्थांपर्यंत अनेक शंकराचार्य त्या गादीवर आले असतील, पण त्यांत द्रष्टा असा कोणीच नव्हता. नाही तर आपल्या कालभेदी दृष्टीने इस्लामी आक्रमणाचे स्वरूप जाणून त्याने आधीच उठावणी केली असती. पण तसे घडले नाही. उत्तर हिंदुस्थानातील अनर्थ दक्षिणेत कोणी आकळलाच नाही. सुदैव एवढेच की तो अनर्थ दक्षिणेत कोसळल्याबरोबर त्याचे स्वरूप जाणून त्याच्या प्रतिकारासाठी फार मोठे धर्मपरिवर्तन घडविणे अवश्य आहे हे जाणून ते घडविण्यास उद्युक्त होणारे विद्यारण्य-विद्यातीर्थ यांसारखे थोर पुरुष येथे निर्माण झाले. ते न होते तर हरिहर व बुक्क स्वधर्मात परत आले नसते. आणि मग हिंदुधर्माच्या पुनरुत्थानाची आशा कितपत धरता आली असती याचा प्रत्येकाने स्वतःशीच विचार करावा. विजयनगरच्या साम्राज्याची स्थापनाच असंभवनीय झाली असती. आणि मग मराठ्यांचा उदय होण्याचा काल येईपर्यंत सर्व हिंदुस्थान इस्लाममय झाला असता. पण विद्यारण्यांनी मोठे धैर्य दाखवून त्या बंधूंचे परिवर्तन केले म्हणून ते अशुभ टळले. त्या वेळी जनतेच्या मनावर रूढ अंध धर्मशास्त्राचेच संस्कार होते. त्यामुळे लोकांचा शुद्धीला विरोध होता. पण विद्यारण्यांनी जरा चतुराई लढवून असे जाहीर केले की, हरिहर स्वतः राजा न होता साक्षात भगवान विरूपाक्षच राज्य

करणार आहेत. आणि हरिहर त्याचे प्रतिनिधी म्हणून कारभार पाहणार आहेत. प्रारंभी राजमुद्राही देवाच्या नावाचीच करण्यात आली आणि अशारीतीने लोकांचा विरोध वितळविण्यात आला.

व्यक्तिगत व राष्ट्रीय आकांक्षा :

अनागोंदीस हरिहराने राज्य स्थापन केले आणि विजयनगर या राजधानीचा पायाही घातला. अर्थात त्याला सुखाने कोणीच राज्य करू देणार नव्हते. दिल्लीचे सुलतान हे तर त्याचे शत्रू होतेच, पण कापय नायक व होयसळ राजा वीर बल्लाळ या हिंदूंनीही परिस्थिती ओळखून त्याच्याशी सहकार्य करावयाचे, ते न करता त्याच्याशी शत्रुभावच धरला. कारण त्यांनाही सम्राटपदाची महत्त्वाकांक्षा होती. त्या मागल्या काळात हिंदुराजनीतिशास्त्राने घटनात्मक अशी कोणतीच राज्यव्यवस्था निर्माण केलेली नव्हती. किंबहुना ब्रिटिश येथे येईपर्यंत घटनाबद्ध संस्था अशी भारतात नव्हतीच. त्यामुळे समाजाचे सर्व भवितव्य व्यक्तीवर अवलंबून असे आणि धर्म हे संघटनतत्त्व नसल्यामुळे साम्राज्याकांक्षा असलेल्या दोन हिंदू पराक्रमी पुरुषांनी आपसात लढून निर्णय करण्याखेरीज गत्यंतरच नव्हते. वीर बल्लाळ व हरिहर यांची प्रत्यक्ष लढाई झाली नाही. पण महंमद तघलखाने मदुरेस स्थापन केलेल्या मुस्लीम राज्याचा सुभेदार जलालुद्दिन यांशी बल्लाळाने एकट्याने लढा द्यावयाचे ठरविले. आणि त्याने तहाच्या वाटाघाटीच्या मिषाने त्यास बोलावून तेथे दग्याने ठार मारले. अशा रीतीने बल्लाळाला सम्राटपद तर नाहीच मिळाले, तर हिंदूंची एक मोठी शक्ती मात्र वाया गेली. आणि मदुरेची मुस्लीम सत्ता नष्ट करण्यास विजयनगरला दीर्घकाळ लागला. हरिहरानंतर बुक्क गादीवर आला. त्याच्या कारकीर्दीत १३७० साली त्याचा मुलगा कंपन याने मदुरेवर स्वारी करून सुलतानास ठार मारले. वीर बल्लाळाने काळ जाणला असता, हरिहराशी सहकार्य केले असते, तर हे कार्य २८ वर्षांपूर्वीच झाले असते. तेवढ्या अवधीत मदुरेच्या सुलतानाने अनेक मंदिरे फोडली होती, स्त्रियांवर अत्याचार केले होते, आणि हजारो लोकांची कत्तल केली होती. मदुरा म्हणजे केवळ नरक झाला होता. व्यक्तिगत आकांक्षा जोपर्यंत समष्टीच्या आकांक्षात विलीन करण्यास हिंदू शिकत नाहीत तोपर्यंत त्यांचा हा नरकवास चुकावयाचा नाही. आत्मा परमात्म्यात विलीन करावा, भक्ताने ईश्वरेच्छेत आपल्या इच्छा

विसर्जित कराव्या, शिष्याने गुरुभक्तीत लोपावे, ही शिकवण हिंदुधर्म देतो. पण हे सर्व परमार्थात! ऐहिक उन्नतीसाठी, समाजाच्या दृढीकरणासाठी, संघटनेसाठी हे आत्मविसर्जन उपदेशावे याची चिंता हिंदुधर्मशास्त्रज्ञांनी कधी केली नाही.

राजधर्माचे पुनरुज्जीवन :

महाभारताने हे तत्त्वज्ञान प्रसारिले होते. त्यानंतर अनेक शतके त्याचा लोप झाला होता. माधवाचार्यांनी आता त्याचे पुनरुज्जीवन करावयाचे ठरविले. आणि महाभारताच्याच भाषेत बोलावयाचे म्हणजे ब्रह्म व क्षत्र यांचा संयोग घडवून आणला. त्यांचे गुरू शृंगेरीचे शंकराचार्य, विद्यातीर्थ (यांचे नाव विद्याशंकर असेही दिले आहे.) यांनी दक्षिणेत आठ पीठे स्थापन करून प्रत्येक ठिकाणी एका थोर संन्याशाची नियुक्ती केली. विद्यारण्य या सर्वांचे प्रमुख होते. (विद्यारण्य, माधव व सायण हे सर्व एक की भिन्न हा प्रश्न वादग्रस्त आहे. विद्यारण्य व माधव एकच आणि सायण त्यांचे बंधू असेही कोणी मानतात.) हरिहर आणि बुक्क यांना स्वधर्मात घेतल्यानंतर त्यांनी त्या पीठांच्या द्वारे स्वधर्मरक्षणासाठी स्वराज्याची स्थापना केली पाहिजे हा संदेश तुंगभद्रेच्या दक्षिणेस रामेश्वरापर्यंत जनतेत प्रसृत करण्याची व्यवस्था केली आणि सर्व जनशक्ती त्यांच्या मागे उभी केली. विद्यारण्य स्वतः या साम्राज्याचे मंत्रीही झाले. स्वराज्य व स्वधर्म यांचा असा संयोग झाल्यामुळेच, पूर्वी इतरांना जे यश आले नाही, ते विजयनगरच्या धुरीणांना अल्पावधीत प्राप्त झाले. (विद्यारण्यांच्या कार्याची माहिती–विजयनगर कमेमोरेशन व्हॉल्यूम – या ग्रंथात एस्. श्रीकांतय यांनी आपल्या लेखात दिली आहे. पृ. १६१ ते १६८.) ए. रामराव, असि. डायरेक्टर ऑफ आर्किऑलजी, म्हैसूर, यांनीही वरील ग्रंथातील आपल्या लेखात हेच मत मांडले आहे. ते म्हणतात, 'मुस्लीमांच्या आक्रमणापासून हिंदुधर्माचे रक्षण व्हावे ही तीव्र इच्छा दक्षिणेतील हिंदूंच्या सर्व जातींत निर्माण झाली होती. आणि तिच्यातूनच विजयनगर साम्राज्याचा उदय झाला. त्या वेळी स्वराज्य हाच स्वधर्मरक्षणाचा उपाय होय ही सर्वांची निश्चिती झाली होती. हे स्वराज्य विघटक शक्तींचा नाश करून आक्रमणास तोंड देण्यास आणि त्याचबरोबर या भूमीतील धार्मिक, सामाजिक, विद्याविषयक व आर्थिक अशा सर्व परंपरांचे व संस्थांचे रक्षण करण्यास समर्थ

असले पाहिजे अशी हिंदुमात्राची आकांक्षा होती. स्वधर्म व स्वराज्य यांच्या अभेदाविषयीच्या अशाच कल्पनांनी शिवाजी व त्याचे अनुयायी प्रेरित झाले होते व मराठी साम्राज्याच्या उभारणीमागे हीच प्रेरणा होती असे आपणांस दिसते.'–(हिंदुइझम् अंडर विजयनगर किंग्ज, पृ. ३९)

याच ग्रंथातील 'विजयनगरच्या इतिहासातील एक महत्त्वाचे प्रकरण' या आपल्या लेखात वेंकटेशम पंतलु यांनीही विजयनगरच्या यशाची अशीच मीमांसा केली आहे. ते म्हणतात, 'विजयनगरच्या साम्राज्याचा उदय व ऱ्हास या योगायोगाच्या गोष्टी नाहीत. मुस्लीम आक्रमणामुळे हिंदूंचे स्वातंत्र्यच नव्हे तर धर्म व एकंदर संस्कृती यांचाही उच्छेद होण्याची वेळ आली होती. अशा वेळी विद्यारण्यस्वामींचा उदय झाला. त्यांनी येथील अध्यात्मविद्या व राजविद्या यांचे पुनरुज्जीवन केले. यासाठी त्यांनी शृंगेरीच्या मठात नवजीवन निर्माण करून कर्नाटकात एकंदर आठ पीठांची स्थापना केली. यांचाच दक्षिणेतील राज्यांना दीपस्तंभासारखा उपयोग झाला. स्वामींनी स्वतः पंपा (हंपी) येथे विरूपाक्ष पीठ स्थापन करून हरिहर व बुक्क यांना साम्राज्यस्थापनेच्या कार्यात तेथूनच सर्व साह्य केले.' -(उक्तग्रंथ, पृ. २७२)

बुद्धिप्रामाण्य :

विद्यारण्य तथा माधवाचार्य यांनी घडविलेल्या धार्मिक क्रान्तीचे स्वरूप आता काहीसे स्पष्ट होईल असे वाटते. शुद्धिबंदीची अत्यंत घातक रूढी त्यांनी नष्ट केली; आणि स्वधर्माला इहाभिमुख बनवून शृंगेरीच्या पीठाकडूनच जनतेच्या मनावरील निवृत्तिवादाचे, राजकीय उदासीनतेचे कश्मल झाडून टाकले. हे सर्व त्यांना करता आले, करण्याचे धैर्य झाले याचे कारण म्हणजे देशकाल-परिस्थिती पाहूनच धर्मनिर्णय करणे अवश्य असते असा त्यांचा बुद्धिनिश्चय झाला होता हे होय. यापूर्वीच्या काळात मीमांसादर्शनाने शब्दप्रामाण्याची म्हणजे वेदप्रामाण्याची घातक कल्पना रूढ करून धर्म हा अदृष्टप्रधान असतो असा सिद्धान्त मांडला होता. धर्माचरणाची फले सर्व परलोकात मिळतात, ती मिळाली की नाही हे ठरविण्याचे सामर्थ्य मानवी बुद्धीला नाही, ती बरी – वाईट फले सर्व अदृष्टच असतात, तेव्हा फलांवरून, परिणामांवरून धर्माज्ञा योग्य की अयोग्य हे सांगणे अशक्यच आहे; म्हणून वेदाज्ञा शिरसावंद्य मानून

त्यांच्या युक्तायुक्ततेचा विचार न करता, परिस्थितीचा विचार न करता, त्यांप्रमाणे आचरण करणे हेच श्रेयस्कर होय, असे मत मीमांसापंथाने मांडले. मीमांसापंथाचा सर्वांत मोठा पुरस्कर्ता कुमारिल भट्ट हा सातव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला. तेव्हापासून त्याच्या वेदप्रामाण्याची व अदृष्ट-प्रधान धर्माची मगरमिठी हळूहळू हिंदुसमाजाच्या मानेला बसत गेली व पुढे त्या तत्त्वांचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत जाऊन हिंदुसमाज अंध व मूढ झाला. आपले आचरण योग्य की अयोग्य हे पारखून घेण्याची त्याची दृष्टीच नाहीशी झाली. असा समाज विघटित होऊन परकी आक्रमणास बळी न पडला तरच नवल! माधवाचार्यांनी आपल्या वेदभाष्यात बुद्धिप्रामाण्याचा पुरस्कार केला आहे. आणि स्वतः विचार करून धर्मनिर्णय करण्याचे महत्त्व सांगितले आहे. [या ग्रंथातील ४ थ्या प्रकरणात प्राचीन काळी देशकालपरिस्थिती पाहून धर्म-निर्णय करण्याची पद्धती कशी होती ते दाखविलेच आहे. ज्यांना अधिक जिज्ञासा आहे त्यांनी तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे यांचा ' धर्मस्वरूपनिर्णय ' हा बहुमोल ग्रंथ पहावा. प्रकरण १२ व १३. माधवाचार्यांचे मत–पृ. २५५.] माधवाचार्यांनी मीमांसकांची समन्वयपद्धतीही वेदप्रामाण्याप्रमाणेच त्याज्य ठरविली आहे. मीमांसकांचा असा एक विपरीत सिद्धान्त आहे की सर्व स्मृतींचा अर्थ एकच आहे! त्यांच्यात कोणत्याही प्रश्नाविषयी मतभेद नाही. वरवर दिसायला मतभेद दिसतात. पण तो भ्रम होय. म्हणून टीकाकारांनी अगदी परस्परविरोधी वचनांचाही समन्वय करून दाखविला पाहिजे. म्हणजे भिन्न स्मृतींतील वचनांचा एकच अर्थ लावला पाहिजे. मीमांसकांची ही समन्वयपद्धती म्हणजे शुद्ध रानटीपणा आहे. हजारो वर्षांवर विखुरलेल्या, भिन्न प्रांतांतील, भिन्न स्मृतिकारांचे प्रत्येक सामाजिक व धार्मिक प्रश्नाविषयी तंतोतंत एकच मत असेल, असे मानणे म्हणजे मानवी बुद्धीचे दिवाळे जाहीर करण्यासारखेच आहे. पण उत्तरकालीन हिंदुधर्मशास्त्र-कारांनी ती पद्धत स्वीकारून तसे दिवाळे जाहीर केले म्हणूनच या समाजाचा नाश झाला. माधवाचार्यांनी ' ही पद्धत कपोलकल्पित आहे, निर्मूल आहे व तिचे प्रवर्तन करणारे मन्दमती आहेत ' असे म्हणून, ' आम्ही तिचा स्वीकार करणार नाही ' असे स्पष्ट म्हटले आहे. (उक्तग्रंथ पृ. १८४–५) वेदप्रामाण्य, अदृष्टप्रधान धर्म व समन्वयपद्धती या अत्यंत घातक तत्त्वांचा निषेध करून माधवाचार्यांनी ती त्याज्य ठरविली ही त्यांची फार मोठी सेवा होय. ही तत्त्वे

समाजाला अपकर्षकारक आहेत असे सांगण्याचे धैर्य त्यांनी दाखविले, त्यामुळेच मोठे धर्मपरिवर्तन होऊन विजयनगर साम्राज्याचा पाया दृढ झाला. त्यांनी हरिहर व बुक्क यांना स्वधर्मात परत घेतले नसते आणि स्वराज्य व स्वधर्म यांचे अद्वैत समाजमनावर बिंबवून निवृत्तिवादाची जळमटे झाडून टाकली नसती तर ते कदापि शक्य झाले नसते.

राजर्षी बुक्क :

विद्यारण्यासारखा द्रष्टा सर्वज्ञ पुरुष या काळात हिंदूंना गुरू म्हणून लाभला हे जसे भाग्य तसेच हरिहर आणि बुक्क हे धर्मवेत्ते राजपुरुष विजयनगरला संस्थापक म्हणून लाभले हेही भाग्यच होय. सम्राट बुक्क हे तर राजर्षीच होते. त्यांनी राजपदावर येताच अखिल वेदविद्येचा संग्रह व संशोधन करण्याचे ठरवून त्यासाठी विद्यारण्यांच्या नेतृत्वाखाली एक पीठच स्थापन केले आणि देशातील सर्व विद्वान पंडितांना त्या पीठात एकत्र जमवून वेदग्रंथांवर नवी भाष्ये लिहिण्याचा आदेश दिला. दुसरेही एक महत्त्वाचे कार्य राजर्षी बुक्क यांनी केले. ते म्हणजे शैव, वैष्णव, जैन या ग्रंथांतील वैमनस्य नष्ट करून हिंदुधर्मातील विघटक वृत्तींना आळा घातला हे होय. याच्या आधीच्या काळात हे पंथभेद किती विकोपाला गेले होते, ज्या पुराणांनी सर्व देवतांचे ऐक्य प्रतिपादिले होते त्यांनीच पुढे त्यांत कसे भेद माजविले होते, हे मागल्या प्रकरणाच्या अखेरीस दाखविलेच आहे. या भेदामुळे हिंदुधर्माचे ऐक्य अगदी भंगले होते. पण सम्राट बुक्क यांनी या दुष्ट प्रवृत्तींना आळा घालून धर्माला पुन्हा संघटित रूप दिले. जैन व वैष्णव यांच्यांत कलह उद्भवला तेव्हा बुक्क यांनी घोषणा केली की, 'जैनदर्शन व वैष्णवदर्शन यांत काहीही भेद नाही. वैष्णवांकडून जैनांना काही लाभहानी झाली तर ती वैष्णवांचीच लाभहानी आहे असे वैष्णवांनी मानावे. आणि जैनांनीही खात्री बाळगावी की त्यांचे रक्षण करण्याचे व्रत वैष्णव यावच्चंद्र दिवाकरौ पाळतील.' (एपिग्राफिका कर्नाटिका II. १३६, शिलालेख १३६८ इ.) परकी प्रवाशांनीही विजयनगर सम्राटांच्या सहिष्णु वृत्तीची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. बार्बोसा म्हणतो, 'सम्राटांनी सर्वांना इतके स्वातंत्र्य दिलेले होते की, कोणीही वाटेल तेथे मुक्तसंचार करीत असे व आपल्या मताप्रमाणे उपासना करीत असे. अमका मनुष्य खिश्चन आहे की ज्यू की मुस्लीम का अन्य कोणी

याची कोणी चौकशीही करीत नसे. सर्वत्र सहिष्णुता व समता यांचे अधिराज्य होते. -(विजयनगर एंपायर, फादर हेरास व व्ही. के. भांडारकर; विजय. कमोव्हॉ, पृ. ३४).

विजयनगरच्या सम्राटांनी विद्येप्रमाणेच लष्करी यंत्रणाही अत्यंत कार्यक्षम ठेवण्याची दक्षता बाळगिली होती. म्हणूनच त्यांना राजर्षी ही पदवी शोभते. हरिहर व बुक्क यांच्या संगमवंशात १४८५ च्या सुमारास अत्यंत भ्याड, दुबळे व व्यसनी वारस निर्माण झाले. तेव्हा साळुव नरसिंह या सेनापतीने त्यांना बाजूस सारून स्वतः सत्तारोहण केले. इतिहासकार याबद्दल त्यांना मुळीच दोष देत नाहीत. त्यांनी हे हिंदुधर्माच्या रक्षणासाठीच केले, असे म्हणून ते या कृत्याचे – या अपहाराचे – समर्थनच करतात. या साळुव नरसिंहाने राज्यातील शांततापिय, भाविक शेतकऱ्यांना क्षात्रधर्माची दीक्षा देऊन मुस्लीमांशी तितक्याच वीरश्रीने लढण्यास शिकविले. ही या राजांची फार मोठी समयज्ञता होय. त्यांनी हे जाणले की मुसलमानांत प्रत्येक मुसलमान युद्धोन्मुख असतो. आणि धर्मांधतेने तो पिसाट झाल्यामुळे त्याचा त्वेष दुपटीने वाढलेला असतो. उलट हिंदू हा शांत, निष्पाप, सहिष्णु व म्हणून मंद व दुबळा झालेला असतो. हे जाणूनच त्यांनी सर्व जनतेला – शेतकऱ्यांनासुद्धा – युद्धप्रवण करून त्यांच्या ठायी मर्दानी बाणा रुजविला. साळुवाप्रमाणे वीर नरसिंहानेही हेच धोरण ठेविले होते. प्रजेत लष्करी बाणा चेतविण्यासाठी त्याने हरतऱ्हेचे प्रयत्न केले. जातिभेदनिरपेक्ष सैन्यात सर्वांची भरती केली आणि भ्याडपणा ही सर्वांत लज्जास्पद गोष्ट ठरवून मरणमारणाच्या संग्रामास त्यांना तयार केले. या चैतन्य प्रेरणेमुळेच सर्व जनता विजयनगरच्या ध्वजाखाली गोळा होऊन मुस्लीमांशी लढण्यास सिद्ध झाली. -(डॉ. मुनशी, खंड ६ वा, पृ. ३०३, ३०८)

कृष्णदेवरायांच्या कारकीर्दीत विजयनगरच्या वैभवाचा कळस झाला. (१५०९–१५३०.) हे सम्राट महापराक्रमी असून विद्या, कला, शास्त्रे यांचे भोक्ते होते. कृष्णा व तुंगभद्रा या दुआबातील प्रदेश तर त्यांनी आपल्या अधिराज्याखाली आणलाच पण अनेक वेळा विजापूर, गुलबर्गा या बहामनी राजधान्यांवर आक्रमण करून त्यांनी त्या मुस्लीम सत्ता खिळखिळ्या करून टाकल्या. लष्करी यंत्र अत्यंत सुसज्ज व कार्यक्षम ठेवण्याची त्यांनी अखंड दक्षता बाळगली होती. अरब व्यापाऱ्यांकडून अस्सल पैदाशीचे घोडे व कारीगर हत्यारे यांची

फार मोठ्या प्रमाणावर ते नित्य खरेदी करीत. लष्करी शिक्षणासाठी त्यांनी शाळाही स्थापन केल्या होत्या. कारण त्यांनी ओळखले होते की मुस्लीम आक्रमण हे प्रामुख्याने लष्करी आक्रमण होते. लूटमार, दरोडेखोरी, कपटनीती, जाळपोळ, कत्तल हेच त्यांचे मुख्य बळ होते. अशा आक्रमणाला त्याच भाषेत उत्तर दिल्याखेरीज हिंदूंचा निभाव लागणार नाही हे पक्के जाणून त्यांनी त्याच राजनीतीचा निःशंकपणे अवलंब केला होता. रजपुतांनी हे फारसे जाणले नाही. खरे म्हणजे मुस्लीम आक्रमणाचे खरे स्वरूप रजपुतांना कधी आकळलेच नाही. अंध, पिसाट धर्मश्रद्धा व लूटमारीची विद्या हे ज्यांचे बळ अशा जमातीशी उदार, उदात्त तत्त्वाने वागण्यात आत्मघात आहे, हा उमज त्यांना पडलाच नाही. म्हणून स्त्रियांचा जोहार व पुरुषांचे हौतात्म्य हेच त्यांनी भूषण मानिले. पण त्याचे फल काय ? तर स्त्रिया मोगलांच्या जनानखान्यात गेल्या व पुरुष त्यांचे दास झाले. विजयनगरच्या सम्राटांनी रजपुताचे अविवेकी, आत्मघातकी उदार धोरण, त्यांची ती सात्त्विक राजनीती व ते निष्फळ, विचारहीन हौतात्म्य यांचा कधीच अवलंब केला नाही. त्यांनी नित्य चाणक्यनीतीचाच आश्रय केला. त्यामुळेच दक्षिण हिंदुस्थान मुस्लीमवर्चस्वापासून अबाधित राखण्यात ते यशस्वी झाले. या सर्वच दृष्टींनी सम्राट कृष्णदेवराय यांची कारकीर्द अत्यंत वैभवशाली झाली.

कृष्णदेवरायानंतर अच्युतराय व सदाशिवराय हे दोन अगदी नाकर्ते राजे झाले. सदाशिवरायाच्या कारकीर्दीतच सर्व सत्ता रामराजाच्या हाती गेली. हा राजा अतिशय कर्ता आणि पराक्रमी असून बहामनी राज्याच्या भिन्न शाखांवर आक्रमण करून त्यांना खच्ची करून टाकण्याचे विजयनगरचे कार्य त्याने अखंड चालू ठेविले होते. त्यांचेही आपापसांत नित्य झगडे व लढाया चालू असत व ते सुलतान एकमेकांविरुद्ध रामराजाची मदत नेहमी घेत असत. १५५७ साली आदिलशहा व कुतुबशहा यांनी राजारामाच्या मदतीने अहमदनगरच्या निजामशाहीवर हल्ला केला व ते राज्य अगदी वेचिराख करून टाकले. त्या वेळी, फिरिस्ता या इतिहासकाराच्या म्हणण्याप्रमाणे, रामराजाच्या हिंदू लष्कराने अनेक मशिदी उध्वस्त केल्या, मुस्लीम स्त्रियांची विटंबना केली व कुराणाचाही अवमान केला. आणि यांतूनच राक्षसतागडीचा संग्राम उद्भवून विजयनगरच्या साम्राज्याला प्राणांतिक तडाखा बसला. वास्तविक हिंदूंवर असे अत्याचार मुसल-

मान प्रत्येक स्वारीत करीत असत. महंमद कासीम, महंमद गझनी, महंमद घोरी, ऐबक, अल्तमश, काफूर, तघलख यांच्या स्वाऱ्यांचे हे स्वरूप ठरलेलेच होते. पण याची पराकाष्ठेची चीड येऊन त्याचा बदला घेण्यासाठी व मुस्लीम सत्तेचे निर्मूलन करण्यासाठी भिन्न रजपूत राज्यांनी कधी अवश्य ते ऐक्य केले नाही. बहामनी सुलतानांनी या वेळी ते घडविले हाच मुस्लीम व हिंदू यांतील फरक. आधीच्या चाळीस पन्नास वर्षांत विजापूर, गोवळकोंडा व अहमदनगर या शाह्यांत अगदी हाडवैर माजून राहिले होते. त्यामुळे कृष्णदेवराय व रामराजा यांनी त्यांच्यावर अनेकदा आक्रमणे करून त्यांना झोडपून झोडपून हैराण करून टाकले होते. आणि या शेवटच्या निजामशाहीवरील स्वारीने तर बहामनी सत्ता नष्ट होण्याचाच समय प्राप्त झाला होता. पण त्यामुळेच त्यांच्यांतील विवेक जागृत झाला. ही विजयनगरची सत्ता अंशीच वाढू दिली तर दक्षिण निर्यवन होईल हे भवितव्य त्यांना दिसू लागले व त्यांनी आपसातील वैरे विसरून, एकमेकांशी सोयरसंबंध जोडून, विजयनगरविरुद्ध एक बलाढ्य फळी उभारली व त्या साम्राज्यावर चाल करून राक्षसतागडी येथे रामराजाच्या सैन्याचा संपूर्ण विध्वंस करून त्या साम्राज्याला कायमचे विकलांग करून टाकले.

कोणत्याही समाजाच्या जीवनशक्तीची हीच कसोटी आहे. कोठले तरी संघटनतत्त्व त्याने अवलंबिले पाहिजे आणि त्या निष्ठेपुढे इतर सर्व निष्ठा, सर्व अभिमान, सर्व मानापमान, सर्व वैमनस्ये, सर्व भेदभाव गौण लेखण्याची शिकवण मनाला दिली पाहिजे. ज्या समाजाला, ज्या प्रमाणात, हे साधते त्या प्रमाणात तो समाज जगण्यात, स्वातंत्र्य टिकविण्यात व आपल्या मानबिंदूचे रक्षण करण्यात यशस्वी होतो. राजस्थानातील जयपूर, जोधपूर, बुंदी, कोटा, अजमीर येथील हिंदुराजांनी अशी संघटनातत्त्वनिष्ठा कधीही दाखविली नाही. त्यामुळे राजस्थानचे एकछत्र कधीही झाले नाही. विजयनगरने धर्मतत्त्वावर संघटन करण्यात दीर्घकाल यश मिळविले. त्यामुळे हिंदुसंस्कृतीचे रक्षण करण्यात त्या साम्राज्याला अपूर्व यश मिळाले. पण तालिकोटनंतर दक्षिणेतल्या लोकांची ही निष्ठा ढळली. या घोर संग्रामाने विजयनगरचा पाया हादरला हे खरे. पण त्याचा संपूर्ण नाश झाला नव्हता. पुढे पाऊणशे वर्षे ते साम्राज्य बऱ्या स्थितीत टिकून होते. पण बहामनी मुस्लीम सत्ता त्या वेळी एक झाल्या तशा फिरून अनेक वेळा होऊन त्यांनी या हिंदुसत्तेचा संपूर्ण नाश केला. तरी दक्षिणेतल्या हिंदुसत्ता मात्र

तशा कधीच एक झाल्या नाहीत. त्यामुळे अखेरी यवनांनीच साधली.

तुंगभद्रेच्या दक्षिणेस विजयनगरचे साम्राज्य दीर्घ काल अबाधित असे होते. पण कृष्णा-तुंगभद्रेच्या दुआबात कोंडविडू येथे रेड्डी आणि राचकोंडा येथे वेलमा या हिंदुसत्ता होत्या. आणि पलीकडे ओरिसामध्ये गजपती यांची हिंदुसत्ता तर पुष्कळच प्रबळ होती. पण हिंदुसत्ता या आपल्या शत्रू आहेत, ही भावना मुस्लीमांत जागृत ठेवण्याचे जसे प्रयत्न होत, तसे प्रयत्न या हिंदुसत्तांनी केव्हाही केले नाहीत. गजपती, रेड्डी व वेलमा यांचे आपसांत नित्य कलह तर चालतच, पण अनेक वेळा त्या सत्ता बहामनी सुलतानांशी सख्य करून त्यांना विजयनगर-विरुद्ध साह्य करीत. मुस्लीमही अनेक वेळा मुस्लीमांविरुद्ध हिंदूंचे साह्य घेत. पण मधूनमधून तरी त्यांचा कडवा हिंदुद्वेष जागृत होऊन ते सर्व मिळून हिंदु-धर्मीयांविरुद्ध उभे ठाकत. बाबर आणि संग यांच्या संग्रामात हेच घडले. आयत्या वेळी संगाकडचे मुस्लीम सरदार त्याला दगा देऊन बाबराला मिळाले. सिंधवरील कासीमच्या आक्रमणाच्या वेळी हेच घडले. मोका बसव्या या हिंदू अधिकाऱ्याने कासीमला सर्वतोपरी साह्य केले. त्याचा भाऊ रासिल यानेही असाच स्वामिद्रोह व धर्मद्रोह केला. पण दाहराकडचा मुसलमान सरदार अलाफी याने मात्र कासीमविरुद्ध लढण्याचे नाकारले. राक्षसतागडीच्या लढाईत याचीच पुनरावृत्ती घडली. अहमदनगर, विजापूर व गोवळकोंडा हे सुल्तान तर एक झालेच. पण शिवाय रामराजाकडच्या मुस्लीम सरदारांनीही त्याला आयत्या वेळी दगा दिला. त्यामुळे ऐन धुमश्चक्रीच्या वेळी विजयनगरच्या सेनेतील दीड लाख फौज उलटली व तिने हिंदू फौजेचा संहार केला. अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब यांच्या सैन्यांत शेकडो रजपूत अधिकारी होते. त्या सेनेचे सेनापतीही अनेक वेळा मानसिंग, जयसिंग हे हिंदु रजपूत होते. पण त्यांनी मुस्लीम स्वामी व मुस्लीम धर्म यांशी असा द्रोह कधीही केला नाही. आयत्या वेळी उलटून हिंदुराजाला मिळण्याचे व स्वधर्मनिष्ठा प्रगट करण्याचे पातक त्यांनी कधीही केले नाही !

विजयनगरच्या पाडावासाठी दोन-तीन मुस्लीम सत्ता, काही काळ तरी एक झाल्या; तशा, त्या हिंदुराज्यांच्या संरक्षणासाठी, दक्षिणेतल्या वर सांगितलेल्या हिंदुसत्ता का एक झाल्या नाहीत ? ओरिसाचे गजपती, कोंडविडूचे रेड्डी व राचकोंडाचे वेलमा हे या वेळी विजयनगरला मिळाले असते तर या हिंदुसत्तेचा

विनाश टळला असता. किंवा याआधीच आपसातील वैरे विसरून, अभिमान बाजूला ठेवून या सर्व सत्तांनी बहामनी शाह्यांना घेरले असते तर नर्मदेच्या दक्षिणेकडच्या मुस्लीम सत्तेचा समूळ नाश झाला असता. पण हिंदूंची धर्मभावना इतक्या व्यापक प्रमाणावर कधीच संघटना करू शकली नाही. भारताबाहेरच्या मुस्लीमांनाही पाचारण करून, त्यांच्याशी ऐक्य करून भारतातील हिंदुसत्ता नष्ट कराव्या, हे धोरण प्रारंभापासून आजपर्यंत मुस्लीमांनी अनेक वेळा अवलंबिलेले आहे. पण अखिल भारतातल्या–नव्हे–केवळ उत्तरेतल्या–किंवा केवळ दक्षिणेतल्या हिंदुसत्ता संघटित कराव्या आणि मुस्लीमांविरुद्ध एकसंध फळी उभी करावी हे हिंदूंना कधी साधले नाही. धर्म या संघटनातत्त्वाला इतके श्रेष्ठस्थान त्यांनी कधीही दिले नाही. त्यासाठी कोणताही त्याग करण्यास तयार व्हावे असा उत्कट आवेश, असा तीव्र ध्येयवाद हिंदुधर्मधुरीण आपल्या समाजात कधीच निर्माण करू शकले नाहीत.

तालीकोटच्या–राक्षसतागडीच्या लढाईत विजयनगरच्या साम्राज्याचा पाया निखळला हे खरे. पण त्या वेळी त्याचा सर्वनाश झाला हा रूढ समज खरा नाही, हे वर सांगितलेच आहे. त्यानंतर जवळ जवळ पाऊणशे वर्षे हे साम्राज्य बऱ्या स्थितीत टिकून होते. एवढेच नव्हे तर मुस्लीमांच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे आपले जन्मप्राप्त कार्यही ते काही अंशी करीत होते. रामराजाचा भाऊ तिरुमल याने १५७० मध्ये आपणास राज्याभिषेक करवून घेतला. त्याला श्रीरंग, राम व वेंकट असे तीन पुत्र होते. पैकी वेंकटाने तीस वर्षे राज्य करून विजयनगरची बरीच प्रतिष्ठा परत मिळविली. त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस म्हैसूर येथे ओडियार या घराण्याचे स्वतंत्र राज्य स्थापन झाले. दोन वर्षांनी १६१४ साली वेंकटचा मृत्यू झाल्यावर वारशाच्या लढाया उद्भवल्या आणि या संधीचा फायदा घेऊन आदिलशहाने कर्नूलचा प्रांत काबीज केला. या साठ-सत्तर वर्षांच्या काळात विजापूर व गोवळकोंडा यांच्या स्वाऱ्या चालूच होत्या. १६४२ च्या सुमारास वरील दोन शाह्यांनी पुन्हा एक होऊन विजयनगरचा संपूर्ण नाश करण्याचे ठरविले. या वेळी त्यांना दिल्लीपती शहाजहान याचाही पाठिंबा मिळाला. त्याने विजयनगरचे अवशिष्ट साम्राज्य त्या दोघांनी आपसात वाटून घेण्यास मान्यता दिली. अशा रीतीने हिंदुसत्तेचा नाश करण्यास पुन्हा तीन मुस्लीम सत्ता एकत्र झाल्या. या प्रसंगी हिंदूंनी काय केले ? राजा श्रीरंग याने तंजावर,

जींजी, मदुरा व म्हैसूर येथील नायकांना संघटित होण्याची विनंती केली, पण त्यांना ती मान्य झाली नाही. ते तटस्थच राहिले. मग मीरजुम्ला, मुस्ताफाखान व शहाजी भोसले या विजापूरच्या सरदारांनी एकेकाचा पराभव करून १६५२ मध्ये विजयनगरच्या साम्राज्याचा समूळ उच्छेद केला. दक्षिणेतील हिंदूराज्ये बुडविण्याचे फार मोठे श्रेय शहाजी राजे भोसले यांना आहे, हे इतिहासाला माहीत आहे. शहाजी राजे हे मोंगल, विजापूर, अहमदनगर यांच्या सेवेत होते. कधी विजापुरशी फितुरी करून ते मोगलांना मिळत, कधी अहमदनगरच्या निजामशहाला मिळत. पण या सर्वांना सोडून दक्षिणेतल्या हिंदुसत्तांना ते कधीही मिळाले नाहीत. इतकेच काय त्यांचा पुत्र पराक्रमी झाला, त्याला १६६० सालापर्यंत यशही घवघवीत मिळाले, तरी त्या वेळी विजापूरची सेवा सोडून ते आपल्या पुत्रालाही मिळाले नाहीत ! आपल्या प्रचंड सरंजामानिशी ते त्या वेळी छत्रपतींना सामील झाले असते तर दक्षिणेच्या सर्व शाह्या त्याच वेळी नामशेष झाल्या असत्या. हे त्यांचेच असे नाही. राजा भगवानदास, मानसिंग जयसिंग, सवाई जयसिंग, लखूजी जाधव, मुरार जगदेव, जगदेवराव पवार, आक्कणा, मादण्णा या थोर सरदारांनी मुस्लीम राज्यविस्तारासाठी जे पराक्रम केले त्याच्या शतांश जरी हिंदुराज्य स्थापनेसाठी केले असते तरी भारतात मुस्लीम सत्ता नामशेष झाली असती. हे सरदार हिंदू होते. पण स्वधर्मनिष्ठेत स्वातंत्र्यनिष्ठेचा अंतर्भाव होतो हे त्यांना मान्य नव्हते. त्यांच्या धर्मनिष्ठेपेक्षा त्यांची मुस्लीमस्वामिनिष्ठा शतपटींनी जास्त उत्कट होती. याचा अर्थच असा की 'हिंदुधर्म' या संज्ञेला हिंदुधर्मशास्त्रकारांनी अत्यंत विकृत असा अर्थ प्राप्त करून दिला होता. व्रते, उद्यापने, प्रायश्चित्ते यांना त्यांत महत्त्व होते. जात संभाळण्याला, अस्पृश्यांना न शिवण्याला, शुद्धिबंदीला त्यात महत्त्व होते. पण स्वातंत्र्याला नव्हते ! मूर्तिपूजेत हिंदु धर्म होता. मूर्तिरक्षणात तो नव्हता. परदेशगमन त्याला निषिद्ध होते, परदास्य नव्हते. मुस्लीमांना राजे मानण्यास हिंदुधर्मशास्त्रकार तयार होते, पण हिंदुराजे त्यांना मान्य नव्हते. कारण त्यांच्या मते ते क्षत्रिय नव्हते ! असो.

रजपूत व विजयनगर यांच्या उत्कर्षापकर्षाचा येथवर विचार केला. हा इतिहास म्हणजे हिंदुसमाजाच्या संघटनविघटनेचाच इतिहास आहे. मेवाड व विजयनगर या दोन सत्तांनी दीर्घकाळपर्यंत मुस्लीम आक्रमणांशी लढा केला व हिंदुधर्म

व हिंदुसंस्कृती यांचे रक्षण केले हे खरे. पण दोन्ही सत्ता शेवटी मुस्लीमांनीच बुडविल्या हेही खरे आहे. मुस्लीमांत वंशभेद, पंथभेद, प्रांतभेद अतिशय होते. वारशाची युद्धे त्यांच्यात दर पिढीस चालत. मध्यवर्ती सत्तेपासून फुटून निघणे हे तर नित्याचेच होते. असे असूनही दोन्ही वेळा अखेरी त्यांनीच मारली आणि हिंदुसत्ता नामशेष केल्या. असे का झाले याचेच विवेचन वर केले आहे. राष्ट्रीय भावना हिंदूंच्या ठायी नव्हती पण तशी ती मुस्लीमांतही नव्हती. पण धर्म हे तत्त्व मुस्लीमांनी अनेक वेळा श्रेष्ठ मानले. स्वराज्य व स्वधर्म यांचे ते अद्वैत मानीत. हिंदूंच्या बाजूने मुस्लीमांशी लढणाऱ्याला ते धर्मभ्रष्ट समजत. अशी तीव्र व उत्कट धर्मनिष्ठा अखिल हिंदुसमाजात कधीच निर्माण झाली नाही. विद्यारण्य, हरिहर, बुक्क यांनी काही काळ ती निर्माण केली होती. तिच्या बळावर हिंदूंनी तीनशे वर्षे मुस्लीमांचा प्रतिकार केला व दक्षिणेचे रक्षण केले यासाठी हिंदुसमाज, हिंदुधर्म व हिंदुसंस्कृती त्यांची कायमची ऋणी राहील यात शंकाच नाही. पण ही मानवंदना दिल्यानंतर हिंदूंच्या जीवशक्तीविषयी पुन्हा विचार करू लागताच तिच्यातील वैगुण्ये मनापुढे उभी राहतातच. विजयनगरने तीनशे वर्षे लढा दिला हे कौतुकास्पद आहे. पण त्या सत्तेचाही नाश करून तिच्याच जन्माच्या वेळी स्थापन झालेली बहामनी सत्ता अनेक शाह्यांत दुभंगलेली असूनही आणि दिल्लीच्या मोगल बादशाहीचे वारंवार प्राणघातक हल्ले होत असूनही विजयनगरनंतर आणखी शंभर वर्षे टिकून राहिली हे आपण विसरता कामा नये. राजस्थान एकछत्र कधी झाले नव्हते; पण विजयनगरने तुंगभद्रेच्या दक्षिणेस अखंड एकछत्र टिकवून धरण्यात अपूर्व यश मिळविले होते. पण मरणमारणाच्या दीर्घकालीन संग्रामात शेवटी या सत्तेला हार खावी लागली. अखिल भारतातून मुस्लीम सत्तेची पाळेमुळे खणून काढण्यात तिला यश आले नाही. ते यश मराठ्यांना आले. तेव्हा विजयनगर कोठे कमी पडले व मराठे या कार्यात यशस्वी का झाले याची कारणमीमांसा आपण केली पाहिजे. पुढच्या प्रकरणात तो प्रयत्न करावयाचा आहे.

६

हिंदुपदपातशाही

हिंदुपदपातशाही :

राजस्थान, कर्नाटक, महाराष्ट्र व पंजाब (शीख) या ज्या चार राष्ट्रांनी मुस्लीम आक्रमणास तोंड देऊन हिंदुधर्म व हिंदु संस्कृती यांचे रक्षण केले, त्यांपैकी पहिल्या दोघांच्या यशापयशाचा विचार गेल्या प्रकरणात केला. रजपुतांनी सातशे वर्षे अखंड संग्राम करून आरबी आक्रमणास पायबंद घातला. पण तुर्की आक्रमणास पंजाब, अयोध्या, काशी, बंगाल, बिहार, ओरिसा, माळवा, गुजराथ हे प्रदेश बळी पडत असताना त्यांच्या रक्षणाचा त्यांनी प्रयत्नही केला नाही. राजस्थान सोडून हिंदुधर्माच्या व स्वराज्याच्या रक्षणासाठी रजपूत बाहेर पडलेच नाहीत. आणि राजस्थानातही सगळे श्रेय मेवाडचे आहे. जयपूर, जोधपूर यांनी फार लवकर पारतंत्र्य स्वीकारले. तेव्हा रजपूत असे म्हणताना मेवाडचा सिसोदे वंशच मनात अभिप्रेत असतो. विजयनगरचे यश यापेक्षा मोठे आहे. त्यांनी तुंगभद्रेच्या दक्षिणेस कर्नाटक, आंध्र, तामीळनाड व केरळ या चार प्रदेशांवर एकछत्री साम्राज्य स्थापून अविरत तीनशे वर्षे संग्राम केला आणि मधून मधून विजापूर, अहंमदनगर, गोवळकोंडा येथील बहामनी राज्यांवर आक्रमण करून त्या सत्ता काही काळ तरी हतबल करून टाकल्या. पण विजयनगरच्या

सम्राटांनी नर्मदेच्या उत्तरेकडच्या दिल्लीच्या सलतनतीचा उच्छेद करण्याचा कधी संकल्पही केला नाही. तिकडे त्यांनी कधी पाऊलही टाकले नाही. आणि बहामनी शाखांपैकी सर्वच किंवा एखादी तरी उखडून टाकून तेथे हिंदुसत्ता प्रस्थापित करण्याची आकांक्षाही त्यांनी कधी धरली नाही.

अखिल भारतातून मुस्लीमसत्तेची पाळेमुळे खणून काढण्यात मराठ्यांना यश आले याचे एक कारण हे की प्रारंभापासून त्यांचा संकल्पच तसा होता. पंधराव्या वर्षीच शिवछत्रपती 'हिंदवी स्वराज्याचे' स्वप्न पाहात होते आणि छत्रपतींपासून पाटिलबाबांपर्यंतच्या दीडशे वर्षांच्या काळात प्रत्येक मराठ्याच्या मनापुढे हिंदुपदपातशाहीचे हेच भव्य स्वप्न सारखे उभे होते. दिल्ली सर करावयाची आहे, रूमशामपर्यंत जावयाचे आहे, अवनिमंडल निर्यवन करावयाचे आहे हाच मराठ्यांना ध्यास होता. या भव्य आकांक्षेमुळेच त्यांना अटकेपासून म्हैसूरपर्यंत आणि अहमदाबादेपासून जगन्नाथपुरीपर्यंत मराठा साम्राज्याची प्रस्थापना करता आली. आपला प्रारंभापासूनचा हा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी त्यांनी सामर्थ्यसंघटना कशी केली, संघटनतत्त्व कोणते अवलंबिले, त्यावरील निष्ठा कशा जोपासिल्या हे आता पाहावयाचे आहे; पण हे पाहण्याआधी जरा पूर्व-इतिहासाचे अवलोकन करणे अवश्य आहे. मराठ्यांच्या या स्वराज्यस्थापनेच्या उद्योगाला प्रारंभ झाला तो सतराव्या शतकाच्या मध्याला, छत्रपतींचा उदय झाला तेव्हा. त्याच्या आधी महाराष्ट्र तीनशे-साडेतीनशे वर्षे पारतंत्र्यात होता. १२९६ सालीच अल्लाउद्दिनाने देवगिरीच्या रामदेवरावाला मांडलिक करून टाकले होते. मग तेथपासून शिवोदय होईपर्यंत एवढ्या प्रदीर्घकाळात मराठे काय करीत होते हे पाहणे उद्बोधक ठरेल. विजयनगरच्या धुरीणांनी पारतंत्र्य आल्यावर पंचवीस-तीस वर्षांतच ते नष्ट केले व स्वराज्याची स्थापना केली. मग हीच गोष्ट महाराष्ट्रात मराठ्यांना का शक्य झाली नाही हे पाहिल्याखेरीज पुढे जाणे युक्त ठरणार नाही.

दुबळी बहामनीसत्ता :

मदुरेला स्थापन झालेल्या मुस्लीम सत्तेपेक्षा कलबुर्ग्याला हसन गंगू याने स्थापिलेली बहामनी सत्ता जास्त प्रबळ होती असे मुळीच नाही. मागल्या प्रकरणात सांगितलेली एकंदर मुस्लीमसत्तांच्या ठायीची सर्व भेदकारणे, सर्व विघटन-

वीजे बहामनी सत्तेच्या ठायीही होती. शिया व सुनी हा भेद तर दर पिढीला जाणवत असे. एक सुलतान शिया तर त्याचा मुलगा सुनी. यामुळे दरवेळी सर्व कारभाराला हादरा बसे. दक्षिणी-परदेशी हा भेद तर इतका विकोपाला गेला होता की, राजधानीत त्यामुळे वरचेवर तीन-तीन चार-चार दिवस वेबंदशाही माजे, रक्तपात होई. दर पिढीला वारसाचे कलह कायम चालू असत. बहुतेक सुलतान व्यसनासक्त, मद्यपी, विलासमग्न असत. सरदारांची वैमनस्ये एकमेकांच्या खुना-पर्यंत जात. अशा स्थितीत कोणत्याही सत्तेला दृढता येणे शक्यच नव्हते; पण तरीही मराठ्यांना तो बहामनी सत्ता नष्ट करता आली नाही. १४९० च्या सुमारास बहामनी सत्तेची पाच शकले झाली व आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही अशा त्या एकीच्या पाच शाखा झाल्या. यामुळे तर ती सत्ता आणखीच कमजोर झाली. पण यांपैकी एकाही शाखेचे राज्य हिंदूंना साडेतीनशे वर्षांत घेता आले नाही. विचित्र गोष्ट अशी की, एलिचपूरला इमादशाही स्थापन करणारा फत्तेउल्ला व अहमदनगरला निजामशाही स्थापन करणारा बहिरी हे मूळचे हिंदु ब्राह्मण होते. ते हिंदू असताना स्वतंत्र राज्य स्थापणे त्यांना शक्य झाले नाही; पण मुसलमान होताच ते कर्तृत्व त्यांच्या ठायी सहज आले, याचा हिंदुधर्मशास्त्राने फार गंभीरपणे विचार केला पाहिजे. विजापूर स्थापणारा यूसफ आदिलशहा हा तुर्कस्थानातून आलेला व वेदरचा कासम वेरीद येथलाच पण गुलाम होता. त्या दोघांना स्वतंत्र सत्ता स्थापन करणे सहज शक्य झाले. पण हिंदूंतील चंद्रसूर्यवंशां-तल्या, छत्तीस कुळांतल्या, मौर्य, गुप्त, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव यांच्या कुळांतल्या कोणालाही हे जमले नाही. बहामनी राज्य स्थापन झाले त्या वेळची हकीकत अशीच उद्वेगजनक आहे. या राज्याचा संस्थापक हसन ऊर्फ जाफरखान हा मूळचा एक गुलाम. केवळ आपल्या कर्तृत्वाने वर चढत जाऊन सरदार झालेला आणि तब्बलखाचा सेनापती म्हणून दक्षिणेत आलेला. त्याला दिल्लीच्या सत्तेला शह देऊन दक्षिणेत स्वतंत्र राज्य स्थापिता आले. याच वेळी सिसोदे कुळातील दोन पुरुष सजनसिंह व क्षेमसिंह हेही दक्षिणेत, महाराष्ट्रात आले होते. त्यांनी काय पराक्रम केला ? त्यांनी दक्षिणेत राज्य स्थापण्यास जाफरखानाला साह्य करून त्याच्याकडून दहा गावांची जहागीर मिळवली ! तो गुलाम, त्याने राज्य स्थापिले आणि हे राजपुत्र, यांनी पाटिलकी मिळवली व गुलामी स्वीकारली ! कारण तो मुसलमान होता व हे हिंदू होते.

मुस्लीम धर्म व राज्य :

हे विधान जरा विचित्र व अत्युक्त वाटेल; पण मागल्या प्रकरणातील स्वराज्य व स्वधर्म यांच्या अभेदाविषयीचे विवेचन पुन्हा जरा बारकाईने वाचले तर ते अगदी यथार्थ आहे असे ध्यानात येईल. मुस्लिमांनी या अभेदाचा कधी विसर पडू दिला नव्हता. जेव्हा जेव्हा ते स्वाऱ्या करीत, आक्रमणे करीत, राज्ये स्थापीत तेव्हा त्यामागे धर्मप्रसार हा एक प्रधान हेतू निश्चित असेच असे. जो जो मुस्लीम तो जवळचा व हिंदू हा निश्चित शत्रू ही भूमिका त्यांनी, काही अपवाद वजा जाता, कधी सोडलीच नाही. त्यामुळे राज्य स्थापन करताच सक्तीने धर्मांतर करणे आणि हिंदूंच्या कत्तली करणे किंवा त्यांवर जिझीया कर लादून व इतर बंधने घालून, त्यांचा अनन्वित छळ करून त्यांना जगणे असह्य करून टाकणे हे धोरण ते अवलंबीत. आज पाकिस्तानात हेच चालले आहे. मग त्या मागल्या काळी काय असेल याची कल्पनाच करणे बरे. सत्ता हाती येण्यापूर्वीही मुल्ला, मौलवी, अवलिया हे त्या प्रदेशांत ठाण मांडून धर्मप्रसाराचा उद्योग चालू करीत आणि या धर्मप्रसारातूनच राजसत्तेचा पाया रचीत. उलट हिंदू या काळच्या सुमारास संन्यास, निवृत्ती, मायावाद, मोक्ष, परलोक यांच्या आहारी जाऊन स्वराज्य, साम्राज्य यांविषयी उदासीन होत चालले होते. त्यामुळे हाती राजसत्ता असूनही राज्य चालविण्यासाठी जो साक्षेप, जी सावधता, जी दूरदृष्टी अवश्य असते ती त्यांच्या बुद्धीतून नष्ट होत चालली होती.

यादवांचे राज्य असतानाच सूफी पंथाच्या मुस्लीमांनी महाराष्ट्रात जो धर्मप्रसार केला त्यावरून या विधानाची सत्यता ध्यानी येईल. दौलताबाद (देवगिरी) व त्याच्याजवळचे खुल्ताबाद येथे मोमीन आरीफ व जलालुद्दिन गुंजरवा या मुसलमान साधूंच्या कबरी आहेत. हे दोघेही तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात, म्हणजे यादवांच्या राजवटीतच, दक्षिणेत धर्मप्रसाराचे कार्य करीत होते. सूफी सरमस्त हाही अरबस्थानातून तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात येथे येऊन स्थायिक झाला होता. त्याच्याबरोबर शेकडो फकीर व शिष्य होते. दिल्लीहून त्याच्या मदतीकरिता आलेल्या पठाणांच्या साह्याने तेथील सुभेदाराला मारून त्याने मुस्लीम धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले. हा १२८० च्या सुमारास मृत्यू पावला. दुसरा एक सूफी हयात कलंदर हा वऱ्हाडात मंगरूळपीर येथे याचे आधीच ते कार्य करीत होता.

मंगरूळ गावी मंगळ नावाचा राजा होता. त्याची व कलंदरची झटापट होऊन मंगळ मारला गेला. त्यामुळे कलंदराचा वचक सर्वत्र बसून हिंदूंना इस्लामधर्माची दीक्षा देण्याचे कार्य त्याला निर्वेधपणे करता आले. हा इ. स. १२५८ मध्ये मृत्यू पावला. १२७० च्या सुमारास वरंगळमध्ये काकतीयांचे राज्य होते. त्यांच्या राजवटीत अतिशय दंडेली करून मुस्लीम सूफी लोक धर्मप्रसार करीत होते. त्यांत जे मारले जातील त्यांना ते शहीद समजत व त्यांचे गुणगान करून लोकांना चेतवीत आणि हे सर्व हिंदू राजांच्या राजवटीत चाले.

हिंदुधर्माची तरुणता :

१२९६ साली अल्लाउद्दिनाने देवगिरीवर स्वारी केली. त्याच्या पाठोपाठ मुंतजबोद्दिन जर्जरीबक्ष हा सातशे सहकाऱ्यांना बरोबर घेऊन इ. स. १३०० मध्ये दक्षिणेत येऊन दौलताबादेजवळ खुल्ताबाद येथे स्थायिक झाला. मोईजोद्दिन हा त्याचा सहकारी त्याच्याबरोबरच आला होता. हा नंतर पैठणास गेला व तेथे असलेली महालक्ष्मी, रेणुकादेवी व गजानन यांची मंदिरे पाडून तेथे त्याने मशिदी उभारल्या. महानुभावांच्या स्थानपोथीत 'महालक्ष्मीचे देऊळ, पूर्वाभिमुख, एकवीरा दक्षिणाभिमुख विनायेकू, त्याची मसीद केली' असा उल्लेख आहे. पैठणला असा जम बसल्यावर पुणे, पेण, विजापूर, येथे आपले शिष्य पाठवून त्याने हिंदूंना इस्लामची दीक्षा देण्याचे काम सपाट्याने सुरू केले. लक्ष्मी, रेणुका, गजानन यांची मंदिरे पाडली गेली तेव्हा पैठणला यादवांचीच सत्ता होती; पण त्यांनी या इस्लामी आक्रमणाचा कसलाही बंदोबस्त केला नाही. (सूफी संप्रदाय – सेतुमाधवराव पगडी – प्रकरण ९ वे.) एक राजा फार तर गाफील असेल; पण इतर सरदार, सेनापती, हेमाद्रीसारखे पंडित काय करीत होते ? या अत्याचाराची कोणीही दखल घेऊ नये याचा अर्थ काय होतो ? या अत्याचारांचा अर्थ काय, त्यांतून कोणते संकट कोसळण्याची शक्यता आहे, त्याचा राज्यनाशाशी किती निकट संबंध आहे हे काही जाणण्याची ऐपतच देवगिरीला कोणाच्या ठायी नव्हती असे दिसते. राज्यनाश लांब राहिला. या हिंदुदेवता आहेत, ही धर्मपीठे आहेत, त्यांचा धर्माशी संबंध आहे हे तर त्यांना कळत होते ना ? पण तरीही त्यांना चीड आली नाही, त्यांचा संताप झाला नाही. ते सर्व याविषयी उदासीन होते. यादव राजांची स्तुती करताना, हेमाद्रीने

म्हटले आहे की, कलियुगामुळे धर्म क्षीण झाला होता, त्याला त्यांनी पुन्हा तरुणता प्राप्त करून दिली. पण या तरुणतेत मंदिरांचे व स्त्रियांचे रक्षण हे येत नव्हते. मग काय येत होते ? हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणीवरून ते कळेल. व्रते-वैकल्ये, उपासतापास, तिथिवार, नक्षत्र, त्यांची त्यांची पक्वान्ने, देवांच्या आवडी-निवडी, या सर्वांत धर्माचे तारुण्य होते. मंदिरांच्या रक्षणाचा, आक्रमणाच्या प्रतिकाराचा त्याशी काही संबंध नव्हता. विद्यारण्य, विद्यातीर्थ यांनी आक्रमणाच्या प्रतिकाराचा व धर्माचा संबंध अविभाज्य मानून त्या तत्त्वाचा प्रसार कर्नाटकात केला तसा देवगिरीच्या पंडितांनी केला असता तर मलिक काफूरला नर्मदेच्याखाली उतरता आलेच नसते. पण महाराष्ट्रात हिंदुधर्माला राजधर्माचे, राष्ट्रधर्माचे रूप आलेच नाही. तीनशे वर्षांनी छत्रपतींनी व समर्थांनी ते रूप दिले, धर्मक्रान्ती केली तेव्हा स्वराज्यस्थापना झाली.

या तीनशे वर्षांच्या काळात ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे संत महाराष्ट्र समाजाचे धर्मक्षेत्रातील नेते होते. पण हे संत व त्यांचे अनुयायी पूर्णपणे निवृत्तिवादी होते. संसार, स्त्रीपुत्र, धनवित्त, राज्य, ऐश्वर्य यांची त्यांनी कमालीची निंदा केली आहे. त्यांचा भक्तिमार्ग हा व्यक्तिधर्म होता. लो. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे भागवतधर्म हा मूळचा प्रवृत्तिवादी. गीतेतला कर्मयोग तो हाच. पण भागवतपुराणाचा भागवतधर्म हा त्याहून निराळा आहे. तो निवृत्तिवादी व व्यक्तिनिष्ठ आहे. संतांनी त्याचाच महाराष्ट्रात प्रसार केला. या धर्मामुळे हिंदू हे निदान हिंदू तरी राहिले, नाही तर सर्व महाराष्ट्र व हिंदुस्थानही इस्लाममय झाला असता, हे राजवाडयांचे म्हणणे काहीसे खरे आहे; पण विजयनगरचे साम्राज्य झाले नसते, तेथील सम्राटांनी इस्लामच्या प्रसाराला लष्करी सामर्थ्याने पायबंद घातला नसता, महाराष्ट्रातील बहामनी राज्यावर सारखी धाड घालून त्याला हतप्रभ केले नसते तर महाराष्ट्र इस्लाममय होण्याचे कितपत टळले असते याची शंकाच आहे. आणि येथे नंतर शिवछत्रपतींचा उदय झाला नसता तर हिंदुस्थानवरची ती आपत्ती टळली असती असे वाटत नाही. या दोन प्रवृत्तिधर्माच्या शक्ती निर्माण झाल्या नसत्या तर सिंध, अयोध्या, बंगाल, बिहार येथल्याप्रमाणे मुमूर्षू स्थितीत फार तर, हिंदू टिकून राहिले असते.

विठ्ठलाच्या लीला :

बहामनी इतिहासाचे समालोचन करताना नानासाहेब सरदेसाई लिहितात– 'त्या काळचे सर्व इतिहास मुसलमानांनी लिहिलेले आहेत. हिंदूंनी लिहिलेला एकही इतिहास-ग्रंथ नाही. त्या राज्यामध्ये मुसलमानांचे वर्चस्व असे. हिंदू लोक हलक्या नोकऱ्या व शेतीभाती करून स्वस्थ असत. ब्राह्मणी राज्यात इतकी बंडे झाली, इतक्या लढाया झाल्या व इतक्या राज्यक्रान्त्या झाल्या, पण कोणत्याही खटपटीत हिंदू लोक अग्रेसर असल्याचे आढळत नाही.' (मुसलमानी रियासत, भाग १ ला, आवृत्ती १८९८, पृ. २७२) बहामनी राज्याचे पाच तुकडे झाल्यावर अनेक मराठा सरदार उदयास आले; पण आश्चर्याची गोष्ट अशी की, एकही सरदार कधी विजयनगरच्या हिंदू राजांना मिळाला नाही किंवा एकाही पंडिताने विजयनगरपासून स्फूर्ती घेऊन राजधर्म, प्रवृत्तिवाद शिकविणारा ग्रंथ लिहिला नाही. स्वराज्य, स्वातंत्र्य या कल्पनांना ते किती पारखे झाले होते हे त्यांनी विठ्ठलाच्या ज्या लीला वर्णन केलेल्या आहेत त्यांवरून स्पष्ट दिसते. परमेश्वर नेहमी भक्तांसाठी धावत येत असे आणि तो काय करीत असे ? मुस्लीम सत्ता नष्ट करावी, हिंदू सैन्य निर्माण करावे, लढायांत हिंदूंना जय मिळवून द्यावा, असे उद्योग त्याने केले काय ? मुळीच नाही. जनाबाईला दळणकांडणाला मदत करणे, सेना न्हाव्याचे रूप घेऊन बादशहाची हजामत करणे, महाराचे रूप घेऊन पैशाचा भरणा करणे, देवळाचे तोंड पूर्वेकडून पश्चिमेला फिरविणे या लीलांत तो मग्न असे. सेना न्हावी किंवा दामाजी या भक्तांना छळणाऱ्या बादशहांना पदभ्रष्ट करून मराठ्यांना सत्तारूढ करावे असे देवाच्या कधी स्वप्नातही आले नाही ! पण माणसांच्या स्वप्नांत जे आले नाही ते देवाच्या कसे येणार ? माणसांना त्या काळी स्वराज्य, स्वातंत्र्य हे स्वप्नातही दिसत नव्हते. तीनशे वर्षांनी समर्थांना ते दिसले आणि 'स्वप्नीं जें देखिलें रात्रीं, तें तें तैसेंचि होतसे' या न्यायाने ते प्रत्यक्षात घडूनही आले.

रूढ धर्माचा उच्छेद :

तीनशे वर्षांच्या पारतंत्र्यानंतर शिवछत्रपतींना स्वराज्याची स्थापना करण्यात यश आले ते त्यांनी आधी धर्मक्रान्ती घडवून आणली यामुळेच होय. व्यक्तिधर्माला समाजधर्माचे रूप देणे, राजधर्मात सर्व धर्मांचा समावेश होतो हे लोकांच्या

मनावर ठसविणे, स्वराज्य व साम्राज्य यांना पाठमोरा झालेला धर्म त्या ध्येयाच्या मागे उभा करणे, थोडक्यात म्हणजे स्वराज्य व स्वधर्म यांचा संयोग घडवून धर्माला समाजसंघटनेचे तत्त्व मानणे हीच ती क्रान्ती होय. महाराजांनी विचार केला, "आपण हिंदू, सर्व दक्षण देश म्लेंच्छांनी व्यापला. धर्म बुडविला. हा रक्षणार्थ प्राणही वेचून धर्म रक्षू व आपले पराक्रमाने नवीन दौलत संपादू. पुरुष प्रयत्न बळवत्तर, दैव पंगू आहे, यास्तव प्रयत्ने अचल करावे, त्यास दैव जसजसे सहाय होईल तसतसे अधिक करीत जावे, देव परिणामास नेणार समर्थ आहे." धर्मरक्षणासाठी प्राण वेचावे लागतात, हा विचार या भूमीतून नाहीसाच झाला होता. छत्रपतींनी तो येथे रूढविला आणि त्यामुळे तीनशे वर्षांत येथे जे घडू शकले नव्हते ते चमत्कारासारखे पाचपंचवीस वर्षांत घडून आले. महाराजांना नवी दौलत संपादावयाची होती आणि रूढ हिंदुधर्म तर दर पावलाला त्यांना अडवीत होता. त्यामुळे त्या रूढ धर्मकल्पनांचा उच्छेद करीतच त्यांना मार्ग क्रमावा लागला. समुद्र-गमननिषेधाची रूढी त्यांनी झुगारून दिली व जलदुर्ग बांधून आरमार निर्माण केले. पतितांची शुद्धी रूढ धर्मशास्त्राला मान्य नव्हती, पण ते धर्मशास्त्र बाजूस ठेवून त्यांनी नेताजी पालकर व बजाजी निंबाळकर यांना परत स्वधर्मात घेतले. 'कलावाद्यंतयोः स्थितिः।' कलियुगात ब्राह्मण व शूद्रच फक्त आहेत,क्षत्रिय वैश्यांचे अस्तित्वच नाही, हे महामूर्ख वचन तर त्यांनी अगदी हेटाळून टाकले व 'क्षत्रिय-कुलावतंस' असे स्वतःला म्हणवून घेऊन विधियुक्त राज्याभिषेकही त्यांनी करवून घेतला. त्या काळी हिंदुधर्माला इतके हीन व समाजघातक रूप आले होते की, ज्याला काही 'नवे साधावयाचे' होते त्याला त्यात आमूलाग्र परिवर्तन घडविल्या-वाचून गत्यंतरच नव्हते आणि 'नवे साधावे हेच या कुलात जन्मल्याचे सार्थक' हे तर छत्रपतींचे ब्रीद होते.

छत्रपतींची नवी सृष्टी :

छत्रपतींनी हे 'नवे' काय साधले ? त्यांनी या महाराष्ट्रभूमीत नवे राष्ट्र निर्माण केले. सुर्वे, मोरे, सावंत, जेधे इ. मराठा देशमुख, सरदेशमुख, सरंजाम-दार, वतनदार हे सर्व विजापूरचे तावेदार होऊन आपापल्या मुलखातील प्रजे-कडून महसूल वसूल करून पातशहाकडे त्याचा भरणा करणारे त्याचे मुनीम झाले होते आणि आपल्या वतनापलीकडे त्यांना कसलीच दृष्टी नसल्यामुळे

त्यासाठी आपसात त्यांच्या कायमच्या लढाया चालू असत. अवचित छापा घालून एकमेकांची घरेदारे जाळून टाकणे, बायकामुलांसकट सर्वांची कत्तल करणे, कपटाने खून करणे, हे त्यांचे नित्याचे उद्योग होते. अशा या मराठ्यांना छत्रपतींनी एक नवी दृष्टी दिली. त्यांच्या ठायी आपण सर्व 'मराठे' आहो ही भावना निर्माण केली आणि स्वातंत्र्याची प्रेरणा त्यांना देऊन त्यांच्यांत नवचैतन्य निर्माण केले. जदुनाथ सरकार यांनी शिवछत्रपतींच्या कार्याचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. ते म्हणतातः "शिवाजी हा हिंदुजातीने निर्माण केलेला शेवटचा महाप्रज्ञासंपन्न असा राष्ट्रनिर्माता होय. त्याची सृष्टी–त्याची सेना, त्याचे आरमार व त्याच्या संस्था–ही त्याची स्वतःची होती. त्यात इतरांच्या अनुकरणाचे काही नव्हते. त्याच्या उदयापूर्वी मराठा समाज अनंत सबबत्या सुभ्यांमुळे छिन्नभिन्न झाला होता. त्यांना संघटित करून त्यांचे त्याने एक राष्ट्र घडविले आणि दिल्लीचे मोगल, विजापूरचे पातशहा, गोव्याचे पोर्तुगीज व जंजिऱ्याचे हबशी या सत्तांशी मुकाबला करून त्यांची आक्रमणे निर्दाळून, त्याने हे साधले, हे विशेष होय. त्याच्यापूर्वी मराठे हे सरदार होते; पण ते परक्यांचे दास होते. राज्यकारभारात त्यांना कसलेही स्थान नव्हते. ते लढाईत पराक्रम करीत, आपले रक्त सांडीत; पण ते परक्यांचे सेवक म्हणून. लढाईचे नेतृत्व त्यांच्याकडे नव्हते. अशा स्थितीत दिल्ली व विजापूर यांना आव्हान देऊन आपण स्वतंत्रपणे युद्धाचे नेतृत्व करू शकतो हा आत्मविश्वास शिवाजीने त्यांच्या ठायी निर्माण केला. हिंदुजात ही राष्ट्र निर्माण करू शकते, सेना व आरमार निर्माण करू शकते व स्वराज्य स्थापून ते यशस्वी करू शकते हे त्याने सिद्ध करून दाखविले. हिंदुत्व हा वठलेला वृक्ष नसून अनेक शतकांच्या पारतंत्र्यानंतरही तो पुन्हा फुटू शकतो, शाखापल्लवांचा त्याला अजूनही बहर येणे शक्य आहे आणि अनेक शतकांच्या अत्याचारांनंतरही पुन्हा उठून गगनाला भिडण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी आहे हे शिवाजीने पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले." (शिवाजी अँड हिज टाइम्स, ५ वी आवृत्ती, पृ. ३८५–८६).

नवे संघटना-तत्त्व :

ही महाक्रान्ती घडविण्याच्या कार्यात छत्रपतींना समर्थांचे सर्वतोपरी साह्य झाले हे विश्रुतच आहे. समर्थांनी प्रवृत्तिधर्माचा उपदेश केला, 'मनासारिखी

सुंदरा ते अनन्या' हे स्तोत्र लिहून संसाराचा गौरव केला, धनाचे माहात्म्य जाणून लोकांना 'प्रपंची पाहिजे सुवर्ण' हे समजावून दिले, 'शक्तीने मिळती राज्ये,' हे रोकडे सत्य समाजमनावर बिंबविले, 'यत्न तो देव जाणावा' 'साक्षेपी वंश देवाचे, आळशी वंश दानवी' हे सांगून दैववादाची निर्भर्त्सना केली आणि अशा रीतीने मराठासमाजाला काही अंशी भौतिक दृष्टी दिली. हे त्यांचे कार्य असामान्यच आहे; पण त्यांचे खरे कार्य म्हणजे या समाजाला त्यांनी एक नवे संघटनतत्त्व दिले हे होय. 'मराठा तितुका मेळवावा' हे ते महातत्त्व होय. शिवछत्रपतींना याच तत्त्वाचा साक्षात्कार झालेला होता. त्यांनी मराठा समाजाची संघटना करण्याचे कार्य आरंभिले ते याच तत्त्वावर. समर्थांनी याच तत्त्वाचे विवेचन केले आणि त्याच्या दृढीकरणासाठी मठांची स्थापना करून सर्व समाजात ते प्रसृत करण्याचा प्रयत्न केला.

पूर्वपरंपरा, मातृभूमी व भाषा यांच्या अभिमानाने पृथगात्म झालेल्या समाजाची जी संघटना ते राष्ट्र होय. या राष्ट्रकल्पनेचा उदय युरोपात नुकताच झाला होता आणि इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली अशी भिन्न राष्ट्रे तेथे उदय पावत होती. त्यांपैकी राष्ट्रतत्त्वावर प्रत्यक्ष समाजसंघटना करण्याचे साधले ते फक्त इंग्लिशांना. इतर लोकांना एकुणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत त्यात यश आले नव्हते. अशा या 'राष्ट्र' शक्तीचे दर्शन भारतात सतराव्या शतकात समर्थांना व्हावे यातच त्यांचे अलौकिकत्व आहे. 'राष्ट्र' तत्त्वाच्या बुडाशी समाजशक्तीची जागृती, हा विचार प्रधान आहे हे जाणूनच समर्थांनी त्या शक्तीचे महत्त्व समाजाला पटवून देण्याचे यावत्शक्य प्रयत्न केले. 'सकल लोक एक करावे, गलीम निवटूनि काढावे, ऐसे करिता कीर्ती धावे दिगंतरी ॥ बहुत लोक मेळवावे, एकविचारे भरावे, कष्टे करूनि घसरावे म्लेंछावरी ॥ आहे तितुके जतन करावे, पुढे आणिक मेळवावे, महाराष्ट्र राज्य करावे। जिकडे तिकडे॥' या संभाजीला लिहिलेल्या पत्रातील तीन ओव्यांत समर्थांचे सर्व तत्त्वज्ञान स्पष्ट झाले आहे. राष्ट्र घडवावयाचे म्हणजे 'लोक' ही शक्ती जागृत व संघटित केली पाहिजे हे समर्थांनी अचूक जाणले होते. हे लोक एका मर्यादित भूभागातील असून काही वैशिष्ट्याने इतरांपासून पृथक असले पाहिजेत, त्यांना स्वतंत्र अस्मिता निर्माण झाली पाहिजे हेही त्यांनी आकळिले होते. म्हणूनच 'मराठा तितुका मेळवावा, आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा' हा त्यांचा आग्रह होता. हे नवे तत्त्व आहे हे

लोकांना समजावून दिले पाहिजे, त्यांच्या रक्तात उतरविले पाहिजे, हे ध्यानी घेऊन त्यांनी शेकडो ठिकाणी फिरून फिरून ते विवरिले आहे आणि 'विवरिले तेचि विवरावे' असा आपल्या महंतांना आदेश दिला आहे. 'सर्वही पेरणे विद्या लोकांमध्ये हळूहळू, नेणते-जाणते करणे, कथानिरूपणे सदा!' 'लोक हे राखिता राजी सर्व राजीच होतसे.' 'जन हे बोळती तेथे अंतरात्माचि बोळला.' 'समर्थापाशी बहुतजन, राहिला पाहिजे साभिमान', 'जिकडे जग तिकडे जगन्नायक, कळला पाहिजे विवेक,' 'जनी जनार्दन बोळला, मग काय उणे तयाला?' 'जो मानिला बहुतांसी, कोणी बोलो न सके त्यासी, धगधगीत पुण्यराशी महापुरुष' या वचनांमधून समर्थांना लोकशक्तीचा, राष्ट्रकल्यनेचा साक्षात्कार कसा झाला होता आणि 'जे आपणांसि ठावे झाले ते इतरांसि शिकवून सकळ जन शहाणे करण्याचा' त्यांनी केवढा प्रयत्न चालविला होता हे ध्यानी येईल.

भारतातल्या इतर प्रदेशांत हे संघटनतत्त्व त्या काळी कोणी जाणले नव्हते. 'रजपूत तेवढा मेळवावा', 'गुर्जर तेवढा मेळवावा' बंगाली, पंजाबी, कर्नाटकी, तामिळी यांची या तत्त्वावर संघटना करावी, असे स्फुरण महाराष्ट्राखेरीज अन्यत्र कोठेही झाले नव्हते. इस्लामी आक्रमणाचा निःपात करण्यात मराठ्यांना इतरांपेक्षा जास्त यश आले अणि एका शतकाच्या आतच त्यांनी ते कार्य पुरे करून टाकले याचे हे कारण आहे. स्वराज्य व स्वधर्म यांचा संयोग तर त्यांनी घडवून आणलाच. 'देवद्रोही तितुके कुत्ते, मारूनि घालावे परते' देवदास पावती फत्ते, यदर्थी संशय नाही ॥, देव मस्तकी धरावा, अवघा हलकल्लोळ करावा, मुलुखबडवा का बुडवावा, धर्मसंस्थापनेपाठी ॥ या भूमंडळाचे ठायी, धर्मरक्षी ऐसा नाही, महाराष्ट्रधर्म राहिला काही, तुम्हांकरिता ॥ या वचनांवरून ते स्पष्टच आहे; पण त्याशिवाय मराठ्यांचे एक राष्ट्र घडवावे, या नव्या तत्त्वावर या समाजाची संघटना करावी, हे या दोन महापुरुषांचे प्रयत्न होते, हे वरील विवेचनावरून ध्यानी येईल. महाराष्ट्रात सतराव्या व अठराव्या शतकांत जी भारतव्यापी अशी एक प्रचंड शक्ती निर्माण झाली ती संघटनेच्या या नव्या तत्त्वातून निर्माण झाली यात शंका नाही.

स्वातंत्र्य-युद्ध :

या शक्तीचेच प्रत्यंतर औरंगजेबाशी झालेल्या स्वातंत्र्ययुद्धात आले. संभाजी-

महाराजांच्या मृत्यूनंतर जवळजवळ अठरा वर्षे हा संग्राम चालू होता. त्या काळात मराठ्यांचे नेतृत्व करील असा राजपुरुष कोणीच नव्हता. अखिल महाराष्ट्राचा एकमेव नेता असा अन्य पुरुषही या वेळी कोणी नव्हता. तरी औरंगजेबासारख्या अत्यंत प्रबळ शत्रूला मराठ्यांनी खडे चारले. पूर्वीच्या काळात एकेक दोन वर्षांत मुस्लीमांनी हिंदु राज्यांचा पाडाव केला होता. मलिक-काफुराने नर्मदेखालची अवघी दक्षिण पंधरा-वीस वर्षांत पादाक्रांत केली. तेथल्या चारही सत्ता अल्पावधीत धुळीस मिळविल्या; पण आता औरंगजेबासारखा अत्यंत बलाढ्य पातशहा आपल्या सर्व सामर्थ्यानिशी जातीने लढत असताना त्याला मराठ्यांना जिंकता आले नाही. त्याची अफाट सेना, त्याचे धुरंधर सेनापती, पोक्त सरंजाम, अक्षय्य खजिना हे सामर्थ्य मागल्या कोणत्याही मोहिमेपेक्षा भारी होते; पण ते सर्व व्यर्थ झाले, फजीत पावले ! सर्वश्रेष्ठ अशा मुस्लीमसत्तेचाही निःपात करील अशी एक भारी शक्ती महाराष्ट्रात त्या वेळी निर्माण झाली होती याचेच हे द्योतक होय.

निष्ठाहीन सरदार :

रामचंद्रपंत अमात्य, संताजी, धनाजी, शंकराजी नारायण, परशुराम त्रिंबक, खंडो बल्लाळ या थोर पराक्रमी पुरुषांनी एकजुटीने कार्य करून औरंगजेबासारख्या बादशहाला नामोहरम केले. 'बादशहाने राज्यानिमित्त आपला संपूर्ण पराक्रम व अर्थवैभवादि सर्व शक्ती वेचली. तथापि परिणामी हतोद्यम होत्साता, पराङ्मुख होऊन यमलोकास गेला.' अणि अशा रीतीने मराठ्यांनी स्वातंत्र्ययुद्ध जिंकले. त्यानंतर औरंगजेबाचा पुत्र अजमशहा याने शाहूला सोडून दिले व तो दक्षिणेत आला; पण राजारामाची राणी ताराबाई हिला आपला पुत्र शिवाजी हाच खरा गादीचा वारस आहे असे वाटत होते. त्यामुळे शाहूला सर्व प्रकारे विरोध करण्याची तिने सिद्धता केली आणि त्या तिच्या कृत्यामुळे मराठ्यांची स्वामिनिष्ठा दुभंगली आणि त्याबरोबर स्वराज्यालाही तडा गेला. चंद्रसेन जाधव, उदाजी चव्हाण, हिंदुराव घोरपडे इ. प्रमुख सरदार ताराबाईस मिळाले व शाहूचा पक्ष उघडा पडला; पण हे येवढ्यानेच भागले नाही. धनाजी जाधवाचा मुलगा चंद्रसेन जाधव यास शाहूने धनाजीच्या मागे सेनापतिपद दिले होते. तो प्रथम ताराबाईस मिळाला; पण पुढे तिचाही पक्ष सोडून तो सरळ मोगलांना जाऊन मिळाल

आणि त्याच्या मागून रंभाजी निंबाळकर, दमाजी थोरात, हिंदुराव घोरपडे, उदाजी चव्हाण, सर्जेराव घाटगे यांनीही तेच केले. याचा अर्थ असा की, स्वराज्य नाही, स्वधर्म नाही आणि स्वामीही नाही! त्यांच्या ठायी कसलीही निष्ठा नव्हती. त्यांना फक्त स्वतःचे वतन दिसत होते. जो पक्ष प्रबळ होईल, आपल्या वतनाची हमी देईल, त्या पक्षाला ते मिळत. मग तो मोगल असो की मराठा असो. या सरदारांचीच वृत्ती अशी होती असे नाही. कोल्हापूरचा संभाजी हा तर छत्रपतींचा वंशज; पण तोही शाहूविरुद्ध निजामाला मिळाला. खुद्द शिवछत्रपतींचे पुत्र संभाजीमहाराज हे ते जिवंत असतानाच मोगलांना जाऊन मिळाले होते: मग इतरांचे काय ? पण संभाजीमहाराजांनी शेवटी स्वधर्मासाठी आत्मार्पण करून आपल्या मागल्या दुष्कृत्यांची भरपाई केली. त्या त्यांच्या दिव्य त्यागामुळेच मराठ्यांमध्ये नवचैतन्य संचारले आणि त्यांनी महापराक्रम करून स्वातंत्र्ययुद्ध जिंकले; पण संभाजीमहाराज असे एकटेच निघाले. बाकीचे जे वर सांगितलेले लोक त्यांना स्वराज्य वा स्वधर्म यांचे कसलेही सोयरसुतक नव्हते.

नवा मनू :

सेनापतीसकट सर्व मोठे सरदार मोगलांना जाऊन मिळाल्यामुळे शिवछत्रपतींनी स्थापिलेल्या स्वराज्याचे अस्तित्वच धोक्यात आले होते. या वेळी बाळाजी विश्वनाथाचा उदय झाला आणि त्याने या सर्व प्रकारे विघटित व छिन्नभिन्न अशा मराठा समाजातून पुन्हा एक संघटित शक्ती निर्माण केली. ती शक्ती इतकी प्रभावी झाली की, स्वराज्याचा संभाळ तर तिने केलाच आणि शिवाय चढाईचे, आक्रमक धोरण स्वीकारून मराठा स्वराज्याचे साम्राज्य करण्याच्या उपक्रमाचा तिने पाया घातला. मोगल पातशहाचा दक्षिणचा सुभेदार सय्यद हुसेन व त्याचा भाऊ यांना दिल्लीच्या राजकारणात आपले वर्चस्व स्थापित करावयाचे होते. यासाठी त्यांनी या नवनिर्मित मराठा शक्तीचे साह्य मागितले. ही संधी साधून बाळाजी विश्वनाथाने लष्करासह दिल्लीला जाऊन स्वराज्याच्या व दक्षिणच्या साही सुभ्यांच्या चौथाईच्या व सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. बाळाजीच्या या कर्तृत्वाचे वर्णन करताना नानासाहेब सरदेसाई म्हणतात, 'मराठमंडळाचे लक्ष घरगुती भांडणातून काढून बाहेरच्या उद्योगात लावण्याचा बाळाजी विश्वनाथाचा मतलब सिद्धीस गेला, आणि मराठ्यांच्या उद्योगाला

नवीन क्षेत्र प्राप्त झाले. चौथाई-सरदेशमुखीचे हक्क मिळाल्यामुळे बाहेर संचार करण्याची मोकळीक मराठ्यांना मिळाली. स्वहित संभाळण्यासाठी आजूबाजूच्या सत्ताधीशांसंबंधाने चढावाची राज्यपद्धती स्वीकारावी लागते तसा बहुतेक प्रकार मराठ्यांचा झाला. या सनदांमुळे मराठ्यांच्या कारभारास नवीन वळण लागले. नवा मनू सुरू झाला. मराठशाहीचे हे रूपांतर बाळाजी पेशव्याने घडविले आणि पुढील पुरुषांनी त्याच्या परिपोषाचा उद्योग केला.' (मराठी रियासत, ५-पृ. १३८)

चौथाई सरदेशमुखी :

मराठा साम्राज्याचा विकास पुढल्या पन्नास वर्षांत जो झाला तो या पद्धतीने झाला. चौथाईसरदेशमुखीची पद्धत शिवछत्रपतींनी सुरू केली होती व मराठ्यांच्या स्वराज्याच्या बाहेरचा जो मुलूख त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांनी घ्यावयाची व त्याच्या बदल्यात एकंदर महसुलाचा चौथा हिस्सा त्यांनी घ्यावयाचा आणि ही चौथाई वसूल करण्यासाठी जो खर्च होईल त्यासाठी महसुलाचा दहावा हिस्सा–सरदेशमुखी–त्यांना मिळावयाचा. शेजारच्या राज्यात आपली सेना घुसवून तेथे वर्चस्व प्रस्थापित करावयाचे व नंतर हळूहळू त्या प्रदेशात आपले राज्य स्थापावयाचे असे हे धोरण होते. ब्रिटिशांनी तैनाती फौजेची पद्धत अवलंबून याच प्रकारे आपले राज्य स्थापिले. तैनाती फौज म्हणजे चौथाई सरदेशमुखीचीच सुधारलेली आवृत्ती होती.

दिल्लीच्या बादशहाने चौथाईचे हक्क मान्य केले तरी ते बादशहा अत्यंत दुबळे, कर्तृत्वशून्य व नालायक असल्यामुळे त्यांचे निरनिराळ्या प्रांतांवरचे सुभेदार मराठ्यांचे हे हक्क कधीच मान्य करीत नसत. त्यामुळे मराठ्यांना लढाया करून चौथाईचा ऐवज नेहमी वसूल करावा लागत असे. दक्षिणच्या सहा सुभ्यांचे-बऱ्हाणपूर, बऱ्हाड, विजापूर, कर्नाटक, वेदर व हैद्राबाद या प्रदेशांचे–चौथाईचे हक्क बादशहाने बाळाजी विश्वनाथाला दिले; पण या सहा सुभ्यांचा सुभेदार जो निजाम त्याने ते कधीच मान्य केले नाहीत. त्यामुळे मराठ्यांना त्याच्याशी वारंवार युद्धे करूनच ऐवज वसूल करावा लागत असे. निजाम व मराठे यांच्या लढाया झाल्या त्यांचे कारण हेच होते. त्यातूनच निजामाचा उच्छेद होऊन तेथे मराठी राज्याची प्रस्थापना झाली असती. ती का झाली नाही याचा विचार पुढे करू. सध्या या पद्धतीने मराठ्यांनी सर्व हिंदुस्थान आक्रमून मोगली सत्ता

हतबल कशी करून टाकिली ते पाहावयाचे आहे.

स्वराज्याचे साम्राज्य :

१७२८ साली पालखेड येथे निजामाचा पूर्ण पराभव केल्यावर बाजीराव व चिमाजी यांच्या मनात मोठ्या आकांक्षा निर्माण झाल्या व हिंदुपदपातशाहीचे शिवछत्रपतींचे स्वप्न साकार करण्याचा उद्योग आता हाती घ्यावा असे त्यांनी ठरविले. मनाचा असा निश्चय होताच त्यांची नजर माळव्यावर गेली. माळवा हे दिल्लीच्या पातशाहीचे मर्मस्थान होते. ज्याच्या हातात माळवा तो उत्तर हिंदुस्थानचा स्वामी, हे ठरलेले होते. शिवाय औरंगजेबाशी युद्ध सुरू असतानाच त्याला शह देण्यासाठी, मराठ्यांनी माळव्यावर हल्ले सुरू केले होते. त्यानंतर आता बादशाही अमलात माळव्याच्या रयतेवर व तेथील रजपूत सरदारांवर अतिशय जुलूम होऊ लागला होता. रयत अगदी गांजून गेली होती व सरदार हैराण होऊन गेले होते. याच वेळी पेशव्यांच्या पराक्रमाची कीर्ती त्यांनी ऐकली व स्वसंरक्षणासाठी त्यांना बोलावून सवाई जयसिंग, नंदलाल मंडलोई, वढवाणीचा ठाकूर अनूपसिंह व मांडवगडचे ठाकूर यांनी त्यांना सर्व प्रकारे साह्य करण्याचे आश्वासन दिले. या राजपुतांच्या साह्याच्या आधारावरच बाजीरावाने चिमाजीअप्पाची रवानगी माळव्यावर केली व त्यानेही अपूर्व पराक्रम करून गिरिधर व दयाबहादुर या बादशाही सरदारांस बुडवून माळवा जिंकला. शिंदे, होळकर, पवार या नवोदित मराठा सरदारांनी या वेळी पराक्रमाची शर्थ केली. म्हणूनच माळवा सर करून तेथे मराठ्यांना आपले राज्य प्रस्थापित करता आले. मराठ्यांनी माळव्यात उत्तम व्यवस्था लावून रयत इतकी सुखी केली की पाश्चात्य पौर्वात्य, सर्व इतिहासकार त्यांची यासाठी मुक्तकंठाने आजही प्रशंसा करतात. (माळवा इन ट्रॅन्झिशन,–महाराज कुमारसिंग; सेंट्रल इंडिया-मालकम, खंड २ रा, पृ. ८२) माळव्यानंतर बाजीराव स्वतः बुंदेलखंडावर चालून गेला. या वेळीही बुंदेले रजपूत व त्यांचा राजा छत्रसाल यांनीच मराठ्यांना साह्यार्थ बोलाविले होते. महंमदखान बंगष याने जैतपूरच्या लढाईत त्यांचा पराभव करून जैतपूरच्या किल्ल्यात छत्रसाल व त्याचे पुत्र यांना कैदेत ठेवले होते. बाजीरावाने जैतपूरला वेढा देऊन बंगषाची अन्नान्नदशा केली. तेव्हा बंगष शरण आला. माळव्याप्रमाणेच हाही विजय अपूर्व झाला व मराठ्यांचा

अंमल यमुनातीरापर्यंत झाला. नानासाहेब सरदेसाई म्हणतात, 'हे एकंदर प्रकरण म्हणजे मराठे व रजपूत यांचे मोगल बादशाहीविरुद्ध धर्मयुद्धच होय. ते जिंकल्यामुळे 'हिंदूंचा पुरस्कर्ता' अशी बाजीरावाची कीर्ती झाली.' (मराठी रियासत, ५।२, पेशवा बाजीराव, पृ. १४२) या मोहिमांपासूनच इन्दूर, धार, ग्वाल्हेर, सागर येथे मराठ्यांची कायमची ठाणी बसू लागली व तेथून त्यांचे उत्तरेतले उद्योग सुलभ होऊ लागले. याच वेळी शाहूच्या आज्ञेने कर्नाटक व गुजराथ या प्रदेशांत मराठ्यांनी मोहिमा सुरू करून तेथूनही ते चौथाई वसूल करू लागले. गुजराथेत तर त्यांनी माळव्याप्रमाणे राज्यच प्रस्थापित केले.

कालचक्र उलटविले :

माळवा, गुजराथ व बुंदेलखंड पडल्यामुळे दिल्लीची पातशाही हादरून गेली व तेथल्या दरबारातच, मराठ्यांच्या आश्रयावाचून पातशाही तरणे यापुढे शक्य नाही, असे म्हणणारा एक पक्ष निर्माण झाला. दिल्लीच्या पातशाहीची अशी विकल स्थिती असतानाच श्रीमंत प्रौढ प्रताप राऊस्वामी तथा थोरले बाजीरावसाहेब यांनी २८ मार्च १७३७ रोजी दिल्लीवर स्वारी केली. ही स्वारी करून बाजीरावाने कालचक्रच फिरवून टाकले. १२९६ साली अल्लाउद्दिनाने दक्षिणेवर स्वारी केली तेव्हापासून पाचशे-साडेपाचशे वर्षे तुर्कांची, मोगलांची दक्षिणेवर स्वारी, असाच काळाचा लोट चालू होता. बाजीरावाने दोन्ही बाहूंनी त्याला कच घालून तो उलटून टाकला आणि मराठ्यांच्या दिल्लीवर, लाहोरवर, अटकेपार स्वाऱ्या सुरू झाल्या.

दिल्लीच्या स्वारीने पातशाही तर हादरलीच; पण सर्व हिंदुस्थानही हादरले. मराठे ही एक नवी महाशक्ती निर्माण झाली हे अखिल भारतातील सत्ताधीशांनी व जनतेने जाणले. राजस्थानातील अनेक रजपूत सरदार पातशहाचा आश्रय सोडून उघड उघड मराठ्यांच्या आश्रयाला आले. यातच चिमाजीअप्पा याने कोकणात पोर्तुगीजांवर स्वारी करून वसई घेऊन भोवतालचा मोठा प्रदेश पोर्तुगीजांच्या छळातून मुक्त केला. यामुळे, मराठे हे केवळ तुर्कांनाच भारी आहेत असे नसून पाश्चात्य सत्तांनाही निर्दाळू शकतात, असा त्यांचा लौकिक सर्वत्र झाला व बाजीरावाच्या रूपाने आपल्याला एक नवा समर्थ नेता लाभला असा हिंदूंना दिलासा मिळाला.

दिल्लीच्या स्वारीनंतर पुढील दहा-पंधरा वर्षांत, चौथाईच्या पद्धतीने अखिल भारतावर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा मराठ्यांचा उद्योग पूर्ण झाला. मराठ्यांच्या शक्तीला या वेळी सर्व बाजूंनी उधान येत होते व मोठमोठे कर्ते, पराक्रमी पुरुष महाराष्ट्रात निर्माण होऊन ते हिंदुस्थान आटोपीत होते. नागरपूरचा रघूजी भोसले हा अशा पराक्रमी पुरुषांपैकीच एक होता. १७४० साली अर्कोटच्या नबाबाचा जावई चंदासाहेब हा, तंजावरच्या गादीवर असलेला शहाजीचा वंशज प्रतापसिंह भोसले याला उखडून टाकण्याच्या विचारात होता. त्या वेळी छत्रपती शाहूमहाराजांच्या आज्ञेवरून रघूजी मोठी सेना घेऊन कर्नाटकात उतरला व त्याने घनघोर युद्ध करून नबाबाला ठार मारले, चंदासाहेबाला कैद केले व एक कोट रुपये खंडणी घेऊन नबाबाचा मुलगा सफदरअल्ली यास अर्कोटचा नबाब केले. याच वेळी मुरारराव घोरपडे यास त्रिचनापल्लीस ठेवून तेथे त्याने मराठ्यांचे कायमचे ठाणे बसविले. कर्नाटकातून परत गेल्यावर बंगाल, बिहार व ओरिसा या पूर्व हिंदुस्थानातील प्रदेशांवर रघूजीने स्वाऱ्या करण्यास प्रारंभ केला. अलीवर्दीखान या पराक्रमी सरदाराने पातशाही सुभेदार सर्फराजखान यास मारून तो सर्व मुलूख बळकावला होता. १७५२ सालापर्यंत बंगालवर चार स्वाऱ्या करून भोसल्यांनी अलीवर्दीस वठणीवर आणले तेव्हा त्याने तीनही प्रांतांवरचा मराठ्यांचा चौथाईचा हक्क मान्य करून तसा तहनामा करून दिला. कर्नाटकाप्रमाणेच ओरिसातील कटक शहरी रघूजीने शिवरामभट साठे याला नेमून तेथेही मराठ्यांचे ठाणे कायम केले.

उत्तर हिंद :

पूर्वेप्रमाणेच उत्तरेचे–दिल्लीचे–राजकारणही साधारण याच सुमारास शिजून तयार झाले. या वेळी मुसलमानांतच दोन पक्ष पडून बादशहाला मराठ्यांच्या संरक्षणाची गरज भासू लागली. बादशहा अहंमदशहा याने मनसूरअली सफदरजंग यास वजीर व गाजीउद्दीन यास बक्षी–सेनापती–नेमिले. याच वेळी रोहिल्यांचा उदय होत होता हे मूळचे अफगाण. नादिरशहाच्या स्वारीपासून यांच्या झुंडीच्या झुंडी भारतात येऊन राहू लागल्या. हळूहळू गंगा-यमुनांच्या दुआबाच्या उत्तरेकडच्या कटेरा प्रांतात त्यांची वसाहत होऊ लागली. रोहिले हे भयंकर आडदांड, तामसी व क्रूर होते. त्यांनी मूळच्या हिंदूंना कटेरातून हुसकून लावून

तो प्रांत बळकावला. त्यामुळे त्याला रोहिलखंड असे नाव पडले. रोहिले हे सुनीपंथी असून वजीर सफदरजंग हा शिया होता. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण झाला; पण हे निमित्त कारण होय. दिल्लीची पातशाही अगदी दुबळी झालेली रोहिल्यांना दिसत होती. तेव्हा पूर्वी लोदी व सूर या अफगाणवंशांनी जसे दिल्लीस राज्य स्थापिले होते, तसे पुन्हा स्थापण्याची स्वप्ने त्यांना पडू लागली, म्हणून त्यांनी दुआबात व अयोध्याप्रांतात बंडाळ्या माजविण्यास प्रारंभ केला. बादशाही सरदारांना व वजीराला त्यांना पायबंद घालणे शक्य होईना. म्हणून त्यांनी मराठ्यांची मदत घेण्याचे ठरविले. जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर या वेळी उत्तरेत होतेच. त्यांनी १७५० साली चौथाईचा करार करून दिल्लीच्या पातशाहीचे रक्षण करण्याची जबाबदारी घेऊन पेशव्यांतर्फे तसा करार करून दिला. या कराराअन्वये ठट्टा, मुलतान (सिंध), पंजाब, रजपुताना व रोहिलखंड एवढ्या प्रदेशांत चौथाई वसूल करण्याचा हक्क मराठ्यांना मिळाला आणि याच्या बदल्यात सिंधपासून काशीपर्यंत सर्व प्रदेशाचा बंदोबस्त मराठ्यांनी करावयाचा होता. यानंतर थोड्याच दिवसांनी बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांचे चौथाईचे हक्क मराठ्यांना कसे मिळाले ते वर सांगितलेच आहे. अशा रीतीने श्रीशिवछत्रपतींनी सुरू केलेल्या चौथाईच्या पद्धतीने मराठ्यांनी एका शतकाच्या आत सर्व हिंदुस्थान व्यापला व हिंदुपदपातशाहीच्या स्थापनेची सिद्धता केली.

धर्मसंग्राम :

या वेळी दिल्लीची पातशाही जरी दुबळी झाली असली तरी तिचे निरनिराळ्या प्रांतांचे सुभेदार हे बरेच प्रबळ होते. दक्षिणेत निजाम व बंगालमध्ये अलीवर्दीखान यांनी मराठ्यांची सत्ता कधीच जुमानली नाही. मराठे त्यांना नमवीत तेवढ्यापुरते ते नमत; पण पुन्हा झगडा चालू करीत. अखिल हिंदुस्थानवर मुस्लीमांचे राज्य पुन्हा स्थापावे अशा त्यांच्या आकांक्षा होत्या. मराठ्यांना नमविण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही हे ध्यानात येताच त्यांनी वायव्येकडून पठाणी सुलतानांना बोलविण्याची पूर्वपरंपरा पुन्हा चालू केली. निजामाने नादिरशहाला याच कारणासाठी पाचारण केले होते; निदान तो यावा अशी त्याची प्रबळ इच्छा होती व म्हणूनच दिल्लीचा या वेळी तो वजीर असतानाही त्याने नादिरशहाला तोंड देण्याची कसलीच व्यवस्था केली नाही. निजामाप्रमाणेच

रोहिल्यांच्याही आकांक्षा होत्या. त्यांचा तर अफगाणिस्तानशी घनिष्ठ संबंध होता. ती त्यांची मायभूमीच होती. निजाम व रोहिले या दोघांनाही दिल्लीच्या बादशहाबद्दल कसलेच प्रेम नव्हते. ते प्रबळ असते तर त्यांना हवेच होते; पण ते दुबळे असून हळूहळू मराठ्यांच्या आहारी जात आहेत व यामुळे कालांतराने दिल्लीला हिंदुसत्ता प्रस्थापित होईल, याचे त्यांना पराकाष्ठेचे वैषम्य वाटत होते. १७४५ पासून दिल्लीला शह देण्याचा मराठ्यांचा उद्योग स्पष्ट दिसू लागला होता आणि १७५० साली बादशहाने त्यांना चौथाईचे हक्क दिले तेव्हा रोहिल्यांना कसलीच शंका राहिली नाही. म्हणून त्यांनी अफगाणिस्तानचा सुल्तान अहंमदशहा अबदाली – दुराणी – याशी संधान बांधून त्याला पाचारण केले व अशा रीतीने दिल्लीला पठाणी सत्ता स्थापून हिंदुपदपातशाही निर्माण होण्याचा संभवच नष्ट करून टाकण्याचा डाव त्यांनी टाकला. मराठे व अबदाली यांचा संघर्ष सुरू झाला तो या कारणाने. बादशहाच्या वतीने सर्व उत्तर हिंदुस्थानचे रक्षण मराठ्यांना करावयाचे होते. बादशहाला व त्याच्या सरदारांना अबदाली व रोहिले सारखेच शत्रू वाटत असत. त्यांच्यापासून रक्षण व्हावे म्हणूनच त्यांनी मराठ्यांचा आश्रय केला होता. आणि यातून होणारा अनर्थ दिसत असल्यामुळे रोहिल्यांचा त्याला कडवा विरोध होता. म्हणजे हा धर्मसंग्रामच होता.

अटकेपार :

अबदालीने १७४८ सालीच हिंदुस्थानवर स्वारी केली होती. पुढील दहा-बारा वर्षांत त्याने आणखी तीन स्वाऱ्या केल्या. त्याच्या प्रतिकारार्थ मराठे सज्ज होते. अशा एका स्वारीतच रघुनाथरावाने अटकेपार मराठ्यांचा झेंडा रोवला व मराठ्यांच्या आकांक्षांना गगन ठेंगणे आहे, हे दाखवून दिले. शिंदे-होळकरांचा तर अबदाली व त्याचे सरदार यांशी सतत संघर्ष चालू होता. यातूनच पानपतचा संग्राम उद्भवून मराठ्यांचा त्यात पराभव झाला. या पराभवाने मराठ्यांच्या हिंदुपदपातशाहीच्या आकांक्षांना जबरदस्त धक्का बसला. त्यांचे ते स्वप्न जवळजवळ भंगूनच गेले; पण माधवरावसारखा कर्ता पुरुष पेशवाईवर आल्याने मराठ्यांनी ते स्वप्न पूर्णपणे भंगू दिले नाही. पुढील आठदहा वर्षांत पुन्हा उत्तरेत त्यांनी पाय रोविले व १७७० साली रोहिलखंडात शिरून तेथे रोहिल्यांचा संपूर्ण निःपात केला आणि बादशहाला ताब्यात घेऊन दिल्लीच्या तख्तावर

आणून बसविले. अशा रीतीने पानपतच्या पराभवाची त्यांनी भरपाई केली. 'हिंदुपदपातशाही' या ग्रंथात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिले आहे की, '१७७० नंतर मुस्लीमसत्ता भारतात निष्प्रभ झाली. हिंदुपदपातशाहीच्या मार्गातील एक विरोधी प्रभावी शक्ती म्हणून तिचा विचार करण्याचे आता कारण राहिले नाही!' सावरकरांचे हे म्हणणे सर्वथैव खरे आहे. अवनिमंडल निर्यवन करण्याचे मराठ्यांनी आरंभिलेले कार्य येथे पुरे झाले.

स्वप्न भंगले :

पण हिंदुपदपातशाहीच्या मार्गातील एक विरोधी सत्ता ज्या शतकात मराठ्यांनी नष्ट केली त्याच शतकात तिच्याहून किती तरी पटींनी जास्त समर्थ अशी दुसरी सत्ता भारतात निर्माण होत होती आणि आता तिचा प्रभाव भारतात सर्वत्र जाणवू लागला होता. मराठ्यांनी पातशहा व दिल्ली यांना पुन्हा ताब्यात घेतले तेव्हा इंग्रजांनी सर्व बंगाल आक्रमिला होता व दिल्ली आक्रमिण्याच्या उद्योगास त्यांनी प्रारंभही केला होता; पण या वेळी महादजी शिंदे हा एक थोर, कर्ता व महापराक्रमी पुरुष मराठमंडळात उदयास आला व त्याने पुढील पंचवीस वर्षे इंग्रजांच्या त्या उद्योगाला पायबंद घातला. त्याच्या मृत्यूपर्यंत इंग्रजांना दिल्लीकडे दृष्टी टाकण्याची छाती झाली नाही. या काळात राघोबा मुंबईकर इंग्रजांच्या आश्रयाला गेल्याकारणाने, पुण्यावरच चालून जाऊन तेथे पेशव्यांच्या गादीवर त्याला स्थापून, मराठ्यांचे राज्य संपुष्टात आणण्याचा डाव इंग्रजांनी टाकला होता; पण तळेगावच्या लढाईत त्यांचा पराभव होऊन त्यांना मराठ्यांशी अत्यंत नामुष्कीचा तह करावा लागला. त्यानंतर दक्षिणेत नाना फडणीस व उत्तरेत महादजी यांच्या प्रभावामुळे इंग्रजांना काही हालचाल करता आली नाही. १७९२ साली महादजीने दिल्लीच्या बादशहाकडून वकील इ-मुतलीकच्या सनदा आणून पेशव्यास अर्पण केल्या. या सनदांमुळे पेशवे पातशहाचे वजीर झाले व महादजी शिंदे बक्षी म्हणजे सेनापती झाले व अशा रीतीने पातशाही संपूर्णपणे हिंदूंच्या ताब्यात आली. यानंतर कालांतराने दिल्लीस हिंदुपदपातशाहीचीही स्थापना झाली असती; पण इंग्रजांच्या सामर्थ्यापुढे मराठ्यांचा टिकाव लागला नाही. कदाचित आणखी काही वर्षे मराठेशाही टिकली असती; पण या सुमारास महादजी, हरिपंत फडके, रामशास्त्री असे कर्ते पुरुष काळाधीन झाले. सवाई

माधवराव मृत्यू पावल्यामुळे नाना फडणिसाच्या मागची पुण्याई संपून तो निष्प्रभ झाला सर्व मराठा मंडळाची शक्ती संघटित करील असा प्रतापी पुरुष आता कोणीच राहिला नाही व नवा निर्माण झाला नाही. यामुळे हिंदुपदपातशाहीचे स्वप्न साकार होत येते न येते तोच ते भग्न झाले आणि इंग्रजांनी अखिल हिंदुस्थान आक्रमून तेथे आपले अधिराज्य स्थापन केले.

मूल्यमापन :

मराठ्यांनी भारतातून मुस्लीम सत्तेचा समूळ नाश करून आपले वर्चस्व कसे प्रस्थापित केले त्याचे वर्णन व विवेचन येथवर केले. आता त्यांच्या या कार्याचे हिंदुसमाजाच्या संघटनेच्या व विघटनेच्या दृष्टीने मूल्यमापन करावयाचे आहे. हा मूल्यमापनाचा विचार मनात येताच अनेक प्रश्न समोर उभे राहतात. 'मराठ्यांचे साम्राज्य' असा शब्दप्रयोग नेहमी केला जातो त्याचा नेमका अर्थ काय? मराठ्यांनी महाराष्ट्राबाहेर माळवा, गुजराथ, ग्वाल्हेर व नागपूर या प्रांतांतच फक्त राज्य स्थापिले होते. संरक्षण, न्यायदान, करवसुली, चोराचिलट्यांचा बंदोबस्त ही शासनाची कर्तव्ये ते या प्रांतांपुरतीच पाहात असत. भारतातल्या इतर प्रांतांत ते फक्त चौथाईच्या वसुलीसाठी जात आणि ती लढाईवाचून कधीच वसूल होत नसल्यामुळे त्या वेळी अमाप लूटमार सहजच होई; पण याचा परिणाम फार वाईट होत असे. हे केवळ लुटारू आहेत असा तेथील लोकांचा समज होत असे आणि आजही बऱ्याच अंशी तो कायम आहे. वास्तविक प्रारंभी माळवा, गुजराथ मराठ्यांनी घेतले तेव्हा त्यांचे धोरण असे नव्हते. ते प्रांत चौथाईसाठीच त्यांनी घेतले; पण लगेच तेथे त्यांनी राज्य स्थापून रयत सुखी केली. मग बंगाल, बिहार, ओरिसा, पंजाब, मुलतान, कर्नाटक या प्रदेशांत त्यांनी हेच धोरण का अवलंबिले नाही? आपल्या नावाला लुटारू, दरोडेखोर असा कलंक का लावून घेतला? आणि असा कलंक लागलेला असताना 'मराठा साम्राज्य' हा शब्दप्रयोग कितपत सार्थ आहे? दुसरा प्रश्न असा की, अगोदर दक्षिणेत दृढ अशी राज्यस्थापना न करता ते उत्तरेत कशासाठी गेले? अटकेपार त्यांनी झेंडा नेला हे खरे. पण तो किती दिवस टिकला? एक भरारी यापलीकडे त्याला काय विशेष अर्थ आहे? मराठे दरसाल दसऱ्यानंतर मुलुखगिरीसाठी बाहेर पडत. आणि

अनेक प्रांतांतून चौथाई, सरदेशमुखी या हक्कांसाठी आणि इतर अनेक प्रकारे अमाप धन मिळवून स्वदेशी परत येत. असे असताना ते कायमचे कर्जबाजारी का राहिले ? बाजीराव, नानासाहेब, माधवराव यांना कर्जाची अहोरात्र चिंता असे. त्यापायी त्यांचे निम्मे रक्त आटले असेल. इंग्रज हे परमुलखातून आलेले. त्यांनाही सर्व हिंदुस्थानभर फौजा न्याव्या लागत; पण ते असे कर्जबाजारी कधीच झाले नाहीत ! पुढचा प्रश्न असा की निजाम, हैदर, अलीवर्दीखान, अर्काटचे नबाब, महंमदखान बंगष, यांना मराठ्यांनी अनेक वेळा जवळ जवळ प्रत्येक लढाईत पराभूत केले होते. तरी त्या मुस्लीम सरदारांनी मूळच्या सत्ताधाऱ्यांना नष्ट करून तेथे आपली राज्ये स्थापिली तसे मराठ्यांनी का केले नाही ? पन्नास वर्षे त्यांच्या कायमच्या कटकटी मागे ठेवून देण्यात त्यांनी काय साधले ? पानपतावर मराठ्यांचा अहंमदशहा अबदालीशी संग्राम झाला. हिंदुपदपातशाहीची स्थापना हे मराठ्यांचे ब्रीद होते. त्यांचे ते घोषवाक्यच होते. असे असून रजपूत, जाट, शीख यांपैकी कोणीही हिंदुराजे, सत्ताधारी वा सरदार पानपताला त्यांच्या बाजूने लढण्यास का उभे राहिले नाहीत ? त्या सर्वांना मुस्लीम सत्तेचा जुल्म अगदी असह्य झाला होता. त्यातून मुक्त व्हावे अशी त्यांची उत्कट इच्छा होती. माळव्याच्या स्वारीच्या वेळी रजपुतांनी मराठ्यांना सर्वतोपरी साह्य केले होते ! तरी पानपतावर मात्र त्यांनी व जाट-शिखांनी मराठ्यांना काडीमात्र साह्य केले नाही. उलट त्या वेळी ते मराठ्यांना शत्रूच लेखीत असत. त्यांची अशी विपरीत वृत्ती का झाली ? आणखी एक प्रश्न मनात उद्भवतो तो असा– बाबराच्या वेळेपासून मुसलमान आक्रमक लढाईत तोफांचा वापर करीत होते. तरी १७५० पर्यंत म्हणजे दोनशे-सव्वा दोनशे वर्षे होऊन गेली तरी मराठ्यांनी आपला तोफखाना का तयार केला नाही ? बाजीरावाने आपल्या अद्वितीय रणकौशल्याने पालखेड व भोपाळ येथे निजामाचा तोफखाना पोचणार नाही अशा ठिकाणी त्याला गाठून पराभूत केले हे निराळे. पण तोफा असत्या तर द्राविडी प्राणायाम करण्यात शक्ती खर्च झाली नसती; आणि मराठ्यांचे सामर्थ्य अनेक पटींनी वाढले असते. असे असूनही मराठे गहाळ का राहिले ? बाजीरावा-संबंधाने लिहिताना यदुनाथ सरकार यांनी प्रथम त्याचा अतिशय गौरव केला आहे आणि शेवटी एक प्रश्न उपस्थित करून त्याच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन केले आहे. ते म्हणतात, 'बाजीराव अल्पायुषी झाला म्हणून मराठा राज्याचा तोटा झाला

हे मान्य आहे; पण तो किंवा त्याचा पुत्र नानासाहेब पेशवा हे दीर्घायुषी झाले असते तरी भारताचे पारतंत्र्य–इंग्रजांचे अधिराज्य–टळले असते असे नाही. फारफार ते लांबणीवर पडले असते.' यदुनाथ सरकार यांच्या या म्हणण्याचा अर्थ काय? (पेशवा बाजीराव–सरदेसाई, प्रस्तावना–यदुनाथ सरकार, पृ. १२) प्रा. शेजवलकर यांनी नानासाहेब पेशवे व इंग्लंडचा त्याचा समकालीन नेता चॅथॅम याची तुलना करून नानासाहेबाला अगदी हिणकस ठरविले आहे आणि हे विवेचन करताना म्हटले आहे की, 'नानासाहेबाच्या जागी आमच्यात त्या काळी चॅथम का निर्माण झाला नाही, याचे उत्तर, आमच्या मते, हिंदी समाज हा इंग्रजी समाजाप्रमाणे नव्हता हे आहे.' (नानासाहेब पेशवे–चरित्र,सरदेसाई, प्रस्तावना–शेजवलकर, पृ. ७) याचा अर्थ असा की हिंदी समाजात चॅथॅम निर्माण करण्याची ऐपतच नव्हती! याचे कारण काय? याच प्रस्तावनेत जपानशी भारताची तुलना करून शेजवलकर म्हणतात, 'ज्या काळी पाश्चात्यांनी आमच्या किनाऱ्यावर प्रवेश केला त्याच सुमारास जपानच्या किनाऱ्यावरही केला, पण ते श्वेतेतर (आशियाई) राष्ट्र पाश्चात्य गिधाडांच्या तडाख्यातून सुटून पुन्हा त्यांच्याच जोडीस बसले. कोणत्याही पाश्चात्य राष्ट्राने इतक्या अल्प अवधीत एवढी कर्तबगारी दाखविलेली नाही. या जपानी मुत्सद्द्यांच्या पासंगालाही पुरणारी हुषारी दाखविणारा पेशवाईत कोणी निघाला नाही ही केवळ्या शरमेची गोष्ट आहे?' 'मराठे व इंग्रज' या तात्यासाहेब केळकरांच्या ग्रंथाला वासुदेवशास्त्री खरे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. तिचा समारोप करताना त्यांनी म्हटले आहे की, 'हिंदुस्थान इंग्रजांनी घेतले नसते तर फ्रेंचांनी घेतलेच असते. प्रवाहात पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असता त्यांतले कोणते फुटावयाचे, मातीचे की लोखंडाचे, हे ठरलेलेच आहे!' हिंदुस्थानचे पारतंत्र्य हे अटळ होते असा यदुनाथ सरकारांच्या म्हणण्याप्रमाणेच खरेशास्त्री यांच्याही म्हणण्याचा भावार्थ आहे. या इतिहासपंडितांनी असा निष्कर्ष का काढावा?

अतापर्यंतची मीमांसा :

वर मराठ्यांच्या सत्तेसंबंधी, साम्राज्यासंबंधी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांची उत्तरे आजवर अनेकांनी दिलेली आहेत. वर ज्या थोर इतिहासवेत्त्यांचा उल्लेख केला आहे त्यांनी आपल्या लेखांत त्यांचे विवेचनही केले आहे. सवत्या

सुभ्याची आवड, राष्ट्राभिमानाचा अभाव, आपसातील फूट, मध्यवर्ती सत्तेचा कमकुवतपणा आणि कवाइती लष्कर व सुधारलेली युद्धसामग्री यांचा अभाव ही केळकरांच्या मते मराठेशाही बुडण्याची खरी कारणे होत. मराठ्यांच्या साम्राज्यात घटनात्मक राज्यव्यवस्था नव्हती, लष्करात व्यवस्था व शिस्त नव्हती, भौतिक ज्ञानाची, विज्ञानाची, त्यांनी उपेक्षा केली, त्यांनी जगप्रवास कधी केला नाही ही कारणे सरदेसाई देतात. आणखी एक महत्त्वाचे कारण त्यांनी दिले आहे. सर्वांस धाकात ठेवून सर्वांकडून योग्य कामगिरी घेणारा चालक राष्ट्राला मिळाला नाही हे, त्यांच्या मते, राज्यनाशाचे आद्य कारण होय. इंग्रजांचे जबरदस्त राजकारण हेही एक कारण ते सांगतात. खरेशास्त्री यांच्या मते देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची वेसुमार हाव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय हे दुर्गुण आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत. कडवा धर्माभिमान, करडी राजनीती, करारीपणा, चिकाटी, निश्चय या गुणांचा अभाव ही कारणे शेजवलकर देतात. 'मराठाज् अँड पानिपत' या नावाचा एक ग्रंथ पंजाब विद्यापीठाने १९६१ साली प्रसिद्ध केला आहे. त्या विद्यापीठातील इतिहासशाखेचे प्रमुख प्रा. हरिराम गुप्ता हे त्याचे संपादक आहेत. 'अठराव्या शतकातील हिंदुसमाजात जातिभेद अत्यंत तीव्र होता. या समाजास ऐक्य, संघटना यांचा कसलाही पाया नव्हता. बंधुभावाला कसलाही आधार नव्हता. भिन्न भिन्न हिंदुसत्ता सांघिक वृत्तीने कार्य करू शकत नसत, त्यामुळे मुत्सद्देगिरी व रणांगण यांत त्यांचा पराभव झाला. हिंदुसमाजाचे ऐक्य हा एक भ्रम होता. उलट मुस्लीम समाजात धर्म हे प्रबळ संघटनतत्त्व होते. जिहाद–धर्मयुद्ध–या घोषणेने मुस्लीम समाज चटकन् एकत्र येई.' पानपतावरील मराठ्यांच्या अपयशाची कारणे देताना त्यांनी हे मत मांडले आहे. (प्रस्तावना, पृ. १२) दुसरे एक प्राध्यापक श्री. सनगर यांनी, वतनदारी, सरंजामदारी, शिवाजीच्या वेळच्या उच्च ध्येयनिष्ठेचा अभाव व मुत्सद्देगिरीचा अभाव, ही कारणे दिली आहेत. (पृ. २५६). नित्याची दुही, व्यवस्थितपणाचा अभाव, जुटीने काम करण्याच्या वृत्तीचा अभाव,—अशी कारणे न्या. मू. रानडे यांनी 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या आपल्या ग्रथात दिली आहेत.

कारणांचे मूलकारण :

वर दिलेली कारणे सर्वमान्य अशीच आहेत. शिवाय वरील सर्व इतिहास-पंडित मराठ्यांचे अभिमानी आहेत. पंजाब विद्यापीठातील लेखकही अनेक ठिकाणी मराठ्यांचा मुक्तकंठाने गौरव करताना दिसतात. तेव्हा त्यांनी काही पूर्वग्रह ठेवून ही कारणे दिली आहेत असे म्हणता येणार नाही. त्यांच्या ग्रंथांचा व एकंदर मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करताना मला याहून काही निराळी कारणे सापडली आहेत असे नाही. पण मी येथे एका निराळ्या दृष्टीने विचार करणार आहे. वर या पंडितांनी दिलेले दुर्गुण मराठ्यांच्या ठायी का उद्भवावे ? दीडशे वर्षांच्या वाढत्या वैभवाच्या काळातही ते लोप न पावता जास्तच प्रबळ का व्हावे ? याचा विचार केला पाहिजे असे वाटते. हिंदुसमाजात त्या काळी चॅथॅमसारखे कर्ते पुरुष निर्माण होणे शक्य नव्हते, हिंदुस्थानचे पारतंत्र्य अटळ होते, मराठ्यांचे राज्य म्हणजे मातीचे भांडे होते, ते फुटणे अपरिहार्य होते, अशी विधाने काही पंडितांनी केली आहेत. तेव्हा हा समाज कुठल्या तरी जुनाट रोगाने ग्रस्त झालेला असला पाहिजे, वरवरच्या औषधोपचारांनी तो रोग समूळ नष्ट होणे शक्य नव्हते, असे स्वच्छ दिसते. याची काही कारणमीमांसा केली पाहिजे. राष्ट्रनिष्ठा नाही, संघटनतत्त्व नाही. शिस्त नाही, ज्ञानार्जनाची हौस नाही, विज्ञानाचा अभ्यास नाही, जग पाहाण्याची जिज्ञासा नाही, चिकाटी नाही, निश्चय नाही यांमुळे मराठे पराभूत झाले हे खरे. पण हे सद्गुण त्यांच्या ठायी का निर्माण झाले नाहीत, आणि या समाजाला जय मिळणे शक्यच नव्हते, असे इतिहासतत्त्ववेत्ते का म्हणतात, हे अधिक खोल जाऊन पाहिले पाहिजे. कारणांचेही मूलकारण शोधले पाहिजे.

अधर्मशास्त्र :

माझ्या मते अकराव्याबाराव्या शतकापासून त्या वेळेच्या धर्मशास्त्रकारांनी जे हिंदुधर्मशास्त्र–किंवा खरे म्हणजे अधर्मशास्त्र—या समाजात रूढ केले ते या सर्व अनार्थाच्या बुडाशी आहे. भिन्नभिन्न आचार्यांनी उपदेशिलेली ती निवृत्ती, तो पुराणप्रणीत (गीताप्रणीत नव्हे) निष्क्रिय भागवतधर्म, चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता ही ती सनातन विघटक तत्त्वे, ते शब्दप्रामाण्य, तो कर्म-वाद, ती शुद्धिबंदी, तो समुद्रगमननिषेध, ती कलियुगकल्पना, ते कर्मकांड, ती

व्रतेवैकल्ये, ती संसारनिंदा, धननिंदा, भौतिक ज्ञानाची निंदा, – हे अधर्मशास्त्र या विनाशाच्या बुडाशी आहे असे मला निश्चित वाटते. शिवछत्रपती व समर्थ रामदासस्वामी यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने रूढ धर्मातले हे दोष जाणून त्यांतील बरेच नष्ट करण्याचा प्रयत्न कसा केला ते वर सांगितलेच आहे. त्यामुळेच या भूमीत एक अद्‌भुत शक्ती निर्माण होऊन तिने शंभर-दीडशे वर्षांत हिंदुस्थान आक्रमिला हे खरे; पण त्या दोन महापुरुषांनी घडविलेल्या क्रांतीची तत्त्वे समाजात दृढमूल करून ठाकण्याचे कार्य कोणीच न केल्यामुळे त्यांचा प्रभाव उत्तरोत्तर कमी होत गेला. खुद्द शिवछत्रपतींच्या वारसांनाच त्या महाराष्ट्रधर्माची कल्पना आली नाही आणि रामदासांच्या एकाही शिष्याला त्यांच्या प्रवृत्ति-धर्माचे आकलन झाले नाही, यापरते दुर्दैव ते काय ? वास्तविक या वेळी शास्त्री-पंडित, आचार्य, भिन्नभिन्न संप्रदायांचे धुरीण, मठाधिपती यांनी शिवसमर्थांचा नवा धर्म–महाराष्ट्रधर्म–जाणून घेऊन अखिल महाराष्ट्रात व भारतात कथा, कीर्तने, प्रवचने, पुराणे, भारुडे, लळिते, यांच्या द्वारा त्याचा अहोरात्र प्रचार करावयास हवा होता. पण ते बाजूलाच राहिले आणि शास्त्री, हरिदास, पुराणिक आचार्य, सर्व सर्व त्या जुन्या व्यक्तिनिष्ठ, परलोकवादी, दैववादी कर्मकांडात्मक धर्माचेच कीर्तन करीत राहिले. चार-पाचशे वर्षांची जुनी परंपराच त्यांनी चालू ठेविली. राज्य, साम्राज्य, क्षात्रधर्म, पराक्रम, विजीगिषा, यांचा कसलाही संबंध त्यांनी धर्माशी येऊ दिला नाही.

नवे संस्कार नाहीत :

बाजीरावाला शाहूमहाराजांनी पेशवाईची वस्त्रे दिली तेव्हा प्रतिनिधी, अमात्य, सुमंत, सेनापती या सर्वांना हा लहान पोर आपल्या डोक्यावर आणून बसविला याचे वैषम्य वाटले. यामुळे त्याच्याशी सहकार्य करण्याचे, त्याच्या आज्ञा पाळण्याचे त्यांनी साफ नाकारले. येथपर्यंत ठीक; पण यानंतर शाहूमहाराजांनी प्रत्येकाला आखून दिलेल्या प्रदेशात काही पराक्रम करण्याऐवजी ते एकेक निजामाला जाऊन मिळाले ! कोल्हापूरचा संभाजीसुद्धा निजामाला मिळून शाहूला उखडण्याचा डाव रचू लागला. त्या वेळी कोणी शंकराचार्यांनी, कोणी महाराजांनी, स्वामींनी, वारकरीपंथाच्या व दत्त, आनंद, चैतन्य या संप्रदायांच्या धुरीणांनी हा अधर्म आहे असे त्यांना सांगितले काय ? यवनसेवा, तुर्कसेवा हा अधर्म आहे

हे शिवछत्रपतींनी सांगितले होते. हे महातत्त्व वरीलपैकी कोणा तरी धर्माचार्यांनी समाजाला उपदेशिले काय ? त्याच्या हाडीमासी खिळविण्याचा प्रयत्न केला काय ? हरिदासांनी, पुराणिकांनी, कीर्तनकारांनी याचा उच्चार तरी केला काय ? शेकडो वर्षे मनावर झालेले ते जुने संस्कार जाऊन धर्म हे संघटनतत्त्व होय, परधर्मीयांना मिळून स्वधर्मीयांवर घाला घालणे अधर्म होय, या नव्या विचारांचे संस्कार एरवी व्हावे कसे ? पश्चिम-युरोपात इटली, जर्मनी, फ्रान्स, हॉलंड, इंग्लंड या देशांत राष्ट्रधर्म, बुद्धिप्रामाण्य, इहवृत्ती, प्रवृत्तिधर्म विज्ञाननिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता या विषयांवर शेकडो ग्रंथ या काळात झाले. तेव्हा त्या जुनाट शब्दप्रामाण्यवादी, परलोकनिष्ठ धर्माचे संस्कार पुसून जाऊन तेथे नवा मानव निर्माण झाला आणि याला धर्मक्रान्तीपासूनच प्रारंभ झाला. तशी धर्मक्रान्ती येथे झालीच नाही. ती एकट्यादुकट्याने होत नसते. ग्रंथ, प्रवचने, व्याख्याने यांचा पाऊस त्यासाठी पडावा लागतो. कृतिशील आदर्श त्यासाठी डोळ्यांपुढे असावे लागतात; पण येथल्या कवींनी, ग्रंथकारांनी, आचार्यांनी, पुराणिकांनी, कीर्तनकारांनी या धोरणाने काही केले नाही. स्वराज्य, स्वातंत्र्य यांचा त्यांच्या साहित्याशी, काव्यांशी, धर्माशी, कसलाही संबंध नव्हता. दुही, फूट, स्वजनद्रोह, स्वामिद्रोह, देशद्रोह यांचा त्यांच्या धर्मप्रवचनात केव्हाही, कधीही अधिक्षेप झाला नाही. कोणी इतर जातीच्या हातचे पाणी प्याला, कोणी सोवळे केले नाही, कोणी अभक्ष्यभक्षण केले, एकादशीला कांदा खाल्ला, कोणा मुलीच्या लग्नाला उशीर झाला तर मात्र हे आचार्य, हे शास्त्रीपंडित तत्काळ खवळून उठत व बहिष्काराचे अस्त्र उपशीत. बाजीराव मद्यमांस सेवन करीत असे, त्याने मस्तानी ठेविली होती यासाठी त्याच्यावर बहिष्कार घालण्यास पुण्याचा ब्रह्मवृंद उद्युक्त झाला होता. कारण त्यामुळे हिंदुधर्म रसातळाला जाणार होता. त्याच्या पराक्रमामुळे, दिल्लीवरील स्वारीमुळे, निजाम, बंगष यांना त्याने पराभूत केल्यामुळे हिंदुधर्माचा काही फायदा होतो, त्याचे रक्षण होते असे त्यांना मुळीच वाटत नव्हते.

पराक्रमाची यंत्रे :

शाहूच्या प्रारंभकाळी सर्व प्रमुख सरदार मोगलांना जाऊन मिळाले आणि नंतर निजामाला ! याचा अर्थ असा की, मराठ्यांवर राष्ट्रनिष्ठेचे वा धर्मनिष्ठेचे

संस्कार तर नव्हतेच पण स्वामिनिष्ठाही ते ओळखीत नव्हते. म्हणजे मराठा सरदार हा एक पराक्रमाचे यंत्र बनला. ती एक जडशक्ती झाली. इंग्रजांनी यावे, मोगलांनी यावे, फ्रेंचांनी यावे, पोर्तुगीजांनी यावे, हबशांनी यावे, त्यांना ही यंत्रे पैसा टाकताच मिळत आणि मग ती स्वधर्मीय, स्वदेशीय लोकांवर, स्वतःच्या स्वामीवर वाटेल तो भडिमार करण्यास सज्ज होत जमीन, वतन, पैसा एवढेच त्यांना दिसत असे. समर्थांनी म्हटलेच आहे, 'आम्ही पोटाचे पाईक, आम्हा नलगे आणिक, आम्ही खाऊ ज्याची रोटी, त्याची कीर्ती करू मोठी ॥' हीच टीका नानासाहेब सरदेसाई यांनी केली आहे. ते म्हणतात, 'अमात्यांच्या कारस्थानाचा विचार मुद्दामच केला आहे. त्यावरून मराठमंडळाच्या मनोभावनांची बरीच कल्पना करता येते. आपण एक राष्ट्र आहो, आणि सर्वांनी मिळून हिंदुस्थानावर आपले स्वराज्य स्थापन करावयाचे आहे, ही कल्पना थोड्याबहुत चालकांच्या मनात कितीही असली तरी सामान्य महाराष्ट्र-जनतेच्या मनात ही राष्ट्रीय भावना बिलकुल नव्हती. स्वार्थ साधेल ते कृत्य करण्यास मराठमंडळापैकी बहुतेक सर्व व्यक्ती नेहमीच तयार असत. मग त्या ब्राह्मण असोत किंवा ब्राह्मणेतर असोत.' (मध्यविभाग–२, १९२१ आवृत्ती, पृ. २४३) यावरून दुही, फूट हीच मराठ्यांची प्रकृती होती आणि ऐक्य, संघटना, राष्ट्रभावना ही त्यांची केवळ विकृती होती, हे ध्यानात घेतले म्हणजे त्यांच्या सर्व कर्तृत्वाचा ग्रंथ नीट लागतो.

शत्रू रक्षिला पाहिजे :

आपल्या धर्माच्या, देशाच्या, स्वामीच्या शत्रूला, पिढ्यान्‌पिढ्यांच्या हाडवैऱ्याला जाऊन मिळणे, त्यांच्याशी द्रोह करणे याची मराठ्यांना कसलीच खंत वाटत नसे. प्रारंभापासून अखेरपर्यंत एकही कालखंड मराठेशाहीत असा नव्हता की, जेव्हा मोठमोठे सरदार शत्रूला फितूर नव्हते. पेशवे आणि शिंदे ही दोन घराणीच याला अपवाद होती. त्यांच्याही निष्ठा ढळल्या तेव्हा साम्राज्यच बुडाले. नजीबखान, निजाम, हैदर यांचा एकदाच कायमचा निःपात का केला नाही असा प्रश्न विचारला जातो. त्याचे उत्तर सोपे आहे. प्रत्येक वेळी त्यांना संभाळायला मराठे सरदारच, त्यांचा पक्ष घेऊन उभे असत. नजीबखान रोहिल्याला अनेक वेळा मल्हारराव होळकरांनी वाचविला. त्याला मारले तर पेशव्यांना कोणी

शत्रू राहणार नाही व मग त्यांना शिंदे-होळकरांची गरजच राहाणार नाही व ते आपल्याला धोतरे बडवायला लावतील, ही मल्हारराबांना चिंता होती, म्हणून नजीबाला ते मानसपुत्रच मानीत. हैदराचा पूर्ण पराभव झाला तरी त्याला तहाच्या वेळी झुकते माप माधवरावांना द्यावे लागले. कारण राघोबा व तत्पक्षीय सरदार त्याच्या पाठीशी उभे होते. या लोकांनी निजामाचे व हैदराचे रक्षण केले ते याच हेतूने. शत्रू संभाळून ठेविला पाहिजे. उद्या माधवरावाविरुद्ध लढावे लागले तर त्याचे साह्य होईल! प्रत्यक्ष सरदारांची ही भावना होती. यातून त्यांचे दिवाण, सल्लागार यांनी काही या देशद्रोही वृत्तीस आळा घालावा, तर ते बाजूस राहून तेच स्वामिद्रोहाचा सल्ला देऊन सर्व कारस्थाने शिजवीत असत. राक्षसभुवनच्या लढाईच्या आधी देवाजीपंत चोरघडे हा जो भोसल्यांचा कारभारी त्याने जानोजी भोसले यास सल्ला दिला की, 'निजामास घेऊन खानदेशात छावणीस जावे, आजपर्यंत पेशव्यांनी कारभार केला, आता त्यास निर्दाळून आपणच दौलत करावी.' (रियासत, मध्यविभाग, आवृत्ती १९२५, पृ. ५५) सखारामबापू हा राघोबाचा कारभारी. त्याने फितुरीची किती कारस्थाने शिजविली हे प्रसिद्धच आहे. सरदेसाई लिहितात, 'प्रत्येक सरदाराजवळ शहाणपणाची घमेंड मिरविणारे व येनकेनप्रकारेण पेशव्यास गोत्यात आणून आपला वैयक्तिक स्वार्थ साधणारे कारभारी लोक असत. हे कारभारी बहुधा ब्राह्मणवर्गातले असत. ब्राह्मणांतच सारस्वत, प्रभू इत्यादींचा अंतर्भाव समजावयाचा. ताराबाईजवळचे पुराणिक व उपाध्ये, प्रतिनिधीचा यमाजी शिवदेव, दाभाड्यांचा यादो महादेव, भोसल्याजवळचा कोन्हेरेराम, शिंद्यांचे रामचंद्रबाबा, होळकरांचे चंद्रचूड या मंडळींस मराठी राज्य, त्याचे हेतू, पुढील कर्तव्य व प्रस्तुतच्या अडचणी यांची जाणीव बहुधा नसे.' (मध्यविभाग २, पृ. २३५) पेशव्याला गोत्यात आणावे हा प्रत्येकाचा प्रयत्न होता, पण तो वैयक्तिक स्वार्थासाठी; देशासाठी वा मराठी दौलतीसाठी नव्हे आणि पेशव्याला गोत्यात आणायचे ते निजाम, हैदर, रोहिले यांच्या साह्याने, स्वतःच्या हिमतीने नव्हे. सर्व मराठमंडळाने एकजूट करून शाहूच्यानंतर सातारच्या गादीवर जानोजी भोसल्यासारखा कर्ता तरुण पुरुष बसविला असता आणि अभेद्य एकी करून मग पेशव्यास दूर केले असते तर मराठी दौलतीचे हितच झाले असते; पण ती हिंमत, ते धैर्य व ते कर्तृत्व व तशी उदात्त निष्ठा कोणाच्याही जवळ नव्हती. माधवरावांच्यानंतर पुढील

पेशवे नाकर्ते झाले, तेव्हा तरी हे करावयाचे ! पेशवेपद तरी दुसऱ्या कोणा कर्त्या पुरुषाला द्यावयाचे; पण त्यासाठी सर्व मराठमंडळ संघटित असणे अवश्य होते. सर्व धर्मनिष्ठेने प्रेरित झाले असते तर ते अशक्य नव्हते; पण त्यांचा धर्म म्हणजे स्नानसंध्या, उपासतापास, सोवळेओवळे हा होता. त्याचा संघटनेशी संबंध नव्हता. अशा स्थितीत 'पेशवे कशीबशी धडपड करून, मराठमंडळाची जुळेल तशी एकत्र मोट बांधून, पुढे पाऊल टाकीत होते. आणि हिंदुस्थानभर पराक्रम गाजविण्याची त्यांस संधी देत होते. सरदारांची महत्त्वाकांक्षा मात्र अशी की, आपण संपादिलेले वतन आपल्या पश्चात आपल्या संततीस मिळावे. मुख्यतः लाचलुचपतीवरच मराठे सरदार पराक्रम गाजवीत. दरएक सनदेत व पत्रात प्रत्येकाची ही ऐहिक हाव स्पष्ट सांगितलेली असते.' (सरदेसाई कित्ता, पृ. २४८, २३६) अशा प्रकारे वतनाचा, धनाचा, सत्तेचा लोभ हीच बहुतेक सर्वांची प्रधान प्रेरणा असल्यामुळे पंजाब, रोहिलखंड, बंगाल, बिहार, ओरिसा, कर्नाटक, आंध्र या प्रदेशांत मराठ्यांना माळवा व गुजराथ येथल्याप्रमाणे प्रत्यक्ष राज्यस्थापना करता आली नाही.

ध्येयशून्य पराक्रम :

श्रीशिवछत्रपती व समर्थ यांच्या महाराष्ट्रधर्माच्या उपदेशाने व प्रत्यक्ष आचरणाने महाराष्ट्रात अनेक पराक्रमी, बलशाली व कर्तबगार घराणी निर्माण झाली; पण पुढे ती धर्मनिष्ठा ढळल्यामुळे त्यांना सत्ता, वतने व सरंजाम यांपुढे काही दिसेचना. याचा एक घोर परिणाम असा झाला की, यांतील अनेक घराण्यांची शक्ती एकमेकांशी भांडण्यात, प्रत्यक्ष रणांगणात उतरून लढाई करण्यात खर्च झाली. संताजी व धनाजी यांच्यापासून हा प्रकार जो सुरू झाला तो थेट शिंदे-होळकरांच्या लढाईपर्यंत अखंड चालू होता. मराठी राज्याचे शासन एकमुखी असावे हे अनेक मराठा सरदारांना मान्यच नव्हते. त्यामुळे कोल्हापूरचा संभाजी, त्र्यंबकराव दाभाडे, रघूजी भोसले, राघोबा, मोरोबा यांना नमविण्यातच शाहूमहाराज व पेशवे यांची निम्मी शक्ती खर्च झाली. मराठ्यांत राष्ट्रनिष्ठा जागृत असती, 'मराठा तितुका मेळवावा' याचा अर्थ त्यांना उमगला असता तर आपसात लढण्यात वाया गेलेली शक्ती संघटित झाली असती व मग तिला 'महाराष्ट्र राज्य करावे जिकडे तिकडे' हे ध्येय सिद्ध करता आले असते.

त्यातही आणखी खेदाची गोष्ट अशी की, वतने व सरंजाम हे पराक्रमासाठी असतात, मराठा राज्याची सेवा करण्यासाठी असतात एवढाही समज मराठा सरदारांनी संभाळला नाही. कार्य न करता, सेवा न करता, सरंजाम आणि वतने कायम राहिली पाहिजेत, असा त्यांचा आग्रह होता. बाजीराव पेशवा असताना प्रतिनिधी, सेनापती, अमात्य, सुमंत हे सर्व निष्क्रिय झाले होते; पण त्यांचे सरंजाम मात्र चालू होते. शाहूमहाराजांना ते खालसा करणे मंजूर नव्हते. त्यामुळे इकडे अमाप धन या निष्क्रिय वतनदारांना पोसण्यात खर्च होत होते आणि अखिल भारतभर मोहिमा चालविण्यासाठी जे लष्कर उभारावयाचे त्यासाठी पैसा उभा करताना पेशवे हैराण होत होते. ते कायम कर्जबाजारी राहण्याचे हे कारण होते. ऐतखाऊंचे सरंजाम खालसा झाले असते तर तो पैसा हिंदवी स्वराज्याच्या विस्तारासाठी उपलब्ध झाला असता आणि मग शस्त्रशक्ती व धनशक्ती यांचा संयोग होऊन मराठ्यांना आले याच्या शतपट जास्त यश आले असते. भावार्थ असा की, सातारा व पुणे येथे छत्रपतींची व पेशव्यांची दृढ, स्थिर व अविचल अशी सत्ता असती व त्यांचे सरदार एकनिष्ठ, धर्मनिष्ठ व स्वामिनिष्ठ असते तर हिंदुस्थानातल्या प्रत्येक प्रदेशात मराठ्यांना स्थिरपद राज्य स्थापून उत्तम राज्यकारभार करता आला असता. इंग्रजांची मूळ इंग्लंडमधील सत्ता दृढ होती व क्लाइव्ह, हेस्टिंग्ज, वेलस्ली या त्यांच्या सरदारांची राष्ट्रनिष्ठा संशयातीत होती. या बळावर त्यांनी जे करून दाखविले ते मराठ्यांनीही केले असते; पण मूळ राज्याला स्थैर्य नाही, सरदारांत निष्ठा नाही आणि खजिन्यात धन नाही अशा स्थितीत चौथाईच्या निमित्ताने सर्व दिशांना संचार करून मुस्लीम सत्ता नष्ट करणे येवढेच मराठ्यांना शक्य होते. थोरले बाजीराव पेशवे यांच्या कारकीर्दीपर्यंत मराठे हे हिंदुधर्माचे संरक्षक, पेशवे हिंदूंचे त्राते अशी उदात्त भूमिका मराठ्यांची होती व ती उत्तर हिंदुस्थानातही सर्वांना मान्य होती; पण पुढे मराठा सरदारांचे हे ध्येय सुटले. धनलोभाने ते रजपुतांवर, जाटांवर अत्याचार करू लागले. शिंद्यांनी एका रजपूत वारसाचा पक्ष घेतला तर होळकरांनी दुसऱ्याचा घ्यावा व दोघांनी आपसात लढाई करावी हा प्रकार नित्याचा झाला. यामुळे मराठ्यांची प्रतिष्ठा गेली व त्यांच्या नावाला लुटारू, दरोडेखोर असा कलंक लागला. रजपूत, जाट, बुंदेले हे हिंदू असूनही त्यांचे वैरी बनले. पानपतावर नजीबखानाने अबदाली, रोहिले, सुजाउद्दौला इ. सर्व मुस्लीम सत्तांची एकजूट केली; पण हिंदुसत्तांची एकजूट

करणारा पुरुष हिंदूंमध्ये झाला नाही. त्या धर्मात ते तत्त्वच नाहीं. विघटना हेच त्याचे प्रधान लक्षण होऊन बसले होते. त्यामुळे अखिल हिंदुधर्मीयांची संघटना ही कल्पनाच शक्य नव्हती. या वेळी सर्व शंकराचार्य, पंथाचार्य, मठाधिपती, संतमहंत यांनी एकत्र येऊन अखिल भारतभर भ्रमण करून हिंदुधर्माला हे रूप दिले असते तरच हिंदुशक्ती संघटित होऊन हिंदुपदपातशाही प्रत्यक्षात अवतरली असती; पण मुस्लीम, इंग्रज, पोर्तुगीज यांची कृपा संपादून आपापल्या गाद्या संभाळण्यात व वतनाप्रमाणेच त्यांसाठी भांडण्यात अखंड मग्न असलेले हे धर्मधुरीण हिंदुधर्मसंघटनेकडे कसे लक्ष पोचविणार ?

जातिभेदाचा गळफास :

जातिभेद हे मराठ्यांच्या अपयशाचे एक प्रधान कारण म्हणून यदुनाथ सरकार, हरिराम गुप्ता इ. काही पंडितांनी दिले आहे. तात्यासाहेब केळकर, नानासाहेब सरदेसाई यांनी हे मत खोडून काढले आहे. मराठ्यांत जी दुही झाली, फळ्या पडल्या, पक्ष पडले ते जातीअन्वये पडले नाहीत, प्रत्येक पक्षात सर्व जातीपोट-जातींचे लोक होते, असे दाखवून देऊन विनाशाला जातिभेद मुळीच कारण झाला नाही असे मत या दोघा थोर इतिहासवेत्त्यांनी मांडले आहे. त्यांनी मांडलेला युक्तिवाद बरोबर आहे; पण पक्ष पडणे, फळ्या पडणे एवढीच हानी जातिभेदाने होते असे नाही. जातिभेदामुळे हिंदूंचे शंकराचार्यादी धर्मधुरीण शूद्र, अस्पृश्य यांच्यात मिसळू शकत नाहीत. त्यांच्याविषयी आपले काही कर्तव्य आहे असेही त्यांना वाटत नाही. जातिभेद नसता तर हे धर्मवेत्ते त्यांच्यात जाऊन राहिले असते आणि इंग्रज मिशनऱ्यांनी बहुजनसमाजाला जसा राष्ट्रधर्म शिकविला, तसा यांनी शिवसमर्थांचा धर्म बहुजनांना शिकविला असता. जातिभेद नसता तर हिंदूंनी परदेश-प्रवास केला असता व युरोपातले नवीन भौतिक ज्ञान हस्तगत केले असते आणि मग परत येऊन आपल्या समाजात विज्ञाननिष्ठा निर्माण केली असती. तिच्या अभावी आपला विनाश झाला हे तर उघडच आहे. जातिभेद नसता तर या देशात तरी प्रवास करून इंग्रज, मुस्लीम यांच्यात आपले लोक मिसळले असते आणि इंग्रजांचे जवळून अवलोकन केल्यावर त्यांची विद्या, त्यांची राजनीती, त्यांची निष्ठा, त्यांची कारस्थाने यांचा तरी संस्कार आपल्यावर होऊन विज्ञाननिष्ठा व राष्ट्रनिष्ठा यांचे आकलन येथल्या येथेच आपल्याला झाले असते; पण इंग्रजांच्या सहवासात

गेल्यावर त्यांचा संसर्ग होणार, मग जात बाटणार व मग त्या व्यक्तीवर बहिष्कार पडणार! 'गेल्या शतकात गंगाधर दीक्षित फडके हा मनुष्य इंग्रजांस शिकविण्याकरिता पंडित म्हणून ५ वर्षे मुंबईस राहिला होता. तो परत आल्यावर, पाच वर्षे मुंबईत राहिलेला माणूस बाटल्याशिवाय कसा राहिला असेल, असे ठरवून त्यावर सर्वांनी बहिष्कार घातला. शेवटी तो संन्यास घेऊन मेला.' अशी एक गोष्ट लोकहितवादींनी दिली आहे. त्याच सुमारास 'एक हिंदुधर्माभिमानी' या सहीने 'प्रभाकर' या पत्रात एक पत्र प्रसिद्ध झाले आहे. लेखक म्हणतो, 'मुंबईत हिंदुधर्म रसातळाला गेला हे ऐकून मी मुंबईत पाऊल ठेवणार नव्हतो; पण नाइलाजाने जावे लागले. तेथील हिंदु लोकांची मने बहकून गेली आहेत. कोणी म्हणतात पुनर्विवाह करा, मुलींना शाळेत पाठवा. सरकारी शाळेतून महाराधेडांच्या मुलांना प्रवेश द्यावा, असेही काही म्हणतात. यावरून हिंदुधर्मविनाशास आपलेच लोक कारणीभूत आहेत असे दिसते.' (नाना शंकरशेट चरित्र, पृ. ११०) मुंबईस इंग्रजांच्या संसर्गात येणे, मुलींना शिकविणे, अस्पृश्यांना शाळेत घालणे ही हिंदुधर्म रसातळाला गेल्याची लक्षणे गेल्या शतकात ठरत. मग मराठेशाहीत काय असेल! ही हिंदुधर्माच्या विनाशाची लक्षणे असे मानणारे हिंदुधर्मशास्त्र हे अधर्मशास्त्र होय, हे कोणाच्याही लक्षात येईल. वरील चरित्राच्या लेखकाने हा धर्म नसून अधर्म होय, असेच मत दिले आहे. इंग्रज वा मुस्लीम यांचे राज्य आमच्यावर झाले, आम्ही त्यांचे गुलाम झालो, तर त्यांत हिंदुधर्महानी नाही. त्यांच्या सहवासात जाण्यात किंवा हिंदुधर्मीय जे महारधेड त्यांच्या सहवासात जाण्यात मात्र आहे! हा सर्व जातिभेदाचा प्रभाव आहे. तेव्हा हे स्पष्टच आहे की, परदेशगमन, ज्ञानार्जन, विज्ञानसंशोधन, बहुजनांना राष्ट्रधर्माची शिकवण देणे हे सर्व जातिभेदामुळे अशक्य झाले होते. आमच्या सर्व कर्तृत्वाला जातिभेदामुळे गळफास बसला होता.

छापखाना हे अर्वाचीन युगातले मोठे ज्ञानसाधन. पोर्तुगीजांनी गोव्यात १५५० च्या सुमारास तो आणला होता. त्याच वेळी भारतात त्याचा प्रसार झाला असता तर? पण ते होणे अशक्य होते. कारण जातिभेद! शाईमध्ये चरबी असते त्यामुळे वरिष्ठ जातींतील धर्मशील लोक गेल्या शतकातही छापील ग्रंथांना शिवत नसत. बाळशास्त्री जांभेकरांना 'दिग्दर्शन' हे तुपाच्या शाईत छापलेले आहे, असा खुलासा मुद्दाम करावा लागला होता. अशा स्थितीत छापखान्यात

काम करण्याला जातिभेद आड येणारच ! हे एका साध्या कारखान्याचे झाले. मग शास्त्रीय संशोधनात किती पदार्थांच्या बाबतीत ब्राह्मण्य आड आले असते याची कल्पनाच करावी. तेथे अनेक जीवांची हत्या करावी लागते. त्यांची चरबीच काय, त्यांचे रक्तमांस तपासावे लागते. त्यांच्यापासून व इतर अशाच वर्ज्य ठरलेल्या वस्तूंपासून झालेले पदार्थ संशोधनात वापरावे लागतात. अर्थात त्यामुळे जात बाटणारच. तेव्हा शास्त्रीय संशोधन ही कल्पनाच भारतात त्या काळात शक्य नव्हती. (श्रीशिवछत्रपतींनी याही बाबतीत रूढ धर्म बाजूस ठेवण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी छापखाना काढण्याचा प्रयत्न केला होता; पण तो यशस्वी न झाल्यामुळे १६७४ साली तो भीमजी पारेख याला विकला, अशी आख्यायिका आहे.) संशोधन लांब राहिले. सतराव्या-अठराव्या शतकात इंग्रज जसे येथल्या भाषा शिकत होते तसे मराठे इंग्रजी शिकले असते, तरी येथे धर्मक्रान्ती घडण्याचा संभव होता; पण एकोणिसाव्या शतकातही इंग्रजी भाषा शिकल्याने ब्राह्मणपणा जातो, अशी समजूत होती. जे इंग्रजी शिकले ते नास्तिक, निर्दय, अधर्मी, अमर्याद आहेत, असे लोक मानीत होते. (माडखोलकर–चिपळूणकर, काल आणि कर्तृत्व', पृ. ५९, ४२, ४३ चतुर्थ संस्करण इ. स. १९५४) परदेशगमन, परभाषाअध्ययन, ग्रंथाभ्यास ही ज्ञानाची द्वारे. तीच जातिभेदाने बंद केली होती.

स्वल्पमप्यस्य धर्मस्य :

हिंदूंच्या अधर्मशास्त्राने भारताची स्थिती अशी करून टाकलेली असताना त्या धर्मशास्त्राचा उच्छेद केल्यावाचून येथे कसलीही प्रगती होणे शक्य नव्हते. तसा थोडासा प्रयत्न शिवसमर्थांनी केला. त्यांच्या तेजस्वी महाराष्ट्रधर्मामुळे, त्याच्या स्वल्प प्रसारामुळेसुद्धा हिंदुसंस्कृती नष्ट होण्याच्या महान भयापासून भारताचे संरक्षण करण्याची महाशक्ती मराठ्यांच्या ठायी आली. इ. स. १७०७ नंतर शंभर वर्षेपर्यंत दिल्लीच्या तख्तावर अत्यंत नादान, कर्तृत्वशून्य, व्यसनासक्त, बेजबाबदार असे पातशहा होते. त्यांचे वजीरही त्याच मासल्याचे होते. (इंग्रज, मुस्लीम इ. अनेक लेखकांचे आधार देऊन यदुनाथ सरकार यांनी हे दाखवून दिले आहे. फॉल ऑफ दि मुघल एंपायर, खंड १ ला, पृ. १ ते १५) अशी स्थिती असूनही पंजाबचे शीख, राजस्थानचे रजपूत, बुंदेले,

बंगाली, बिहारी, उरिया, आसामी यांपैकी कोणीही त्या सत्तेवर आघात करून तेथे हिंदुवर्चस्व स्थापन केले नाही. ते कार्य दक्षिणेतून जाऊन मराठ्यांनी केले आणि वरील प्रदेशही मुस्लीम वर्चस्वापासून सोडविले. तेव्हा मराठ्यांच्या ठायी एक नवीन जोम, एक नवीन शक्ती निर्माण झाली होती यांत शंका नाही. पण शिवसमर्थांनी आरंभिलेली धर्मक्रान्ती सर्व क्षेत्रांत पूर्ण करून नवधर्मतत्त्वांचा प्रसार सर्व समाजात करण्याचा उद्योग येथले आचार्य, शास्त्री, पंडित, कवी, तत्त्ववेत्ते, कीर्तनकार यांनी न केल्यामुळे त्या शक्तीला जडत्व आले, अंधत्व आले. त्यामुळे मराठ्यांना मुस्लीमसत्ता भारतातून निर्मूल करण्यापलीकडे काही साधले नाही.

धर्मक्रान्ती होती तर :

मराठ्यांना पानपतावर जय मिळाला असता तर भारतात व्यवस्थित साम्राज्य स्थापण्यात त्यांना यश आले असते काय ? काही पंडितांनी यश आले असते, असे म्हटले आहे. पंजाब विद्यापीठातील इतिहासाचे एक प्राध्यापक प्रेमराज वर्मा यांनी तसे म्हटले आहे. त्या वेळच्या अनेक सत्तांपैकी मराठ्यांच्याच ठायी फक्त भारतीय साम्राज्य स्थापन करण्यास अवश्य ते नैतिक, बौद्धिक व भौतिक सामर्थ्य होते, असे ते म्हणतात. (मराठाज ॲण्ड पानिपत–हॅड दि मराठाज़ वन, पृ. २७०) असा पूर्ण संभव होता असे निश्चित वाटते; पण यानंतर जपानप्रमाणे अत्यंत वेगाने अवश्य ती धर्मक्रान्ती व मानसिक क्रान्ती मराठ्यांनी केली असती तरच ब्रिटिश आक्रमणापासून भारताचे संरक्षण त्यांना करता आले असते. कमोडोर पेरी या अमेरिकन सेनापतीने तोफांच्या बळावर अपमानास्पद तह जपानवर लादताच सत्सुमा, चोशियु, टोसा व हिझेन या चार मोठ्या सरदारांनी आपले सरंजाम खाली करून सम्राटाच्या स्वाधीन केले. शिंदे, होळकर, गायकवाड, नागपूरकर भोसले, पवार, पटवर्धन यांनी तसे केले असते तरच येथे संघटित सामर्थ्य निर्माण झाले असते. सम्राट मुटसुहिटो त्या वेळी बाल होता. त्याला नवे पाश्चात्य संस्कार करून त्या सरदारांनी कर्तृत्वसंपन्न केले. तेथला शोगुन म्हणजे पेशवा हा येथल्याप्रमाणेच सर्वसत्ताधारी होता. त्यानेही सत्तात्याग केला. प्रिन्स इटो, मार्क्विस इनोई व आणखी तिघे सामुराई–वरिष्ठ वर्णाचे लोक – इंग्लंडला गेले व परत येताना पाश्चात्य विद्या घेऊन आले. अशी क्रांती

१७६२ ते ७० या काळात येथे मराठ्यांनी केली असती तरच मराठ्यांना अखिल भारतात साम्राज्य स्थापून इंग्रज, फ्रेंच इत्यादी पाश्चात्य आक्रमणाचेही निर्दालन करता आले असते. (तशी क्रान्ती अजूनही येथे झालेली नाही. त्यामुळे अजूनही आपल्याला आपल्यावरील आक्रमणांचा निःपात करता येत नाही.) पण ती तेव्हा झाली नाही. त्यामुळे, ' येथे इंग्रजांचे राज्य झाले नसते तर फ्रेंचांचे झाले असते ', ' बाजीरावाला दीर्घायुष्य मिळूनही पारतंत्र्य टळले नसते ', ' चॅथॅमसारखे कर्ते पुरुष येथे निर्माण होणे शक्य नव्हते ' ही मते मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही.

समाजधर्माच्या अभावी :

हिंदुधर्म हा व्यक्तिनिष्ठ धर्म आहे. त्याला समाजधर्माचे, राष्ट्रधर्माचे रूप जोपर्यंत येत नाही तोपर्यंत तो स्वधर्मीयांना संघटित करू शकणार नाही. आपण हे ध्यानात ठेवले पाहिजे की, धर्माला समाजनिष्ठ धर्माचे रूप आले नाही तर व्यक्तिधर्मही तगू शकत नाही. संतांचा पुराणप्रणीत भागवतधर्म तर भारतात प्रचलित होता ना? मग कमालीची वतनासक्ती, त्यापायी वाटेल ती पापे आचरण्याची वृत्ती या मराठ्यांच्या दुर्गुणांना आळा का बसला नाही? राजस्थानातही संतसाधू होतेच; पण असे एक पाप नाही व दुष्कृत्य नाही की जे रजपुतांनी आचरले नाही. यदुनाथ सरकार म्हणतात, ' १७०७ नंतर तर पाशवी वासनांचे राजस्थानात सैतानी तांडवच सुरू झाले. बाप मुलाचा, मुलगा बापाचा खून करतो आहे, थोर घराण्यांतल्या स्त्रिया आप्तांवरही विषप्रयोग करण्यास कचरत नाहीत, राजे मंत्र्यांचे खून पाडीत आहेत, स्वकीयांना मारण्यासाठी रामाच्या वंशातले राजेही परकीय लुटारूंचे साह्य घेत आहेत; दारू, अफू, व्यभिचार यांना तर सीमाच नाही, अशी रजपुतांची स्थिती होती. ' (फॉल ऑफ दि मुघल एंपायर, पृ. २३६,३७) मराठ्यांना राष्ट्रधर्माची काही तरी जाणीव होती. त्यामुळे इतकी घोर पापे या प्रमाणात त्यांनी केली नाहीत, इतकेच. त्यांपासून ते मुक्त होते असे मात्र नाही. समाजनिष्ठ धर्मामुळे, राष्ट्रनिष्ठेमुळे मनुष्याचे मन व्यक्तिनिष्ठ धर्मापेक्षा जास्त उदार व उदात्त होते. व्यक्तिधर्मात हे चैतन्य नाही. समाजदृष्टिहीन व्यक्तिनिष्ठधर्म लोकांना विघटित करतो. मग तो समाज दुबळा होऊन परतंत्र होतो आणि त्याचा नैतिक अधःपातही

अटळ होती. भारताच्या गेल्या अनेक शतकांच्या इतिहासाचे हे सार आहे स्वराज्य व स्वधर्म यांचा संयोग घडवून विजयनगरने या अधःपातापासून दक्षिण भारताचे संरक्षण केले. मराठ्यांनी धर्मनिष्ठेला राष्ट्रनिष्ठेची जोड दिली. त्यामुळे अखिल भारताचे त्यापासून रक्षण करून हिंदुपरंपरा व हिंदुधर्म यांचे मुस्लीम आक्रमणापासून रक्षण करण्यात त्यांना यश आले. त्याच निष्ठांचे येथील धर्मवेत्त्यांनी संवर्धन करून त्या जनतेत दृढमूल केल्या असत्या तर पाश्चात्य आक्रमणापासूनही आपल्या मातृभूमीचे रक्षण करण्यात मराठे यशस्वी झाले असते आणि भारतात त्यांनी अत्यंत दृढ व बलशाली अशी हिंदुपदपातशाही स्थापन केली असती यात शंका नाही.

७

'राज्य करेगा खालसा'

प्रास्ताविक :

इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या अखेरीस गझनीचा सुल्तान सबक्तगीन याने पंजाबचा राजा जयपाळ याचा पराभव केला आणि तेव्हापासून त्या प्रदेशाचे स्वातंत्र्य नष्ट झाले. सबक्तगीनाचा मुलगा महंमद याने अनंगपाळ पराभव केला आणि तेव्हापासून पंजाब हा आपल्या राज्याचा एक प्रदेश आहे. असे गझनीचे अफगाण राजे मानू लागले. पंजाबवर हक्क सांग पठाणांची ही वृत्ती आठशे साडेआठशे वर्षे कायम होती. १८१० ला, मुलगा रास महाराजा रणजितसिंग यांनी पंजाब मुक्त करून तेथे स्वराज्याची केली तरी पठाणांनी ते कधीच मान्य केले नाही. १८३७ पर्यंत ते स्वाऱ्या करीतच होते. त्यांना यश मिळाले नाही हे निराळे. पण आपला आहे ही त्यांची भावना अखेरपर्यंत कायम होती. आणि घेण्यासाठी ते वारंवार जिहाद पुकारीत, हे आपण विसरू नये.

मागील लेखात सांगितल्याप्रमाणे शतकानुशतकांचे दीर्घकालीन पारतंत्र्य भारतातील बंगाल, बिहार, गुजराथ, माळवा, अयोध्या इ. अनेक प्रदेशांच्या नशिबी आले होते. पण पंजाब हा वायव्य सरहद्दीचा प्रदेश असल्यामुळे पारतंत्र्य, गुलामगिरी यांच्या भरीला कायमचे अराजक, रणधुमाळी, लूटमार,

जाळपोळ, विध्वंस, कत्तल, बलात्कार हीच पंजाबच्या जीवनाची प्रकृती होऊन बसली होती. पंजाबचा इतिहास वाचताना, हे लोक जगले तरी कशाच्या आधारावर, असा प्रश्न पडतो. मानवी जमाती अगदी समूळ अशा नष्ट सहसा होत नाहीत. कसे तरी प्राणधारण त्या करीत असतात. पण परंपरेचा धागा अखंड टिकवून, पूर्वसूरींचा वारसा सांगत जो समाज टिकून राहतो तोच जगला असे म्हणणे सार्थ आहे. दीर्घकालीन पारतंत्र्यात पंजाबचे लोक अशा अर्थाने जगले काय, आणि जगले असले तर कशाच्या बळावर, कोणाच्या सामर्थ्याने या प्रश्नाचा आपल्याला विचार करावयाचा आहे.

पंजाबचे लोक खऱ्या अर्थाने जगले असे इतिहास निःसंशय सांगत आहे. आणि याचे श्रेय बव्हंशी शीख या क्षात्रधर्मी, शूर, मर्द समाजाला, या लढाऊ जमातीला, गुरू नानक, गुरू गोविंदसिंग यांचा वारसा सांगणाऱ्या या पराक्रमी लोकांना आहे. ही पराक्रमाची प्रेरणा या समाजाला कोठून मिळाली, त्याला सामर्थ्य कसे प्राप्त झाले, त्याने संघटनतत्त्व कोणते अवलंबिले व परकीय आक्रमकांचा प्रतिकार करून भारताच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यात त्याला कितपत यश आले, याचा या लेखात विचार करावयाचा आहे.

मागील अनेक लेखांत सांगितल्याप्रमाणे या काळात हिंदुधर्माला अत्यंत हीन व विकृत रूप आले असल्यामुळे स्वसमाजाचे रक्षण करण्याचे सामर्थ्य हिंदु-समाजाच्या ठायी राहिले नव्हते. शतकेच्या शतके मुस्लीमांनी इतके भयानक अत्याचार हिंदूंवर केले होते की, पूर्वीच्या शतांश जरी स्वाभिमान त्यांच्या ठायी असता तरी त्यांनी या सैतानी आक्रमणाचा प्रतिकार केला असता. पण निवृत्ती, शब्दप्रामाण्य, जातिभेद, अस्पृश्यता, दैववाद, कर्मवाद, कलियुग, कर्मकांड, अपरिवर्तनीयता, असे एकाहून एक दुर्धर रोग या समाजाला जडलेले असताना, त्याच्या ठायी स्वभिमान जाग्रत होऊन त्याला सामर्थ्य प्राप्त होणे शक्यच नव्हते. तसे होण्यासाठी धर्मक्रान्तीचीच आवश्यकता होती. मराठे, विजयनगर यांनी धर्मक्रान्ती घडविली म्हणूनच त्यांना यश आले, हे मागील लेखात सांगितलेच आहे. बंगाल, गुजराथ, राजस्थान येथे अशा तऱ्हेची क्रांती झाली नाही म्हणून ते देश पारतंत्र्यात कायमचे खितपत पडले हेही तेथे दाखविले आहे. पंजाबमध्ये शीखांचा उदय झाला नसता तर तेथेही हेच झाले असते, यात शंका नाही. शीखांचा उदय होण्यापूर्वी व नंतरही ते संघटित

होईपर्यंत, पंजाब पारतंत्र्यातच होता. त्याला मुक्त केला तो शीखांनी. पंजाबात स्वराज्याची स्थापना होऊन काश्मीर, पेशावर व पंजाब हे प्रदेश बलुचिस्थान, अफगाणिस्थान या प्रदेशांप्रमाणे हिंदुधर्माला व हिंदुसंस्कृतीला कायमचे मुकले नाहीत, याचे श्रेय गुरुगोविंदांच्या या शिष्यांना–शीखांना आहे.

आधीच्या पाच-सहाशे वर्षांत पंजाबी जनतेला जे साधले नाही ते शीखांना कसे साधले, त्यांच्याच ठायी प्रतिकारसामर्थ्य कोठून आले, त्यांचाच पुरुषार्थ जागृत कसा झाला, त्यांनी काही धर्मक्रान्ती केली काय, काही नवे संघटनतत्त्व अंगीकारले काय, धर्मक्रान्ती केली असल्यास तिचे स्वरूप काय होते, त्या क्रांतीच्या तत्त्वांवरील निष्ठा शीखांनी अचल राखली काय, या व अशा सर्व प्रश्नांचे विवेचन आता करावयाचे आहे. 'शीख' या शक्तीच्या स्वरूपाचे, तिच्या यशापयशाचे संपूर्ण परीक्षण करून हिंदुसमाजाच्या संघटनक्षमतेविषयी काही निर्णय करावयाचे आहेत. 'राज्य करेगा खालसा' खालसाचे–शीखपंथाचे अनुयायी—स्वराज्यस्थापना करतील ही गुरुगोविंदसिंग यांची भविष्यवाणी कोणत्या अर्थाने खरी ठरली, किती सार्थ झाली हे पहावयाचे आहे.

धर्मक्रांती :

शीख पंथाचे संस्थापक गुरुनानक यांचा जन्म पंजाबातील तळवंडी या गावी इ. स. १४६९ साली झाला आणि १५३९ साली त्यांनी इहलोक सोडला. या दीर्घकाळात त्यांनी जो संप्रदाय प्रवर्तित केला त्याचे स्वरूप बाह्यतः इतर भक्तिमार्गी संप्रदायांसारखे असले तरी प्रथमपासूनच त्यात फार महत्त्वाचे भेद होते, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. गुरुनानक यांनी निवृत्ती, संसार-त्याग, संन्यास यांचा अत्यंत तीव्र निषेध केला आहे. भक्तिमार्गी साधुसंत हे संन्यासाचा उपदेश करीत नाहीत. संसारात राहूनच मोक्ष मिळतो असे सांगतात. अरण्यवासाची केव्हा चेष्टाही करतात. पण त्याचबरोबर ते संसाराची अत्यंत बीभत्स अशी निंदाही करतात. स्त्री-पुत्र, धन-दौलत, कीर्ती, वैभव यांची साधुसंतांनी कमालीची हेटाळणी केली आहे. यांबद्दलची उदासीनता हाच तर हिंदुसमाजाचा त्या काळी मुख्य रोग होता. गुरुनानक यांनी अशी संसाराची निंदा केली नाही. इतकेच नव्हे तर संसारत्यागाचा उपदेश करणाऱ्यांना आपल्या पंथात स्थानच दिले नाही. नानक यांचे पुत्र श्रीचंद हे संन्यासपक्षाचे

होते. पूर्ण संसारत्याग केल्यावाचून मोक्ष मिळत नाही, असे त्यांचे मत होते. त्यांच्या पंथाला उदासी पंथ म्हणतात. त्या पंथाच्या अनुयायांना शीख समाज स्वकीय मानीत नाही. नानकानंतरचे गुरू अंगद (१५३९–१५५२) यांनी तर एवढ्याच कारणासाठी उदासी पंथीयांना संप्रदायाच्या बाहेर घालविले. निवृत्ती हा विघटक धर्म आहे हे गुरू अंगद यांनी नेमके जाणले होते. त्यामुळेच त्यांनी श्रीचंदाच्या अनुयायांना थारा दिला नाही. पुढे पुढे शीख गुरूंनी अनेक शहरे वसविली, व्यापार, उद्योगधंदे यांकडे लक्ष पुरविले व आपल्या अनुयायांना तशी प्रेरणा दिली, यावरून गुरुनानक यांचा धर्म मुळापासूनच प्रवृत्तिरूप होता हे ध्यानी येईल. नानकांनी केलेल्या धर्मपरिवर्तनाचे हे पहिले लक्षण होय.

प्रवृत्तिधर्म :

पण गुरुनानकांच्या प्रवृत्तिपरतेचे यापेक्षा मोठे लक्षण म्हणजे ते परिस्थितीविषयी केव्हाही उदासीन राहिले नाहीत, हे होय. भक्तिमार्गी संत हे मुस्लीम आक्रमणाचा, त्यांनी केलेले जुलूम, अत्याचार, स्त्रियांची विटंबना यांचा उल्लेखही करीत नाहीत. भोवतालच्या परिस्थितीविषयी ते जळातल्या कमळाप्रमाणे अलिप्त असतात. पण गुरुनानक यांची वृत्ती अशी नव्हती. त्यांनी मुस्लीम अत्याचारांचा, बाबराच्या सैतानी वृत्तीचा अत्यंत जळजळीत शब्दांत निषेध केला आहे. ते म्हणतात, "क्रूर बाबर आपल्याबरोबर पापाची सेना घेऊन भारतावर चाल करून आला आहे. तो बलात्काराने धन व संपत्ती मागत आहे. लोकलज्जा व धर्म दोन्ही पळून गेले आहेत. सर्वत्र असत्य व पाप यांचा अंमल चालू आहे. निरपराधी जनतेवर मोगल राजे भुकी व्याघ्राप्रमाणे तुटून पडत आहेत. आणि त्यांचे साहाय्यक शिकारी कुत्र्यांप्रमाणे त्यांना मदत करीत आहेत. बाबराने आपल्या दूतांना सांगितले की, स्त्रियांचे सौभाग्य लुटा, आणि त्याच्या या घोषणेमुळे कोणाही राजाला सुखाने जेवता येत नाही. हे परमात्मा, तुम्ही खुरासानवर कृपा केली व भारतावर कोप केला आहे. कोणी तुम्हांला प्रत्यक्ष दोष देऊ नये म्हणून यमरूपी यवनांना तुम्ही येथे अत्याचार करण्यास धाडलेले दिसते. हे भगवान, हिंदूंनी पुष्कळ सहन केले आहे, मार खाल्ला आहे, पण तुम्ही तर सर्वांचे आहा ना?" (शीखांचा इतिहास, न. वि. गाडगीळ, पृ.

१०, ११, ३४). पारतंत्र्य व मुस्लीम आक्रमण यांची गुरुनानक यांना अशी खंत वाटत होती. शीख पंथीयांनी पुढे पंथाचे एक तंत्र म्हणूनच क्षात्रधर्माचा अंगीकार केला. गुरुनानकांनी पंथाला अशी दीक्षा दिलेली नव्हती, हे खरे. पण ज्या कारणामुळे शीखांना शस्त्र हाती घ्यावे लागले त्या कारणाची म्हणजे मुस्लीम आक्रमणाची, ह्या पापी सत्तेची जाणीव गुरुनानक यांनी स्पष्ट शब्दांत दिलेली आहे. इतर धर्मपंथ व शीखपंथ यांत हाच भेद आहे.

समता :

भारतातील भक्तिपंथांनी जातिभेदाचा निषेध केला आहे. पण तो परमार्थ-क्षेत्रापुरता. परमेश्वराच्या पायांशी सर्व जाती सारख्या असा उपदेश ते करीत. पण प्रत्यक्ष व्यवहारातील जातिभेदाचे ते कटाक्षाने समर्थन करीत. शूद्राच्या घरी उत्तम पक्वान्ने असली तरी ब्राह्मणाने ती खाणे योग्य नव्हे, असे ज्ञानेश्वर म्हणतात. वरिष्ठ वर्णांची सेवा हाच शूद्राचा धर्म, असे ते सांगतात. आणि हा धर्म 'गोरेया अंगी गोरेपण' इतका जन्मजात व म्हणूनच अटळ आहे, असे त्यांचे मत होते. एकनाथ, तुकाराम या इतर भागवतांनी सर्व जातींनी एकत्र अन्नपानादी व्यवहार करणे हे धर्महानीचे, कलियुगाचे लक्षण म्हणून सांगितले आहे. पण गुरुनानक यांनी व्यावहारिक पातळीवरूनही जातिभेदाचा निषेधच केला आहे. भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, सोवळेओवळे यांचा विचार ते कधीच करीत नसत. खाण्यापिण्यावर काही एक अवलंबून नाही, असे त्यांचे मत होते. शीखांच्या गुरुद्वारात लंगर ही संस्था आहे. तीत मुक्तद्वार सहभोजन चालते. स्वतः गुरुनानक अशा लंगरात जेवीत असत. त्यांचा पहिला शिष्य मर्दाना हा मुसलमान होता. प्रवासात तोच त्यांच्याबरोबर असे. पण स्पर्शास्पर्शाचा वा खाण्यापिण्याचा विधिनिषेध गुरूंनी कधीही पाळला नाही. याप्रमाणे शीखांची समताबुद्धी केवळ परमार्थापुरतीच मर्यादित नसून प्रत्यक्ष व्यवहारातही ती आचरणात आणली जात असे.

खाणेपिणे, स्पर्शास्पर्श, यावरील निर्बंधांमुळेच भारतातील जातिभेदाला फार कडक व घातक रूप प्राप्त झाले आणि त्यांमुळेच पूर्वी हजारो वर्षे चालू असलेले परदेशगमन, समुद्रपर्यटन हे हिंदूंना निषिद्ध ठरले. गुरुनानक यांनी परदेशगमनाचे हे सर्व नियम झुगारून दिले व आपल्या चवथ्या यात्रापर्वात ते मक्का, मदिना,

बगदाद या शहरांना भेटी देऊन आले. तेथे असताना त्यांनी अनेक इस्लामी पंडितांशी वादविवाद केले व अनेकांना आपली तत्त्वे पटवून दिली. बगदादला ज्या घरात शेख बहलोल यांच्याशी गुरुनानक यांचा वाद झाला तेथे 'बाबा नानक, फकीर अवलिया यांच्या स्मरणार्थ' अशी पाटी लावलेली आहे. तीवर हिजरी वर्ष ९२७ दिले आहे. म्हणजे ही गोष्ट इ. स. १५२०-२१ साली घडली.

मुस्लीमांना दीक्षा :

पारंभापासून हिंदू व मुसलमान यांत भेद नाही असा उपदेश नानक करीत असत. आणि हा त्यांचा उपदेश पटल्यामुळे अनेक मुसलमान शीखपंथात त्या काळी आले. अन्य धर्मीयांना संस्कार करून आपल्या धर्मात घेणे ही हिंदू-धर्मीयांची प्राचीन परंपरा पुढे पूर्ण बंद पडली, हे मागे सांगितलेच आहे. पुढे हिंदूंचे सोवळे इतके वाढले की स्वधर्मातून, जुलमामुळे, फसवणुकीमुळे जे च्युत झाले त्यांनाही शुद्ध करून घेण्याचे त्यांनी नाकारले आणि पुढील अनेक अनर्थांचा पाया रचून ठेवला. गुरुनानक यांनी मुस्लीमांनाही शीखपंथात समाविष्ट करून घेण्याचा उपक्रम केला. ही प्रथा कायम टिकली असती तर भारतावरची अनेक संकटे मुळातच नाहीशी झाली असती. पण मुस्लीमांचे धर्मांतर करणे हे दिल्लीच्या मोगल पादशहांना व त्यांच्या मुल्लामौल्वींना सहन होणे कधीच शक्य नव्हते. हिंदू सत्ताधीशांना हिंदूंच्या धर्मांतराची खंत कधीच वाटली नाही. देवगिरीचे यादव, वरंगळचे काकतीय यांची सत्ता चालू असतानाच सूफी पंथाच्या मुल्लामौल्वींनी अनेक हिंदूंना इस्लामची दीक्षा दिली, येवढेच नव्हे तर हिंदू राजे सत्तारूढ असताना त्यांनी हिंदुदेवतांची मंदिरे पाडून तेथे मशिदी उभारल्या. हिंदूंच्या धर्मांतराची हिंदू राजांना व हिंदू धर्मपंडितांना कधी खंत वाटलीच नाही. पण इस्लामी सुलतान व त्यांचे मुल्लामौलवी याबाबतीत पराकाष्ठेचे जागरूक असत व आजही आहेत. गुरुनानक यांनी आपली धर्मतत्त्वे इस्लामपेक्षा श्रेष्ठ आहेत असे सांगितले आणि अनेक मुस्लीमांना शीख पंथात समाविष्ट केले. यामुळेच पुढे शीखपंथ व दिल्लीचे पादशहा यांच्यात मोठा संघर्ष निर्माण झाला. गुरुनानक यांच्या काळी दिल्लीची सत्ता विशेष प्रभावी नव्हती. त्यानंतर अकबर हा फार मोठा बलाढ्य पादशहा झाला. पण त्याची इस्लामनिष्ठा कडवी नव्हती.

त्याची शीखपंथाला सहानुभूतीच होती. पण त्याच्यामागून १६०५ मध्ये जहांगीर गादीवर येताच मुस्लीमांच्या धर्मांतराला पायबंद घालण्याचा त्याने निर्धार केला व तेथपासूनच शीख व मुस्लीम हे हाडवैरी झाले. येथून पुढचा शीखपंथाचा सर्व इतिहास हा पंजाबातून मुस्लीम सत्तेचा उच्छेद करण्याचे शीखांनी जे प्रयत्न केले त्याचा इतिहास आहे.

पृथगात्मता :

गुरुनानक यांच्यानंतर गुरू अंगद (१५३९–५२) हे त्यांच्या स्थानी आले. हे गुरू अंगद व त्यांच्यानंतरचे चार गुरू अमरदास, रामदास, अर्जुन व हरगोविंद यांच्या काळात (१५५२–१६४५) शीख संप्रदायाची पृथगात्मता निश्चित झाली. सभोवार पसरलेल्या हिंदुसमाजापासून हा संप्रदाय स्पष्टपणे निराळा दिसू लागला. त्याला त्याची अशी अनेक वैशिष्ट्ये या गुरूंनी प्राप्त करून दिली आणि त्यामुळे या पंथाच्या विशिष्ट धर्माला संघटनतत्त्वाचे स्वरूप येऊन शीख समाज संघटित झाला. शीख समाज इतर हिंदूंपेक्षा जास्त प्रबल झाला, मोगली सत्तेचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य काही अंशी त्याला प्राप्त झाले, ते या नवधर्मतत्त्वांवरील श्रद्धेमुळे आणि त्या श्रद्धेमुळे जी पृथगात्मता आली तिच्यामुळेच होय.

गुरू अंगद व गुरू अर्जुन यांनी 'ग्रंथसाहेबा'ची रचना पूर्ण करून शीखांना एक स्वतंत्र धर्मग्रंथ प्राप्त करून दिला. वेदप्रामाण्य त्यांनी त्याज्य ठरविले. हिंदूंची पुराणे, त्यांतील अवतारकल्पना, तीर्थयात्रा, व्रतेवैकल्ये त्यांनी शीखांना वर्ज्य केली. आणि यापुढे शीखांचे विवाहादी सर्व संस्कार ग्रंथसाहेबांतील मंत्रांनी झाले पाहिजेत असा दण्डक घालून दिला. गंगा, यमुना, काशी, प्रयाग, रामेश्वर या सर्व तीर्थक्षेत्रांचे पुण्य अमृतसर येथील सरोवरात साठविले आहे, असे त्यांनी सांगितले आणि वैशाख, माघ व कार्तिक शुद्ध प्रतिपदा हे शीखांसाठी नवे सण रूढ केले. गुरुगोविंदसिंगांनी शीखांना पृथगात्म करण्याचे हे कार्य पूर्णतेस नेले. पोल नावाचा दीक्षाविधी प्रत्येक शीखाला अवश्य म्हणून त्यांनी सांगितला, केश, कंगवा, कच्छ, कडे व कृपाण ही शीखांची वैशिष्ट्ये सदैव त्याच्याजवळ असलीच पाहिजेत, असा नियम केला, 'वाह गुरू की फत्ते' हे नमनवाक्य म्हणून ठरवून दिले व प्रत्येक शीखाने दीक्षा घेताच सिंग हे उपपद आपल्या

नावापुढे लावले पाहिजे असा दण्डक घालून दिला. अशा तऱ्हेने शीखसमाज हा एक संप्रदाय झाला. वारकरी, रामदासी यांना आपण संप्रदाय म्हणतो. पण त्याचे नियम असे कडक नाहीत. माळ घातली नाही, टिळे लावले नाहीत, विठ्ठलाहून किंवा रामाहून अन्य देवतांचे भजन केले तर त्या मनुष्याला पंथात स्थान नाही असे कधी घडत नाही. अमुक एक मनुष्याला अमक्या कारणासाठी संप्रदायातून घालवून दिले, असे या संप्रदायात कधीच घडले नाही. अशा बाह्य आचारावर अनुयायित्व अवलंबून ठेविणे हे त्या पंथाच्या प्रवर्तकांना मुळीच मान्य नव्हते. कारण शेवटी हे बाह्य कर्मकांड तेवढे शिल्लक राहून मूळ आत्मा निघून जातो, असे त्यांचे मत होते. पण शीखगुरूंनी या आचारांवर भर देऊन आपल्या पंथाची भिन्नता करकरीत करून टाकली व त्याला एक स्वतंत्र अस्मिता प्राप्त करून दिली.

पृथगात्मता, भिन्नता यांत शक्ती आहे, सामर्थ्य आहे, बल आहे. अखंडात खंड निर्माण झाला, अनंतात सांतता आली, अरूपाला रूप आले की कर्तृत्व निर्माण होते, असे ब्रह्मासंबंधी बोलताना, तत्त्ववेत्ते म्हणतात. मानवाबद्दल ते तितकेच खरे आहे. आपण समूह म्हणून इतरांच्यापेक्षा भिन्न आहो, निराळे आहो अशी जाणीव ज्या समाजात निर्माण होते तो समाज हळूहळू उन्नत होऊ लागतो. अर्थात ज्या कारणांमुळे, ज्या तत्त्वांमुळे तो समाज इतरांपासून आपल्याला पृथक मानतो त्यावर म्हणजे त्या संघटनतत्त्वावर त्याची निष्ठा किती दृढ आहे, अविचल आहे, उत्कट आहे यावर ही उन्नती अवलंबून आहे, हे उघडच आहे. शीखसमाजाने काही धर्मतत्त्वे निराळी मानून त्यांवर आपल्या संप्रदायाची संघटना केली आणि काही आचार, विचार, नियमने ही प्रत्येक घटकाला अवश्य म्हणून लावून देऊन त्याच्या भिन्नपणाची जाणीव दृढ करण्याचा प्रयत्न केला. अखिल हिंदुसमाज हा त्याच्या धर्मतत्त्वामुळेच इतरांहून पृथक झालेला आहे. पण त्याने आपल्या अंतरातच इतके भेद निर्माण करून ठेविले की त्याला समाज हे रूप राहिलेच नाही. इतरांहून भिन्न होताच आपल्या संप्रदायाच्या अंतरात आपण सर्व अभिन्न आहो ही जाणीव भिन्नतेच्या जाणीवेपेक्षा दसपटीने जास्त परिपोषावी लागते. हिंदुसमाजाने हे कधीच केले नाही. उलट आपल्या अभ्यंतरातही भिन्नतेचाच तो परिपोष करीत राहिला. त्यामुळे त्याचे सामर्थ्य क्षीण होऊ लागले. आणि पंजाबात शीखांच्या उदयाच्या वेळी तर तो

अगदी मृतप्राय होऊन पडला होता. या वेळी शीखांनी स्वतंत्र संप्रदाय स्थापून त्यात काही तरी सामर्थ्य निर्माण करण्यात यश मिळविले.

क्षात्रधर्माची दीक्षा :

शीख संप्रदायाची अनेक वैशिष्ट्ये वर सांगितली. पण त्या सर्वांहून क्षात्र-धर्माची दीक्षा प्रत्येक शीखाला देणे, हे त्याचे खरे वैशिष्ट्य होय. त्याच्या ठायी मोगली सत्तेचा, तिने चालविलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचे जे काही सामर्थ्य निर्माण झाले ते त्यामुळेच झाले. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे चार वर्णांपैकी क्षत्रिय वर्णानेच फक्त शस्त्र धारण करावयाचे असते. इतर वर्णांना केवळ आप-त्काळापुरते सशस्त्र होण्यास शास्त्राची अपवादात्मक परवानगी आहे. याचा परि-णाम हळूहळू असा होत गेला की, बहुसंख्य जो शेतकरीवर्ग आणि शूद्र वर्ण तो स्वराज्य, युद्ध, परकीय आक्रमण यांविषयी उदासीन झाला. आणि युद्धाचा भार एकट्या क्षत्रियवर्णावर पडू लागला. मुस्लीमांमध्ये वर्णव्यवस्था नसल्याने त्या समाजात सर्वच जनता राज्याच्या भवितव्याशी निगडित झालेली असे. आणि स्वराज्य हे त्यांच्या धर्माचेच एक अविभाज्य अंग असल्यामुळे प्रत्येक मुसल-मान आपोआपच शस्त्रधारी होई. हिंदुधर्माने निवृत्तीची व अहिंसेची जोपासना करून बहुजन समाजाला स्वराज्य, स्वातंत्र्य यांपासून अलग करून टाकले आणि बहुसंख्य कर्त्या पुरुषांनाही यांविषयी उदासीन केले. त्यामुळेच आत्मरक्षणाचे सामर्थ्य त्या समाजातून नष्ट झाले. हे सर्व ध्यानी घेऊन शीखगुरूंनी शस्त्र हे शीखाच्या धर्मनिष्ठेचेच एक लक्षण आहे, असे ठरवून टाकले. आणि अशा रीतीने तो सर्व समाजच क्षात्रधर्मी बनविला.

आत्मबलिदान :

तो तसा बनविला नसता तर शीख समाज जगलाच नसता. मुस्लीमांचेही धर्मांतर करून, आणि इस्लामपेक्षा आपली धर्मतत्त्वे श्रेष्ठ आहेत असे जाहीर करून, शीखांनी मोगल साम्राज्यसत्तेला आव्हानच दिले होते. त्यामुळे पहिल्या-पासूनच त्या सत्तेची शीखांवर वक्रदृष्टी होती. १६०५ साली जहांगीर तख्तावर येताच त्याने शीखांच्या बंडाचे निर्मूलन करावयाचे ठरविले. आणि त्याचा मुलगा खुश्रू बापाविरुद्ध बंड करून उठला असताना, त्याला गुरू अर्जुन यांनी

साह्य केल्याचे निमित्तही त्याला मिळाले. त्याने गुरू अर्जुन यांना कैद करून हालहाल करून ठार मारिले. शीख समाजाने धर्मासाठी केलेले हे पहिले बलिदान होय! तेथून ही परंपरा सुरू झाली आणि जवळ जवळ एक शतकभर शीखांनी ती चालविली. या प्रकारच्या आत्मबलिदानातूनच त्या समाजाच्या ठायी मोठी प्रतिकारशक्ती निर्माण झाली.

दिल्लीशी संघर्ष :

मोगली सत्तेने गुरू अर्जुन यांचा बळी घेतल्याने शीख समाज अत्यंत संतप्त झाला, आणि त्यामुळेच त्यात मोठे परिवर्तन घडून आले. शीखांच्या हे ध्यानात आले की, नुसत्या हरिनामगजराने किंवा ग्रंथसाहेबाच्या पठनाने धर्मरक्षण होणार नाही. आध्यात्मिक उन्नतीसाठीसुद्धा भौतिक लष्करी सामर्थ्य व धन ही आवश्यक आहेत. गुरू अर्जुन यांनी मृत्यूपूर्वी आपला मुलगा हरगोविंद याला हाच संदेश दिला. त्यामुळे गुरुपदी येताच हरगोविंद यांनी आपल्या समाजाला क्षात्रधर्माची दीक्षा देण्याचा निर्धार केला. इतके दिवस शीख समाज केवळ भक्तिमार्गी होता; तो आता शक्तिमार्गी झाला. वारकरी होता तो धारकरी झाला. हरगोविंद यांनी स्वतःचे घोडदळ तयार केले, तोफखाना उभा केला आणि सरळ सरळ लष्करच सज्ज केले. जहांगीरच्या हे कानी जाताच त्याने गुरूंना पकडून कैदेत ठेविले. पण एक दोन वर्षांनी काही लोकांच्या मध्यस्थीने त्यांची सुटका झाली. त्यानंतर शहाजहान गादीवर येईपर्यंत शीखांचा मोगलसत्तेशी संघर्ष झाला नाही. पण तो सत्तारूढ होताच, गुरूंचा बंदोबस्त केला नाही तर इस्लाम भारतातून नष्ट होईल, असे मुल्लामौलवी त्याला सांगू लागले. त्यामुळे संघर्षाला पुन्हा प्रारंभ झाला. निरनिराळी कारणे काढून शहाजहान शीखपंथ नष्ट करण्यासाठी आपले सरदार धाडू लागला. प्रथम मुखलीसखान सात हजार फौज घेऊन आला. त्याने अमृतसरवर हल्ला केला, शहर लुटले व हरगोविंद यांचा वाडा लुटला. पण त्या लढाईत खान स्वतःच मारला गेला. यानंतर तीन वर्षांनी कायरबेग व आणखी तीन वर्षांनी पैंदाखान व कालेखान असे सरदार स्वारी करून आले, पण हे सर्व सरदार मारले गेले. (ठाकुर देशराज-सिख इतिहास, आठवा अध्याय.) पण असे विजय मिळाले तरी, युद्धप्रसंग सारखे येत गेले तर, आपला टिकाव लागणार नाही, हे जाणून गुरू हरगोविंद यांनी अमृतसरहून आपले ठाणे हलविले

व लांब पहाडात कीरतपूर येथे ते जाऊन राहिले. आणि तयारी करण्यास शीखांना वेळ मिळावा म्हणून काही काळ सबुरीचे, नरमाईचे, धोरण स्वीकारून दहा बारा वर्षे धर्मप्रसाराच्या कार्यात त्यांनी शांतपणे घालविली. त्यांच्यामागून आलेले गुरू हरिराय (१६४५–६१) व गुरू हरकिशन (१६६१–६४) यांच्या कारकीर्दीत विशेष काहीच घडले नाही. त्यानंतर १६६४ साली गुरू तेगबहाद्दुर हे गुरुपदी आले.

तेगबहाद्दुर :

गुरू तेगबहाद्दुर गादीवर आले त्या वेळी शीख समाजात फार वेदिली माजली होती. गुरू अर्जुन यांच्या बलिदानामुळे तेवढ्यापुरती धर्माभिमानाची लाट समाजात उसळली, पण त्या अभिमानातून दृढ व दीर्घकालीन ऐक्यभावना निर्माण झाली नाही. गुरू अर्जुन यांचा भाऊ पृथिया मोगलांना जाऊन मिळाला होता. गुरूंना तो जन्मभर छळीत राहिला. गुरू हरगोविंद यांच्याविरुद्ध दिल्लीच्या सुलतानांना चिथावण्यात शीख भाईबंदांचा बराच हात होता. अमृतसरच्या मंदिराचे अधिकारी बडवे, पंडे यांच्याच वळणावर गेले. गुरू तेगबहाद्दुर तेथे गेले तेव्हा मंदिराचे दरवाजे त्यांनी बंद करून घेतले व गुरूंनाच आत येण्याची बंदी केली. आणि आश्चर्य असे की गुरूंनी ती मानली व क्षात्रधर्माची दीक्षा देऊन गुरू हरगोविंद यांनी संघटित केलेल्या शीख समाजानेही काही प्रतिकार केला नाही. या पुजाऱ्यांना मसंद म्हणत. मसंद ही एक संस्थाच होती. गुरू अर्जुन यांनी प्रत्येक शीखाने गुरुपीठाला काही दक्षिणा दिलीच पाहिजे, असा दण्डक घालून देऊन त्याच्या वसुलीसाठी ही मसंदसंस्था निर्मिली होती. प्रारंभी काही दिवस ही व्यवस्था ठीक जमली. पण पुढे पुढे हे मसंद इतके भ्रष्ट झाले, दक्षिणेसाठी लोकांना इतके छळू लागले की, गुरू गोविंदसिंग यांना ती संस्था बंद करावी लागली.

गुरू तेगबहाद्दुर हे अमृतसरहून निघाले ते कीरतपूरला आपल्या वडिलांच्या गावी जाऊन राहिले. तेथेही त्यांचे भाऊ, धीरमल, पुतण्या रामराय व अमृतसरचे मसंद यांनी त्यांना रहाणे अशक्य करून टाकले. रामराय याने तर औरंगजेबाकडून गुरूंना पकडण्याचे हुकूम मिळविले. पण या वेळी हे प्रकरण फार चिघळले नाही. थोड्याच दिवसांत गुरूंची मुक्तता होऊन ते यात्रेला

निघाले व प्रयाग, पाटणा, डाक्का या भागांत हिंडून त्यांनी धर्मप्रचार केला. कदाचित याच कार्यात त्यांनी शांतपणे आपले आयुष्य घालविले असते. पण प्रचार करताना मुसल्मानांनाही ते शीख धर्माची दीक्षा देत. अर्थातच औरंगजेबासारख्या कडव्या धर्मांध बादशहाला हे सहन होणे शक्यच नव्हते. या वेळी हिंदूंना सक्तीने बाटविण्याची त्याने मोहीमच काढली होती. काश्मीरमध्ये त्याचा सुभेदार शेख अफगाण याने यापायी अनन्वित अत्याचार चालविले होते. तेव्हा तेथील काही ब्राह्मण तेगबहाद्दुर यांचेकडे आले व काश्मीरची सर्व कहाणी त्यांनी त्यांना सांगितली. त्या वेळी गुरूंच्या वृत्तीत एकदम पालट झाला व त्यांनी धर्मासाठी आत्मबलिदान करावयाचे ठरविले. त्यांनी त्या ब्राह्मणांना सांगितले की औरंगजेबाला सांगा की, 'गुरू तेगबहाद्दुरांना तू आधी मुसल्मान कर. त्यात तुला यश आले तर मग आम्ही सर्व मुसल्मान होऊ.' हा निरोप पोचताच औरंगजेब पराकाष्ठेचा खवळून गेला व त्याने गुरूंना पकडून नेऊन हाल हाल करून ठार मारले.

गुरू तेगबहाद्दुर यांच्या आत्मबलिदानाची कथा ही शीख इतिहासात अमर झाली आहे. आजही शीखांना ती स्फूर्तिप्रद वाटते. गुरूंच्या बरोबर मतिराम, दयालदास इ. पाच शीखांना बादशहाने पकडून नेले होते. एक दिवस तुरुंगात मतिराम गुरूंना म्हणाले की, 'आपला धर्म रक्षावयाचा तर ही मोगल सल्तनत नष्ट केली पाहिजे.' हे औरंगजेबाच्या कानी जाताच त्याने मतिरामला पकडून दरबारात नेले व त्याला जाब विचारला. मतिराम याने अत्यंत धैर्याने तेथेही जबाब दिला की, 'अरे, ज्यांच्या हृदयात निष्ठा आहे व जे सत्याचे उपासक आहेत ते एकच काय, अनेक मोगल बादशाह्या नष्ट करून टाकतील.' अर्थात् औरंगजेबाने मतिरामला तेथल्या तेथे कापून टाकण्याची आज्ञा दिली. शरीराचे तुकडे होत असतानाही मतिराम अकाल पुरुषाचा जयजयकार करीत होता. याच वेळी दयाळदासानेही असेच वीरमरण पत्करले. त्याने औरंगजेबाला सांगितले की, 'तू मतिरामाच्या शिरावर तलवार चालवीत नसून मोगल सल्तनतीच्या शिरावर चालवीत आहेस.' औरंगजेबाने त्यालाही तेलाच्या कढईत घालून ठार मारले. यानंतर गुरू तेगबहाद्दूर यांचाही शिरच्छेद करण्यात आला. मरतेसमयी त्यांनी आपल्या मानेवर एक चिठ्ठी गुंडाळून बांधून ठेवली होती. तिच्यावर लिहिले होते की, 'सिर दिया, सर न दिया!' शीर दिले पण धर्म दिला नाही. ह

इतिहास देऊन ठाकुर देशराज म्हणतात, 'गुरू तेगबहाद्दुर यांच्या या बलिदानाची महती वर्णन करण्याची शक्ती माझ्या ठायी नाही. मी इतकेच सांगतो की, मृतप्राय झालेल्या हिंदुजातीमध्ये यामुळे एक फार मोठे सामर्थ्य निर्माण झाले व त्याने अनेक विजय मिळविले.' (सिख इतिहास–पृ. २२६,२२७, १७३)

या सामर्थ्याचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजेच गुरू गोविंदसिंग होत. पिताजी गेले (इ. स. १६७५) तेव्हा हा मुलगा नऊ वर्षांचा होता. पण तेव्हापासूनच त्याच्या बुद्धीला एक विशेष समज, विशेष प्रौढता आली होती. त्या वेळेपासूनच त्याने पिताजी गुरू तेगबहाद्दुर यांच्या वधाचा बदला घेण्याचे ठरविले होते. पण हा बदला खुनास खून करून त्याला घ्यायचा नव्हता, तर मुस्लीम सल्तनतीच्या सामर्थ्याला दुसरे सामर्थ्य भिडवून घ्यावयाचा होता. हे कार्य एक-दोन दिवसांचे नव्हते. त्यासाठी लोकजागृती अवश्य होती. म्हणून प्रारंभीची वीस वर्षे गुरु गोविंदसिंग यांनी मनन, चिंतन व संघटन यांत घालविली. वर सांगितलेच आहे की, शीख समाज या वेळी अगदी अल्पसंख्य असला तरी त्याच्यात दुही, फूट, स्वजनद्रोह, भ्रष्टाचार हे फार माजले होते. गुरुनानक यांनी केलेल्या धर्मक्रान्तीची बीजे पुरतेपणी रुजली नव्हती. म्हणून पुन्हा एकदा त्या धर्मतत्त्वांना उजाळा देणे अवश्य होते. हे जाणून गुरू गोविंदसिंग यांनी ते कार्य प्रथम हाती घेतले.

हा धर्मच नव्हे :

धर्मतत्त्वांना उजाळा देणे याचा अर्थ काय ते मागील अनेक लेखांत स्पष्ट केलेच आहे. हिंदुधर्माला आलेल्या विकृतीपासून त्याला मुक्त करणे आणि समता, प्रवृत्तिवाद, राष्ट्रभक्ती, बुद्धिनिष्ठा या तत्त्वांचा उपदेश करून ती समाजात दृढमूल करणे याचेच नाव धर्मतत्त्वांना उजाळा देणे असे आहे. शीख समाजात प्रारंभापासूनच जातिभेद, वर्णभेद, जन्मनिष्ठ उच्चनीचता यांस विरोध होता, सर्व जातीचे लोक त्या पंथात समाविष्ट होत आणि मग त्यांच्यात खाण्यापिण्याचा विधिनिषेध मुळीच पाळला जात नसे, हे मागे सांगितलेच आहे. पंजाबातील पहाडी भागात अनेक क्षुद्र रजपूत राजे व त्यांची क्षुद्र संस्थाने मोगल बादशहांच्या कृपाछत्राखाली सुखाने नांदत होती. त्यांना स्वातंत्र्याशी, स्वराज्याशी काहीच कर्तव्य नव्हते. पण सर्व जातींत समता निर्माण होणे, सर्वांनी एकत्र खानपान करणे,

शेंडी, जानवे, यांचे आकार कमी होणे यांबद्दल मात्र ते अत्यंत चिंताग्रस्त होते. शीख गुरूंनी हा अधर्म चालविला आहे, भ्रष्टाकार माजविला आहे, असे त्यांना वाटत होते. म्हणून राजा अमेरचंद याच्या नेतृत्वाखाली त्यांचे एक शिष्टमंडळ गुरु गोविंदसिंग यांच्याकडे आले व त्यांना म्हणाले, 'महाराज, आपण खालसानामक पंथ काढून हे काय चालविले आहे? यात शिखासूत्राचा विचार नाही, जातिपातीचाही नाही, खानदानीलाही तुम्ही किंमत देत नाही. सर्वांची रसोई एकत्र होते आणि वाटेल त्याच्या हातचे लोक खातात. हे काय आहे?' हिंदुधर्माचा आत्मा स्वराज्य-स्वातंत्र्यात आहे, स्त्रियांच्या व मंदिरांच्या रक्षणात आहे, सर्व हिंदूंचे संघटन करण्यात आहे, असे त्या रजपूत राजांना मुळीच वाटत नव्हते. शिखासूत्र, उच्चनीचता, भक्ष्याभक्ष्य यांतच तो कोठे तरी आहे अशी त्यांची श्रद्धा होती. मोगलांना मुली देण्यामुळे धर्महानी होते, असा विचारसुद्धा त्यांना शिवत नव्हता. पण इतर हिंदूंबरोबर खाण्यापिण्याने ती होते याविषयी त्यांना शंका नव्हती. गुरू गोविंदसिंग त्यांना म्हणाले, "अरे, तुम्ही ज्याला धर्म म्हणता तो धर्मच नाही. ज्या धर्मात एक माणूस दुसऱ्याला हीन लेखतो तो सर्व समाजाचा धर्म होऊ शकत नाही. माझा प्रयत्न असा आहे की कोणालाही उच्चनीच मानू नये, असे धर्मसंस्कार लोकांवर करावे. राजा, आपल्या देशाची काय अवस्था झाली आहे हे तुला दिसत नाही का? आपल्या धर्म-बांधवांवर कोणते संकट आले आहे आणि तुम्ही स्वतः आपले पूर्ववैभव कसे गमावून बसला आहा, याची तुम्हांला काही कल्पना नाही? तुम्ही रजपूत आपल्या मुली मोगलांना देऊन त्यांच्या सेवेला हजर राहता. तुमचे धन व तुमच्या कन्या यांवर आपला अधिकारच आहे, असे हे तुर्क समजतात. आणि ते तुम्ही मान्य करता! तरी तुमच्या अंगी काही क्षात्रत्व आहे असेच मानाव-याचे काय? तुर्कांनी चालविलेल्या घोर अन्यायाचा प्रतिकार करण्याचा उद्योग आम्ही चालविला आहे. पण त्यामुळे तुमच्या धर्मभावना दुखावतात! हा तुमचा जो धर्म त्याला काय म्हणावयाचे!"

अर्थात रजपूत संस्थानिकांवर याचा काडीमात्र परिणाम झाला नाही. त्यांनी सर्व राजांची एक सभा घेतली व गुरू गोविंद यांना लिहून धाडले की, 'मोगल बादशहा आज शेकडो वर्षे या देशात राज्य करीत आहेत. त्यांचे राज्य नष्ट करण्यात आपल्याला यश येईल हे संभवत नाही व बलशाली मोगल

पातशाहीला विरोध करण्यापासून काही लाभ आहे, असेही आम्हांला वाटत नाही.' (सिख इतिहास–देशराज ठाकुर, पृ. १८४.)

खालसा :

एकंदर हिंदुसमाजाची ही मृतावस्था, ही पौरुषहीनता, ही अवकळा ध्यानी घेऊनच गुरू गोविंद यांनी शीख संप्रदायालाच 'खालसा' असे नाव ठेवून, त्यांना काही नवी आचारबंधने लावून त्या पंथात नवे चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एका सभेत 'धर्मासाठी आत्मबलिदान करण्यास कोण तयार आहेत?' असा सवाल त्यांनी विचारला. आणि जे पाच लोक तयार झाले त्यांना गुरूंनी 'पंचप्यारे' म्हणून संबोधिले. आणि त्यांच्या साह्याने पंथाचे संघटन पुन्हा दृढ करून, त्याला क्षात्रधर्माची दिलेली दीक्षा पुन्हा एकदा उजळण्याचा संकल्प त्यांनी केला. खालसा म्हणजे शुद्ध, पवित्र; खालसा म्हणजे समता, बंधुता; खालसा म्हणजे स्वतंत्र, स्वत्वनिष्ठ! या खालसा अनुयायांना केस, कडे, कृपाण इ. पाच चिन्हे गुरूंनी आवश्यक म्हणून सांगितल्याचे वर निर्देशिलेच आहे. या सर्वांमुळे शीख समाजात नवी शक्ती, नवे चैतन्य निर्माण करण्यात गुरू गोविंदसिंग यांना इतके यश आले की, आज गुरू गोविंदसिंग व शीख संप्रदाय यांत अभेद मानला जातो.

गुरू गोविंदसिंग :

धर्मजागृतीचे हे कार्य चालू असतानाच गुरूंनी लष्करी सामर्थ्य वाढविण्याकडे लक्ष पुरविले होते. किल्ल्यांचे महत्त्व ओळखून त्यांनी त्यांचे निवासस्थान जे आनंदपूर त्याच्या भोवतालच्या टापूत लोहगड, फत्तेगड, फूलगड, आनंदगड असे किल्ले बांधले व एक मोठी सेना उभी करण्यासही त्यांनी प्रारंभ केला. त्यांना प्रथम विरोध झाला तो पहाडी राजपूत राजांकडून. आनंदपूर हे एका राजाचे हद्दीत होते. त्याने ती जागा खाली करण्याची गुरुजींना आज्ञा दिली. आणि ती मानली जात नाही असे पाहून वीस-बावीस संस्थानिकांना जमवून त्याने गुरूंवर चाल केली. हे रजपूत राजे औरंगजेबाविरुद्ध असे कधी एकत्र होऊन उठले नव्हते. तो त्यांचा शत्रू नव्हता! कारण तो फक्त मंदिरे पाडीत असे, हिंदू लोकांना सक्तीने बाटवीत असे व त्यांच्या कत्तली करीत असे. पण

जातिभेदाला त्याने हात लावला नव्हता, की भक्ष्याभक्ष्यांच्या नियमांचे उल्लंघन करण्याची सक्ती केली नव्हती. गुरू गोविंदसिंगांनी तो भ्रष्टाकार करून धर्मनाश चालविला होता. म्हणून रजपूत राजे एक झाले होते. पण भंगाणी येथे मोठी लढाई होऊन राजपूत राजांचा पराभव झाला. गुरूंचा असा अनेक वेळा प्रभाव दिसून आल्यावर बरेचसे पहाडी राजे त्यांना वश झाले व ते औरंगजेबाला वार्षिक खंडणी देईनासे झाले. यावेळी औरंगजेब दक्षिणेत असून मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्याच्या उद्योगात गुंतला होता. त्याला ही खबर मिळताच, अत्यंत चिडून जाऊन, त्याने आपल्या लाहोरच्या सुभेदाराला खरमरीत पत्रे लिहिली व गुरू गोविंदसिंग यांना जिवंत पकडून आपल्यासमोर हजर करण्याचा हुकूम दिला. त्या अन्वये अलीफखा, दिलावरखा, रुस्तुमखा अशा अनेक सरदारांनी आनंदपूरवर स्वारी केली. पण त्या सर्वांचा शीखांनी पराभव केला. त्यानंतर बादशहाने शहाजादा मुअज्जम याला मोठी सेना देऊन गुरुबर पाठविले. पण त्याचीही काही मात्रा चालली नाही. तेव्हा औरंगजेबाने पंजाबच्या सर्व सुभेदारांना कडक पत्रे लिहून सर्वांनी मिळून शीखांना जमीनदोस्त करण्याचा हुकूम दिला. या वेळी पहाडी राजपूतही उलट खाऊन मोगल सैन्याला मिळाले. राजपूत व मोगल मिळून एक लाख फौज जमा झाली होती. एवढ्या सेनेने आनंदपूरला वेढा घातला असताना अल्पसंख्य शीखांचा टिकाव लागणे शक्यच नव्हते. त्यातही अन्नाचा तुटवडा पडू लागला. तेव्हा एके दिवशी आपल्या सहकाऱ्यांचा सल्ला घेऊन गुरू गोविंदसिंग रात्रीचे गुप्तपणे किल्ल्याबाहेर निसटले. मोगलांना याचा सुगावा लागताच त्यांनीही लगोलग त्यांना पकडण्यासाठी फौज धाडली. या धावपळीत निभाव लागणे कठीण आहे, हे पाहून गोविंदसिंग यांनी आपली माता, दोन स्त्रिया व धाकटे दोन मुलगे जोरावरसिंग व फत्तेसिंग यांना एका खेड्यात गंगाराम नावाच्या विश्वासू माणसाकडे धाडून दिले, आणि आपण स्वतः चमकौरच्या किल्ल्यात अजितसिंह व जुझारसिंह या दोन मुलांसह जाऊन राहिले. तेथेही मोगल सेनेने त्यांना घेरले. त्या वेळी त्यांच्याजवळ अवघे ४० शीख होते. कोणाच्या मते ५०० होते. या वेढ्याच्या प्रसंगी अफाट मोगल सेनेवर स्वतः होऊन चालून जाऊन गुरूंच्या दोन पुत्रांनी अभिमन्यूप्रमाणे बलिदान केले. पण चमकौरच्या किल्ल्यातही निभाव लागेना तेव्हा गुरुजी तेथून निसटून गेले व त्यांनी अरण्यवास पत्करला. तेथेही मोगल सेना त्यांचा पिच्छा

पुरवीत होतीच. पण ते तिच्या हाती सापडले नाहीत. पण याच काळात त्यांच्यावर एक भयंकर आपत्ती कोसळली. गंगाराम हा त्यांचा पूर्वीचा शिष्य व स्वयंपाकी. त्याच्याकडे त्यांनी आपल्या मातेला व धाकट्या दोन मुलांना विश्वासाने ठेविले होते. पण त्याने दगा दिला व सरहिंदचा सुभेदार वजीरखान यास गोविंदसिंगांचा हा परिवार आपल्याकडे असल्याची बातमी दिली. खानाने लगेच त्यांना पकडून नेले आणि 'मुसलमान व्हा नाही तर तुम्हांला देहदंड सोसावा लागेल' अशी धमकी दिली. मुलांनी उत्तर दिले की, 'आम्ही गुरू गोविंद यांचे पुत्र आहो. आम्ही मरणाला भीत नाही. पण ध्यानात ठेवा की, आमच्या रक्ताच्या थेंबातून अनेक जोरावरसिंग व फत्तेसिंग उत्पन्न होतील व तुझ्यासारख्या जुलमी मोगलांचा प्राण घेतील.' अर्थातच दोन्ही मुलांना भिंतीत चिणून ठार मारण्यात आले. यानंतर लौकरच औरंगजेब मृत्यू पावला. त्याच्या मागून गादीवर हक्क सांगणाऱ्या बहादुरशहाला गुरू गोविंद यांच्या मदतीची जरूर होती. मुअज्जमशी झालेल्या लढाईत गुरूंनी त्याला खूप मदत केली व त्यामुळेच बहादुरशहाला विजय मिळाला व तो गुरूंचा मित्र बनला. त्याने गुरुजींना लाख मोहरा नजर केल्या व आपल्याबरोबर दक्षिणेत येण्याचा आग्रह केला. गोविंदसिंगांनी तो मान्य करून ते दक्षिणेत नांदेड येथे जाऊन राहिले. तेथून मराठ्यांच्या मदतीने पुन्हा पंजाबात जाऊन तेथे स्वराज्यस्थापना करण्याचा त्यांचा विचार होता, असे म्हणतात. पण एके दिवशी रात्री गुरुजी झोपले असताना दोन पठाणांनी त्यांचा खून केला. त्यांच्या मुलांना भिंतीत चिणून मारणाऱ्या वजीरखानानेच या पठाणांना पाठविले होते. इ. स. १७०८ साली ही दुःखद घटना घडली आणि शीखसमाजाच्या सर्व आशा धुळीस मिळण्याची वेळ आली व खालसा स्वराज्यस्थापना करतील–'राज्य करेगा खालसा' या गुरूंच्या भविष्यवाणीचे काय होणार, असा प्रश्न निर्माण झाला.

मूल्यमापन :

गुरू गोविंदसिंग या शीख महापुरुषाच्या अखेरीपर्यंत शीखसंप्रदायाच्या कार्याचे स्वरूप येथवर आपण पाहिले. आता त्याच्या त्या कार्याचे थोडे मूल्यमापन करू. या दृष्टीने विचार करता एक गोष्ट स्पष्ट दिसते की पंजाबातील अखिल हिंदुसमाजात उठाव करण्यात शीखांना यश आले नाही. त्यांनी धर्मक्रांतीची

तत्त्वे उपदेशिली. पण ती शीखसमाजापुरतीच राहिली. शिवसमर्थांनी अखिल महाराष्ट्र जागृत केला होता. तसा शीखांना पंजाब जागृत करता आला नाही. याचे एक कारण असे दिसते की, शीखसंप्रदाय हिंदुसमाजापासून फुटून निघाला होता. पंथाला किंवा संप्रदायाला स्वतंत्र अस्मिता आणण्यासाठी पंथाचे म्हणून काही विशिष्ट आचार, विशिष्ट गणवेश आणि काही भिन्नतादर्शक चिन्हे ही अवश्य असतात. पण त्यामुळे, हे लोक आपले नव्हेत, असे सर्व समाजाला कधीही वाटता कामा नये. रामदासी संप्रदायाने आपल्यासाठी स्वतंत्र आचारपरंपरा व गणवेश निश्चित केला होता. पण रामदासी हा हिंदुसमाजापासून वेगळा आहे, असे कधी कोणाच्या स्वप्नातही आले नाही. शीखसमाजाविषयी हळूहळू तशी भावना हिंदुसमाजात निर्माण होऊ लागली. हिंदूंची दैवते, हिंदूंचे अवतार, हिंदूंची तीर्थक्षेत्रे, हिंदूंचे धर्मग्रंथ यांचा शीखगुरूंनी बुद्धिपुरःसर अव्हेर केला. त्यांच्या पूजनास बंदी केली आणि पूर्वपरंपरेचा धागाच अशा रीतीने त्यांनी तोडून टाकला. गुरू गोविंदसिंगांपर्यंत हिंदुसमाजाच्या उद्धाराची भाषा शीखांच्या तोंडी असे. आणि शेवटपर्यंत हिंदुसमाजाचे मित्र व मुस्लीमांचे हाडवैरी अशीच शीखांची भूमिका कायम होती. पण पूर्वपरंपरेचा जाणूनबुजून त्यांनी विच्छेद केल्यामुळे, हिंदुसमाजाचे नेते, अशी भूमिका शीखांना यशस्वीपणे प्राप्त करून घेताच आली नाही. त्यामुळे मुस्लीमांविरुद्ध चालविलेल्या लढ्यात त्यांना अखिल पंजाबची शक्ती आपल्यामागे उभी करता आली नाही, आणि स्वतः शीख अल्पसंख्य पडल्यामुळे त्यांचे बळ तोकडे पडले.

दुही-यादवी :

अल्पसंख्य असूनही शीखसंप्रदायाचे ऐक्य अत्यंत दृढ व अभंग असते तरीही त्याला यापेक्षा किती तरी पटीने जास्त यश आले असते. पण तसे ऐक्यही शीखसमाज निर्माण करू शकला नाही. येथून पुढचा ८०-९० वर्षांचा म्हणजे महाराजा रणजितसिंग यांच्या उदयापर्यंत शीखांचा इतिहास हा जितका शौर्य, त्याग, आत्मबलिदान या गुणांचा आहे तितकाच तो दुही, फूट, यादवी या दुर्गुणांचाही आहे. नाही तर अखिल पंजाबची शक्ती मागे नसतानाही शीखांना गुरू अर्जुनसिंग ते गुरू गोविंदसिंग या काळात पंजाबात स्वराज्याची स्थापना निश्चित करता आली असती. पण ते त्यांना जमले नाही. मराठे आणि शीख

यांच्यांत या बाबतीत केवढे जमीनअस्मानचे अंतर दिसते पहा. औरंगजेब मोगल बादशाहीच्या सर्व सामर्थ्यानिशी दक्षिणेत उतरला होता. त्या वेळी शिवछत्रपती दिवंगत झाले होते. आणि काही काळाने संभाजीमहाराजही मृत्युमुखी पडले. पण त्यानंतरच्या १८ वर्षांच्या काळात, मोठा नेता नसतानाही, मराठ्यांनी मोगल-शाहीशी लढा देऊन तिलाच खिळखिळी करून टाकली व आपल्या स्वराज्याचे रक्षण केले. उलट पंजाबापासून या वेळी मोगली सामर्थ्य फार दूर गेले होते. मागे उरले होते ते दुय्यम तिय्यम दर्जाचे सरदार. पण औरंगजेबाने हजारो मैलांवरून केवळ पत्रे लिहून त्यांना कार्यप्रवण केले व शेवटी त्यांनीच शीखस्वराज्य-स्थापनेचा संभव नष्ट करून टाकला. शीखसमाजाला हिंदुसमाजात तर नाहीच, पण आपल्या संप्रदायातही विपुल संख्येने कर्ते पुरुष निर्माण करता आले नाहीत. शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचा काळ अवघा तीसपस्तीस वर्षांचा होता. पण तेवढ्या अवधीत तान्हाजी, नेताजी, प्रतापराव, हंबीरराव, मोरोपंत, मुरारबाजी, बाजीप्रभू, बाळाजी आवजी, अण्णाजी दत्तो, रघुनाथपंत हणमंते, मायनक भंडारी, कान्होजी आंगरे असे किती तरी स्वतंत्र कर्तृत्वाचे पुरुष त्यांनी निर्माण केले. त्यांच्यानंतरही स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, परशुराम त्रिंबक, धनाजी, संताजी, खंडो बल्लाळ ही पिढी महाराष्ट्रात निर्माण झाली. त्यानंतर मध्यंतरी ही परंपरा खंडित होते की काय असा क्षण आला होता. पण त्या वेळी पेशव्यांचा उदय झाला. आणि बाजीराव, नानासाहेब यांनी तर अखिल भारताच्या मुक्ततेला पुरे पडेल असे कर्तृत्व शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले, पवार, पटवर्धन, फडणीस, फडके यांच्या रूपाने निर्माण केले. शीखसमाजाला असे विपुल कर्ते पुरुष निर्माण करता आले नाहीत. गुरू गोविंदसिंग हे शीखांतले सर्वांत श्रेष्ठ पुरुष. पण प्रारंभापासून अखेरपर्यंत ते एकटेच होते. त्यांच्या नावाचा जयजयकार करीत आनंदपूरहून दशदिशांना शीख सेनापती व सरदार मोहिमांवर जाऊन फत्ते करून येत आहेत असे महाराष्ट्राप्रमाणे पंजाबात कधी घडलेच नाही. त्यामुळे शीखांचा इतिहास वाचताना, स्वतंत्र राज्यस्थापनेचा संभव कोठे निर्माण झालेला या काळात दिसतच नाही. कारण पंजाबी कर्तृत्वाला धुमारे फुटत आहेत असे त्यात कधी आढळून येत नाही.

बंदाबैरागी :

अपवादामुळे मूळ सिद्धान्त निश्चित सिद्ध होतो, असे म्हणतात. त्यात तथ्य

असेल तर बंदाबैरागी याच्या अपवादाने वरील विचाराची सत्यता डोळ्यांत जास्त भरते, असे दिसून येईल. बंदाबैरागी हा मूळचा पंजाबी गृहस्थ. तरुणपणीच काही कारणाने विरक्त होऊन त्याने संसारत्याग केला आणि तो दक्षिणेत येऊन राहिला. तेथे गुरू गोविंदसिंग यांच्या सहवासात आल्यावर त्यांच्यापासून त्याला स्फूर्ती मिळाली. गुरूंनी त्याला शीखपंथाची दीक्षा देऊन पंजाबात धाडले. त्याच्याबरोबर आपले पंचवीस शिष्यही त्यांनी दिले व पंजाबातील प्रमुख शीखांना पत्रे देऊन त्यांना बंदाबैरागी याचे नेतृत्व स्वीकारण्याची आज्ञा केली. बंदा पंजाबात पोचला व त्याने गुरू तेगबहादुर व गुरू गोविंदसिंग यांचे पुत्र यांवर मुस्लीमांनी भयानक अत्याचार करून त्यांचा वध केला याचा सूड घेण्याची आपली आकांक्षा जाहीर केली. गुरू गोविंदसिंगांची आज्ञा, त्यांच्या शिष्यांनी केलेला प्रचार व बंदाचे प्रभावी नेतृत्व यांमुळे बंदाबैरागी याच्याभोवती शीख फार झपाट्याने गोळा झाले व थोड्याच अवधीत शीखांची चाळीस हजार सेना जमा झाली. तिच्या साह्याने पुढील सात-आठ वर्षांत बंदाबैरागी याने असे अद्भुत पराक्रम केले की, पंजाबच्या इतिहासात ते अजरामर होऊन राहिले आहेत. बंदाबहादुराचा सगळा रोख सरहिंदकडे होता. तेथील सुभेदार वजीरखान यानेच गोविंदसिंगांच्या पुत्रांना भिंतीत चिणून मारले होते. प्रथम त्याने समाना या सरहिंदजवळच्या ठाण्यावर हल्ला करून ते गाव उजाड करून टाकले. त्याचे पराक्रम ऐकून शधोरा, बनोर या गावचे हिंदू त्याच्याकडे धावत आले. तेथे त्यांच्या तरुण मुलींवर भरदिवसा मुसलमान नबाब, काजी बलात्कार करीत व एकंदर हिंदूंचा अनन्वित छळ करीत. बंदाने दोन्ही गावे उजाड करून तेथील मुसलमानांची कत्तल केली. नंतर १७१०,३० मे रोजी बंदाने सरहिंदवर हल्ला केला व ते शहर धुळीस मिळवून वजीरखानास कापून काढले. यानंतर शीखांना प्रचंड विजय मिळत गेले व थोड्याच दिवसात तीनचतुर्थांश पंजाब बंदाच्या ताब्यात आला. या वेळी दिल्लीचा मोगल बादशहा दक्षिणेत होता. तो त्वरेने दिल्लीस परत आला व बंदाचा व शीखांचा निःपात करण्याचा त्याने दृढनिश्चय करून एक मोठी फौज बंदावर पाठविली. आता भोळ्या बादशाही सेनेशी शीखांची गाठ पडली आणि युद्धातले चढउतार सुरू झाले. शीखांना अजूनही मोठे विजय मिळत होते, पण त्यांचे सामर्थ्य कमी पडत आहे हे आता स्वच्छ दिसू लागले. बहादुरशहा मरण पावल्यावर १७१२ साली फरुखसियर गादीवर आला. त्याने

वढ्या जोमाने शीखनिःपाताची मोहीम चालू केली. शेवटी गुरुदासपूर किल्ल्यात अन्नपाण्यावाचून हाल होऊन शीख सेना मरू लागली; तेव्हा बंदाने बाहेर पडून अफाट मोगलसेनेवर चालून घेतले. अर्थातच तो पकडला गेला. त्याचे पाचशे सैनिकही त्याच्याबरोबर पकडले गेले. सर्वांना दिल्लीला नेऊन अतिशय विटंबना व हाल करून ठार मारण्यात आले. कत्तलीपूर्वी प्रत्येकाला, मुसलमान झाल्यास जीवदान मिळेल, असे सांगण्यात आले. पण एकानेही धर्मत्याग केला नाही. सर्वांनी स्वधर्मे निधनच श्रेयस्कर मानले. आणि अशा रीतीने जिवंतपणी जसा त्यांनी अद्‌भुत इतिहास केला तसेच मृत्यूतही एक अत्यंत तेजस्वी पर्व रचून ठेविले.

परंपरा नाही :

वीर बंदाबैरागी याच्या चरित्राचा विचार करू लागताच वर सांगितलेला विचार पुनः पुन्हा मनात येतो. त्याच्यासारखे पाच–सहा शूर सेनापती व सरदार गुरू गोविंदसिंगांना मिळाले असते तर पंजाबात त्याच वेळी स्वराज्यस्थापना झाली असती. आणि मग औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्य आठ–पंधरा वर्षांत समूळ नष्ट झाले असते. पण गुरुगोविंदांना असा एकही सेनापती मिळाला नाही. एकटा बंदाबैरागी गुरूंच्या मदतीला असता तरीसुद्धा पुष्कळ कार्यभाग झाला असता. पण गुरूंच्या निधनानंतर त्याची कारकीर्द सुरू झाली. आणि तोही पुन्हा एकाकीच होता. त्याच्या काळीही शीखसमाजात मोठे कर्ते पुरुष निर्माण झाले नाहीत. दुसरी गोष्ट शीखांच्या दुहीची. सर्व शीख त्याला मिळाले नाहीत. खालसापंथ मनापासून त्याच्या मागे उभा राहिला नाही. बंदाचे अनुयायी स्वतःला बंदिया म्हणवीत. स्वतः बंदा याने 'वाहा गुरुजी की फत्ते', 'वाहा गुरू का खालसा' या गुरू गोविंदांनी ठरवून दिलेल्या घोषणा बदलून 'फत्ते धर्म', 'फत्तेदर्शन' अशा घोषणा चालू केल्या. त्यामुळे शीखांत आणखी फूट पडली. त्याच्यापासून फुटलेले शीख नुसते दूर राहिले असे नव्हे तर ते बादशहा फरुखसियर याच्या सैन्यात सामील झाले. बादशहाने अमृतसरला देणग्या देऊन, सक्तीने धर्मांतर केले जाणार नाही, खालसांकडच्या जहागिरी कायम ठेविल्या जातील, अशी आश्वासने देऊन, अनेक शीखांना फोडले आणि वीर बंदाचे सामर्थ्य खच्ची केले. (गोकुळचंद नारंग, ट्रॅन्सफॉरमेशन ऑफ सिखीझम्).

मागे एके ठिकाणी सांगितलेच आहे की मूळ समाजापासून निराळे होऊन जे भिन्न अस्मिता स्थापू पहातात त्यांनी आपल्या नव्या संप्रदायाच्या अंतरात वज्रासारखे अभंग ऐक्य टिकविले पाहिजे. शीखांना हे कधीच जमले नाही. अगदी प्रारंभीच्या लेखात संघटनेचे एक प्रधान लक्षण सांगितले आहे. जे लोक आपसात लढत नाहीत; किंवा निदान आपल्याच लोकांविरुद्ध शत्रूला मिळून स्वकीयांशी लढत नाहीत त्यांना संघटित म्हणता येईल. शीखसमाज यांपैकी कोणत्याच अर्थाने केव्हाही संघटित झाला नाही. निराळा पंथ काढून शीखांनी हिंदूंपासून दुरावा मात्र निर्माण केला. त्यामुळे अखिल हिंदुसमाजात त्यांना क्रान्ती करता आली नाही, उठाव करता आला नाही. आणि भिन्न अस्मितेचा जो लाभ मिळावयाचा तोही दुहीमुळे त्यांना मिळाला नाही. यामुळे गुरू गोविंद-सिंग किंवा बंदा यांसारख्या थोर पुरुषांना यश आले नाही. हिंदुसमाजाबद्दल शीखांची दृष्टी शेवटपर्यंत आपलेपणाची होती. पानपतनंतर अबदालीने गुलाम करून चालविलेल्या २०,००० स्त्रियांना मुक्त करून त्यांनी महाराष्ट्रात परत पाठविले. हे सर्व खरे, पण शीख हिंदुसमाजाशी एकरूप झाले नाहीत. त्यामुळे त्यांचे बळ तोकडे पडले.

शिरकाण :

बंदाबहादर याचा वध १७१६ साली झाला. यानंतरच्या ५० वर्षांचा शीखांचा इतिहास अनेक दृष्टींनी अभ्यसनीय आहे. कोणी इतिहासकार त्याची मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामाशी तुलना करतात, कोणी त्यापेक्षाही त्याचे महत्त्व जास्त मानतात. बंदानंतर शीखसमाजाला समर्थ असा नेता लाभला नाही. आणि बंदाच्या नेतृत्वाखाली शीखांनी मुस्लीमांवर इतका भयानक सूड उगविला होता की, सर्व मुस्लीमसामर्थ्य एकवटून शीखांचा नायनाट करण्याचा मुस्लीम सत्ता-धाऱ्यांनी निर्धार केला. बादशहा फरुखसियर याने तर असे फर्मानच काढले की, मोगल अधिकाऱ्यांना जेथे जेथे शीख सापडेल तेथे त्यांनी त्याला मुसल्मान तरी करावे किंवा त्याची कत्तल करावी. पंजाबच्या मुस्लीम सुभेदारांनी तर जो कोणी शीखाचे मुंडके आणून देईल त्याला ५० रु. बक्षीस मिळेल असे जाहीर केले. यामुळे शीखांचे पद्धतशीर शिरकाण सुरू झाले आणि ते जवळ जवळ ४०–५० वर्षे चालू राहिले.

या काळात दिल्लीचे बादशहा अत्यंत नादान व दुबळे असून त्यांचे वजीर त्यांच्यापेक्षाही कर्तृत्वशून्य होते. पण या काळातले पंजाबचे सुभेदार झकेरिया-खान, मीर मन्नू, आदिनावेग व सादिक यांसारखे सरदार हे कर्तबगार होते. त्यांनी शीखांचा संहार करण्यात आपले शक्तिसर्वस्व वेचले. शिवाय याच काळात अहमदशहा अबदालीने पंजाब-दिल्लीवर आठ स्वाऱ्या केल्या. नजीब-खान रोहिल्याखारखे सरदार त्याला वारंवार आमंत्रणे देत आणि त्याला सर्वतोपरी साह्य करीत. मोगलांनी १५२६ साली अफगाणी पठाणांची सत्ता नष्ट करून तेथे आपले राज्य स्थापिले. पण पठाणांनी पंजाब हा आपला आहे ही भावना कधीच विस्मृतीत जाऊ दिली नाही. अबदालीने इतक्या स्वाऱ्या केल्या त्याच्या मागे पंजाबचे गेलेले राज्य परत मिळवणे, हीच आकांक्षा होती. पहिल्या स्वारीतच त्याने लाहोर जिंकून तेथे आपला सुभेदार नेमला. आणि त्या सत्तेवर शीख सतत आघात करीत राहिल्यामुळेच अहंमदशहा वारंवार हिंदुस्थानवर चालून येत होता. तेव्हा दिल्लीची पातशाही जरी क्षीण व निर्बल झाली असली तरी मुस्लीमवर्चस्वाचा जोर कमी झाला नव्हता. त्यामुळे शीखांना या स्वातंत्र्यसंग्रामात फार मोठे अग्निदिव्य करावे लागले.

फरुकसियर १७१९ साली मेला. त्यानंतर दिल्लीला बंडाळ्या माजल्यामुळे पंजाबच्या शासनात जरा ढिलाई आली. त्याबरोबर शीखांनी उचल करून शीखांना छळणाऱ्या अधिकाऱ्यांवर हल्ले केले आणि लाहोरच्या सुभेदाराने पाठविलेल्या फौजांचा मोड केला. याच सुमाराला झकेरियाखान हा लाहोरचा सुभेदार झाला व त्याने पुन्हा हत्याकांड सुरू केले. तो व त्याचे अधिकारी शेकडो शीखांना पकडून आणीत आणि लाहोरच्या दिल्लीवेशीजवळ त्यांची कत्तल करीत. त्यामुळे त्या जागेला शहीदगंज असेच नाव पडले होते. अशी घोर कत्तल सुरू होताच शीख घरादारांचा त्याग करून वनवासात गेले आणि डोंगर-दऱ्यांत राहून तेथून सरकारी रसद व खजीना यांवर हल्ले चढवून त्यांची लुटा-लूट करू लागले. पुढच्या चाळीस वर्षांचा शीखांचा इतिहास असा आहे. दिल्लीच्या पातशाहीचे सुभेदार मोठमोठ्या फौजा घेऊन शीखांच्या शिकारीस बाहेर पडत आणि हजारो शीखांना ठार करीत. अशा वेळी शीख घरेदारे सोडून अरण्यात जात आणि मोगलांच्या मोहिमा ढिलावल्या की पुन्हा परत येत, आपल्या लहानमोठ्या टोळ्या पुन्हा उभ्या करीत आणि सर्वत्र लांडगेतोड करीत.

पुन्हा कोणी कर्तबगार सरदाराने मोहीम काढली की कडेकपारीत नाहीसे होत.

वनवास :

चाळीसपन्नास वर्षे शीखांनी हा जो लढा चालविला त्याला भारताच्या इतिहासात खरोखर तोड नाही. धर्मासाठी एवढे घोर बलिदान फार थोड्या जमातींनी केले असेल. झकेरियाखान, मीर मन्नू, सादिक यांनी केलेल्या हत्याकांडाची वर्णने वाचताना सारखे मनात येत असते की दुसरी कोणतीही जमात पहिल्या मोहिमेतच गारद झाली असती व शरणागती पत्करून तिने कायमचे दास्य स्वीकारले असते. पण गुरू गोविंदसिंगांनी दिलेली क्षात्रधर्माची शिकवण, बंदाबहादराच्या पराक्रमामुळे निर्माण झालेला आत्मविश्वास आणि गुरू नानकांच्या धर्मावरील अचल श्रद्धा यामुळे शीखांत काही अद्भुत बळ संचरले होते. त्यामुळे केवढाही भयंकर संहार झाला, कसल्याही यमयातना सोसाव्या लागल्या, रानावनात, गिरिकंदरात कितीही कष्टाचे जीवन कंठावे लागले तरी शीख दबले नाहीत. जरा संधी सापडताच ते पुन्हा उसळून येत व मुस्लीमसत्तेवर सर्व सामर्थ्य एकवटून आघात करीत.

स्वातंत्र्य :

चाळीसपन्नास वर्षे असा लढा चालवून १७६८-६९ च्या सुमारास शीखांनी पंजाब स्वतंत्र केला. अबदालीने पुन्हा हिंदुस्थानवर स्वारी केली नाही. आणि दिल्लीच्या सुभेदारांचाही दम उखडला होता. त्यामुळे शीखांनी आक्रमकांशी चालविलेला लढा समाप्त होऊन शीखांचे नष्टचर्य संपले. यामुळे शीखांच्या सत्तेविषयी पंजाबी जनतेच्या मनात मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या. शीखसत्ता पंजाबात प्रस्थापित होऊन आपलेही नष्टचर्य संपेल व सुखशांतीचे दिवस आपल्याला लाभतील अशी आशा तिला वाटू लागली. पण या अपेक्षेचा संपूर्ण भंग झाला. कारण सर्व पंजाब हाती आला असूनही शीखांना तेथे एकमुखी केंद्रसत्ता प्रस्थापित करता आली नाही. स्वातंत्र्यलढा चालू असतानाही शीखांना एकमुखी नेतृत्व निर्माण करता आले नव्हते. त्यांच्या निरनिराळ्या पासष्ट टोळ्या सर्व पंजाबभर संचार करीत आणि स्वतंत्रपणेच लूटमार करीत. त्याकाळीही शीखजमातीत शिस्त अशी काही नव्हती. स्वातंत्रलढ्याचा काळ म्हणजे मोठा गौरवाचा

काळ गणला जातो. पंजाब विद्यापीठाचे इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. हरिराम गुप्ता यांनी तीन खंडांत 'हिस्टरी ऑफ दि सिख्स्' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यातील पांहला खंड १७३९–१७६८ या काळाविषयीचाच आहे. त्यांनी त्यात शीखांच्या पराक्रमाचा खूपच गौरव केला आहे. कलकत्ता विद्यापीठाचे डॉ. नरेंद्र कृष्ण सिन्हा यांनी आपल्या 'राइज ऑफ दि सिख पॉवर' या पुस्तकातही शीखांचा मुक्तकंठाने गौरव केला आहे. आणि वर सांगितल्याप्रमाणे शीखांचा तो गौरव सार्थच आहे. पण याहीपलीकडे जाऊन समाजसंघटनेच्या दृष्टीने विचार करता, असे दिसते की, याही काळात शीख आपले बल संघटित करू शकले नव्हते. कपूरसिंग, जसासिंग असे जरा समर्थ नेते त्यांना मिळत तेव्हा काही टोळ्या एकमेकीत विलीन होत. आणि असे होता होता स्वातंत्र्यसंग्रामाच्या अखेरीस शीखांच्या बारा टोळ्या राहिल्या. त्यांना मिसली म्हणत. हे सर्व शीखच होते. पण ते एकमुखी संघटना संग्रामकाळीही निर्माण करू शकले नाहीत.

संघटना नाही :

याचा अर्थ असा की 'खालसा धर्म' हे शीखांचेही संघटनतत्त्व होऊ शकले नाही. याचे एक स्पष्ट प्रमाण असे की सतलजच्या दक्षिणेचे शीख हे स्वातंत्र्य-संग्रामातही सहभागी झाले नाहीत. सतलजच्या उत्तरेच्या शीखांना मंझा शीख व दक्षिणेच्या शीखांना मालवा शीख म्हणतात. मंझा शीख अबदालीशी लढत असताना पतियाळाचा अलासिंग त्याला शरण गेला व पुढे तर तो अबदालीचा सहकारीच झाला. पुढील काळी अबदालीचा नातू झमानशहा स्वारी करून आला तेव्हा पतियाळाच्या साहेबसिंगाने जबरदस्तापुढे नमण्याचे कुलव्रत तसेच चालू ठेविले. (रणजितसिंगाचे चरित्र – लेखक कुशावतसिंग, पृ. २८,३१) नरेंद्र कृष्ण सिंह म्हणतात, 'मालवा शीख अंतर्वेदीत नित्य लूटमार करीत, वरचेवर मोहिमा काढून जाळपोळ, विध्वंस करीत, पण ही केवळ दरोडेखोरी होती. त्याच्यामागे राष्ट्रीय भावना मुळीच नव्हती. अबदालीशी लढणारे मंझा शीख काही उच्च भावनेने प्रेरित झाले होते. तसे मालवांचे काही नव्हते. अंतर्वेदीत प्रभुत्व नजीबखान रोहिल्याचे होते. त्या प्रदेशात वर्षानुवर्ष लूटमार करून त्यांनी नजीबला नामोहरम करून टाकले. पण हे मालवा शीख कधी ऐक्य करू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना स्वकीय शासन असे कधीच निर्माण करता

मराठा ग्रंथ संग्रहालय, नागपूर. संख्या
दिनांक ...10.4.2012... वि: विवेक
क्रमांक ...2012... क्रमांक 2013/07

आले नाही. शेवटपर्यंत ते लुटारू पेंढारीच राहिले. पुढील काळात महादजी शिंदे यांनी इंग्रजांविरुद्ध मराठा-शीखांची एक आघाडी करण्याचा प्रयत्न केला. दोघांत तहनामाही झाला. पण शीखांनी तो पाळला नाही. त्यांनी उलट इंग्रजांशीच सहकार्य केले. 'हा परका मनुष्य (महादजी) आमच्या देशात घुसला आहे. तो सर्वनाश करील. अशा वेळी आमच्याशी स्नेह जोडावा अशी आपली इच्छा असेल तर आम्ही आपलेच आहो' असे इंग्रजांना त्यांनी कळविले. महादजींनी त्यांना लिहिले होते की 'इंग्रज हा तुमचा, आमचा, सर्वांचा शत्रू आहे. म्हणून वेळीच उपाययोजना करणे आपल्या हिताचे आहे.' पण याचा काही उपयोग झाला नाही. (राइज् ऑफ दि सिख पॉवर; प्रकरण ६ वे-पृष्ठे १३७,१४५,१४७,१८२)

संधी घालविली :

मंझा व मालवा शीख दोघेही खालसाचेच अनुयायी होते. पण मुस्लीम सत्तेच्या लढ्यात ते संघटित होऊ शकले नाहीत. मंझा शीख ४०-४५ वर्षे लढत राहिले. पण तेही आपले सामर्थ्य संघटित करू शकले नाहीत. तसे त्यांनी केले असते तर दिल्लीला शीखसत्ता तेव्हाच प्रस्थापित झाली असती आणि अबदालीच्या स्वाऱ्यांचा संभवच नष्ट झाला असता. सर जोगेन्द्रसिंग म्हणतात, "या शीख टोळ्यांना एकमुखी नेतृत्व निर्माण करून संघटना करता आली नाही. ते कोणत्याही नाईकाशी एकनिष्ठ रहात नसत. त्यामुळे सर्व पंजाबचे ऐक्य करून स्वराज्य व सुराज्य स्थापन करण्याचे आपले ऐतिहासिक कार्य ते करू शकले नाहीत. सर्व शीखांची अभंग निष्ठा स्वतःच्या ठायी खेचील असा नेता त्यांना मिळाला असता तर भारताच्या इतिहासाला वेगळे वळण लागले असते. पण गुरू गोविंदांनी निर्माण केलेले ऐक्यबंध तोडून खालसासमाज भग्न झाला. त्याच्या अनेक फळ्या झाल्या, शकले झाली. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य मिळवून देऊन ते अबाधित राखण्याच्या व त्याचे दारिद्र्य नष्ट करून त्याला वैभवसंपन्न करण्याच्या कार्यात शीख यश मिळवू शकले नाहीत. भारताला संघटित करण्याची संधी खालसाला आली होती. पण ती त्याने घालविली." (हिस्टरी ऑफ दि सीख्स्. खंड २ रा-प्रा. हरिराम गुप्ता. प्रस्तावना - जोगेन्द्रसिंग) 'आजचा विसाव्या शतकातील शीख असाच विघटित आहे,' असे सांगून जोगेन्द्रसिंग

म्हणतात, 'जमात–संस्कृतीतून वारशाने आलेले विघटित वृत्तीचे, दुहीचे जे रक्तातले संस्कार त्यांवर शीखधर्म जय मिळवू शकला नाही व आजही मिळवू शकत नाही.' (कित्ता)

१७२० ते १७६९ या काळात मंझा शीख विघटित होते. तरी त्यांच्या ठायी धर्मनिष्ठा, त्यागबुद्धी, प्राणार्पणाची सिद्धता हे गुण जिवंत होते. पण पुढच्या १७६९ ते १७९९ या कालखंडात त्यांचा फारच अधःपात झाला. शत्रू निःशेष होताच त्यांच्यातील ध्येयवाद संपुष्टात आला आणि धनलोभ व सत्तालोभ हे प्रबळ झाले. पंजाबात शीखांच्या बारा स्वतंत्र सत्ता–मिसली–स्थापन झाल्या. यातील प्रत्येक मिसल दुसरीवर धाड घालून शीखांचे रक्त सांडू लागली.

अधःपात :

प्रा. हरिराम गुप्ता यांनी आपल्या 'हिस्टरी ऑफ शीख्स्' या ग्रंथाच्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडात शीखसमाजाच्या यादवीच्या वृत्तीवर, दुही, फुटीरपणा, विद्वेष, धर्मलोप, ध्येयशून्यता यांवर फार कडक टीका केली आहे. पहिल्या खंडात त्यांनीच शीखांच्या पराक्रमाचा गौरव केला असल्यामुळे या टीकेला महत्त्व आहे. ते म्हणतात, "या काळात शीखसमाजाची सर्व शक्ती यादवीत खर्च होत होती. शीखांच्या मिसलींची स्थापना लोकशाहीतत्त्वावर झाली होती. अशा स्थितीत एक प्रबळ लोकसत्ताक राष्ट्र पंजाबात स्थापन करण्यासाठी पाया सिद्ध झाला होता आणि ते त्यांनी स्थापन केले असते तर अमेरिकेतील संयुक्त संस्थाने हे जसे पश्चिमेस तसेच हे लोकसत्ताक पूर्वेस भूषणभूत झाले असते. पण वॉशिंग्टन एकच होता. आणि तो व त्याचे सहकारी हे कायदा, स्वातंत्र्य व स्वजनप्रेम या निष्ठांनी प्रेरित झाले होते. उलट शीख स्वार्थ, अहंकार व राज्यविस्तार यांनी प्रेरित झाले होते. त्यामुळे पंजाबात वॉशिंग्टनसारखा नेता किंवा त्याच्यासारखी राष्ट्रीय वृत्ती निर्माण झाली नाही. (चॅथॅमसारखा पुरुष भारतात त्याकाळी निर्माण होणे शक्यच नव्हते हे शेजवलकरांचे मत मागील लेखात सांगितले आहे. येथे वाचकांनी त्याचे स्मरण करावे.) जनहितात स्वहित विलीन करण्याऐवजी प्रत्येक माणूस स्वहित हे ध्येय मानू लागला व अशा रीतीने शीखांनी गुरूंच्या समतेच्या कल्पनेचा विपर्यास केला. गुरूंच्या सर्वच धर्मतत्त्वांना शीखांनी विकृत रूप दिले. त्यामुळे स्पर्धा, मत्सर,

कलह, संघर्ष हेच शीख मिसलींचे लक्षण झाले आणि अराजक, विघटना व अधःपात यांत त्याची परिणती झाली." (खंड ३ रा–पृ. ३३)

अशा धर्मभ्रष्टतेमुळे व विघटनेमुळे शीखसमाज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बलशाली होण्याऐवजी उत्तरोत्तर क्षीणबलच होत गेला. अबदालीचा नातू झमानशहा याच्या स्वाऱ्यांनी शीखांचे हे दौर्बल्य अगदी उघडे केले. १७९७, व १७९९ या साली त्याने स्वाऱ्या केल्या त्यावेळी शीखांना आपली सत्ता दृढ करण्यास पुरी तीस वर्षे मिळाली होती. पण त्यांच्यात तर यादवीचे थैमान चालू होते. विघटना पराकोटीला गेली होती. त्यामुळे दोन्ही स्वाऱ्यांत झमानशहाने थेट लाहोरपर्यंत येऊन पंजाबची ती राजधानी दोन्ही वेळा लुटून नेली व जाळून विध्वंसून टाकली. अबदालीच्या वेळेप्रमाणेच शीख याही वेळीं वनवासी झाले व गिरिकंदरात गेले! तीस वर्षांत त्यांच्यांत कसलीही प्रगती झाली नव्हती. त्यावेळी मंझाशीखांपैकी अबदालीच्या बाजूला कोणी गेले नव्हते. यावेळी अनेकांनी तोही धर्मद्रोह केला. प्रगती झाली ती अशी!

हिंदूंप्रमाणेच :

या झमानशहाच्या वेळच्या भारतातील हिंदूंच्या व मुसलमानांच्या वृत्ती लक्षिण्याजोग्या आहेत. झमानशहा येणार हे कानी येताच अखिल भारतातले मुस्लीम त्याच्या स्वागतार्थ सिद्ध झाले. कसूरचा निजामुद्दिन, रोहिले, अफगाण, अयोध्येचा वजीर, म्हैसूरचा टिपू, आणि दिल्लीचे काही सरदार यांनी स्वारी करून येण्याची त्याला निकड लावली. भारतातला प्रत्येक मुस्लीम तयमूरच्या वंशजाला पुन्हा दिल्लीच्या तख्तावर बसविण्याची भाषा बोलू लागला. तो आपल्या धर्माचा संरक्षक आहे अशी त्यांची भावना होती. (हिस्टरी ऑफ दि सीख्स्, हरिराम गुप्ता, खंड ३ रा. पृ. ६४-६५) यावेळी 'शरबत खालसा' ही अखिल शीखांची सभा भरली होती. 'रानावनात निघून जावे,' असा ठराव सभेत संमत झाला. अनेक रजपूतराजे व मालवा शीख तर झमानशहाला जाऊन मिळालेच होते! हिंदुधर्म हा हिंदूंचे संघटनतत्त्व कधीच होऊ शकला नाही. दुर्दैवाने शीखधर्माची तीच स्थिती झाली. यावेळी झमानशहाला प्रतिकार केला तो एकाच शक्तीने. ती शक्ती म्हणजे रणजितसिंग!

शीखसमाज स्वार्थ, सत्तालोभ, धर्मभ्रष्टता, अराष्ट्रीय वृत्ती यांनी असा शतधा

भग्न झालेला असल्यामुळे त्याला भवितव्य असे काहीच नव्हते. आणि याच वेळी महाराजा रणजितसिंगाचा उदय झाला नसता तर शीखांचे मागले कर्तृत्व हे तरी इतिहासविषय झाले असते की नाही, याची शंकाच आहे. एक धार्मिक संप्रदाय म्हणून फारतर इतिहासाने त्याची नोंद केली असती. पण भारताच्या, हिंदूंच्या आणि शीखांच्या सुदैवाने महाराजा रणजितसिंगासारखा एक थोर, कर्ता, संघटनाकुशल असा नेता पंजाबला लाभला आणि त्यामुळे त्या प्रदेशाचे भवितव्य उजळून निघाले.

शीखांचे एकछत्र :

महाराजा रणजितसिंग यांचा जन्म इ. स. १७८० साली गुजराणवाला येथे झाला. बारा मिसलींपैकी शुकरचाकिया या मिसलीचा संस्थापक चरणसिंग याचा रणजितसिंग हा नातू. त्याच्या वडिलांचे नाव महानसिंग. ते १७९२ साली वारले. पुढील पाच वर्षे शुकरचाकिया मिसलीचा कारभार त्याची आई राजकौर हिने पाहिला. १७९७ साली महाराजांनी आईला व दिवाण लखपतराय यांना बाजूस सारून सर्व कारभार आपल्या ताब्यात घेतला. प्रारंभापासूनच सर्व शीखांचे एकछत्री राज्य निर्माण करण्याची ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. झमानशहाला निश्चयाने प्रतिकार केला असेल तर तो त्यांनीच. पण त्या वेळी बारांपैकी एका मिसलीचा एक तरुण प्रमुख सरदार येवढीच त्यांची प्रतिष्ठा होती. १७९९ साली झमानशहा परत गेल्यानंतर महाराजांनी आपल्या अंगीकृत कार्याला प्रारंभ केला आणि पुढील दहा वर्षांत साम-दाम-दंड-भेद या उपायांनी बहुतेक सर्व मिसली विलीन करून त्यांनी पंजाबवर आपले अधिराज्य प्रस्थापित केले. हे कार्य सुखासुखी झाले नाही. काही मिसालदारांनी कसूर, मुलतान येथील मुस्लीम खानांची मदत घेऊनसुद्धा महाराजांशी लढा केला. पण महाराजांनी आपल्या शौर्याने, राजनीतीने, संघटनाकौशल्याने सर्वांना जेर केले व सतलजच्या उत्तरेच्या व दक्षिणेच्याही मिसली जिंकून शीखांचे एकछत्र निर्माण केले. आणि स्वधर्म व स्वराज्य यांच्या अभेदाचे महातत्त्व शीखांच्या ठायी रुजले असते तर शीखांचे हे स्वराज्य दुर्भेद्य होऊन कदाचित त्याचे साम्राज्यातही रूपांतर झाले असते. पण सतलजच्या दक्षिणेचे पतियाळा, नाभा, झिंद येथले शीख सरदार धर्मनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा यांपासून सर्वस्वी अलिप्त होते. त्यांनी रणजितसिंगा-

पासून संरक्षण मिळावे म्हणून इंग्रजांकडे धाव घेतली. इंग्रजही आपल्याला खाऊन टाकतील अशी भीती त्यांना होती. पण रणजितसिंग म्हणजे अर्धांगवायू व इंग्रज म्हणजे क्षय, असा त्यांचा दृष्टिकोन होता. अर्धांगवायू हा तत्काळ मनुष्याला लुळा करतो. क्षय हा कालांतराने ठार मारतो. असा पोक्त विचार करून या मालवा शीखांनी क्षयरोग पत्करण्याचे ठरवून इंग्रजांचा आश्रय घेतला. त्यांनी तत्काळ आपला वकील मेटकाफ याला महाराजांकडे धाडले व मागून सैन्य धाडले. ब्रिटिशांचे सामर्थ्य महाराज जाणून होते. त्यामुळे सर्व आयुष्याचे स्वप्न धुळीस मिळणार हे दिसत असून, मालवा शीखांचा पराकाष्ठेचा संताप आला असून त्यांनी मन विकाराधीन होऊ दिले नाही व १८०९ साली सतलज ही आपली दक्षिण सरहद्द, हे मान्य करून तसा इंग्रजांना तहनामा करून दिला. अशा रीतीने शीख स्वराज्याचे, एकछत्री शीख राज्याचे साकार होत आलेले त्यांचे स्वप्न कायमचे भग्न झाले. ते कोणामुळे? शीख मिसलदारांमुळे! गुरू नानक, गुरू गोविंदसिंग यांचा धर्म हा शीखांना संघटित करू शकला नाही!

प्रश्न असा येतो की यात सनातन हिंदुसमाजापेक्षा निराळे काय झाले?

कर्ते पुरुष :

मालवा शीखांनी धर्मद्रोह करून इंग्रजांशी हातमिळवणी केली व महाराज रणजितसिंग यांचे स्वप्न धुळीस मिळविले तरी महाराज हताश होऊन स्वस्थ बसले नाहीत. वायव्येकडे साम्राज्यविस्ताराला अजून खूप अवसर होता. तिकडे आपले शक्तिसर्वस्व खर्चून मुस्लीम सत्तांपासून तो प्रवेश मुक्त करावयाचा, असे त्यांनी ठरविले. सतलजच्या उत्तरेच्या सहा मिसलींवर त्यांचे प्रभुत्व प्रस्थापित झाले होते तरी कसूर, मुलतान ही सिंधूच्या पूर्वेची ठाणी आणि डेरागाझीखान, डेरा इस्माइलखान ही पश्चिमेची ठाणी अजून मुस्लीम नबाबांच्या ताब्यात होती. वायव्य सरहद्दीचा पेशावर प्रांत आणि काश्मीर यांवर तर त्यांचेच राज्य होते. हा सर्व प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट करण्याचे ठरवून १८०९ नंतर महाराज त्या उद्योगाला लागले. त्यांच्या कर्तृत्वाचा हा विशेष की, दिवाण मोकमचंद, हरिसिंग नलुआ, बाबा फुलासिंह, मिश्री दिवाणचंद, अमरसिंह, रामदयाळ, दिवाण मोतीराम, फकीर अजिजुद्दिन यांसारखे सेनापती, कारभारी व मुत्सद्दी त्यांनी आपल्याभोवती निर्माण केले. आजपर्यंत कोणत्याही शीख

नेत्याला हे साधले नव्हते. महाराजांना हे साधले म्हणूनच त्यांचे स्वराज्य-साम्राज्याचे ध्येय काही अंशी तरी सिद्ध झाले.

ध्येयपूर्ती :

कसूरचा नबाब कुत्बुद्दिन, मुलतानचा मुजफरखान, मुंघेर म्हणजे डेरा इस्माइलखान येथील नबाब हाफीज अहंमद यांना पंजाबवर शीखांचे प्रभुत्व स्थापन झाले हे सहन झाले नाही. त्यांच्या निष्ठा अफगाणिस्थान–काबूल येथील सुलतानावर होत्या. महाराजांना त्यांनी सतत विरोध केला होता. यांपैकी प्रत्येक नबाबापाशी २०–२५ हजार लष्कर रणांगणात उभे करण्याचे सामर्थ्य होते आणि जिहादची घोषणा करून त्यांच्या शौर्याला कडवेपणाची धार आणण्याचे कौशल्यही त्यांच्या ठायी होते. शीखांची धर्मनिष्ठाही अशीच कडवी होती. पण इतके दिवस ते संघटनविद्या पढले नव्हते. रणजितसिंगांनी त्यांना व पंजाबांतील हिंदूंना संघटित करताच त्या समाजात एक अभूतपूर्व सामर्थ्य निर्माण झाले व त्याने विजयामागून विजय मिळवून मुस्लीमांपासून पंजाब तर मुक्त केलाच पण वायव्यप्रांत व काश्मीर हेही मुक्त केले. या कार्याच्या सिद्धीसाठी महाराजांना जे संग्राम करावे लागले त्यांत हजरोचा व नौशेराचा असे दोन संग्राम विशेष उल्लेखनीय आहेत. महाराजांनी अटकेचा किल्ला घेतला हे काबूलचा वजीर फत्तेखान याला सहन न होऊन त्याने प्रचंड सैन्यानिशी किल्ल्याला वेढा घातला. यावेळी किल्ल्याजवळच्या हजरोच्या मैदानात मातबर झुंज होऊन शीखांना जय मिळाला. या विजयाचे महत्त्व फार आहे. वायव्येकडून येणाऱ्या पठाण सैन्याशी समोरासमोर लढाई करून, गेल्या सातशे वर्षांत हिंदूंनी कधी विजय मिळविला नव्हता. दहाव्या शतकाच्या अखेरीस जयपाळ, अनंगपाळ यांचा पराभव झाल्यापासून तीच लांछनास्पद परंपरा शतकानुशतक चालू राहिली होती. हजरोच्या लढाईने कालचक्र उलटून टाकले व तो कलंक धुऊन काढला. १८१९ साली वजीर फत्तेखान याचा भाऊ महंमद जबारखान याचा सोपियाच्या लढाईत पराभव करून शीख सेनेने काश्मीर जिंकले. १८२२ साली नबाब हफीज अहंमदखान याच्या २५००० पठाणांचे निर्दालन करून सेनापती हरिसिंग नलुआ याने डेरा इस्माइलखान परगणा जिंकला. नौशेराची लढाई १८२३ साली झाली. तीत विजय मिळवून महाराजांनी पेशावर जिंकले

आणि भारताच्या वायव्य सरहद्दीपर्यंत आपले प्रभुत्व नेऊन भिडविले. कुशावत-सिंग म्हणतात, 'हा पराभव अगदी निकाली झाला. पंजाबी खड्ग हे टोळी-वाल्यांच्या खड्गापेक्षा श्रेष्ठ आहे याची त्याने पठाणी टोळ्यांना खात्री करून दिली.' [रणजितसिंग–पृ. १५२] मराठ्यांनी आरंभिलेले कार्य या विजयाने पुरे झाले. पेशावरपासून कन्याकुमारीपर्यंत मुस्लीमसत्ता निःशेष झाली.

जुनी कहाणी :

महाराजा रणजितसिंग यांचे हे पराक्रम म्हणजे शीख समाजाच्या कर्तृत्वाचा कळस होय. पंजाबचा व शीखसमाजाचा इतिहास या यशाने धवळून निघाला आहे. एवढे थोर कार्य करून हा असामान्य पुरुष १८३९ साली कालवश झाला आणि दुर्दैव असे की त्याच्याबरोबरच शीखांची संघटनविद्याही कालवश झाली. अत्यंत खेदाची गोष्ट अशी की एवढ्या मोठ्या कर्तृत्वातूनही कर्त्या पुरुषांची नवी पिढी निर्माण झाली नाही. चाळीस वर्षांच्या या यशस्वी कार-कीर्दीतही शीखसमाजावर धर्म, राष्ट्र अशा संघटनतत्त्वांचे टिकाऊ असे संस्कार होऊ शकले नाहीत. आणि महाराजांचा मृत्यू होताच यादवीची पूर्वीची कहाणी सुरू झाली. हा सर्व दुःखद इतिहास आर. सी. मजुमदार यांनी सविस्तर दिला आहे. (ब्रिटिश पॅरामाउंटसी-भाग १ ला) महाराजांचे वारस अगदी नादान व नालायक निघाले. खरकसिंग व शेरसिंग हे त्यांचे दोन पुत्र गादीसाठी भांडू लागले. त्यांतील एक अर्धवट होता व दुसरा चारित्र्यहीन होता. दरबारातही अनेक फळ्या पडल्या असून प्रत्येक पक्षांची कारस्थाने चालू झाली होती. महाराजांनी उभारलेली सेना अति उत्कृष्ट होती. पण त्यांच्यामागे तिलाही चारित्र्य, ध्येय, निष्ठा काही राहिले नाही. जो पक्ष जास्त पगार कबूल करील त्याच्या बाजूने ती कत्तली करू लागली; खून पाडू लागली. सेनाधिकारी परा-काष्ठेचे उद्धट व वेजबाबदार झाले. यामुळे भारताच्या इतिहासातील नित्याचा रोग बळावून एका पक्षाने इंग्रजांना निमंत्रण दिले. ते याची वाटच पहात होते. त्यांच्याजवळ सामर्थ्यही होते. दोनतीन लढायांतच त्यांनी शीखांचा निःपात केला आणि पंजाब खालसा करून टाकला. रणजितसिंगांच्या पराक्रमाची परंपरा दहा वर्षेसुद्धा टिकली नाही.

गुरू नानक यांच्यापासून महाराजा रणजितसिंग यांच्यापर्यंत शीखसमाजाच्या

संघटन-विघटनेचा इतिहास येथपर्यंत आपण पाहिला. आता भारतावर होणाऱ्या परकीय आक्रमणाचा प्रतिकार करणारी, रजपूत, कर्नाटकी, मराठे यांच्यासारखी एक शक्ती या दृष्टीने शीखांच्या यशापयशाचे विवेचन करू.

यशापयश :

मुस्लीम आक्रमणाचा प्रतिकार करणारी पंजाबात एक स्वतंत्र शक्ती शीखांनी निर्माण केली हे त्यांचे पहिले मोठे यश होय. मराठ्यांनी औरंगजेबाच्या प्रचंड सेनासामर्थ्याचा दक्षिणेत निःपात केला आणि नंतरच्या ८०–८५ वर्षांच्या काळात दिल्लीची सलतनत निर्जीव व नामशेष करून टाकली हे खरे. पण पंजाब, पेशावर या प्रदेशांत एकदोन भराऱ्या मारण्यापलीकडे त्यांना काही साधले नाही. अशा स्थितीत शीखांचा उदय तेथे झाला नसता तर सिंध, बलुचिस्तान, अफगाणिस्थान यांच्याप्रमाणेच पंजाब, पेशावर, काश्मीर हे प्रदेश हिंदुत्व, हिंदुसंस्कृती व हिंदुस्थान यांना पारखे होऊन मुस्लीम जगतात विलीन झाले असते. पण गुरू गोविंदसिंग, बंदाबहादर, सहस्रसंख्येने धर्मार्थ आत्मबलिदान करणारे त्यांचे अनुयायी, अहंमदशहा अबदालीसारख्या कसलेल्या कडव्या मुस्लीम सेनापतीशी सतत तीस वर्षे लढा चालू ठेवणारे मंझाशीख आणि महाराजा रणजितसिंग यांच्या पराक्रमामुळे भारतावरचा तो अनर्थ टळला. एका फार मोठ्या भयानक विपत्तीतून हिंदुसमाजाचे शीखांनी रक्षण केले. हे पराक्रमी शूर पुरुष तेथे पहाडासारखे उभे राहिले नसते तर पठाणांनी पंजाब सर्व गिळून कदाचित उत्तरप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश यांवरही आक्रमण केले असते. रोहिले, नबाब, मालवा शीख व रजपूत संस्थानिक त्यांच्या स्वागताला कसे सिद्ध होते हे मागे सांगितलेच आहे. तेव्हा ही सर्व घोर आपत्ती टळली याचे श्रेय शीखांनाच आहे याबद्दल वाद होऊच शकणार नाही.

पण शीखांनी प्रारंभी घडविलेली सामाजिक क्रान्ती, स्वसमाजाला प्राप्त करून दिलेली स्वतंत्र अस्मिता, धर्मासाठी त्यांनी केलेले बलिदान यांचा विचार करता हे त्यांचे यश फार मर्यादित आहे, असे म्हणावे लागते. सर जोगेन्द्रसिंग यांनी म्हटल्याप्रमाणे, अखिल भारताला संघटित करण्याची संधी खालसाला आली होती ती त्याने घालविली. प्रा. हरिराम गुप्ता, डॉ. नरेन्द्रकृष्ण सिन्हा, कुशावत-सिंग, ठाकुर देशराज हे सर्व जे शीखांच्या कार्याचे विवेचन करणारे इतिहासकार

यांच्या सर्वांच्याच शीखसमाजाकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या, असे दिसते. पण त्या सफल झाल्या नाहीत. याच्या कारणांचा शोध आपण घेतला पाहिजे.

विकास नाही :

याचे पहिले कारण असे स्पष्ट दिसते की, गुरू नानक यांनी जी क्रान्तिबीजे हिंदुसमाजात रुजविली त्यांचा विकास पुढे झाला नाही. त्यांनी वेद, पुराणे इ. धर्मग्रंथांचे प्रामाण्य मानले नाही, आपल्या स्वतंत्र बुद्धीने काही धर्मतत्त्वांचा उपदेश केला. पण पुढे बुद्धिप्रामाण्याची ही परंपरा अल्पावधीतच नष्ट झाली. शीखांचा 'ग्रंथसाहेब' हा वेदांच्या ठायीच येऊन बसला आणि धर्मक्रान्तीची मूळ प्रेरणाच नष्ट झाली. संगतपंगत निर्माण करून गुरूंनी समाजातील उच्चनीचता नष्ट केली याची कथा अशीच आहे. एकत्र रसोई शीखांनी केली, कोणाच्याही हातचे ते अजूनही खातात; पण याच्याच पुढची पायरी म्हणजे जे आंतरजातीय विवाह, तिच्याकडे शीखसमाज वळलेला नाही. सर्व शीखसमाजात सरमिसळ तर विवाह होत नाहीतच; पण जाती-पोटजातींच्या पलीकडेही ते फारसे जात नाहीत. समाजात कोणी मुसल्मान नाही, कोणी हिंदू नाही, असे गुरू नानक सांगत. जो धर्म कोणत्याही प्रकारची उच्चनीचता मानतो तो धर्मच नव्हे, असे गुरू गोविंदसिंग म्हणत. पण या उपदेशाची साहजिक परिणती म्हणजे सर्व समाज एक रक्ताचा होऊन जाणे ती शीखांनी केली नाही. वैवाहिक क्षेत्रात उच्चनीचता हिंदूंच्याप्रमाणेच जपून ठेवली. परदेशगमनाचे तेच झाले. गुरू नानक बगदाद, रोमपर्यंत जाऊन आले. चीनमध्येही ते गेले होते. त्यानंतर काही शीख व्यापारी दर्यावरचा व्यापार करीत असा उल्लेख सापडतो. पण इतकेच. समुद्रगमननिषेध या रूढीचा शीखांनी त्याग केला असे दिसत नाही. गुरूंनी ती बंधने नष्ट करताच इंग्लिश, पोर्तुगीज, फ्रेंच, डच यांच्याप्रमाणे जर शीख जगभर फिरू लागले असते तर त्यांच्या देशातल्याप्रमाणे येथेही विद्येचे पुनरुज्जीवन झाले असते आणि सोळाव्या-सतराव्या शतकातच शीखसमाज त्या पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणे भौतिक विद्येने संपन्न झाला असता. पण ती विद्या येथे येण्यास एकुणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध उजाडावा लागला. कारण शीख हे समुद्रगमन-निषेधाच्या रूढीचे शेवटपर्यंत गुलामच राहिले. १८२३ साली महाराजा रणजितसिंग यांना अटक नदी ओलांडून सेना पलीकडे न्यावयाची होती. पण

लष्कराधिकारी हात जोडून विनवू लागले की, 'अटक ओलांडण्यास सांगू नका. कारण ते धर्म्य नाही.' त्यावेळी महाराज संतापले आणि म्हणाले, 'ज्यांच्या मनात बंदी असते त्यांना अटकबंदी योग्य आहे. खालसाला हे बंधन नाही.' गुरू नानक यांनी हेच सांगितले होते !

हेही नाही, तेही नाही :

शीखांच्या निष्फळ पृथगात्मतेचे विवरण मागे केलेच आहे. गुरू नानक यांच्या उपदेशात हिंदुसमाजापासून पृथक् होण्याविषयी एक वाक्यही सापडत नाही. त्यांचा धर्म हा गीतेतील कर्मयोग होता. तो पुढे रामदासांनी सांगितलेला प्रवृत्तिधर्म होता. 'शीखिझम् अॅज प्रीच्ड् बाय नानक' या आपल्या लेखात डॉ. एल्. रमा कृष्ण यांनी गीतेतील व नानकांच्या उपदेशातील अनेक वचने देऊन नानकांचा धर्म हा गीतेतला कर्मयोगच होय, हे स्पष्ट केले आहे. (महाराजा रणजितसिंग सेंटेनरी व्हॉल्यूम–पृ. ९५) पण पुढील गुरूंनी याच क्रांतिबीजांचा विकास करण्याऐवजी शीखसमाजाला हिंदुधर्मग्रंथ, आचारविचार, तीर्थक्षेत्रे ही वर्ज्य ठरवून त्याला नवे आचार लावून दिले. याने त्या समाजाला स्वतंत्र अस्मिता प्राप्त झाली. पण पुढे ती केवळ बाह्याचारापुरतीच राहिली. इतरांपासून विभक्त पण अंतरात अत्यंत संघटित अशा समाजाच्याच स्वतंत्र अस्मितेला किंमत असते. पृथगात्म समाज अत्यंत क्रांतिप्रवण व अत्यंत संघटित असावा लागतो. शीखसमाजात पुढच्या काळात ही दोन्ही लक्षणे दिसेनाशी झाली. आणि गुरू गोविंदसिंगांनी घालून दिलेल्या केस, कच्छ, कडे इ. आचारांना निर्जीव कर्मकांडाचे रूप आले. यामुळे शीखांना अखिल हिंदुसमाजात क्रांतीची बीजे पेरताच आली नाहीत. आगरकरांनी सुधारणेचा उपदेश करण्यास प्रारंभ केला तेव्हा 'तुम्ही वेगळी जात का करीत नाही ?' असे सनातनी त्यांना विचारू लागले. तेव्हा 'मला या समाजातच राहावयाचे आहे, कारण मला या समाजाची सुधारणा करावयाची आहे. वेगळी जात मी करणार नाही.' असे त्यांनी उत्तर दिले. रामदासी, वारकरी यांनी वेगळी जात केली नाही. ते पृथगात्म झाले नाहीत, जुन्या परंपरेचा धागा त्यांनी तोडला नाही. शीखसमाजाने ते केले. आणि पृथगात्मतेची पथ्येही पाळली नाहीत. त्यामुळे दोन्हीकडूनही त्याला अपयश आले.

महाराणा रणजितसिंग यांनी शीखसमाज संघटित केला. त्यामुळे ३०-४० वर्षे त्यांना पठाण आक्रमणापासून वायव्य भारत मुक्त ठेवता आला. त्याचवेळी इंग्रजी सत्ता प्रबळ होत होती. त्या आक्रमणापासून भारताचे रक्षण करण्याचे सामर्थ्य मात्र महाराजांना किंवा त्यांच्या राज्यातील पंडित, मुत्सद्दी यांना निर्माण करता आले नाही. ते सामर्थ्य पाश्चात्य विद्येच्या अभ्यासाने प्राप्त होणाऱ्या ज्या राष्ट्रनिष्ठा, लोकशाही व विज्ञाननिष्ठा या विद्या त्यामुळे अधिगत झाले असते. १८०९ नंतर स्वतंत्र सत्ताधारी शीखसमाजाला हे अशक्य नव्हते. महाराजांच्या दरबारी मंडळींना ही दृष्टी असती तर त्यांनी त्याच वेळी युरोपला विद्यार्थी धाडले असते; जर्मनी, फ्रान्स येथून शास्त्रज्ञ, पंडित यांना बोलावून पंजाबात विद्यापीठे उघडली असती. बंगालमधील राजा राममोहन रॉय यांनी १७९५ सालीच युरोपीय भाषांचा अभ्यास सुरू केला होता आणि १८१४ च्या सुमारास पाश्चात्य विद्याप्रसारासाठी कॉलेजही काढले होते. इंग्रजांनी भारताला जिंकले ते भौतिक विद्या व संघटनविद्या यांच्या बळावर. अमेरिकेशी १८५४ साली संबंध येताच जपानी नेत्यांनी १०-२० वर्षांतच त्या विद्यांची उपासना सुरू केली. महाराजा रणजितसिंग यांनी लष्कराच्या बाबतीत पाश्चात्य विद्येचा अंगीकार केलाच होता. त्यांची सेना यामुळेच अत्यंत कार्यक्षम झाली होती. या दृष्टीने शीखसमाजातील नेते, पंडित, इतर प्रमुख नागरिक यांनी १८१० च्या सुमारास पाश्चात्यांची भौतिकशास्त्रे, त्यांची राष्ट्रनिष्ठा आणि बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, ज्ञानलालसा, ऐहिकता इ. त्यांचे इतर जीवनविषयक तत्त्वज्ञान यांचा प्रसार पंजाबात करण्याचे ठरवून त्यासाठी शाळा, प्रशाळा, महाशाळा, ग्रंथालये, प्रयोगशाळा स्थापन केल्या असत्या तर इंग्रजी आक्रमणापासूनही शीखांना भारताचे रक्षण करता आले असते. पण शीखधर्मातील क्रांतितत्त्वांचा त्यांना विसर पडल्यामुळे त्यांना ती दृष्टी प्राप्त झाली नाही. त्यामुळे चाळीस वर्षे दृढ अशा शासनाचा लाभ होऊनही त्यातून कोणत्याही प्रकारचे नवे कर्तृत्व, नव्या परंपरा निर्माण झाल्या नाहीत आणि रणजितसिंग जाताच शीख पराभूत झाले.

रजपूत, विजयनगर, मराठे व शीख यांना गेल्या हजार वर्षांत परकीय आक्रमकांपासून स्वदेशाचे रक्षण करण्यात कितपत यश आले, ते यश कोणत्या प्रेरणेमुळे आले, त्यांनी आपल्या समाजात कोणती क्रान्तीबीजे पेरली, कोणत्या संघटनतत्त्वांचा अंगीकार केला याचा विचार येथवर आपण केला. त्याचप्रमाणे या

चार राष्ट्रांच्या यशाच्या मर्यादा कोणत्या, त्या मर्यादा त्यांच्या सामर्थ्याला का पडल्या, मुस्लीम आक्रमण त्यांनी नष्ट केले पण पाश्चात्य आक्रमणापुढे ते पराभूत का झाले याची आपण मीमांसा केली. त्या सर्व यशापयशाच्या मीमांसेचा इत्यर्थ असा की, इ.स. १००० च्या सुमारास हिंदुधर्माला जी विकृती जडली होती ती या राष्ट्रांनी काही अंशी नष्ट केली, काही प्रमाणात धर्मक्रान्ती केली म्हणूनच त्यांना त्या प्रमाणात यश आले. पण प्रारंभीच्या नेत्यांनी रूढविलेल्या क्रांतिबीजांचा विकास पुढीलांनी न केल्यामुळे पुढे समाजाचा विकास झाला नाही. त्याची सामर्थ्ये, त्याच्या सुप्तशक्ती आविष्कृत झाल्या नाहीत आणि त्यामुळे ही सर्व राष्ट्रे पाश्चात्य आक्रमणापुढे नामोहरम झाली.

यानंतर पुढील प्रकरणात गेल्या शतकात भारतात झालेल्या क्रान्तीचा विचार करून त्या क्रान्तीमुळे पाश्चात्य सत्तांशीही लढून भारताला पुन्हा स्वतंत्र करण्यात आपल्याला कसे यश आले त्याचे विवेचन प्रथम करावयाचे आहे. आणि नंतर स्वातंत्र्यानंतर उद्भवलेल्या समस्या सोडविण्यासाठी हिंदुसमाज संघटित, बलशाली व समर्थ कसा होईल व त्या दृष्टीने नुकत्याच प्रस्थापित झालेल्या विश्वहिंदुपरिषदेने कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याचे विवेचन करून या लेखमालेचा समारोप करावयाचा आहे.

८

हिंदुसमाजाचें भवितव्य

हिंदुसमाजाच्या संघटनेचा व विघटनेचा वेदकाळापासूनचा इतिहास आपण पाहात आहो. या इतिहासाचे दोन कालखंड आतापर्यंत पाहून झाले. इ. स. १००० पर्यंतचा पहिला कालखंड होय. या कालखंडात बुद्धिनिष्ठा, प्रवृत्तिवाद, प्रयत्नवाद, स्वराज्य व स्वधर्म यांच्या अभेद इ. समाजाला उपकारक अशा धर्मतत्त्वांचा प्रभाव असल्यामुळे हिंदुसमाज संघटित व म्हणूनच बलशाली व वैभवसंपन्न होऊ शकला. या कालाच्या अखेरीस हिंदुधर्माला अत्यंत विकृत रूप आले. शब्दप्रामाण्य, विषमता, निवृत्ती, दैववाद अशी समाजघातक तत्त्वे धर्मशास्त्रज्ञांनी उपदेशिली व समाजाने ती अंगीकारिली. त्यामुळे हा समाज विघटित झाला व म्हणूनच तो स्वसंरक्षणाला असमर्थ होऊन त्याला दैन्य, दारिद्र्य, पारतंत्र्य, या नरकात दीर्घकाल पिचत राहावे लागले. इ. स. १००० ते १८५० हा तो पारतंत्र्याचा दुसरा कालखंड होय. हा काळ पारतंत्र्याचा असला तरी या तमोयुगातही येथल्या काही लोकांनी संघटित होऊन आपल्या पराक्रमाने मधून-मधून स्वातंत्र्यसूर्याचे दर्शन भारताला घडविले. रजपूत, कर्नाटकी, मराठे व शीख हे ते लोक होत. या लोकांच्या धुरीणांनी हिंदुधर्माला आलेली विकृती काही अंशी तरी नष्ट केली, काही प्रमाणात तरी धर्मक्रान्ती केली, म्हणूनच यांना मुस्लीम आक्रमणाचा निःपात करता आला. मराठे या दृष्टीने जवळजवळ

पूर्ण यशस्वी झाले होते, अवनीमंडल निर्यवन करण्यात त्यांना बहुंशी यश आले होते; पण याच काळात पाश्चात्त्यांचे आक्रमण या भूमीवर चालू होते. पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज या युरोपीय सत्ता सोळाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच भारतावर आक्रमण करू लागल्या होत्या. या सत्तांशी मराठ्यांनी वरचेवर मुकाबला केला आणि काही युद्धांत त्यांचा पराभवही केला; पण प्रथमपासूनच असे दिसू लागले की, पाश्चात्त्य सत्तांना तोंड देण्यासाठी जे सामर्थ्य प्राप्त करून घ्यायला हवे होते त्याची उपासना कशी करावयाची, याचे आकलन भारतातल्या कोणत्याही समाजाला होत नाही; त्या सत्तांची बलस्थाने कोणती, त्यांच्या जगद्विजयाचे रहस्य काय हे जाणून घेण्याची ऐपतच येथे कोणाच्या ठायी नाही. शब्दप्रामाण्य, भौतिक ज्ञानाची अवहेलना, कूपमंडूकवृत्ती, समुद्रगमननिषेध यामुळे हिंदूंची बुद्धी अगदी लुळीपांगळी होऊन गेली होती. यामुळे पाश्चात्त्य आक्रमकांचे सामर्थ्य व त्यांच्या आक्रमणाचे स्वरूप यांविषयी त्यांना कधी उमजच पडला नाही. मराठ्यांना पडला नाही आणि शीखांच्या उत्कर्षाच्या काळी भारतातल्या काही प्रांतांत इंग्रजी विद्येचा प्रसार झाला असून त्यांनाही हा उमज पडला नाही. अर्थातच मुस्लीम आक्रमणास निर्दाळून टाकण्यात यशस्वी झालेले हे समाज इंग्रजांच्यापुढे नामोहरम झाले आणि पुन्हा एकदा भारताच्या कपाळी पारतंत्र्य आले. दुसऱ्या कालखंडाची ही कथा आहे.

तिसरा कालखंड :

त्यानंतर १८२० पासून भारतात पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारास प्रारंभ होऊन येथल्या इतिहासाच्या तिसऱ्या कालखंडास प्रारंभ झाला. सुदैव असे की, पाश्चात्त्य विद्येच्या प्रभावाने येथल्या धुरीणांना अगदी अल्पकाळात नवी दृष्टी प्राप्त झाली. आणि राष्ट्रीयता, लोकशाही व विज्ञाननिष्ठा ही पाश्चात्त्यांच्या सामर्थ्याची रहस्ये त्यांना सहजच आकळता आली. हे नवीन ज्ञान प्राप्त होताच, या नवतत्त्वांवर आपल्या समाजाची पुनर्घटना करण्यास येथे सर्वांगीण, आमूलाग्र क्रान्ती घडविणे अवश्य आहे, हे त्यांच्या ध्यानी आले व राजा राममोहन रॉय यांच्यापासून पंडित जवाहरलाल नेहरूंपर्यंत या देशातील सर्व नेते तनमनधन खर्चून त्या उद्योगाला लागले. हा उद्योग एक शतकभर चालू होता. आणि त्याचाच परिपाक होऊन राष्ट्रीयतेच्या महातत्त्वावर भारतीय जनता संघटित होऊ शकली व मागल्या

कालखंडांत अजिंक्य ठरलेल्या पाश्चात्य सत्तेचा निःपात करून स्वातंत्र्य मिळविण्यात ती यशस्वी झाली. भारतात ही जी अपूर्व क्रान्ती झाली तिचे विवेचन या प्रकरणाच्या प्रथमार्धात करून उत्तरार्धात त्या क्रान्तीची पूर्णता, सांगता कशी करता येईल याचा विचार करावयाचा आहे. स्वातंत्र्य प्राप्त झाल्याला आता एकोणीस-वीस वर्षे होत आली; पण आपले भारतीय प्रजासत्ताक बलशाली होण्याऐवजी उत्तरोत्तर क्षीणबल्च होत चालले आहे. चीनचे आक्रमण मोडून काढून त्याने गिळलेली भारताची भूमी मुक्त करण्यात भारताला यश येत नाही. त्याचप्रमाणे काश्मीर, नागा, मिझो या समस्याही सोडविता येत नाहीत. अन्नधान्यसमस्या, चलनाच्या स्थैर्याची समस्या, पंजाबचा प्रश्न, आसामचा प्रश्न, सीमाप्रश्न, गोवाप्रश्न, काँग्रेस मंत्रिमंडळातील प्रत्येक प्रदेशातील दुही, प्रदेशराज्यांत भडकत चाललेला वैराग्नी, संघराज्यातून फुटून निघण्याची द्रवीडकळहम्-सारखी वृत्ती यांमुळे तर दीर्घकालानंतर मिळालेले स्वातंत्र्य टिकविता येईल की नाही, अशी दारुण, दुष्ट शंका विचारी मनाला घेरीत आहे. म्हणजे पुन्हा पहिलाच प्रश्न निर्माण झाला ! भारताच्या स्वातंत्र्याचे रक्षण कसे करायचे ? अपूर्ण राहिलेली धार्मिक व राष्ट्रीय क्रान्ती पूर्ण करून हे बल प्राप्त करून घ्यावयाचे, हे त्याचे उत्तर आहे. त्याचा विचार उत्तरार्धात करावयाचा आहे. प्रथम घडलेल्या क्रान्तीचे स्वरूप पाहू.

ब्रिटिश साम्राज्यसत्तेशी लढा देऊन भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून देणारी जी सर्वांगीण क्रान्ती तिचा विचार येथे करावयाचा आहे, तो अगदी संक्षेपाने करावयाचा आहे. एकतर हा विषय अगदी ताजा असा आहे. शिवाय ती क्रान्ती घडविणाऱ्या थोर पुरुषांची चरित्रे शाळा-महाशाळांतून नित्य शिकविली जातात. या विषयावरचे ग्रंथही बहुतेक भाषांतून झालेले असून त्यांतले बरेचसे सुशिक्षितांच्या वाचनात असतात. म्हणून येथे तपशिलात न शिरता विषयपूर्तीसाठी अवश्य तेवढेच विवेचन करावयाचे आहे.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि येथला स्वातंत्र्याचा लढा संपला. १८९८ साली लो. टिळकांना राजद्रोहाची शिक्षा झाली. त्या वेळी या स्वातंत्र्ययुद्धाला प्रत्यक्ष प्रारंभ झाला; पण त्याच्या आधी जवळजवळ पन्नास वर्षे राष्ट्रीयत्व, लोकशाही व विज्ञान यांचे तत्त्वज्ञान समाजात प्रसृत होत होते. म्हणजे हा स्वातंत्र्याचा लढा जवळजवळ शंभर वर्षे चालू होता असे म्हणण्यास हरकत

नाही. त्याच्या आधीच्या तीस-चाळीस वर्षांच्या भारताच्या इतिहासाकडे पाहिले तर आपली आपल्याला लाज वाटावी अशी परिस्थिती येथे होती असे दिसून येईल.

साहेबासाठी अनुष्ठाने :

पहिली लज्जास्पद गोष्ट आपल्या ध्यानात येते ती ही की, या येवढ्या विस्तीर्ण देशात कोणत्याही प्रदेशाला, कोणत्याही समाजाला स्वराज्य नको होते. 'हिंदुस्थान का व कसा जिंकला गेला ?' या 'आधुनिक भारत' या आपल्या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात आचार्य जावडेकरांनी या स्वत्वशून्य वृत्तीचे तपशिलाने वर्णन केले आहे. त्यावरून असे दिसून येईल की, पेढीवाले, सावकार, व्यापारी, सरदार, जमीनदार, लष्करी अधिकारी, ब्राह्मण, रजपूत, सर्व-सर्व ब्रिटिशांना येथे राज्य स्थापण्यास सर्व प्रकारे मदत करीत होते आणि त्यांची सत्ता प्रस्थापित व्हावी म्हणून आतुर झाले होते. गुप्त पेढीवाल्यांनी प्रत्येक लढाईच्या वेळी इंग्रजांना गुप्त माहिती पुरवून व द्रव्याचे साहाय्य करून, आपल्या राजनिष्ठे-विषयी कंपनी सरकारकडून प्रशस्तिपत्रे मिळविली होती. बंगालप्रांत लॉर्ड क्लाइव्हने घेतला त्या वेळी तेथील हिंदू व्यापाऱ्यांनी व जमीनदारांनी ब्रिटिशांना सर्वतोपरी साह्य केले, हे हिल्ल, कर्नल स्कॉट, रॉबर्टस् या इंग्रज लेखकांनीच लिहून ठेविले आहे. यावेळी हे व्यापारी व जमीनदार मुसलमान नबाबांच्या जुलमाला अत्यंत कंटाळून गेले होते, हे खरे; पण ती सत्ता आपण उलथून पाडावी हे सामर्थ्य व ही आकांक्षाही त्यांच्या मनात नव्हती ! भारतात साम्राज्य स्थापण्यास ब्रिटिशांना ज्यांनी सैनिक दृष्टीने मदत केली त्यांत क्षात्रधर्माचे अनुयायी म्हणून गाजलेल्या रजपुतांचाही भरणा बराच मोठा होता. ते शूर होते, उच्चवर्णीय होते; पण, जावडेकर म्हणतात, त्या वेळच्या हिंदुसमाजात धर्मनिष्ठा, शौर्य ही गुणसंपदा भरपूर असूनही राष्ट्राभिमान मुळीच नव्हता. दक्षिणेतील मराठे सरदार व जहागीरदार यांच्या राजनिष्ठेचे पोवाडे मुंबईचा गव्हर्नर सर जॉन मालकम यानेच गाइले आहेत. त्यांनी आपल्या स्वामीशी म्हणजे पेशव्यांशी द्रोह करून ब्रिटि-शांना साह्य केले म्हणून त्यांच्या जहागिरी जप्त करू नयेत, अशी मालकम विलायतसरकारकडे शिफारस करीत आहे ! खडकीच्या लढाईच्या वेळी, 'बडे साहेबास यश यावे, साहेब लोक जिवानिसी खुशाल राहावे,' म्हणून पुण्याला

काही ब्राह्मणांनी अनुष्ठाने बसविली होती व श्रीगणपतीस व महालक्ष्मीस नवस केला होता !

राष्ट्राभिमान नाही :

हे सर्व वाचले म्हणजे आजच्या सुशिक्षित मनाला मोठा विस्मय वाटतो, खेद होतो; पण एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्रीयत्वाचे कसलेही संस्कार भारतीय मनावर झालेले नव्हते आणि स्वाभिमान, स्वत्व यांचा या भूमीत संपूर्ण लोप झालेला होता, हे ध्यानी घेतल्यावर यात विस्मयावह काही नाही, हे लक्षात येईल. अनेक इंग्रजांनी हे जाणून तसे लिहूनही ठेविले आहे. 'हिंदी लोकांना आत्मप्रत्यय वाटत नाही. त्यांच्यांत राष्ट्राभिमान नाही व ते एकजूट करू शकत नाहीत, हेच आपल्या साम्राज्याचे सामर्थ्य आहे. आपल्या गावापलीकडे देशाचे प्रेम म्हणजे काय याचे ज्ञान हिंदी लोकांना नाही. राज्यसंस्थेविषयी ते अगदी बेफिकीर असतात. जो पगार देईल त्याच्यासाठी ते लढतील व चांगल्या पगाराच्या व लुटीच्या आशेने शत्रूलाही जाऊन मिळतील.' (फ्रेड्रिक जॉन शोअर) येथील सामान्य जनता राष्ट्रनिर्मितीच्या ज्ञानापासून अलिप्त आहे. येथील राज्यकर्ते, संस्थानिक, परकीयांविरुद्ध एकजुटीने लढून स्वातंत्र्यस्थापना करण्यास नालायक आहेत आणि येथील विद्वानांना जगाचे, भौतिक शास्त्रांचे आणि सामाजिक विद्यांचे गाढ अज्ञान आहे,–हे मनरो मालकम, एल्फिन्स्टन यांना दिसत होते. (आधुनिक भारत–पृ. ३५) हिंदी राजे, संस्थानिक किंवा त्यांचे विद्वान-अविद्वान मुत्सद्दी हिंदुस्थानात राष्ट्रीयत्व निर्माण करू शकत नाहीत. कारण ते जगाच्या संस्कृतीत मागासलेले, अर्धरानटी, आपसात भांडणारे, परकी प्रभुत्वाची चीड न बाळगणारे, धर्मवेडात गुरफटलेले, आधुनिक राष्ट्रनिर्मितीस पारखे, लोकसत्तेचे ज्ञान नसलेले आणि जगातील घडामोडी न जाणणारे असे आहेत, हे ब्रिटिश मुत्सद्दी जाणून होते. (कित्ता पृ. ३०) म्हणजे राष्ट्रत्वाच्या दृष्टीने येथील सर्व वर्ग शूद्र अथवा दास बनले होते. आपल्या धर्माच्या व संस्कृतीच्या रक्षणास स्वराज्य हवे याची जाणीवही त्यांच्यात उरली नव्हती. आमच्या अंगी केवळ वैयक्तिक सद्गुण होते; पण राष्ट्रनिर्मितीस व स्वराज्यनिर्मितीस लागणाऱ्या सद्गुणांचा संपूर्ण लोप झाला होता; (कित्ता पृ. २४). आचार्य जावडेकरांनी त्या काळच्या अनेक इंग्रज पंडितांच्या व अधिकाऱ्यांच्या आधारे त्या काळच्या

भारतीयांचे हे असे वर्णन केले आहे. मूढ धर्मशास्त्रकारांनी प्रसृत केलेल्या हीन धर्मामुळे हिंदुसमाजाचा शतमुखांनी कसा विनिपात झाला होता, हे यावरून कळून येईल.

सर्वांगीण क्रान्ती :

अशा या पतित समाजात सर्वांगीण क्रान्तीची बीजे पेरणारे पहिले थोर पुरुष म्हणजे राजा राममोहन रॉय हे होत. त्यांनी प्रथम रूढ हिंदुधर्मावर अत्यंत प्रखर टीका करण्यास प्रारंभ केला. कारण धर्मक्रान्ती झाल्यावाचून, विकृत धर्मकल्पनांपासून समाज मुक्त झाल्यावाचून, येथे दुसरी कसलीही क्रान्ती होणे शक्य नव्हते. कारण धर्माची सत्ता त्या वेळी सर्वंकष अशी होती. व्रतेवैकल्ये, उद्यापने हे सर्व कर्मकांड, मायावाद शिकविणारी निवृत्ती, बुद्धिनाश करणारे ग्रंथप्रामाण्य, समष्टिभावना मुळातच खुडून टाकणारा जातिभेद, स्त्रीचे दास्य व त्यातून निर्माण झालेली सतीची दुष्ट रानटी चाल ही सर्व हिंदुधर्माच्या विकृतीची लक्षणे होत, असे राममोहन यांचे मत होते. आपल्या लेखांतून, पत्रांतून व व्याख्यानांतून त्यांनी या अधर्मावर सतत भडिमार चालू ठेविला होता आणि त्याच वेळी भौतिकविद्यांची उपासना या देशात व्हावी असे प्रयत्न त्यांनी चालविले होते. कंपनी सरकारने कलकत्त्यास संस्कृत पाठशाळा काढून येथल्या न्याय, मीमांसा, वेदान्त इ. जुन्याच विद्यांचे अध्यापन करण्याचे धोरण आखले होते. त्यावर टीका करताना राममोहन म्हणतात की, 'आम्हांस अशी आशा वाटत होती की, या पाठशाळेत हिंदी लोकांना गणित, भौतिक विद्या, रसायनशास्त्र, शारीरविद्या व इतर ज्या शास्त्रांना पूर्णत्वास नेल्यामुळे युरोपीय राष्ट्रे जगातील लोकांच्या पुढे गेली आहेत ती शास्त्रे शिकविण्यासाठी बुद्धिमान व विद्वान युरोपियनांची नेमणूक होईल.' लॉर्ड बेकन याच्या काळापासून ज्या भौतिक दृष्टिकोणाचा अवलंब युरोपने केला त्याच दृष्टिकोणाचा अवलंब करून, आधुनिक भारताने आधुनिक, भौतिक व सामाजिक विद्यांचे अध्ययन केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. ब्रिटिश सरकारने हा त्यांचा आग्रह मानला आणि भारतीय पंडितांनी अनन्य भक्तीने या पाश्चात्य विद्यांची उपासना केली; म्हणूनच भारतात क्रान्ती घडविणे विसाव्या शतकातील त्याच्या नेत्यांना शक्य झाले.

मानवी प्रतिष्ठा :

गेल्या शतकातील दुसरे मोठे धर्मसुधारक म्हणजे न्या. मू. रानडे हे होत. 'मानवी प्रतिष्ठेचे पुनरुज्जीवन' हे त्यांच्या धार्मिक व सामाजिक तत्त्वज्ञानाचे आदिसूत्र होते. 'आपल्या अधःपाताचे मूळ कारण म्हणजे आपल्यावरची बंधने ही विवेकबंधने नसून, ती बाह्य बंधने आहेत, हे होय; यामुळे आपली मने बाल्यावस्थेतच राहिली. स्वयंशासन, आत्मसंयम यांमुळे येणारी मानवी प्रतिष्ठा आपल्याला कधीच आली नाही.' असे उद्‌गार त्यांनी कलकत्त्याच्या दहाव्या सामाजिक परिषदेत भाषण करताना काढले आहेत. (मिसलेनियस राइटिंग्ज्–पृ. १९२–९३) ब्रिटिशांच्या पूर्वीच्या हजार वर्षांच्या काळात येथे समाजरचनेची जी तत्त्वे मान्य व रूढ झाली होती, त्यातील जवळजवळ प्रत्येक तत्त्व मानवी प्रतिष्ठेला घातक असे होते. कलियुग, नियतिवाद, संसाराची उपेक्षा, तर्काची अवहेलना, जन्मनिष्ठ उच्चनीचता, शब्दप्रामाण्य यांतील प्रत्येक तत्त्वाने व्यक्तीच्या स्वत्वाची पायमल्ली केलेली आहे. असल्या अधम व हीन धर्माचे जे अनुयायी त्यांच्यांत लोकसत्ता तर राहोच, पण मानवी कर्तृत्वाचा निदर्शक असा कोणताच गुण निर्माण होणे शक्य नव्हते. पाश्चात्त्य विद्येने ज्यांना नवी दृष्टी प्राप्त झाली त्या सर्व धर्मवेत्त्यांना हीच भयावह गोष्ट प्रथम जाणवली. गेल्या शतकातील सर्व प्रमुख समाजनेते प्रथम धर्मसुधारक होते याचे हेच कारण आहे. त्यांपैकी प्रत्येकाने पहिला घण त्या कर्मकांडप्रधान, विवेकहीन, जड धर्मावरच घातला आहे. त्यांच्या धर्मसुधारणेचे एकच लक्षण होते. मानवाला देहप्रधान गणून आधीच्या जडधी, मूढ अशा धर्मपंडितांनी सांगितलेला हीन व अपवित्र असा आचारधर्म नष्ट करून त्याच्या जागी त्याच्या मनाची, बुद्धीची, आत्म्याची प्रतिष्ठा वाढविणारा तात्त्विकधर्म प्रस्थापित करणे हे ते लक्षण होय. "धर्म म्हणजे मनाचे संस्कार, देहाचे नव्हेत. धर्म म्हणजे मनोजय, धर्म म्हणजे आत्मसंयमन, धर्म म्हणजे भूतदया, श्रद्धा, भक्ती, प्रेम, दया, क्षमा, शांती, रंजल्यागांजल्यांना आपुले म्हणणे, सर्वांभूती समभाव" हा महनीय विचार त्यांना सांगावयाचा होता आणि वेद, उपनिषदे, गीता या धर्मग्रंथांच्या आधारे त्यांनी तो सांगितला.

स्वामी दयानंदसरस्वती यांनी पंजाबात जे धर्मसुधारणेचे कार्य केले त्याचे स्वरूप काहीसे असेच होते. वेदाध्ययनाचा अधिकार मनुष्यमात्राला आहे,

चातुर्वर्ण्य हे जन्मसिद्ध नसून ते गुणकर्मांवर अवलंबून असावे, वैदिक धर्माचे दरवाजे सर्व धर्मीयांना खुले असावे व शुद्धीकरणाने कोणासही या धर्मात प्रवेश मिळावा, अशी दयानंदांच्या आर्यसमाजाची तत्त्वे आहेत. मूर्तिपूजा, बालविवाह, स्त्रीदास्य, अस्पृश्यता या रूढींवर समाजाचे नेते प्रखर हल्ला करतात. स्वामी दयानंदांना लाला हंसराज, स्वामी श्रद्धानंद, लाला लजपतराय यांसारखे थोर अनुयायी मिळाल्यामुळे पंजाबात धर्मक्रान्तीची जी बीजे पेरली गेली त्यांचा त्वरेने विकास झाला.

भौतिकवादाचे माहात्म्य :

स्वामी विवेकानंदांचे धर्माच्या अभ्युत्थानाचे कार्य प्रसिद्धच आहे. त्याचे वर्णन करण्याची गरजच नाही. त्यांना कोणती धर्मक्रान्ती अभिप्रेत होती याची कल्पना यावी म्हणून त्यांच्या भाषणातील एकच उतारा देतो. " आमच्यावर मुसलमानांचे आक्रमण झाले, ख्रिस्त्यांचे झाले. आमच्यांपैकी कोट्यवधी लोक धर्मच्युत झाले; पण त्यांनी तसे न व्हावे म्हणून कोणती व्यवस्था आम्ही केली होती ? जे भिकारी होते, हीनदीन दरिद्री होते, त्यांना आम्ही थोडे सुख देण्याऐवजी निवृत्तीचे धडे देत बसलो. आमच्या पंडितांनी सगळा धर्म सोवळ्या-ओवळ्यात आणून ठेविला आणि ऐहिक वैभवाकडे दुर्लक्ष केले. अध्यात्माचा त्यांनी अतिरेकच केला. तेव्हा आता आत्मोद्धारासाठी आपण भौतिकवादाचा आश्रय करणे अवश्य आहे. एका दृष्टीने भौतिकवाद आला तो आपल्या उद्धारार्थच आला आहे. त्यामुळे जन्मनिष्ठ उच्चनीचता नष्ट होईल, बुद्धिप्रामाण्य निर्माण होऊन धर्मग्रंथांची ठेव सर्वांच्या हाती येईल व सुखी जीवनाचे दरवाजे सर्वांना खुले होतील. पश्चिम ही धनिकांच्या टाचेखाली चेंगरली असली तर पूर्व ही धर्ममार्तंडांच्या टाचेखाली चिरडली आहे, हे ध्यानात ठेवा. आता एकीने दुसरीवर नियंत्रण ठेवून समतोल राखिला पाहिजे. केवळ अध्यात्माने जगाची प्रगती होणार नाही. "

राममोहन, रानडे, दयानंद, विवेकानंद यांना जी सर्वांगीण क्रान्ती अभिप्रेत होती, त्यांना जे समाजरचनेचे नवे तत्त्वज्ञान समाजाला सांगावयाचे होते ते गेल्या शतकात प्रांतोप्रांतीच्या शेकडो लहानमोठ्या सुधारकांच्या मनात उदित झालेले होते. हे तत्त्वज्ञान पाश्चात्त्य विद्येचे फळ असल्यामुळे व ती विद्या सर्वच

प्रदेशांत प्रसृत करण्याचे धोरण इंग्रज सरकारने अवलंबिले असल्यामुळे, हे नवविचारप्रवाह सर्व प्रदेशांत वाहू लागले होते आणि प्रत्येक प्रांतातील सुधारक आपल्या वाणीने व लेखणीने ते विचार या भूमीत दृढमूल करण्याचा प्रयत्न करीत होते. ईश्वरचंद्र विद्यासागर, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी रामतीर्थ, दादोबा पांडुरंग, ज्योतिबा फुले, लोकहितवादी, आगरकर, पंडित अयोध्यानाथ, लाला हंसराज, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद, आनंदा चार्लू, सुब्रह्मण्य अय्यर इ. भारतातील अनेक नेत्यांना, कार्यकर्त्यांना व विचारवंतांना गेल्या हजार वर्षांत येथल्या लोकांना जे प्रश्न प्रतीत झाले नाहीत तेच नेमके प्रतीत झाले. त्यामुळे आपल्या समाजाचे अवनत रूप पाहून त्यांच्या पायांखालची धरणी हादरून गेली आणि समाजात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचा दृढनिश्चय करून त्यांनी ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज, महाजनसभा, भार्गवसभा, हिंदु युनियन क्लब अशा अनेक संस्था स्थापन केल्या आणि बंगाल हेरल्ड, बंगाली, अमृतबझारपत्रिका, दर्पण, इन्दुप्रकाश, दीनबंधु, हिंदू, स्वदेशमित्रम्, इंडियन हेरल्ड, रीजनरेटर ऑफ आर्यावर्त अशी वृत्तपत्रे काढली व सर्व भारतभर नवविचारांचे एक प्रचंड आंदोलन घडवून आणले.

नवी संघटनतत्त्वे :

आणि यातूनच राष्ट्रनिष्ठा व लोकशाही या संघटनातत्त्वांची बीजे सर्वत्र पडून लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांना अखिल भारताची संघटना करून इंग्रजी साम्राज्यशक्तीशी लढा देण्याचे सामर्थ्य भारतीय समाजात निर्माण करता आले. हे दोघेही महापुरुष धार्मिक व सामाजिक परिवर्तनाचे पुरस्कर्ते होतेच; पण भारताचे राजकीय स्वातंत्र्य हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट असल्यामुळे त्या सर्वांगीण क्रान्तीतून निर्माण झालेल्या शक्तीला त्यांनी राष्ट्रीयत्वाची जोड दिली व या भूमीत एक अभूतपूर्व सामर्थ्य निर्माण केले. टिळकांच्या उदयापर्यंत नवधर्मतत्त्वे ही बव्हंशी वैचारिक पातळीवर होती व सामान्यतः सुशिक्षित वर्गापर्यंतच त्यांचा प्रसार मर्यादित होता. स्वातंत्र्यासाठी भारताची लोकशक्ती जागृत करावयाची असे ठरवून टिळकांनी आतापर्यंतच्या चळवळींची बैठक बदलली व त्यांना अखिल भारतव्यापी रूप दिले. विचारस्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्माच होय. त्याचा अत्यंत जोराने टिळकांनी पुरस्कार केला. जेथे विचार-

स्वातंत्र्य नाही ते राष्ट्र मेल्यासारखे होय; म्हणून हे स्वातंत्र्य नष्ट करू पाहणारा मनुष्य राष्ट्राचा शत्रू समजला पाहिजे, असे ते सांगत असत. निवृत्तिवाद हा समाजाला किती घातक आहे हे तरुणपणी त्यांनी गीतेच्या अध्ययनास आरंभ केला तेव्हाच त्यांच्या ध्यानात आले होते. मंडालेच्या तुरुंगात सवड मिळताच गीतारहस्य हा ग्रंथ लिहून, हजारो वर्षे विस्मृतीत पडून राहिलेला गीतेचा जो कर्मयोग म्हणजेच प्रवृत्तिधर्म त्याचे त्यांनी अभ्युत्थान केले आणि एका जुनाट रोगापासून भारताला मुक्त केले. जातिभेद व जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्य त्यांना कधीच मान्य नव्हते, पण प्रारंभी त्यावर काही धोरणाने ते टीका करीत नसत; पण राजकीय चळवळीला उधाण येऊ लागले तेव्हा जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य मानणे लोकशाहीच्या काळास अननुरूप आहे व सर्व जातींच्या लोकांनी स्वराज्याच्या कार्यात पडणे व जातिभेद जन्मसिद्ध न मानता गुणकर्मानुसार मानणे हेच युक्त होय, असे सांगण्यास त्यांनी प्रारंभ केला. ही उक्ती त्यांनी मागून सांगितली असली तरी ती कृती मात्र त्यांनी प्रारंभापासून आरंभिली होती. कारण त्यांना लोकशक्ती जागृत करावयाची होती. महार, मांग, चांभार, ब्राह्मण, मराठे, कुणबी हे सर्व गणेशोत्सवात एकत्र आले पाहिजेत असा त्यांचा प्रयत्न व शिकवण असे. त्यांना दुसरे काही करणे शक्यच नव्हते. कारण ब्रिटिश साम्राज्यशक्तीशी लढा देण्यासाठी त्यांना लोकांत जागृती करावयाची होती, त्यांचा स्वाभिमान उद्दीपित करावयाचा होता, त्यांचे व्यक्तिमत्त्व कणखर करावयाचे होते. त्यामुळेच मजूर, काबाडकष्ट करणारे लोक, शेतकरी, कारागीर, कोष्टी, साळी, माळी, भिल्ल, कातवडी ह्या शतकानुशतके निद्रिस्त असलेल्या समाजाला ते 'केसरी'च्या पानापानातून आवाहन करीत होते. खरी सर्वांगीण क्रांती ती हीच होय. अन्यायाचा प्रतिकार करण्याची बुद्धी व शक्ती एकदा मनुष्याच्या मनात जागृत झाली की, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सांगितलेल्या सुप्त स्वदेशी शृंखला त्याच्या पायात क्षणभरही टिकू शकत नाहीत. टिळकांनी भारतीय जनतेच्या मनातली हीच सुप्तशक्ती जागृत केली आणि धार्मिक, सामाजिक, आर्थिक व सर्व प्रकारच्या क्रान्तीचा पाया घातला. तीतूनच अग्नीसारखे महातेज निर्माण करून महात्माजींनी त्यात ब्रिटिश साम्राज्याची आहुती दिली.

व्यक्तित्वजागृती :

महात्माजी हे लो. टिळकांसारखेच धर्मप्रणेते होते. मानवत्वाची प्रतिष्ठा हे

त्यांच्याही तत्त्वज्ञानाचे मुख्य सूत्र आहे. व्यक्ती हे अंतिम मूल्य आहे हा अत्यंत उदात्त विचार त्या सूत्रातूनच विकसित झालेला आहे. या विचाराचा उपदेश करूनच एक व्यक्ती आपल्या विवेकाने निश्चित केलेल्या सत्यासाठी अखिल विश्वाविरुद्ध लढा करू शकते, निःशस्त्र असताही लढा करू शकते, हे फार मोठे तत्त्व त्यांनी प्रस्थापित केले आणि हीन, दीन अशा भारतीय जनतेला व्यक्तित्वाचे असामान्य सामर्थ्य प्राप्त करून दिले. दक्षिण आफ्रिकेत, चंपारण्यात, खेडा जिल्ह्यात सामर्थ्यनिर्मितीचा हा अलौकिक चमत्कार महात्माजींनी करून दाखविला. तेथे ज्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीशी लढा केला ते लोक हिंदुसमाजाच्या अगदी खालच्या थरातले होते. शेकडो वर्षे ते तेथेच पिचत होते. त्यांना उन्नत होण्यास हिंदुधर्मशास्त्राच्या चौकटीत कधीही अवसर मिळाला नसता. तो मिळत नव्हता म्हणूनच हा समाज शेकडो वर्षे पारतंत्र्याच्या नरकात सडत होता. जुने धर्मशास्त्र कोणाही व्यक्तीकडे तिच्या जातीतून, वर्णातून पाहात असे. त्या जातीची वा वर्णाची ती एक घटक एवढेच तिचे स्थान होते. व्यक्तित्व हेच अंतिम मूल्य हा विचार युरोपात विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे निर्माण झाला. औद्योगिक क्रान्तीमुळे तो बळावला. विज्ञाननिष्ठेमुळे त्याचा परिपोष झाला आणि त्यातूनच युरोपचे सर्व वैभव निर्माण झाले. अत्यंत निराळ्या भूमिकेवरून पण महात्माजींनी तेच तत्त्व भारतीय जनतेला सांगितले आणि सत्याग्रह लढ्याला तिला उद्युक्त करून तिच्या ठायी एक महाशक्ती निर्माण केली.

परंपराभिमान :

ही महाशक्ती, हे महातेज म्हणजेच राष्ट्रनिष्ठा हे संघटनतत्त्व होय. वर सांगितलेली धर्मक्रान्ती व सामाजिक क्रान्ती घडविणारे लोक जरी अंतर्मुख होऊन स्वसमाजावर प्रखर टीका करीत असत तरी भारताच्या प्राचीन वैभवाचा, पूर्वपरंपरेचा त्यांना प्रखर अभिमान होता. हिंदुसमाजाच्या पुनर्घटनेची त्यांनी जी तत्त्वे सांगितली त्यांना ते वेद, उपनिषदे, महाभारत, गीता यांचाच आधार घेत. आगरकरांसारख्यांना असा आधार घेणे पसंत नव्हते. तरी पाश्चात्य सुधारणांचा अंगीकार करावयाचा तो आपले प्राचीन आर्यत्व न सोडता करावयाचा, असेच त्यांचे मत होते. प्राचीन काळातील हिंदुसमाजाच्या नेत्यांना पूर्वपरंपरेचा अभिमान होता; पण तो आंधळा होता. वेद, उपनिषदे, गीता यांची चिकित्स

करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी नव्हते आणि त्यांच्या त्या अभिमानाचा समाज-संघटनेशी काही संबंध नव्हता; पण पाश्चात्यविद्या येथे आल्यापासून भारतीयांनी इतिहासाचा अभ्यास सुरू केला. त्यामुळे प्राचीन ग्रंथांचे खरे वैभव त्यांना कळून आले. शिवाय चंद्रगुप्त मौर्य, शातवाहन, विक्रमादित्य, चंद्रगुप्त, समुद्रगुप्त इ. महापराक्रमी सम्राटांचा जो पराक्रम गेली हजार वर्षे विस्मृतीत गेला होता तोही आता इतिहाससंशोधनामुळे प्रकाशात आला. यामुळे भारतीयांचा परंपराभिमान जास्तच दृढ झाला. हा अभिमान जागृत होऊ नये म्हणून वेद–उपनिषदादि ग्रंथ फार प्राचीन नाहीत; रामायण, गीता हे ग्रंथ उसनवारीने रचलेले आहेत; हिंदू लोकांना चारित्र्य नाही, त्यांच्या ठायी काव्यप्रतिभा असणे शक्य नाही, मराठ्यांच्या राज्याला कसलीही तात्त्विक बैठक नव्हती, इ. निरर्गल निंदा इंग्रज मिशनरी, पंडित व अधिकारी करीत होते. न्या. मू. तेलंग, लो. टिळक, चिंतामणराव वैद्य, वि. का. राजवाडे, रमेशचंद्र दत्त, बसू, डॉ. जयस्वाल, अयंगार यांनी या निंदेला पाश्चात्यांच्याच ऐतिहासिक शस्त्रास्त्रांनी उत्तर देऊन भारतीय संस्कृतीचे प्राचीनत्व व स्वयंसिद्धत्व शंकातीत करून टाकले. त्यामुळे परंपराभिमानाला ज्ञानाचा पाया प्राप्त होऊन त्याला अधिकच उत्कटता व तेज आले.

अभिमान आणि द्वेष :

याच काळात पितामह दादाभाई नौरोजी, न्या. मू. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रिन्सिपल आगरकर, लो. टिळक, ना. गोखले, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, सुब्रह्मण्य अय्यर, वीर राघवाचार्य इ. नेत्यांनी इंग्रजी राज्याचे हिडिस अंतरंग, त्याचे खरे काळे स्वरूप भारतीय जनतेला उघडे करून दाखविण्यास प्रारंभ केला होता. ब्रिटिशांनी चालविलेला अर्थशोष, मिशनऱ्यांकरवी त्यांनी चालविलेले धार्मिक आक्रमण, त्यांच्या राज्यातील भयानक अन्याय, इंग्रज अधिकाऱ्यांचे असह्य उद्दाम, उर्मट वर्तन, भारताच्या आर्थिक उन्नतीला सतत पायबंद घालण्याची त्यांची वृत्ती, दुष्काळ, साथीचे रोग यांच्या निवारणाच्या मिषाने गोऱ्या सोजिरांनी केलेले अत्याचार या सर्वांचे वर्णन वृत्तपत्रे रोज करीत व त्यामुळे इंग्रज राज्यकर्त्यांविषयी कडवा द्वेष भारतीय जनतेत निर्माण झाला. स्वराष्ट्र, स्वधर्म, पूर्वपरंपरा यांचा अभिमान ही राष्ट्रनिष्ठेची एक बाजू होय. आक्रमक सत्ताधारी, राज्यकर्ते यांच्याबद्दलचा जहरी द्वेष ही त्याची दुसरी बाजू होय. लो. टिळकांनी मृगशीर्ष, आर्यांचे मूलस्थान, गीतारहस्य इ.

ग्रंथ लिहून स्वत्वाचा अभिमान जसा जागृत केला तसाच बहुजनांच्या तोंडचा घास सरकार काढून घेत आहे, त्यांच्यावर करांचे असह्य ओझे लादीत आहे हे दाखवून इंग्रजांविषयी द्वेष व असंतोषही पेटवून दिला. वासुदेव बळवंत, चाफेकर, वीरेन्द्रकुमार घोष, भूपेन्द्रनाथ दत्त आणि या सर्वांचे मुकुटमणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी सशस्त्र क्रान्तीच्या मार्गाने वधस्तंभावर चढून हेच कार्य केले. आचार्य जावडेकर म्हणतात, 'परकीय सत्तेच्या आक्रमणामुळे दारिद्र्य व बेकारी वाढत आहे, याची जाणीव सर्वांना होत होती. ही जाणीव आणि आपल्या परंपरागत संस्कृतीचा अभिमान यांची गाठ पडताच क्रांतीवादी व जहाल राजकारणाचा जन्म झाला. ही गाठ घालून देण्याचे काम लोकमान्यांनी केले.' (आधुनिक भारत–पृ. २३६)

नव्या क्रांतिकारक विचारांचा परिपाक होऊन भारतात राष्ट्रनिष्ठा कशी विकसत गेली याचे महर्षी दादाभाईंनी १८८० सालच्या एका भाषणात चांगले वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'सर्व वर्गांतल्या व थरांतल्या हजारो लोकांना आज जे शिक्षण मिळत आहे त्यामुळे त्यांची मने एकाच मुशीत घडत आहेत. त्या सर्वांच्या भावना समान होत आहेत, आकांक्षा समान होत आहेत व विचार समान होत आहेत आणि विशेषतः या जागृतीतून राजकीय संघटन व सहभाव निर्माण होत आहे. कारण सर्वांनाच दारिद्र्याची झळ लागली असून आपल्या देशाचा होत असलेला अधःपात आणि नाश स्पष्ट दिसत आहे. धर्म, वंश, पक्ष हे भेद या समाईक ध्येयात वितळून जात आहेत. हिंदू, मुसलमान, पारशी सर्वांनाच इंग्रजी राज्य हे वरदान आहे की शाप आहे हा प्रश्न पडला आहे आणि त्यामुळे देशाच्या राजकारणाने सर्वांची मने व्यापिली आहेत. देशाची अधोगती अशीच चालू राहिली, बहुजनांची सुखाची आशा नष्ट झाली तर लोकांची राजनिष्ठा भंगेल आणि ब्रिटिश मालाबद्दलचा आजचा द्वेष हा ब्रिटिश सत्तेकडे वळेल.'

हे १८८० सालचे भाषण आहे. पुढील साठसत्तर वर्षांत लो. टिळक, सावरकर, महात्माजी, पंडितजी, नेताजी यांनी हेच घडवले व त्या संघटित शक्तीच्या बळावर ब्रिटिश सत्ता नष्ट करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.

सार्थ भीती :

ज्या धार्मिक व सामाजिक क्रान्तीचे येथवर वर्णन केले ती येथे झाली नसती,

आर्थिक क्रांतीची आश्वासने जनतेला मिळाली नसती तर येथे राष्ट्रनिष्ठा ही कधीच उदयाला आली नसती व भारताची शक्ती कधीच संघटित झाली नसती. ब्रिटिश साम्राज्यशक्तीशी लढा करण्यास बहुजनांत जागृती होऊन स्वातंत्र्याच्या चळवळीला व लढ्याला त्यांचा पाठिंबा मिळणे अवश्य होते आणि इंग्रजी राज्य गेल्यानंतर येथे पुन्हा तेच चातुर्वर्ण्य, तोच ब्राह्मण-क्षत्रियांचा जन्मजात अधिकार, सावकार, व्यापारी, कारखानदार यांनी चालविलेला तोच रक्तशोष, तेच दारिद्र्य, तेच दास्य, तीच अवकळा, अस्पृश्यतेचा तोच नरक–हेच आपल्या कपाळी आहे असे जर बहुजनांना वाटत राहिले असते तर ते स्वातंत्र्यसंगरात कधीही सहभागी झाले नसते. अस्पृश्य हे तर या स्वातंत्र्यलढ्यापासून बहुतेक दूरच राहिले. कारण इंग्रजांच्या राज्यातच आपले हित आहे, स्वातंत्र्य आले तर पुन्हा स्पृश्य हिंदू आपला पूर्वीसारखाच छळ करतील, ही भीती त्यांना होती. सार्वजनिक तलावावर पाणी भरण्याच्या हक्कासाठी, सार्वजनिक देवळात प्रवेश मिळविण्यासाठी डॉ. आंबेडकरांना लढे करावे लागले, आणि ते करूनही हिंदूंना उमज पडत नाही हे पाहून त्यांना धर्मांतर करावे लागले यावरून ही त्यांची भीती सार्थ होती, यात शंका नाही; पण महात्माजींनी चालविलेली अस्पृश्योद्धाराची चळवळ व स्पृश्य हिंदूंनी त्यासाठी स्थापिलेल्या अनेक संस्था आणि प्रत्यक्षात काही अंशी अस्पृश्यतेचे निर्बंध ढिले करून त्या समाजाला दिलेला विसार, यांमुळेच त्यांचा विरोध बराच कमजोर झाला. धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळीत भेद करणे योग्य नाही, एक आधी व एक मागून या म्हणण्याला काही अर्थ नाही हे रानडे, दादाभाई, आगरकर, सावरकर, आंबेडकर यांचे म्हणणे कसे पूर्ण सार्थ होते ते स्वातंत्र्याच्या चळवळीला शेवटी जे रूप आले त्यावरून सहज दिसून येते. सर्व धर्मपंथ, सर्व वर्ण, सर्व जाती, सर्व वर्ग यांना स्वातंत्र्यामुळे आपला उत्कर्ष होईल, आजच्यापेक्षा स्वातंत्र्यानंतर आपली स्थिती थोडी तरी सुधारेल अशी निश्चिती वाटल्याशिवाय त्या लढ्यात उतरण्याची त्यांची कदापि सिद्धता होत नाही आणि ही निश्चिती धार्मिक व सामाजिक क्रान्तीशिवाय, म्हणजे त्या क्षेत्रातील विषमतेची रूढ तत्त्वे नष्ट करून समता, स्वातंत्र्य, बंधुता यांची तेथे प्रस्थापना झाल्याशिवाय होणे शक्य नसते. राममोहन रॉय यांच्यापासून महात्माजींपर्यंत भारताच्या सर्व नेत्यांनी आधी धर्मक्रान्ती करण्याचे धोरण अवलंबिले याचे हेच कारण आहे. रूढ धर्मतत्त्वे

वैचारिक पातळीवरून नष्ट करण्यात भारतीय नेत्यांना पुष्कळच यश आले आणि स्वातंत्र्य, समता, बुद्धिनिष्ठा या तत्त्वांना बरेच व्यवहारात आणता आले म्हणूनच त्यांना येथे राजकीय क्रान्ती करण्यात यश आले. त्या तत्त्वांमुळेच येथे राष्ट्रनिष्ठा रुजू शकली, जनशक्ती संघटित झाली आणि स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला.

अपेक्षाभंग :

स्वातंत्र्यलढ्याचे स्वरूप असे असल्यामुळे, धार्मिक व सामाजिक क्रान्ती ही या विजयासाठी अपरिहार्य आहे हे सर्व नेत्यांना मान्य असल्यामुळे आणि ती घडविण्यासाठी बहुतेक सर्वांनी यावच्छक्य प्रयत्न केलेले असल्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही अपुरी क्रान्ती सत्तेच्या साह्याने पूर्ण करून, त्या क्रान्तीची तत्त्वे जनतेच्या मनात खोलवर रुजवून भारतीयांची राष्ट्रनिष्ठा अभंग करून टाकण्याकडेच स्वातंत्र्याच्या उत्तरकाळचे भारताचे नेते आपले लक्ष केन्द्रित करतील, आपले शक्तिसर्वस्व पणाला लावतील अशी भारतातील सर्वजनांची अपेक्षा होती. स्वातंत्र्यपूर्वकाळात काही नेत्यांच्या तशा प्रतिज्ञाच होत्या. आधी राजकीय सुधारणा होऊन स्वातंत्र्य प्राप्त झाले, सत्ता हाती आली की, सामाजिक व धार्मिक सुधारणा सहज घडविता येतील असे त्यांचे मत होते. ज्यांना प्रारंभापासूनच त्या सुधारणांचे महत्त्व वाटत होते, सर्व क्षेत्रांतील सुधारणा एकदम झाल्या पाहिजेत असे ज्यांचे मत होते त्यांच्याबद्दल तर प्रश्नच नाही. राष्ट्रनिष्ठा हे या सुधारणांचेच फल आहे, त्यांच्या आधाराबाचून तिला स्थैर्य व दृढता येणार नाही अशी त्यांची खात्री असल्यामुळे त्या निष्ठेचा हा पाया भक्कम व अभंग करून टाकण्याचा उद्योग, सत्तारूढ होताच ते प्रथम हाती घेतील याबद्दल कोणाला शंकाच नव्हती.

पण जे कोणाच्या ध्यानीमनी नव्हते तेच भारतात घडले. स्वातंत्र्योत्तर काळातील सत्ताधाऱ्यांच्या वर्तनामुळे सर्वांचा अत्यंत दारुण असा अपेक्षाभंग झाला.

विष हेच पौष्टिक :

सत्ता हाती येताच धर्म, जाती, पंथ, प्रांत हे भेद नष्ट करण्याचा कसून प्रयत्न करण्याऐवजी ती सत्ता कायम आपल्या हाती टिकविण्यासाठी या भेदांचा आश्रयच सत्ताधारी काँग्रेसपक्ष करू लागला. राष्ट्रनिष्ठेऐवजी निवडणूकनिष्ठा हे आता काँग्रसचे ध्येय झाले आणि ज्या विषांनी भारतीय समाज विघटित होतो असे

काँग्रेसनेत्यांनी पूर्वी लक्षलक्ष वेळा सांगितले होते ती विषे आता यांनी पौष्टिके ठरविली व त्यांची इंजेक्शने ते समाजाला देऊ लागले. त्यामुळे जातीय व धार्मिक भेद स्वातंत्र्यानंतर लोप पावण्याऐवजी, पूर्वी कधी नव्हते इतक्या जोराने उफाळून आले. या विषयाची गेल्या पंधरावीस वर्षांत इतकी चर्चा झाली आहे की, त्याचे पुन्हा विवेचन करण्याचे कारण नाही. 'लोकसत्तेला दण्डसत्तेचे आव्हान', 'अराजकाच्या उंबरठ्यावरील भारत' ('वसंत' सप्टेंबर, ऑक्टोबर १९६१) 'भारतीय लोकसत्ता' या ग्रंथांत व लेखांत मी हा विषय सविस्तर व साधार मांडला आहे. पंडित नेहरू, राष्ट्रपती राजेन्द्रबाबू, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या भाषणांच्या आधारेच तो मांडला असल्यामुळे त्यातील सत्य वादातीत आहे. निवडणुकांची तिकिटे कशी दिली जातात, त्या वेळच्या भाषणांत प्रामुख्याने या विषारांचाच प्रसार कसा केला जातो, मंत्रिपदे, अधिकारपदे यांचे वाटप कसे होते, शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश देताना जात, धर्म, पंथ हीच प्रामुख्याने कशी पाहिली जातात हे सर्व जगजाहीर आहे. इत्यर्थ असा की, संघटनेच्या दृष्टीने विचार करता स्वातंत्र्यानंतर पाऊल प्रगतीच्या मार्गाने न पडता अधोगतीच्या मार्गानेच पडू लागले आणि पुन्हा हा समाज विघटित होऊ लागला. त्याचे भवितव्य पुन्हा धोक्यात आले.

धन्य अहिंसा, धन्य विश्वप्रेम !:

मुस्लीमांच्या बाबतीतही काँग्रेसच्या नेत्यांनी हिंदुसमाजाला आणि भारताला अत्यंत विघातक असेच धोरण अवलंबिले. फाळणीला मान्यता देऊन त्यांनी पाकिस्तानची निर्मिती केली. रूमशामला, इस्तंबूल्ला जावे, तेथपर्यंत मराठ्यांचा भगवा ध्वज न्यावा अशी मराठ्यांची आकांक्षा होती. बलुचिस्तान, अफगाणिस्तान येथपर्यंत आपले साम्राज्य विस्तारावे अशी रणजितसिंगाची आकांक्षा होती. ते सर्व लांबच राहिले आणि सिंध, पेशावर, अर्धा पंजाब, अर्धा बंगाल हे प्रांत मुस्लीमांना देऊन भारताच्या नेत्यांनी अफगाणिस्थानच्या अमीराचे स्वप्न दुपटीने सफल करून दिले, आणि हे सर्व अहिंसेपायी ! वैयक्तिक धर्म, वैयक्तिक मोह ही भारतीयांच्या मनाची सर्वांत मोठी विकृती. ती अजूनही निरनिराळ्या रूपांत पुन्हा पुन्हा उद्भवते. सत्य, अहिंसा ही आमच्या नेत्यांची प्रिय तत्त्वे. त्यांपायी राष्ट्रहित नासले तरी त्यांना त्याची परवा नाही. मागल्या

काळी ब्रह्मप्रेमाने येथले थोर पुरुष समाजहिताची उपेक्षा करीत, आता अहिंसा-प्रेमाने, एवढाच फरक. वैयक्तिक दृष्टिकोण दोहीकडे तोच आहे. ही वैयक्तिकता अत्यंत वरच्या, अत्यंत उदात्त पातळीवरची आहे हे खरे, पण राष्ट्रहिताच्या दृष्टीने ती त्याज्यच आहे. ती विकृतीच आहे. तीतूनच–त्या अहिंसाप्रेमातूनच –पाकिस्तानचा जन्म झालेला आहे. तो झाल्यावर राहिलेल्या भारताविषयी तरी आमच्या नेत्यांनी खंबीर, कणखर धोरण अवलंबावयाचे होते ! पण ते हिंदूंच्या रक्तातच नाही. त्यामुळे काश्मीर, आसाम, कच्छ हे प्रदेशही पाकिस्तानात जाण्याची वेळ आली आहे. याचेही कारण तेच. विश्वकल्याण, सत्य, जागतिक न्याय, यांवर राष्ट्रीय स्वार्थापेक्षा आमच्या नेत्यांची जास्त निष्ठा आहे. याचा अर्थ इतकाच की, त्या तत्त्वाचा ते उद्घोष करीत असतात. हाच तर हिंदु-समाजाचा आज हजारो वर्षांचा रोग आहे. 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत' या तत्त्वाचा मुखी उद्घोष आणि प्रत्यक्षात काही मानवांची सावली-सुद्धा ध्यावयाची नाही इतकी विषमता. सत्य, अहिंसा, समता, न्याय यांचा पाठ म्हणणाऱ्या काँग्रेजनांची हीच स्थिती आहे. रोजच्या कारभारात, निवड-णुकीच्या काळात, सत्ताप्राप्तीच्या समयी त्यांना या तत्त्वांची आठवणही राहात नाही. मुस्लीम लीग जातीय आहे, अराष्ट्रीय आहे असे शंभर वेळा तरी दर-साल ते म्हणतात; पण निवडणुका जवळ आल्या की तिच्याशी हातमिळवणी कर-ण्यात आपण राष्ट्रनिष्ठेशी प्रतारणा करीत आहो असे त्यांना वाटत नाही. निधर्मी म्हणून पुकारलेल्या राज्यात फक्त हिंदूंपुरतेच कायदे करण्यात काही असत्य आहे, काही अन्याय आहे, अशी शंकासुद्धा काँग्रेसनेत्यांना येत नाही. सारांश काय, आपापली संस्थाने व राज्ये टिकावी म्हणून आक्रमकांपुढे जे धोरण मागल्या काळी हिंदुराजे, सरदार, मिसालदार, संस्थानिक अवलंबीत असत त्यात आज फारसा फरक पडलेला नाही. पूर्वी राजसत्ता होती, आता लोकसत्ता आहे; पण लोकसत्तेत निवडणूक ही सत्ताधाऱ्यांना तितकीच लाचार व भ्रष्ट बनविते, राष्ट्र-निष्ठेला तीही तसाच सुरुंग लावते हे स्पष्ट आहे. मुस्लीम लीग, आसामात घुस-णारे पाकिस्तानी, लूटमार, बलात्कार, अत्याचार करणारे मुस्लीम गुंड यांच्यापुढे लाचारी पतकरून काँग्रेसने हे स्पष्ट केले आहे.

धर्मांतर हे राष्ट्रांतर –

मुस्लीमांप्रमाणे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या बाबतीतले काँग्रेसचे धोरणही असेच

राष्ट्रविघातक आहे. वाटेल त्या वाममार्गांनी हे मिशनरी हिंदूंचे धर्मांतर घडवितात व त्या धर्मांतरित समाजाला राष्ट्रद्रोही बनवितात, हे आता सूर्य-प्रकाशाइतके स्वच्छ झाले आहे. महात्माजींनी अत्यंत स्पष्ट शब्दांत हे सांगितलेले आहे. 'मिशनऱ्यांचा हेतू एकच आहे. हिंदुधर्माचा पाया उखडून तो समूळ नष्ट करून तेथे दुसरा धर्म स्थापिणे हा तो हेतू होय. माझ्या हाती सत्ता असती तर मी कायद्याने हे धर्मांतर बंद पाडले असते. अज्ञानी हिंदुसमाजाचा असा फायदा घेणाऱ्या वृत्तीचा मला तिटकारा वाटतो.' जे. सी. कुमारप्पा यांनी मिशनऱ्यां-बद्दल हेच उद्‌गार काढले आहेत. 'मिशनऱ्यांचा धर्मप्रचार असाच चालला तर भारतात लवकरच एक खिस्तिस्थान निर्माण होईल' ही भीती सभापती अनंतशयनम अय्यंगार यांनीही व्यक्त केली आहे. (मसुराश्रम–विश्वकल्याणमाला पत्रक क्रमांक ४, ५, ६, ७– यांच्या आधारे.) डॉ. वेरियर एलविन हे एक इंग्रज पाद्री आहेत. त्यांनी, 'मिशनऱ्यांनी जे धर्मांतराचे राष्ट्रद्रोही कार्य चालविले आहे त्याला, भारतीयांनी सावध होऊन वेळीच आळा घातला नाही तर सर्व आदिवासी जनता अराष्ट्रीय होऊन भारताच्या कुशीत ती एक कट्यार घुसेल,' असा इषारा दिला आहे. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपल्या आत्म-चरित्रात आपले हेच मत ठायी ठायी प्रकट केले आहे. ते तर म्हणतात की, 'खिस्ती झाल्यामुळे अस्पृश्यसमाजाची कोणतीच उन्नती झालेली नाही. खिरस्ती मिशनऱ्यांनी सर्व जातिभेद, अस्पृश्यता या बाटलेल्या लोकांत कायम ठेविली आहे. अस्पृश्यांना चर्चमध्ये प्रवेश मिळत नाही आणि इतर जातींना चर्चमध्ये वेगवेगळ्या बाकांवर बसावे लागते.' (माझ्या आठवणी व अनुभव, पृ. २१३, ३०२) नियोगीसमितीचा अहवाल तर प्रसिद्धच आहे. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर होय हे समितीने निर्विवादपणे सिद्ध केले आहे. असे असूनही मिशनऱ्यांच्या या राष्ट्रद्रोही धार्मिक आक्रमणाला पायबंद घालण्याची बुद्धी काँग्रेसनेत्यांना होत नाही. आपल्या हाती कायदा नाही म्हणून महात्माजींना वाईट वाटत होते. त्यांच्या अनुयायांच्या हाती तो आहे; पण ते निधर्मी आहेत! हिंदुधर्मीयांखेरीज इतर धर्मीयांना दुखविणे त्यांच्या अहिंसेत, उदात्त विचारसरणीत बसत नाही. युकॅरिस्ट काँग्रेसचे प्रतिनिधी 'हिंदुधर्मीयांचे धर्मांतर करण्याची ही अभूतपूर्व संधी आहे.' अशा घोषणा करीत भारतात आले होते. त्या काँग्रेसला बंदी घालणे तर लांबच राहिले; उलट सर्व भारतसरकारने, हिंदुधर्मश्रेष्ठींपुढे कधी

वाकणार नाहीत इतके वाकून, त्यांचे स्वागत केले. त्या वेळी सरकारने तुरुंगात घातले ते युकॅरिस्ट काँग्रेसला विरोध करणाऱ्या हिंदूंना. राष्ट्रद्रोही मिशनऱ्यांना नव्हे. कारण भारत सरकार निधर्मी आहे! नागालँडमध्ये ब्रिटिश सरकारने हिंदी नागरिकांना प्रवेश करण्यास बंदी घातली होती. तेथे फक्त ख्रिस्ती मिशनऱ्यांना मुक्त संचार होता. आश्चर्याची गोष्ट अशी की स्वातंत्र्यानंतरही भारत सरकारने असेच निर्बंध कायम ठेविले आहेत. भारतीय नागरिकांना नागालँडमध्ये प्रवेश करण्यास आजही बंदी आहे. (किर्लोस्कर जून ६६–ले. पंडित) ख्रिस्ती बॅप्टिस्ट मिशनने गेल्या पन्नास वर्षांत धर्मांतर करून जे राष्ट्रांतर घडविले आहे ते भारतीय नागरिक कदाचित बिघडवितील! धर्मांतरितांची व राष्ट्रद्रोह्यांची जपणूक हे तर निधर्मीपणाचे प्रधान लक्षण!

ध्येयनिष्ठांची संघटना :

भारताचे भवितव्य घडविणारी काँग्रेस ही सर्वांत मोठी शक्ती, तीच अशी अत्यंत अराष्ट्रीय, जातीय व पराकाष्ठेची स्वार्थी व सत्तैकदृष्टी झाल्यामुळे या भूमीत अपुरी राहिलेली धार्मिक व सामाजिक क्रान्ती पुरी करून राष्ट्रनिष्ठा व लोकशाही यांची तत्त्वे अखिल भारतीय समाजात खोलवर रुजविण्याचे कार्य तिच्या हातून होणे कालत्रयी शक्य नाही. या कार्यासाठी ध्येयनिष्ठ समाजसेवकांची एक प्रचंड संघटना उभी करणे अवश्य आहे. आणि काँग्रेसमध्ये ध्येयवाद आज औषधालासुद्धा राहिलेला नाही. नैतिक धैर्य, स्वार्थत्याग, ध्येयवाद या दृष्टीने काँग्रेस व काँग्रेस सरकार आज किती खालच्या पातळीवर गेली आहेत याचे काँग्रेसच्या नेत्यांनीच सविस्तृत वर्णन करून ठेवलेले आहे आणि काँग्रेसच्या योजनांचे मूल्यमापन करणाऱ्या ज्या समित्या त्यांच्या अहवालांची पाने तर यांनीच भरलेली आहेत. राष्ट्राचा उत्कर्ष करण्यासाठी, साम्राज्य संघटित करण्यासाठी व सामाजाचे सामर्थ्य वृद्धिंगत करण्यासाठी ध्येयवाद ही शक्ती अवश्य असते आणि तिचाच काँग्रेसमधून संपूर्ण लोप झाला असल्यामुळे त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी दुसरी तशीच अत्यंत प्रभावी अशी संस्था निर्माण करणे अवश्य आहे. त्या दृष्टीने पाहता विश्वहिंदुपरिषद ही नुकतीच स्थापन झालेली संस्था डोळ्यांपुढे येते. म्हणूनच हिंदुसमाज संघटित करण्यासाठी अशा संस्थेने कोणत्या मार्गाने गेले पाहिजे त्याचे दिग्दर्शन या लेखात करण्याचे ठरविले आहे.

अजूनही अपात्रच :

हिंदुसमाजातील धर्मशास्त्रज्ञांनी गेल्या हजार दीड हजार वर्षे फुटीरवृत्तीचा परिपोष केला आहे. समाजातील एक घटक दुसऱ्यापासून तोडून काढण्यातच सर्व धर्म साठविला आहे, अशी त्यांची कल्पना होती. या समाजातील सर्व जातिवर्णांचे लोक कोणत्याही कारणाने एकत्र येणे ही कल्पनाच त्यांनी अशक्य करून टाकली. परपस्परांत विवाह तर अशक्यच; पण सहभोजन हेसुद्धा पाप ! इतकेच नव्हे तर एका मंदिरात किंवा मठात सर्व हिंदूंनी भजन-कीर्तनासाठी येणे हेसुद्धा निषिद्ध. पण इतकी विघटना करूनही त्या महामूढ धर्मशास्त्रज्ञांचे समाधान झाले नाही. ब्राह्मण-क्षत्रियादि श्रेष्ठवर्णीयांना अस्पृश्यांची सावलीही त्यांनी वर्ज्य केली. यामुळेच हिंदुसमाज हा समाज या पदवीला राहिला नाही व अजूनही तो त्या पदवीला अपात्रच आहे. २० जून ६६ च्या टाइम्समध्ये एक बातमी आहे; अहमदाबादच्या स्वामीनारायणमंदिरात त्या दिवशी सुप्रीम कोर्टाच्या निवाड्याअन्वये अनेक हरिजनांना प्रवेश मिळाला. हरिजनांचा हा दावा १८ वर्षे चालू होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटनेअन्वये हरिजनांना मंदिरप्रवेशाचा हक्क मिळाला असूनही एका मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी त्यांना १८ वर्षे झगडावे लागले. स्पृश्य हिंदुसमाजात अस्पृश्यांविषयी किती जवळीक आहे, आपण सर्व एकधर्मीय आहो, म्हणून आपण संघटित झाले पाहिजे ही भावना त्यांच्यात कितपत रुजली आहे त्याचे हे गमक आहे. अस्पृश्यांनी ही गलिच्छ कामे करण्याचे नाकारले म्हणून त्यांच्या वस्तीवर धाड घालून बायकापोरांना मारहाण करून त्यांच्या घरादारांना स्पृश्य समाजाने आगी लावल्याची उदाहरणे वरचेवर ऐकू येतात. अशा स्थितीत डॉ. आंबेडकरांच्या हजारो अनुयायांनी धर्मांतर केले तसे पुनः पुनः घडत राहिले तर त्यात नवल वाटण्याजोगे काही नाही. आदिवासी लोकांचा प्रश्न असाच आहे. इतके दिवस या जमाती जागृत नव्हत्या. त्यामुळे त्या हिंदुसमाजात कशा तरी राहिल्या. तरी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी या जमातीतच आपले कार्य सुरू करून सहस्र, लक्षसंख्येने त्यांना बाटविले आणि धर्मांतराबरोबर त्यांचे राष्ट्रांतरही घडविले. पाऊणशे वर्षांपूर्वी नागा प्रदेशात एकही मिशनरी नव्हता व एकही माणूस ख्रिस्ती झाला नव्हता. त्या वेळी पाश्चात्यविद्या सर्व भारतात पसरली होती व धर्मक्रान्तीची आवश्यकताही बऱ्याच सुशिक्षितांना पटली होती. त्याच वेळी हिंदूंचे शंकराचार्य, इतर मठाधिपती, किंवा वारकरी, रामदासी,

नाथपंथी, रामानुज, वल्लभ, हे संप्रदाय इ. पंथांतील धर्मधुरीण त्यांच्यांत जाऊन राहिले असते तर ती जमात हिंदुधर्माला पारखी झाली नसती आणि भारताची शत्रू झाली नसती. आज पण या धर्मधुरीणांना त्यांची सावली घेणेही पाप वाटत असे व अजूनही वाटते. त्यामुळे तेथे ते गेले नाहीत; पण येशूचे अनुयायी तेथे गेले आणि त्यांनी हिंदुसमाजाचा एक लचका तोडून भारतापुढे एक बिकट समस्या निर्माण करून ठेवली आहे आणि हिंदुसमाजाचे धुरीण वेळीच जागे झाले नाहीत तर हाच क्रम पुढे चालून अनेक आदिवासी जमाती, हिंदुधर्माला व भारतराष्ट्राला पारख्या होतील. गेल्या जानेवारीत प्रयागला बहुसंख्य हिंदुधर्मधुरीण एकत्र आले होते. त्यांनी हे कार्य शिरावर घेतले पाहिजे. त्यांनी हिंदुसमाजाला वेळीच जागे केले पाहिजे; पण वेळीच जागे करावयाचे म्हणजे काय करावयाचे ? तेच आता सांगांवयाचे आहे.

पुण्याई :

समाज संघटित कशाने होतो व विघटित कशाने होतो याचे विवरण या लेखमालेतील पहिल्या लेखापासून केले आहे. आणि हिंदुसमाज विघटित कसा व का होत गेला हेही विस्ताराने दाखविले आहे. ती विघटनेची कारणे म्हणजेच शेकडो वर्षे समाजमनात दृढपणे खोल रुतून बसलेली निवृत्ती, शब्दप्रामाण्य, जातिभेद, अस्पृश्यता, व्यक्तिगत मोक्षकल्पना, दैववाद, कर्मकांड इ. अधर्मतत्त्वे नष्ट करून राष्ट्रनिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, प्रवृत्तिवाद, प्रयत्नवाद, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, समष्टिधर्म यांचे संस्कार केले तरच हिंदुसमाज संघटित होईल; पण हे काम नुसत्या व्याख्यानाने होणार नाही. व्याख्यात्याच्या शब्दांना काही पुण्याई असेल तरच त्यांचा परिणाम होतो. आज शेकडो तरुण राष्ट्र, विज्ञान, धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र यांचे सम्यक अध्ययन करून आदिवासी, विमोचित (पूर्व गुन्हेगार) जाती, अस्पृश्य, अज्ञ, रूढिग्रस्त, अंध, दीन, दलित, अनाथ यांच्यात जाऊन राहतील, त्यांच्या सुखदुःखांची चिंता वाहतील, खाणे, पिणे, इतर आचार या दृष्टीने त्यांच्याशी एकरूप होऊन जातील तरच त्यांच्या शब्दांना पुण्याई येईल आणि अशा समर्थ वाणीने ते बोलले तरच त्यांना रूढ धर्म नष्ट करून नव्या धर्माचे, राष्ट्रीयतेचे, लोकशाहीचे संस्कार या लोकांच्या मनावर करता येतील आणि यातून संघटित व समर्थ हिंदुसमाज निर्माण होईल.

मिशनरी-आदर्श :

या तरुण हिंदुधर्मप्रवक्त्यांनी मिशनऱ्यांप्रमाणे कार्य केले पाहिजे असे आज ७०-८० वर्षे सांगितले जात आहे. आमच्या सुशिक्षित तरुणांनी मिशनऱ्यांप्रमाणे समाजात जाऊन राहिले पाहिजे, असे टिळक म्हणत असत. त्यानंतरच्या काळात ज्यांनी ज्यांनी हिंदुसमाजाची सेवा करण्याचे व्रत घेतले व त्यासाठी संस्था स्थापन केल्या त्यांनी त्यांनी पाश्चात्य मिशनरी हाच आदर्श मानला आहे. स्वामी विवेकानंदांनी आपल्या संस्थेला 'रामकृष्ण-मिशन' असे नाव दिले. गजाननराव वैद्य यांच्या संस्थेचे नाव 'हिंदु मिशनरी सोसायटी' असे आहे. केरळमध्ये लाखांनी शुद्धी घडवून आणणारी संस्था म्हणजे 'केरळ हिंदुमिशन'. विमोचित जमातींचा उद्धार करण्यासाठी स्थापन झालेली संस्था म्हणजे 'गाडगे-महाराज मिशन'. जयसिंगपूरजवळचे शशिकला सॅनिटोरियम त्यागबुद्धीने चालविणारे डॉ. भिर्डी यांचा गौरव करताना, मिशनरीवृत्तीने ते काम करतात, असे म्हटले जाते. पंढरपूरच्या अनाथ बालकाश्रमाचे ध्येयवादी, थोर संचालक वि. सी जव्हेरे यांचे 'महाराष्ट्राचे मिशनरी' असे वर्णन वृत्तपत्रे करतात. तेव्हा महाराष्ट्राने व भारतानेही त्याग, ध्येयवाद, लोकसेवा, स्वधर्मनिष्ठा यांचा 'मिशनरी' हा आदर्श मानला आहे. ते तसे मानणे हे सयुक्तिकही आहे; पण तो आदर्श ठेवून चालावयाचे तर त्या आदर्शाचे स्वरूप आपण साकल्याने अवलोकिले पाहिजे. अभ्यासिले पाहिजे. त्यावाचून त्याचे सामर्थ्य आपल्या ठायी येणार नाही.

गेली चारशे वर्षे युरोपचा सारखा उत्कर्ष होत आहे. त्याचे श्रेय जितके तिकडील शास्त्रज्ञ, संशोधक, राष्ट्रीय नेते, मुत्सद्दी यांना आहे तितकेच युरोपातील धर्मसुधारक व धर्मक्रान्तीचे प्रणेते यांनाही आहे. चौदाव्या शतकाच्या अखेर-पर्यंत खिस्ती धर्म हा त्या वेळच्या हिंदुधर्मासारखाच अधोगामी होता. जॉन हस्, लूथर, वायक्लिफ इ. धर्मसुधारकांनी त्यांतील निवृत्ती, कर्मकांड, शब्दप्रामाण्य ही जळमटे नष्ट केली म्हणून युरोपचे मत त्या विकृत धर्मातून मुक्त झाले; पण याहीपेक्षा जेसुइट, मेथॉडिस्ट, क्वेकर, साल्व्हेशन आर्मी या पंथांनी जे कार्य केले ते येथे अभिप्रेत आहे. त्या वेळचा समाज अत्यंत विषम होता. आणि समाजातील बहुसंख्य वर्ग दीन, दलित, अनाथ, रंजले-गांजले असेच असत. या पंथांच्या संस्थापकांनी व त्यांच्या हजारो अनुयायांनी या लोकांच्या सेवेचे

व्रत घेतले आणि त्यांच्यात राहून, त्यांच्याशी एकरूप होऊन त्यांच्या मनावर खऱ्या धर्माचे, समतेचे, बुद्धिप्रामाण्याचे संस्कार केले व त्यांना अन्यायाच्या प्रतिकाराचे शिक्षण देऊन, त्यांच्यात चैतन्य निर्माण करून त्यांना पुन्हा जीवनात सुप्रतिष्ठित केले. त्यांच्या जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली व त्यांना राष्ट्राचे खरे नागरिक बनविले. हे कार्य त्यांनी केले नसते तर युरोपची प्रगती झाली नसती, तेथे राष्ट्रवाद, लोकसत्ता यांना यश आले नसते. ज्या देशात बहुसंख्य समाज दीनदलित आहे, दारिद्र्याने गांजलेला आहे, मुकाट्याने अन्याय सहन करतो आहे, अंधरूढींनी ग्रस्त आहे, तेथे कसले राष्ट्र नी कसली लोकसत्ता !

हिंदुस्थानात हिंदुसमाजाची अशी स्थिती आहे. गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांत पालट झाला, परिवर्तन झाले ते अल्पसंख्य सुशिक्षितांत झाले. त्यांनी ते लोण समाजाच्या सीमेपर्यंत पोचविले नाही तर हिंदुसमाज संघटित होणार नाही आणि हे कार्य मिशनरी पद्धतीने केले पाहिजे.

मिशनरी कार्यपद्धती :

लोकसेवेतून धर्मप्रसार हे मिशनऱ्यांचे प्रधान लक्षण आहे. औषध हे वाय-बलचे वाहन आहे, असे मिशनरी म्हणतात. ते जेथे जातात तेथे शाळा व दवाखाने उघडतात, शक्य तर रुग्णालयेही उभी करतात आणि या सेवेमुळे लोकांची त्यांच्यावर भक्ती जडल्यावर ते प्रथम धर्मोपदेश व नंतर धर्मांतर घडवितात. आज शेकडो वर्षे त्यांनी या मार्गाचा अवलंब केला आहे. आता अलीकडे त्यांनी एक नवीन उपक्रम आरंभिला आहे. ते ज्या परगण्यात जातील तेथल्या लोकांच्या योगक्षेमाची, ऐहिक उत्कर्षाची चिंता ते वाहतात आणि त्यासाठी सहकारी तत्त्वावर समित्या स्थापन करून गावच्या लोकांना स्वावलंबी, संघटित व सुखी समाज निर्माण करण्याचा मार्ग दाखवितात. याचा अर्थ असा की, मिशनरी हा त्या गावाचा सर्व दृष्टींनी नेता होतो, कर्णधार होतो. यासाठी केवढी ध्येयनिष्ठा, सेवावृत्ती व त्यागभावना अवश्य आहे याची सहज कल्पना येईल ! हे हिंदूंना शक्य आहे काय ?

मिशनऱ्यांचे मुख्य कार्य म्हणजे धर्मांतर घडवून आणणे हे होय असा आपल्याकडे समज आहे. तो खोटा आहे असे नव्हे; पण स्वदेश व स्वस्ती समाज सोडून ते बाहेर जातात तेव्हा धर्मांतर हे त्यांचे उद्दिष्ट असते; पण ते

स्वसमाजात, ख्रिस्ती देशांत जेव्हा असतात तेव्हा धर्मांतराचा प्रश्न उद्भवतच नाही. वर जे मेथॉडिस्ट, बेकर इ. पंथ सांगितले त्यांनी प्रारंभी स्वदेशातील दलित समाजाची जी सेवा केली तिचे उद्दिष्ट धर्मांतर हे असणे शक्यच नव्हते. अनाथ, निराश्रित, दीन, दरिद्री, परित्यक्त, पतित, गुन्हेगार यांच्यात मिसळून त्यांच्यावर खऱ्या धर्माचे संस्कार करून त्यांना जीवनात पुन्हा सुप्रतिष्ठित करणे हे त्यांचे खरे कार्य होते आणि आहे.

शत्रूची विद्या :

भारतातील मिशनरी हे हिंदुधर्माचे व भारतराष्ट्राचे शत्रू आहेत असे वर एके ठिकाणी सांगितले आहे. ते तसे आहेत याबद्दल शंका नाही; पण येथे आपण प्रामुख्याने विचार करीत आहोत तो स्वसमाजाच्या उद्धारार्थ मिशनऱ्यांनी भिन्नभिन्न ख्रिस्ती धर्मपंथांनी जे अलौकिक कार्य केले त्याचा व विशेषतः त्यांच्या कार्यपद्धतीचा. लो. टिळक, स्वामी विवेकानंद यांनी त्यांचा आदर्श पुढे ठेवण्यास सांगितले ते या दृष्टीने. तरुणपणीच धर्मसेवेची दीक्षा घेऊन, आमरण ब्रह्मचर्य पाळून किंवा संसारातील दारिद्र्य पतकरून, अत्यंत निष्ठेने, प्रसंगी प्राणार्पणाचीही सिद्धता ठेवून अनाथ, अपंग, दीन, दलित यांची सेवा करण्याचे व्रत चालविणे ही सामान्य गोष्ट नाही. भारतात येणारे मिशनरी आपल्याला शत्रुसम असले तरी त्यांच्या या त्यागवृत्तीचा अभ्यास आपण केला पाहिजे. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे इंग्रजांचे पक्के द्वेष्टे, हाडवैरी; पण राष्ट्रनिष्ठा आपण त्यांना गुरू करूनच शिकली पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे. त्याच न्यायाने आपण धर्मसंघटना करताना मिशनऱ्यांना गुरू केले पाहिजे. नागाप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश यांतील गहन अरण्यांत, सर्व अर्वाचीन सुखसोयींचा त्याग करून अगदी रानटी अशा परक्या जमातीत पन्नास पन्नास वर्षे राहून त्यांच्यांत धर्मप्रस'र करणे यासाठी केवढी धर्मनिष्ठा, केवढे राष्ट्रप्रेम, केवढा मनोनिग्रह, केवढी त्यागबुद्धी अवश्य आहे याचा प्रत्येक भारतीयाने विचार केला पाहिजे ! असो. स्वसमाजात मिशनरी कसे कार्य करतात याची काही उदाहरणे देतो म्हणजे ही कल्पना स्पष्ट होईल.

फादर जिमी :

नोव्हास्कोशियामधील कॅनसो या गावी १९२० च्या सुमारास रेव्ह. रॉ. जेम्स टॉमकिन्स–तथा फादर जिमी-हे धर्मगुरू म्हणून गेले व दहा-पंधरा वर्षांत त्यांनी

तेथे क्रान्ती घडवून आणली. हा सर्व गाव कोळ्यांचा असून मच्छीमारी हा त्यांचा धंदा; पण ते सर्व सावकारी पाशांमुळे पिढ्यान् पिढ्या कर्जबाजारी होते. सावकारच व्यापारी होते. ते तेथील कॉड मासा सात पैशाला विकत घेत व शहरात सत्तर पैशाला विकीत. फादर जिमी यांनी वर्षभर कोळ्यांत राहून त्यांना ही सर्व आर्थिक यंत्रणा समजावून दिली आणि प्रथम दोन आणे वर्गणी ठेवून हळूहळू त्यांच्याकरवी सहकारी पेढी स्थापन केली. हळूहळू कोळी कर्जमुक्त झाले. स्वतः शहराशी व्यापार करू लागले व आता कॅनसो गावाचे मोठे संपन्न शहर झाले आहे. फादर जिमी यांनी, सहकारी पेढी स्थापन झाल्यानंतर, धर्मप्रवचनास प्रारंभ केला. प्रारंभी ती प्रवचने स्वावलंबन, सहकार, अन्यायाचा प्रतिकार, इहलोकीचे सुख यांवर होती. 'तुम्ही जडवादी आहात' अशी त्यांच्यावर कोणी टीका केली तर ते उत्तर देत की, 'स्वतः जीजसही रिकाम्या पोटावर प्रवचने करीत नसे.' आज मिशनरी कार्याचा नियमच झाला आहे. आपल्या लोकांच्या योगक्षेमाची ते प्रथम चिंता वाहतात, त्यातून धर्मोपदेश करण्याचा हक्क निर्माण करतात आणि मग धर्मव्याख्यान करतात. सहकारी पेढ्या यशस्वी करण्यास नेता किती निर्लोभ, निःस्पृह व निर्मळ असावा लागतो याची आपल्याला सहज कल्पना येईल. भारतातील सहकारी पेढ्यांचे काय चाललेले आहे, याकडे एकदा नजर टाकल्यास निर्लोभ नेतृत्वाचे महत्त्व सहज ध्यानात येईल. मिशनरी असे नेते आहेत म्हणूनच ते समाजाला सहकार शिकवू शकतात व त्या पायावर धर्मनिष्ठा दृढ करतात. पेरू देशातील अँडीज पर्वताच्या कुशीत पूनो हे ३०–३५ हजार वस्तीचे गाव आहे. तेथे फादर डॅन यांनी याच मार्गाने आर्थिक व धार्मिक क्रान्ती घडविली. 'फादर डॅनस मनी मिरॅकल' म्हणूनच ती प्रसिद्ध आहे. 'जे लोक कर्जात बुडालेले आहेत, ज्यांना भाकरीची चिंता आहे त्यांना उच्च धर्मतत्त्व सांगण्यात अर्थ नाही' असे फादर डॅन नेहमी म्हणत. पूनो गाव अत्यंत दरिद्री होता. झोपडपट्टीतच सर्व लोक राहात. त्यांना सहकाराची कल्पनासुद्धा प्रथम मानवेना. कारण प्रारंभीचे भांडवल तरी कोठून आणावयाचे आणि ते संभाळील असा विश्वासू माणूस कोठून आणावयाचा ? तेथेही आण्या-दोन आण्यांच्या भांडवलापासूनच फादर डॅन यांनी प्रारंभ केला व विश्वस्त ते स्वतः झाले. आज पेरू देशात कमीत कमी दोनशे गावांत अशा पेढ्या स्थापन झाल्या असून ती गावे समृद्ध झाली आहेत. कम्युनिस्टांचा प्रथमपासूनच या सहकार-

चळवळीला विरोध होता. कारण कामगार, शेतकरी, कोळी यांना सुस्थिती प्राप्त झाली तर भांडवलदार, जमीनदार यांच्याविरुद्ध ते भडकत नाहीत ही त्यांना चिंता असते. त्यांनी या सहकारी पेढ्यांत स्वतः शिरून त्या मोडण्याचा प्रयत्न केला; पण तेथे त्यांचा मुखभंग झाला. कारण फादर डॅन यांनी प्रत्येक गावात निर्लोभ नेतृत्व निर्माण केले होते.

युनीस वीव्हर :

डोना युनीस ही ब्राझीलमधील एका खेड्यातील नऊ वर्षांची मुलगी. त्या वेळी महारोग्यांची सर्वांना भयंकर भीती वाटे. रस्त्याने त्यांची माळका भीक मागत जाई तेव्हा रस्त्यावर शिळेपाके अन्न ठेवून लोक भराभर दारे लावून घेत. ती माळका गेल्यावर मग दारे उघडीत. १९१६ साली या नऊ वर्षांच्या मुलीने त्या माळकेत आपल्या शेजारच्या मैत्रिणीला पाहिले आणि तिला जबरदस्त धक्का बसला. त्याच क्षणी महारोगनिवारणार्थ आयुष्य वाहण्याचा तिने संकल्प केला. नवव्या वर्षी ! मोठी झाल्यावर ती मेथॉडिस्ट पंथात शिरली व डॉ. ॲंडरसन वीव्हर या मिशनऱ्याशी तिचा विवाह झाला. नंतर तिने आपल्या कार्याला प्रारंभ केला. तिचे मुख्य धोरण हे की, महारोग्यांच्या मुलांच्यासाठी घरे उभी करून त्यांना आईबापापासून दूर करावयाचे व अशा रीतीने त्या रोगाचा त्यांना संसर्गच होऊ द्यावयाचा नाही. महारोग हा आनुवंशिक रोग नाही हे तिने वैद्यकीय संशोधनाने सिद्ध करून दिले आणि अशा रीतीने महारोग्यांच्या पुढल्या पिढीला बालवयातच मुक्त करण्याची चळवळ सुरू केली. ब्राझीलच्चे अध्यक्ष, प्रांतोप्रांतीचे गव्हर्नर, महिलामंडळे यांच्यापुढे व्याख्याने देऊन युनीस वीव्हर यांनी जागृती केली. हे सर्व लोक पिढ्यान् पिढ्यांचे दैववादी होते. पण सौ. वीव्हर यांनी त्यांच्या ठायी उत्साह निर्माण केला. ते आता त्यांना डायना-मोच म्हणतात. १९३५ साली महारोग्यांच्या मुलांचे पहिले घर उभे झाले. आज ब्राझीलमध्ये तशी १७० घरे आहेत आणि २०,००० मुले त्यांत राहतात. ही मुले त्या किळसवाण्या रोगापासून पूर्ण मुक्त असतात आणि त्यांच्या मुलांतही ही रोगबीजे दिसत नाहीत हे युनीस वीव्हर यांनी सिद्ध करून दिल्यामुळे आता त्या मुलांना समाजात सर्वत्र मुक्त प्रवेश मिळतो. त्यांचे विवाहही समाजात होतात.

गावाचे मातापिता :

कॅनडामधील ब्रिटिश कोलंबिया परगण्यात व्हँकूव्हर नावाचे लहानसे बेट आहे. तेथे बहुसंख्य वस्ती रेड इंडियन लोकांची आहे. डॉ. जॉर्ज डार्बी यांनी टोरँटोला वैद्यकीय पदवी घेतल्यानंतर मेथॉडिस्ट पंथात प्रवेश केला. पंथाने त्यांना या बेटातील बेलाबेला या गावी पाठविले. ही पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्या वेळी व्हँकूव्हरमधील लोक रानटी अवस्थेतच होते. ग्रामीण वैदू हेच तेथले डॉक्टर. औषधे, इंजेक्शने, शस्त्रक्रिया हे सर्व अशुभ, त्यांनी मरीआई कोपते अशी त्यांची श्रद्धा. नव्या डॉक्टराकडून रोगी दगावला तर ते त्याला मारायला उठणार. अशा या परगण्यात पन्नास वर्षांपूर्वी आपल्या तरुण पत्नीला घेऊन डॉ. डार्बी आले व थोड्याच काळात गावाचे मातापिता झाले. बेलाबेला गावचे धर्मगुरू तेच, डॉक्टर तेच, न्यायाधीश, पंच तेच, मित्र, सल्लागार सर्व तेच. या पन्नास वर्षाच्या अवधीत त्यांच्या वैद्यकीय नैपुण्यामुळे त्यांना पाचपट पगारावर अनेक ठिकाणी बोलावणी आली होती; पण ते गेले नाहीत. 'हेच माझे घर, येथेच माझे कार्य' असे ते दर वेळी सांगत. त्यांची स्वतःची मुले मोठी झाल्यावर त्यांच्या शिक्षणासाठी सौ. एडना डार्बी यांना त्यांना घेऊन व्हँकूव्हर शहरी जावे लागले. डॉ. डार्बी यांचे आता वय झाले होते, तरी त्यांनी कुटुंबवियोग पतकरला पण सेवाव्रत सोडले नाही. पन्नास वर्षे तेथे राहून त्यांनी दुष्ट रूढी, अंधश्रद्धा, दारिद्र्य, रोग यांशी लढा केला व तो परगणा सतराव्या शतकातून विसाव्या शतकात आणला.

स्वकीय स्फूर्तिस्थाने :

ही उदाहरणे गेल्या तीस-चाळीस वर्षांतली, पन्नास वर्षांतली आहेत. या सध्याच्या विज्ञानप्रधान जडयुगातही मिशनऱ्यांची धर्मश्रद्धा पूर्वीइतकीच दृढ आहे हे यावरून दिसेल. भारताच्या गेल्या शतकाच्या अखेरच्या नेत्यांपुढे आदर्श होते ते आफ्रिकेत धर्मप्रसारार्थ गेलेले स्टॅनले व लिव्हिंगस्टन, क्वेकर-पंथाचे जॉर्ज फॉक्स, एलिझाबेथ फ्राय, साल्व्हेशन आर्मीचे विल्यम बूथ व त्यांची कन्या इव्हँजेलाइन बूथ, हवाई बेटांतील मोलोकाई येथे महारोग्यांची शुश्रूषा करण्यात आयुष्य घालविणारे फादर डामियन, हिंदुस्थानात आलेले झेव्हियर, स्टीफन्स हे जेसुइट, मद्रास प्रांतात काम करणारे जॉन स्कडर व नुकत्याच

दिवंगत झालेल्या त्यांच्या कन्या इडा स्कडर–यांचे होते. ज्यांना हिंदुसमाज-संघटना करावयाची आहे, त्यांनी या थोर ध्येयवादी मिशनऱ्यांच्या चरित्रांचा अभ्यास अवश्य करावा. गेल्या शतकात पाश्चात्य भौतिक शास्त्रज्ञ व मिल, स्पेन्सर यांसारख्या बुद्धिवादी पंडितांकडून ज्याप्रमाणे आपल्या नेत्यांना स्फूर्ती मिळाली त्याचप्रमाणे आपल्या धर्मसुधारकांनाही पाश्चात्त्य मिशनऱ्यांचे आदर्श पाहूनच कार्याची प्रेरणा झाली व त्यांनी तशी हिंदुसमाजाची सेवा करण्यासाठी संस्था स्थापल्या. पुढे तशा काही संस्थांची माहिती देतो. त्यांचा अभ्यास धर्मसंघट-कांनी अधिकच आस्थेने केला पाहिजे. कारण आपली खरी स्फूर्तिस्थाने ती आहेत. आज भारतात गरज आहे ती तशा संस्थांची व त्यांनी निर्माण केलेल्या त्यागी, ध्येयवादी धर्मप्रवक्त्यांची. मोठीमोठी विद्यालये, आश्रम, मठ स्थापून विश्वहिंदुपरिषदेने बाराबारा वर्षे शिक्षण देऊन, असे लोकांत जन्मभर जाऊन राहणारे धर्मप्रवक्ते तयार केले तरच हिंदुसमाजाची संघटना करण्यात तिला यश येईल.

आर्यसमाज :

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या पद्धतीने हिंदुधर्माचा प्रसार करणारी भारतातील पहिली मोठी संस्था म्हणजे 'आर्यसमाज' ही होय. स्वामी दयानंद सरस्वती हे तिचे संस्थापक होत. स्वामी मूळचे सौराष्ट्रातील असून त्यांनी समाजाची स्थापना १८७५ साली मुंबईस केली; पण समाजाच्या कार्याचा खरा प्रसार झाला तो पंजाबात. स्वामीजी खरे धर्मक्रांतिकारक होते. पूर्वीच्या लेखांतून वर्णिलेली हिंदुधर्मातील घातकी तत्त्वे आणि तज्जन्य दुष्ट रूढी यांचे निर्मूलन करावयाचे असा त्यांचा दृढ निश्चय झाला होता. धार्मिक, सामाजिक, राजकीय व शास्त्रीय बाबतीत हिंदुस्थानची उन्नती घडविणे हाच समाजस्थापनेत त्यांचा हेतू होता. समाज जन्मनिष्ठ जातिभेद वा वर्णभेद आणि अस्पृश्यता मानीत नाही. स्त्री व पुरुष यांचा सामाजिक दर्जा समाजाच्या मते सारखाच आहे. समाजातील सर्व सभासद परस्परांत रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करतात, तसे विवाह घडवून आणण्याचा प्रयत्न असतो. वैयक्तिक मोक्ष हे व्यक्तीचे अंतिम उद्दिष्ट असू नये, समाजसेवा, समाजोत्कर्ष यांतच व्यक्तीचे हित आहे, असे स्वामी सांगत असत. वेद हा एकच धर्मग्रंथ त्यांना मान्य असून उत्तरकाळचे

सर्व धर्मग्रंथ ते त्याज्य मानीत. समाज एकेश्वरी पंथाचा असून मूर्तिपूजेला त्यांचा विरोध आहे. यावरून निवृत्ती, व्यक्तिधर्म, जातिभेद, चातुर्वर्ण्य, अस्पृश्यता हेच खरे हिंदुसमाजाचे रोग आहेत, आणि भारताच्या उन्नतीसाठी त्यांचा नायनाट केला पाहिजे, अशी स्वामींची निश्चिती होती हे स्पष्ट दिसते.

हे कार्य साधण्यासाठी आर्यसमाजाने हरिद्वारला गुरुकुल व लाहोरला दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज अशा दोन संस्था स्थापून तेथे अनेक तरुण धर्मप्रचारकांना शिक्षण दिले व नंतर पंजाब व उत्तर प्रदेश मिळून धर्मप्रसारकार्यासाठी तीनशे शाखा स्थापन केल्या. या सर्व शाखांतून लोकसेवेतून धर्मप्रसार करण्याचे मिशनऱ्यांचे धोरणच अवलंबिलेले होते. अनाथांना आश्रय देणे, त्यांच्या योगक्षेमाची व्यवस्था करणे व त्यांना शिक्षण देऊन समाजात सुप्रतिष्ठित करणे हे कार्य आर्यसमाजाचे 'आर्य' मोठ्या निष्ठेने करतात. पतितांची शुद्धी हे तर समाजाचे अत्यंत महत्त्वाचे कार्य होय. हिंदुधर्मातून पतित झालेल्यांना तर समाज शुद्ध करून घेतोच पण मूळच्या इतर धर्मीच्या लोकांनाही तो हिंदुधर्माची दीक्षा देतो. मलकाना रजपुतांना स्वामी श्रद्धानंदांनी प्रचंड संख्येने शुद्ध करून घेतले म्हणून तर त्यांना प्राणांस मुकावे लागले. अर्थात त्यामुळे समाजाने आपले धोरण सोडले असे नाही. धर्मासाठी आत्मबलिदान करण्यासही तयार असणारे तरुण 'आर्य' हेच तर समाजाचे मुख्य सामर्थ्य आहे. कोणत्याही संस्थेचे, समाजाचे वा राष्ट्राचे हेच खरे सामर्थ्य होय. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश.) त्यावरच त्याचे भवितव्य अवलंबून असते.

रामकृष्ण मिशन :

हिंदुसमाजाच्या पुनर्घटनेसाठी, संघटनेसाठी अशा स्वरूपाचे सामर्थ्य निर्माण करणारी दुसरी मोठी संस्था म्हणजे 'रामकृष्ण मिशन' ही होय. १ मे १८९७ रोजी स्वामी विवेकानंदांनी हिची स्थापना केली. या संस्थेचा हेतू काय, तिचे स्वरूप व कार्यपद्धती काय असावी हे स्वामींनी अमेरिकेत असतानाच आपल्या सहकाऱ्यांना अनेक पत्रे लिहून स्पष्ट केले होते. स्वामींच्या मते हिंदुसमाजाची अस्मिताच नष्ट झालेली आहे. ती पुन्हा उज्जीवित केली पाहिजे; त्याचप्रमाणे या समाजात व्यक्तीला प्रतिष्ठा नाही म्हणून त्याचा अधःपात झाला आहे; असे त्यांचे निश्चित मत होते. ते म्हणतात की, आपला धर्म श्रेष्ठ आहे, पण व्यवहा-

रात तो मुळीच येत नाही. व्यवहारात त्याला अत्यंत विकृत रूप आले आहे. विषमता, शब्दप्रामाण्य, जन्मनिष्ठ जातिभेद, अस्पृश्यता, निवृत्ती ही आपल्या अधःपाताची करणे आहेत. हिंदुसमाजात मानवाचे समूहच्या समूह गुलामगिरीत असल्यामुळे तो मृतवत झाला आहे. तेव्हा आता या समाजाचा उत्कर्ष साधावयाचा असेल तर आपल्या प्राचीन धर्माचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. सर्व समाजाला समता, स्वातंत्र्य, प्रवृत्ती, कर्मयोग यांचे शिक्षण देऊन दीनदलितांचा, अनाथअपंगांचा, उद्धार केला पाहिजे. ज्या समाजात विधवांचे अश्रू पुसले जात नाहीत, भुकेल्यांना अन्न दिले जात नाही, हीनांना उन्नत होण्याला अवसर नाही तो धर्महीन समाज होय. एक जात, एक वेद व सर्व समाजात सौहार्द हे खरे सत्ययुगाचे, धर्माचे लक्षण होय. अशा धर्माचे शिक्षण समाजाला, बहुजनांना देणे हाच भारताच्या उन्नतीचा खरा मार्ग होय. (हिस्टरी ऑफ दि रामकृष्ण मठ अँड मिशन–स्वामी गंभीरानंद, पृ. ७५, १०१-११२).

नवे संन्यासी :

हे शिक्षण देणे हे सामान्य शिक्षकांचे काम नाही. ध्येयवादी, त्यागी, या कार्याला तनमनधन अर्पण करणारे संन्यासीच हे कार्य करू शकतील अशी स्वामींची निश्चिती होती आणि त्यासाठीच त्यांनी 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली. असे तरुण, विद्याविभूषित संन्यासी धर्मप्रवक्ते तयार करून सर्व भारतात व अन्य देशांतही त्यांना पाठवावयाचे, हे मिशनचे मुख्य काम. मात्र हे संन्यासी जुन्या संन्याशांहून अगदी भिन्न असले पाहिजेत. सर्वत्र दारिद्र्य, अज्ञान, अवकळा, गुलामगिरी यांचे थैमान चालू असताना ते जुने संन्यासपंथी लोक समाजाला अध्यात्म, संसाराची असारता, मायावाद यांचा उपदेश करीत हिंडत. स्वामींच्या मते हा केवळ मूर्खपणा होय. रामकृष्ण आश्रमाचे संन्यासी पूर्ण पाश्चात्य वृत्तीचे पण तितकेच हिंदुत्वनिष्ठ असले पाहिजेत, असे स्वामींचे सांगणे होते. खेड्यापाड्यांत जाऊन समाजात मिसळून नकाशे, मॅजिक लँटर्न, ग्रंथ यांच्या साह्याने त्यांनी ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत खऱ्या धर्माचे शिक्षण दिले पाहिजे. म्हणजे हे संन्यासी नव्या क्रान्तीचे नेते झाले पाहिजेत. असे संन्यासी तयार करणे हे रामकृष्ण मिशनचे मुख्य उद्दिष्ट होते.

धर्म आणि समाजसेवा यांचा संबंध आहे, हे गेली हजारो वर्षे हिंदुधर्म-

शास्त्राला मान्य नव्हतेच; पण आश्चर्याची गोष्ट अशी की स्वामी विवेकानंदांच्या सहकाऱ्यांपैकी कित्येकांना हे मान्य नव्हते. धर्म हा मोक्षाचा, वैयक्तिक उन्नतीचा मार्ग होय, दीनदलितांची सेवा, समाजशिक्षण, समाजाची ऐहिक उन्नती, लोकांच्या योगक्षेमाची चिंता हे धर्मात येत नाही, असे त्यांना वाटे. त्यांनी स्वामींशी यावर अनेक वेळा वाद घातले. रामकृष्णांच्या शिकवणीच्या हे विरुद्ध आहे, असे ते म्हणू लागले; पण स्वामींच्या अलौकिक प्रभावामुळे त्यांचे मतपरिवर्तन होऊन त्यांच्या सर्वच्या सर्व म्हणजे सोळा सहकाऱ्यांनी संन्यास-दीक्षा घेऊन मिशनकार्याला प्रारंभ केला.

आज रामकृष्ण मिशनच्या शाखा सर्व भारतभर व अमेरिका, सीलोन, ब्रह्म-देश या अन्य देशांतही पसरल्या आहेत. दिल्ली, प्रयाग, कानपूर, मद्रास, नागपूर, मुंबई, कोइमतूर, म्हैसूर, विजगापट्टम-सर्वत्र आश्रमांचे जाळे विणलेले आहे. प्रत्येक ठिकाणी प्राथमिक शाळा, प्रशाळा, महाशाळा, औद्योगिक, वैद्य-कीय अशी विद्यालये आश्रमाने स्थापलेली आहेत. रुग्णालये बांधलेली आहेत. मुलांसाठी, मुलींसाठी वसतिगृहे काढलेली आहेत. अनाथाश्रम आहेत, सेवाश्रम आहेत. दुष्काळ, पूर, धरणीकंप, साथीचे रोग या आपत्तींच्या वेळी समाजसेवा करण्यासाठी योजना नित्य सिद्ध आहेत आणि यांतून समाजसेवा करून मिशनचे संन्यासी धर्मप्रवचन करीत असतात. वेलूर येथे संस्थेचे मुख्य कार्यालय असून तेथून सर्व कारभाराचे नियंत्रण होते. प्रारंभी मिशनजवळ थोडेच संन्यासी होते, आज साधारण साडेपाचशे आहेत. मिशनच्या सर्व संस्था हे संन्यासी चालवितात.

मिशनची स्थापना केल्यावर स्वामीजी ४–५ वर्षांतच इहलोक सोडून गेले; पण सुदैवाची गोष्ट अशी की, त्यांची परंपरा चालविणारे कर्ते पुरुष मिशनला लाभले. स्वामी ब्रह्मानंद, प्रेमानंद, शारदानंद, अभेदानंद, शिवानंद, अखंडानंद यांनी कार्याची धुरा अंगावर घेतली. आज सत्तर वर्षे स्वामीजींच्या समाजनिष्ठ वेदान्तधर्माचा प्रसार ते भारतभर करीत आहेत.

आर्यसमाज व रामकृष्ण मिशन यांच्यानंतर धर्मजागृतीचे एवढ्या प्रचंड प्रमाणावर कार्य करणारी अखिल भारतव्यापी अशी संस्था निर्माण झाली नाही. पण लहान प्रमाणावर, प्रांतीय पातळीवर, मिशनरी पद्धतीने कार्य करणाऱ्या अनेक संस्था भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांत स्थापन झाल्या असून त्या हिंदु-समाजसंघटनेचे कार्य करीत आहेत. त्यांच्यापैकी काहींची माहिती देऊन शेवटी

या प्रकरणाचा व प्रबंधाचा समारोप करू.

लाखांची शुद्धी :

'केरळ हिंदु मिशन' ही अशीच एक संस्था आहे. जुन्या त्रावणकोर संस्थानात १९३७ साली ही स्थापन झाली. त्रावणकोरचे महाराज व दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांचा तिला पाठिंबा होता. त्यांनी मुक्त हस्ताने मिशनला द्रव्यसाह्य केले. अस्पृश्य, आदिवासी व दलित हिंदुसमाज यांतील हजारो लोकांना खिस्ती मिशनऱ्यांनी बाटविले होते. त्यांना परत स्वधर्मात घेणे हा संस्थेचा मुख्य उद्देश. आजवर दोनतीन लाख लोकांना मिशनने शुद्ध केले आहे. स्वातंत्र्यापूर्वी धर्मांतरावर माणशी एक रुपया कर असे. स्वातंत्र्यानंतर स्वदेशी सरकारने तो आता ११। रु. केला आहे! त्यामुळे मिशनच्या शुद्धि-कार्यात मोठी अडचण निर्माण झाली आहे. तरी मिशनने जोमाने कार्य चालविले आहे. शाळा, देवालये, आयुर्वेदी दवाखाने चालवून धर्मांतराला आळा घाल-ण्याचा मिशनने मोठा प्रयत्न चालविला आहे. सध्या मिशनचे तीनशे पगारी प्रचारक असून सहाशेवर स्वयंकार्यकर्ते आहेत. राजाश्रय संपल्यावर एवढा प्रचंड खर्च चालविणे मिशनला फार जड जात आहे; पण सध्याचे मिशनचे अध्यक्ष आर. वेलायुधन यांनी अत्यंत चिकाटीने कार्य चालविले आहे.

महर्षी शिंदे :

'भारतीय निराश्रित साह्यकारी मंडळी'—'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' या संस्थेच्या नावावरूनच तिचे स्वरूप ध्यानात येईल. महर्षी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे तिचे संस्थापक. अमेरिकेतील युनिटेरियन असोसिएशनचे एक प्रति-निधी रे. डॉ. संडरलंड यांच्या भाषणामुळे प्रथम कर्मवीरांना धर्मसेवेची स्फूर्ती झाली. नंतर प्रार्थनासमाजातील उपासना ऐकून ते संस्कार दृढ झाले व त्या समाजाचे सभासद होऊन धर्मप्रसाराच्या कार्याला वाहून घेण्याचा त्यांनी निश्चय केला. वरील युनिटेरियन असोसिएशनकडून शिष्यवृत्ती मिळवून ते मँचेस्टरच्या कॉलेजमधून धर्मप्रसाराचे शिक्षणही घेऊन आले आणि परत आल्यानंतर प्रार्थना-समाजाच्या साह्याने त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' या संस्थेची १९०६ साली स्थापना केली. मिशनऱ्यांच्या कार्यपद्धतीचा त्यांनी उत्तम अभ्यास केला होता.

त्यामुळे त्याच पद्धतीने त्यांनी आपले कार्य सुरू केले व चालविले. प्रथम त्यांनी मुंबईला परळ येथे अस्पृश्यांसाठी शाळा काढल्यानंतर 'निराश्रित सेवासदन' स्थापून दीन, अस्पृश्य, बेवारशी, अनाथ यांना आश्रय देण्याची सोय केली. पुढे मग दवाखाने, वसतिगृहे, ग्रंथालये यांची स्थापना करून हिंदुसमाजाच्या या विकल अंगाला संस्कृतीच्या कक्षेत आणण्याचे महान कार्य त्यांनी हाती घेतले. महर्षी शिंदे यांना सरकारचे, धनिकांचे व चंदावरकर, भांडारकर यांच्यासारख्या थोर समाजनेत्यांचे चांगले साह्य झाले; पण त्यांना यापेक्षाही मोलाचे साह्य झाले ते त्यांची बहीण व त्यांचे मातापिता यांचे व या कार्याला सर्वस्वी वाहून घेणाऱ्या वामनराव सोहोनींसारख्या तरुणांचे. सर्वस्व वाहणारे लोक हेच खरे राष्ट्राचे बळ होय.

महर्षींच्या भगिनी जनाक्का या आपली शिक्षिकेची नोकरी सोडून त्यांच्याबरोबर अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन राहिल्या. इतकेच नव्हे तर अस्पृश्य, दलित, अनाथ, बेवारशी अशा सर्व मुलांचे त्यांनी अपत्यवत संगोपन केले. या निःस्वार्थी सेवेमुळेच मिशनच्या कार्याला पहिल्यापासून यश आले व मनमाड, इगतपुरी, इंदूर, अकोला, अमरावती, मंगरूळ, मद्रास इ. ठिकाणी मिशनचे आश्रम स्थापन करणे शक्य झाले.

महारवाडा हेच माहेरघर :

हे कार्य करीत असताना अनंत प्रकारच्या अडचणींना या समाजसेवकांना तोंड द्यावे लागले. अशा तऱ्हेची सेवा ख्रिस्ती मिशनरीच फक्त करतात, हिंदू असे कार्य कधीच करणे शक्य नाही, अशी हिंदुसमाजाची खात्री असल्यामुळे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या लोकांना अनेक अस्पृश्यांनी ते ख्रिस्ती आहेत व बाटविण्यासाठी आले आहेत असे समजून, आपल्या घरांतून हाकलून लावले. महार, मांग, चांभार यांच्यांत आपसांतही अस्पृश्यता असल्यामुळे एका जातीला हे सेवक शिवल्यानंतर दुसऱ्या जातीचे लोक त्यांना घरात येऊ देत नसत. मुलीला मुरळी म्हणून सोडण्याची रूढी महारांत आहे. ती रूढी निंद्य आहे, ती नष्ट केली पाहिजे असा प्रचार कर्मवीरांनी सुरू केला व काही मुरळ्यांची लग्नेही लावून दिली; पण यामुळे काही ठिकाणचे महार भयंकर चिडले. हा आपल्या धर्मावर (!) घाला आहे असे त्यांना वाटले व त्यांनी कर्मवीरांना मारण्याचाही

घाट घातला होता. अशाही स्थितीत 'महारवाडा हेच आमचे माहेरघर' असे महर्षी शिंदे म्हणत. प्राचीन-ऋषींची हीच भावना होती. हिंदुसमाजाच्या मनोवृत्तीत कोणती क्रान्ती होणे अवश्य आहे ते विसाव्या शतकातील या ऋषींच्या चरित्रावरून कळून येईल.

कल्याण आश्रम :

याच पद्धतीने कार्य करणारी सध्याची एक मोठी संस्था म्हणजे मध्यप्रदेशातील जशपूरनगर येथील 'कल्याण आश्रम' ही होय. जशपूरनगर हे रायगढ जिल्ह्यात असून रांचीपासून ११० मैलांवर आहे. या भागात सर्वत्र घनदाट जंगले असून त्यांत गोंड, मुंडिया, खैतिया, कोरवा इ. जमातींचे आदिवासी लोक राहतात. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आज पन्नास-साठ वर्षे या प्रदेशात ठाण मांडलेले असून लोकांचे दारिद्र्य, अज्ञान, कर्जबाजारीपणा आणि हिंदुसमाजाची उपेक्षा यांचा फायदा घेऊन त्यांनी आदिवासींना वाटविलेले आहे. हे सर्व हिंदुसमाजाच्या गतशतकांच्या घोर पापांचेच फल आहे; पण त्याचे क्षालन करावे अशी बुद्धी थोडी जागृत झाली असल्यामुळे कल्याण आश्रमासारख्या संस्था निघत आहेत. र. के. देशपांडे हे या आश्रमाचे प्रधान असून मो. ह. केतकर हे संचालक व भीमसेन चोरडा हे मंत्री आहेत. या वन्य प्रदेशात आश्रमाने शाळा, प्रशाळा, महाशाळा काढल्या असून दवाखाने, बँका व छात्रवास यांचीही स्थापना केली आहे. अगदी गरीब आदिवासींना अन्न, वस्त्र, शिक्षण व निवास सर्व मोफत पुरविले जाते. आश्रमाजवळ स्वतःची दोनशे एकर जमीन असून तेथे यांत्रिक पद्धतीने शेती केली जाते व त्या प्रकारचे सर्व शिक्षण आदिवासींना दिले जाते. सर्व शेती तेच करतात. आश्रमाच्या इमारती बांधणे, मंदिरे बांधणे, विहिरी खोदणे ही कामेही आश्रमीय विद्यार्थीच करतात. त्यांच्यापैकी काहींच्या कॉलेजच्या शिक्षणाचीही सोय आश्रमाने केली आहे. ह्या लोकांना भारताचे व नव्या आधुनिक जगाचे दर्शन घडावे म्हणून दिल्ली, काशी, गया, पाटणा या बाजूला सफरीही काढल्या जातात. हिंदुधर्माचे व संस्कृतीचे संस्कार त्यांच्यावर व्हावे म्हणून विजयादशमी, रामनवमी इ. उत्सव केले जातात. दिल्लीला 'अखिल भारतीय आर्य (हिंदु) धर्म सेवा संघ' अशी एक संस्था आहे. आज भारतात सरकारच्या निधर्मी धोरणामुळे विद्यालयांतून धर्मशिक्षण देण्याची सोय काहीच

नाही. ती उणीव भरून निघावी म्हणून या संस्थेने 'धर्मपरीक्षा' नावाच्या परीक्षा ठेविल्या आहेत. या परीक्षांत गीता, तुलसीरामायण, भगवान बुद्ध की वाणी, गुरुगोविंदसिंग की वाणी, जैनसिद्धान्त, मीरा, कबीर, सूरदास यांचे साहित्य यांवर प्रश्नपत्रिका असतात. विशारद, रत्न अशा पदव्याही यशस्वी विद्यार्थ्यांना दिल्या जातात. आजपर्यंत पाच लाख विद्यार्थी या परीक्षांना बसले आहेत. हृषीकेश येथे 'गीतारामायण-परीक्षासमिती' अशी समिती असून ती आज तेहतीस वर्षे हेच कार्य करीत आहे. कल्याणआश्रमातील विद्यार्थ्यांना या परीक्षांना बसविले जाते. मध्यप्रदेश सरकारने, ख्रिस्ती मिशनरी वाममार्गाने धर्मांतर घडवून आणतात, वाटलेल्या लोकांना राष्ट्रद्रोहाचे शिक्षण देतात, नागा-भूमीप्रमाणेच झारखंड ही दुसरी भूमी निर्माण करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत, अशा तऱ्हेचे मिशनऱ्यांवर केले जाणारे जे आरोप त्यांची चौकशी करण्यासाठी 'नियोगी समिती' नेमली होती. तिच्यापुढे वरील आरोप सिद्ध करणारे अनेक पुरावे कल्याण आश्रमाने सादर केले. समितीने आश्रमाचे यासाठी स्वतंत्र पत्र पाठवून आभार मानले आहेत. धर्मो रक्षति रक्षितः। हे आश्रमाचे ब्रीदवाक्य आहे.

मसुराश्रम :

महाराष्ट्रातील मसुराश्रम ही संस्था प्रसिद्धच आहे. धर्मभास्कर मसूरकरमहाराज यांनी ती १९२० साली मसूर येथे स्थापन केली. गोव्यातील दहा हजार गावड्यांना त्यांनी शुद्ध करून स्वधर्मात घेतले तेव्हा ख्रिश्चन मिशनऱ्यांना मोठाच धक्का बसला. कारण त्यांच्या कार्याला हा मोठाच शह होता. तेव्हापासून आजपर्यंत आश्रमाने हजारो लोकांची शुद्धी केली आहे. आश्रमाचा विशेष असा की, शुद्धीनंतर शुद्धीकृतांचे विवाह जमवून आणण्याकडे चालक कटाक्षाने लक्ष देतात. 'जनपद विद्यापीठ' ही आश्रमाची एक अभिनव संस्था आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात आणि मध्यप्रदेश, माळवा या भागांत आश्रम एकेक महिन्याचे हिंदुधर्मशिक्षणवर्ग चालवितो. या वर्गाला येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा जेवणाचा व राहण्याचा खर्च आश्रम करतो. बस्तर संस्थान, छत्तीसगड, सातपुडा, दमण-विभाग येथील वन्य जाती, गोंड, संताळ, कोर्कू, वारली, कोळी या जमाती यांच्यात ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य फार चालते. त्या लोकांत शिक्षणप्रसार करून,

धर्मजागृती करून, प्रसंगी ख्रिस्ती मिशनरी व त्यांचे बाटे हस्तक यांच्या हिंसक आक्रमणाला तोंड देऊनही त्याला आळा घालण्याचे मोठे कार्य आश्रमाने चालविले आहे. मनाचे श्लोक, दासबोध, भक्तिसुधा, गीता इ. धार्मिक ग्रंथांच्या लाखो प्रती काढून आश्रमाने त्या विनामूल्य वाटल्या आहेत. धर्मशिक्षणाचा हा एक मोठा मार्ग आहे. शारीरिक शिक्षणाचे वर्गही आश्रम चालवितो आणि शुद्धिकृतांसाठी मारुतीची मंदिरे स्थापून या मार्गाने हिंदुसंघटना करतो. विनायक-महाराज मसूरकर यांच्या मागे ब्रह्मचारी दत्तमूर्ती यांनी आश्रमाचे काम तितक्याच जोमाने चालविले होते; पण मार्च १९६६ मध्ये ते ब्रह्मीभूत झाले. पण आश्रमाच्या कार्यात खंड पडलेला नाही. ब्रह्मचारी विश्वनाथजी यानी हिंदुसंघटनाचे कार्य मोठ्या धैर्याने व उत्साहाने तसेच चालविले आहे.

वारली पुरोहित :

बोरिवली येथे १९६० साली ' हिंदुधर्मप्रसारक मंडळ ' स्थापन झाले असून ते याच प्रकारचे कार्य करते. ठाणे जिल्ह्यातील डहाणू या गावापासून १० मैलांवर तळसारी हे गाव आहे. त्याच्याजवळ डोंगरपाडा येथे मंडळाने धर्मप्रसाराच्या हेतूनेच आश्रम स्थापिला आहे. ल. र. कुळकर्णी हे या मंडळाचे अध्यक्ष स्वतःच तेथे राहतात. या भागात प्रामुख्याने वारली लोकांची वस्ती आहे. शाळा, दवाखाने, सहकारी पेढ्या, उद्योगकेंद्रे स्थापून त्या समाजाशी एकरूप होऊन कुळकर्णी व त्यांचे सहकारी धर्मप्रसार करतात. शुद्धिकार्यावरही त्यांचा भर आहेच. मधून मधून शंभरदोनशेच्या गटाने ते बाटलेल्या लोकांना स्वधर्मात परत आणतात. ' हिंदुधर्मपरिचय ' या नावाची तीन पुस्तके श्री. कुळकर्णी यांनी लिहिली असून ' रूढ हिंदुधर्म हा धर्म नसून अधर्म आहे ' असे मत त्यांनी मांडले आहे. जातिभेद, चातुर्वर्ण्य त्यांना मुळीच मान्य नाही. तळसारी विभागातील दोन वारली लोकांना याज्ञिकीचे शिक्षण देऊन त्यांनी त्यांना पुरोहित म्हणून मान्यता दिली व संकेश्वर मठाकडूनही त्यांना मान्यता मिळवून दिली. हा अधिकार ब्राह्मणांनाच आहे हे रूढ मत त्यांना अयुक्त वाटते. वारली तरुणांना तो अधिकार देऊन वैदिक समतेचेच त्यांनी पुनरुज्जीवन केले आहे. समाजाच्या उद्धारासाठी केवळ अध्यात्मविचार पुरेसा नाही. दीनदलितांच्या योगक्षेमाचा, अन्नवस्त्राचा प्रथम विचार केला पाहिजे, ही मिशनरी विचारसरणी त्यांना मान्य

असून आश्रमाचे कार्य चालविताना तिचाच त्यांनी अवलंब केला आहे. श्री. कुळकर्णी १९२४ सालापासून हिंदुत्वरक्षणाचे कार्य करीत आहेत. आज त्यांचे वय ७३ वर्षांचे आहे.

समष्टिधर्म—

याच दिशेने, याच मार्गाने, याच मिशनरी पद्धतीने कार्य करणारे एक थोर पुरुष म्हणजे श्रीमंत पाचलेगावकरमहाराज हे होत. महाराजांचे चरित्र व कार्य पाहिले म्हणजे दीनदलितांची सेवा करून त्यांच्यावर धर्मसंस्कार करण्याची जी मिशनरी पद्धती तिचे ते आदर्श आहेत असे वाटते. पाचलेगाव, जि. परभणी, मराठवाडा–निजामशाही येथे १९१२ साली महाराजांचा जन्म झाला. त्यांचे मूळचे नाव नरसिंह राजाराम कुळकर्णी. वाटेल त्या सापाचे विष उतरविणे व भूतबाधा, भानामती, चेटुक, मानसिक रोग, वेडेपण इ. व्याधींपासून लोकांना मुक्त करणे यासाठी आज ते प्रसिद्ध आहेत. ही विद्या त्यांना वयाच्या नवव्या वर्षापासूनच प्राप्त झालेली आहे. वडिलांनी लग्न ठरविल्याचे ऐकून ते त्याच वर्षी घरातून पळाले व तपःसाधना, भारताचा प्रवास यात काही वर्षे घालवून त्यांनी १२–१३ व्या वर्षीच समाजजागृतीच्या कार्यास प्रारंभ केला. प्रारंभी ते मोठमोठे यज्ञ घडवून आणीत. त्यांची मंत्रविद्या, निखाऱ्यांवरून पाय भाजून देता लोकांना चालविण्याची विद्या, त्यांचे निर्भय अमोघ वक्तृत्व व वैराग्यवृत्ती यामुळे लोकांची त्यांच्यावर अपार श्रद्धा बसली व हजारो लोक यज्ञसमारंभाला जमू लागले. याच वेळी महाराज लोकांना समष्टिधर्माचा उपदेश करीत. सध्याचा रूढ धर्म म्हणजे धर्माच्या नावाखाली चाललेला अधर्म आहे, असे त्यांचे मत आहे. प्राचीन हिंदुधर्म हा समष्टिधर्म होता, समाजधर्म होता, तो जाऊन उत्तरकाळात त्याच्या जागी व्यक्तिधर्म आला, त्यामुळे हिंदुस्थानचा अधःपात झाला, अशा तऱ्हेचे प्रतिपादन ते यज्ञप्रसंगीच्या प्रवचनात करीत.

या प्रवचनांतून ते स्वातंत्र्याचा निःसंदेह पुरस्कार करीत व निजामी राज्यावरही कडक टीका करीत. प्रारंभी निजामाने दरमहा ८०० रु. तनखा देऊ करून त्यांना लगाम लावण्याचा प्रयत्न केला; पण महाराजांनी तो झिडकारून लावताच त्याने त्यांना हद्दपार केले. ब्रिटिश हद्दीतही पोलीस त्यांना राहू देईनात म्हणून काही दिवस फ्रेंच नागरिकत्व पतकरून ते पांदेचरीला राहिले होते; पण

नंतर ब्रिटिश हिंदुस्थानचे नागरिकत्व मिळवून ते तेथून परत आले व शुद्धी, संघटन, समाजजागृती, समष्टिधर्माचा प्रचार या कार्याला त्यांनी प्रारंभ केला.

महाराज आदर्श मिशनरी आहेत असे वर म्हटले आहे त्याचा अर्थ असा. मिशनरी वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग करून, लोकांना औषधोपचार करून त्यांचे रोगनिवारण करतात, त्यांना शिक्षण देतात व द्रव्यसाहाय्यही करतात. आणि या पुण्याईच्या बळावर धर्मप्रसार करतात. रोगनिवारणाची विद्या महाराजांच्याजवळ मिशनऱ्यापेक्षां शतपटीने जास्त प्रभावी आहे. त्या पुण्याईवर ग्रामीण भागात आज प्रचंड विधायक कार्य करून ते समष्टिधर्माचा प्रसार करीत आहेत. ते खेड्यांत जातात व श्रमदानमहोत्सव, श्रमदानसप्ताह, कृषिसेवा-यज्ञ, श्रमदान-महायज्ञ असे सहकारी श्रमयज्ञ घडवितात व विहिरी खोदणे, तलाव बांधणे, खते तयार करणे, सडका बांधणे, शाळा उभारणे, हजारो एकर जमीन सहकारी पद्धतीने कसणे, कातळावर तीनतीन फूट मातीचा थर टाकून नवीन जमीन तयार करणे, पडीक जमीन लागवडीस आणणे ही कामे खेडुतांकडून करून घेतात. आज भारताला हेच हवे आहे; पण हे घडविणारी ध्येयवादी माणसे नाहीत. या श्रमदानात सहकाराचे, उद्योगाचे, स्वावलंबनाचे, शास्त्रीय शेतीचे शिक्षण लोकांना मिळते. महाराज सरकारी अनुदाने घेत नाहीत. या श्रमदानात तीस तीस हजार लोक, कधी लाखापर्यंत लोक सहभागी होतात. त्यांच्या जेवणाखाणाची सोय भोवतालच्या परिसरातून खंडोगणती गहू, डाळ, तांदूळ, साखर हे पदार्थ जमवूनच केली जाते. यातून जनतेच्या मनावर जे संस्कार होतात ते फार मोलाचे आहेत. स्मरण या श्रमदानात जातिभेद नाही, अस्पृश्यता नाही, श्रीमंत-गरीब नाही, हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन नाही. श्रमदानात सर्व सामील होतात. अनेक केंद्र-मंत्री व राज्यमंत्री हा श्रमदानयज्ञ पाहावयास येतात. तेही खोरे घमेले घेऊन श्रमदानात सामील होतात. गुलझारीलाल नंदा, पाटसकर यांचे पाठ्या घेतलेले फोटो त्या त्या वेळी प्रसिद्ध झालेलेच आहेत. असे श्रमदानयज्ञ महाराजांनी पंजाब, उत्तर प्रदेश, आंध्र, मद्रास, महाराष्ट्र, कर्नाटक–सर्व प्रदेशांत घडवून आणलेले आहेत आणि हे यज्ञ चालू असतानाच महाराजांची समष्टिधर्माची प्रवचने चालू असतात. 'भारतीय समष्टिधर्म' या नावाने त्यांची प्रवचने प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांवरून त्यांच्या समष्टिधर्माचे स्वरूप पुढीलप्रमाणे दिसते.

महाराज म्हणतात, ज्याने अभ्युदय व निःश्रेयस साधते तोच धर्म

होय. परमार्थापासून प्रापंचिक कर्मे निराळी करणे अशक्य आहे. म्हणून खऱ्या परमार्थिकांनी प्रपंचापासून वा जगापासून अलिप्त राहू नये. परमार्थास अवश्य ते गुण समाजसेवेतूनच निर्माण होत असतात. समाजालाच राष्ट्र ऊर्फ समष्टी म्हणतात. राष्ट्र नसते तर परमार्थपोषक गुण जन्मालाच येते ना, हे पारमार्थिकांनी कधीही विसरू नये. (भारतीय समष्टिधर्म, पृ. २४-२५) तेव्हा उच्चतम मानवी कल्याण हाच खरा धर्म होय. असा हा आमचा समष्टिधर्म बुद्धिनियंत्रित श्रद्धावादी व तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी आहे. हा धर्म पोथीनिष्ठ नाही. तत्त्वनिष्ठ पोथीवादी आहे. खरा धर्म व पोथी यांत विरोध आल्यास आम्ही पोथी फाडून टाकल्यावाचून राहणार नाही. (पृ. १८)

जडाचा अतिरेक जसा वर्ज्य तसा अध्यात्माचाही अतिरेक आम्ही वर्ज्य मानतो. भौतिक शोधांचे आम्ही स्वागत करतो व त्या संशोधकांना भगवद्भक्तच मानतो. आम्हांस विज्ञानवादाचा संपूर्ण पुरस्कार करावयाचा आहे व समाजहितकारी नीतितत्त्वांचे समर्थन करावयाचे आहे. त्याचप्रमाणे धर्माच्या नावाखाली चाललेल्या पोथीनिष्ठ, अज्ञाननिष्ठ विषमतेचे निर्मूलन करावयाचे आहे. (पृ. १५३)

आमच्या धर्मात, 'अवघे सम ब्रह्म पाहे, सर्वांभूती विठ्ठल आहे' अशी मानवी समतेची उदात्त तत्त्वे आहेत. पण या तत्त्वांचा आचार प्रत्यक्षात करावयाचा नसतो, असे रूढिवादी म्हणतात. ही चलाखीने काढलेली पळवाट आहे. ही समाजघातक प्रवृत्ती रूढींनी निर्माण केली आणि मदांध सत्ताधाऱ्यांनी तिला उचलून धरले. (पृ. १०१) वास्तविक नैसर्गिक व ईश्वरी कायदे सर्वांकरता समान आहेत. तेथे विषमता असलीच तर ती गुणभिन्नत्वाने असू शकते. पण गुणविकसनाचा अधिकार व संधी सर्वांना समान मिळावी असाच ईश्वरी हेतू आहे.

पाचलेगावकरमहाराजांच्या समष्टिधर्माचे स्वरूप हे असे आहे. हा धर्म ते जन्मभर प्रत्यक्ष आचरणात आणीत आहेत. मिशनरी जसे दीन, दलित, अनाथ, परित्यक्त, रंजले, गांजले यांच्या जीवनांशी एकरूप होतात तसेच महाराजही भारतातील दीनदलितांशी एकरूप होतात. त्यांच्यांत राहतात, त्यांचेच अन्न खातात, श्रीमंत, श्रेष्ठवर्णीय यांना श्रमदानात सहभागी करून, किंवा महार, मांग, चांभार, भंगी, मराठे, ब्राह्मण अशा सर्व जातींच्या विद्यार्थ्यांसाठी एकत्र वसतिगृहे बांधून त्यांना दलितांशी एकरूप करण्याचा प्रयत्न करतात आणि अशा रीतीने भारताला अत्यंत अवश्य असलेल्या समष्टिधर्माची तत्त्वे प्रत्यक्ष आचाराने

जनतेत रुजविण्याचे महान कार्य करतात.

विमोचित जमाती :

'श्रीगाडगेमहाराज मिशन'चे कार्य याच पद्धतीने चालू आहे. हे मिशन विमोचित जमातींच्या उद्धाराचे कार्य करते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मांगगारुडी, कंकाडी, वंजार, रामोशी, भामटा या जातींना गुन्हेगार ठरवून कैदखान्यासारख्या वसाहतींत त्यांना डांबून ठाकले होते. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने त्यांना मुक्त केले व त्यांच्या उन्नतीसाठी नानाविध योजना आखल्या. गाडगेमहाराज मिशन सरकारच्या साह्याने हेच कार्य करते. माण भागातील एक समाजसेवक यशवंतराव कृष्णराव माने यांनी गोंदवले येथे या जमातीसाठी प्रथम शाळा काढली. सातारा, ओतूर, राहुरी येथेही अशाच शाळा आहेत. या सर्व गुरुकुलपद्धतीने चालतात. त्यांना आश्रमशाळाच म्हणतात. तेथे अन्न, वस्त्र व शिक्षण मोफत पुरविले जाते.

धर्मनिर्णय मंडळ :

लोणावळ्याचे 'धर्मनिर्णय मंडळ' याचे या क्षेत्रात विशेष महत्त्व आहे. त्याला एक स्वतंत्र स्थान आहे. गेली हजार वर्षे रूढ असलेले जे अधोगामी धर्मशास्त्र त्याची वेद, उपनिषदे, सूत्रग्रंथ, महाभारत, रामायण, स्मृती यांच्या आधारे चर्चा करून मंडळाने तो रूढधर्म कसा त्याज्य आहे आणि हिंदुधर्माचे सत्यस्वरूप काय आहे हे समाजाला दाखवून फार मोठे कार्य केले आहे. म. म. काणे, म. म. श्रीधरशास्त्री पाठक, विद्वद्रत्न दप्तरी, वे. महादेवशास्त्री दिवेकर यांसारख्या थोर धर्मनिष्ठ पंडितांनी हे स्थापन केले असल्यामुळे मंडळाच्या या क्षेत्रातल्या अधिकाराबद्दल वाद होणे शक्य नाही. हे अर्वाचीनकाळचे ऋषीच होत. इ. स. १९३४ साली हे मंडळ स्थापन झाले तेव्हा 'तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद्' असे त्याचे नाव होते. १९३८ साली 'धर्मनिर्णय मंडळ' असे नामांतर करण्यात आले. मंडळ बुद्धिवादी व परिवर्तनवादी असून जातीय ऐक्य, मिश्रविवाह, अस्पृश्यतानिवारण, यांचा ते पुरस्कार करते आणि सर्व हिंदूंना जातिपंथनिरपेक्ष वैदिक संस्कार करून समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे हे सध्याचे मंडळाचे कार्यवाह असून

ते सर्वत्र दौरे काढून मंडळाचे उद्दिष्ट साधीत असतात.

याशिवाय हिंदुमिशनरी सोसायटी, श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम, मुंबई; पंढरपूर अनाथबालकाश्रम, अनाथ महिलाश्रम-पुणे, गुरुदेवसेवा मंडळ, आदिवासी समाजसुधार सभा, छोटानागपूर; विदर्भ महारोगी सेवामंडळ, तपोवन अमरावती; कर्मवीर बाबासाहेब आमटे यांची कुष्ठरोगवसाहत, आनंदवन, वरोरा; अशा अनेक संस्था हिंदुसमाजातील अनाथअपंगांची, दीनदलितांची सेवा करून हिंदुधर्माच्या मूलतत्त्वांचा आचार करीत आहेत. स्थलाभावी त्यांची सविस्तर माहिती येथे देता येत नाही.

तुलनेने पाहता :

आदिवासी, अस्पृश्य, उपेक्षित, बहिष्कृत, परित्यक्त, अनाथ, अपंग, पतित, दीन, दलित यांच्या उद्धारार्थ काम करीत असलेल्या या संस्थांचे कार्य पाहून मनाला समाधान वाटते. त्यावरून एक गोष्ट निश्चित दिसते की, या हिंदुसमाजाचा मोहरा आता फिरला आहे. गेल्या हजार वर्षांतील समाजघातकी रूढी, धर्मशास्त्रकारांनी रूढविलेला तो अधर्म, नष्ट करून, विघटनापोटक सर्व तत्त्वांचे निर्मूलन करून हा समाज संघटित व बलशाली करण्याच्या मार्गास तो लागला आहे आणि कोणत्या मार्गाने जावयाचे हे त्याने निश्चित केले आहे, याविषयी शंका राहात नाही. पण ३०–४० कोटींचा हा समाज पहाता हे प्रयत्न, हा उद्योग अगदी अल्प, अत्यल्प आहे हे आपण ध्यानी घेतले पाहिजे. मुस्लीम मुल्ला-मौलवी, खिश्चन मिशनरी यांच्या तुलनेने पाहता हे प्रयत्न नसल्यासारखेच वाटतात. त्यांच्या त्या उद्योगाच्या मागे प्रचंड संघटना उभ्या आहेत आणि अक्षय असा निधी आहे. त्यांशी सामना देऊन हिंदुसमाजाचे संरक्षण व संवर्धन करावयाचे तर वर सांगितल्या तशांपैकी एकदोनदुकट्या संस्थेला ते अशक्य आहे. त्यासाठी अखिल भारतव्यापी अशी एक प्रचंड संस्थाच उभी केली पाहिजे आणि हे मनात येताच विश्वहिंदुपरिषदेचे नाव पुढे येते.

वर उल्लेखिलेल्या संस्थांची वृत्ते वाचताना एक गोष्ट ध्यानात येते की, या अनेक संस्थांत एकसूत्रीकरण नाही. त्यांचा एकमेकींशी काही संबंध नाही. त्यामुळे संस्था अनेक असून त्या एकाकीच आहेत. त्यांचे बल संघटित झाले तर त्या यापेक्षा दसपट कार्य सहज करू शकतील; पण अखिल भारतीय स्वरू-

पाची एखादी महासंस्था स्थापिल्यावाचून हे बल संघटित होणार नाही.

परंपरा नाही :

पण या संस्थांतील सर्वांत मोठे दौर्बल्य म्हणजे त्यांच्या परंपरा निर्माण होत नाहीत. हिंदुधर्मप्रसारक मंडळाचे ठाणे जिल्ह्यातील तळसारी येथे काम करणारे ल. र. कुळकर्णी यांनी एका पत्रात म्हटले आहे की, 'मला हार्टफेल झाल्यावर पुढे काय होईल याची चिंता वाटते.' हा प्रश्न एकट्या कुलकर्ण्यांच्या पुढे नसून अखिल भारतापुढचा आणि गेल्या हजार वर्षांचा तो प्रश्न आहे. 'नेहरूंनंतर कोण?' या स्वरूपात तो नुकताच पुन्हा सर्वांच्या मुखी झाला होता आणि नेहमीप्रमाणेच तो अनुत्तरितच राहिला आहे. समर्थ रामदासस्वामी गेले म्हणजे त्यांचे मठ चालू राहतात; पण त्यांना वारस निर्माण होत नाही. ते सामर्थ्यच या भूमीत नाही. पाश्चात्य देशांत परंपरा निर्माण करण्याचे सामर्थ्य प्रत्येक राष्ट्रात, प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. विज्ञानसंशोधन, वैद्यकीय संशोधन, कारखानदारी, व्यापार, भूसंशोधन, लोकशाहीचे नेतृत्व, राजकीय मुत्सद्देगिरी, प्रशासन इ. सर्व क्षेत्रांत लिंकननंतर कोण, चर्चिलनंतर कोण, फोर्डनंतर कोण, एडिसन गेल्यावर काय हा प्रश्न तेथे निर्माण होत नाही. मिशनऱ्यांच्या परंपरा तर शेकडो वर्षे सतत चालतात; हेच त्या देशाचे बळ आहे. पण हे आपोआप निर्माण होत नाही. शाळा, प्रशाळा, महाशाळा यातून तसे संस्कार अहोरात्र, वर्षानुवर्ष केले जातात. पुण्यात 'स्यायसर' व 'डी नोबिली' अशा दोन ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या महाशाळा आहेत. त्यांतून बाराबारा वर्षे धर्मप्रवक्त्यांना शिक्षण दिले जाते आणि आमरण सेवेचे व ब्रह्मचर्याचे व्रत घेऊन तेथून अनेक मिशनरी दरसाल बाहेर पडतात आणि संस्था जगाच्या ज्या भागात पाठवील तेथे जाऊन तेथील दीनदलितांत मिसळून, त्यांच्या भाषा शिकून, त्यांशी एकरूप होऊन ख्रिस्ताचा संदेश त्यांच्यांत प्रसृत करतात. अमेरिकेतील 'समर इन्स्टिट्यूट ऑफ लिंग्विस्टिक्स' ही संस्था ख्रिस्ती धर्माच्या प्रसारार्थच स्थापन झाली आहे. आफ्रिकेतील प्रचंड गहन अरण्ये, पेरू, ब्राझील या देशांतील जंगले यांत अजून लिहितावाचता न येणारे कमीत कमी ७० कोटी लोक आहेत. ते एकंदर दोन हजार भाषा बोलतात. त्यांच्यात धर्मप्रसार करणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी या रानटी जमातींच्या भाषा लिपिबद्ध कराण्याचे शास्त्र इन्स्टिट्यूटचे संस्थापक

विल्यम कॅमेरॉन टाऊनसेंड, अंकल कॅम, यांनी सिद्ध केले आहे. ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया येथे संस्थेच्या शाखा आहेत. त्यांतून दरसाल पाचशे तरुणांना त्या शास्त्राचे शिक्षण दिले जाते. शिवाय नदीनाले पार होणे, टहाळे, गवत यांच्या झोपड्या बांधून त्यात रहाणे, होडगी तयार करणे, हिंस्रपशू, महासर्प यांपासून स्वसंरक्षण करणे, साथीच्या रोगांवर उपचार करणे, जंगलांतून मार्ग काढणे यांचेही शिक्षण त्यांना दिले जाते. कारण महारण्यात वन्य जमातींच्या सान्निध्यातच त्यांना राहावयाचे असते. असे शिक्षण घेऊन दरसाल पाचशे तरुण स्त्रीपुरुष बाहेर पडतात व वर निर्देशिलेल्या घनारण्यात जाऊन जन्मभर धर्मप्रसाराचे कार्य करितात. मिशनऱ्यांच्या कार्यामागे अशा त्यागी, ध्येयनिष्ठ, धर्मनिष्ठ तरुणांची पुण्याई उभी आहे. तेच त्यांचे खरे बळ, खरे सामर्थ्य आहे. हे बळ हिंदुसमाजाला निर्माण करता येईल काय, हा आजचा प्रश्न आहे. आर्यसमाज, रामकृष्ण मिशन, यांनी हे बळ काही प्रमाणात निर्माण केले आहे; पण वर सांगितल्याप्रमाणे ते अत्यल्प आहे, फार अपुरे आहे. सिंधूमध्ये एक मधुबिंदू इतकेच त्याचे प्रमाण आहे.

पुन्हा तोच प्रश्न :

आज भारतात सर्व क्षेत्रांत पाहता आपले कर्तृत्व शून्यावर येऊन ठेपले आहे असे दिसते. आपल्या पंचवार्षिक योजना इष्ट फल देत नाहीत, कारखानदारी बुडीतखात्यात आहे, राजकीय मुत्सद्देगिरीच्या नावाने दिवाळे वाजले आहे, सर्वांना पुरेसे अन्न आपण निर्माण करू शकत नाही, विद्यालये, विद्यापीठे यांचा शिक्षणाचा दर्जा अत्यंत खालावला आहे, आपल्या चलनाला स्थैर्य नाही, आपल्या नगरपालिका, महापालिका यांची कार्यक्षमता प्रसिद्धच आहे. सहकारी संस्था म्हणजे त्या शब्दाची विटंबनाच आहे, आपल्या पोलिसांना चोरटी आयात थांबविता येत नाही, खेड्यांत गुंडांचे राज्य प्रस्थापित होत आहे, तेथे त्यांचा कोणी प्रतिकार करू शकत नाही. आपल्याला आगगाड्या चालविता येत नाहीत, आपल्या इमारती बांधकाम पुरे होण्याच्या आधीच पडू लागतात, वीजपुरवठ्याची यंत्रणा आपल्याला साधत नाही, सीमाप्रश्न, पाणीवाटपाचा प्रश्न, कारखाने उभारण्याचा प्रश्न असे अंतर्गत प्रश्न रक्तपातावाचून आपल्याला सोडविता येत नाहीत आणि शेवटी आक्रमकांशी मुकाबला करून गेलेला प्रदेश सोडविण्यात

आपल्याला काडीमात्र यश येत नाही. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्याचे रक्षण आपल्याला करता येईल की नाही हा पूर्वीचाच प्रश्न पुन्हा उभा राहिला आहे.


याचे कारण हे की येथे लोकशाही प्रस्थापित झाली; पण तिचा भार पेलण्यास येथे 'लोक' अजून निर्माण झालेले नाहीत. येथला बहुजनसमाज, आपली कोट्यवधी जनता अजून जुन्या युगात आहे. राष्ट्र, विज्ञान, व्यक्तिस्वातंत्र्य, समाजहितबुद्धी, राजकीय प्रबुद्धता यांचे संस्कार तिच्यावर अजून झालेले नाहीत. हे झाले नाहीत तोपर्यंत या जनतेतून 'लोक' निर्माण होणार नाहीत. आज जनतेत राजकीय प्रबुद्धता आली आहे; पण ती फक्त एकाच दृष्टीने. तिला सर्वत्र निवडून यावयाचे आहे. समाजसेवा या धर्माची तिला ओळखच नाही. सर्व भारतात प्रत्येक नागरिकाचे आज एकच ध्येय आहे. निवडून येणे! त्यामुळे हा सर्व समाज भ्रष्ट, चारित्र्यहीन झाला आहे. त्याग, सेवा, निष्ठा हे लांब राहिले, या समाजातून प्राथमिक कर्तव्यबुद्धीचाही लोप झाला आहे. अशा स्थितीत या समाजाचा प्रपंच यशस्वी होणार कसा?

हिंदुसमाजाचे भवितव्य :

तेव्हा भारतीय समाजातून लोक निर्माण करणे हे आज पहिले कार्य आहे. त्यासाठी वर सांगितलेल्या निष्ठांचे संस्कार भारतातील जनतेवर करणे अवश्य आहे आणि त्यासाठी लक्षलक्ष त्यागी, ध्येयवादी तरुणांची संघटना भारतात उभी झाली पाहिजे. स्वामी विवेकानंद नेहमी म्हणत, 'मला एक हजार तरुण संन्यासी मिळाले तर मी भारतात क्रांती करीन.' आज तेवढ्यानेही भागणार नाही. लक्षसंख्येने असे तरुण एकत्र येणे अवश्य आहे. पाश्चात्य तरुणांची त्यांच्या धर्मावर असीम निष्ठा आहे म्हणून महारण्यात, जंगलात, पहाडात, दऱ्याखोऱ्यांत ते जन्मभर जाऊन राहतात व सर्व आयुष्य जनतेच्या सेवेत घालवितात. हिंदुसमाजाला अशा निष्ठेने संपन्न असे लक्षावधी तरुण निर्माण करता आले तरच आपल्याला, लोकशाहीला, राष्ट्रसंरक्षणाला व धर्मरक्षणाला पुरेसे सामर्थ्य व कर्तृत्व प्राप्त करून घेता येईल. एरवी या समाजाला कसलेही भवितव्य नाही!

जिवंतपणाची कसोटी

विश्वहिंदुपरिषद हे कार्य शिरावर घेईल काय? वर सांगितलेल्या अंकल कॅमसारखा एक मनुष्य पाचशेपाचशे तरुण दरसाल तयार करू शकतो. मेथॉडिस्ट, बॅप्टिस्ट, क्वेकर, साल्व्हेशन आर्मी अशा प्रत्येक मिशनला असे ध्येयवादी, वाहून घेणारे शेकडो लोक मिळतात. विश्वहिंदुपरिषद अखिल हिंदूंची संस्था आहे. संख्येच्याच दृष्टीने पाहिले तर यात अशक्य असे काहीच नाही; पण गुणांच्या, निष्ठेच्या, ध्येयवादाच्या दृष्टीने? रामायणकाळात उत्तरेतून दक्षिणेकडे भारद्वाज, अत्री, अगस्त्य असे अनेक तरुण गेले व तेथे महारण्यात आश्रम बांधून राहिले आणि राक्षस, दस्यू, दैत्य अशा रानटांच्या हल्ल्यांना तोंड देऊन त्यांनी विंध्याच्या दक्षिणेची सर्व जनता आर्यसंस्कृतीच्या कक्षेत आणली. ऐतिहासिक काळात बौद्धभिक्षू या भूमीतून लंका, ब्रह्मदेश, चीन, जपान या देशांत गेले व तेथे त्यांनी प्रचंड मानवसमूहांना आपल्या धर्माची दीक्षा दिली. शालिवाहन शकाच्या पहिल्या दहा शतकांत जावा, सुमात्रा, बोर्निओ, सयाम, मलाया या पूर्वेकडच्या प्रदेशात कौंडिण्यासारखे भारतीय पुरुष गेले आणि त्यांनी रामायण-महाभारत संस्कृतीत तेथला समाज समाविष्ट केला. आजचा प्रश्न त्या मानाने सोपा आहे. आपल्याला कोठे परदेशात जावयाचे नाही. दळवळणाची साधने विपुल आहेत. एक शतकभर राष्ट्र, विज्ञान, बुद्धिवाद यांच्या लहरी तरी पूर्वसूरींच्या कृपेने भारतभर प्रसृत झालेल्या आहेत. म्हणजे भूमी तयार आहे. आता सेवेच्या, धर्मनिष्ठेच्या बळावर हे नवे संस्कार बहुजनांत रुजविण्याचे कार्य शिल्लक आहे. यासाठीच त्या समाजात राहून त्याशी एकरूप होऊन ही धर्मक्रान्ती घडविणारे लक्षावधी तरुण हवे आहेत. विश्वहिंदुपरिषदेचे हे कार्य आहे असे मला वाटते. हिंदुसमाज जिवंत असला तर असे कार्यकर्ते मिळणे अवघड नाही. तसा तो आहे की नाही हेच आता ठरावयाचे आहे.



विषय-सूची

आर्य–५. शब्द वंशवाचक नाही. ६. संस्कृतिवाचक ७. शकहूणांचे आर्यीकरण ९, १०, १७, ४४, ४८. आर्य मिशनरी. ११, २५७. यज्ञसंस्था १२, ३०. असुर, राक्षस, नाग हे आर्यांत समाविष्ट ८, ९, १०, १५. संस्कृत-भाषा १२–१४, २१, २३, २४. संग्राहकबुद्धी २०. आपपरभाव २८.

इंग्रज (ब्रिटिश)–उदय १५८, १६०. त्यांची राष्ट्रनिष्ठा १६९. भौतिक-विद्या २११. शीख आणि इंग्रज २०५. त्यांचा जगद्विजय २१४. इंग्रज पंडित, मुत्सद्दी यांचे हिंदूंविषयी मत २१७. इंग्रजी सत्तेचे स्वरूप २२४, २२५.

गुप्तसम्राट–चंद्रगुप्त २ रा, समुद्रगुप्त ४४. हूणविजेता स्कंदगुप्त ४५, ४८.

चंद्रगुप्त मौर्य–स्वातंत्र्ययुद्धातील नेता ४०. सम्राट ४१.

चाणक्य–हिमवत् समुद्रान्तरम् ३१. परक्यांच्या द्वेष ४०. चाणक्य नीती १३३.

चातुर्वर्ण्य–प्राचीन काळी नाही ६०. गुणनिष्ठ वर्ण ५९–६१. प्राचीन वर्णसंकर ११, ५५, ६२. व्यवसायसंकर ६५. तो हितावह ९०. अनुलोम, प्रतिलोम ९, ६३, ६४, ६५, ८४. जन्मनिष्ठ ७७, ७८, ८०. यांत उन्नतीला अवसर नाही १०८.

चार वर्ण-ब्राह्मण–प्राचीन वैभव-आर्यसंस्कृतीचा प्रसार १२. फिलॉसफरस् ३८. राष्ट्रासाठी बलिदान ३९. प्राचीन लक्षण-वेदाध्ययन, सदाचार ६१. जन्मावरून ब्राह्मण्य ७८–७९. अतिरेकी स्तुती ७८. शासनमुक्त ८२, ८३. त्यांचे शूद्रत्व ८४. श्रेष्ठत्व समर्थन-हरदास ८९. **क्षत्रिय**–प्राचीन लक्षण ६१. ब्रह्मवेत्ते ६६, ६७. कलियुगात अभाव ८५. जन्मनिष्ठ क्षत्रियत्व १०१, १०२. चातुर्वर्ण्यसंरक्षक १०१. पुनरुत्थानाचे सामर्थ्य नाही १०९. क्षात्रधर्म ११८. नादान राजे १२३. **वैश्य**–राजे १०१. गुप्तसम्राट वैश्य ६४. प्राचीन लक्षण ६१. **शूद्र**–९, १५, ५५, ६२. त्यांची प्रतिष्ठा ६७, ६८. अन्नपान व्यवहार ६९. धर्मांतर-प्रवृत्ती ७७. अन्याय ८३. राज्यकर्ते शूद्र ९०. सर्वच शूद्र ८४. लहरी शास्त्र ८६. हिंदूंची असहिष्णुता ८८. धर्मवेत्ते शूद्र ९०. धर्मशास्त्राने केलेली हत्या ९१. **अस्पृश्य**–हिंदुधर्मत्याग ७७. अस्पृश्यता पूर्वकाळी नव्हती ९१. ती अशास्त्रीय ९२. अस्पृश्यांची सार्थ

भीती २२६. डॉ. आंबेडकरांचे लढे २२६. ख्रिस्ती धर्मातही अस्पृश्यता २३०. आर्यसमाज मानीत नाही २४०. डिप्रेस्ड क्लासेस मिशन-शिंदे २४४, ४५. अस्पृश्यसमाजातील अस्पृश्यता २४५.

जातिभेद – उत्पत्ती ९४, ९५. यामुळे परदेशगमन बंद १०१. मराठ्यांच्या अपयशाचे कारण १७०, १७१, १७२. शीख आणि जातिभेद १८०, २०९. संत आणि जातिभेद १८०.

नवभारत (१८३०–१९६५) स्वत्वशून्य समाज २१६, २१७. पाश्चात्त्य पंडितांचे अभिप्राय २१७. पाश्चात्त्यविद्या २१४, २२१, २२४. राष्ट्रीयता २१४, २२१, २२३, २२५. लोकशाही २१४, २२१. विज्ञाननिष्ठा २१४, २२३. भारतातील **सर्वांगीण क्रान्ती** – राममोहन राय २१८. न्या. मू. रानडे २१९. दयानंदसरस्वती २१९–२०. आर्यसमाज २४१-४२. विवेकानंद २२०. रामकृष्ण-मिशन २४२-४३. महर्षी शिंदे २४४-४५. कल्याणाश्रम २४६. मसुराश्रम २४७. पाचलेगावकरमहाराज २४९-५२. सुधारक व त्यांच्या संस्था २२१. **स्वातंत्र्यलढा**–महर्षी दादाभाई २२५. लो. टिळक २१५, २२१–२२, २२४–२५. म. गांधी २२१, २२३. स्वा. सावरकर २२५. सत्ताधारी काँग्रेसपक्ष २२७. विष हेच पौष्टिक २२७. काँग्रेस व मुस्लीम २२८–२९. ध्येयवादाचा लोप २३१. निधर्मी धोरण २४६. वैयक्तिक धर्म २२८, २४३. उच्चार व आचार २२९, २५१. विघटनेची कारणे २३३, २४०–४१. संघटनेचे मार्ग २३३, २४२, २५०, २५४. कार्यकर्त्यांची परंपरा नाही २५४. 'लोक' नाहीत २५६. जिवंतपणाची कसोटी २५७.

पुराणे – त्यांची संघटक दृष्टी १८, १९, २१, २२. त्यांची विघटक दृष्टी ९६, ९७.

प्राजके – प्राचीन भारतातील ३५. त्यांची राष्ट्रनिष्ठा ३६, ३९. समता ६९-७२.

बौद्ध – १७, ४२. अहिंसा, विघटना, दौर्बल्य ४२. अशोक ४२. कनिष्क ४४. लोप ४७.

मराठे – भव्य आकांक्षा, भव्य यश १४०. **श्रीशिवछत्रपती** – हिंदवीस्वराज्य १४०, १५३. धर्मक्रान्ती १४४-४६, १६४. रूढ धर्माचा उच्छेद १४६. राष्ट्रनिर्माता १४७. तुर्कसेवा हा अधर्म १६५. महाराष्ट्रधर्म १६८. **समर्थ रामदास**-प्रवृत्तिधर्म, शक्ती, प्रयत्नवाद, साक्षेप, भौतिक दृष्टी १४७-४८. लोक-

शक्ती १४८-४९. मराठा तितुका मेळवावा १६८. शिष्यपरंपरा नाही १६४. हिंदूवृत्तीवर टीका १६६. **छत्रपती संभाजीमहाराज** – धर्मासाठी आत्मबलिदान १५१. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध १४९-५०. महाराष्ट्रात नवशक्तीचा उदय, औरंगजेब हतोद्यम झाला १५०. **छत्रपती शाहूमहाराज** १५५, १६९. **पेशवे** – बाळाजी विश्वनाथ–स्वराज्याच्या सनदा १५१. चढाईचे धोरण १५२. थोरले बाजीराव–निजामाचा पाडाव १५२, १५६, १६०. माळवा, बुंदेलखंड १५३. दिल्लीवर स्वारी १५४. जदुनाथ सरकार यांचे मत १६०. चिमाजीअप्पा १५३-५४. स्वराज्याचे साम्राज्य १५१, १५३, १५६, १५९. नानासाहेब–चॅथॅमशी तुलना १६१. दिल्लीची पातशाही १५४-५८, १७२. माधवराव १५७. पानपत १५७. रोहिले १५५-५७. **मराठा सरदार** – शिंदे, होळकर, जाधव, पवार, गायकवाड, पटवर्धन, भोसले, फडके यांचा पराक्रम १५०–५१, १५३. महाशक्ती १५४, १७२-७३. निष्ठाहीनता १५०. पराक्रमाची यंत्रे १६६. स्वामिद्रोह १६४. वतनासक्ती १४७, १६८. दुही, यादवी १४७, १६६, १६८-६९. शत्रूचे रक्षण १६७. मराठे रजपूत-तुलना १६१, १७३. मूल्यमापन १५९-७५. महादजी शिंदे १५८, २०१. नाना फडणीस १५८.

हिंदुपदपातशाही–१४०, १५६, १५८-६०, १७०, १७५. चौथाई सरदेशमुखी १५१-५२, १५५-५६, १५९-६० शीखांशी तुलना १९४. जपानशी तुलना १६१, १७३.

महाभारत – आर्यलक्षण ७. एक वंशीयत्व ८, ९, १०. काल १६. वर्णलक्षणे ६१. आविक्षित मरुत्त ६४. वैश्य-शूद्र मंत्री ६७. शूद्र राजा ६८. समता ७२. परिस्थिती व धर्मनिर्णय ९३. ब्रह्मक्षत्र ११७.

मिशनरी – पाश्चात्त्य, त्यांचे वाममार्ग २३०. धर्मांतर हे राष्ट्रांतर २२९. म. गांधींचे मत २३०. त्यांचे राष्ट्रद्रोही कार्य २३०. नियोगी समितीचा अहवाल २३०. युकॅरिस्ट काँग्रेस २३०. मिशनरी आणि काँग्रेस २३०-३१. आणि आदिवासी २३२. भारतीयांपुढे आदर्श २३४, २४०. त्यांचे थोर कार्य २३४-३६. लोकसेवेतून धर्मप्रसार २३५. शत्रूची विद्या २३६. फादर जिमी-आधी योगक्षेम २३६. महारोगनिवारण २३८. मातापिता २३९. आर्य मिशनरी ११, २५७.

मुस्लीम – भारतावर आक्रमण–महंमद कासीम ५१, १३५. महंमद

गझनी ५२, १०६. महंमद घोरी १०७. अखिल भारत आक्रमिला ११०. पूर्ण साम्राज्य कधीही नाही ११०. मुस्लीम व हिंदु तुलना १११, ११६, १३२, १३४, १३६, १३८, १४२, १६२, १८४. बहामनी सत्ता १३२, १३४, १३८. मुस्लीम आक्रमणाचे स्वरूप १३३. मुस्लीमात सर्व भेदलक्षणे १११. वंशभेद, पंथभेद १३७. शिया-सुनी १३७, १५६. वारशाच्या लढाया १४१. धर्म व राज्य १४२. सूफी पंथ १४२–४३. धर्मप्रसार १४२. अल्लाउद्दिन १४३. मलिक काफूर १४४, १५०. औरंगजेब १५०, १८७, १९०, १९१, १९४. मुस्लीम मुल्ला-मौलवी १८१.

रजपूत – मुस्लीम आक्रमणाचा प्रतिकार ५१, ११४-१५. एकछत्री राज्य नाही ११४-१५, १३८. अतिरेकी कुलाभिमान ११५. व्यक्तिधर्माचे पूजक ११७. राष्ट्रभावना नाही ११७. वैयक्तिक कर्तृत्व १२०. अविवेकी हौतात्म्य व त्याची फळे १३३. संघटनतत्त्वनिष्ठा नाही १३४. मुस्लीम निष्ठा १३५. आक्रमकवृत्ती नाही १३९. बाप्पा रावळ ५१, ११३. खुम्माण ५१. महाराणा प्रतापसिंह ११६. राजा भगवानदास, राजा मानसिंह, मिर्झा राजा जयसिंह ११६, १३५. राणा संग १३५. बाबर १३५.

राष्ट्रनिष्ठा – लक्षणे ३. प्राचीन भारतात उदय २४, २८. आपपरभाव २८, ३०. भूमिनिष्ठा ३०, ३१. अभिमान ३२. वेदांतील ३२-३३. पुराणातील ३३, ३४. ऐतिहासिक काळातील ३५, ३६. महाराष्ट्रात उदय १४७-४८. संघटनतत्त्व १४९. लोप १६६, २१६. नवभारतात उदय २२१, २२५. तिचे तत्त्वज्ञान ३९, ४०. समता, बंधुता ७३. कडवे रागद्वेष ३७, २२५–२६. परंपराभिमान २२३. वैयक्तिक धर्म व राष्ट्रधर्म २२८-२९. धर्मांतर हे राष्ट्रांतर २२९. राष्ट्र व परमार्थ २५१.

विजयनगर – साम्राज्याचे महत्त्व १२५, १२९, १४४. शिवाजी-मराठे यांशी तुलना १२९. धार्मिक क्रान्ती १२९-३१. स्वधर्म व स्वराज्य यांचे अद्वैत १२८, १२९, १३८, १४२. धर्म हे संघटनतत्त्व १३४. लष्करी यंत्रणा १३२-३४. आक्रमणाचा प्रतिकार १४४. विद्यारण्य-शुद्धी १२६. पीठस्थापना १२८. राजधर्माचे पुनरुज्जीवन १२९. बुद्धिप्रामाण्य १२९. वेदभाष्य १३०. राजर्षी बुक्क-जैन वैष्णव ऐक्य. सहिष्णुवृत्ती १३१. कृष्णदेवराय आक्रमकवृत्ती १३२. चाणक्यनीतीचा अवलंब १३३. रामराजा १३३. पाडाव-राक्षसतागडी १३३-३६. दक्षिणेतल्या हिंदुसत्ता १३५, १३७

नायक १३७. दुही, फितुरी १३७. शहाजी भोसले १३७.

शीख – पराक्रम १७७-७८. गुरु-नानक १७८. धर्मक्रान्ती १७८-८०. मुस्लीमांचे धर्मांतर १८१-८४. धर्म-संघटन तत्त्व १८२, २००. शीख व दिल्लीचे बादशहा १८१-८५. पृथगात्मता १८२-८३, १९७, २१०. क्षात्र-धर्माची दीक्षा १८४-८५. आत्मबलि-दान १८५-८८, १९२. तेगबहाद्दुर १८६. **गुरू गोविंदसिंग** १८२, १८६. धर्मतत्त्वांना उजाळा १८८-८९. खालसा १९०. पाच ककार १९०. लष्करी सामर्थ्य १९०. बंदा बैरागी १९४-९५. शीख ऐक्याभाव, दुही, फूट १८६, १८८, १९२, २०२. संघटना नाही २००. राष्ट्रीय भावना नाही २००, २०४. मिसली २००-२०२. शीख व रजपूत संस्थानिक १८९-९०. शीख आणि हिंदुसमाज १९३, १९७, २०३. शीख आणि मराठे १९४. कर्ते पुरुष नाहीत १९४. खालसाचे अपयश २०१. अब्दाली १९८. झमानशहा २०३. मंझा व मालवा २०३. महाराजा रणजितसिंग २०४-८. शीख आणि इंग्रज २०४-५. पाश्चात्त्यविद्या २११ यशाच्या मर्यादा २०८.

श्रीकृष्ण – भारताचे एक राष्ट्र १४, १६. शूद्रसमाजात आर्यसंस्कृतीचा प्रसार १५. संग्राहक धोरण २०

श्रीरामचंद्र – आर्यांचा राजा १२. आर्यसंस्कृतिप्रसार १२. संस्कृत भाषा १३.

स्वराज्य आणि स्वधर्म – यांचे अद्वैत ११६. रजपुतांत नाही ११६. ब्रह्मक्षत्र ११७. राजधर्म श्रेष्ठ ११७. स्वराज्यद्रोही तो स्वधर्मद्रोही ११८. यांचा संयोग–विजयनगर १२८, १२९. मुस्लीम वृत्ती ११८, १३५. मराठे १४६, १४९, १५१. महाराष्ट्रधर्म १६४, १६५. मराठा सरदार १६६, १६८, १७४, १७५. शीख १८४, १८५, १८७, १८९, २०३.

हिंदुधर्मशास्त्र व शास्त्रकार – उत्कर्षकारक धर्मतत्त्वे–बुद्धिप्रामाण्य, परिवर्तन, प्रवृत्तिवाद, समता, गुणनिष्ठ चातुर्वर्ण्य, राजधर्माचे श्रेष्ठत्व, समसंधी, पतितशुद्धी समाजनिष्ठा, सहकार्य–पृ. ५४, ५५, ५७, ६०, ६२, ६४, ९३, १२९–१३१, १४४–१४७, १६४, १६६, १७८–१८०, १८८, २०९, २११, २१३, २१९, २२१, २२२, २४१–२५०. समाजघातक धर्मतत्त्वे – शब्दप्रामाण्य, अदृष्टप्रधानधर्म समन्वय-पद्धती, अपरिवर्तनीयता, निवृत्ती, विषमता, जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्य, कलियुग-कल्पना, कर्मकांड, वैयक्तिकता, समाज-विमुखता, समुद्रगमननिषेध, अस्पृश्यता,

रूढिवाद, राजधर्माची उपेक्षा–१७, ५४, ५५, ६२, ७५–८३, ९२, ९४, ९५, ९८, ९९–१०३, ११०, ११९, १२१, १२४, १२७, १२९–३०, १४२, १४४, १४६, १७०, १७३–७४, १७७, १८०, २०२–२०५, २१३, २१९, २३२, २४१–२५०. लहरी धर्मशास्त्र – ८६-८८. निबंधकार १०४. अविवेकी धर्मधुरीण १३७, २३२-२३३. हे अधर्मशास्त्र १६३, १७१, २४८-४९.

हिंदुसमाज – हिंदू शब्दाची व्याप्ती १. हा समाज आहे काय? २, ३, ५, २५, ५६. प्राचीन जमाती ५, २४, ४८, ६८. एकरूपता आणण्याचे प्रयत्न ७, ११, १६, १८, १९–२१, २७. एकवंशीयत्व ७-१६. त्याचे समाजशास्त्र ४, २५. प्राचीन संघटनतत्त्व ३०, ३१. संघटना-सामर्थ्य ४८-४९. परकीय आक्रमणे व त्यांचा प्रतिकार ३५, ३६, ४३-४६, ५१. उत्तरकालातील प्रतिकारशून्यता ४, २५, ५२. हिंदुभारताचा अंत ७५. समान उद्दिष्ट नाही २. एक ध्येय नाही १०२. संघटनतत्त्व नाही ९९. त्याची क्षीण जीवशक्ती १०५, १०७, ११२, १२४. पडण्यासच योग्य १०८. स्वातंत्र्यरक्षणास असमर्थ ४, ५१, १०६, २५६. जडता ७८. विपरीत सहिष्णुता ८८.

ग्रंथकार-सूची

अय्यंगार डॉ. कृष्णस्वामी – पृ. १२१
आळतेकर डॉ. – ९४, ९५
ईश्वरीप्रसाद प्रा. – ११५
काणे डॉ. पां. वा. – ३१, ५९, ६०, ६४, ६५, ६९, ७५, ७७, ७८, ८१–८३, ८५, ८६, ८८, ९१, ९२, ९५, ९७, १०१
कुशावंतसिंग – २००, २०५
केतकर डॉ. श्री. व्यं. – ३, ४, ६, २५, ३०
केळकर न. चिं. – १६१
केळकर द. के. – ४, २३, ३१, ९९
कोकजे तर्कतीर्थ – ७५, ९५, ९८, ९९, १०१, १०२, १३०
खरेशास्त्री – १६१
गाडगीळ न. वि. – १७९
गुप्ता हरिराम – १६२, १७३, २०१, २०२, २०३
गंभीरानंद स्वामी – २४२
घोषल डॉ. – ६६
जगन्नाथ प्रा. – ४६
जयस्वाल डॉ. के. पी. – ३९, ५९, ७०, ७१, ७२
जावडेकर शं. द. – २१७, २२५
जोगेन्द्रसिंग – १०१, २०२
ठाकुर देशराज – १८५, १८८, १९०
दत्त डॉ. एस्. – ११८, ११९
पगडी सेतुमाधवराव – १४३
पाचलेगावकरमहाराज – २५०, २५१
पाठक श्रीधरशास्त्री–५९-६१, ६३, ८४, ८७, ९१, ९२
पुसाळकर डॉ. – १४, १५
भांडारकर डॉ. देवदत्त – ६४
मजुमदार डॉ. आर्. सी. –३६-३९, १२३, २०७
माटे प्रा. श्री. म. – १९
माडखोलकर ग. त्र्यं. – १७२
मुकर्जी – ४०, ४१
मुनशी डॉ. कन्हय्यालाल – ६५, १२६, १३२
रमाकृष्ण डॉ. एल्. – २१०
रानडे न्या. मू. – १६२, २१९
विजयनगर कमेमोरेशन हाल्यूम – १२८, १२९, १३०, १३२
वैद्य, कुलगुरु चिं. वि. – ४, ४७, ४९, ६०, ६५, ६९, ७४, ९५-९७, १०८
शास्त्री नीळकंठ – कॉंप्रिव्हेन्सिव्ह हिस्टरी – ३९, ९७
शिंदे वि. रा. – २३०, २४५

शेजवलकर प्रा. – १६१
सरकार यदुनाथ – १४७, १६१, १७२, १७४
सरदेसाई गो. स. – १४५, १५२, १५४, १६६-६८
पं. सातवळेकर श्री. दा. – ३३, ५८-६०, ६७-६९, ८४, ९१, ९५
सावरकर स्वा. वि. दा. – ४८, ७५, ७६, १५८
सिंह नरेन्द्र कृष्ण – २००
सेन क्षितिमोहन – ५९-६२, ६५, ६६, ७५, ९८
स्मिथ हिन्सेंट – ४३, ४७
हरदास बाळशास्त्री – २९, ५५, ८२, ८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर. स्वामुद्र
क्रमांक ०५५८९ दिः ....किंमत....
दादर ....२०००.... नोंद दिः २०१३७७

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क्र. ५५८९३

REFBK-0015963

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे इतर ग्रंथ

स्वभाव लेखन (पी. एच्. डी. प्रबंध)
विज्ञान प्रणीत समाजरचना
भारतीय लोकसत्ता
लोकसत्तेला दण्डसत्तेचे आव्हान
भारतीय तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म
माझे चिंतन (निबंध संग्रह)
राजविद्या (निबंध संग्रह)
पराधीन सरस्वती (निबंध संग्रह)
वैयक्तिक आणि सामाजिक (निबंध संग्रह)

आगामी

महाराष्ट्र संस्कृती
समाजवादी समाजरचना



आमची आगामी पुस्तके

मृत्युंजय (कादंबरी)
शिवाजीराव सावंत

महाराष्ट्र संस्कृती
डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे